म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. १४३०

१४३०

# महात्मा जोतिराव फुले

— धनंजय कीर

REFBK-0016040

# महात्मा जोतीराव फुले

## आमच्या समाजक्रांतीचे जनक

REFBK-0016040

१६०४०

## लेखकाचे इतर ग्रंथ

Veer Savarkar

Dr. Ambedkar : Life And Mission

Lokamanya Tilak : Father of
Our Freedom Struggle

Mahatma Jotirao Phooley
Father of Our Social Revolution

डॉ. बाबासाहेब आंबेडकर



समाजक्रांतीचे जनक महात्मा जोतीराव फुले आणि त्यांचा दत्तक पुत्र यशवंत

# महात्मा जोतीराव फुले

## आमच्या समाजक्रांतीचे जनक

धनंजय कीर

पॉप्युलर प्रकाशन मुंबई

© धनंजय कीर

पहिली आवृत्ती : १९६८, १८८९

प्रकाशक : ग. रा. भटकळ
पॉप्युलर प्रकाशन
३५ सी ताडदेव रोड
मुंबई ३४ डब्ल्यू बी

मुद्रक : वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

माझे मामा व मामी

ती. पांडुरंग काळुराम घुडे

आणि

ती. सौ. सत्यभामा पांडुरंग घुडे

यांना अर्पण

# अनुक्रम


प्रस्तावना नऊ

कुलकथा व जन्म १

नवयुगाची सुप्रभात ९

विचारांती ध्येय ठरले १९

बंडाचे निशाण रोवले २७

स्त्रीशिक्षणाच्या आद्यजनकाचा गौरव ४३

समानशिक्षण, समानसंधी ५३

प्राणावरील प्रसंग ७२

स्वातंत्र्यसमर नि विधवाविवाह ८८

भिक्षुकशाहीवर विदारक प्रकाश १०२

'गुलामगिरी' १२२

सत्यशोधक समाज १४३

प्रतिगाम्यांचा प्रतिहल्ला १६३

कामगार चळवळ व दारूबंदी १८०

सार्वत्रिक लोकशिक्षणाविषयी विचार १९५

हिंदी शेतकऱ्यांची कहाणी २०५

चळवळीचे नवे पर्व २२२

राष्ट्रीय सभा व कनिष्ठ वर्ग २३८

आधुनिक भारताचा पहिला महात्मा २५६

जोतीरावांची तत्त्वप्रणाली २७८

मृत्युसमयीची भव्यता २९१

युगसमाप्ती ३०७

सूची ३२३

# प्रस्तावना

डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांचे चरित्र मी लिहीत असता एका भेटीच्या प्रसंगी, महात्मा फुले यांचे चरित्र लिहिण्याचा आपला मानस आहे, असे त्यांनी मला सांगितले. परंतु आपली प्रकृती ढासळत असल्यामुळे ते कार्य आपल्या हातून सिद्धीस जाईल किंवा नाही अशी त्यांनी शंका प्रदर्शित केली. त्यावर मी स्वयंस्फूर्तीने उत्तरलो, 'बाबासाहेब, ते कार्य आपण करू शकला नाहीत तर मी ते तडीस नेण्याचा प्रयत्न करीन.' डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे, भगवान बुद्ध व महात्मा कबीर ह्या आपल्या दोन गुरूंच्या बरोबरीने महात्मा फुले ह्यांना आपले तिसरे गुरू मानीत. डॉ. आंबेडकरांचे ते संकल्पित कार्य नि उत्कट इच्छा ही मी यथामती नि यथाशक्ती पूर्ण केली ह्याविषयी मला कृतार्थता वाटते.

अस्पृश्य, अदर्शनीय नि अनभिगम्य समजल्या जाणाऱ्या अतिशूद्रांच्या मुलींसाठी शाळा काढणारा पहिला भारतीय, आधुनिक भारतातील स्त्रीशिक्षणाचा जनक, भारतीय स्त्रियांचे हक्क व स्वातंत्र्य ह्यांचा उद्गाता, शेतकरी व कामगार ह्यांची दुःखे नि दारिद्र्य निवारण्यासाठी चळवळ उभारणारा पहिला पुढारी, जातिभेद संस्थेवर कडाडून हल्ला चढवून मानवी समानतेची घोषणा करणारा पहिला लोकनेता, सामान्य जनतेच्या दुःखाला अन् दैन्याला वाचा फोडणारा पहिला महात्मा आणि सत्यमेव जयते ह्या दिव्य तत्त्वाने भारून गेलेला

खरा सत्यशोधक अशा ह्या नरोत्तमास महात्मा गांधींनी खरा महात्मा म्हणून गौरवावे, वीर सावरकरांनी समाजक्रांतिकारक म्हणून प्रशंसावे, भारतभूषण डॉ. आंबेडकरांनी गुरू मानून त्याचा जयजयकार करावा आणि न्यायमूर्ती रानडे यांनी त्याचे सहकार्य घ्यावे यावरूनच जोतीरावांच्या ऐतिहासिक भूमिकेची सार्थकता व श्रेष्ठता पटण्यासारखी आहे.

सुशिक्षित पण स्वार्थी अशा वरिष्ठ वर्गांनी जोतीरावांच्या विरुद्ध त्या काळी विलक्षण ओरड केली. त्यांच्या पायाखालची वाळू आता घसरली आहे. सर्व राष्ट्राने आता जोतीरावांचा, सामान्य जनतेच्या युगाचा प्रेषित अन् समाजक्रांतिकारक म्हणून गौरव केला आहे.

जोतीरावांनी ब्राह्मणीधर्माच्या स्वार्थी तत्त्वांवर जो हल्ला चढविला तो अचूक नि अजोड होता. ब्राह्मणीधर्माची परिणती सामाजिक, धार्मिक नि आर्थिक विषमतेत होऊन समाजव्यवस्थेत ब्राह्मणांना प्रतिष्ठा, सत्ता नि देवपण प्राप्त झाले होते. त्यांच्या सत्तेचे मूळ त्यांच्या स्मृती, श्रुती नि पुराणे यांत होते हे जाणून त्यांच्या मानसिक गुलामगिरीतून कनिष्ठ वर्गांची मुक्तता करण्यासाठी त्यांवर जोतीरावांनी हल्ला चढविला आणि सामाजिक न्याय, बुद्धिप्रामाण्य व मानवी समानता ह्या तत्त्वांवर समाजाची उभारणी करण्यासाठी लढा केला.

ब्राह्मणीधर्माचे नि ग्रंथांचे खरे अंतरंग एकट्या जोतीरावांनीच उघडे केले असे नव्हे, तर त्यांच्या मृत्यूनंतर स्वामी विवेकानंद ह्यांच्यासारख्यांनीही, प्रत्यक्ष आधार दाखवून ते स्पष्ट केले. स्वामी विवेकानंद ह्यांनी म्हटले आहे : 'जेव्हा जेव्हा ब्राह्मणांनी ग्रंथ लिहिले तेव्हा तेव्हा त्यांनी दुसऱ्यांना सर्व अधिकार नाकारले आणि व्यासाने तर गरीब शूद्रांना ठकविण्यासाठी वेदांचा दिशाभूल करणारा अर्थ लाविला.'

जोतीरावांचे तत्त्वज्ञान मानवाची प्रतिष्ठा, धार्मिक सहिष्णुता, मानवी हक्क, मानवी समानता यांचा संदेश देत राहिले आहे. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' ह्या ग्रंथानंतर भारताच्या ध्येयांचे, भूतकाळातील घटनांचे नि तत्त्वांचे संशोधन सुरू होऊन आता आत्मनिरीक्षण, तत्त्वचिकित्सा आणि मूल्यमापन ह्यांद्वारा नव-मंथन सुरू झाले आहे. त्या संदर्भात जोतीरावांच्या कार्याचा अभ्यास होणे योग्य आहे.

जोतीरावांच्या चरित्राची साधने गोळा करीत असता जे काही माहितीचे दुवे सापडले ते जोडून, अस्थिसंधान करून उभारलेल्या सांगाड्यात त्यांच्या विचारांचा प्राणवायू मंचरवून मी त्यांची मूर्ती सजीव नि साकार केली आहे. चरित्रसाहित्य नि तंत्र ही एकजीव करून त्या काळाच्या पार्श्वभूमीवर ती मूर्ती उभी केली आहे. त्यामुळे त्या काळाची सुगम, सम्यक कल्पना तर यावी आणि जोतीरावांच्या मानवी मनाचे व्यापार स्पष्टपणे दिसून त्यांचे सर्वांगीण जीवनदर्शन तर घडावे अशी दक्षता बाळगली आहे.

---

१. The Complete Works of Swami Vivekanand, Mayavati Memorial Edition, vol. IV (1948), p. 305.

मी तीन वर्षांपूर्वी 'महात्मा जोतीराव फुले : फादर ऑफ् अवर सोशल रेव्हल्यूशन' हा इंग्रजी चरित्रग्रंथ प्रसिद्ध केला. त्यावर अभिप्राय देताना भारतातील प्रमुख वर्तमानपत्रांनी जोतीरावांचे कार्य व तत्त्वप्रणाली यांचा विचार करता ते भारतातील एक महापुरुष होते असा निर्वाळा दिला, ते पाहून मला परम संतोष झाला. उपरोक्त वृत्तपत्रांपैकी 'सन्डे स्टॅन्डर्ड' ह्या वृत्तपत्राने ह्या चरित्रग्रंथासंबंधी आपले मत व्यक्त करताना म्हटले की, 'एकोणिसाव्या शतकातील भारताचा एक महान सुपुत्र आणि आमच्या समाजक्रांतीचा जनक असे ज्याला खरोखरीच म्हणता येईल अशा व्यक्तीचे समग्र जीवनदर्शन घडविण्यात कीरांनी यश मिळविले आहे.' याशिवाय मुंबईचे 'टाईम्स ऑफ इंडिया', अंबाल्याचे 'ट्रिब्यून', कलकत्त्याचे 'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड', नागपूरचे 'हितवाद' प्रभृति वृत्तपत्रांनीही जोतीरावांच्या थोरवीचे गुणवर्णन नि चरित्रग्रंथाचे अभिनंदन केले आहे.

मी जे इंग्रजी चरित्र लिहिले त्याचा हा अनुवाद नाही. जो वाचक हे समग्र चरित्र बारकाईने वाचील त्याला ह्यात नवीन माहिती, नवीन विचार नि नवीन मीमांसा आढळून येईल. आजपर्यंत जोतीरावांची त्रोटक अन् छोटी छोटी अनेक चरित्रे प्रसिद्ध झाली आहेत. परंतु त्यांतील काहींत आधुनिक चरित्राच्या मांडणीसाठी जे संशोधन नि पद्धती अनुसरली पाहिजे त्याचा अभाव असल्यामुळे त्यांत जोतीरावांचे शिक्षण, शिक्षणकार्याचा काळ, कार्य, सत्कार व मृत्युदिन यांविषयी चुकीची माहिती दिलेली आढळते.

जोतीरावांचा सरकारने केलेला सत्कार केव्हा नि कुठे झाला, कोणाच्या हस्ते झाला, त्या प्रसंगी वृत्तपत्रांनी कोणते विचार व्यक्त केले, जोतीरावांच्या शाळेतील कार्यावर प्रकाश टाकणारी वृत्तपत्रांतील पत्रे, शेतकऱ्यांची नि केशवपनबंदीची चळवळ, ईस्ट इंडिया कंपनीकडे राज्यपालाने जोतीरावांच्या शाळांविषयी धाडलेला वृत्तांत, दारूचे व्यसन फैलावू नये म्हणून जोतीरावांनी केलेले प्रयत्न, त्यांचे शिक्षण विषयक विचार, त्यांनी सुधारकांना ग्रामण्याच्या वेळी केलेले साह्य, मामा परमानंद यांचे संबंध, जोतीरावकृत शेतकऱ्याचा असूड, त्यांच्या अखंडांची (अभंगांची) माहिती, पुरोहितांशी झालेले झगडे, वृत्तपत्रांनी प्रसिद्ध केलेले जोतीरावांवरील मृत्युलेख इत्यादी माहिती जोतीरावांच्या चरित्रात पहिल्यांदाच प्रसिद्ध होत आहे.

जोतीरावांचे समकालीन असलेल्या काही समाजसुधारकांवर नव प्रकाश टाकावा लागला आहे. समाजाचे हितचिंतक व मार्गदर्शक असणाऱ्या त्या महाभागांविषयी मनात नितांत आदर असूनही सत्यरक्षणाच्या नि ऐतिहासिक मूल्यमापनाच्या दृष्टीने ते कर्तव्य मला करावे लागले.

ह्या चरित्रग्रंथात १८७० सालच्या आधीच्या मराठी ग्रंथांतील व मराठी वृत्तपत्रांतील उताऱ्यांचे शुद्धलेखन शक्यतो मूळचेच ठेवले आहे. १८७० सालच्या नंतरचे उतारे नवीन शुद्धलेखनानुसार दिले आहेत.

ह्या चरित्राची साधने मिळविण्यात मला अनेक व्यक्तींनी साहाय्य केले. त्यांच्या नावांचा खास उल्लेख मी इंग्रजी चरित्राच्या आरंभी केलेला आहे. तरीसुद्धा महसूलमंत्री श्री. बाळासाहेब देसाई, आचार्य अत्रे, प्रबोधनकार ठाकरे, ह. मो. जोशी आणि वि. द. घाटे यांचे पुन्हा मनःपूर्वक आभार मानल्याशिवाय राहवत नाही.

ह्या चरित्रलेखनासाठी काही महत्त्वाची साधने देऊन श्री. पंढरीनाथ पाटील यांनी मला उपकृत केले आहे. पाटीलकृत फुलेचरित्र आणि काही इतिहाससंशोधकांशी झालेल्या चर्चा यांवरून मला अनेक गोष्टी शोधून काढता आल्या. ह्या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे. ह्या मराठी चरित्राचे हस्तलिखित श्री. गं. दे. खानोलकर यांनी अत्यंत आत्मीयतेने वाचून दिले. तसेच प्राध्यापक डॉ. स. गं. मालशे यांनी चरित्राची उपमुद्रिते तपासण्यात अत्यंत आपुलकीने साहाय्य केले. ह्या दोघांचे मी अंतःकरणपूर्वक आभार मानतो. ज्या व्यक्तींनी ह्या ग्रंथाची मुद्रणप्रत तयार करून दिली, त्या व्यक्तींचे मी कृतज्ञतापूर्वक आभार मानतो. ज्या नियतकालिकांतून, ग्रंथांतून नि वृत्तपत्रांतून मी ह्या चरित्रग्रंथासाठी उतारे घेतले आहेत त्यांचे ऋण मी प्रकटपणे मान्य करतो. मौज प्रिंटिंग ब्यूरोचे श्री. विष्णुपंत भागवत ह्यांचाही मी फार आभारी आहे.


पॉप्युलर प्रकाशनचे श्री. रामदास भटकळ यांचा राष्ट्रीय वाङ्मयाकडे पाहण्याचा व्यापक नि बाणेदार दृष्टिकोण, मजविषयी त्यांनी दाखविलेली आस्था, माझे स्नेही, वाचक आणि चाहते यांनी मला दिलेला हार्दिक पाठिंबा ह्यांमुळे माझे संकल्पित चरित्रग्रंथ मी लवकरच प्रसिद्ध करू शकेन असा मला दृढ विश्वास आहे.

धनंजय कीर

७७ भागेश्वर भुवन
ले० दिलीप गुप्ते पथ
माहीम, मुंबई १६
दिनांक २६ जानेवारी १९६८



ध्येयाचा साक्षात्कार
झालेले तरुण जोतीराव



जोतीरावांचे हस्ताक्षर



जो हौद जोतीरावांनी अतिशूद्रांना खुला केला तो हाच



जोतीरावांचे घर— त्याचे फक्त छप्पर बदललेले आहे



रामचंद्रपंत धामणस्कर
जोतीरावांचे शिष्य; पुढे बडोद्याचे दिवाण झाले



रामय्या व्यंकय्या आय्यावारू
सत्यशोधक चळवळीचे एक आधारस्तंभ



नारायणराव लोखंडे
जोतीरावांचा उजवा हात आणि भारतीय
कामगार चळवळीचा जनक



डॉ. संतूजी लाड
सत्यशोधक समाजाचे निष्ठावंत नेते



कृष्णराव भालेकर
प्रभावी वक्ता आणि लेखक; कनिष्ठ वर्गांचा त्राता



डॉ. विश्राम रामजी घोले
प्रख्यात डॉक्टर आणि सत्यशोधक
चळवळीचे पुरस्कर्ते



तुकाराम तात्या पडवळ
'जातिभेद विवेकसारा'चे कर्ते व सामाजिक समतेचे कैवारी



महाराज सयाजीराव गायकवाड
आदर्श लोकपाल



वासुदेव बाबाजी नवरंगे
'बोले तैसा चाले' याचे प्रतीक



मामा परमानंद
महाराष्ट्राचे 'राजकीय ऋषी'

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १६०४७
मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम.......................... दि: ......................
क्र.......................... नों: दि: ......................

# कुलकथा व जन्म

जोतीराव फुले यांचे कुलपुरुष कटगुण गावी राहत असत. हा गाव साताऱ्यापासून सुमारे पंचवीस मैलांवर आहे. जोतीरावांचे पणजोबा ह्या गावचे चौगुले होते. चौगुला म्हणजे गावच्या बारा बलुत्यांपैकी एक गावकामगार. पाटील व कुलकर्णी हे गावचे दोन प्रमुख अधिकारी असत. कुलकर्णी हा बहुधा ब्राह्मणच असावयाचा. त्या दोन ग्रामाधिकाऱ्यांच्या हाताखाली ग्रामसेवक अनेक प्रकारची कामे करीत. चौगुला हा अधिकाऱ्यांच्या दप्तराची ने-आण करी; सारावसुली करण्यात आणि कापणीच्या हंगामात पिकाची पाहणी करण्यात त्यांना साह्य करी.

जोतीरावांचे घराणे हिंदुसमाजातील क्षत्रिय-माळी जातीचे. त्यांचे पणजोबा आपल्या शेतीच्या तुटपुंज्या उत्पन्नावर कुटुंबाचा कसाबसा उदरनिर्वाह करीत. त्यांचे उपनाव होते गोऱ्हे. एक दिवशी कटगुणच्या ब्राह्मण कुलकर्ण्याशी त्यांची बोलाचाली झाली. मोठा खटका उडाला. कुलकर्णी हा प्रायः कावा नि कपट यांची गाळीव मूर्तीच असावयाचा. जेथे कुलकर्णीआप्पा उगवायचा तेथे सत्य, न्याय आणि वैयक्तिक स्वातंत्र्य ही मावळावयाची. गावाच्या बंदोबस्ताचे दायित्व पाटलावर असे. परंतु इतर व्यवहारात तो बहुधा कुलकर्ण्याची री ओढावयाचा.

उपरोक्त खटल्यामुळे कटगुणच्या कुलकर्ण्यांने चौगुल्याचे काम करणाऱ्या जोतीरावांच्या पणजोबाचा छळ मांडला. त्या गावात त्याला शांतपणे व अब्रूने जीवन जगणे त्याने अशक्य करून टाकले. अगदी निरुपाय म्हणून निराशेच्या भरात त्याने त्या कुलकर्ण्यास कंठस्नान घातले आणि त्या क्षणीच कटगुणला रामराम ठोकला.

त्यानंतर चौगुल्याचे कुटुंब पुणे जिल्ह्याच्या पुरंदर तालुक्यातील खानवडी गावी नांदू लागले. तेथे त्याला एक मुलगा झाला. त्याचे नाव शेटीबा. बापाचा तो एकुलता एक मुलगा. त्यात बापाची चलती. आणि चलती तिकडे भलती. त्यामुळे तो लाडावला. तशात बुद्धीने तो सामान्य नि भोळसट असल्यामुळे फारच उधळ्या बनला. शेवटी उधळ्या माणसाचे जे होते तेच त्याचे झाले. तो भिकेस लागला. अशा कंगाल स्थितीत असताना, त्याने कुटुंबपोषणाची काही व्यवस्था व्हावी ह्यासाठी कुटुंबासहित पुणे गाठले.

शेटीबाला राणोजी, कृष्णा व गोविंद असे तीन मुलगे झाले. वडिलांच्या दैन्यामुळे त्या मुलांना कोवळ्या वयातच भाकरीकरिता चाकरी करावी लागली. आरंभी ते एका सावकाराच्या शेळ्या राखण्याचे काम करू लागले. त्या कामाचा प्रत्येकाला एक पै रोज मिळे. पुढे ते मुलगे थोडे जाणते झाल्यावर त्यांच्या धन्याने त्यांना आपल्या फुलांच्या धंद्यात नोकरीस ठेविले. त्या धंद्यातील खुबी व कसब यांचे त्यांना भरपूर ज्ञान झाले. आणि अधिकस्याधिकं फलं या न्यायाप्रमाणे त्यांनी अधिकाधिक कष्टाने नि कळकळीने काम करून त्या धंद्यात आपला स्वतंत्रपणे चांगला जम बसविला. थोड्याच दिवसांत ते नावारूपास आले.

त्या तिघा बंधूंचा धंद्यातील लौकिक पेशव्यांच्या कानांवर गेला. पेशव्यांनी त्यांना आपल्याकडे फुले आणि फुलांच्या बनविलेल्या वस्तू पुरविण्याची आज्ञा केली. ते पेशव्यांसाठी फुलांच्या गाद्या, चटया, उश्या आणि पोशाख बनवीत असत. होता होता पेशव्यांनी त्यांच्याकडे आपल्या एका बागेचेही काम सोपविले होते. त्यांच्या ह्या उपयुक्त, गोड व सुवासिक सेवेबद्दल खूष होऊन पेशव्यांनी त्यांना पस्तीस एकर जमीन इनाम दिली. आता त्यांना लोक 'फुले' म्हणून संबोधू लागले. तेव्हापासून त्यांनी आपले 'गोऱ्हे' हे उपनाव टाकून देऊन 'फुले' हेच आडनाव धारण केले.

क्षत्रिय-माळी जात ही कनिष्ठ थरांतील शेतकरीवर्गापैकी. माळी फुलझाडे व फळझाडे यांची लागवड करीत. भाजीपाल्याचा नि फुलांचा धंदा करीत. ह्या जातीच्या नावामागे काही विशेष इतिहास होता असे नाही. तसे काही वैशिष्ट्यही होते असेही नाही.

तथापि, माळी जातीच्या गाठी एका थोर संताचे पुण्य होते. तो संत महाराष्ट्रात इ. स. १२५० च्या सुमारास उदयास आला. त्याचे नाव सावता माळी. संतकवींच्या श्रेणीत महान स्थान प्राप्त झालेल्या नामदेवाचा तो समकालीन. सावता माळी पंढरपूर-जवळील एका खेड्यात राहत असे. तो पंढरपुरच्या विठोबाचा परम भक्त. आपल्या मळ्यात भाजीपाला, ऊस व कांदे यांची लागवड करीत असताना,

कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी ॥ १ ॥
लसूण, मिरची, कोथिंबीरी । अवघा झाला माझा हरी ॥ २ ॥

अशी भावना बाळगून तो संत विठुरायाच्या भक्तीत तल्लीन होऊन जाई. तो देवासंगे बोलतो चालतो, अशी त्या काळच्या लोकांची समजूत होती.

आपल्या मुलांचा धंद्यात चांगला जम बसला आहे असे पाहून शेटीबा फुले यांना अतिशय समाधान झाले. थोड्या दिवसांनंतर त्यांचे त्या सुस्थितीतच देहावसान झाले. राणोजी, कृष्णा आणि गोविंद हे तिघे मुलगे आपला धंदा नेमाने नि निष्ठेने करीत होते. थोरला मुलगा राणोजी हा दुसऱ्या दोन भावांपेक्षा वयाने बराच मोठा होता. शिवाय तो कावेबाज नि स्वार्थी होता, असे दिसते. ह्या तिघा बंधूंच्या सेवेबद्दल पेशव्यांनी दिलेली ती इनाम जमीन त्या धूर्ताने आपल्या एकट्याच्याच नावावर सरकारी कागदपत्रांत चढवून घेतली.

शेटीबाच्या मृत्यूनंतर हे तिघे भाऊ झगडे नावाच्या आपल्या वडिलांच्या मामाकडे राहत असत. झगडे यांच्या धनदौलतीवर राणोजीचा डोळा असल्यामुळे, आपल्या दोन्ही बंधूंना झगडे यांनी घराबाहेर काढावे, असा त्याने डाव रचला. त्याप्रमाणे त्याने झगड्यांकडून त्या दोन्ही बंधूंना घराबाहेर काढविले आणि आपली तुंबडी भरली. असे झाले तरी कृष्णा व गोविंद ह्या दोघांनी एकजुटीने व बंधुभावाने वागून आपला धंदा नेटाने सुरू ठेविला.

**. २ .**

मध्यंतरी स्वच्छंदी, नालायक, दुराचारी नि पराक्रमहीन रावबाजीची पेशवाई लयास गेली आणि इंग्रजांचे निशाण शनिवारवाड्यावर फडकले. ह्या भयंकर स्थित्यंतरामुळे पेशव्यांच्या सत्तेवर अवलंबून असलेल्या महाराष्ट्रातील शेकडो कुटुंबांचे भवितव्य उलटे-पालटे झाले. फुले कुटुंबाचेही दिवस फिरले. राणोजीने त्या दोघा बंधूंना ठकविल्यामुळे कृष्णा व गोविंद ह्यांना उदरनिर्वाहासाठी पुन्हा अहोरात्र झगडावे लागले.

गोविंद पुण्याजवळील एका खेड्यातील मळ्यात काम करी. आपल्या मळ्यातील भाजीपाला विकण्यासाठी त्याने पुण्यात एक भाजीपाल्याचे दुकान घातले. त्यावर त्याची परिस्थिती सुधारली. धंद्यात जम बसल्यावर गोविंद आपल्या भाजीपाल्याच्या दुकानावरच योगक्षेम करू लागला. चिमणा नावाच्या एका माळी मुलीशी त्याने विवाह केला. ती होती पुण्याजवळील धनकवडी गावातील झगडेपाटील नावाच्या गृहस्थाची मुलगी. चिमणाबाईला दोन पुत्र झाले. पहिल्याचे नाव राजाराम. जोती होते दुसऱ्याचे नाव. जोतीचा जन्म १८२७ साली झाला. जोती म्हणजे ज्योत!

गोविंदरावांनी मराठेशाहीच्या पडत्या काळातील अनेक घटना प्रत्यक्ष पाहिल्या होत्या. पाहता पाहता पुण्याचे वैभव व सत्ता लुप्त झाली होती. पुण्यातील ब्राह्मणी राज्याचा अस्त झाल्यामुळे ब्राह्मणांवर मोठेच संकट कोसळले.

उत्तर पेशवाईत ब्राह्मणांना, विशेषतः चित्पावन ब्राह्मणांना, शासनसंस्थेत नि सामाजिक क्षेत्रात उच्चपदे देण्यात येत असत. इतर जातीतील पुरुष कितीही कर्तबगार, लायक आणि पराक्रमी असले, तरी त्यांना खालचा दर्जा देणे हीच त्या राज्याची प्रथा असे. पोटार्थी भट व धनार्थी स्तुतिपाठक रावबाजी हा कृष्णाचा वा शंकराचा अवतार आहे असे म्हणून त्याची खोटी स्तुती करीत. त्या ब्राह्मणी राज्यात ब्राह्मण आपणांस राज्यकर्ता वर्ग समजत. साहजिकच ते सर्व कारभारातले जास्तीत जास्त सवलती नि फायदे उपटीत. सरकारी सारा आकारणीत ब्राह्मणांना भरमसाट सूट मिळे. ब्राह्मण लोक आपल्या जमिनीचा सारा इतर लोकांच्या तेवढ्याच जमिनीच्या साऱ्याच्या निमपट[1] किंवा त्याहूनही कमी करून घेत. ब्राह्मण गुन्हेगारांना निर्बंधाप्रमाणे जी शिक्षा होईल ती त्यांना देण्यात येत नसे. त्यांना कमीत कमी शिक्षा व्हायची. सर्व निर्बंध व सर्व मक्तेदारी ब्राह्मणांच्या हितासाठीच वापरण्यात येत असे.

दानधर्माचा वर्षाव ब्राह्मणांवरच करण्यात येई. रावबाजी जवळजवळ चाळीस हजार भिकार नि लोभिष्ट ब्राह्मण भिक्षुकांसाठी लाखो रुपयांचा चुराडा करून जेवणावळी सुरू ठेवी. त्यांना दक्षिणा देण्यात प्रजेचे लाखो रुपये उधळी. मग ते ब्राह्मण विद्वान असोत वा नसोत. गरीब जनतेकडून वसूल केलेला कर हा असा उधळला जाई. दुष्काळात[2] रावबाजीचे सरकार केवळ ब्राह्मणांनाच साह्य करी. ब्राह्मणास केला तर तो धर्म; परंतु आंधळ्या कुळंब्यास वा लंगड्या महारास केला तर तो धर्म नव्हे, अशी त्या काळी सर्वसाधारणपणे समजूत असे. रावबाजीच्या भोजनभाऊ ब्राह्मणांच्या जेवणावळी चालत असताना त्यामधून जो गलगलाट निर्माण होई, जो कल्लोळ उठे, त्याने पुण्याचे सर्व आकाश दुमदुमून जाई. पायलीची खाईल क्षिप्रा। पालखी द्यावी तया विप्रा। अशी त्यावेळी एक लोकप्रिय म्हण होती. यावरून रावबाजीच्या पुण्याची कल्पना येईल.

शेतकऱ्यांना नि शेतांवर राबणाऱ्या कामकऱ्यांना पेशव्याचे अधिकारी व त्याचा दत्तक भाऊ अमृतराव हे छळून हैराण करीत असत. त्यांनी मागितलेली रक्कम शेतकऱ्यांना देता आली नाही तर तो चांडाळ अमृतराव त्यांच्या मुलांच्या अंगावर उकळत्या कढईतील तेल ओती.[3] तवे तापवून शेतकऱ्यांना त्यांवर उभे करीत. त्यांना 'तक्त्यांत पिळीत.' शेतकऱ्यांच्या पाठीवर अमानुषपणे मोठमोठाले दगड ठेवण्यात येत. त्यांना ओणवे करून त्यांच्या नाकाखाली मिरचीचा धूर देण्यात येई. त्यांच्या कानांत व बेंबीत बंदुकीची दारू घालून उडवीत. अधर्मी अमलाचा जोर झाला की कृत्ये घोर होतात हेच खरे.

राज्यकर्त्यांना वाटे, कनिष्ठ वर्गाचे लोक हे आपल्या कुटुंबांच्या व जातीच्या सेवेसाठी

१. The Miscellaneous Writings of the late Mr. Justice M. G. Ranade, p. 350-52

२. अॅक्वर्थ व शाळिग्राम, ऐतिहासिक पोवाडे पृ. १८६

३. संपादक, टिकेकर, श्री. रा., लोकहितवादींची शतपत्रे, पृ. ३२०-२१.

जन्मलेले आहेत. त्यांनी धान्य पिकवावे, कापड विणावे आणि कडक उन्हामध्ये कष्ट करावे. शेतकऱ्यांची स्थिती तर अत्यंत केविलवाणी झाली होती. शेतात मरेमरेतो काम करून सरकार व सावकार यांची भर करावी आणि जे उरेल ते आपल्या कुटुंबपोषणासाठी ठेवावे. ते संपले म्हणजे पुन्हा गुरेढोरे, बायकापोरे, घरेदारे, शेतीपोती, आणि गाडगी-मडकी गहाण ठेवून पैसे काढावे. सावकार रीतसर दस्तऐवज करून घेऊन ऋणकोच्या मुलांना नि मुलींनाही गहाण लावून घेत.[४] आणि त्या मूळ रकमेवरील कधीही न फिटणाऱ्या व्याजाच्या रकमेवर आपल्या घरी पिढ्यानपिढ्या गुलाम म्हणून राबवीत असत.

त्या काळी सावकार बहुधा ब्राह्मणच असत. सरकारी अधिकारी त्यांच्या आधीन असत. त्यामुळे शेतकऱ्याची मालमत्ता ते वाटेल तेव्हा ताब्यात घेत. त्यांच्या डोकीवर वा छातीवर धोंडा ठेवून किंवा त्यांना ओणवे करून पैसे वसूल करीत. क्षुल्लक रकमेसाठी त्यांच्या गुराढोरांचा लिलाव करीत, शेते जप्त करीत, त्यांना विहिरीस मुकवीत. त्यांना सावकार हा साक्षात यमराज वाटे. शेवटी त्या गरीबांपैकी अनेकजण खंगून खंगून, दारुण निराशेत देह ठेवीत किंवा हाय हाय करीत प्राण सोडीत.

आपल्या राजकीय नि जातीय वर्चस्वामुळे ब्राह्मण इतर जातींना कमी लेखीत. त्यामुळे ग्रामण्ये गाजली. कलह वाढले होते. महारमांगांना तर गळ्यात मडकुले आणि कंबरेस झाडाची फांदी बांधून, दिवसा माणसाची सावली मोठी पडत नसते तेव्हा पुणे नगरीत फिरण्याची मोकळीक असे.[५] फांदी त्या दीनांची पावले पुसून टाकी म्हणजे ब्राह्मणभूदेवांना त्यांचा विटाळ होत नसे. मडकुले त्यांच्या थुंकीचा विटाळ टाळी.

. ३ .

रावबाजीच्या पेशवाईत स्त्रियांच्या बाबतीत अशाच वाईट गोष्टी घडल्या. त्या दुराचाऱ्याच्या अपेक्षित भेटीच्या भयामुळे वाईतील अनेक महिलांनी विहिरींत उड्या टाकून जीव दिला होता.[६] तो सदानकदा बदफैली स्त्रियांच्या घोळक्यात वावरे. त्याच्या राजवटीत एका ब्राह्मणबाईने बुधवारवाड्यापासून विश्रामबागवाड्यापर्यंत भर रस्त्यातून दिवसा विवस्त्र चालून दाखवून पैज जिंकली होती असे म्हणतात.[७] अशा स्त्रिया त्या पोखरत नि कोसळत चाललेल्या समाजाची प्रतीके होऊन राहिल्या होत्या. त्या समाजाने राष्ट्रद्रोह नि राक्षसी महत्त्वाकांक्षा यांना जन्म दिला होता. अट्टल दारुड्यांचे फाजील लाड केले होते. तो समाज जुगारी अड्डे चालवीत असे. तो लाचलुचपतीने नि भ्रष्टाचाराने अतिशय बरबटलेला होता.

---

४. जोशी, ना. वि., पुणें शहराचें वर्णन, पृ. १०–११.

५. Ghurye, Dr. G. S, Caste And Class in India, p. 166.

६. संपादक, टिकेकर, श्री. रा., लोकंहितवादीचीं शतपत्रें, पृ. १०.

७. पंतप्रतिनिधी, भ. श्री., ऊर्फ बाळासाहेब, आत्मचरित्र खंड १, पृ. ५०.

त्या काळात शाक्तपंथी लोकांनी तर पुण्यामध्ये देवदेवतांची नग्नपणे पूजा करण्याची प्रथा पाडून अगदी धुडगूस घातला होता. त्या पंथात ब्राह्मण लोकांचा भरणा मोठा असे. अनाचारांची कमाल कराल तितके शंकराला अधिक प्रिय व्हाल, अशी त्या पंथाची अघोर शिकवणूक असे. रावबाजीच्या पुण्यातील वातावरण गतयुगातील कोणत्याही कुजत गेलेल्या साम्राज्याच्या राजधानीतील वातावरणाप्रमाणे प्रजाहितद्रोही नि नीतिभ्रष्ट झाले होते. पडिक शेतात जसे रान फोफावते तसा त्या नीतिभ्रष्ट राज्यात दुराचार फोफावला होता. अब्रूदार नि नेकीच्या सरदारांवर पुणे सोडून जाण्याची पाळी आली. नीतिभ्रष्ट मुत्सद्दी नि निर्लज्ज सरदार हेच काय ते त्या कोसळत्या राज्यामध्ये रावबाजीची हाजी हाजी करून बढती मिळविण्याचा खटाटोप करीत राहिले. त्या दुर्गुणांचे दृश्य इतके भयानक नि हिडीस होते की, रॉबर्टसन[८] नावाच्या पहिल्या इंग्रज जिल्हाधिकाऱ्याला लोक इतके नीतिभ्रष्ट झालेले पाहून धक्काच बसला.

अशा प्रकारे एकंदर सर्व समाजाचे नैतिक जीवन कुजून, सडून कोंडले गेले होते. सांस्कृतिक गुणांचा अत्यंत ऱ्हास झाला होता. धार्मिक वातावरण सडले होते. तो कालखंड बौद्धिक नि शारीरिक थकव्यामुळे पूर्णतया अवनतीचा नि पुरा ऱ्हासाचा ठरला. अशा परिस्थितीत जेव्हा १८१८ साली पेशवाई कोलमडून पडली तेव्हा रावबाजीच्या नीतिभ्रष्ट आश्रितांशिवाय डोळ्यांतून अश्रू ढाळणारे दुसरे फारसे लोक नसावेत. रावबाजीच्या सैनिकांनी अवघ्या छत्तीस तासांत इंग्रजांची नोकरी पत्करली.[९] माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यांस जे मानपत्र देण्यात आले त्यात स्पष्ट लिहिले होते की, 'तुम्ही राज्य घेतले हे बरे जहाले.'[१०] रावबाजीचे राज्य गेल्यावर स्त्रियांनी उद्गार काढले की, 'बाजीरावाचे आता पुण्यास राज्य नाही, बरे झाले! चांगले मेल्याचे तळपट झाले. मोठा चांडाळ होता तो.'[११]

राज्यकर्त्यांच्या स्वार्थाची पोळी पिकली म्हणजे राज्याची होळी झालीच म्हणून समजावे. त्याप्रमाणे रावबाजीची ती भयंकर, प्रजाहितद्रोही नि जुलमी राजवट एकदाची संपुष्टात आली. जिवाला नि जिंदगीला त्या बेबंदशाहीत सुरक्षितता नसे. न्यायाची चाड नसे. अन्यायाची चीड नसे. न्याय पैशाच्या बाजूने होत असे. दिवाणी खटले ग्रामपंचायतींत चालत. फौजदारी न्यायालयात पक्षपात होत असे. सतत चालू असणारे दरोडे आणि अंतर्गत धुमाकूळ घालत असलेले दंगे ह्यांमुळे जनता त्रस्त झाली होती. तिने आता सुटकेचा निःश्वास सोडला. पिढ्यानपिढ्या चाललेल्या दंगली शांत झाल्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या कष्टाची फळे शांततेने गोळा तरी करता येऊ लागली. राज्यकर्त्यां

---

८. Chokshi, R. D, The Last Phase, pp. 220-21

९. वाळिंबे, रा. शं., एकोणिसाव्या शतकांतील महाराष्ट्राची सामाजिक पुनर्घटना, पृ. ३४.

१०. संपादक, टिकेकर, श्री. रा., लोकहितवादींचीं शतपत्रें. पृ. ७५.

११. कित्ता पृ. १०,

वर्गांच्या दुष्कृत्यांमुळे त्यांच्या मनातील देशाभिमानाचा कोंडमारा झाला होता.

परंतु हे राजकीय स्थित्यंतर जहागिरदारांपेक्षाही ब्राह्मणांना अधिक जाचक वाटू लागले; कारण त्यांचे तथाकथित देवदत्त अधिकार नाकारण्यात येऊन त्यांना नव राजवटीत इतर सर्वसामान्य लोकांप्रमाणे वागविण्यात येऊ लागले. आतां इतर सामान्य जनाप्रमाणे निर्बंध पाळणे ब्राह्मणांना भाग पडू लागले. न्यायदेवतेपुढे सर्व माणसे समान लेखण्यात येऊ लागली. हे तत्त्व पेशवाईतल्या अनेक पिढ्यांना परिचित नव्हते. आता ते रूढ होऊ लागले.

शिवाजी महाराजांनी संस्थापिलेले मराठी राज्य पहिल्या चार प्रतापी पेशव्यांच्या नेतृत्वाखाली विस्तार पावले. मराठ्यांनी मोंगल साम्राज्याचा पूर्ण पाडाव करून मुसलमानांच्या गुलामगिरीतून हिंदूंना मुक्त केले. परंतु शाहूच्या मृत्यूनंतर शेवटच्या पेशव्यांच्या पेशवाईत मराठी राज्याचे रूपांतर पूर्णपणे ब्राह्मणी राज्यात झाले. शिवाजीने संस्थापिलेले राज्य चालविण्याची संधी ब्राह्मणांना जवळजवळ शंभर वर्षे लाभली. परंतु त्यांनी शिवाजीची न्यायप्रधान व गुणप्रधान राज्यपद्धती मोडून पेशवाईत ती अन्याय-प्रधान नि जातिप्रधान बनविली. त्यामुळे अंतर्गत कलह वाढले; सांघिक रीत्या राष्ट्रकार्य पुढे झाले नाही. जगातील नवीन विचार, देशकालाला अनुरूप अशी अद्यावत देशरक्षणाची साधने ह्यांविषयी राज्यकर्ते जागरूक राहिले नाहीत. शासनसंस्था, मुत्सद्देगिरी, खेड्यांतील कारभार, सैनिक दल ह्यांत पिढीजादपणाचे तत्त्व अखंडपणे चालू राहिले. त्यामुळे नव रक्ताच्या नि नवविचाराच्या अभावी राज्य कमकुवत झाले आणि विजिगीषू इंग्रज नेते नि सुरब्बी इंग्रज मुत्सद्दी यांच्या घणाखाली ते राज्य कोलमडून पडले, अशी इतिहास साक्ष देत आहे.

पेशव्यांच्या ब्राह्मणी राज्यात ब्राह्मणांचे प्रस्थ माजले; त्यांचे अमर्याद जातिवर्चस्व वाढले. इतकेच नव्हे तर, त्यांनी आपला राज्यकारभार न्यायाने नि दक्षतेने पार पाडला नाही. त्यामुळे स्वराज्याचा नाश झाला असे लोकहितवादींना वाटल्यामुळे 'ब्राह्मणांनी देश बुडविला,'[१२] असा त्यांनी सडेतोड अभिप्राय व्यक्त केला आहे.

एवढे मोठे स्थित्यंतर घडले. राज्यक्रांती झाली. तथापि, ज्या ग्रामपंचायतींचा गौरव अलीकडे ग्रामसत्ताक राज्ये असा करण्यात येतो त्या त्याविषयी उदासीन राहिल्या. कारण युगानयुगे त्यांची अशी समजूत झाली होती की, जो राजा आपणावर राज्य करतो तो विष्णूचा अवतार असतो. धूर्त इंग्रज राज्यकर्त्यांनी खेड्यांतील लोकांच्या सर्वसाधारण जीवनात मुळीच ढवळाढवळ केली नाही. इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीमुळे तेथील पक्का माल येथे येऊन, गावगाड्याच्या चाकाचे रवे निखळून बलुत्याचे कामकाज थंडपडेपर्यंत त्या ग्रामपंचायती तशाच उदासीन होऊन पडल्या होत्या.

स्वराज्याचा अस्त झाल्यावर मराठी साम्राज्याची राजधानी पुणे नगरी ही अगदी

---

१२. आठल्ये, कृ. ना., लोकहितवादी, पृ. १५१.

पुण्यहीन, तेजोहीन, झाली होती. अपवित्र अशा परकी, परधर्मी, परभाषी साम्राज्याच्या जुवाखाली एकेकाळची ती पुण्यभूमी नि पवित्र नगरी चडफडत, झिजत पडली होती. तिच्या दुर्दैवी पतनामुळे भारत हा परकी साम्राज्याचा दास झाला.

त्या काळी पुणे हेच ब्राह्मणांना नवखंड पृथ्वी वाटे. इंग्रज कोण, कुठून आले याविषयी त्यांनी चौकशी केली नाही. कलकत्ता विलायतेत आहे आणि विलायत कलकत्त्यात आहे अशीच त्यांची भ्रामक समजूत असे. संस्कृत विद्येखेरीज बाकीच्या विद्या व भाषा नरकाचे साधन आहेत असे ते मानीत. इंद्र ढगांना पाऊस पाडावयास सांगतो अशी त्यांची प्रामाणिक श्रद्धा असे. ढग हे इंद्राचे हत्ती असून इंद्राने आज्ञा करताच ते पाऊस पाडतात, अशा नाना समजुतींनी पुणे नगरी अज्ञानाची गुहा बनली होती. पुण्यात गोटे बसविलेले किंवा फरसबंदी केलेले रस्ते असत. श्रीमंत लोकांचा व्यवहार उंटावरून, घोड्यावरून, मेण्यातून चाले. बहुतेक स्त्रिया अनवाणी चालत. श्रीमंतांच्या बायका पायात जोडा किंवा पायपोस घालीत. जोतीपूर्व महाराष्ट्राची सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय नि सामाजिक परिस्थिती अशी होती.

२

# नवयुगाची सुप्रभात

जोती वर्षाचा झाला असेल नसेल तोच त्याची आई चिमणाबाई निवर्तली. ती अत्यंत धर्मनिष्ठ व देवपरायण होती. पत्नीच्या निधनामुळे गोविंदरावांना अनिवार दुःख झाले. त्यांनी दुसरे लग्न न करता जोतीचे संगोपन करण्यासाठी एक दाई नेमली. त्या दाईची निवड अजोड ठरली. जणू तिचा जन्म जोतीसाठीच झाला होता. तिने निष्ठेने जोतीबाचे नि राजारामाचे संगोपन केले. गोविंदरावांना जोतीच्या बाबतीत कसलीही चिंता वाटू दिली नाही. गोविंदराव आपल्या बागेत काम करीत. शिवाय आपले फुलांचे दुकान चालवीत. नेकीने धंदा करणारे नि नीतीने चालणारे गोविंदराव आपल्या जातीत एक प्रतिष्ठित व्यक्ती म्हणून मानले जात. ते स्वभावाने धार्मिक, शांत नि धोपटमार्गी होते. परंपरा व चालीरीती योग्य रीतीने पाळून ते आपला गृहस्थाश्रम दक्षतेने चालवीत.

जोती सहा वर्षांचा झाला. तो मातृहीन मुलगा हाडापेराने मजबूत, प्रकृतीने सुदृढ आणि रूपाने देखणा होता. शिक्षण ही ब्राह्मणांखेरीज इतर जातींनी संपादन करावयाची गोष्ट नव्हे, अशी त्या काळी समजूत असे. गोविंदराव फुले यांच्या ज्ञातीत त्या काळी कोणी शिक्षण घेतलेले पुरुष बहुधा नसावेत. तसे असले तरी त्यांनी आपल्या मुलाच्या शिक्षणाच्या प्रश्नासंबंधी स्वतःशी खूप विचार केला होता. आधुनिक दृष्टीने ज्याला आपण

शिक्षण म्हणतो ते जोतीपूर्व काळात मुळी अस्तित्वातच नव्हते. जेथे वरच्या वर्गाची बरीच वस्ती असे तेथे काही शास्त्री खाजगी पाटशाळा उघडीत. त्यांत संस्कृत, व्याकरण, न्याय, वैद्यकशास्त्र, ज्योतिष, वेदान्त, अलंकार आणि धर्मशास्त्र हे विषय शिकविले जात. समाजातील कनिष्ठ वर्गातील लोकांना शिक्षण घेण्याचा अधिकार नाही, अशीच सर्वत्र समजूत असे. त्यामुळे त्यांना शिक्षण द्यावे, असा विचार उच्चवर्णीयांना कधी शिवलाही नाही. काही खेड्यांत मुलांना प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळा असत. तेथे पंतोजीकडून व्यापाऱ्यांच्या नि श्रीमंतांच्या मुलांना शिक्षण देण्यात येई.) कारकुनी, कुलकरण वा सावकारी चालविता यावी एवढाच ह्या शिक्षणाचा मर्यादित उद्देश असे.

बालबोध लिपी ब्राह्मणांशिवाय क्वचित कोणी शिकत असे. इतर लोक मोडी लिपी लिहावयाला व वाचावयाला शिकत. अंकगणिताचा अभ्यास बराच घोटून घेण्यात येई. इतिहास किंवा भूगोल ह्यांसारखे विषय नावालादेखील नव्हते. त्या काळची पुस्तके म्हणजे हस्तलिखित पोथ्या. त्यांत देवदेवतांच्या ऐकीव कथा असावयाच्या. प्रत्येक मुलगा म्हणजे एक वर्गच. आपले धडे तयार करताना विद्यार्थी एकाच तारस्वरात घोकंपट्टी करीत असावयाचे. जुने आणि जाणते विद्यार्थी नवीन मुलांना शिकवीत. पंतोजींना पुरेशी दक्षिणा मिळत नसे. त्यामुळे बहुधा असे व्हावयाचे की, स्वतःहून पंतोजींचा पेशा पत्करलेला तो दुर्दैवी पुरुष निराश होऊन, पंतोजीगिरीपेक्षा अधिक लाभदायक आणि प्रतिष्ठित असा धंदा शोधण्याची केविलवाणी धडपड करताना बहुशः आढळे. 'मागतां येईना भीक, तर पंतोजीपणा शीक' अशी म्हण त्यावेळी प्रचारात होती. त्यामुळे समाजातील बहुधा पंगू पुरुषच काय ते ह्या पेशात प्रविष्ट होत. शिक्षकाच्या घरीच शाळा भरे किंवा कधीकधी जमीनदार आपल्या मुलांना शिकविण्यासाठी खास पंतोजी नेमून एखाद्या देवळात शाळा सुरू करीत. आणि शेजारच्या दोनचार गरीब मुलांना आपल्या मुलांबरोबर शिकावयास बसवीत.

(अठराशे छत्तीस साली सरकारी खर्चाने पुणे जिल्ह्यातील काही खेड्यांत प्रयोगादाखल 'ग्राम' शाळा सुरू करण्यात आल्या. त्यात लेखन, वाचन व अंकगणित हे विषय शिकवीत असत. पुढे १८६२ साली ह्या ग्रामशाळांची योजना त्याज्य ठरविण्यात आली.) तथापि, १९५३ मध्ये असे मत व्यक्त करण्यात आले आहे की ह्या ग्रामशाळांसंबंधी जे प्रतिवृत्त उपलब्ध आहे ते खेड्यांतील शिक्षणाचा प्रश्न सोडविण्यास सध्याच्या शिक्षणाधिकाऱ्यांस अत्यंत उपयुक्त ठरेल.[१] भारतीय शिक्षणक्षेत्राच्या इतिहासात हा प्रयोग मोठा अपूर्व होता असे मानण्यात येते. भारतात इंग्रजांचे राज्य येण्यापूर्वी प्रजेला शिक्षण देणे हे सरकारी दायित्व आहे, असे मानण्यात येत नसे.

फुलेपूर्व महाराष्ट्रात राजसत्ता आणि धार्मिकसत्ता ब्राह्मणांच्या हाती असल्यामुळे

---

१. Parulekar, R. V., Selections from the Records of the Government of Bombay-Education-Part I, Preface.

केवळ ब्राह्मणांनाच धार्मिक ग्रंथ वाचण्याचा आणि पठण करण्याचा अधिकार होता. कनिष्ठ वर्गातील ज्या ज्या व्यक्तींनी पवित्र ग्रंथ पठणाचा प्रयत्न केला त्या त्या व्यक्तींना महाराष्ट्रात जबरदस्त शिक्षा ठोठावण्यात आल्या.

तथापि, नवीन राज्यकर्त्यांबरोबर नवीन निर्बंध आले. ईस्ट इंडिया कंपनी सरकारच्या १८१३ सालच्या सनदेन्वये असे ठरले की, 'भारतातील शिलकी महसुलापैकी प्रत्येक वर्षी कमीतकमी एक लक्ष रुपयांची रक्कम वेगळी काढावी. तिचा उपयोग, भारतातील प्राच्य-वाङ्मयाचे पुनरुज्जीवन नि वृद्धी करण्यासाठी तसेच पंडितांना उत्तेजन देण्यासाठी आणि भारतातील रहिवाश्यांमध्ये शास्त्रांचे ज्ञान सुरू करून त्याचा प्रसार करण्यासाठी करण्यात यावा.' अशा प्रकारे १८१३ च्या निर्बंधाप्रमाणे भारतात प्रथमच 'शिक्षण' सर्वांना खुले झाले. शिक्षणाची नवप्रभात उजाडली. नवसमाजधारणेला आणि बदलत्या सुधारणेला पोषक अशा शिक्षणास प्रारंभ झाला. पौर्वात्य पद्धतीच्या शिक्षणाला उत्तेजन देण्यासाठी वार्षिक अनुदानाची रक्कम विद्यार्थ्यांना विद्यावेतन म्हणून देण्यात येऊ लागली. ब्रिटन-मध्येही १८३३ सालपर्यंत शाळांना अनुदान देण्याची प्रथा नव्हती[२].

एकोणिसाव्या शतकाचा इतिहास म्हणजे जगाचे पाश्चात्त्यीकरण होय. भारतात इंग्रजांचे राज्य आल्यानंतर भारतीय समाजरचनेवर आणि शासनपद्धतीवर त्यांच्या विचारांचे नि संस्कृतीचे अतिशय दूरवर परिणाम झाले. त्या सर्वांचा परिणाम म्हणून सरकारच्या शैक्षणिक धोरणातही बदल झाला. सुधारणेची प्रेरणा दोन कारणांतून निर्माण झाली. इंग्रजी भाषेचे ज्ञान अवगत असलेल्या नोकरांची सरकारला भासणारी आवश्यकता हे पहिले कारण. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात पाश्चात्त्य आणि देशी शिक्षण यांवर ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी जो प्रभाव पाडला होता, त्यामुळे शिक्षणाविषयी उत्पन्न झालेली आकांक्षा हे दुसरे कारण होय. ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी १८२४ साली पुण्यात मराठी शाळा काढल्या.

त्या काळी भारतात एक मोठा वादविवाद सुरू होता. वादातील एका पक्षाचे म्हणणे असे होते की, पाश्चात्त्य शिक्षण भारतीयांना इंग्रजी भाषेतून द्यावे; तर दुसऱ्या पक्षाचे म्हणणे असे होते की, देशी भाषेतून पौर्वात्य शिक्षण द्यावे. त्याच वेळी महाराज्य-पालांच्या कार्यकारी मंडळात इंग्रज महापंडित थॉमस बॅबिंग्टन मेकॉले हे पहिले विधिमंत्री आणि सरकारी शिक्षण समितीचे अध्यक्ष ह्या नात्याने काम पाहत असत. यांनी २ फेब्रुवारी १८३५ रोजी एक टिपण लिहून त्यात इंग्रजीभाषेतून पाश्चात्त्य शिक्षण द्यावे असा निर्णय करून त्या वादाचा शेवट केला. पुढे ७ मार्च १८३५ रोजी महाराज्यपाल लॉर्ड बेंटिंगच्या सरकारने असे ठरविले की, युरोपियन वाङ्मय आणि शास्त्र यांचा भारतीयांमध्ये प्रचार करणे हाच इंग्रज सरकारचा महान उद्देश असावयाला हवा.

---

२. Hampton, H. V., Eiographical Studies in Modern Indian Education, p. 25.

ह्या संक्रमणाच्या काळात कनिष्ठ वर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षणाचे दरवाजे जरा किलकिले झाल्याचे दिसू लागताच काही शहाण्या आणि दूरदृष्टी व्यक्तींनी आपली मुले शाळेत घातली. गोविंदरावांनीसुद्धा आपल्या मुलाला शाळेत घालण्याचा निर्धार केला. त्याप्रमाणे त्यांनी जोतीला त्याच्या वयाच्या सातव्या वर्षी प्राथमिक मराठी शाळेत घातले. त्या काळी शाळा एकमेकींपासून अतिशय दूर अंतरावर असत. त्या शाळा चालविणाऱ्या शिक्षकांना पंतोजी म्हणत. कोकणांत तर त्यांना शेणवी म्हणत. कारण तेथील शिक्षक शेणवी जातीचे असत.[3]

अठराशे एकवीस साली सरकारने पुणे येथे एक हिंदुकॉलेज उघडले. त्याला संस्कृत पाठशाळा म्हणत. पण त्या पाठशाळेत फक्त ब्राह्मण विद्यार्थ्यांनाच प्रवेश मिळे. भारतामध्ये शिक्षणाचा प्रसार करण्याच्या हेतूने स्थापन झालेली पहिली संस्था म्हणजे बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी. शिक्षणाच्या प्रसारासाठी भारतातील संघटित असा हा पहिला प्रयत्न होय. ह्या संस्थेने १८२० साली शाळा उघडल्या. १८३३ च्या सुमारास पुण्यात खिस्ती धर्मोपदेशकांनी चालविलेल्या अशा दोन-तीन शाळा होत्या. जिल्ह्यातील प्रमुख शहरी आपल्या खर्चाने मुंबई सरकारने १८२५ च्या सुमारास शाळा काढल्या होत्या. त्या शाळा जिल्हाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली असत. बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्य आणि सरकारी शाळांचे कार्य यांचे एकत्रीकरण करून पुढे १८४० साली सरकारने शिक्षा मंडळी (बोर्ड ऑफ एज्युकेशन) ही शिक्षणसंस्था स्थापन केली.

त्या काळी पुस्तकाच्या मलपृष्ठावरील चामड्यास स्पर्श झाला तर विटाळ होतो, असे मानीत असत. छापील कागदास शिवणे हे अपवित्र नि धर्मबाह्य वर्तन आहे अशी लोकांत समजूत असे. शाईचासुद्धा विटाळ मानण्यात येई. घरी मुले आपली दप्तरे एका कोपऱ्यात ठेवीत. घुबड शब्दासारखे अमंगल शब्द घरात उच्चारण्याने विटाळ होतो व इतर जातीच्या विद्यार्थ्यांच्या स्पर्शामुळे शिवाशिव होते असा समज असे. ती शिवाशिव काढण्यासाठी शाळकरी मुले घरी येताच सचैल स्नान करीत आणि शुद्ध होत. इंग्रजी भाषेच्या पठणाने माणूस अपवित्र होतो; एवढेच नव्हे तर त्याचे ब्राह्मणत्वही जाते असे सनातनी ब्राह्मण मानीत असत. जोतीचे समकालीन गोपाळराव देशमुख यांना विद्यार्थीदशेत आपले दप्तर घरात नेता येत नसे. शिवाशिव होऊ नये म्हणून ते आपली पुस्तके विहिरीतल्या एका कोनाड्यात ठेवीत असत.

मुलींना शिक्षण देण्याचा १८३३ साली पुण्यात एक प्रयत्न झाला. काही उत्साही व धाडशी लोकांनी इंग्रज अधिकाऱ्यांच्या सल्ल्याने ती शाळा पेशव्यांच्या जुन्या राजवाड्यात काढली होती. त्या शाळेत मुली लपूनछपून शिकत आणि पसार होत. परंतु चालकांचे श्रम वाया गेले. लोकभयामुळे थोड्याच दिवसांत ती शाळा बंद पडली.

शिक्षणाच्या कार्यात अडथळे आणणाऱ्या आणखीही दुसऱ्या काही समजुती असत.

---

३. प्रियोळकर, अ. का., रावबहादूर दादोबा पांडुरंग, पृ. १७.

ब्राह्मणांची अशी समजूत होती की 'ब्राह्मणांनीच काय ती विद्या करावी.' अन्य वर्गीयांना शिक्षणाचा अधिकार नाही. सर्व ज्ञान काय ते संस्कृत ग्रंथात साठविलेले आहे अशी त्यांची धारणा होती. श्रीमंतांनी गादीवर लोळावे, त्यांना श्रम करण्याची व शिक्षण घेण्याची गरज नाही, असे मानण्यात येई. वरिष्ठ वर्गाचे लक्ष नवशिक्षणाकडे अद्याप वेधले गेले नव्हते. शिक्षणाविषयी त्यांना अजून आदर वाटत नव्हता. तेही आपल्या संकुचित अशा सामाजिक परिस्थितीच्या चाकोरीतून बाहेर पडले नव्हते. सामाजिक आणि धार्मिक आज्ञा हाडीमासी खिळल्यामुळे शिक्षण घेणे हे हीन दर्जाचे लक्षण आहे असे ते मानीत. धर्मोपदेशकाने काढलेल्या शाळेत शिक्षण घेणे तर त्यांना अगदीच कमीपणाचे वाटे. बाटाबाटीची त्यांना भीती वाटे. त्यासंबंधी १९ ऑक्टोबर १८५४ च्या 'ज्ञानप्रकाशा'मध्ये एका कवीने चिंता व्यक्त केली आहे. तो म्हणतो :

**गत तरी आतां काय करावी । अबरूनी पोरें कैशी धरावीं ॥**
**जाऊं देतां त्यांच्या शाळे । बाटूनि येतील तुमची बाळें ॥**
**सर्व कुळाला लागले काळें । खातरी ऐशी पक्की धरावी ॥**

**. २ .**

त्या काळची परिस्थिती ही अशी असली तरी गोविंदराव फुल्यांनी जोतीला शाळेत घातले होते. ही गोष्ट खचितच धैर्यद्योतक नि प्रशंसनीय होती. त्या बुद्धिमान, तरतरीत आणि उत्साही विद्यार्थ्याने हा हा म्हणता आपल्या अभ्यासात प्रगती केली. त्याची अभ्यासात अशी चांगली प्रगती होत असतानाच एक घटना घडली. मुलाच्या शिक्षणाविरुद्ध गोविंदरावांचे कोणीतरी कान फुंकले आणि त्यांचे मत फिरले. त्यामुळे आपल्या मुलाला शिक्षणाचा काही उपयोग नाही असे आता त्यांच्या मनाने घेतले. हंटर शिक्षणमंडळाच्या काळापर्यंत कनिष्ठ वर्गातील लोकांच्या शिक्षणास ब्राह्मणांनी जो विरोध केला त्यावरून, गोविंदरावांच्या दुकानातील ब्राह्मण कारकुनाने जोतीला शाळेतून काढण्याविषयी त्यांना कुसल्ला दिला असे जोतीरावांच्या दत्तक मुलाने जे लिहून ठेवले आहे ते कथन सत्य असले पाहिजे.

जोतीने आपला प्राथमिक शाळेतील अभ्यास पूर्ण केला होता. आता त्याला चांगले लिहिता-वाचता येऊ लागले. हिशेबही करता येऊ लागले. 'तुमच्या मुलाला शिक्षणाचा तसा काय उपयोग आहे? शिक्षणामुळे तो शेतात काम करावयास नालायक होईल.' असे त्याने साळसुदपणे गोविंदरावांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला. शिवाय प्रचलित शिक्षण मनुष्याला धर्मद्रोही बनविते आणि त्यामुळे तो बंडखोर होतो असे त्या काळी अज्ञानामुळे सर्वसाधारण जनता मानीत असे हे खरे. तथापि गोविंदरावांना त्या ब्राह्मण कारकुनाने दिलेला सल्ला कावेबाज आणि मतलबी स्वरूपाचा नव्हता, असे म्हणता येणार नाही.

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत असा मतलबी उपदेश ब्राह्मण शिक्षक, ब्राह्मणेतर

मुलांना करीत असत. वरिष्ठ वर्गातील लोकांना वाटे, कनिष्ठ वर्गातील लोक शिकले तर नोकरी-धंद्यात ते आपले भागीदार होतील. नोकऱ्यांचा बराच मोठा हिस्सा त्यांच्या वाट्याला जाईल. गोपाळराव देशमुख यांनी १८४८ साली आपल्या शतपत्रांत लिहिले की, 'एखादा मराठा किंवा इतर जातीचा कारकून ब्राह्मणांनी पाहिला म्हणजे त्यांचे अंगाचे तिळपापड होतात, हे काय?'[४] असा फरक परिस्थितीत पडू लागल्यामुळे ब्राह्मण चडफडू लागले. ब्राह्मणेतर मुलांचा कल शिक्षणाकडे होऊ लागताच ते ओरडू लागले की, 'कलियुग आले, विद्या शूद्राघरी गेली.' त्यांना वरिष्ठ वर्गातील स्वार्थी लोक साथ देत असत. एकदा असे घडले की, बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या शाळेमधून मराठे, कोळी, भंडारी, सोनारादी जातींच्या मुलांना शाळेतून तडकाफडकी काढून टाकण्यात आले.[५] मुंबईतील प्रभू जातीतील धाकजी दादाजी परभु नावाचे एक प्रतिष्ठित गृहस्थ बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीचे सभासद होते. त्यांच्या सनातनी वृत्तीमुळे आणि संकुचित धोरणामुळे ही गोष्ट घडली.

कुसल्ल्याला बळी पडून सरळ स्वभावी गोविंदरावांनी जोतीला शाळेतून काढले. शाळेला मुकल्यानंतर जोती फावडे, कुदळ आणि घमेले हाती घेऊन आपल्या वडिलांच्या फुलबागेत आणि भाजीच्या मळ्यात काम करू लागला. आपल्या भावी जीवनाची पूर्वतयारी जोती ह्या बागेत करीत होता. प्रातःकाळी उठून मळ्यातील तण उपटून मळा साफ करीत होता. फुलझाडांना पाणी घालीत होता. उत्तम उत्तम फुले खुडीत होता. कुंपण साफ करीत होता. गवत कापीत होता. फावड्याने पाटपन्हाळे बांधीत होता. हे सर्व साफसफाईचे काम मोठ्या तन्मयतेने करीत असताना त्याला मनस्वी संतोष आणि उत्साह वाटत होता. आपला मुलगा इतका सुदृढ, प्रामाणिक, नि उत्साही आहे, त्याच्या अंगी अखंड उद्योगशीलता बाणली आहे, हे पाहून गोविंदरावांना फारच समाधान वाटे. त्यांच्या कामातही त्यांना थोडी विश्रांती नि विरंगुळा मिळे.

प्रचलित रीतीरिवाजाप्रमाणे जोतीचे लग्न त्याच्या लहान वयातच करण्याचे विचार गोविंदरावांच्या डोक्यात येऊ लागले. मुलगा आता सुमारे १३ वर्षांचा झाला होता. त्याचे त्या काळाच्या दृष्टीने लग्नाचे वय होऊन गेले होते म्हणाना. म्हणून त्यांनी त्याचे लग्न ठरविले. त्यांनी पुण्याजवळील धनकवडी गावातील झगडे-पाटील यांची मुलगी निवडली. ती आठ एक वर्षांची असावी. लग्न मोठ्या थाटात झाले. छोट्या पत्नीच्या उदरनिर्वाहाची जोतीला काही काळजी करावयास नको होती. संसाराचा गाडा चालविण्यास वडील समर्थ होते. त्या काळात विवाहाच्या वेळी मुलांचे इतके लहान वय असे की, लग्न का आणि कशासाठी करतात हे त्यांना कळत नसे. जोतीचे भावी मित्र केशवराव भवाळकर याचे लग्न ठरले आहे असे त्याच्या आईने सांगताच छोट्या

४. संपादक, टिकेकर, श्री. रा., लोकहितवादींचीं शतपत्रें, पृ. २३४.
५. प्रियोळकर, अ. का., रावबहादूर दादोबा पांडुरंग, पृ. ४५-४६.

भवाळकराने आपल्या आईस विचारले[६], "आई, माझ्या लग्नास मला नेशील का?" जोतीरावांचे दुसरे समकालीन लोकहितवादी गोपाळराव देशमुख यांचे लग्न त्यांच्या वयाच्या सातव्या वर्षी झाले. त्यांची पत्नी चार वर्षांची होती!

आपली सेवा तन्मयतेने करणाऱ्या जोतीला निसर्गाने एक उत्तम देणगी दिली. त्याने जोतीची उद्योगी वृत्ती दृढ केली. जरी त्याच्या शिक्षणात खंड पडला होता तरी त्याची शिक्षणाकडची ओढ कमी झाली नव्हती. उलट त्याचा वाचनाचा नाद अधिक बळावला. आणि मळ्यात काम केल्यावर तो मिणमिणत्या समईजवळ रात्री वाचत बसत असे. साहजिकच त्या बुद्धिमान, उद्योगी नि उत्साही मुलाने काही चांगल्या बुद्धीचे शेजारी आणि सहानुभूती दाविणारे ओळखीचे गृहस्थ यांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले.

अशा शेजाऱ्यांमध्ये दोन विद्वान गृहस्थ होते. एकाचे नाव होते गफ्फार बेग मुनशी. हे उर्दू व पर्शियन भाषांचे पंतोजी होते. दुसऱ्याचे नाव लिजीट साहेब. हे अधिकारी किंवा खिस्ती धर्मोपदेशक असावेत. दोघेही थोर मनाचे होते. त्या दोघांनी जोतीला शिक्षण देण्याची कशी आवश्यकता आहे, हे गोविंदरावांच्या मनावर ठसविले. मुलाची बौद्धिक पातळी उंचावून भावी काळात त्याच्या कर्तृत्वास वाव मिळावा म्हणून त्याला शिक्षणाची संधी देण्यास त्यांनी त्यांना आग्रहाची विनंती केली. आपल्या मुलाच्या शिक्षणात आपण उगाच व्यत्यय आणला याविषयी गोविंदरावांची आता बालंबाल खात्री पटली. यास्तव त्यांनी मुलाला पुन्हा शाळेत घालण्याचा निर्धार केला. मुलाच्या आयुष्यातील तीन अमोल वर्षे आपण वाया घालविली याविषयी त्यांना फार वाईट वाटले असावे.

त्याप्रमाणे गोविंदरावांनी जोतीला १८४१ मध्ये एका स्कॉटिश मिशनच्या इंग्रजी शाळेत घातले. तो आता जवळ जवळ १४ वर्षांचा झाला होता. जोती करारी वृत्तीचा होता. तो आपला अभ्यास मन लावून करीत असल्यामुळे आपले पाठ समजून घेण्यास तो सदोदित उत्सुक असे. परीक्षेत त्याला प्रथम श्रेणीचे गुण मिळत असत. त्याविषयी त्याचे शिक्षक आणि वर्गबंधू त्याची वाहवा करीत. आपल्या विद्यार्थीदशेतच जोतीने सदाशिव बल्लाळ गोवंडे यांच्याशी अभंग अशी मैत्री जोडली. जोतीच्या ह्या गोवंडे मित्राचा जन्म १८२४ मध्ये पुण्यात झाला. तो ब्राह्मण कुटुंबातील होता. त्याने दृढनिश्चय आणि अखंड उद्योगशीलता या गुणवत्तेवर आपल्या पुढील आयुष्यात मोठीच प्रगती केली. तो स्कॉटिश मिशन शाळेत असताना जोतीचा स्नेही झाला. आणि पुढे बुधवारवाड्यातील सरकारी शाळेत ते दोघे शिकत असताना त्यांचा स्नेह दृढ होत गेला. ही शाळा स्टिव्हनसन नावाच्या गृहस्थाने सप्टेंबर १८३२ मध्ये काढली होती. ती पुढे त्याने सरकारच्या स्वाधीन केली.

जोतीच्या घरच्या सवंगड्यांत काही शेजारचे मुसलमान[७] मुलगे होते. त्यांच्याशी

६. संपादक, पंडित, भ. श्री., रावसाहेब केशव शिवराम भवाळकर यांचें आत्मवृत्त, पृ. ४७.
७. फुले, जोतीराव गोविंद, शेतकऱ्याचा असूड, पृ. ७९.

होत असलेल्या बोलण्याचालण्यावरून त्याच्या मनात हिंदुधर्म नि मुसलमानधर्म यांतील रूढी नि सामाजिक समता ह्याविषयींचे विचार आले. त्यामुळे हिंदुधर्माच्या नावाखाली चालत आलेल्या खोट्या नि मतलबी रूढींचा त्याला हळूहळू अर्थ कळू लागला. आणि जातिभेद व खोट्या श्रद्धा ह्यांविषयी त्याला दुःख होऊ लागले. स्कॉटिश मिशन शाळेत असताना जोती आणि त्याचे मित्र ह्यांनी बरेच ज्ञान संपादन केले. तेथे जोतीला मानवी कर्तव्य आणि मानवी हक्क यांची जाणीव झाली.

जोती व गोवंडे हे उत्साही, महत्त्वाकांक्षी आणि उद्योगी तरुण होते. शिवाजी नि वॉशिंग्टन यांची चरित्रे त्यांनी अभ्यासिली होती. त्या दोघांची वीरवृत्ती, स्वदेशप्रेम व उदात्त महत्त्वाकांक्षा ह्यांपासून त्यांनी स्फूर्ती घेतली होती. त्यांच्याप्रमाणे आपणही आपल्या मायभूमीचे विमोचन करण्याचा महान प्रयत्न करावा, असे त्यांना वाटू लागले.

त्याप्रमाणे ह्या दोन तरुणांनी आपल्या देशबांधवांचा उद्धार करण्यासाठी आपले जीवन व्यतीत करण्याचा संकल्प सोडला. आपल्या देशबांधवांच्या मनावर अज्ञानाची, शैथिल्याची आणि बुरसटलेल्या विचारांची पकड बसली होती. ती पकड विचारक्रांती घडवून आणून दूर करण्याचा त्यांनी निर्धार केला. या दोन्ही मुलांच्या मनावर आणखी एका ग्रंथाने अतिशय परिणाम घडवून आणला. त्या ग्रंथाचे नाव 'राईट्स् ऑफ मॅन' असे होते. ह्या ग्रंथाने युरोपमध्ये मोठीच खळबळ उडविली होती. सामान्य माणसाचे 'बायबल' असे त्या ग्रंथाचे वर्णन करीत असत. तो ग्रंथ विख्यात विचार-प्रवर्तक थॉमस पेन या बंडखोर ग्रंथकाराचा होता. जोती व सदाशिव गोवंडे हे देशबांधवांची सेवा करण्याच्या विचाराने भारलेले होते. ते 'राइट्स् ऑफ मॅन' या ग्रंथाच्या कारंज्याचे पाणी आकंठ प्यालेले होते.

भावी काळातील कष्टमय जीवनप्रवासासाठी नि स्वतःच्या महान ध्येयसिद्धीसाठी आपले शारीरिक सामर्थ्य तितकेच कणखर व खणखणीत असणे आवश्यक आहे हे जाणून ते विविध प्रकारांचे मर्दानी खेळ खेळत. तरवार, दांडपट्टा व निशाणबाजी यांत ते चांगलेच तरबेज झाले होते. लहुजीबुवा मांग हे अस्पृश्य समाजातील गृहस्थ ह्या दोघांचे या क्षेत्रातील गुरुजी होते. सैनिक शिक्षणाचे लहुजीबुवा हे एक आदर्श गुरुजी होते. त्यांच्या तालमीत जोतीने ह्या शिक्षणात इतकी मोठी प्रगती केली की, तो जेव्हा दांडपट्टा फिरवी तेव्हा त्याचे ते कौशल्य पाहण्यास लोकांची झुंबड उडत असे. एक उत्कृष्ट व्यायामपटू म्हणून जोतीची पुण्यात ख्याती झाली होती. रेखीव व सुंदर शरीरयष्टी आणि उत्तम आरोग्य यांची मूर्ती दिसणारा जोती प्रेक्षकांच्या मनावर सहज छाप टाकीत असे.

लहुजीबुवा हे तडफदार व देशाभिमानी तरुणांचे एक कळकळीचे मार्गदर्शक होते, असे दिसते. वीस वर्षांनंतर पुढे त्यांच्याच हाताखाली वासुदेव बळवंत फडके यांनी सैनिक-शिक्षण घेतले. आणि १८७९ मध्ये फडक्यांनी ब्रिटिश राजवटीविरुद्ध बंडाचा झेंडा उभारला. शिक्षण संपल्यावर गोवंडे यांनी पुणे संस्कृतमहाविद्यालयात १८४३ मध्ये नोकरी धरली. जोती आपले शिक्षण पूर्ण करीपर्यंत त्या मिशन शाळेत जात होता.

त्या काळी इंग्रजी शिक्षणासाठी महाराष्ट्रात महाविद्यालय नव्हते. इंग्रजी शिक्षण देणारी तशी मोठी एखादी संस्थाही नव्हती. याच दिवसांत सदाशिव गोवंड्यांनी मोरो विठ्ठल वाळवेकर या ब्राह्मण मित्राशी आणि वाळवेकरांचा ब्राह्मणमित्र सखाराम यशवंत परांजपे यांच्याशी मैत्री जोडली. मोरो वाळवेकर हा गरीब ब्राह्मणाचा मुलगा होता. त्याचेही शिक्षण एका मिशनशाळेत झाले होते. वाळवेकर आणि परांजपे हे जोतीचे परम स्नेही झाले. पुढे ते दोघे जोतीच्या कार्यातील मोठे सहकारी म्हणून गाजले.

. ३ .

पाश्चात्त्य शिक्षण नि खिस्ती धर्मोपदेशकांचे कार्य व सदुपदेश यांचा परिणाम य चौघा तरुणांच्या मनावर झाला होता. त्याकाळी जो हिंदू इंग्रजी ग्रंथ समजण्याएवढ्या प्रगल्भबुद्धीचा असे त्याला एक नवीन विचाराचे सर्व जग खुले झाल्यासारखे वाटे. वाळवेकरांनी आपल्या आत्मचरित्रात्मक व्यक्तिरेखेत असे म्हटले आहे की, 'विद्यार्थी असतानाच आमची हिंदुधर्मावरील श्रद्धा उडून खिस्ती धर्माकडे वळली' तथापि, ह्या चौघा मित्रांनी सर्व धर्मांचा तुलनात्मक अभ्यास करून शेवटी असे सार काढले की, 'प्रत्येक धर्मात अशी काही तत्त्वे आहेत की ती केवळ श्रद्धेनेच मानावयाची असतात. म्हणून सर्व धर्मांत जी समानतत्त्वे आहेत त्यांचेच आपण अनुसरण करावे.' यास्तव त्यांनी धर्मांतराचा बेत रहित केला.[८] या सर्वांनी स्वीकृत केलेली समान तत्त्वे कोणती? देव एक आहे. त्याचीच पूजा करावी. जी नीतितत्त्वे सर्व धर्मांत सारखी आहेत त्याप्रमाणे वर्तन करावे. त्यांतील मुख्य सिद्धांत असा होता की, परोपकार हे पुण्य व परपीडा हे पाप. ह्या तरुणांना खिस्ती धर्मोपदेशकांच्या परोपकारी कार्यापासून स्फूर्ती मिळाली होती हे निःसंशय. मिशनऱ्यांनी घालून दिलेला लोकसेवेचा आदर्श आणि भारतात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी त्यांनी स्वीकृत केलेले आमरण ध्येय ह्या अत्यंत अनुकरणीय अशाच गोष्टी होत्या.

जोतीने १८४७ साली आपला इंग्रजी शाळेतील अभ्यास पूर्ण केला. अमेरिकन स्वातंत्र्याच्या चळवळीपासून जोतीने घेतलेली स्फूर्ती प्रबळ होती. ती त्याच्या रक्तातील बिंदूबिंदूतून संचरत होती. तो आता मानवी समता, मानवी हक्क आणि मानवी स्वातंत्र्य यांचा कैवारी बनला. अशा प्रबळ नि उदात्त विचारांत तो धुंद झाला असताना एके दिवशी रस्त्यात दंडेलीने वागणाऱ्या दोन इंग्रज सैनिकांशी त्याची गाठ पडली. उच्चंड व उद्दामवृत्ती असलेले ते दोघे जोतीच्या देखत असे काही बरळले की ते त्याला सहन झाले नाही. प्रकरण एकेरीवर आणि हातघाईवर आले. सुदृढ, व्यायामपटू अन् धाडशी जोतीने उसाचे एक भले मोठे कांडे घेऊन त्या दोघा सैनिकांना झोडपून पिटाळून लावले. ह्या काळाविषयी पुढील आयुष्यांत लिहिताना 'गुलामगिरी' या आपल्या ग्रंथात

---

८. पराग, फेब्रुवारी व मार्च १९४९

जोतीरावांनी म्हटले आहे की, ब्रिटिशांना हिंदुस्थानातून घालवून देण्याच्या कल्पनांनी आपण तेव्हा भारून गेलो होतो.

जोतीच्या विद्यार्थीदशेत महाराष्ट्रात ब्रिटिश सत्तेविरुद्ध वारंवार लहानमोठी बंडे होत असत. त्या बंडाचा परिणाम जोती आणि त्याचे स्नेही यांच्या मनावर बराचसा झाला होता. उमाजी नाईकाने १८२६ मध्ये बंड केले. पण त्याचा पराभव झाला. तथापि उमाजी नाईकाचे नाव महाराष्ट्रात पिढ्यानपिढ्या सर्वतोमुखी झाले. पुणे जिल्ह्यातील कोळ्यांनी १८३० साली बंडाचा ध्वज उभारला. जवळ जवळ आठदहा वर्षे त्यांनी अधूनमधून बंडे केली. सातारचे छत्रपती प्रतापसिंह १८२२ मध्ये गादीवर बसले होते. त्यांना ४ सप्टेंबर १८३९ रोजी ब्रिटिश सरकारने बनारस येथे नजरकैदेत ठेवले. त्यांच्या पदच्युतीमुळे महाराष्ट्रात ब्रिटिशांविरुद्ध अप्रीती वाढली. १८३९ ते १८४६ या काळात भाऊ खरे, चिमणाजी जाधव, नाना दरबारे यांनी पदच्युत पेशव्यांच्या नावाने बंड केले. त्या बंडाचा पाडाव झाला. रामचंद्र गोरे आणि एक कोळी यांना फाशी देण्यात आले. बापू भांग्रे आणि रावोजी भांग्रे यांनी १८४८ साली बंड केले. तेही फसले. रावोजी भांग्रे यांना २ मे १८४८ रोजी फाशी देण्यात आले. हे सर्व निधड्या छातीचे देशवेडे देशभक्त होते. तथापि, त्यांनी अधूनमधून केलेली ती बंडे निष्फळ होणार हे ठरल्यासारखे होते. त्या बंडांमध्ये अनेक देशभक्त धारातीर्थी पडले होते, हे जोती जाणत होता. तरी आपल्या मित्रांच्या साहाय्याने ब्रिटिशांचे राज्य उलथून पाडण्याचे, आपला देश स्वतंत्र व बलवान करण्याचे ध्येय त्याने बाळगले होते.

स्वातंत्र्याच्या विचारांची बीजे आपल्या मनात ब्राह्मण विद्यार्थी मित्रांनी आणि ब्राह्मण शिक्षकांनी पेरली होती, असे जोतीरावांनी आपल्या 'गुलामगिरी' या ग्रंथात नमूद केले आहे. पेशव्यांच्या सत्तेच्या पाडावामुळे ब्राह्मणांचे अतिभयंकर नुकसान झाले होते. त्या काळी ब्राह्मण हे समाजाचे पुरोहित आणि नेते होते. आपली महत्त्वाकांक्षा आणि देशभक्ती यांच्याशी त्यांनी कधीही प्रतारणा केली नाही. जरी ब्रिटिशांच्या नोकरीत ते होते, तरी त्यांनी ब्रिटिशराज्याचे भले कधीही इच्छिले नाही. ही गोष्ट ब्रिटिश राज्यकर्ते पूर्णपणे जाणून होते. मुंबईचे ब्रिटिश राज्यपाल सर रिचर्ड टेंपल यांनी त्या वेळच्या हिंदुस्थानच्या महाराज्यपालांना १८७९ जुलैत जे प्रतिवृत्त पाठविले त्यात असे म्हटले होते की, 'शिक्षण, वेतन किंवा सरकारी नोकरीतील बढती ह्या बाबतीत आपण त्यांच्यासाठी काही केले तरी त्यामुळे चित्पावनांना मुळीच समाधान होत नाही. ह्या देशात त्यांचे प्रभुत्व पुन्हा स्थापन झाल्याशिवाय त्यांना समाधान होणार नाही. पश्चिम भारतातील ब्राह्मणांच्याइतकी जागृत, अखंड आणि दूरवर परिणाम करणारी व आमच्याकडून कधीही संतुष्ट न होणारी राजकीय आणि राष्ट्रीय महत्त्वाकांक्षा आजवर आपल्या आढळात नाही."[९]

---

९. सर रिचर्ड टेंपल यांचे पत्र, हिंदुस्तान टाईम्स वीकली, ८ जुलै १९६२.

# ३

मराठा ग्रंथ संग्रहालय, ...
अनुक्रम.................... दि: ....................
क्रमांक .................... नोंद दि ....................

## विचारांती ध्येय ठरले

त्या काळी जेवढे शिक्षण घेता येईल तेवढे जोतीने घेतले. सरकारी नोकरीचे दार उघडे असता त्यांनी सरकारी नोकरी धरली नाही. घरचा वंशपरंपरागत धंदा फुलमाळ्याचा असल्यामुळे त्याने तोच धंदा करावा हे साहजिकच होते. त्या काळी जसा लोहाराचा मुलगा बहुधा लोहारकीच करावयाचा तसाच फुलमाळ्याचा मुलगा बहुधा फुलांचाच धंदा करावयाचा. जोतीच्या वडिलांचा धंदा चांगला चालला होता. परंतु जोतीच्या मनाचा ओढा त्याकडे नव्हता. लोकसेवा व लोककल्याण याविषयींचे विचार त्याच्या मनात घोळत राहिलेले होते. ह्याच सुमारास अशी एक घटना घडली की, तिच्यामुळे जोतीच्या जीवनाला एक वेगळीच कलाटणी मिळाली.

जोतीला एका ब्राह्मण स्नेह्याच्या लग्नाचे आमंत्रण आले होते. त्या ब्राह्मण मित्रावर त्याचे नितांत प्रेम असल्यामुळे तो त्या लग्नसमारंभास गेला. नवरा मुलगा नवरीकडे वऱ्हाडी मंडळीसहित मिरवत जात होता. त्या मिरवणुकीत ब्राह्मण बायका, पुरुष व मुले होती. तीत दुसऱ्या जातीचे लोक क्वचितच होते. जोती त्या मिरवणुकीतील मंडळीबरोबर चालत होता. ब्राह्मण्याचा ज्वलंत अभिमान बाळगणाऱ्या काही सनातनी ब्राह्मणांनी त्याला ओळखले. ब्राह्मण भूदेवांबरोबर कनिष्ठ वर्गातील एका माळ्याच्या मुलाने मिरवणुकीत

बरोबरीने चालावे हे पाहून त्यांच्या कपाळात तिडीक चढली. संतापाने ते बेभान झाले. त्यांच्यापैकी एकजण जोतीच्या अंगावर खेकसून म्हणाला, "ब्राह्मणांसगे रस्त्यातून चालायला तुला धारिष्ट तरी कसं झालं ? अरे शूद्रा, तू जातिपातीची सगळी बंधनं आणि रीतरिवाज धुडकावून आमचा असा अपमान करतोस काय ? तू आमच्या बरोबरीचा आहेस असं समजतोस की काय ? असं वागण्यापूर्वी तू शंभर वेळा विचार करावयास पाहिजे होतास. चल हट मागं अन चालू लाग सर्वांच्या मागून. अलीकडं लोक अगदीच बेताल नि बेशरम झाले आहेत. जातिपातीची मर्यादा ध्यानातच ठेवीनासे झाले आहेत. ह्या इंग्रज राजवटीमुळे हे लोक भारीच उद्धट होत चालले आहेत."

ही भयंकर भाषा ऐकून तरुण जोती क्षणभर गोंधळला. तो स्तिमित झाला. परंतु क्षण दोन क्षणांत तो भानावर आला. त्याच्या मनांतील गोंधळ खाली बसला अन् स्वाभिमान उसळून उठला. ते अपमानकारक शब्द त्याच्या जिव्हारी झोंबले. त्याच्या शरीराच्या रोमारोमात, मेंदूतल्या कप्प्याकप्प्यात आणि रक्ताच्या थेंबाथेंबात अपमानाची सल सलू लागली. त्या लग्नाच्या मिरवणुकीतून तो रागाने बाहेर पडला व घरी तडक निघून गेला.

अपमानाने संतापलेल्या आणि मनात थैमान घालणाऱ्या अनेक विचारांनी गोंधळून गेलेल्या जोतीने घरात प्रवेश केला. त्याने आपल्या वडिलांच्या कानांवर घडलेल्या प्रसंगाची साद्यंत हकीगत घातली. त्याच्या डोळ्यांतून मनोवेदनेच्या जळजळीत ठिणग्या बाहेर पडत होत्या. त्याचा चेहरा संतापाने लाल लाल झाला होता. तो सारा अपमानकारक वृत्तांत कथन केल्यावर तो स्फुंदून स्फुंदून रडू लागला; दुःखवेदनाने कण्हू लागला; संतापाने हातवारे करू लागला.

जोतीचे वडील होते जुन्या चालीरीती मानणारे. परंपरेचे पाइक. ते म्हणाले, 'आपण शूद्र जातीचे. आपण ब्राह्मणाच्या बरोबरीचे कसे होणार ? धार्मिक आणि सामाजिक जीवनातले ते अग्रणी. त्यांनी तुला शिक्षा न करता तेथून हाकलून दिले हेसुद्धा त्यांचे एकपरी उपकारच आहेत. अरे, पेशव्यांच्या ऐन राजवटीत ब्राह्मणेतरांचा अपमान होत असे. आणि हत्तीच्या पायाखालीसुद्धा त्यांना देण्यात येत असे. न्यायालयांत ब्राह्मणांच्या बाजूने पक्षपात व्हायचा. त्या गुलटेकडीवर ब्राह्मणांनी जी अनेक अमानुष कृत्ये केली त्याची ती साक्ष देत आहे. ज्या ब्राह्मणेतर ज्ञाती आपण ब्राह्मणांच्या बरोबरीचे आहोत अशी शेखी मिरवीत, त्यांनी अमूक अमूक प्रकारचा पोशाख करता कामा नये, असा त्यांनी दंडक घातला होता.'

जोतीने आपल्या वडिलांचा हितोपदेश ऐकून घेतला. जुन्या रीतिभाती मुकाट्याने पाळणे हेच हिताचे. त्या मोडून ब्राह्मणांचा कोप ओढवून घेऊ नये. जी गोष्ट रीतीरिवाज आणि परंपरा यांच्या विरुद्ध आहे, ती गोष्ट करण्यात काही अर्थ नाही. हाच जोतीच्या वडिलांचा बोलण्याचा मथितार्थ होता. पण जोतीने शिवाजी, वॉशिंग्टन आणि मार्टिन ल्युथर यांच्या जीवनापासून स्फूर्ती घेतली होती ती काही उगाच नव्हती. ती

स्फूर्ती केवळ वरवरची नव्हती. सारी रात्र जोती अंथरुणावर तळमळत होता. मानवी समतेच्या क्रांतिकारक विचाराने त्याच्या डोक्यात थैमान घातले होते. 'जर तू ही गोष्ट पेशव्यांच्या ब्राह्मणी राज्यात केली असतीस तर तुला बंडखोर म्हणून शिक्षा झाली असती.' हे वडिलांचे बोल जोतीच्या मनाला पुन्हा एकदा डिवचून गेले.

सर्व परिस्थितीचा विचार करता करता समाजातील प्रत्येक क्षेत्रातील ब्राह्मणांचे प्रभुत्व व वर्चस्व यांचे मूळ कशात आहे, शूद्र अनेक शतके मानसिक गुलामगिरी नि दारिद्य कसे भोगीत राहिले होते हे त्याच्या लक्षात आले. शूद्रांचा जन्म दारिद्र्यात होई आणि त्यांचा अंतही दारिद्र्यात नि मानसिक गुलामगिरीतच होई. आपले दैन्य नि गुलामगिरी हा आपल्या पूर्वजन्माचा अटळ असा वारसा आहे, प्राक्तनच आहे, अशी त्यांची भोळी समजूत असे. शूद्र वर्गाच्या नशिबी जन्मभर अपमानाची पंगत. निकृष्ट अशा उदरंभरणाच्या साधनांची संगत !

जोतीच्या मनात ह्या विचारांची खळबळ उडाली. त्यामुळे त्याच्या मनाच्या खोल तळाशी कित्येक दिवसांपासून दबून राहिलेली एक उत्कट आकांक्षा वेगाने उसळून वर आली. तिने एक नव चेतना निर्माण केली. लग्नाच्या मिरवणुकीतील त्या घटनेच्या योगे भोवतालच्या परिस्थितीवर एक नवाच प्रकाशझोत पडला व तिच्यामागील खरे कारण त्याला सत्यस्वरूपात स्पष्ट दिसले. त्याच्या आतापर्यंतच्या विचाराला कलाटणी मिळाली. त्याच्या मनात विवेकाचे वातावरण पसरू लागले आणि विकाराचे वादळ ओसरू लागले. जी क्रांती घडून यावी अशी आपली आकांक्षा आहे, ती शस्त्राने नि रक्तसिंचनाने साध्य होणार नाही. त्यासाठी दुसऱ्या कोणत्या तरी साधनांचा उपयोग करावा लागेल याचा त्याने विचार केला. विचारांती त्याने आपल्या ध्येयसिद्धीच्या मार्गाचा मनाशी पक्का निर्णय करून टाकला. त्या निर्णयानुसार आपल्या पूर्वीच्या ध्येयाचा नि योजलेल्या मार्गाचा त्याग करून, त्याने समाजक्रांतीचा झेंडा उभारण्याचे ठरविले.

स्वतःला सन्मान आणि लौकिक मिळावा असाच काही जोतीच्या त्या तीव्र जाणिवेचा अर्थ नव्हता. त्याला समाजाची अधोगती थोपवून धरण्यासाठी दंड थोपटून उभे राहावयाचे होते. सामाजिक व मानसिक गुलामगिरीच्या बेड्या तोडावयाच्या होत्या. धर्माच्या नावाखाली हिंदुसमाजाच्या मनावर ज्या दुष्ट नि निष्ठुर चालीरीती आणि दुर्मते सत्ता चालवीत होती, त्यांविरुद्ध त्याला लढा करावयाचा होता. समाजातील त्या भयंकर चालीरीती आणि रूढी ह्यांचा दुष्टपणा किती अघोर होता ह्याची स्पष्ट जाणीव झाल्यामुळे कनिष्ठ वर्गांना मनुष्यपणास मुकविणाऱ्या त्या गुलामगिरीतून मुक्त करून त्यांच्या जीवनात त्याला पुन्हा चैतन्य निर्माण करावयाचे होते; त्यांच्या ठायी आत्मतेज निर्माण करायचे होते. सामाजिक अप्रतिष्ठेच्या कलंकाने जोतीच्या मनात सामाजिक अन्यायाविरुद्ध जळजळीत चीड निर्माण केली आणि त्याचा परिणाम साहजिकच अन्यायाविरुद्ध झगडा करण्याच्या निर्णयात झाला.

## . २ .

जोतीच्या धैर्यशाली हृदयात एकप्रकारचे नवे मनोबळ निर्माण झाले. ते त्याच्या ध्येयाच्या दिशेने त्याला पुढे पुढे लोटू लागले. जोतीची कृती, विचार, भावना आणि इच्छा ही सारी त्या ध्येयात केंद्रित झाली. त्यांनी त्याचे जीवन आमूलाग्र बदलून टाकले. त्याचा कायापालट झाला. त्याचे बोलणे-चालणे आणि राहणी यांत एक विशिष्ट पद्धत नि शिस्त निर्माण झाली. मनुष्याचे व्यक्तिमत्व त्याच्या विशिष्ट ध्येयानुसार घडते हेच खरे. मनुष्याच्या जीवनात जेव्हा अशी स्थित्यंतरे घडून येतात तेव्हा जुनी मूल्ये नि सामाजिक पुनर्रचना यांविषयी त्याच्या मनात जोराने मंथन सुरू झाल्यावरच ती घडतात. जोतीच्या आंतरिक झगड्याविषयी अशीच गोष्ट घडली.

सामाजिक अप्रतिष्ठेचा तो कलंक जोतीच्या पुढील आयुष्यातील चळवळीचा उगमस्थान ठरला. ही एक प्रकारची नवीनच अशी जाणीव होती. ह्या तीव्रतर जाणिवेमुळे सत्याचा असत्याशी, न्यायाचा अन्यायाशी, झगडा सुरू झाला. आपल्या चळवळीचे हे तात्त्विक अधिष्ठान निश्चित केल्यावर आणि कार्यक्रम आखल्यावर तरुण जोतीने बंडाचे निशाण रोवण्याचा निर्धार केला. अनेकदा असे घडते की धर्मश्रद्धाळू आईबाप आपल्या मुलांना जी धर्मतत्त्वे शिकवितात, त्यांचा ती मुले तिरस्कार करतात आणि आईबापांच्या सनातनी मतांविरुद्ध बंड करून उठतात. तरुण जोतीने आपल्या वडिलांच्या रूढिप्रिय मतांना मानले नाही. त्याचे असे ठाम मत झाले की, 'राजकीय गुलामगिरीपेक्षा ही सामाजिक गुलामगिरी अधिक वाईट होय.'

जोती स्वतःशी म्हणाला, 'मी सुशिक्षित आहे. चांगले काय आणि वाईट काय हे मला समजते. ब्राह्मण आणि मी एकाच धर्माचे. मग मी कमी दर्जाचा आहे, असे त्यांना वाटण्यास कारण कोणते? धर्माच्या शिकवणीमुळे ते असे वागतात काय? परंतु खरी नीती हाच मानवाचा धर्म आहे.' असा विचार करता करता तो अशा निर्णयाप्रत आला की, जातिव्यवस्थेतील आणि धर्मव्यवस्थेतील प्रमुख म्हणून ब्राह्मण ही सत्ता नि मान उपभोगीत आहेत. म्हणून जातिभेद हा संघटनेचा, एकोप्याचा आणि सुसंस्कृत जीवनाचा शत्रू आहे. ब्राह्मणशाही हे त्याचे बाह्य स्वरूप आहे. ज्या ब्राह्मणशाहीने शूद्रांना निरंतर अपमानित आणि हीन अवस्थेत पिचत ठेवले, तिचे निर्मूलन करण्यासाठी प्रचलित समाजव्यवस्थेची पायाभूत असलेली जन्मजात उच्चनीचतेची कल्पना हीच समूळ उखडून टाकली पाहिजे, असे त्याने मनाशी ठरविले.

जातिव्यवस्था ही अनेक शतके अभंग नि भक्कम राहून अबाधितपणे चालू राहिली. कारण कनिष्ठ वर्ग विद्यासंपन्न नसल्यामुळे त्यांनी त्या मानसिक गुलामगिरीच्या दावणीत आपली मान अडकवली. कनिष्ठ वर्गातील लोकांना ज्ञानाचे दरवाजे खुले करून यांच्यामध्ये शिक्षणाचा प्रसार केला, तर सामाजिक समतेच्या कल्पनेने स्फुरलेले ते कनिष्ठ वर्गातील लोक सामाजिक समतेसाठी लढतील, त्या मानसिक गुलामगिरीविरुद्ध

बंड करतील अशा उद्देशाने जोतीने शिक्षण आणि समता यांचे निशाण उभारण्याचे ठरविले. प्रत्येक दुर्दैवी घटनेतून काही सुदैवाचा अंश निघतो असे म्हणतात. जोतीचा अपमान झाला खरा. परंतु त्या वैयक्तिक अपमानाचे रूपांतर त्याने आपल्या विशाल ध्येयशक्तीत केले. यातच जोतीच्या मनाचे वैशिष्ट्य नि त्याच्या दृष्टीतील विशालता दिसून येते.

जोतीच्या पूर्वीच्या पिढीतील राममोहन रॉय यांच्याप्रमाणे जोतीलाही सरकारी नोकरी मिळून तीत त्याला बढती मिळत गेली असती. जी परीक्षा लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख उतरले होते, तीच परीक्षा जोती उत्तीर्ण झाला होता. मुंबई विद्यापीठ स्थापन झाले त्या पूर्वीच्या काळात विद्यार्थ्यांची लायकी ठरविण्यास दुसरे साधन नव्हते. इंग्रजी राजवटीत महाराष्ट्रातील पहिल्या श्रेणीच्या ज्या नेत्यांनी सरकारी नोकरी पत्करली नाही, त्यांपैकी जोती हा पहिला नेता होय. जगन्नाथ शंकरशेट हे लक्ष्मीपुत्र होते. जोतीचे दुसरे समकालीन लोकहितवादी. त्यांनी न्यायालयात लेखनिकाची नोकरी धरली. दुसरे तेजस्वी नेते होते बाळशास्त्री जांभेकर. तेसुद्धा सरकारी नोकरीत होते. कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी सरकारी नोकरी केली. भाऊ महाजन हे मात्र ह्याला अपवाद होते. देशसुधारणेच्या बुद्धीने त्यांनी पाक्षिके नि मासिके चालविली. त्यानंतरच्या काळात ज्या नेत्यांनी इंग्रज सरकारची नोकरी केली नाही, त्यांत लो० टिळक, गो. ग. आगरकर, गो. कृ. गोखले, न. चिं. केळकर, धों. के. कर्वे, कर्मवीर विठ्ठलराव शिंदे आणि वीर सावरकर हे प्रमुख होत. खरोखरीच हे तेजस्वी अपवाद होते.

. ३ .

सर्व जगाच्या जीवनात १८४८ हे वर्ष एक महान क्रांतिकारक वर्ष ठरले आहे. कार्ल मार्क्स ह्याने त्याच वर्षी 'कम्युनिस्टांचा जाहीरनामा' हा आपला ऐतिहासिक महत्त्वाचा प्रबंध प्रसिद्ध केला. अमेरिकेत स्त्रियांच्या उद्धाराची चळवळ त्याच वर्षी न्यूयॉर्क येथील वेस्लियन चर्च येथे सुरू झाली.[1] तिकडे अमेरिकन स्त्री क्रांतीच्या मार्गावर असता इकडे भारतीय स्त्री गुलामगिरीच्या बंधनांत खितपत पडली होती. हिंदुशास्त्राच्या आज्ञेप्रमाणे हिंदू स्त्रीला कनिष्ठ दर्जा देण्यात आला होता. श्रुतीचा काळ सोडला तर शतकानुशतके तीच परिस्थिती चालू होती. त्या वर्षी भारतात राजकीय स्थित्यंतरे झपाट्याने होत राहिली होती. साताऱ्याच्या छत्रपतीची गादी १८४८ सालीच विसर्जित करण्यात आली.

महाराष्ट्रात जुने नेतृत्व जाऊन नवीन स्वरूपाचे नेतृत्व उदयास येत होते. पेशव्यांच्या राजवटीत जे पुरुष रणांगणात शौर्य गाजवीत, धनसंपत्ती मिळवीत, वा मुत्सद्दीपणाच्या क्षेत्रात नाव मिळवीत, तेच समाजाचे नेतृत्व करीत. ब्रिटिश राजवटीत पेशवाईतील जुने

१. Park, Maud Wood, Front Door Lobby, p. 2.

मुत्सद्दी नि प्रशासक यांच्या नेतृत्वाची परंपरा संपुष्टात आली. ब्रिटिश शासनसंस्था आणि पाश्चिमात्य शिक्षण यांचा मराठ्यांच्या राजकीय नि सामाजिक विचारांवर फारच मोठा परिणाम होत राहिला होता. त्यामुळे पंडितांची, देशभक्तांची नि समाजसुधारकांची एक नवीन पिढी उदयास येऊन ती जुन्या पिढीतील नेत्यांची जागा घेत होती.

पाश्चात्त्य शिक्षण आणि विचारप्रणाली यांचा महाराष्ट्रीयांवर दूरगामी परिणाम होऊ लागला होता. उंच वृक्षांना वाऱ्याची दिशा चटदिशी उमजते. त्याप्रमाणे खऱ्या थोर पुरुषांना नवविचारांची दिशा चटदिशी उमगते. आणि त्यांकडे ते झुकतात. कऱ्हाडे ब्राह्मण कुटुंबामध्ये जन्मास आलेले बाळशास्त्री जांभेकर हे अशा पुरुषांमध्ये अग्रेसर होत. त्यांचा जन्म राजापूर तालुक्यातील पोंभुर्ले गावी झाला. त्यांची बुद्धिमत्ता लहानपणीच परिपक्व झालेली होती. त्यांचे बुद्धिवैभव, त्यांचा शालेय नि शैक्षणिक क्षेत्रांतील पराक्रम व प्रखर देशाभिमान, त्यांचे इतिहाससंशोधनाचे कार्य नि तेजस्वी आचार्यपद आणि त्यांची अलौकिक स्मरणशक्ती ह्यांचा परिणाम त्यांच्या पिढीवर झाला होता.

बाळशास्त्री जांभेकर (१८१२–४६) हे पश्चिम हिंदुस्थानातील पहिलेवहिले प्राध्यापक. ते नोकरीत चढता चढता शिक्षणखात्यात शाळातपासनीस झाले. अठराशे पंचेचाळीस साली ते विद्यार्थ्यांना अध्यापनशास्त्राचे ज्ञान देणाऱ्या शाळेचे मुख्याध्यापक झाले. त्यांनीच ६ जानेवारी १८३२ रोजी पहिले मराठी पाक्षिक 'दर्पण' सुरू केले. त्या पाक्षिकाचा इंग्रजी विभाग बाळशास्त्री स्वतः संपादन करीत. ते लोकांचे म्हणणे काय आहे आणि त्यांची दुःखे कोणती आहेत हे आपल्या पाक्षिकात मांडून सरकारच्या निदर्शनास आणून देत. त्या पाक्षिकातील मराठी विभागाचे संपादन भाऊ महाजन करीत. गोविंद विठ्ठल ऊर्फ भाऊ महाजन यांची विद्यार्थीदशेतील प्रगती बाळशास्त्री जांभेकरांप्रमाणेच वाखाणण्यासारखी होती. भाऊ महाजन हे (१८१५–१८९०) एक प्रागतिक विचाराचे तरुण देशभक्त होते. विद्यार्थीदशेच्या पूर्वार्धात ते स्वयंशिक्षित झाले होते. महाविद्यालयात विद्यार्थी असताना त्यांनी १८४१ मध्ये 'प्रभाकर' नावाचे मराठी साप्ताहिक काढले. ते १८४० च्या मे महिन्यात सुरू झालेल्या राघोबा जनार्दन गऱ्हाणकर यांच्या 'दिग्दर्शन' नावाच्या मराठीतील पहिल्या मासिकातही लिहीत असत. पुढे ते त्यांनी विकत घेतले. त्यानंतर त्यांनी धुमकेतू नावाचे दुसरे साप्ताहिक व 'ज्ञानदर्शन' नावाचे त्रैमासिक चालविले.[२] बाळशास्त्री जांभेकर आणि भाऊ महाजन यांनी हिंदुसमाजाच्या खोट्या पूर्वग्रहावर नि अज्ञानावर हल्ले चढविले. समाजसुधारणेला अनुकूल असे वातावरण निर्माण करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. विधवाविवाहाच्या बाजूने—सुद्धा त्यांनी आपली लेखणी चालविली होती.

दादोबा पांडुरंग तर्खडकर हे त्याकाळचे तिसरे महत्त्वाचे नेते होते. एका वैश्य कुटुंबातील ते गरीब आणि बुद्धिमान विद्यार्थी. त्यांनी परिश्रमपूर्वक अभ्यास

---

२. खानोलकर, गं. दे., अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक, पृ. २१–४९

करून सरकारी नोकरीत प्रवेश केला. शिक्षणखात्यात शाळातपासनीस झाले व पुढे साहाय्यक जिल्हाधिकारी झाले. ते श्रेष्ठ प्रतीचे धर्मसुधारक होते. धर्मक्षेत्रातील एक मोठे विचारवंत म्हणून त्यांच्या मागील दोन पिढ्या त्यांना बहुमान देत असत. त्यांनी परमहंस सभा नावाची एक गुप्त संस्था १८४८ साली स्थापन केली. त्या संस्थेचा उद्देश जातिभेद मोडून समाजात बंधुभाव निर्माण करणे हा होता. पुण्यातील ब्राह्मण पंडित या विद्वानाला आणि व्याकरणकर्त्याला जेव्हा भेटत तेव्हा त्यांची वेदशास्त्रावरील चर्चा ऐकून त्या ब्राह्मणांना त्यांच्या बुद्धीचा आणि ज्ञानाचा हेवा वाटे. ते म्हणत, "स्वधर्मी राज्य असते, तर असला प्रकार झाला नसता. 'अध्यापक' व 'अध्यायी' या उभयतांचे पारिपात्य झाले असते."[३]

हे नेते नवविद्या, नव-विचार, नव-आचार आणि सुधारणा यांचे प्रवर्तक होते. ह्या सर्वांच्या कार्याला या ना त्या स्वरूपात जगन्नाथ शंकरशेट प्रोत्साहन देत असत. जगन्नाथ तथा नाना शंकरशेट (१८०३ ते १८६५) हे हिंदुस्थानातील त्या काळातील थोर नेते होत. ते मोठे उद्योगपती होते. त्यांचा उदारमतवाद, सतत प्रेरक ठरणारे त्यांचे औदार्य आणि त्यांची उदात्त देशभक्ती यांची मुंबईतील शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यास मोठीच सढळ आणि सक्रिय मदत होत राहिली होती. बाळशास्त्री जांभेकर, नाना शंकरशेट, दादोबा पांडुरंग आणि भाऊ महाजन यांचा उल्लेख बहुधा मुंबईचे नेते असा करण्यात येई. कारण मुंबई हे पाश्चिमात्य प्रागतिक विचारांचे त्या काळचे एक प्रमुख केंद्र होते.

ह्याच समयास पुण्यातील एका तरुण नेत्याने लोकांचे लक्ष प्रगतीच्या नवीन विचारांकडे आणि नव्या ज्ञानाकडे वेधून घेतले. त्याचे नाव गोपाळ हरी देशमुख. त्यांचा जन्म पुणे येथे एका ब्राह्मण सरदार कुटुंबात झाला. त्यांनी त्याकाळी पाश्चिमात्य शिक्षण घेण्यात मोठे धैर्य दाखविले. त्यांनी मिशनऱ्यांच्या शाळेत आपले शिक्षण पूर्ण केले आणि इनाममंडळात कारकुनाची नोकरी धरली.

गोपाळ हरी देशमुख (१८२३ ते १८९२) हेच पुढे लोकहितवादी म्हणून प्रसिद्धीस आले. त्यांनी 'प्रभाकर' पत्रात लोकहितवादी या टोपण नावाने १८४८ साली आपली इतिहासप्रसिद्ध लेखमालिका प्रामुख्याने ब्राह्मण जातीला उद्देशूनच लिहिलेली होती. प्राचीन ज्ञान हे निष्फळ ठरले आहे, ते सोडून द्या आणि नवीन ज्ञानाचा विचार करा. समाजातील जुन्या चालीरीती आणि कडक बंधने टाकून द्या. आधुनिक ज्ञान व पाश्चिमात्य विचार यांचा स्वीकार करा, असा त्यांचा ब्राह्मणांना उपदेश असे. त्या काळच्या ऐतखाऊ, आळशी आणि चारित्र्यहीन ब्राह्मणांवर त्यांनी आसूडाचे फटकेच ओढले. अवनतीच्या त्या अंधकारात ब्राह्मणांच्या सनातनी वृत्तीविरुद्ध असे जळजळीतपणे उद्गार काढणे हेच मोठे धारिष्ट्य होते. त्यामुळे त्या काळच्याच नव्हे तर पुढील

३. संपादक, पंडित, भ. श्री., रावसाहेब केशव शिवराम भवाळकर यांचें आत्मवृत्त, पृ. ९०.

काळातील ब्राह्मण समाजाने लोकहितवादींच्या कठोर बोलांविषयी त्यांना क्षमा केली नाही. त्यांची पिढ्यानपिढ्या उपेक्षाच केली.

हे सर्व नव नेते मध्यमवर्गीय कुटुंबांपैकी होते. ते आपल्या अंगच्या गुणांच्या आणि बुद्धिमत्तेच्या जोरावर लौकिकास चढले होते. जोतीच्या समकालीन नेत्यांपैकी काहीजण जोतीपेक्षा अधिक पढलेले होते. तथापि, जोतीचे ठायी असलेले युगप्रवर्तक धैर्य, निस्पृहता, स्पष्टोक्ती, संघटनाचातुर्य नि त्याग ह्या गुणांची प्रखर शक्ती त्यांच्या ठायी नव्हती. जोतीच्या विचारांबरोबर, कृतीबरोबर अन् उदयाबरोबर नवयुगाची प्रभात उजाडली. नवयुगाची तुतारी फुंकली गेली. महाराष्ट्रात नवयुगाची चाहूल दिसू लागली. महाराष्ट्र नवयुगाच्या उंबरठ्यावर उभा राहिला. नव युगाची ती प्रभात आणि त्यातून दिसणारे भविष्यकाळाचे पुसट दर्शन यांनी जोतीचे शरीर, मन आणि विचार हे थरारून, भारावून, गेले होते. समाजातील कनिष्ठ थरात जन्मलेल्या तरुण जोतीने महाराष्ट्रात नवीन नेतृत्वाचा पाया घालण्यास प्रारंभ केला.

# ४

## बंडाचे निशाण रोवले

आता जोतीला लोक व त्याचे मित्र जोतीबा म्हणू लागले. 'बा' हा प्रत्यय आदर व प्रीती यांचा दर्शक आहे. जोतीबा हे सुमारे एकवीस वर्षांचे झाले. त्यांनी हिंदू स्त्रीला तिच्या प्राचीन गुलामगिरीतून मुक्त करण्याचा विडा उचलला. भारताने स्त्रियांना आणि शूद्रांना शिक्षणापासून दूर ठेवले होते. अज्ञान म्हणजे अंधार व शिक्षण म्हणजे प्रखर सूर्यप्रकाश. हा प्रकाश अज्ञानांधकार नष्ट करून मनुष्याचे जीवन चैतन्यमय करून सोडतो. जीवित पूर्णपणे विकसित करण्याचे आणि जगण्याचे, शिक्षण हे एक प्रमुख साधन आहे. कोणत्याही समाजात द्रुतगतीने स्थित्यंतर घडवून आणण्यापूर्वी शिक्षणाचा प्रसार करणे अत्यावश्यक असते, ती मूलभूत अशी एक आवश्यकताच असते. शिक्षणाने मनुष्याला सत्यासत्याचा नि अंतिम हिताचा विचार करण्याची शक्ती प्राप्त होते; स्वाभिमानाची जाणीव त्याच्यात जागृत होते. म्हणून शिक्षण हे सर्व सुधारणेचे मूळ आहे.

यास्तव स्त्रिया व शूद्र यांना ज्ञानाचे दरवाजे खुले करावयाचे, असा जोतीबांचा ठाम निर्धार झाला. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उद्धरी' ह्या सत्याचा प्रत्यय त्यांना आला होता; गुरूणां माता गरीयसी, याची थोरवी त्यांना पटली होती. दीर्घ विचारांती, मुलींकरिता एक शाळा काढावी असे त्यांनी ठरविले. कारण मुलांच्या

भवितव्याचे मार्गदर्शन मातांकडून यशस्वी रीतीने होऊ शकते. स्त्रियांना आपल्या कर्तव्याची नीट जाणीव झाली, तर देशाची प्रगती फार झपाट्याने होईल असे त्यांना वाटले. जोतीबा हे नवयुगाचे एक प्रतीकच होते. आत्मसमर्पणाच्या उदात्त आणि विलक्षण विचारांनी ते भारलेले होते. स्त्रियांच्या व शूद्रांच्या उद्धारकार्याचा श्रीगणेशा करण्यास ते उतावीळ झाले होते.

दृढनिश्चयी मनुष्य आणि धबधबा हे आपला मार्ग आपणच काढीत पुढेपुढे जातात तसेच जोतीबा आपला मार्ग चोखाळू लागले. ते मुलींची शाळा उघडण्याच्या विचारात असता त्यांचे परम स्नेही सदाशिवराव गोवंडे यांची 'रस्ते आणि तळी खाते' कार्यालयातून अहमदनगरच्या न्यायखात्याच्या कचेरीत बदली झाली. नोकरीवर रुजू होण्यासाठी सदाशिवराव गोवंडे अहमदनगरला गेले तेव्हा त्यांनी आपल्याबरोबर जोतीबांना नेले. त्या काळी अहमदनगर हे ख्रिस्ती मिशनऱ्यांनी चालविलेल्या शिक्षणकार्याचे एक मोठे केंद्र बनले होते. तेथे गेल्यावर एके दिवशी सदाशिवराव गोवंडे व जोतीबा ह्यांनी अमेरिकन मिशनमधील मिस फॅरारबाईंच्या शाळेला भेट दिली.

मुलींची शाळा काढण्यापूर्वी आपण कोणत्या गोष्टी केल्या ह्याविषयी जोतीबा म्हणतात : "माझ्या देशबांधवांपैकी महारमांगचांभार ह्या कनिष्ठ जातींतील बंधू हे दुःख आणि अज्ञान यांत खाक बुडालेले आहेत. त्यांची स्थिती सुधारण्यासाठी दयाळू देवानें मला प्रेरणा दिली. स्त्रियांच्या शाळेनें प्रथम माझें लक्ष वेधलें. पूर्ण विचारांती माझें असें मत झालें कीं पुरुषांच्या शाळेपेक्षा स्त्रियांच्या शाळेची अधिक आवश्यकता आहे. स्त्रिया आपल्या मुलांना त्यांच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षांत जें वळण लावतात त्यातच त्यांच्या शिक्षणाची बीजें असतात. अशा विचारांत मी असताना अहमदनगर येथील अमेरिकन मिशनमधील मिस फॅरार या बाईनें चालविलेल्या शाळा मी एका मित्रासमवेत पाहिल्या. ज्या पद्धतीनें त्या मुलींना शिक्षण देण्यांत येत होतें ती पद्धत पाहून मी फार खूष झालो."[1]

हिंदुस्थानात स्त्रीशिक्षणाकडे दुर्लक्ष करण्यात येतें याबद्दल जोतीबा आणि गोवंडे यांच्याजवळ मिस फॅरारने अत्यंत दुःख व्यक्त केले. आपल्या देशाची सुधारणा करण्यासाठी परकीय लोक जे चिकाटीने प्रयत्न करीत होते ते पाहून जोतीबा आणि गोवंडे यांच्या मनावर फारच चांगला परिणाम झाला. आपल्या देशबांधवांच्या सुधारणेकडे आपले लोक अजिबात दुर्लक्ष करतात याविषयी त्यांना खंत वाटली. वास्तव प्रत्येकाने आपल्या पत्नीस शिक्षण देऊन शिक्षणप्रसाराच्या कार्यात तिचे साहाय्य घ्यावे, असे त्यांनी ठरविले. त्याप्रमाणे जोतीराव पुण्यास परत आल्यावर त्यांची पत्नी सावित्रीबाई ह्यांचे शिक्षण सुरू करण्यात आले आणि त्यांनी स्वतः कनिष्ठ वर्गातील मुलींसाठी एक शाळा उघडली. जोतीबा म्हणतात : "मी पुण्यास येतांच कनिष्ठ वर्गातील मुलींसाठी एक शाळा

१. The Bombay Guardian, 16 December 1853.

सुरू केली. मात्र त्या शाळेंत ज्या मुलांना शिक्षण घेण्याची आवड असेल त्यांनाही प्रवेश दिला. या शाळेंत मी वाचन, अंकगणित आणि व्याकरणाची मूलतत्त्वें हे विषय शिकवीत असे."[२]

जोतीबांची ही शाळा बुधवारपेठेतील भिड्यांच्या वाड्यात १८४८ च्या ऑगस्ट महिन्याच्या आसपास सुरू झाली असावी असे ह्या शाळेसंबंधी 'बॉंबे गार्डियन' वर्तमानपत्राच्या २८ नोव्हेंबर १८५१ च्या अंकात जे पत्र प्रसिद्ध झाले आहे त्यावरून अनुमान काढता येते. जोतीबांचे सहकारी सखाराम यशवंत परांजपे, सदाशिव गोविंद हाटे व सदाशिवराव गोवंडे हे त्यांना ती शाळा चालविण्यात आर्थिक साहाय्य करीत असत.

ही शाळा जोतिबांसारख्या ब्राह्मणेतराने काढलेली. तीत महारमांगचांभारादी अतिशूद्राच्या मुली शिकत. पुणे हा सनातन्यांचा बालेकिल्ला. स्त्रियांना आणि त्यांतही शूद्र आणि अतिशूद्र ह्या जातींतील स्त्रियांना शिक्षण देणे हा त्या सनातन्यांच्या दृष्टीने अत्यंत भयंकर भ्रष्टाचार होता. महान पातक होते. त्यांनी त्याविरुद्ध आरडाओरडा करण्यास प्रारंभ केला. शूद्रांच्या घरी विद्या आणि ज्ञान चालले, असे ते ओरडू लागले. शास्त्राप्रमाणे शूद्रांना विद्येचा अधिकार नाही. त्यांना शिक्षण देणे म्हणजे देव, धर्म, समाज यांच्याविरुद्ध वर्तन करणे होय. आणि मुलींना शिकविणे म्हणजे हिंदुधर्मावर मोठा भयंकर अत्याचार करणे नि मोठे पातक करणे होय. ज्या शाळेत पुरुष मुलींना शिकवतो, त्या शाळेत मुलींना पाठविणे हा तर लोकांच्या दृष्टीने मोठाच अपराध होता.

हिंदू शास्त्रांच्या मते स्त्रिया आणि शूद्र यांना विद्येचा अधिकार नव्हता. स्त्री ही विश्वासास अपात्र, त्याचप्रमाणे दुष्ट, चंचल, अविचारी आणि स्त्रैण म्हणून मानण्यात येई. स्त्रीला शिक्षण दिले तर ती कुमार्गास लागेल आणि घरच्या सुखाचे वाटोळे करील असे मानण्यात येई. स्त्रीने शिक्षण घेणे म्हणजे समाजाच्या दृष्टीने भ्रष्टाचार करणे होय. मुलीने शिक्षण घेतले तर तिला अकाली वैधव्य येते, अशी समजूत होती. स्त्रियांनी पायात जोडे वा वहाणा घालणे ही अपवित्र गोष्ट समजत. तिने छत्री वापरली तर पुरुषाचा उपमर्द होई. वडिलधाऱ्या मंडळींच्या देखत नवऱ्याशी बोलणे हे असभ्य वर्तन मानीत. एकदा एक जोडपे दिवसा गप्पागोष्टी करताना आढळले. मुलाच्या बापाने त्या उभयतांस या अपमानाबद्दल एक दिवसभर खोलीत कोंडून ठेवले.

स्त्रीने स्वतःच्या नवऱ्याच्या पंगतीस जेवणे ही अपमानकारक गोष्ट समजत. सासऱ्याचे गाव सोडून नवरा जेथे नोकरी किंवा धंदा करीत असेल त्याच्याबरोबर मुलीने राहणे हे वडिलधाऱ्या मंडळीस खपत नसे. त्या तरुण पत्नीला सासऱ्याच्या घरात कुजत सडत पडावे लागे. स्त्री परतंत्र अबला. विद्याभ्यासाने तिची पापाचरणाकडे प्रवृत्ती होईल. तिच्या बुद्धीने वागले असता सर्वस्वी नाश होतो. स्त्री ही दोषाची आणि अज्ञानाची खाण होय. तिला शिकविणे म्हणजे वेड्याच्या हाती कोलीत देण्यासारखे आहे.

---

२. The Bombay Guardian, 16 December 1853.

'विद्यादिके करून कपट, कुयुक्ती, वंचना मात्र वाढेल.' जर ती मुलगी शिकली तर ती सासऱ्याची पर्वा करणार नाही असे वाटे. शिवाय इतर जातींच्या मुलींबरोबर ती शाळेत बिघडून जाईल असे वाटे. वाईट पुस्तके वाचून ती उद्धट होईल असा समज असे. तिचे लग्न बालवयातच झाले तर सासऱ्याच्या मुलांकडे ती लक्ष देईल. त्यांच्याकरिता राबेल. आणि अशा तऱ्हेने धर्म व सद्गुण यांचे पालन करील. स्त्रीला अशा तऱ्हेने एक क्षणभरही स्वातंत्र्य मिळत नसे. तिचे जीवन करुणास्पद झाले होते. धर्म आणि सामाजिक परंपरा यांनी तिचे जीवन जखडून ठेवले होते.

**.२.**

जोतीबांनी मनुस्मृतीला आव्हान दिले. त्यांनी अशी घोषणा केली.

**आतां तरी तुम्ही मागें घेऊं नका। धिःकारूनी टाका मनूमत ॥**
**विद्या शिकतांच पावाल तें सुख। घ्यावा माझा लेख जोती म्हणे ॥**

सामाजिक परंपरा नि चालीरीती जोतीबांनी धुडकावून लावल्या म्हणून सनातनी मार्तंड आक्रोश करू लागले की, 'सनातनीपणा हाच आमचा धर्म आहे. आमचा धर्म धोक्यात आला आहे. जोतीबा हा समाजाचा शत्रू आहे. तो कःपदार्थ आहे. पिढ्यानपिढ्या कःपदार्थ गणलेल्या कुळातला हा वंशज आहे.'

जोतीबाचे शैक्षणिक कार्य हा हिंदुधर्मावर रानटी हल्ला आहे, असे पुण्यातील सनातनी ब्राह्मणांना वाटले. त्यामुळे पुण्यनगरीस एक भयंकर कलंक लागला, असे त्यांनी मनाले. त्यांना त्यांच्याविषयी अमर्याद द्वेष वाटू लागला. पुणेनगरात सनातन्यांच्या पूर्वजांनी असल्या नवस्थित्यंतरांचा आणि बंडाचा वीमोड केला होता. असली भयंकर गोष्ट त्याने त्यांच्या पूर्वजांच्या काळी केली असती, तर त्याला त्यांनी हत्तीच्या पायी दिले असते. परंतु आता ते सत्ताहीन झाले होते. जोतीबांच्या जातभाईकडून त्यांनी त्याला 'तुमच्या कृत्याचे परिणाम तुम्हाला भोगावे लागतील' असे धमकावले होते. परंतु त्यांच्या धमक्यांना त्यांनी भीक घातली नाही.

उलट जोतीबांनी दुसरी अशी एक गोष्ट केली की, त्यामुळे सनातन्यांची माथी अधिकच भडकली. महारमांगांच्या मुलींच्या शाळेत त्यांना दुसरा शिक्षक मिळत नव्हता. तेव्हा त्यांनी आपल्या पत्नीला मुलींना शिकविण्यासाठी सहायक शिक्षक म्हणून शाळेत आणले. सावित्रीबाईचा विद्याभ्यास त्यांनी घरीच करून घेतला होता. एका हिंदूबाईने शिक्षिकेचे काम केले ही त्या काळी अत्यंत समाजद्रोही आणि धर्मद्रोही गोष्ट मानण्यात आली. त्यामुळे पुण्यात संतापाची प्रचंड लाट उसळली. एका बाईने समाजाची बंधने तोडून शिक्षिकेचे काम करावे! ही गोष्ट त्यांना अपवित्र, अभूतपूर्व, अश्रुतपूर्व वाटली. नव्हे, तो राष्ट्रीय अपमानच वाटला. ते पढिक ब्राह्मण आणि त्यांचे बगलबच्चे हे सावित्रीबाई शाळेत जाताना दिसताच मार्गात तिच्या अंगावर चिखल फेकीत, घाण टाकीत, दगड मारीत. प्रतिदिनी घराकडून शाळेत जाताना हे दुःख तिला सहन करावे लागे.

सनातनी मार्तंडांचा तो अपवित्र त्वेष आणि ज्वलंत द्वेष पाहून ती किंचित गोंधळल्यासारखी होई. एकदा रस्त्यात क्षणभर थांबून ती आपल्या निंदकांना आणि छळकांना काकुळतीस येऊन म्हणाली : 'मी आपले कर्तव्य करीत आहे. देव तुम्हाला क्षमा करो! तुमचे भले करो.' असे म्हणतात की भारतात इसवी सनाच्या प्रारंभापासून स्त्रीशिक्षक जवळजवळ दिसेनासे झाले होते.[3] सावित्रीबाईंच्या शिक्षणक्षेत्रात प्रवेश झाल्यापासून हिंदू स्त्री पुन्हा सार्वजनिक क्षेत्रात उतरली, असे म्हणावयास हरकत नाही.

जोतीबा बंडखोर होते. त्यांच्या नसानसांतून त्या बंडाची उर्मी उसळत होती. लोकांना वाटे, जोतीबा धर्म, समाज आणि बहुमत यांची पर्वा करीत नाहीत. आणि जोतीबा तर देहभान विसरून, पराकोटीच्या निष्ठेने आपले कार्य करीत होते. त्यांची प्रतिभा आणि पराक्रम ही सडलेल्या चालीरीती आणि देशकालाला प्रतिकूल असणाऱ्या सामाजिक परंपरा यांच्याविरुद्ध बंड करून उठली होती. अंधश्रद्धेची ही रात्र हिंदुस्थानात संपता संपत नव्हती. दुष्ट चालीरीती आणि खोटे पूर्वग्रह यांनी समाजाच्या अनेक घटकांना जर्जर केले होते. त्यांच्या कुजट वासाने 'परमेश्वर'सुद्धा गुदमरला असेल. यास्तव जोतीबांनी त्या क्रूर चालीरीतींचा धिक्कार करून त्यावर मोठा कठोर नि निकराचा हल्ला केला. सनातन्यांच्या बेफाम विरोधाला घाबरून त्यांनी कच खाल्ली नाही. आपल्या जीवितकार्याला प्रारंभ करताना आपल्याविषयी आणि आपल्या कार्याविषयी गैरसमज, निंदा आणि विपर्यास होईल याची प्रत्येक महापुरुषाला चांगलीच कल्पना असते.

वरिष्ठ वर्गातील लोक हे सामाजिक परंपरेचे नि व्यवस्थेचे सदा गोडवे गात असतात. त्यामुळे नवसमाज निर्मितीस त्यांचा पाठिंबा असत नाही. त्यांचा जोतीबाच्या कार्याला पाठिंबा कसा मिळणार? हिंदू समाजाचे नियंत्रण कसे करावे यात प्रवीण असलेल्या ब्राह्मणांनी मात्र गोविंदराव फुले यांच्याकडे आपल्या तोफेचे तोंड वळविले. त्यांनी गोविंदरावांवर जास्तीत जास्त सामाजिक दडपण आणले. समाजव्यवस्थेत सुसंबद्धता राहवी म्हणून प्रचलित आणि प्रस्थापित सामाजिक परंपरांना पाठिंबा मिळविण्यासाठी अशा गोष्टी ते नेहमीच करीत असत. रागाने लाल झालेले आपले डोळे गरगर फिरवीत ते गोविंदरावांना विचारीत, "तुझ्या मुलाने समाजाला आणि धर्माला काळिमा लावला आहे. तशीच त्याची ती निर्लज्ज पत्नी. या दोघांच्या समाजद्रोही वर्तनामुळे तू देवाचा आपल्यावर वृथा रोष ओढवून घेत आहेस. देवाच्या आणि धर्माच्या नावाने तुला आम्ही अशी आज्ञा देतो की, तू जोतीबाचे हे कार्य थांबव; नाहीतर त्याला घरातून हाकलून तरी दे."

गोविंदराव हे जात्या धर्मनिष्ठ आणि श्रद्धाळू होते. सामाजिक चालीरीती आणि परंपरा यांनाच ते धर्म समजत व त्यांचे दक्षतेने पालन करीत. त्यांच्या मनावर ब्राह्मणांनी फुलमाळी समाजाकडून दडपण आणताच त्यांची भीतीने गाळण उडाली. त्या दुष्ट

---

३. Altekar, A. S, Position of Women in Hindu Society, p. 41.

दडपणाला ते बळी पडले. कनिष्ठ वर्गातील त्या माळ्याला ब्राह्मणांच्या मनाविरुद्ध साह्य करण्याची कोणाची छाती होती? शेवटी सनातन्यांचा आणि प्रतिगाम्यांचा जय झाला.

तथापि, सामाजिक दडपणाला गोविंदरावांनी स्वसंतोषाने मान तुकविली असे नाही. त्यांनी अत्यंत नाखुषीने त्यांच्या मतास मान तुकविली. पिता आणि पुत्र यांमध्ये अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध असतानासुद्धा गोविंदराव रागापेक्षा दुःखाने जोतीबांना म्हणाले, "शाळा तरी सोड किंवा घर तरी सोड." मुलाचे पाश तोडताना त्यांचे काळीज तिळ तिळ तुटत होते.

जोतीबांनी एक दीर्घ निःश्वास टाकला. आपल्या जीवितकार्याच्या उदात्ततेची आणि उपयुक्ततेची पित्याला खात्री पटविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. परंतु पित्याला मुलाचे म्हणणे पटेना. पुत्राच्या विनंतीचा अव्हेर करताना त्यांना मोठे दुःख झाले. त्यावर जोतीबांनी अत्यंत दुःखी अंतःकरणाने आपल्या प्रेमळ पित्याला स्पष्टपणे सांगितले की, 'मजवर मरण ओढवले तरी माझे हे कार्य मी सोडणार नाही.' पित्याचे अंग भीतीने शहारले. भयानक अशी निःस्तब्धता क्षणभर पसरली. थोड्या वेळाने गोविंदराव खिन्नतेने म्हणाले, 'तर मग तुझा मार्ग तुला मोकळा आहे. तू आपल्या बायकोला घेऊन कुठेही जा. तुझ्या बायकोला माझ्या घरात मी ठेवू शकत नाही.' सावित्रीबाईसुद्धा परंपराविध्वंसक मानली गेली. तिने गोविंदरावांच्या घराला काळीमा लावला अशीच ओरड झाली होती. ती आदर्श अशी भारतीय स्त्री होती. तिने आपल्या पतीबरोबर छळ आणि वनवास भोगण्याची आपल्या मनाची तयारी केली होती. ज्या समाजाची गुलामगिरीतून मुक्तता करून त्याचा उद्धार करण्याचे व्रत त्या दोघांनी घेतले होते, त्या समाजाच्या हातून अनन्वित छळ सोसण्याची त्यांनी आपली सिद्धता केली. जोतीबा तुकारामाप्रमाणे म्हणाले,

**सत्यअसत्यासी मन केलें ग्वाही।**
**मानियलें नाहीं बहुमता ॥**

जोतीबा त्याकाळाचे वर्णन करताना म्हणतात, "कनिष्ठ वर्गातील मुलांना शिकविल्यामुळे मी माझ्या जातिबंधूंच्या तिरस्कारास पात्र झालो. माझ्या वडिलांनी मला घरातून बाहेर काढले आणि मी कुठेही स्वतःचा संसार चालवावा असे सांगितले. साहजिकच शाळा बंद पडली आणि उदरनिर्वाहासाठी मात्र उद्योगधंदा करावा लागला."[४]

जोतीबांनी आपल्या पत्नीसहित बापाच्या घराला रामराम ठोकला. बापाचे हृदय दुःखाने होरपळले. विनम्र, विनयशील, बुद्धिमान आणि देखणी अशी ती वनिताही आपल्या पतीच्या मागून त्यागबुद्धीने बाहेर पडली. पतीबरोबर तिनेही त्यागाचा आपला वाटा उचलला. महान जीवितकार्याची धुरा खांद्यावर घेतलेल्या पुरुषाला समाजाने

४. The Bombay Guardian, 16 December 1853.

आपले ध्येय मान्य करावे म्हणून सर्व आयुष्यभर संकटे सोसावी लागतात. त्यासाठी पराकाष्ठेचा त्याग करावा लागतो; दुःखे भोगावी लागतात. समाजाच्या प्रचलित मताला विरोध करण्याला तो डरत नाही. समाजातील प्रचलित मताहून वेगळी मते मांडावयास तो भीत नाही. समाजाच्या विनंतीने किंवा धिक्काराने गोंधळून न जाता, तो आपले कार्य पुढे रेटीत असतो. आपल्या मताचा प्रचार आणि त्याप्रमाणे आचार तो करीत राहिलेला असतो. मार्गात एखादा दुर्दैवी अनुभव आला, तर त्याचे मन कच खात नाही किंवा तो आपल्या जीवितकार्यांचा त्याग करीत नाही. मानव समाजाची प्रगती अशाच विलक्षण, दृढनिश्चयी, कल्पक पुरुषांच्या हातून होत आली आहे. कल्पकता म्हणजे परंपरागत चालत आलेल्या गोष्टीहून काही वेगळेपणा. जो विचार निदिध्यासातून निर्माण होतो, तो अभिनव आणि अपूर्व असतो. तो यापूर्वी कधी कोणाच्या कल्पकतेला चाटून गेलेला नसतो म्हणून तो अभिनव असतो असे नाही; तर स्वबुद्धिप्रेरित विचार-वंताने जगात काही नवीन शोधून काढण्याच्या कल्पकतेने तो साधन म्हणून वापरलेला असतो. त्याअर्थी तो विचार अभिनव व अपूर्व असतो एवढेच.

. ३ .

एकोणिसाव्या शतकातील हिंदू मुलींकरता पहिली शाळा कलकत्त्यात १८१९ साली तेथील अमेरिकन मिशनने सुरू केली. त्याकाळी मुली शाळेत आणण्याकरिता शिक्षकाला प्रत्येक दिवशी घरोघर जावे लागे. मुलींनी शाळेत शिकावयास यावे म्हणून त्यांना काही विद्यावेतन द्यावे लागे. शिक्षक शाळेत ज्या प्रमाणात मुली आणील त्या प्रमाणात त्याला वेतन मिळत असे. अमेरिकन मिशनने १८४० त पुण्याच्या आसमंतात मुलींच्या शाळा उघडल्या होत्या. स्कॉटिश ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी चालविलेली एक मुलींची शाळा पुण्यात होती. सुमारे दहा मुली तीत शिकत असत. ती ख्रिश्चनांची शाळा असल्यामुळे चालू शकली नाही. स्वतंत्रपणे मुलींची शाळा काढणारे जोतीबा हेच पहिले भारतीय होत.

जोतीबांची शाळा आणि त्यांचे ते शैक्षणिक कार्य जवळजवळ पाचसहा महिने चालले.[५] त्यांचे स्नेही गोवंडे हे अहमदनगरहून मुलींसाठी स्वखर्चाने पुस्तके पाठवीत असत. जोतीबा शाळेच्या कामात इतके दंग झाले होते की त्यांना जेवायलादेखील सवड होत नसे. कित्येकदा सायंकाळपर्यंत ते उपाशीपोटी असत. परंतु जोतीबांच्या वडिलांनी त्यांना पत्नीसहित घराबाहेर काढल्यामुळे त्यांची ती शाळा फार दिवस चालली नाही. कारण जोतीबांना आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचे साधन पाहणे भाग पडले. त्यामुळे ती शाळा त्यांना बंद करावी लागली. या महारमांग मुलींच्या शाळेविषयी एका सत्यप्रिय माणसाने 'बॉम्बे गार्डियन' ह्या इंग्रजी वर्तमानपत्रात असे लिहिले की, "पांच किंवा सहा महिन्यांनंतर दुर्दैवाच्या दैवताने त्या उदात्त हेतूवर आपली क्रोधदृष्टी फिरवली.

---

५. The Bombay Guardian, 28 Novemeber 1851.

लोकांच्या मूर्ख पूर्वग्रहांना बळी पडून जोती गोविंद फुले याच्या वडिलांनी आपल्या मुलाला घराबाहेर काढले. त्यामुळे सर्वच अव्यवस्था झाली आणि शाळा बंद पडली." [६]

मध्यंतरी जोतीबा आणि त्यांचे मित्र ह्यांनी मुलींच्या नियोजित शाळेत आपापल्या पत्नीस शिक्षिकेचे काम करता यावे म्हणून त्यांना शिक्षण देण्यास आरंभ केला होता. जोतीबाची पत्नी सावित्रीबाई ही सरस्वतीबाई गोवंडे यांची जिवाभावाची मैत्रिण होती. अहमदनगर येथे त्या दोघींनी काही दिवस एकत्र अभ्यास केला. त्याच सुमारास केशव शिवराम भवाळकर यांची १ नोव्हेंबर १८४८ पासून पुणे येथे सरकारी शाळेत शिक्षक म्हणून नेमणूक झाली. सावित्रीबाई फुले यांना शिक्षिकेचे कार्य कसे करावे याविषयी शिक्षण देण्याचे काम भवाळकरांनी पत्करले. दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी मुंबईस १८४८ साली स्थापन केलेल्या परमहंस सभेचे केशवराव भवाळकर हे नुकतेच सभासद झाले होते. अध्यापनशास्त्राचे ज्ञान देण्यासाठी स्त्रियांचा एक वर्ग यांनी १८४८ च्या उत्तरार्धात अतिशय परिश्रमपूर्वक चालविला होता. [७]

आपल्या आर्थिक परिस्थितीत थोडी सुधारणा झाल्याबरोबर जोतीबांनी जुनागंज पेठेत सदाशिवराव गोवंडे यांनी दिलेल्या जागेत ती शाळा पुन्हा सुरू केली. जोतीबांचे व्यायामपटू गुरुजी लहुजीबुवा मांग आणि राणबा महार यांनी काही मुलांमुलींना जोतीबांच्या शाळेत आणले. गोवंड्यांनी त्या मुलांमुलींना पाट्या पुरविल्या व ते शाळेच्या खर्चाकरिता दरमहा दोन रुपये वर्गणी म्हणून पाठवू लागले. शाळेत मुलींची संख्या वाढताच विष्णुपंत थत्ते नावाच्या ब्राह्मण शिक्षकाने कृपाळूपणे शाळेत मुलांना शिकवून जोतीबांना साह्य केले. परंतु ब्राह्मणांनी विष्णुपंतांचा छळ मांडल्यामुळे त्यांनीही ह्या शाळेत शिकविण्याचे काम सोडून दिले. त्या शाळेतील मुले खालच्या वर्गातील असल्यामुळे, सार्वजनिक हौदावर आणि विहिरीवर त्यांना प्यायला पाणी मिळत नसे. म्हणून त्या विद्यार्थ्यांसाठी पिण्याचे पाणी विकत घ्यावे लागे. शाळेत येण्यासाठी ज्या मुलांना कपडे नसत, त्यांना कपडे पुरवावे लागत.

त्या शाळेत मुलांची संख्या अधिक वाढल्यावर जोतीबा मोठी जागा शोधू लागले. त्या वेळी जोतीबांच्या शाळेला कोणीही हिंदू जागा देईना. तेव्हा त्याच पेठेतील एका मुसलमानाच्या घरातील जागा जोतीबांनी शाळेकरिता भाड्याने घेतली. मोरो विठ्ठल वाळवेकर व देवराव ठोसर हे जोतीबांना पत्रव्यवहार करण्यात आणि परिपत्रके काढण्यात साह्य करीत. मेजर कँडी शाळेला पुस्तके पुरवीत. [८]

ही कामगिरी फारच मोठी होती. समाजातील अत्यंत कनिष्ठातील कनिष्ठ वर्गाला भारताच्या इतिहासातील तीन हजार वर्षांच्या कालखंडानंतर प्रथमच ज्ञानाची कवाडे

---

६. The Bombay Guardian, 28 November 1851.

७. –कित्ता

८. –कित्ता–१८ डिसेंबर १८५३.

उघडण्यात आली. ही आश्चर्यकारक क्रांती घडविणारे जोतीबा हे पहिले भारतीय होत. शूद्रांनी वेदपठण ऐकले तर त्यांच्या कानात कढलेले शिसे ओतावे अशी मनुस्मृतीची आज्ञा होती. शूद्रांना नि अतिशूद्रांना शिक्षण देण्याचा प्रश्न ह्यापूर्वी कधीही उत्पन्न झाला नव्हता. महार आणि मांग हे अस्पृश्य होते. त्यांना विद्या कोण देणार? महार-मांगांना मोठ्या भावुकतेने पोटाशी धरणाऱ्या एकनाथासारख्या भागवत धर्मभास्कराला अस्पृश्यतेच्या विटाळावर उतारा घेऊन कसा सुस्कारा सोडावा लागला, ते भागवतामध्ये दिसून येते.

अंत्यजाचा विटाळ ज्यासी। गंगास्नानें शुद्धत्व त्यासी ॥
तें गंगास्नान अंत्यजासी। शुद्धत्वासी अनुपयोगी ॥ ९१ ॥

—एकनाथी भागवत, अ. २८ वा.

त्या धर्मात्म्यालासुद्धा असा अन्याय्य निर्णय करून सनातन्यांपुढे लोटांगण घालावे लागले; तर इतरांची कथा काय? म्हणून जोतीबांच्या कार्याचे नि धैर्याचे मोल अमोल आहे. जोतीबांच्या जीवनातील ह्या युगप्रवर्तक नि चित्तथरारक घटनेचे वृत्त ऐकून महात्मा गांधींनी १९३२च्या मे महिन्यात येरवडा तुरुंगात असताना अस्पृश्यांच्या चळवळीतील ह्या अग्रदूताला वंदन करून 'जोतीबा हे खरे महात्मा होत!'[९] असे जे उद्गार काढले ते किती यथार्थ होते हे दिसून येते.

## .४.

शिक्षणक्षेत्रात दोन वर्षांपेक्षा अधिक काळ अनुभव घेतल्यावर जोतीबांनी बुधवार-पेठेतील अण्णासाहेब चिपळूणकरांच्या वाड्यात ३ जुलै १८५१ रोजी मुलींची शाळा काढली. अण्णासाहेब वासुदेव चिपळूणकर हे एक धनाढ्य गृहस्थ असून केशवराव भवाळकरांचे स्नेही होते. केशवराव भवाळकर हे जोतीबांच्या शिक्षणकार्यांत फार मोठ्या उत्साहाने भाग घेत असत. या सर्वांना ह्या कार्यांत फार मोठा विरोध झाला. त्या वेळचे शिक्षामंडळीचे अध्यक्ष जॉन वॉर्डन यांच्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे "ती शाळा लोकांच्या नजरेआड चालवण्यात येत असे."[१०] त्या शाळेत जोतीबा विनावेतन दिवसातून चार तास शिकवीत असत. त्यांनी आपल्या पत्नीला अध्यापिकेचे शिक्षण दिले होते."[११] महारमांगांच्या शाळेतून तिला या शाळेत आणण्यात आले. जोतीबा स्वतः महारमांगांच्या शाळेत काम करीत असत.

आपल्या जीवितकार्याची पूर्ण जाणीव असलेले जोतीराव अखंड उत्साहाने काम

९. दीनबंधु, महात्मा फुले खास अंक, नोव्हेंबर १९४९.

१०. ज्ञानोदय, १५ जुलै १८५३.

११. Report of the Board of Education for the year 1853-54.

करीत. आपल्या उत्साहाने आणि तेजाने त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना आणि मित्रांना भारून टाकले होते. शिक्षणक्षेत्रातील आपले हे काम भरभक्कम पायावर उभे राहावे म्हणून जोतीबा अष्टौप्रहर खपत असत. 'दसकी लकडी एकका बोजा' हे तत्त्व त्यांना पटले असावे. म्हणून त्यांनी एक कार्यकारी मंडळ स्थापून त्या मंडळाच्या स्वाधीन ती शाळा केली. त्या कार्यकारीमंडळाचे कार्यवाह अभियांत्रिकी विभागांतील एक लेखनिक श्री. जगन्नाथ सदाशिव हे होते. सरकारी मराठी शाळेतील शिक्षक केशव शिवराम जोशी म्हणजेच भवाळकर हे एक सभासद होते. सरकारी शाळेत शिक्षक असल्यामुळे भवाळकरांनी उपनाव बदलले असावे. त्या कार्यकारी मंडळावर मिशन शाळेमधील शिक्षक अण्णा सहस्रबुद्धे, आयुक्ताच्या कार्यालयातील लेखनिक बापूरावजी मांडे, पुणे महाविद्यालयातील सहायक मुख्य अध्यापक विष्णु मोरेश्वर भिडे, मराठी वाङ्मयाचे सहायक प्राध्यापक कृष्णशास्त्री चिपळूणकर आणि त्यातील एक विद्यार्थी विष्णुशास्त्री पंडित हे होते. विष्णुशास्त्री पंडित हे पुढे विधवाविवाहाचे मोठे कैवारी म्हणून गाजले. कार्यकारी मंडळाने सरकारकडे पाठविलेल्या अर्जात जी सभासदांची यादी दिली आहे, तीत जोतीबांचे नाव पहिले आहे. आणि 'जोतीबा हे परोपकारी गृहस्थ असून त्यांनी आपले जीवित शिक्षण कार्यासाठी व्यतीत केले आहे' असे तीत जोतीबांचे वर्णन केलेले आहे.

आपल्या संस्थेचे ध्येय आणि उद्देश यांविषयी लिहिताना कार्यवाह म्हणतात : "आपल्या देशात स्त्रियांना अनेक युगे अज्ञानात खितपत पडून राहावे लागते याविषयी सरकारी शाळेत शिक्षण घेतलेल्या काही व्यक्तींना त्यांची कीव आली. स्त्रियांच्या परिस्थितीत सुधारणा व्हावी म्हणून आणि विधाता नि निसर्ग यांनी इच्छिलेले स्थान त्यांना प्राप्त करून देण्यासाठी त्यांनी अनेक योजनांचा विचार केला. त्या विचारांची निष्पत्ती म्हणजे अनेक अडचणींना तोंड देऊन मुलींची शाळा काढण्याचा निर्धार ही होय. त्याप्रमाणे काही पालकांची संमती मिळवून बुधवारपेठेतील अण्णा चिपळूणकरांच्या वाड्यात ३ जुलै १८५१ रोजी शाळा सुरू करण्यात आली. त्या दिवशी पटावर ८ मुली होत्या. त्यांची संख्या लवकर ४८ झाली."

"कार्यकारी मंडळाची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे शिक्षकांना मोठे वेतन देता येत नाही. म्हणून शिक्षक जेथे अधिक पगार मिळतो तेथे जातात. मधूनमधून असे शिक्षक शाळा सोडून गेल्यामुळे, शाळेला एरवी फायदा झाला असता तो होत नाही. शाळेतील मुख्याध्यापिका सावित्रीबाई ह्यांनी स्त्रीशिक्षणाच्या सुधारणेसाठी उदारपणे जीवित समर्पित करण्याचे ठरविले आहे. ह्या बाई शिक्षिकेचे काम विनावेतन करतात. जसजसा ज्ञानाचा प्रसार होईल तसतसा स्त्रियांना शिक्षणापासून कोणता फायदा आहे हे लोकांना कळून येईल, अशी आम्हाला उमेद वाटते. आणि स्त्रियांच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी ज्या योजना उपयुक्त आहेत, त्यांत लोक आम्हांस प्रेमाने साहाय्य करतील. दूषित पूर्वग्रहांमुळे स्त्रियांकडे अविवरणीय असे दुर्लक्ष करण्यात आले

आहे. वास्तविक तसे करण्यास देशाच्या पवित्र शास्त्रात आधार नाही. बुद्धिवादाचा पाठिंबा नाही आणि त्या वर्तनाचे समर्थन करण्यास युक्तिवादही नाही."[१२]

. ५ .

मुख्याध्यापिका सावित्रीबाई फुले यांचा याही शाळेत जाता-येताना छळ झाला. त्यांना घराकडून शाळेत नेण्यासाठी व परत घरी पोचविण्यासाठी संस्थेने एका शिपायाची नेमणूक केली. या संस्थेचे जोतीबा हे मुख्य आधारस्तंभ होते. स्त्रीशिक्षणाच्या चळवळीचे नेते होते. त्यासाठी ते अविरत झगडत होते; अनंत यातना सोसत होते. शाळेची व्यवस्था पाहता पाहता त्यांना जेवायलाही सवड होत नसे. इतके ते आपल्या ध्येयाशी समरस झाले होते. त्या कार्यात आलेल्या अडचणी त्यांनाच दूर कराव्या लागत आणि काही गोष्टी तर त्यांना स्वतःलाच कराव्या लागत. शिपायाकडून मुलींना शाळेत आणावे लागे व परत घरी पोहोचवावे लागे. याकडे त्यांना जागरूकतेने लक्ष द्यावे लागे. मुलींनी दररोज शाळेत यावे म्हणून खाऊचे प्रलोभन दाखविण्यात येई. मुलींना शाळेत खेळावयास मिळे. काही मुलींना तर कपडेही द्यावे लागत. जोतीबांच्या अविरत कार्यामुळे ती शाळा चालविण्यात कार्यकारी मंडळाला यश आले. पालकांच्या मताला मान देण्यासाठी चालक कोणत्याही परक्या मनुष्याला संस्थेच्या सभासदांच्या अनुमतीविना शाळेला भेट देण्यास संमती देत नसत.

आपल्या संस्थेच्या विद्यमाने जोतीबांनी १७ सप्टेंबर १८५१ रोजी रास्तापेठेत मुलींची दुसरी शाळा काढली आणि १५ मार्च १८५२ रोजी वेताळपेठेत मुलींची तिसरी शाळा घातली. दादोबा पांडुरंग तर्खडकर हे त्या काळी सरकारी देशी शाळांचे पर्यवेक्षक होते. त्यांनी वर उल्लेखलेल्या पहिल्या शाळेची परीक्षा १६ ऑक्टोबर १८५१ रोजी बुधवारपेठेत घेतली. इतक्या थोड्या वेळात शाळेने चांगली प्रगती केली, हे त्या चालकांना भूषणावह आहे, असा त्यांनी अभिप्राय व्यक्त केला. 'नीतिबोध कथा' हे पुस्तक वाचनासाठी नेमले होते. बालबोध वाचणे, शब्दांचे व्याकरण सांगणे, बजाबाकी करणे, भूगोलाची थोडी माहिती सांगणे, मराठ्यांचा इतिहास शिकणे आणि आशिया, युरोप व हिंदुस्थान यांच्या नकाशांची माहिती देणे, असा अभ्यासक्रम असे. पुणे महाविद्यालयाचे पर्यवेक्षक मेजर कँडी यांनी आपल्या वृत्तांतात म्हटले की, "शाळेतील मुलींची बुद्धिमत्ता आणि प्रगती पाहून मला फार समाधान झाले."[१४]

शिक्षा मंडळीचे अध्यक्ष नामदार जॉन वार्डन यांनी मुंबईतील एका पारितोषिक व शिष्यवृत्ती वितरणसमारंभाच्या वेळी वरील पहिल्या दोन शाळांचा उल्लेख करून

१२. G. D. Vol. VII, 1852, pp. 207-09.

१३. G. D. Vol. VII, 1852, p. 203.

१४. —कित्ता—पृ. २०३.

सांगितले, "मी जेव्हा प्रथम १८५१ मध्ये न्यायालयाचा आयुक्त म्हणून गेलो त्या वेळी पुणे शहरात स्थापन झालेल्या मुलींच्या शाळांना भेट दिली. ज्यूंच्या भीतीमुळे वरच्या मजल्यावर दरवाजे बंद करून ख्रिश्चन लोकांच्या आरंभी आरंभी शाळा चालत त्यांची आठवण मला ही शाळा पाहून त्या वेळी झाली. त्या शाळेची शिक्षिका एका माळ्याची पत्नी असे. आपल्या देशबांधवांचे केविलवाणे अज्ञान दूर करून त्यांचा उद्धार करण्यासाठी स्वतःच्या पत्नीने साह्यभूत व्हावे म्हणून त्या माळ्याने तिला शिकविली होती. माझ्यादेखत तिने मुलांना काही प्रश्न विचारण्यासाठी मी तिचे मोठ्या कष्टाने मन वळवू शकलो. काही तरुण विवाहित स्त्रियांचा प्रशिक्षणाचा वर्ग चालविला होता. मला तर त्या वर्गाला कोणत्याही अटीवर भेटू दिले नाही. शिक्षा मंडळीचे माझ्या पूर्वीचे अध्यक्ष सर थॉमस अर्स्किन पेरी आणि त्यांचे सहकारी लम्सडेन यांना त्या प्रशिक्षणाच्या वर्गातील स्त्रियांनी माझ्या भेटीनंतर पुढे लवकर भेट देण्यास संमती दिली. १८५१ साली शाळांची अशी स्थिती होती."[१५]

जोतीबांच्या शाळेची १७ फेब्रुवारी १८५२ रोजी प्रकटपणे परीक्षा घेण्यात आली. तो समारंभ पाहण्यासाठी नागरिकांची प्रचंड गर्दी जमली होती. मुलांची परीक्षा घेण्यात आल्यावर भाऊसाहेब मांडे हे आपल्या भाषणात म्हणाले की, "आज या समारंभाला जे सन्माननीय नागरिक जमले आहेत त्यांना स्त्रियांच्या शिक्षणाचे महत्त्व अद्यापपर्यंतही कळलेले नाही, याविषयी मला वाईट वाटते." आंग्ल महाकवी मिल्टन यांच्या एका सुभाषिताचा उल्लेख करून ब्राऊन नावाचे न्यायाधीश त्या समारंभाच्या वेळी म्हणाले, "जर स्त्रियांनी शिक्षण घेतले तर घरातील सुख आणि उपयुक्तता यांची वृद्धी होईल. देशातील निदान काही लोक तरी योग्य दिशेने विचार करीत आहेत आणि देशाचा उद्धार करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत, हे पाहून मला समाधान वाटले."

## • ६ •

आधुनिक भारतातील जोतीबा हे केवळ पददलितांचेच कैवारी व त्राते नसून ते समाजसुधारकांचेही त्राते होते. सामाजिक क्रांतीला आरंभ करून त्यांनी जे अलौकिक धैर्य दाखविले होते, त्यामुळे त्यांचा अगदी तरुण वयातच जिकडे तिकडे लौकिक पसरला होता. एक मोठी वजनदार व्यक्ती म्हणून लोक त्यांना आता ओळखत होते. याच नाराम सुधारणावादी ब्राह्मणांचा सनातनी ब्राह्मणांशी एका प्रकरणात अनवधानतेमुळे खटका उडाला. दक्षिणा फंडाच्या तीन हजार रुपयांच्या रकमेतून अर्धी रक्कम मराठी भाषेच्या वृद्धीसाठी वापरावी की वापरू नये ह्यावर ते वादंग माजले होते.

दक्षिणा म्हणजे ब्राह्मणांना पारितोषिक किंवा दान देणे होय. दक्षिणा वाटली म्हणजे पुण्य मिळते अशी समजूत होती. शिवाजीचे राज्यारोहण झाल्यानंतर त्याने दक्षिणा

---

१५. Report of the Board of Education, 1853-54 pp. 100-01.

वाटण्याची प्रथा पाडली. धार्मिक कार्यासाठी श्रावण महिना हा अत्यंत पवित्र मानण्यात येई. म्हणून दक्षिणा श्रावण महिन्यातच वाटली जाई. धर्ममंत्री म्हणजे पंडितराव हा दक्षिणेसाठी आलेल्या ब्राह्मणांची परीक्षा घेऊन त्यांच्या दर्जाप्रमाणे त्यांना धान्य किंवा रोख पैसे देत असे. शिवाजीचे पुत्र संभाजी आणि राजाराम यांनीही ती प्रथा सुरू ठेवली होती. दक्षिणा वाटण्याचे हे कार्य शाहूने आपला सेनापती दाभाडे ह्याजकडे सोपविले होते. कराच्या रूपाने शाहूला जे उत्पन्न येई त्या उत्पन्नापैकी सेनापती सुमारे चार लाख रुपये दक्षिणेसाठी खर्च करी. सेनापती दाभाडे यांचा पुत्र त्रिंबकराव यानेही हे कार्य सुरू ठेवले होते. दाभाड्यावर विजय मिळविल्यानंतर, पहिल्या बाजीरावानेही दक्षिणेची प्रथा सुरूच ठेवली होती. मुख्यतः विद्येत प्रावीण्य संपादन केलेल्या गरीब ब्राह्मणांनाच माधवराव पेशवा दक्षिणा देत असे.

तथापि रावबाजीच्या राजवटीत ब्राह्मणांना दक्षिणा देण्यात काही धरबंधच राहिला नाही. दिसेल त्या ब्राह्मणाला दक्षिणा दिली म्हणजे पुण्य लाभते, अशी त्याची समजूत झालेली दिसते. दक्षिणा वाटण्यास पवित्र श्रावण महिन्यात आरंभ होई आणि ते कार्य अनेक दिवस चाले. मोठ्या ब्राह्मण पंडितांची परीक्षा शनिवारवाड्यात होई. आणि जे ब्राह्मण परीक्षा द्यावयास तयार नसत त्यांना पर्वती टेकडीच्या पायथ्याशी रमण्यात दक्षिणा वाटण्यात येत असे. रमण्यातील ज्या भिक्षुकांजवळ शाळिग्राम असे त्या शाळिग्रामाला भिक्षुकाइतकीच दक्षिणा मिळत असे. शाळिग्रामाची तूट पडे तेव्हा ते ब्राह्मण भिक्षुक पेशव्यांच्या पागांमधून बनावट शाळिग्राम पैदा करीत. पेशव्यांचे नोकर उंटाची लीद सुकवीत आणि ती ते शाळिग्राम म्हणून विकीत. ब्राह्मण ते बनावट शाळिग्राम तुळशीच्या पानांनी आणि फुलांनी झाकून ठेवीत. रावबाजी मोठ्या भाविकतेने त्या शाळिग्रामांना नमस्कार करी.[१६] भारतातील कांची, श्रीरामपट्टण्, कुंभकोण, तंजावर, काशी, कनोज आणि मथुरा अशा अनेक नगरांतून पुण्यास येऊन ब्राह्मण गर्दी करीत. त्यांच्यावर दक्षिणेचा वर्षाव करण्यात येत असे.

एका वर्षी दक्षिणा मिळविणाऱ्यांची जास्तीत जास्त संख्या साठ सहस्र होती. त्यांना दहा लक्ष रुपयांची रक्कम वाटण्यात आली होती. रावबाजीला कृष्णाचा अवतार मानणारे हे हजारो भोजनभाऊ त्याच्या बाजूने स्वामिनिष्ठेने लढले असते, तर त्याची गादी वाचली असती. पेशव्यांची सत्ता संपुष्टात आल्यावर दक्षिणा देण्याची ही पद्धत, ब्रिटिश राज्यकर्त्यांनी प्रजेपैकी वजनदार अशा ब्राह्मणवर्गाला अंशतः खूष करण्यासाठी आणि अंशतः विद्वान ब्राह्मणांना उत्तेजन देण्याच्या उद्देशाने चालू ठेवली होती. रावबाजी प्रतिवर्षी लाखो रुपये ब्राह्मणांच्या दक्षिणेवर खर्च करीत होता तरी एल्फिन्स्टनने ती रक्कम पन्नास हजार रुपयांपर्यंत खाली आणली होती. काही काळानंतर, पुणे येथील संस्कृत पाठशाळेसाठी प्रतिवर्षी त्या रकमेपैकी वीस हजार रुपये खर्च करण्यात येत होते. आणि

---

१६. भागवत, गोविंद गणेश, मराठ्यांच्या आपसांतील लढाया, पृ. ३२.

ती संस्कृत पाठशाळा केवळ ब्राह्मण विद्यार्थ्यांसाठीच होती.

पुढे असे आढळून आले की, अनेक मृत ब्राह्मणांच्या नावाने भिक्षुक, व नालायक ब्राह्मणांचे थवेच्या थवे, या दक्षिणानिधीचा फायदा उपटीत असत. त्यामुळे १८४० साली ब्रिटिश सरकारने दक्षिणा घेणाऱ्या ब्राह्मणांच्या याद्या तयार केल्या. जे तीन वर्षे अनुपस्थित राहतील किंवा त्या काळात निधन पावले असतील त्यांची नावे त्या यादीतून कमी करण्यात येतील, असे सरकारने जाहीर केले.

अठराशे एकुणपन्नासच्या जून महिन्यात लोकहितवादी गोपाळराव देशमुख यांनी ही दक्षिणा देण्याची पद्धत बंद करावी, अशी ब्रिटिश सरकारला प्रकटपणे सूचना केली. ज्याचा अर्थ कळत नाही ते वाङ्मय ब्राह्मणांनी घोकण्यात काही अर्थ नाही, असे लोकहितवादींचे मत होते. त्या समयी ते पुणे येथील एजंटाच्या कार्यालयामध्ये मुख्य लेखनिक होते. दक्षिणानिधीच्या तीन हजार रुपये शिल्कीपैकी अर्धी रक्कम दरवर्षी मराठी पुस्तकांना — मग ती स्वतंत्र असोत किंवा भाषांतरित असोत — पारितोषिके देण्यात खर्च करावी, अशा आशयाचा एक अर्ज सरकारकडे करण्यास त्यांनी आपल्या मित्रांचे मन वळविले. बापू मांडे यांनी तो अर्ज लिहिला. दामोदरपंत अत्रे यांनी त्याची प्रत केली. त्या अर्जावर लोकहितवादी देशमुख, विष्णु मोरेश्वर रानडे, विष्णु मोरेश्वर भिडे प्रभृति मंडळींच्या सह्या अण्णासाहेब चिपळूणकरांनी घेतल्या.

बुधवार पेठेतील सरकारी इंग्रजी शाळेतील शिक्षकांनी त्या अर्जावर सह्या केल्या. त्यानंतर अण्णासाहेब चिपळूणकरांनी तो अर्ज विश्रामबागवाडा येथील शिक्षक व विद्यार्थी यांच्या सह्या घेण्यासाठी नेला. त्यांच्या विनंतीला मान देऊन काही जणांनी त्यावर सह्या केल्या. बाळाराम किराड हे विश्रामबागवाड्यातील मुख्य अध्यापक होते. त्यांनी अर्ज वाचला पण त्यावर सही करण्याचे नाकारले. कारण तो अर्ज हिंदुधर्माच्या विरुद्ध आहे असे त्यांना वाटले. हे ऐकताच ज्यांनी त्याच्यावर सह्या केल्या होत्या त्यांनी तो अर्ज परत घेण्यासाठी धडपड केली आणि ते अण्णासाहेब चिपळूणकरांवर तुटून पडले. त्यामुळे ज्या कागदावर त्यांनी सह्या केल्या होत्या तो कागद अण्णासाहेब चिपळूणकरांनी परत केला. मुख्य अर्ज आपल्याकडेच ठेवला. तेथून चिपळूणकर धावत धावत जवळच्या एका घराशेजारी गेले. तेथे केशवराव भवाळकर त्यांची वाट पाहत होते. विश्रामबागवाड्यातील विद्यार्थ्यांनी अण्णासाहेब चिपळूणकरांचा तेथपर्यंत पाठलाग केला. परंतु त्यांनी त्या विद्यार्थ्यांना मूळ अर्ज दाखविण्याचे साफ नाकारले. त्यांना धमकी देऊन विद्यार्थी परत गेले.

एकुणचाळीस लोकांनी त्या अर्जावर सह्या केल्या. त्यांपैकी काही परमहंस सभेचे सभासद होते. मुंबई सरकारकडे तो अर्ज टपालाने रवाना झाला. विश्रामबागवाडा येथील विद्यार्थी नि शिक्षक, पुण्यातील अन् शेजारच्या खेड्यांतील सनातनी ब्राह्मण, यांनी त्या अर्जावर सह्या करणाऱ्या लोकांवर ग्रामण्य रचले. अर्जदारांपैकी सात जणांना त्यांनी लेखी सूचना देऊन कळविले की, 'जर तुम्ही आम्ही नियुक्त केलेल्या पंचांपुढे आपल्या

वर्तनाचा जातीने खुलासा केला नाही, तर तुमच्यावर जात बहिष्कार टाकील.' हे ऐकून समाजसुधारकांचे धावे दणाणले. तरुण आणि तडफदार भवाळकर म्हणाले, 'मी हा सर्व दोष आपल्या माथ्यावर घ्यायला सिद्ध आहे.'

जातीच्या पंचापुढे जाण्याच्या आदल्या दिवशी रात्री ही सुधारक मंडळी जोतीबांना भेटली. 'अर्ज तुम्ही लिहिला, असे सांगण्याची आम्हांस तुम्ही संमती द्या' अशी त्यांनी जोतीबांना विनंती केली. 'मी तुमच्या शास्त्रांचा अधिकार मानीत नाही' असा बाणा ज्याच्या व्यक्तिमत्वावर ठसठशीतपणे उमटलेला दिसत होता आणि ज्याचे नाव आता सनातन्यांच्या जगामध्ये गाजत होते, त्या जोतीबांनी सुधारकांच्या विनंतीला त्या क्षणीच मान्यता दिली. जोतीबा बोलघेवडे सामाजिक सुधारक नव्हते. ते कृतिशूर समाजसुधारक होते. त्यांची कर्तृत्वशक्ती अफाट होती. ते उत्कृष्ट संघटक होते. 'बोले तैसा चाले' हे त्यांचे ब्रीद होते. त्या प्रकरणाशी जोतीबांचा संबंध येताच त्या प्रकरणाने फारच मोठे स्वरूप धारण केले. ते प्रकरण चांगलेच रंगून आता हातघाईवर आले. आपल्याला संरक्षण द्यावे अशी सुधारक मंडळींनी जोतीबांना कळकळीची विनंती केली. जोतीबांनी महारमांग वस्तीतून दोनशे तालीमबाज लोक ह्यांच्या संरक्षणासाठी बोलावून घेतले.

दुसऱ्या दिवशी दुपारी मराठी भाषेचे प्रेमी रांगेने ज्ञातीच्या पंचांपुढे खुलासा करावयास निघाले. जोतीबांच्या महारमांग लोकांपैकी निम्मे लोक या मराठीप्रेमी अर्जदारांच्या पुढे चालत होते; निम्मे त्यांच्यामागून चालले होते. रस्त्यावर दुतर्फा लोक संतप्त मुद्रेने या सुधारक मंडळींकडे पाहत होते. सुधारक मंडळींना टरकांड या ब्रिटिश अधिकाऱ्याने पोलीस अधिकाऱ्यांकडून मोठ्या दक्षतेने संरक्षण देवविले. तो पोलीस अधिकारी सनातनी मंडळींच्या बाजूचा होता. तथापि त्याला साहेबाची आज्ञा पाळावी लागली. तुळशीबागेत जेथे ही ग्रामण्याची सभा भरली होती तेथे ही मंडळी सुरक्षितपणे पोहोचली. सरदार मंडळीपैकी कोणीही या ग्रामण्य प्रकरणात भाग घेतला नाही. कारण लोकहितवादी गोपाळराव देशमुख हे ज्या एजंटाच्या कार्यालयात मुख्य लेखनिक होते तेथे त्यांचे हितसंबंध गुंतलेले होते. बंडूनाना रानडे ह्या सनतनी पुढाऱ्याने या सात जणांना 'अर्ज कोणी केला' असे विचारले. भवाळकरांनी सांगितले की, 'मी तो अर्ज सरकारकडे टपालाने पाठविला आहे. त्याची प्रत केलेली नाही.' त्यावर रानड्यांनी भवाळकरांना विचारले की, 'अर्ज कोणी लिहिला? त्याचे नाव सांगा.' त्यावर भवाळकर धीटपणे उत्तरले, 'जोतीबांनी!'[१७]

जोतीबांचे नाव ऐकताच सनातन्यांच्या अंगाचा तिळपापड झाला. ते चरफडले. कारण जोतीबापर्यंत त्यांच्या सत्तेचे पाश पोचत नव्हते. जोतीबा आता पुण्यातील एक मोठी शक्ती म्हणून ओळखले जात होते. पंचांच्या बैठकीतील त्या सनातनी ब्राह्मणांचे अधाशी घारे डोळे जोतीबांच्या नावाचा उल्लेख होताच तिटकाऱ्याने संकोच पावले असणार!

---

१७. संपादक, पंडित, भ. श्री., रावसाहेब केशव शिवराम भवाळकर यांचे आत्मवृत्त, पृ. १०९.

या ग्रामण्य प्रकरणामुळे जोतीबांच्या नेतृत्वावर भरपूर प्रकाश पडतो. जोतीबा हे त्या वेळी पुरे बावीस वर्षांचेही नव्हते. पुणे हे आधुनिक भारताचे सामाजिक आणि राजकीय युद्धाचे रणक्षेत्र खरेच!!

त्या अर्जावर सह्या करणारे बहुतेक लोक जरी नंतर सामाजिक बहिष्कारास घाबरून विरोधी झाले, तरी तो अर्ज त्याविषयासंबंधीचे एक धिटाईचे आणि जोरदार आव्हान होते, असे सरकारने त्या अर्जाचे वर्णन केले आहे. जे त्या अर्जाचे विरोधक बनले होते, त्यांनी सरकारला असे कळविले की, "आम्हांला बनवून आमच्या सह्या त्या अर्जावर घेण्यात आल्या. म्हणून तो अर्ज रद्द समजावा." त्यावर सुधारक मंडळीने पुन्हा त्या बाबतीत सरकारकडे अर्ज केला. सरकारने त्यांचा अर्ज मान्य केला आणि असे जाहीर केले की, हिंदुस्थानातील रहिवाश्यांपैकी जे कोणी मराठी भाषेमध्ये उत्तम निबंध लिहितील किंवा इंग्रजी भाषेतील, संस्कृत भाषेतील अथवा दुसऱ्या कोणत्याही परकीय भाषेतील उपयुक्त पुस्तकांचे मराठीत भाषांतर करतील त्यांना दक्षिणा वाटण्यात येईल.[१८] मराठी भाषेचे कैवारी व संस्कृत भाषेचे अभिमानी यांच्यामधील लढ्याचा असा हा कल्याणकारक शेवट झाला. सरकारने मराठीतील पुस्तकावर दक्षिणा-निधीपैकी निम्मी रक्कम खर्च करण्याचे ठरविले. त्यामुळे संस्कृत ग्रंथांनाच सर्व दक्षिणा द्यावी म्हणणाऱ्या ब्राह्मणांनी दुःखाने नि शरमेने माना खाली घातल्या. ज्ञानगंगा समाजाच्या खालच्या थरापर्यंत वाहत जाणार आणि आपली मक्तेदारी संपणार हे पाहून त्यांना अपार दुःख झाले. बिचाऱ्यांची देवभाषा अगदी गयाळ होऊन पडली. जनतेच्या मायबोलीतील ग्रंथलेखनास त्यांनी प्राण पणास लावून विरोध केला. अप्रत्यक्षपणे संस्कृत भाषेविषयी अप्रीती निर्माण करण्याचे कार्य साधले! 'संस्कृत वाणी देवें केली। तरी प्राकृत काय चोरापासूनि झाली?' असा रोखठोख सवाल मागे संत एकनाथाने अशा दुराग्रह्यांना विचारला होता. ज्ञानेश्वराने मराठीत ग्रंथरचना केली. सामान्य जनतेपर्यंत धर्मज्ञानाची गंगा नेऊ पाहणाऱ्या त्या महापुरुषांची जशी विटंबना झाली तशीच या सुधारकांची झाली असती. परंतु राज्य पडले म्लेंच्छांचे. त्यांनी त्या विषवृत्तीवर उतारा देताच प्रकरण थंड पडले.

---

१८. Parulekar, R. V., Selections from the Records of the Government of Bombay, Education-Part I, p. 67.

# ५

वि:
क्रमांक

## स्त्रीशिक्षणाच्या आद्यजनकाचा गौरव

स्त्रीशिक्षण आणि कनिष्ठ वर्ग यांचा कैवारी म्हणून जोतीबांचे नाव आता सर्व महाराष्ट्रात गर्जू लागले. पुणे संस्कृत पाठशाळेचे प्रमुख मेजर थॉमस कँडी, शिक्षा मंडळीचे अध्यक्ष सर थॉमस अर्स्किन पेरी, आयुक्त रीव्हज आणि त्यांचे हैद्राबादचे स्नेही कर्नल मेडोज टेलर हे प्रतिष्ठित अधिकारी जोतीबांचे मोठे चाहते होते. भले ब्राह्मण जोतीबांची प्रशंसा करीत. 'टेलिग्राफ आणि कूरियर' या वृत्तपत्राच्या दि. १९ फेब्रुवारी १८५२ च्या अंकात एका हिंदी निरीक्षकाचा 'एतद्देशियांची प्रगती' ह्या मथळ्याखाली एक लेख प्रसिद्ध झाला. त्यात त्याने असे म्हटले होते की, "ब्राह्मण हे कनिष्ठ वर्गाचे मोठे शत्रू आहेत, तरी आजकाल त्यांना या गरिबांना आपल्या पूर्वजांनी केलेल्या अन्यायाबद्दल वाईट वाटत आहे. आणि त्यात काही सुधारणा व्हावी म्हणून ते आता विचार करीत आहेत. बाळाचार्य नामक एक गृहस्थ आहेत. ते सध्या सरकारी नोकर आहेत. त्यांना १२ रुपये मासिक वेतन मिळते. जोती गोविंद फुले यांनी कनिष्ठ वर्गातील मुलांकरिता शाळा घातली हे पाहून त्यांनी आपला एक महिन्याचा पगार दलितोद्धाराचा मार्ग खुला करणाऱ्या जोतीबांकडे धाडून दिला. हेतू हा की, गरिबांच्या कल्याणासाठी जे कोणी मार्ग शोधतील त्यांना उत्तेजन मिळावे.

"वरील सर्व गोष्टींवरून असे आढळून येईल की, आपल्या बांधवांचे कल्याण करण्याचे विचार ब्राह्मणांच्या मनात येऊ लागले आहेत. देवाच्या कृपेने ह्या देशातील लोकांच्या मनात अशा कल्पना बिंबून जोतीबासारख्यांच्या अनुकरणीय आणि परोपकारी कार्याला ते जास्तीत जास्त साहाय्य करतील अशी मला आशा आहे. त्या परोपकारी पुरुषाने मुंबईतील थोर आणि उदारहृदयी श्रीमंत नाना शंकरशेट यांच्याकडे शाळागृहास जागा मिळावी म्हणून अर्ज केला आहे. आणि नाना शंकरशेट यांनी शिक्षामंडळीसमोर जी मते व्यक्त केली आहेत त्यांवरून असे दिसून येते की, कनिष्ठ वर्गातील दुर्दैवी लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा असे या गरिबांच्या कैवाऱ्याचे मत आहे. तरी नाना शंकरशेट यांनी कृपाळू होऊन जोतीबांच्या शाळागृहास जागा मिळवून देऊन ही अत्यंत निकडीची गरज पुरवावी."

तो देशी निरीक्षक पुढे म्हणाला की, "आपल्या या दीन नि दुःखी बांधवांना साहाय्य करण्यात थोर आणि उदारहृदयी नाना शंकरशेट चुकणार नाहीत, याविषयी मला शंका नाही. ते जोतीबांच्या शाळेला प्रत्येक बाबतीत साह्य करतील असे मला वाटते. जे साह्य त्वरित केले पाहिजे, ते करून, नाना शंकरशेट औदार्याचे पहिले आणि उत्तम उदाहरण घालून देतील, अशी मला आशा आहे. दिवस उन्हाळ्याचे आहेत आणि शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या दरदिवशी वाढत आहे. अशा औदार्याच्या कृतीने आपले नाव अजरामर करण्याची परोपकारबुद्धी देव नाना शंकरशेट यांना देवो."

हिंदुस्थानात त्या काळी प्राथमिक शाळांची स्थिती मुळीच समाधानकारक नव्हती. 'बॉम्बे गार्डियन'[१] मधील एका वृत्तांतात असे म्हटले होते की, "देशातील इतर भागांतील लोकांत शिक्षणाचा प्रसार क्वचितच होत आहे. महाराज्यपाल लॉर्ड हार्डिंज यांनी दक्षिण बंगालमध्ये पाच वर्षांत शंभर शाळा स्थापन केल्या होत्या. त्यांची व्यवस्था नीट न झाल्यामुळे व त्यांकडे दुर्लक्ष झाल्यामुळे त्या शाळा बंद पडल्या. सर्वांत पुढारलेला मुंबई प्रांत! त्यातदेखील प्राथमिक शाळांना अवकळा प्राप्त झाली आहे आणि त्यासंबंधी जवळजवळ निराशेची भावना पसरली आहे." अशा निराशमय अंधकारात शिक्षणाची मशाल घेऊन जोतीबा कनिष्ठ वर्गात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी अष्टौप्रहर धडपडत होते.

आपल्या कार्यासाठी जेथून जेथून साह्य मिळणे शक्य आहे तेथून तेथून ते मिळविण्याचा जोतीबा आटोकाट प्रयत्न करीत. ते दानशूर व्यक्तींना भेटत. सरकारी उच्चपदस्थ अधिकाऱ्यांची गाठ घेत. त्याचप्रमाणे त्यांनी भारतातील त्या काळच्या नाना शंकरशेट यांसारख्या नामांकित दानशूर लक्षाधिशाच्या कानांवर आपल्या शाळेची माहिती घातली आणि त्यांना शाळेला साह्य करण्याची विनंती केली. नाना शंकरशेट हे जातीने सोनार. जनतेत शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी ते प्रयत्न करीत असत. त्यांचा दानशूरपणा व परोपकारबुद्धी ही देशाभिमानाने प्रेरित झालेली होती. त्यांचे औदार्य आपपरभावरहित

---

१. The Bombay Guardian, 21 March 1851.

असून सर्वव्यापी होते. ते शिक्षा मंडळीचे आरंभापासून सभासद होते. शिक्षा मंडळी ही संस्था म्हणजे बॉंबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीचे मोठे स्वरूप होय.

नाना शंकरशेट यांचे सहकारी डॉ० भाऊ दाजी लाड हे शिक्षा मंडळीचे सभासद झाले. डॉ० भाऊ दाजी हे त्या काळचे विख्यात नि अजोड असे धन्वंतरी. ते शिक्षण-प्रसाराच्या कार्यात उत्साहाने भाग घेत. नाना शंकरशेट आणि डॉ० भाऊ दाजी यांनी मुंबईत पुढे लवकरच १८५२ च्या ऑगस्ट महिन्यात बॉम्बे असोशिएशन नावाची पहिली राजकीय संस्था स्थापली. लोकांच्या मागण्या आणि दुःखे सरकारपुढे व ब्रिटिश लोकसभेपुढे मांडणे हे त्या संस्थेचे उद्दिष्ट होते.

वर उल्लेखिलेले 'टेलिग्राफ् आणि कूरियर' मधील पत्र जोतीबांनी १८४८ साली काढलेल्या शाळासंबंधीचे आहे. त्यांनी ती शाळा काही काळ बंद केली होती. आणि पुन्हा उघडली होती. जोतीबा ती शाळा पदरमोड करून चालवीत होते. मित्रांकडून आणि नाहत्यांकडून मिळालेल्या देणग्याही ते त्या कामी खर्च करीत असत. अठराशे बावन्न सालच्या मे महिन्यात, महारमांग समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार करण्याच्या उद्देशाने जोतीबांनी ती शाळा एका संस्थेच्या स्वाधीन केली. त्या संस्थेचे अध्यक्ष सदाशिवराव गोवंडे हे होते. जोतीबांचे हे शैक्षणिक कार्य चालले असताना सदाशिवराव गोवंडे हे अहमदनगर किंवा मुंबई येथे १८४८ पासून १८५२ च्या ऑगस्टपर्यंत सरकारी नोकरीत होते. महारमांगशाळा चालविण्यासाठी जोतीबांनी जी संस्था स्थापली, तिचे मोरो विठ्ठल वाळवेकर हे कार्यवाह होते. कोषाध्यक्ष सखाराम यशवंत परांजपे हे होते. जोतीबा आणि बाबाजी मानाजी डेंगळे हे सामान्य सभासद होते.

आपल्या २९ मे १८५२ च्या अंकात 'पूना ऑब्झर्व्हर' वृत्तपत्र म्हणते, 'आपल्या देशाची प्रगती व्हावी असे ज्यांना वाटते त्यांना एका दानशूर वृत्तीच्या मानी गृहस्थाने पदरमोड करून पुण्याच्या वेताळपेठेत महारमांग आणि कुणबी यांना मराठीतून शिक्षण देण्यासाठी शाळा घातली आहे हे ऐकून समाधान वाटेल. या शाळेत मुलांची संख्या बरीच आहे आणि शाळेत ज्या सोयी करण्यात आल्या आहेत, त्या पाहता आम्ही अशी आशा करतो की, या शाळेच्या संस्थापनेमुळे त्या जातींना बराच लाभ होईल. आम्हाला असे कळते की, या मुलींच्या शाळा चालविणाऱ्या कार्यकारी मंडळाने शिक्षा मंडळीकडे ह्या शाळा चालविण्यात मासिक साह्य मिळावे म्हणून अर्ज केला आहे. आम्हाला असा विश्वास वाटतो की, मेजर कँडी आणि दक्षिणा पारितोषिक समिती आपल्या निधीतून या शाळांच्या साह्यासाठी वार्षिक अनुदान देण्याचा विचार करीत आहेत."

मेजर कँडी यांनी जोतीबांच्या संस्थेला सरकारने अनुदान द्यावे अशी शिफारस केली. सरकारने दक्षिणा पारितोषिकसमितीकडून त्या संस्थेला दर महिना ७५ रुपयांचे अनुदान सम्मत केले. मेजर कँडी यांना त्या संस्थेच्या हिशेबावर लक्ष ठेवण्याचा अधिकार दिला आणि ठराविक वेळी दक्षिणा पारितोषिक समितीला त्या शाळांच्या कार्याविषयी वृत्तांत पाठविण्यास आज्ञा केली.

मुंबईचे राज्यपाल नामदार व्हिसकाऊंट फॉकलंड यांनी आपल्या १८५२ सालच्या एका पत्रात पुण्यातील मुलींच्या ह्या देशी शाळांविषयी वृत्तांत धाडला. त्यात त्यांनी म्हटले होते की, "थोड्या दिवसांपूर्वी काही तरुणांनी पुण्यात मुलींसाठी शाळा सुरू केल्या आहेत. त्यांनी त्या शाळांसाठी मासिक अनुदान मिळावे असा अर्ज केला आहे. देशी शिक्षण आणि वाङ्मय यांच्या उत्तेजनासाठी ठेवलेल्या सर्वसाधारण निधीतून या शाळांना साह्य मिळावे असा अर्ज केला होता. आम्ही त्या अर्जावर शिफारस करून दक्षिणा पारितोषिकसमितीकडे तो अर्ज पाठविला. कारण तो निधी दक्षिणा पारितोषिकसमितीच्या नियंत्रणाखाली आहे. आणि आम्हास कळविण्यास आनंद वाटतो की, त्या शाळेसाठी मासिक ७५ रुपयांचे अनुदान त्या समितीने संमत केले आहे. आणि जर ह्या शाळांना आणखी साह्याची आवश्यकता वाटली, तर अनुदानात वाढ करू अशी त्यांनी आपली इच्छा व्यक्त केली आहे. सोबत मेजर कँडी यांनी या शाळांसंबंधी लिहिलेला वृत्तांत आहे. तो कंपनीचे चालक आवडीने वाचतील याविषयी आम्हांस शंका नाही." [२]

## .२.

ह्या अनुदानासंबंधी लिहिताना 'ज्ञानप्रकाश'ने असे म्हटले की, 'शाळेला दक्षिणा पारितोषिकसमितीकडून मिळालेली मासिक देणगी पाहून काही लोक कुजबुजू लागले आहेत, तर बहुसंख्य लोकांना ह्या व्यवस्थेमुळे अत्यंत आनंद झाला आहे. 'ज्ञानोदया'ने म्हटले की, 'तथापि ह्या निधीच्या मूळ उद्देशाला लक्षात घेता त्याचा विनियोग ह्याहून अधिक चांगल्या रीतीने करता आला नसता. ब्राह्मणांसाठी ठेवलेला पैसा मुलींच्या शिक्षणाकरिता खर्च करावा अशी दुःखकारक परिस्थिती निर्माण व्हावी याविषयी काही सनातनी वृत्तीच्या हिंदूंना दुःख झाले!' [३]

ह्या समयास काही तरुण महिला जोतीबांच्या महारमांग मुलींच्या शाळेत जाऊ लागल्या. परंतु मुलांबरोबर वर्गात बसावयास त्यांनी नापसंती दर्शविली. म्हणून मुली वेगळ्या काढून त्यांची एक नवीन शाळा उघडण्यात आली. त्यासंबंधी लिहिताना 'पूना ऑब्झर्व्हर' या इंग्रजी पत्राने २१ ऑगस्ट १८५२च्या अंकात असे म्हटले की, 'जोती गोविंद फुले यांनी वेताळ पेठेत दोन शाळा काढल्या आहेत. महारमांगधेडचांभार यांच्या मुलींसाठी एक व दुसरी त्याच जातींच्या मुलांसाठी. या दोन्ही शाळांत जोती स्वतःच शिकवितात आणि त्या शाळांची व्यवस्था करतात. ब्राह्मण शिक्षक त्यांना साह्य करीत आहेत. या शाळांचा खर्च जोती स्वतः पदरमोड करून करतात. शिवाय युरोपियन व सुसंस्कृत देशी लोक वर्गणी पाठवितात. या शाळांना महिन्याला २५ रुपयांचे साह्य दक्षिणा पारितोषिकसमितीकडून देण्यात येते.'

---

२. Paragraphs 22 to 24, G. D. No. 117 of 1852, 10 November 1852. Despatch to the Honourable Court, pp. 362-63.

३. ज्ञानोदय, १५ जुलै १८५२.

ह्या शाळा काढल्यावर त्या शाळांतील विद्यार्थ्यांनी आपणांसाठी एक वाचनालय असावे अशी इच्छा दर्शविली. वाचनालय स्थापण्यासाठी जोतीबांनी तनमनधन अर्पण करून त्या कार्यातही यश मिळविले. त्याविषयी शिक्षा मंडळीच्या प्रतिवृत्तात त्यांना धन्यवाद दिलेले आहेत. त्या प्रतिवृत्तात आणखी असे म्हटले आहे की, 'महारमांगांची पहिली शाळा काढण्याचा मान जोतीबांचा आहे. तसाच त्या मुलांसाठी पहिले वाचनालय काढण्याचा मानही त्यांच्याकडेच जातो. अशा तऱ्हेने आपल्या देशबांधवांच्या उद्धाराचे कार्य जोतीबांनी तीन प्रकारे केले आहे; परंतु न्यायबुद्धीच्या दृष्टीने म्हणायचे तर त्यांच्या ह्या दुसऱ्या कार्यात पुण्याच्या सुशिक्षित लोकांनी त्यांना बरेच साह्य केले आहे, हेही नमूद करणे आमचे कर्तव्य आहे.'[४]

जोतीबा हे केवळ सामान्य पंतोजी नव्हते. ते समाजाचे महान गुरू होते. नवीन विचारांची बीजे मुलांच्या मनात रुजावी म्हणून माळी जशी कुदळ, फावडे, नांगर वापरून आपल्या मळ्याची मशागत करतो, तशी ते त्यांच्या मनाची जोपासना करून वडण करीत असत. ते विद्यार्थ्यांना विचार करण्यास शिकवीत असत. त्यांची ग्रहणशक्ती वाढवीत असत. शालेय शिक्षणाचा संबंध ज्ञानसंचयाशी असतो आणि खऱ्या शिक्षणाचा संबंध मनोविकासाशी असतो. जोतीबांच्या महारमांग मुलींच्या शाळेतील एका चवदा वर्षांच्या मांग मुलीने जो निबंध लिहिला आहे तो पाहता जोतीबांच्या अध्यापनातील वैशिष्ट्य कळून येईल. जोतीबांच्या शाळेत तीन वर्षे अभ्यास केलेली ती मुलगी आपल्या निबंधात म्हणते, "ब्राह्मण लोक असें म्हणतात कीं, वेद तर आमचीच मत्ता आहे. आम्हीच त्याचें अवलोकन करावें. तर यावरून उघड दिसतें कीं, आम्हांस धर्मपुस्तक नाहीं. जर वेद ब्राह्मणासाठीं आहेत तर वेदाप्रमाणें वर्तन करणें हा ब्राह्मणांचा धर्म होय. जर आम्हांस धर्मसंबंधीं पुस्तक पाहण्याची मोकळीक नाहीं तर आम्ही धर्मरहित आहों असें साफ दिसतें कीं नाहीं बरें? तर हे भगवान, तुजकडून आलेला कोणता धर्म तो आम्हांस कळीव, म्हणजे आम्ही सर्व त्याच्यासारिख्या रीतीनें अनुभव घेऊं."

"इमारतीच्या पायांत आम्हांस तेलशेंदूर पाजून पुरण्याचा व आमचा निर्वंश करण्याचा क्रम चालविला होता. त्या समयी महार अथवा मांग यातून कोणी तालीमखान्यापुढून गेला असता गुलटेंकडीच्या मैदानांत त्याच्या शिराचा चेंडू व तलवारीचा दांडू करून खेळत होते. अशी जर मोठ्या सोवळ्या राजाच्या दारावरून जाण्याची बंदी, तर विद्या शिकण्याची मोकळीक कोठून मिळणार? कदाचित् कोणास वाचता आलें आणि तें जर बाजीरावास कळलें तर तो म्हणे कीं, हे महारमांग असून वाचतात. तर ब्राह्मणांनीं का त्यांस दप्तराचे काम देऊन त्यांच्या ऐवजी धोकट्या बगलेंत मारून विधवांच्या हजामती करीत फिरावें की काय? असें बोलून तो त्यास शिक्षा करी."

४. Report of the Board of Education for the year 1853–54, p. 18.

"हा जुलूम विस्तारानें लिहूं लागलें तर मला रडूं येतें. या कारणास्तवच भगवंतानें आम्हावर कृपा करून दयाळू इंग्रजी सरकारास येथें पाठविलें. आणि या राज्यांतून आमचीं दुःखें निवारण झालीं तीं अनुक्रमानें पुढें लिहितें. किल्लाच्या पायांत घालण्याची बंदी झाली. आमचा वंशही वाढत चालला. महारमांग यांतून कोणी बारीक पांघरूण पांवरलें असतां ते म्हणत कीं, त्यांनीं चोरी करून आणलें. हें पांघरूण तर ब्राह्मणांनीच पांघरावें. जर महारमांग पांघरतील तर धर्मभ्रष्ट होतील असें म्हणून ते त्यांस बांधून मारीत. पण आतां इंग्रजांच्या राज्यांत ज्यास पैसा मिळेल त्यांनीं घ्यावें. उच्च वर्गांतील लोकांचा अपराध केला असतां मांगाचे किंवा महाराचें डोकें मारीत होते ती (चाल) बंद झाली. जुलमी बिगार बंद झाली. अंगाचा स्पर्श होऊं देण्याची मोकळीक कोटें कोटें झाली. गुलटेकडीच्या बाजारांत फिरण्याची मोकळीक झाली." [५]

त्या मुलीचा हा निबंध ऐकून 'ज्ञानोदया'ने असे म्हटले की, 'राजश्री जोतीबा माळी, पुण्याच्या अतिशूद्रांच्या शाळेचे स्थापक, यांनी या मुलीकडून तो आमच्यापुढे वाचविला. त्यावेळी राजश्री जोतीबा यांनी मनःपूर्वक केलेल्या श्रमाचे फळ आमच्या दृष्टीस पडले.' [६] अनेक युगे अस्पृश्यांना भोगाव्या लागलेल्या दुःखांमुळे पेशव्यांचे ब्राह्मणी राज्य लयास जाताच त्यांनी का निःश्वास सोडला हे वरील निबंधावरून चांगलेच स्पष्ट होते. ब्रिटिशांच्या राज्याबरोबर प्रत्येक माणसाला समान मूल्य आहे हे लोकशाहीचे तत्त्व आल्यामुळे अस्पृश्यांच्या मनात नवीन आशा निर्माण झाल्या.

जोतीबांची अखंड उद्योगशीलता, अलोट प्रेम आणि सतत जागरूकता यांमुळे शाळेची प्रतिष्ठा वाढली आणि पुण्यातील सरकारी मराठी शाळांपेक्षा जोतीबांच्या शाळांचा अधिक नावलौकिक झाला. यासंबंधी माहिती देऊन 'पूना ऑब्झर्व्हर' या पत्राने सरकारी शिक्षा मंडळीवर कडक टीका केली. ते पत्र म्हणाले की, "सरकारी शिक्षा मंडळीने पुण्यातील शाळांकडे दुर्लक्ष करून आपल्या एका महत्त्वाच्या आणि जबाबदारीच्या कर्तव्याकडे दुर्लक्ष केले आहे. त्या शाळांची स्थिती अत्यत वाईट झाली असून त्यांची व्यवस्था अर्धशिक्षित आणि अज्ञानी अशा म्हाताऱ्याकोताऱ्या शिक्षकांकडे सोपविलेली आहे. येथील पालक अतिशय उदासीन आहेत. शिवाय सरकारी शाळांत आवश्यक अशा उपकरणांचा व साधनांचा अभाव आहे."

सरकारी शाळांची जोतीबांच्या मुलींच्या शाळांबरोबर तुलना करून 'पूना ऑब्झर्व्हर'-मध्ये, संपादकाच्या एका मित्राने असे मत व्यक्त केले की, 'जोतीबांच्या शाळांतील मुलांची पटसंख्या सरकारी शाळांतील पटसंख्येपेक्षा दहा पटीने मोठी आहे.' ते मत उद्धृत करून संपादक म्हणाले, "हा जो आश्चर्यकारक परिणाम झाला आहे त्याला कारण असे की, मुलींना शिकविण्यासाठी जी व्यवस्था झाली आहे, ती मुलांच्या शाळां-

५. जोशी, ना. वि., पुणें शहराचें वर्णन, परिशिष्ट २ रें.
६. ज्ञानोदय, १५ फेब्रुवारी १८५५.

तील व्यवस्थेपेक्षा अनेक पटींनी श्रेष्ठ दर्जाची आहे. त्यामुळे पुण्यातील विचारवंत पुरुषांना मोठी निराशा वाटत आहे, असे आमचा मित्र म्हणतो. जर अशीच परिस्थिती चालू राहिली, तर सरकारी शाळांतील मुलांपेक्षा जोतीबांच्या शाळांतील मुली वरचढ होतील व खरोखरीच येत्या परीक्षेमध्ये आपण मोठा विजय मिळवू असे मुलींना वाटत आहे. जर सरकारी शिक्षा मंडळीने आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा केली नाही, तर स्त्रियांनी पुरुषांवर मात केली हे पाहून आम्हा पुरुषांना लाजेने माना खाली घालाव्या लागतील. त्यामुळे आमच्या कल्पनांना मोठा धक्का बसेल आणि मुलींच्या शाळा एकाएकी बंद होण्याला ते एक कारण घडेल."

तथापि, 'पूना ऑब्झर्व्हर'चे संपादक म्हणाले की, "तसा काही परिणाम होईल अशी व्यक्तिशः आम्हांस भीती वाटत नाही. जर मुलींच्या शाळा मुलांच्या शाळांपेक्षा काही काळ पुढे गेल्या, तर त्यापासून अंती विशेष काही तोटा होईल असे वाटत नाही. सरकारी शिक्षा मंडळी आणि मुले यांच्या हिंमतीला हे एक आव्हानच आहे." ७

पुरुषाच्या श्रेष्ठपणाची ही भावना पुण्यातील नेत्यांनी १९२० सालापर्यंत टिकवून धरण्याचा आटोकाट प्रयत्न केला. त्या वेळी त्यांनी मुलींच्या सक्तीच्या शिक्षणास विरोध केला.

. ३ .

शैक्षणिक क्षेत्रातील जोतीबांचा त्याग आणि कष्ट याविषयी सर्व महाराष्ट्रभर बोलबाला झाला होता. त्यांच्या शैक्षणिक कार्याची माहिती लंडनमधील कंपनी सरकारला यापूर्वीच राज्यपालांनी पाठविली होती. आता त्यांचा यथोचित गौरव होणेही क्रमप्राप्तच होते. आपल्या १२ जून १८५२ च्या अंकात 'पूना ऑब्झर्व्हर' म्हणतो : "आपल्या देशबांधवांच्या उद्धारासाठी जोतीबांनी जे महान प्रयत्न चालविले आहेत, त्याविषयी आम्ही वाचकांना माहिती दिली आहेच. आम्ही असे ऐकतो की, स्त्रीशिक्षणाच्या क्षेत्रात त्यांनी जे प्रशंसनीय कार्य केले आहे त्याविषयी सरकारकडून त्यांना २०० रुपये किंमतीची शाल बक्षीस मिळणार आहे."

आपल्या १५ नोव्हेंबर १८५२ च्या अंकात वाचकांना बातमी देताना 'ज्ञानप्रकाश' म्हणतो, "सर्व जातीचे मुलांस जोतिबा फुले हा फार मेहनत करून लिहिणें, वाचणें, शिकवीत आहे. हे स्तुत्य कामास सरकारनें सन्मानार्थ एक शालजोडी देण्याचा हुकूम केला आहे व ती शालजोडी बोर्डाचे मार्फत कचेरीकडून सदहू गृहस्थास उद्या देणार आहेत. या कामास वृद्ध लोक नाखूष होतील. परंतु तरुण खुषी झाल्यावांचून राहणार नाहींत."

सरकारी शिक्षा मंडळीने जोतीबांच्या कार्याकडे सरकारचे लक्ष वेधले होते आणि त्यांनीच जोतीबांचा असा बहुमान करावा असे सरकारला सुचविले होते. सरकारने ती

---

७. The Poona Observer, 29 May 1852.

सूचना आनंदाने मान्य केली. त्याप्रमाणे सरकारने १९३ रुपयांच्या दोन शाली[८] विकत घेतल्या, आणि आपला प्रतिनिधी म्हणून पुणे महाविद्यालयाचे प्राचार्य मेजर कँडी यांना ती महावस्त्रे समारंभपूर्वक अर्पण करण्याची आज्ञा केली.

जोतीबांच्या गौरवार्थ विश्रामबागवाड्यात १६ नोव्हेंबर १८५२ रोजी सरकारने देशी सरदार आणि प्रमुख लोक यांची एक सभा बोलाविली होती. समारंभाच्या प्रारंभी मेजर कँडी यांनी सरकारी शिक्षा मंडळीचे निवेदन सभेपुढे वाचून दाखविले आणि नंतर सभेचा उद्देश मराठीत कथन केला. भाषणाच्या शेवटी त्यांनी सरकारच्या वतीने जोतीबांना एक शालजोडी सन्मानपूर्वक अर्पण केली. असा हा सत्कार्याचा त्या सुदिनी सत्कार झाला. जोतीबांचे सहकारी आणि स्नेही बापूरावजी मांडे आणि पुणे महाविद्यालयाचे मुख्य पंडित मोरेश्वरशास्त्री यांनी स्त्रीशिक्षणाच्या महत्त्वाविषयी भाषणे केली. त्यांनी जोतीबांच्या शैक्षणिक क्षेत्रातील कार्याचा गौरव केला. त्यावेळी मुलींच्या एका वर्गाची परीक्षा घेण्यात आली. तीत मुलींची चांगलीच प्रगती दिसून आली.

ती भाषणे झाल्यावर एक पंचवीस वर्षांचा तरुण सभेपुढे उभा राहिला. त्याचा चेहरा तेजस्वी व आकर्षक होता. त्याच्या डोळ्यांतील तेज कारुण्यमय होते. नाक तरतरीत आणि किंचित अणकुचीदार होते. छाती भरदार होती. खांदे रुंद होते. भालप्रदेश उंच आणि रुंद होता. तोंडाचा जबडा उठावदार दिसत होता. त्याच्या हनुवटीवर डौलदार दाढी छान शोभत होती. त्यांनी आपल्या कार्यात मोठे साह्य केल्याविषयी आपल्या मित्रांचे, चाहत्यांचे आणि अभिमान्यांचे मनःपूर्वक आभार मानले. भाषणाच्या शेवटी ते गहिवरून म्हणाले, "मी माझे कार्य सदसद्विवेकबुद्धीच्या प्रेरणेमुळे आणि विशेषतः ईश्वरी इच्छेप्रमाणे केले."

'बॉम्बे गार्डियन'ने या सत्काराचा वृत्तांत मोठ्या उत्साहाने देऊन आपल्या वाचकांचे लक्ष त्या घटनेकडे वेधून घेताना म्हटले, 'तरुण जोती फुले यांनी काही वर्षे अविरत कार्य करून आपल्या देशबांधवांमध्ये शिक्षणाचा प्रसार केला आणि फार मोठी प्रगती केली आहे.' त्या समारंभाचा वृत्तांत देताना ते वृत्तपत्र पुढे म्हणाले, "त्या सभेचा समारोप देशी पद्धतीप्रमाणे फुलांचे हार आणि गुच्छ आदरपूर्वक देऊन करण्यात आला. अनेक युरोपियन गृहस्थ आणि दोनतीन युरोपियन स्त्रिया त्या समारंभास उपस्थित होत्या. ती प्रतिष्ठित मंडळी त्या समारंभास उपस्थित राहिल्यामुळे एतद्देशीय मंडळीच्या मनावर चांगला परिणाम होईल आणि ज्याचा बहुमान करण्यासाठी तो समारंभ घडवून आणला होता त्याच्याविषयी आणि शैक्षणिक कार्याविषयी लोकांच्या मनावर काही चांगला परिणाम होईल, असे समारंभाच्या नियोजकांस वाटले."

"जरी जोती गोविंद फुले हे एकटेच शिक्षणकार्याच्या आघाडीवर दिसत होते, तरी त्यांना पुण्यातील दुसरे काही तरुण उत्साहाने पाठिंबा देत होते." असे 'बॉम्बे

---

८. G. D. Index, 1852, p. 82.

गार्डियन'ने म्हटले आहे. त्या वृत्तपत्राने आपल्या वृत्तांताच्या शेवटी असे म्हटले आहे की, "जुन्या पिढीतील काही ब्राह्मणांनी जोतीबांसारख्या शूद्राला सरकारने शालजोडी अर्पण केली याविषयी नापसंती दर्शविली. कारण जोतीबा पडले जातीने माळी. व्यवसायाने मात्र ते त्यावेळी माळी नव्हते. ब्राह्मणांच्या मते त्यांना सरकारने महावस्त्र देऊन सन्मान करण्यापेक्षा त्यांना पैशाच्या रूपाने पारितोषिक देऊन त्यांची बोळवण करावयास हवी होती. जोतीबांना मुळीं सन्मानाचे असे प्रतीक मिळावयासच नको होते, अशी त्यांची खरी भावना असण्याचा संभव आहे. ज्या उत्साही तरुणाविषयी आम्ही लिहीत आहोत, त्याच्याशी आमचा चांगला परिचय आहे. जर जोतीबासारखे पुण्यातील सर्व तरुण असते तर मोठी आनंदाची गोष्ट झाली असती. ज्या अविचारी अश्रद्धेने तेथील अनेक तरुणांना झपाटले आहे, ती पाहून जोतीबाप्रमाणे आमचाही थरकाप होतो. कदाचित लवकरच जोतीबासंबंधी पुन्हा लिहिण्याची आम्हांस संधी मिळणार आहे. अशा प्रसंगाची माहिती देणे ही एक आनंदाची गोष्ट आहे, असे आम्ही मानतो."[१]

'पूना ऑब्झर्व्हर' पत्राने आपल्या २० नोव्हेंबर १८५२ च्या अंकात बातमी देतांना म्हटले, "कनिष्ठ जातीच्या मुलींच्या शिक्षणासाठी मुलींच्या शाळा स्थापन करण्यात, जोती गोविंद फुले यांनी जी मोठी कळकळ दाखविली त्याप्रीत्यर्थ त्यांना सरकारी शिक्षा मंडळीने महावस्त्र दिले." आपल्या वाचकांना उपरोक्त समारंभाची माहिती देताना 'ज्ञानप्रकाश' आपल्या २२ नोव्हेंबर १८५२ च्या अंकात म्हणतो, "तारीख १६ माहे मजकुरी पाठशाळेत मोठा समारंभ होऊन मेजर क्यांडी यांणी सर्कार बोर्ड ऑफ एज्यु-केशन यांच्या मार्फतीनें राजश्री जोती गोविंद फुले माळी यांस एक शालजोडी बक्षीस दिली. पुण्यांत ज्या हल्लीं मुलींच्या शाळा आहेत त्यांची आरंभी स्थापना जोतीबा याणी केली. याकरितां सर्कारानें या स्तुत्य कामाकरितां त्यांस हें बक्षीस दिलें."

जोतीबांचा सत्कार झालेला पाहून ज्या ब्राह्मणांच्या पोटात दुखले, त्यांनी आपला राग मनातल्या मनातच ठेवला होता. पेशव्यांच्या वाड्यात जोतीबांसारख्या एका ब्राह्मणेतराचा सत्कार झाला ही कल्पनाच त्यांना असह्य वाटली असेल. त्या काळी विख्यात संस्कृत पंडितांनाच सन्मानदर्शक शाल अर्पण करण्याचा प्रघात असे. मग, लोकहितवादीच्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे, त्यांच्या पाठांतराचा त्यांना अर्थ कळो वा न कळो!

त्या सनातनी ब्रह्मवृंदाच्या मते जो संस्कृत भाषेत पारंगत असेल तो विद्वान. त्यांना वाटे, संस्कृत ग्रंथांत सर्व जगातील ज्ञानाचे भांडार आहे. त्यांच्यादेखत सरकारने जोतीबांचा सत्कार करून ब्राह्मणांचा जो उपमर्द केला त्यामुळे ते सारखे जळफळत होते. ते सदा गतकाळात वावरत. वर्तमानकाळात आपले जीवन थांबले आहे हे त्यांना कळले नाही. ज्या कसोटीने आणि मापाने ते जीवनमूल्ये मोजीत होते, ती मूल्ये नि मापे केव्हाच धुळीस मिळाली होती.

---

१. The Bombay Guardian, 26 November 1852.



९८०४०

मुलींच्या शाळा काढून जोतीरावांनी स्त्रीशिक्षण-क्षेत्रात जे प्रचंड कार्य केले होते त्याविषयीच हा त्यांचा सत्कार झाला होता. त्यांच्या ज्या मित्रांनी त्यांना धैर्याने पाठिंबा दिला होता, त्यांच्या जीवनातील हा एक सोन्याचा दिवस होता. हिंदी स्त्रियांच्या शिक्षणाच्या इतिहासातील हा एक सुवर्णदिन होता.

एकोणिसाव्या शतकातील भारतातील शैक्षणिक इतिहास काही व्यक्तींच्या नावांशी निगडित झालेला आहे, असे सर हेन्री शार्प यांनी यथार्थपणे म्हटले आहे. त्या व्यक्ती म्हणजे डेव्हीड हॅरे, राममोहन रॉय, विल्यम कॅरे प्रभृति होत. जोतीराव फुले हे त्यांच्यापैकी एक होत.

स्त्रियांच्या हक्कांसाठी, उद्धारासाठी त्याग करणाऱ्या आणि कष्ट भोगणाऱ्या जोतीरावांचा 'स्त्रियांचा उद्धारकर्ता' म्हणून सत्कार झाला त्यावेळी न्यायमूर्ती माधवराव रानडे हे दहा वर्षांचे होते. प्रतिगाम्यांचे शंकराचार्य म्हणून पुढे प्रसिद्धीस आलेले विष्णुशास्त्री चिपळूणकर हे दोन वर्षांचे होते. सामाजिक चळवळीचे कैवारी गोपाळ गणेश आगरकर, स्त्रियांच्या विद्यापीठाचे संस्थापक धोंडो केशव कर्वे, पंडिता रमाबाई आणि महात्मा गांधी तेव्हा जन्मासही आले नव्हते.

# ६

# समानशिक्षण, समानसंधी

जोतीराव फुले हे सामाजिक समतेच्या क्रांतीचे आद्यजनक होत. त्या समाजक्रांतीचा जन्म पाश्चात्त्य शिक्षण आणि त्यासंगे आलेले समतेचे विचार यांच्या पोटी झाला होता. सामाजिक, आर्थिक आणि राष्ट्रीय क्षेत्रांत समतेच्या विचाराचा प्रवाह हळूहळू सर्व भारतात पसरू लागला. भारतातील धार्मिक तत्त्वाचे धागे, काही ठराविक मोजक्या लोकांच्या फायद्यासाठी आणि सोयीसाठी, सामाजिक आणि आर्थिक विचारांच्या धाग्यांत विणले गेले होते. जातिभेद संस्था ही सामाजिक आणि धार्मिक व्यवस्था. ती तर असमानतेच्या अन्याय्य कल्पनांनी बरबटलेली.

सुधारणावादी विचारवंत हिंदुस्थानातील निरनिराळ्या ठिकाणी मुलींच्या प्राथमिक शाळा घालीत होते. 'स्टुडण्टस् लिटररी ॲण्ड सायंटिफिक सोसायटी' या संस्थेचे पहिले चार अध्यक्ष युरोपियन प्राध्यापक होते. ह्या संस्थेच्या गुजराथी शाळांपैकी जी शाळा मर्झबान रस्त्यावर होती, तीत दादाभाई नौरोजी हे पंतोजी होते. स्त्रियांचा शिक्षणाचा एकमेव प्रश्न हाती घेऊन तो सोडविण्याच्या कार्यात व्यग्र असलेल्या ह्या संस्थेने भारतातील लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा ह्या उद्देशाने त्या शाळा स्थापन केल्या होत्या.

ह्या संस्थेचे ध्येय आणि धोरण निवेदन करणाऱ्या पत्रकात म्हटले होते की, 'मनुष्याच्या नैतिक संस्कार–संपादनावर या शाळेत भर देण्यात येईल. मुलांच्या वागण्यातील व्यवस्थितपणा, स्वच्छता आणि शिस्त यांकडे विशेष लक्ष पुरविले जाईल. तसेच ह्या गोष्टी मुख्यतः नीतीच्या कथा सांगून साधण्यात येतील.'[१] मुलींच्या शिक्षणाला वाहून घेणारी मुंबईतील पहिली देशी शिक्षणसंस्था हीच होय.

मुंबईत ह्या आठ शाळा १ ऑक्टोबर १८४९ रोजी स्थापन झाल्या. त्यापूर्वी कलकत्त्यातील महाराज्यपालाच्या सल्लागार मंडळातील एक सभासद ड्रिंकवॉटर बेथून ह्यांनी कलकत्ता येथे एक स्फूर्तिदायक भाषण केले होते. लोपामुद्रा हिचे उदाहरण देऊन त्यांनी स्त्रियांच्या उन्नतीसाठी हिंदूंनी झटावे असा कळकळीचा उपदेश केला. ह्या उपदेशानुसार काही विचारवंत हिंदूंनी वरिष्ठ वर्गातील मुलींना शिकविण्यासाठी एक शाळा घातली. ह्या शाळेत त्यांनी एका शिक्षिकेची नेमणूक केली होती. त्यावेळी भारतात सर्वसाधारण असे मत होते की, जरी स्त्रीशिक्षणाचे महत्त्व हिंदूंना पटले तरी स्त्रीशिक्षणाचा प्रसार होण्यासाठी ते काहीच धडपड करीत नाहीत; आणि जोपर्यंत हिंदूंच्या माता आणि भगिनी शिकून सुसंस्कृत होत नाहीत तोपर्यंत ते सुखी होणार नाहीत.[२]

ड्रिंकवॉटर बेथूनच्या प्रेरणेने सुरू झालेली ती शाळा, तिच्या पाठीराख्यांनी शाळेशी असलेले आपले संबंध तोडल्यामुळे, पाचसहा महिन्यांनी बंद पडली. ही गोष्ट 'स्टूडण्टस लिटररी आणि सायंटिफिक सोसायटी'च्या सभासदांच्या निदर्शनास आणून देऊन, 'ज्ञानोदया'ने त्यांना असा इशारा दिला की, 'ह्या हाती घेतलेल्या कार्याविषयी त्यांनी अधिक निष्ठा आणि चिकाटी दाखवावी यासाठी हे कलकत्त्यातील उदाहरण त्यांना उत्तेजन देईल. परोपकारी कार्यास आरंभ करणे सोपे असते. परंतु सर्वत्र उदासीनवृत्ती दाखविण्यात आली किंवा कदाचित विरोध झाला तरी ते चिकाटीने करणे इतके सोपे नाही. कलकत्त्याच्या लोकांच्या उदाहरणाने त्यांनी योग्य तो धडा घ्यावा. स्त्रियांच्या शिक्षणाचे कार्य ही गोष्ट अशी आहे की, तीसाठी सतत प्रयत्न आणि त्याग केला पाहिजे.'[३]

ड्रिंकवॉटर बेथूनच्या मृत्यूनंतर हिंदुस्थानचे महाराज्यपाल लॉर्ड जेम्स अॅण्ड्र्यू डलहौसी ह्यांनी ती शाळा स्वतःच्या खर्चाने चालविली. बाबू ईश्वरचंद्र बोस ह्या श्रीमंत व्यापाऱ्याने आपली मुलगी ह्या शाळेत घातली. त्यामुळे ईश्वरचंद्राच्या जातभाईंनी वाळीत टाकण्याची त्याला धमकी दिली. तो शरण आल्यावर त्याच्या मुलीची शुद्धी करून त्यांनी तिला परत जातीत घेतली.[४]

---

१. ज्ञानोदय, १५ सप्टेंबर १८४९.
२. ज्ञानोदय, १५ सप्टेंबर १८४९.
३. —कित्ता—
४. ज्ञानोदय, १५ डिसेंबर १८५१.

सर्व भारतात समतेची ही भावना स्त्रियांच्या आणि शूद्रांच्या शिक्षणाच्या चळवळीतून दिसून येत होती. त्या काळात जेव्हा एखादी शाळा सर्व जातींच्या मुलांना खुली करण्यात येई, किंवा कोठे मुलींच्या शाळा जेव्हा उघडत तेव्हा ती बातमी सर्व देशभर गर्जत जाई. त्या शाळांना इंग्रज राज्यपाल आणि इंग्रज न्यायाधीश भेटी देत असत. मोठ्या जनसमूहापुढे त्या मुलींची परीक्षा घेण्यात येई. नामवंत अधिकाऱ्यांनी आणि पुढाऱ्यांनी आपल्या मुली मुलींच्या शाळेत पाठविल्या म्हणजे त्यांच्या ह्या धीट वर्तनाची सर्वत्र प्रसिद्धी होत असे. सर्वसामान्य माणसांनी त्यांचे अनुकरण करावे, हाच त्या प्रसिद्धीकरणामागील प्रधान हेतू होता.

कनिष्ठ वर्गातील लोकांच्या शिक्षणाचे कैवारी त्यांच्या शिक्षणाकडे सरकारने आणि संस्थांनी लक्ष द्यावे म्हणून वर्तमानपत्रांतून आपली गाऱ्हाणी मांडीत असत. अशाच एका कैवाऱ्याने 'बॉम्बे गार्डियन'मध्ये एकदा असे लिहिले की, "भारतातील शिक्षणसंस्थांमध्ये एक मोठा दोष आहे. तो दोष म्हणजे सामान्य जनताशिक्षणाच्या सोयीचा अभाव. जे स्वतःचे शिक्षण घेण्यास समर्थ आहेत, त्या श्रीमंत लोकांस आपण शिकवीत आहोत. कुणबी आणि परिया (अतिशूद्र) ह्यांच्या उद्धारासाठी आपण काहीच व्यवस्था करीत नाही. ज्यांच्या श्रमामुळे सरकारला सर्वांत जास्त कर मिळतो, त्या शेतकऱ्यांच्या आणि गरीब जनतेच्या शिक्षणाची कोणी पर्वा करीत नाही. त्यांना तसेच अज्ञानसागरात डुंबत ठेवण्यात आले आहे. खरोखर ह्या भारतीय गरीब रयतेचा विचार मनात आला की, दुःखाने काळीज फाटून जाते. हृदय दुःखाने विदीर्ण होते. ब्राह्मण, जमीनदार, सरकार आणि सावकार हे सर्व मिळून ह्या दीनांना अवनतीस नेत आहेत. हे गरीब शेतकरी त्यांचे गुलाम बनले आहेत. जर खेड्यांपाड्यांतून शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार झाला नाही आणि रयतेला तिचे अधिकार काय आहेत हे शिकविले नाही, तर ह्या गरीब कामकऱ्यांची आणि शेतकऱ्यांची सध्या होत असलेली फसवणूक थांबणार नाही. जो मनुष्य अज्ञान आणि अंधश्रद्धा यांचा दास बनलेला आहे, त्याचा जरी ऐहिक उत्कर्ष झाला तरी त्याला समाजात मानाचे स्थान लाभणार नाही."

"सरकार रयतेकडे दुर्लक्ष करीत आहे तसे ते करो; परंतु रयतेची नेहमीच अशी आबाळ करता येणार नाही. एखादा झोंडवृत्तीचा लोकनेता किंवा एखादा हिंदू ओकानेल एखाद्या दिवशी उठेल आणि जे सरकार कामगारवर्गांचे कल्याण करण्याच्या बाबतीतल्या आपल्या आद्य कर्तव्याकडे दुर्लक्ष करीत आहे, त्याच्याविरुद्ध लोकांची एकजूट करील"[५]

शिक्षणाचे हे कार्य उत्साही लोक करीत असताना, मुलींच्या आणि शूद्रांच्या शिक्षणाचे विरोधक आपल्या विचाराने, वाणीने आणि कृतीने त्यांना विरोध करीत होते. ब्राह्मणेतरांना मुळी शिक्षणच देऊ नये असे गर्जून, सनातनी ब्राह्मणांनी धर्माच्या

५. The Bombay Guardian, 8 October 1852.

नावाखाली त्वेषाने कडवा विरोध करण्यास आरंभ केला. त्यांना असे वाटले की, जर कनिष्ठ वर्गांतील लोकांना शिक्षण मिळाले, तर शिक्षणापासून होणारे फायदे त्यांनाही मिळतील. शिक्षणक्षेत्रातील आणि व्यवसायातील आपली मक्तेदारी धोक्यात येईल आणि समाजातील आपल्या स्थानाला शेवटी धोका निर्माण होईल.

त्या काळच्या परिस्थितीचे वर्णन करताना लोकहितवादींनी म्हटले आहे की, "ब्राह्मणांनी युक्तीने आपले स्वाधीन विद्या ठेविली. इतरांस शिकवू नये, असा धर्म लावून दिला....भटांनी शाळा घालून कोणास तयार केले, किंवा विद्वान केलें....हल्ली बहुधा सर्व रोजगार ब्राह्मणांनी बळकाविले आहेत. म्हणजे एकीकडे भटांनी धर्म व दुसरीकडे गृहस्थांनी रोजगार अशा दोन्ही बाजू धरून इतर लोकांस आंत येऊं देऊं नये, अशी शक्कल केली होती. आता जर कोणी शूद्र जातीचा कारकून झाला, तर सर्व ब्राह्मण-लोक त्याजकडे डोळे वटारून पहातात. त्यांस असें वाटतें कीं, आमचा धर्म लिहिणें-पुसणें करावयाचा असून कुणबी आमची वृत्तिच्छेद करितात."[६]

अठराशे एकवीस साली चॅप्लिन नावाच्या इंग्रज आयुक्ताने स्थापन केलेल्या पुणे संस्कृत पाठशाळेत फक्त ब्राह्मणांनाच प्रवेश मिळे. इतर जातींच्या हिंदूना तीत प्रवेश नसे. ती पाठशाळा निरुपयोगी आहे असे १८३८ साली ठरले. बराच विचारविनिमय करून आणि ब्राह्मणांची संमती घेऊन, पुढे १८५१ साली तिचे रूपांतर पुणे महा-विद्यालयात करून, ते महाविद्यालय सर्व हिंदूंना खुले करण्यात आले. त्यामुळे पुणे शहरातील ब्राह्मणांचा संताप अनावर झाला. त्याविषयी लिहिताना 'ज्ञानोदया'ने असे म्हटले आहे की, 'ब्राह्मण भूदेव हे शिक्षणाचे दरवाजे सर्वांना सारखे उघडे झाले आहेत असे पाहून अत्यंत नाखूष झाले आहेत.' पुण्यातील ब्राह्मण पंडित भीतीने आणि रागाने थरथरत होते. त्यांनी सरकारच्या या धोरणाला कसून विरोध करण्यासाठी एक-जुटीने प्रयत्न केला. ब्राह्मण शिक्षकांनी ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांना संस्कृत शिकविण्यास नकार दिला; कारण त्यांच्या धर्मशास्त्राप्रमाणे ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांना संस्कृत शिकण्याचा अधिकार नव्हता. ती पडली देवभाषा, पवित्र वेदाची. ती अब्राह्मणांच्या जिव्हांनी विटाळविण्यास त्यांचा विरोध होता.

सनातनी हिंदूंनी पुणे महाविद्यालयाच्या चालकांस धमकी दिल्यावर त्या महाविद्या-लयाचे प्राचार्य मेजर कॅंडी यांनी त्या प्रकरणासंबंधी विचार करण्यासाठी ब्राह्मण पंडितांना काही दिवस सवड दिली. त्यामुळे सोनार, प्रभू, आणि इतर ब्राह्मणेतर जातीतील विद्यार्थी ह्यांना ते स्वतःच संस्कृत शिकवू लागले. ब्रह्मण पंडित मात्र ब्राह्मण विद्यार्थ्यांना शिकवीत असत. बहुतेक ब्राह्मण पंडितांनी 'ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांना संस्कृत ही पवित्र भाषा शिकविण्यापेक्षा आम्ही राजीनामा देऊ,' अशी सरकारला धमकी दिली.[७]

---

६. संपादक, टिकेकर, श्री. रा., लोकहितवादींची पत्रें, पृ. ७१, ७२, २९१, २१५.
७. ज्ञानोदय, २ ऑगस्ट १८५३.

. २ .

त्यावर 'ज्ञानोदया'ने असे लिहिले की, ह्या प्रश्नाचा निर्णय भारतातील इतर भागांत केव्हाच होऊन गेला आहे. कलकत्ता महाविद्यालयात सर्व जातींच्या मुलांना प्रवेश मिळतो, असे सांगून 'ज्ञानोदया'ने पुढे म्हटले की, 'ब्राह्मणांनी अशा विचित्र कल्पनेत रममाण होण्याचे दिवस आता गेले आहेत. सार्वजनिक पैशातून आपली स्वतंत्र शिक्षणव्यवस्था व्हावी, आपणच देवाचे मोठे लाडके आहोत, नव्हे भूदेव आहोत असे म्हणणे, अशा कल्पनेत त्यांनी दंग होण्याचे दिवस आता राहिलेले नाहीत. जर त्यांनी स्वतःच्या खर्चाने अशा शाळा चालविल्या तर आपल्या इच्छेप्रमाणे आणि भावनेप्रमाणे वागण्यास अर्थातच ते मोकळे आहेत. परंतु सरकारने ह्या पोकळ मानापमानाच्या कल्पनेचे लाड करण्यासाठी आपल्या उत्पन्नातून पैसे खर्च करावे हे अयोग्य आहे. सार्वजनिक संस्था या सर्व वर्गांना खुल्या असल्याच पाहिजेत.'[८]

ब्राह्मणांच्या ह्या स्वार्थपरायण अन् असहिष्णू वृत्तीचा धिक्कार करून, मुंबईतील 'प्रभाकर' साप्ताहिकाने असे म्हटले की, 'पुण्यांतील ब्राह्मण पंडितांचें हें वर्तन अयोग्य आणि मूर्खपणाचें आहे. मुंबईत शेकडों ब्राह्मण पंडित प्रभूंच्या, सोनारांच्या आणि तसेच युरोपियनांच्या घरीं संस्कृत शिकवितात व वेदपठणही करतात.' पुण्यातील ब्राह्मण पंडितांनी ऋग्वेदाची प्रत सुधारून देऊन ती इंग्लंडमध्ये छापण्याकरिता सरकारकडे पाठविली याची आठवण 'प्रभाकर' साप्ताहिकाने ब्राह्मणांना करून दिली. शेवटी 'प्रभाकर'ने पुण्यातील ब्राह्मण पंडितांना असा इशारा दिला की, 'त्यांच्या जागा दुसऱ्या विद्वान पंडितांकडून भरल्या जातील आणि ते कमी पगारावर काम करण्यास तयार आहेत.'[९]

गंगाधर दीक्षित-फडके नावाचे ब्राह्मण पंडित मुंबईमध्ये १८२० ते १८२५ पर्यंत युरोपियन लोकांना संस्कृत शिकवून उदरनिर्वाह करीत असत. ते पुण्यास परत गेल्यावर त्यांच्यावर ब्राह्मणांनी बहिष्कार टाकला. ते युरोपियन लोकांच्या पंक्तीस जेवले असावेत असे पुण्यातील ब्राह्मणांना वाटले. बिचारे गंगाधर पंडित पुढे संन्याशी झाले आणि ब्राह्मणांच्या सोवळ्या जगातून नाहीसे झाले.

'ज्ञानप्रकाश'ने ब्राह्मणांच्या गाऱ्हाण्याला वाचा फोडताना एक हूल उठविली. ती अशी की, कलकत्ता येथील हिंदू महाविद्यालयात सरकारने बायबलचा अभ्यास सुरू केला आहे. 'ज्ञानप्रकाश'ने अत्यंत अविचाराने आणखी असे म्हटले की, 'संस्कृत पाठशाळेत शास्त्र आणि पुराणे सर्व जातीतील मुलांना शिकविण्याचा अट्टाहास सरकारने चालू ठेवला आहे. आपली धार्मिक मते आणि विचार यांचा प्रतिपाळ करण्यासाठी सर्व लोकांनी एकजूट

---

८. ज्ञानोदय, २ ऑगस्ट १८५३.

९. —कित्ता—

करून केवळ ब्राह्मणांकरिता असे महाविद्यालय का स्थापन करू नये ? आपला जात्याभिमान अन् पूर्वजांच्या धर्मावरील विश्वास हा आजच नाहीसा झाला काय ?'

'ज्ञानप्रकाश'ला उत्तर देताना 'ज्ञानोदय' पत्र म्हणाले की, 'कलकत्ता येथील सरकारी महाविद्यालयात बायबलचा अभ्यास सुरू केला आहे हे 'ज्ञानप्रकाश'चे म्हणणे चूक आहे. तेथे जर कोणता वादाचा मुद्दा असेल तर तो सर्व जातींच्या विद्यार्थ्यांना त्या महाविद्यालयात प्रवेश मिळतो हा होय. आणि सर्व जातींच्या विद्यार्थ्यांना त्या महाविद्यालयात प्रवेश मिळणे हे जर हिंदूंच्या धर्माविरुद्ध वर्तन असेल तर त्या धर्मतत्त्वालामुद्धा ही वाईट गोष्ट आहे. जर लक्षावधी लोकांनी अज्ञानात आणि पददलित अवस्थेत राहावे अशी हिंदुधर्माची इच्छा असेल, तर तो धर्म देवाचा धर्म नव्हे. जनतेचा उद्धार त्या धर्मामुळे होणार नाही.'[१०]

ज्या दोन ब्राह्मण पंडितांनी पुणे महाविद्यालयात ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांना संस्कृत शिकविण्याचे काम चालू ठेवले होते, त्यांच्यावर हल्ला करताना 'ज्ञानप्रकाश' म्हणतो, "राजश्री नारायणशास्त्री अभ्यंकर व गोपाळशास्त्री गोखले ह्यांनी सरकारपाशी र्वे जातींच्या मुलांस संस्कृत शिकविण्याचें कबूल केलें. तारीख १ माहे मजकुरापासून शिकवूं लागले. आम्ही त्या दिवशीं मुद्दाम विश्रामबागेंत जाऊन पाहिलें तों वर लिहिलेले शास्त्रीबुवा, स्वधर्माचा आणि स्वजातीचा अभिमान सोडून फक्त आपलें पोट भरण्यावरच नजर देऊन, सोनार, शिंपी, परभू, फारसी, शूद्र इत्यादी जातींच्या मुलांस पुढे घेऊन संस्कृत कौमुदींतील नियम त्यांस सांगत होते. हर! हर! हर! हें दुष्ट कर्म पाहून आमचें मनास तर फारच विस्मय झाला. बरें असो, हें विलक्षण कृत्य ह्या उभयतां शास्त्र्यांनी चालविलें हें गांवभर झालें आहे. भट्ट व शास्त्री वगैरे लोकांचीं मनें अगदीं खवळून गेलीं आहेत. आम्ही असें ऐकतों कीं येथील शुक्र पक्षाकडील अग्रेसर भट व शास्त्री यांनी सभा भरून सदरहू शास्त्र्यांस बहिष्कार घातला. आतां पुण्यांतील मुख्य मुख्य भट व गुंडेशास्त्री यांचा रोजगार पिकला. ह्या ग्रामण्याप्रकरणीं आम्ही आमच्या वाचकांकरितां पुढें लिहून कळवूं."[११]

हे वृत्त उद्धृत करून त्यावर 'ज्ञानोदया'ने खरमरीत टीका करताना म्हटले: "सदर्हु ज्ञानप्रकाशकर्त्यांचा लेख पाहून आम्हांस आश्चर्य वाटतें; पोटभरू अज्ञानी भट लोक गडबड करितात त्यांचें आश्चर्य वाटतें असें नाहीं; तर 'ज्ञानप्रकाश' असें नांव आपणांस ठेवून विद्या सर्वांनी सारखीच शिकूं नये असा पक्ष धरतो! तर त्यानें तें नांव फिरवून अज्ञानाधार असें नांव ठेवावें म्हणजे नांव आणि कृति यांची ऐक्यता होईल, अथवा केल्या कर्माचा पश्चात्ताप करून सारखाच ज्ञानप्रकाश करावा हें त्यापेक्षां बरें होईल." 'ज्ञानोदया'ने आपल्या पुढील अंकात पुन्हा म्हटले की, 'संतापाविषयी

---

१०. ज्ञानोदय, १६ मे १८५३.

११. —कित्ता—

आम्हांला काहीच आश्चर्य वाटत नाही. जो स्वतःस ज्ञानाचा प्रकाश म्हणवितो त्या 'ज्ञानप्रकाशा'त अशा प्रकारचा लेख यावा याबद्दल आम्हांला आश्चर्य वाटते. हे कृत्य ज्ञानप्रकाशच्या नावाला शोभत नाही. कारण ज्ञानप्रकाशने ब्राह्मणाची असहिष्णुवृत्ती आणि घमेंडखोरपणा ह्यांना पाठिंबा दिला.' दुसऱ्या एका सुसंस्कृत म्हणविणाऱ्या गृहस्थाने 'ज्ञानप्रकाशा'त एक लेख लिहून पुण्यातील ज्या ब्राह्मणपंडितांनी ब्राह्मणेतरांना संस्कृत शिकविले त्यांचा धिक्कार केला. आणि अशा या भ्रष्टयुगात सर्वत्र गोष्टी भ्रष्ट पावत आहेत, याविषयी खेद प्रदर्शित केला. पुणे शहरात अशी कडाक्याची चर्चा पूर्वी कधीही झाली नव्हती, असे 'प्रभाकर'ने म्हटले आहे.

नीलकंठशास्त्री भट आणि दुसरे पाच पंडित हे ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांना संस्कृत शिकविण्यास तयार नव्हते म्हणून त्यांची बदली कमी पगारावर 'ओरिएंटल् ट्रॅन्सलेटर' कार्यालयामध्ये करण्यात आली. धोंडशास्त्रीबाबा डेंगवेकर, शंकर जोशी व्यवहारे, बाळशास्त्री देव आणि कृष्णशास्त्री राजवाडे ह्या चार पंडितांनी ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांना संस्कृत शिकविले म्हणून, पुण्यातील ब्राह्मणांनी त्यांचा अत्यंत छळ केला. शंकर जोशी यांनी तर ह्यापूर्वी याज्ञवल्क्य हा पवित्र ग्रंथ युरोपियनांना शिकविला होता. त्यामुळे त्यांच्यावर निंदेचा वर्षाव होत होता. ह्या सर्व पंडितांनी जाती–बहिष्काराला मोठ्या धैर्याने तोंड दिले.

गंमत कशी आहे पाहा. याच सनातनी ब्राह्मण पंडितांनी गोमांस खाणाऱ्या मेजर थॉमस कँडींच्या हाताखाली संस्कृत शिकविण्यासाठी नोकरी धरली. परंतु आपल्या धर्मबंधूंना संस्कृत शिकविले, तर धर्मच बुडेल अशी त्यांची समजूत होती. त्यांच्या अडाणी समजुतीमुळे मेजर कँडीदेखील जेरीस आले. मेजर कँडी हे परम दयाळू आणि अत्यंत शांत वृत्तीचे अधिकारी होते. परंतु त्याचा अर्थ ते मूर्ख किंवा अर्धवट आहेत, असे हे शहाणे करीत असत. कँडीसाहेबांच्या स्वभावात एकच दोष होता. तो म्हणजे ते स्वतःला मराठी भाषेचा अधिकारी पुरुष समजत असत, हा होय.

प्रारंभी ज्या विश्रामबागवाड्यात ती संस्कृत पाठशाळा होती, तीत कँडीसाहेबांना ते ब्राह्मण सनातनी पंडित व ब्राह्मण विद्यार्थी प्रवेश करू देत नसत. एके दिवशी कँडी-साहेब त्या वाड्यात शिरताच त्या ब्राह्मण पंडितांनी आणि विद्यार्थ्यांनी उदक शांती केली. नंतर कँडीसाहेब दिवाणखान्यापर्यंत जाऊ लागले. त्यांचा स्पर्श होऊन जर ब्राह्मण विद्यार्थ्यांना विटाळ झाला, तर ते घरी जात व सचैल स्नान करून साहेबाचा विटाळ धुऊन काढीत.

कँडीसाहेबांची पाठशाळेतील उपस्थिती अटळ आहे, हे जेव्हा त्या ब्राह्मण पंडितांना आणि विद्यार्थ्यांना कळून चुकले, तेव्हा ते घरी गेल्यावर पाठशाळेत वापरलेले केवळ कपडे बदलून विटाळ टाळल्याचे समाधान मानू लागले. याही पुढे जाऊन त्यांनी आपल्या आत्म्याची शुद्धता राखण्यासाठी ह्यावर एक तोड काढली. ते म्हणाले, राजा किंवा राजाचा प्रतिनिधी याचा विटाळ होत नाही ! कँडीसाहेबांनी मात्र त्यांचे हे अपमानकारक वागणे

मोठ्या संयमाने सहन केले. काही दिवस बिचारे कँडीसाहेब संस्कृत पाठशाळेत काम करताना बूटही वापरत नसत. पाठशाळेत खाणेपिणेही ते टाळीत असत.[१२]

. ३ .

(सर्व हिंदूंना पुणे महाविद्यालय खुले केले) तरी शिष्यवृत्ती मात्र ब्राह्मण विद्यार्थ्यांनाच मिळे. हा ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांवर मोठाच अन्याय होत असे. ह्या अन्यायाविरुद्ध 'बॉम्बे गार्डियन' मध्ये एका गृहस्थाने पत्र लिहून, 'कनिष्ठ वर्गातील मुलांना शिष्यवृत्ती मिळते की नाही,' अशी त्यात सरकारकडे विचारणा केली. "जरी या विषयासंबंधी काही स्पष्ट उल्लेख केलेला नाही," ते गृहस्थ पुढे म्हणाले, "तरी आम्हांला अशी शंका आहे की, जातपात, धर्म, पंथ निरपेक्ष बुद्धीने सर्वांना सरकारकडून सारखाच न्याय मिळेल असे दिवस अद्याप दूरच आहेत."[१३]

यानंतर थोड्याच दिवसांनी आग्रा महाविद्यालयाने शिष्यवृत्त्या सर्व जातींच्या विद्यार्थ्यांना खुल्या केल्या आहेत, अशी बातमी "बॉम्बे टाईम्स" मध्ये प्रसिद्ध झाली.[१४] मात्र नियमाप्रमाणे विद्यार्थी त्यास पात्र असले पाहिजेत व कसोटीलाही उतरले पाहिजेत, एवढीच अट होती. त्या काळापर्यंत आग्रा महाविद्यालयातही फक्त ब्राह्मणांनाच शिष्यवृत्ती मिळत असे.

रत्नागिरी येथे त्याच सुमारास एक वेदशाळा उघडण्याचा ब्राह्मणांचा बेत होता. पुरस्कर्त्यांनी वेदशाळा सुरू करण्याविषयी विचार करण्यासाठी एक नागरिकांची सभा बोलाविली. तेव्हा ब्राह्मणेतरांनी त्यांना चक्क विचारले की, 'आमच्या मुलांस तुम्ही वेद शिकविणार काय?' 'या प्रश्नावर सर्वच कुंठित झाले.'[१५]

सनातनी व प्रतिगामी ब्राह्मण यांचा शैक्षणिक नि सामाजिक क्षेत्रांतील समताविषयक नव्या उदारमतवादाला हा कट्टर विरोध पाहिला म्हणजे जोतीरावांचे धोरण व ध्येय किती दुःसाध्य, उदात्त आणि यथार्थ होते याची कल्पना येते. कनिष्ठ वर्गाच्या शिक्षणाला ब्राह्मणांचा विरोध होता हेच जोतीकालीन ब्राह्मणांचे वैशिष्ट्य होते.

शूद्रांची जर ही अशी परिस्थिती, तर अतिशूद्र हे अस्पृश्य असल्यामुळे त्यांना शिक्षण घेण्याची स्वप्नातही आशा नव्हती. ज्या सनातनी वर्गाला शिक्षण ही आपलीच मक्तेदारी वाटे, त्यांचा अस्पृश्यांच्या शिक्षणास कडकडून विरोध होता हे सांगावयास नकोच. वरिष्ठ वर्गातील राममोहन रॉयसारखे नेते व सरकारी धोरण ठरविणारे अधिकारी हे उघडपणे वरिष्ठ वर्गातील लोकांना शिक्षण द्यावे याच मताचे होते. त्यांना असे वाटे

---

१२. जोशी, ना. वि., पुणें शहराचें वर्णन, पृ. ७६.
१३. The Bombay Guardian, 8 October 1852.
१४. ज्ञानोदय, १२ नोव्हेंबर १८५१.
१५. ज्ञानोदय, १५ ऑक्टोबर १८५४.

की, शिक्षण वरिष्ठ वर्गातून झिरपत झिरपत जाऊन कनिष्ठ लोकांपर्यंत केव्हातरी पोहोचेल. दुसऱ्या बाजूला जोतीरावांसारखे नेते होते. सर्वसामान्य जनतेच्या शिक्षणाला अग्रहक्क मिळावा असे त्यांना वाटे. इंग्रज सरकारने बुध्याच असे धोरण आखले होते की, शिक्षण हे वरिष्ठ वर्गाची मक्तेदारी राहावी. हे त्यांच्या धोरणातून स्पष्टच होते.

ईस्ट इंडिया कंपनीच्या संचालकांनी मद्रास सरकारला १८३० साली लिहिले होते की, "शिक्षणात अशा सुधारणा पाहिजेत की ज्याने वरिष्ठ वर्गातील नीती व बुद्धिमत्ता यांची पातळी उंच होईल. ज्यांना फुरसत आहे आणि ज्यांचे स्वतःच्या समाजावर वजन आहे अशाच लोकांच्या शिक्षणाची आपण काळजी वाहिली पाहिजे. अशा दर्जाच्या शिक्षणाचा प्रसार या वर्गामुळे त्या जातींच्या कल्पनांत मोठा हितावह बदल घडून येईल. तसा फरक खालच्या बहुसंख्य जातींमध्ये जलद गतीने घडून येणार नाही. तसेच सवयीने आणि ज्ञानाने लायक झालेल्या एतद्देशीय लोकांच्या गटाने हिंदी शासनसंस्थेत पूर्वापेक्षा अधिक वाटा उचलावा आणि वरच्या जागा व्यापाव्यात, अशी आमची उत्कट इच्छा आहे, हे तुम्हांस माहीत आहेच."[१६]

कनिष्ठ वर्गाच्या शिक्षणासंबंधी सरकारचे मत तितकेसे अनुकूल नव्हते. सरकारी शिक्षा मंडळीच्या प्रतिवृत्तात अधिकाऱ्यांनी आपल्या धोरणाच्या पुष्टीसाठी मुंबईचे भूतपूर्व राज्यपाल माऊंट स्टयुअर्ट एल्फिन्स्टन यांचे म्हणणे दिले होते. त्यात असे म्हटले होते की, "भारताच्या पश्चिम विभागातील एल्फिन्स्टन हे उदारमतवादी, उदार बुद्धीचे पुरुष होत. त्यांचे विचार शहाणपणाचे आहेत. ते एकदा म्हणाले होते की, 'मिशनऱ्यांच्या मते खालच्या वर्गातील मुले उत्कृष्ट विद्यार्थी असतात. परंतु त्या वर्गातील लोकांना आपण विशेष उत्तेजन देण्याच्या बाबतीत सावधगिरी बाळगली पाहिजे. कारण त्यांचा समाजात अति द्वेष केला जातो; एवढेच नव्हे तर समाजात जे अनेक गट आहेत त्यांतला हा बहुसंख्य असलेला एक गट आहे. जर आपल्या शिक्षण पद्धतीने त्यांच्यातच प्रथम मूळ धरले, तर शिक्षणाचा प्रसार होणार नाही. आणि आपणांस पुढे असे आढळून येईल की, जे शिक्षणाने पुढारलेले आहेत, परंतु इतर जाती ज्यांचा द्वेष करतात अशा एका नवीन वर्गाचे आपण पुढारी आहोत. मग आपल्याला त्यांनाच पसंत करावे लागेल. जर आपण सैन्याच्या बळावर राज्य करावयाचे ठरविले असते किंवा लोकांच्या एका घटकाच्या निष्ठेवर सत्तेकरता अवलंबून राहावयाचे ठरवले असते, तर ही गोष्ट चालली असती. परंतु आणखी व्यापक पायावर राजसत्ता आधारावयाचे जे आपले प्रयत्न चालले आहेत त्यांच्याशी हे धोरण विसंगत आहे.'"[१७]

एल्फिन्स्टनसाहेबाचा हा कावा पाहिल्यावर त्याचे वर्णन दूरदृष्टी, पाताळयंत्री व महाधूर्त राजकारणी असे न करता, तो सुसंस्कृत नि जनहिततत्पर राज्यकर्ता होता, अशी

---

१६. Report of the Board of Education for the year 1950-51.

१७. Report of the Board of Education for the year 1951-52.

त्याची स्तुती करणे अनाठायी आणि अयोग्य आहे.

शिक्षणासंबंधीच्या ह्या धोरणात पुढे थोडासा फरक झाला. ईस्ट इंडिया कंपनीच्या संचालकांनी आपल्या १९ जुलै १८५४ च्या क्रमांक ४९ च्या खलित्यातून चार्लस वुडस्कृत शिक्षणयोजना हिंदी सरकारच्या मार्गदर्शनासाठी पाठविली. तीत त्यांनी असे म्हटले होते की, 'जी गरीब जनता स्वतःच्या कष्टाने शिक्षण घेण्यास असमर्थ आहे, तिला जीवनात उपयुक्त आणि व्यवहारपोषक असे शिक्षण द्यावे. आमची अशी इच्छा आहे की, सरकारने भविष्यकाळात योग्य ती पावले टाकून हे ध्येय संपादन करावे. ह्यासाठी आम्ही खर्चात वाढ करावयास तयार आहोत.'

त्याप्रमाणे जरी सार्वत्रिक शिक्षणाचे धोरण सरकारने आखले होते, तरी सरकारचा मुख्य हेतू कोट्यवधी हिंदी जनतेचा उद्धार करण्यापेक्षा साम्राज्याचे संवर्धन आणि दृढीकरण करण्याचाच अधिक होता. सरकारचे मोठमोठाले अधिकारी खालच्या वर्गातील जनतेच्या शिक्षणाला अनुकूल नव्हते. कनिष्ठ वर्गात शिक्षणाचा प्रसार करण्याचे प्रयत्न अयशस्वी व्हावेत, यासाठी ते बुद्धिपुरस्सर खटपटत असत.

लॉर्ड एलेनबरो हे बोर्ड ऑफ कंट्रोलचे अध्यक्ष असताना त्यांनी संचालकांच्या अध्यक्षाला कळविले होते की, 'शिक्षण आणि संस्कृती ही वरच्या वर्गातून खालच्या वर्गात झिरपत जाईल आणि त्यामुळे त्या वर्गात नवा जोम निर्माण होईल. परंतु शिक्षण आणि संस्कृती ही खालच्या वर्गातून वरच्या वर्गापर्यंत कधीच जाणार नाही. जर शिक्षण आणि संस्कृती यांचा प्रसार खालच्या वर्गात केला, तर त्याचा परिणाम सार्वत्रिक क्रांतीमध्ये होईल आणि तीत परदेशीयांची पहिल्याप्रथम होळी होईल!'[१८]

. ४ .

कनिष्ठ वर्गाच्या उद्धाराविषयी उदासीनवृत्ती दिसून येत होती, तरी त्या वर्गातील काही मुलांनी त्या काळी शिकण्याचा प्रयत्न केला. त्यांना ब्राह्मणांनी अत्यंत निर्दयपणे वागवून त्यांचा छळ केला. रेव्हरंड मरे मिचल यांनी आपल्या आठवणीच्या ग्रंथात एका मनोरंजक प्रसंगाची माहिती दिली आहे. रेव्हरंड आदम व्हाइट यांनी एकदा पुण्याजवळील सरकारी शाळेला भेट दिली. त्या शाळेतील ब्राह्मण पंतोजीजवळ एक वेताची छडी होती. तिचा उपयोग ते पंतोजी अधूनमधून चांगलाच करीत.

आदम व्हाइट यांनी त्या ब्राह्मण पंतोजीला विचारले की, "ही ढेकळे तुमच्याजवळ कशाकरता ठेवली आहेत?" पंतोजी उत्तरले, "स्पृश्य मुलांच्या बाबतीत मी छडी वापरतो. जर मी छडीने महार मुलास मारले तर तो अस्पृश्य असल्यामुळे काठीबरोबर विटाळ येईल आणि माझे सर्व शरीर विटाळेल. म्हणून जेव्हा महार मुलगा मूर्खपणाने

१८. Report of the of Board Education for the year 1957-58, pp. 10-11.

वागतो तेव्हा मी एक ढेकुळ घेतो आणि त्याच्याकडे फेकतो. जर एक चुकले तर दुसरे मारतो."

जोतीराव यांनी मरे मिचल यांच्या शाळेत पाठविलेल्या मुलाची एक हृदयद्रावक गोष्ट मरे मिचल यांनी आपल्या आठवणीत दिली आहे. ते म्हणतात, "माझे स्नेही जोतीराव गोविंदराव फुले ही एक मोठी उल्लेखनीय अशी व्यक्ती होती. महारांचे हित व्हावे म्हणून ते अत्यंत परिश्रम घेत असत. महार हे हीन जातीचे. जोतीरावांनी एकदा त्या जातीचा मुलगा आमच्याकडे पाठविला. त्याला इंग्रजीच्या प्रारंभीच्या वर्गात घालण्याइतका त्याचा देशी भाषेतील अभ्यास झालेला होता. त्याला शाळेत प्रवेश देताच ब्राह्मण मुलांचे एक शिष्टमंडळ माझ्याकडे आले. त्या मुलांचे काळेभोर डोळे चकाकत होते. आणि त्यांचे हावभाव मनातील हेतू प्रदर्शित करीत होते. 'तुमच्या शाळेत महार मुले असल्यामुळे आम्ही शाळा सोडणार आहो,' असे ते म्हणाले."[१९]

"मी म्हणालो, 'अरे, मला वाटते एकच मुलगा आहे.' 'होय. एक काय नि दहा काय, सारखेच.' 'मग काय त्या मुलाला मी हाकलून देऊ?'

'ते आम्हाला काय सांगता! आमचे म्हणणे एवढेच की तो राहिला तर आम्ही जाणार!' 'तुमची इच्छा नसेल तर त्याला तुम्ही शिवू नका. तुम्ही वर्गातील हुशार मुले आहात, तुमचा क्रमांक नेहमी वरच असणार. तो गरीब महार मुलगा, वर्गात सर्वांच्या खाली असणार. तो वेगळ्याच बाकावर बसतो.' 'ते खरे, परंतु चटई जमिनीवर असते ना? तिचा विटाळ आम्हांस होतो. आता आम्हा सर्वांना विटाळ झाला आहे. आता घरी जेवणापूर्वी स्नान करून हा विटाळ घालविला पाहिजे.' 'मी ती चटई काढून टाकावी अशी तुमची इच्छा आहे का?' 'आम्ही वर्गातच नसतो तर बरे झाले असते!' 'ठीक तर; काही झाले तरी मी या मुलाला वर्गाबाहेर हाकलून देऊ शकत नाही.'

"मी अगदी गोंधळून गेलो. एक तर ब्राह्मण मुलांना हाकलून देण्याची माझी इच्छा नव्हती आणि माझ्या सदसद्विवेकबुद्धीप्रमाणे मी त्या महार मुलालाही शाळेतून बाहेर काढू शकलो नाही. मी म्हणालो, 'उद्यापर्यंत थांबा. वर्गाची उद्या फेररचना करू आणि तशातही तुम्ही आता वरच्या वर्गात उत्तीर्ण होऊन जाणार.' हो ना करता ब्राह्मण मुले दुर्मुखलेल्या चेहऱ्यांनी निघून गेली. तो महार मुलगा शाळेत फिरून आलाच नाही. पाण्याच्याबाहेर माशाची जशी स्थिती होते तशीच त्याची या शाळेत झाली. इतर उच्चवर्गीय अन् मध्यमवर्गीय मुलगे या बाबतीत अचल राहिले. त्या वर्गातील शिक्षकांनीही तेच केले."[२०]

---

१९. Rev Murray Mitchell, The Recollections of My Early Missionary Life, pp. 325-26.

२०. कित्ता, पृ. ३१४-१५.

ब्राह्मणी धर्म हा किती विघातक आहे पाहा. वर्गशिक्षक खिस्ती असताना ब्राह्मण मुलांना त्याचा विटाळ होत नसे. आपल्या क्षुद्र स्वार्थासाठी ते आपले धर्मनियम, चालीरीती आणि तत्त्वे यांचा भंग करण्यास तयार असत. परंतु आपल्या अन्याय्य व निर्दय चालीरीतींचे पालन आपल्या धर्मबांधवांनी कठोरपणे केले पाहिजे अशी त्यांची अपेक्षा असे.

मद्रास येथे एका शाळेने काही अस्पृश्य विद्यार्थ्यांना प्रवेश दिला. त्याबरोबर स्पृश्य जातीच्या मुलांनी अस्पृश्यांचा विटाळ होण्यापेक्षा शाळाच सोडलेली बरी, असे म्हणून शाळेला रामराम ठोकला. या चाळीस मुलांपैकी वीसजण माफी मागून परत शाळेत आले. सरकारने खंबीर धोरण ठेवले म्हणूनच हे विद्यार्थी नमले आणि ह्या प्रकरणामुळे उद्भवलेला क्षोभ शांत झाला.

अठराशे बावन्नच्या पूर्वार्धात बिल्वर जातीच्या विद्यार्थ्यांनी मंगलोर येथील न्यायालयात नोकरीसाठी अर्ज केले. बिल्वर ही कर्नाटकातील अगदी हीन गणलेली जात. या घटनेच्या अगोदर दोन वर्षे फिनले अंडरसन नावाच्या मुख्य न्यायाधिशाने घोषणा केली होती की, यापुढे शिक्षण हीच नोकरीची कसोटी मानण्यात येईल. त्याप्रमाणे बिल्वर जातीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यात आली. त्यांचे वाचन ठीक होते. त्यांनी केलेले भाषांतरही चांगले होते. त्या बिल्वर जातीच्या मुलांची न्यायालयात उमेदवार म्हणून नेमणूक झाली. तिथे ते न्यायालयातील कामकाज शिकू लागले. त्याबरोबर न्यायलयातील त्यांच्या उपस्थितीबाबत विरोधाची वावटळ उठली.

मुख्य न्यायाधिशाने दोन वर्षांपूर्वी जेव्हा ती घोषणा केली होती, तेव्हा ब्राह्मणांनी तात्त्विकदृष्ट्या तिचा स्वीकार केला होता. परंतु आता बिल्वर जातीच्या उमेदवारांना न्यायालयात प्रत्यक्ष पाहताच, त्यांचे पित्त खवळले. अत्यंत प्रिय अशा आपल्या मक्तेदारीला आपण मुकलो हे पाहून त्यांच्या अंगाचा तिळपापड झाला. जर बिल्वर उमेदवारांपैकी पुढे एखादा आपला अधिकारी झाला, तर आपल्याला त्याच्या हाताखाली काम करणे ही अत्यंत लज्जास्पद गोष्ट होईल आणि त्याचा विटाळही होईल, असे ते ब्राह्मण म्हणू लागले. यास्तव ब्राह्मण कारकुनांनी अंडरसनकडे निवेदन धाडून आपले गाऱ्हाणे मांडले; परंतु ते त्यांनी फेटाळले. त्यावेळचे मद्रासचे इंग्रज राज्यपाल सर हेन्री पॉटिंजर यांच्याकडे त्यांनी पुनर्विचारासाठी अर्ज पाठविला. पॉटिंजर साहेबांनीही अंडरसन यांचाच निर्णय उचलून धरला व अंडरसन यांचे त्या बाबतीतले धोरण स्तुत्य आहे, असा निकाल लावला.[२१]

इंग्रज राजवटीच्या आरंभी जिल्हा न्यायालयांतून अस्पृश्यांना अमानुष वागणूक देण्यात येत असे. त्यांची अशीच मानखंडना होत असे. न्यायाधिशाच्या पुढे जमिनीवर ब्राह्मण बसत असत. त्यांच्या पाठीमागे शूद्र बसत. अतिशूद्र खिडकीजवळ किंवा

२१. Friend of India, 26 January 1854.

दरवाजाजवळ उभे राहत व तेथून न्यायाधिशाच्या प्रश्नांचे उत्तर देत. ही रूढी ब्रिटिशांनी मोडून टाकली. गोमांसभक्षक युरोपियन अधिकाऱ्यांनी महारमांगांना आपल्या समोर उभे राहण्याची परवानगी दिली. जातीनियमांची तमा त्यांनी बाळगली नाही. बिचाऱ्या सोवळ्या ब्राह्मणांनी मोठ्या खुशीने त्या गोष्टीस मान तुकविली. ब्राह्मणेतरांना अनेक वर्षे हा विरोध उच्चवर्गीय सुशिक्षित लोकांकडून होत होता, तरी त्याची धार बोथट झाली नव्हती. धाकजी दादाजी हे मुंबई नेटीव एज्युकेशन सोसायटीचे सभासद असताना, त्यांनी शूद्रांच्या मुलांना शाळेतून कसे हाकलून दिले याविषयी माहिती पूर्वी दिली आहेच.

कनिष्ठ वर्गाच्या शिक्षणाला होत असलेल्या या विरोधाचे प्रतिध्वनी हंटर शिक्षण-मंडळाच्या वृत्तांतातही उमटले. म. मो. कुंटे ह्या नाणावलेल्या ब्राह्मण पंडिताने हंटर शिक्षणमंडळापुढे साक्ष देतांना आपले मत असे व्यक्त केले की, 'महारधेड यांना शाळेत प्रवेश मिळावा हा प्रश्न स्वतः महारांनी आणि धेडांनी उपस्थित केलेला नाही. त्यांत काही सत्य नाही. तो प्रश्न व्यवहाराला सोडून आहे. भावनाप्रधान इंग्रज अधिकारी आणि अव्यवहारी देशी सुधारक यांची ही निराधार चळवळ आहे.' कुंटे हे सनातनी ब्राह्मण-सुधारक असल्यामुळे त्यांनी हे सहानुभूतिशून्य विचार बिनधोकपणे मांडले हे सांगावयास नकोच.

'गुलामगिरी' ह्या ग्रंथामध्ये जोतीरावांनी म्हटले आहे की, "सर्व भटपंतोजी असे म्हणतात की, अतिशूद्रांची मुले शाळेत घेतल्याबरोबर हिंदुस्थानात मोठा धिंगाणा होईल. आणि म्हणूनच सरकार भिते."

•५•

ही समतेची क्रांती सामाजिक व्यवहारामध्येसुद्धा घडून येत होती. दादोबा पांडुरंग यांनी महाराष्ट्रात सामाजिक समतेच्या विचाराला जोराने चालना दिली होती. न्यायमूर्ती रानडे यांच्या मते धार्मिक आणि तात्त्विक विचारांचे मंथन करणाऱ्या श्रेष्ठ पुरुषांच्या मालिकेत दादोबांचे स्थान प्रमुख होते. दादोबांची बायबलवर अतिशय भक्ती होती. खिस्ती धर्माचा अभ्यास करणे हा त्यांच्या आयुष्यातील एक छंदच होता. परंतु नंतर त्यांनी खिश्चन धर्मतत्त्वाविषयी आणि त्याच्या उत्पत्तीविषयी निःसंदिग्धपणे मतभेद व्यक्त केले.

दादोबांनी दुर्गाराम मंछाराम मेहता नावाच्या एका गुजराथी शिक्षकाच्या साहाय्याने सुरत येथे १८४४ साली 'मानवधर्म' सभा स्थापन केली होती. दादोबा हे मोठे ज्ञानी पुरुष असून सामाजिक क्षेत्रातील एक मोठे विचारवंत होते. त्यांनी १८४८ साली परमहंस सभा स्थापन केली. परमहंस सभेचे कार्य गुप्तपणे चाले. तिचे अध्यक्ष राम बाळकृष्ण जयकर होते. हे राम बाळकृष्ण जयकर एका माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक होते. शेवटी ते कस्टम खात्यात सहायक नियुक्ताच्या पदापर्यंत चढले.

ह्या परमहंस सभेचे सभासद शेणवी, सोनार, ब्राह्मण, भंडरी, प्रभू इत्यादी जातींचे तरुण असत. त्यांचा भरणा एल्फिन्स्टन संस्था, ख्रिस्तीशाळा आणि सरकारी कचेऱ्या यांतून होत असे. ही एकेश्वरी संस्था होती. देवाचे पितृत्व आणि मनुष्याचे बंधुत्व यांवर तिचा दृढ विश्वास होता. प्रार्थनेसाठी दर आठवड्याला त्यांच्या सभा होत असत.

ह्या संस्थेची झपाट्याने वाढ झाली. तिचे जवळ जवळ एक हजार सभासद होते. तिचे मुख्य उद्दिष्ट जातीसंस्थांचे निर्मूलन करणे, बालविवाहाला विरोध करणे, विधवा विवाहाला चालना देणे आणि हिंदू समाजामध्ये दुसऱ्या निरनिराळ्या सामाजिक सुधारणा करणे, हे होते. त्या संस्थेच्या शाखा पुणे, नगर, सातारा, धारवाड, बेळगाव आणि कलकत्ता येथे होत्या. या संस्थेचा उद्देश आणि वर्तणूक सामाजिकदृष्ट्या काहीशी क्रांतिकारक असल्यामुळे समाजात बरीच मोठी खळबळ उडाली होती. तिचे सभासद युरोपियनांनी केलेला पाव खात असत. ते जातिबंधने पाळीत नसत. म्हणून त्यांचा हिंदुधर्माचे शत्रू असा धिक्कार करण्यात येई.

परमहंस संस्थेचे सभासद वाईट आचरणाचे आणि दुराचारी नाहीत, अशी प्रभाकर साप्ताहिकाच्या संपादकांनी लोकांना ग्वाही दिली होती. स्टूडंट्स लिटररी ॲण्ड सायंटिफिक सोसायटीचे जे सभासद परमहंस सभेचे सभासद झाले होते असा संशय आला त्यांना स्टूडंट्स लिटररी ॲण्ड सायंटिफिक संस्थेच्या चालकांनी आपल्या संस्थेतून काढून टाकले होते. परमहंस सभेच्या सभासदांची यादी कोणीतरी लांबविली आणि त्यामुळे सभासदांमध्ये एकच गोंधळ झाला. आणि ती सभा मोडून पडली. तिचे अस्तित्व १८६० च्या दरम्यान संपले. 'बॉंबे गार्डियन'मध्ये एका टीकाकाराने म्हटले आहे की, 'परमहंस सभेच्या बैठकीत खरी कळकळ नसते. त्यांचे ध्येय समाजाचे कल्याण करण्याचे नसून युरोपियन लोकांत प्रतिष्ठा मिळविणे आणि एतद्देशीय लोकांत प्रसिद्धी मिळविणे हेच होते.'[२२]

जोतीराव शाळांच्या सभेच्या शेवटी प्रार्थना करीत असत. केशवराव भवाळकरांसारख्या परमहंस सभेच्या सभासदांशी त्यांचे निकटचे संबंध होते. पुढे जोतीरावांनी आपला शिवाजीवरील पोवाडा परमहंस सभेचे अध्यक्ष राम बाळकृष्ण ह्यांना अर्पण केला. ह्यावरून असे अनुमान काढावयास हरकत नाही की, जातपाततोडक आणि एकेश्वरी मताच्या परमहंस सभेचे तिच्या आरंभीच्या काळात ते सभासद असण्याचा संभव आहे. वरील गोष्टी ह्या त्या नात्याच्या निदर्शक असाव्यात.

## .६.

याच काळात ख्रिस्ती धर्माचे हिंदू समाजावर आस्ते आस्ते आक्रमण सुरू झाले होते. इंग्रज सरकारने ईस्ट इंडिया कंपनीस हिंदुस्थानचा राज्यकारभार चालविण्यासाठी

---

२२. The Bombay Guardian, 31 October 1851.

१८१३ साली जी नवीन सनद दिली होती, तीत एका कलमान्वये धर्मप्रचार करण्यास मोकळीक दिली होती. आपल्या सत्तेविषयी धार्मिक संबंधात काही अपसमज होऊ नये म्हणून खिस्ती धर्मोपदेशकांना ह्यापूर्वीच्या काळात धर्मप्रचारास इंग्रज सरकारने अनुमती दिली नव्हती. ड्यूक ऑफ वेलिंग्टन, एलेनबरो आणि माऊंट स्टयूअर्ट एल्फिन्स्टन ह्यांसारख्या महाधोरणी मुत्सद्दयांना मिशनऱ्यांच्या धर्मप्रसारामुळे हिंदू लोक बिथरतील अशी भीती वाटे. अठराशे तेरासालच्या सनदेनुसार ब्रिटनमधील खिस्ती धर्मोपदेशकांना हिंदुस्थानात धर्मप्रसार करण्याची परवानगी मिळाली तर १८३३ सालच्या सनदेनुसार सर्व जगातील खिस्ती धर्मोपदेशकांना धर्मप्रसारास हिंदुस्थान खुला करण्यात आला.

नवविचाराचा, पाश्चात्त्य नवज्ञानाचा आणि खिस्ती धर्मोपदेशकांच्या आक्रमक विचारांचा परिणाम पहिल्या नवशिक्षित पिढीवर होऊ लागला होता. त्यांच्या मतांचा नि प्रचाराचा प्रभाव पडू लागल्यामुळे नवशिक्षितांतील काही जणांची मती गुंग झाली. पुढे त्यांच्यापैकी काहींनी हिंदुधर्मावर शस्त्र उपसले. अठराशे एकतीस साली कलकत्त्यांतील अशा नवशिक्षित विद्यार्थ्यांनी तर हिंदुधर्माच्या नावाने शिमगा केला. तेथील हिंदु-महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी हिंदुधर्मावरील आपला रोष बेफामपणे व्यक्त केला. काहींनी तर उपहासपर काव्य रचून पवित्र मंत्रांचे विडंबन केले; तर काहींनी पवित्र मानलेली आपली यज्ञोपविते तोडून टाकली. काही बेफाम झालेल्या विद्यार्थ्यांनी भाजलेल्या गोमांसावर ताव मारला आणि उरली सुरली हाडे ब्राह्मणांच्या घरांत फेकली. हे भयंकर दृश्य पाहून कलकत्त्यातील हिंदू भयभीत झाले.

खिस्ती धर्मप्रचाराच्या आक्रमक धोरणामुळे काही नवशिक्षित, भावनाप्रधान तरुणांनी चुकीच्या धर्मकल्पनांपायी खिस्तीधर्म स्वीकारला. त्या काळी धर्मांतराच्या प्रश्नाने कसे गंभीर रूप धारण केले होते, हे खालील प्रकरणांवरून दिसून येईल.

धनजीभाई नवरोजी ह्या पारशी गृहस्थाने १ मे १८३९ रोजी खिस्तीधर्म स्वीकारला. त्यामुळे मुंबईतील पारशी समाजात फारच मोठी खळबळ उडाली. हे प्रकरण मुंबईच्या सर्वोच्च न्यायालयात गाजले. आपल्या धर्मांतराच्या वर्षश्राद्धाच्या दिवशी दोन घेडांना खिस्तीधर्माच्या जाळ्यात ओढल्याविषयी हा नतभ्रष्ट गृहस्थ स्वतःस भाग्यवान समजत होता ! तशाच प्रकारचे दुसरे प्रक्षोभक प्रकरण म्हणजे नारायण शेषाद्री ह्याचे धर्मांतर. ह्या तरुणास खिस्ती धर्मोपदेशकांनी १३ सप्टेंबर १८४३ रोजी बाप्तिस्मा दिला. हा नारायण शेषाद्री हैद्राबाद संस्थानातील परळीचा देशस्थ ब्राह्मण. त्याचे शिक्षण एका स्कॉटिश मिशनरी शाळेत झाले होते. नारायण शेषाद्री याचा धाकटा भाऊ श्रीपत त्याच्याबरोबर राहत होता. बाटलेल्या बंधूबरोबर तो राहत असल्यामुळे त्याचे वडील शेषाद्री गोविंद परळीकर यांनी त्याला आपल्या स्वाधीन करावे असा हट्ट धरला. शेवटी ते प्रकरण न्यायालयात प्रविष्ट झाले.

सर हेन्री रोपर हे त्यावेळचे मुंबईच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश होते. श्रीपतला त्याच्या बापाच्या स्वाधीन करावे, असा ९ नोव्हेंबर १८४३ रोजी त्यांनी

निर्णय प्रकट केला. ख्रिस्त्यांच्या संगतीत आणि पंगतीत तो बाटला असल्यामुळे त्याला परत शुद्ध करून हिंदुधर्मात घेण्याचा प्रश्न उद्भवला. हिंदुसमाजातील नेत्यांमध्ये या प्रश्नावर चांगलेच वादंग माजले. सनातनी पुढारी श्रीपतला हिंदुधर्मात परत घ्यायला विरोध करू लागले. मुंबईतील समाजसुधारकांचे नेते बाळशास्त्री जांभेकर आणि नाना-शंकरशेट यांनी श्रीपतला हिंदुधर्मात घेण्याविषयी आटोकाट प्रयत्न केले. काशीतील पंडितांकडून अनुकूल असे शिफारसपत्र आणण्याविषयी श्रीपतला त्यांनी काशीला पाठविले होते. परंतु ते सर्व प्रयत्न निष्फळ ठरले.

बाळशास्त्री जांभेकर आणि दुसरे कित्येक सुधारकांचे नेते यांना सनातन्यांनी दे माय धरणी ठाय करून सोडले. त्यामुळे ज्यांनी ज्यांनी श्रीपतला हिंदुधर्मात घ्यावे असा प्रचार केला होता, त्यांनी त्यांनी आपल्यावर पश्चात्ताप करण्याचा प्रसंग ओढवून घेतला. बाळशास्त्री जांभेकर यांचेही धैर्य गळले. शेवटी त्यांनीही मृत्यूपूर्वी प्रायाश्चित्त घेतले. या प्रकरणात पुण्याच्या सनातनी ब्राह्मणांनी या सुधारणावादी विचारवंतांची चांगलीच त्रेधा उडवली होती. पुण्याच्या सनातन्यांच्या निर्णयाप्रमाणे त्या सर्व समाज सुधारकांना गोमूत्र आणि पंचगव्य देण्यात आले. त्यांचे क्षौर करण्यास भाग पाडण्यात आले. अशा रीतीने शेषाद्री प्रकरणाचा शेवट झाला. हा धार्मिक संस्कार करवून घेण्यात त्यांचा सर्व रोख सुधारकांचे अग्रणी बाळशास्त्री जांभेकर यांच्यावरच होता. जेव्हा तो उदारमतवादी आणि थोर ज्ञानी पुरुष निधन पावला तेव्हा आपल्या शापामुळेच बाळशास्त्री अकाली मृत्यू पावला, असे सनातनी ब्राह्मणांनी त्या वेळी मिशाला पीळ देऊन उद्‌गार काढले.

परंपरेशी द्रोह करणाऱ्यांची शुद्धी करण्याची आणि स्वर्गाची दारे हिंदुधर्मीयांना उघडी करण्याची किल्ली ब्राह्मणांच्या हाती असल्यामुळे त्यांच्या शास्त्रांचा अर्थ देणगीच्या आकारानुसार बदलत जात असे. राघोबादादा पेशव्याने आबा काळे नावाच्या गृहस्थांना लंडनला पाठविले होते. आबा काळे परत आल्यानंतर त्याच्यावर सामाजिक बहिष्कार पडला नाही; इतकेच नव्हे तर, आबा काळ्यांच्या मुलीचा विवाह बाळाजीपंत नातू यांच्या मुलाशी झाला. गणेश सीतारामशास्त्री गोळवलकर हे लंडनहून परत आल्यावर होळकर महाराजांनी त्यांना राजवाड्यावर भोजनासाठी आमंत्रिले. गोळवलकर शास्त्र्यांवर सामाजिक बहिष्कार टाकण्यात आला नाही. ब्राह्मणांना मोठी देणगी मिळताच दोषांचे परिमार्जन झटकन होई.

श्रीपत शेषाद्री याच्या प्रकरणानंतर पाच वर्षांनी पुण्यातील काही ब्राह्मणांनी एका ब्राह्मणाकडून मोठी देणगी उपटून त्याला शुद्ध करून घेतले. त्याचा दोष असा होता की, एका अस्पृश्य बाईशी त्याने संसर्ग केला होता. परंतु ज्या ब्राह्मणांना दक्षिणेचा वाटा मिळाला नव्हता त्यांची माथी भडकली. त्यांनी उपरोक्त शुद्धीसमारंभ करणाऱ्या ब्राह्मणांना त्रास दिला. यावरून असे सिद्ध होते की, ब्राह्मणांनी धर्म, चालीरीती आणि परंपरा यांचा उपयोग स्वार्थासाठीच केला. अशा तिरस्करणीय चालीरीतींचा जोतीरावां-च्या मनावर अतिशय भयंकर परिणाम झाला होता. वास्तव त्यांनी भटशाही आणि

ब्राह्मणीधर्म ह्यांवर टीकास्त्र सोडावयास सुरुवात केली होती. उपरोक्त दोन्ही प्रकरणे पुण्यात चांगलीच गाजली होती.

श्रीपत शेषाद्रीप्रकरणासारखी प्रकरणे भारताच्या अनेक प्रांतांत होऊ लागल्यामुळे त्यांचे पडसाद भारतात उठू लागले. कलकत्त्यातील ब्राह्मणांनी २५ मे १८५१ रोजी कलकत्त्यात एक मोठी सभा भरविली. त्या सभेपुढे प्रश्न असा होता की, जर एखाद्या हिंदूने अभक्ष्य खाल्ले तर त्याची शुद्धी करून परत त्याला जातीत घ्यावे की न घ्यावे. अशा मनुष्यास जातीत घ्यावे असे जमलेल्या पंडितांचे बहुमत पडले. चर्चेसाठी दुसरा प्रश्न असा निघाला की, जर अशा माणसास परत जातीत घेण्याचे ठरले तर त्याला प्रायश्चित्त देण्याची पद्धत कोणती असावी. ह्या प्रश्नाचे उत्तर त्या पंडितांनी असे दिले की, काही शेकड्याने गाई दिल्या असता त्याच्या पापाचे परिमार्जन होईल.

'कलकत्त्यामधील ह्या निर्णयाचा अर्थ असा झाला की, पापाचे परिमार्जन केवळ पैशानेच होते. त्याला दुसऱ्या कसल्याही तऱ्हेची शिक्षा नको. जरी बहिष्कृतांनी गोमांस खाल्ले, तरी त्यांच्या पापांचे परिमार्जन ब्राह्मणांना गाई दिल्या म्हणजे होते.' असे 'बॉम्बे गार्डियन' या इंग्रजी वर्तमानपत्राने त्या निर्णयावर टीका करताना म्हटले आहे.[२३]

विचारवंत, उदारमतवादी आणि देशाभिमानी लोक अशा वेड्या आणि बेफाम झालेल्या अतिरेकी तरुणांना हिंदुधर्मात कसे अडकवून ठेवावे याविषयी विचार करू लागले. त्यांनी कलकत्ता येथे १८५२ च्या ऑगस्ट महिन्यात अशा धर्मभ्रष्ट लोकांची मुक्ती कशी करावी याचा विचार करण्यासाठी एक संस्था स्थापन केली. शास्त्रात सांगितल्याप्रमाणे काही धार्मिक संस्कार करून समाजात या धर्मभ्रष्टांना पुन्हा प्रवेश द्यावा, हाच त्या संस्थेचा मुख्य उद्देश होता.

धर्मांतराचे तिसरे गाजलेले प्रकरण महाराज धुलीपसिंगांचे. भारतातील खिस्ती लोकांनी धुलीपसिंगांच्या धर्मांतराच्या घोषणेने हिंदुस्थान दुमदुमवून सोडला. महाराज धुलीपसिंग यांचा जन्म १८३७ त झाला. आणि त्यांनी धर्मांतर केले तेव्हा त्यांचे वय जेम तेम सोळा वर्षांचे होते. तरीसुद्धा असे प्रसिद्ध करण्यात आले की, खिस्तीधर्म स्वीकारण्यासाठी त्यांना मथविण्यात आलेले नाही किंवा भिवविण्यात आलेले नाही. त्याच वेळी दुसऱ्या एका व्यक्तीच्या धर्मांतराचे पडसाद सर्व भारतात उठले. त्या व्यक्तीचे नाव ज्ञानेंद्र मोहन टागोर! राममोहन रॉय यांचे स्नेही प्रभाकरकुमार टागोर यांचे ते चिरंजीव.

बाबा पदमनजी मुळे ह्या नावाचे एक तेवीस वर्षांचे कासार जातीचे तरुण होते. ते एक बुद्धिमान नि उद्योगशील विद्यार्थी होते. स्पष्टोक्ती व ज्ञानसंपादण्याचा उत्साह ह्या गुणांमुळे त्यांनी आपल्या खिस्ती गुरुजनांचे लक्ष वेधून घेतले होते. परमहंस सभेचीही त्यांना ओळख झालेली होती. परंतु त्यांना असे आढळून आले की, 'माझ्या अमर आत्म्याचे समाधान करण्यासारखे परमहंस सभेत काही नाही. मृत्यूनंतर जीवनातील

२३. The Bombay Guardian, 13 June 1851.

शांतता ती देईल अशी मला खात्री वाटत नाही. त्या संस्थेचा नियम असा होता की, धार्मिक मते कशीही असली तरी त्या संस्थेत प्रवेश मिळतो.'

मुंबई हे त्या वेळी भारतातील खिस्ती लोकांचे एक महान केंद्र बनले होते. तेथील मिशनऱ्यांच्या मार्गदर्शनामुळे आणि उपदेशामुळे बाबा पद्मनजी ह्यांनी शेवटी ३ सप्टेंबर १८५४ रोजी खिस्तीधर्म स्वीकारला. डॉ. जॉन विल्सन यांच्या प्रभावी आणि निर्भय व्यक्तित्वामुळे मुंबईतील खिस्ती केंद्राचा सर्व भारतात बोलबाला झाला होता. बाबा पद्मनजी यांनी जरी खिस्तीधर्म स्वीकारला, तरी आपली बुद्धी आणि कर्तृत्व ही आपल्या मातृभूमीच्या कल्याणासाठी व्यतीत करू अशी त्यांनी ग्वाही दिली होती. बाबा पद्मनजींचे धर्मांतर म्हणजे खिस्तीधर्माच्या वृक्षावर विराजमान होऊ इच्छिणाऱ्या एका तत्त्वचिंतक मनाचा पराभव होय. त्या पराभूत मनाची दृष्टी आणि पराक्रम यांचे पंख कापले गेले होते. बाबा पद्मनजी पुढे जोतीरावांचे स्नेही आणि चाहते झाले. बाबा पद्मजींनसारख्या व्यक्तींनी धर्मांतर केले. परंतु जोतीराव आपल्या तत्त्वाशी अचलपणे आणि धैर्यशालीपणाने एकनिष्ठ राहिले.

शिक्षणप्रसाराच्या द्वारे खिस्तीधर्माचे गोडवे गाऊन धर्मांतराचे जाळे पसरीत राहाव-याचे हे खिस्तीधर्मोपदेशकांचे अंतरंग इंग्रज मुत्सद्दी पूर्णपणे जाणत होते. लॉर्ड एलेनबरो यांनीसुद्धा स्पष्ट म्हणून टाकले आहे की, 'शिक्षणप्रसार करण्यात मिशनऱ्यांचा खरा हेतु लोकांना बाटविणे हाच असतो. खिस्ती मिशनरी शिक्षण देतो त्याचे कारण शिक्षण देता देता खिस्तीधर्मप्रसार करण्यास अप्रत्यक्षपणे साह्य होईल अशी त्याला आशा असते हे होय.' लॉर्ड एलेनबरो यांनी ईस्ट इंडिया कंपनीच्या कार्यकारी मंडळाला एकदा अशी धोक्याची सूचना दिली की, 'मिशनरी शाळांना आपण साह्य केले तर भारतातील शिक्षणप्रसारास धोका निर्माण होईल; एवढेच नव्हे तर, साम्राज्यालाही धोका पोचेल.'[२४]

उलटपक्षी, खिस्तीधर्माच्या प्रसारामुळे इंग्रजांची राज्यसत्ता बळकट होईल, असे मिशनऱ्यांचे म्हणणे होते. रे. डॉ. जॉन विल्सन, प्राध्यापक हेंडरसन, रॉबर्ट कॉटन मनी ह्यांसारखे कडवे खिस्ती धर्मवीर शिक्षणप्रसाराच्या द्वारे खिस्तीधर्माचे पोवाडे गाऊन धर्मप्रसार करण्यात दंग असत. हिंदुसमाजाच्या तटबंदीला खिंडार तर पडावे नि आपण निधर्मी तर दिसावे, ह्या अधर्मी हेतूने १८५० साली हिंदी सरकारने 'कोणीही धर्मांतर केले असता त्याचे हक्क बुडत नाहीत,' असा निर्बंध केला. खिस्तीधर्मप्रसाराला पोषक असलेल्या ह्या निर्बंधाचे वर्णन 'धर्मस्वातंत्र्याची एक मोठी सनद' असे धूर्त इंग्रजांनी त्या वेळी केले.

त्या काळात जोतीराव मिशनऱ्यांच्या निकट सहवासात न आल्यामुळे त्यांना त्यांच्या पोटातील ह्या ना त्या मार्गाने धर्मांतर घडवून आणण्याचा कावा प्रारंभी उमगला नव्हता.

---

२४. Report of the Director of Public Instruction, 1957-58, pp. 11-12.

कारण ख्रिस्ती धर्मोपदेशकांचा स्फूर्तिदायक, निष्ठापूर्ण सेवाभाव आणि भारतीयांना शिक्षण देऊन देशातील अज्ञान दूर करण्याचे त्यांनी चालविलेले प्रयत्न ह्यांचा त्यांच्या मनावर बराच प्रभाव पडला होता. ह्या काळात जोतीराव केवळ शिक्षणक्षेत्रातच वावरत होते. परंतु त्यांच्या विवेकी अन् विश्लेषणप्रधान दृष्टीतून ख्रिस्ती धर्मोपदेशकांचे कावे सुटले नसावे. कारण त्यांनी पुढे आपल्या परिचितांपैकी काहींना धर्मांतरापासून परावृत्त केले.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

# ७

## प्राणावरील प्रसंग

जोतीरावांनी स्थापन केलेल्या शाळांची प्रगती होत होती. शाळेतील मुलांसाठी शिक्षणाची साधने संपादन करण्यासाठी त्यांनी फार मोठी धडपड केली. त्यांना शाळांत जे यश मिळाले होते त्यातच त्यांच्या भावी यशाची बीजे होती. मुलींच्या शाळांची १२ फेब्रुवारी १८५३ रोजी मोठ्या लोकसमुदायासमोर तपासणी झाली. त्या दिवशी सायंकाळी मोठे मनोहर आणि स्फूर्तिदायक असे दृश्य दिसले. पुणे महाविद्यालयाचा सभामंडप सुशोभित करण्यात आला होता. सतरंज्या, गालिचे आणि बैठका, कोच आणि खुर्च्या यांनी सभामंडप भरून गेला होता. सभामंडपावरील महाविद्यालयाच्या खिडक्या प्रेक्षकांनी भरून गेल्या होत्या. पुण्यात एवढी मोठी सभा कधी भरली नव्हती. मुलींच्या परीक्षेचा तो सोहळा पाहण्यासाठी तीन हजारांच्या आसपास जनसमुदाय जमला होता.

त्या समारंभास मोठमोठी प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होती. ब्रिगेडीयर ट्रायडेल व जोतीरावांच्या शाळेची आश्रयदाती असलेली त्यांची पत्नी, इ. सी. जोन्स, पुणे महाविद्यालयाचे प्राचार्य मेजर कँडी, प्राध्यापक फ्रेझर, सरदार अप्पासाहेब ढमढेरे, प्राध्यापक केरो लक्ष्मण छत्रे, प्राध्यापक कृष्णशास्त्री चिपळूणकर, जगन्नाथ सदाशिवजी, बापूराव मांडे इत्यादी उपस्थित होते. बापूराव मांडे यांनी पुण्यातील स्त्रीशिक्षणाच्या परिस्थि-

तीची कल्पना देणारे वार्षिक इतिवृत्त वाचले. त्यांनी शाळेची स्थापना आणि तिचा विकास यांचा धावता आढावा घेऊन स्त्रियांचा धर्मभोळेपणा आणि त्यांचे अज्ञान यांची बंधने तोडून त्यांना स्वातंत्र्य देणे हा या शाळांचा हेतू आहे, असे जाहीर केले. देशबांधवांची सुधारणा व्हावी, त्यांची प्रगती व्हावी, त्यांच्यात ज्ञानाचा प्रकाश पडावा यासाठी स्त्रीशिक्षणाची सर्वप्रथम आवश्यकता आहे असे वाटल्यावरून कार्यकर्त्यांनी हे काम सुरू केले, असे त्या इतिवृत्तात म्हटले होते.

"काही थोड्या स्थानिक गृहस्थांनी १८५१ सालच्या जुलईत मुलांची पहिली शाळा पुण्यात काढली. शाळेच्या यशाकरिता आवश्यक असणाऱ्या गोष्टींची व्यवस्था करण्यासाठी व दुसरी शाळा त्वरित काढण्यासाठी अनेक लोकांचे साह्य कारणीभूत झाले आहे. नामदार अर्स्किन पेरी यांनी उदार हृदयाने योग्यवेळी साह्य केले. असा हा परोपकारी बुद्धीचा आणि हिंदूंचा हितचिंतक परदेशी गेला. त्यांची अनुपस्थिती आम्हां सर्वांना जाणवत आहे. शाळेतील पटसंख्या गेल्या परीक्षेच्या दिवशी म्हणजे १७ फेब्रुवारी १८५२ रोजी ५० च्या आसपास होती. त्या वेळी मुलींनी दाखविलेली प्रगती, ह्याच वेळी मुलांच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रगतीपेक्षा बरीच वरच्या दर्जाची होती. त्यासाठी शिक्षकांनी केलेले परिश्रम पूर्णपणे प्रशंसेस पात्र ठरले. ज्या मुलींची गेल्या वर्षी परीक्षा झाली त्या मुली शाळेच्या आरंभापासूनच त्या शाळेत शिकत होत्या."

"आम्ही स्वाभिमानाने, आनंदाने इतके सांगितले म्हणजे पुरे की, निस्वार्थी बुद्धीने आणि देशाभिमानाने केलेल्या या खटपटीची सरकारने दखल घेतली. आणि ह्याच सभामंडपात जाहीररीत्या थोड्याच दिवसांपूर्वी जोतीरावांना सरकारने एक शालजोडी अर्पण केली. जोतीराव व त्यांचे सहकारी केशवराव, जगन्नाथजी आणि अण्णासाहेब चिपळूणकर या सर्वांना मुलींची शाळा स्थापन करण्याचे श्रेय आहे."

"काही स्थानिक गृहस्थांकडून शाळेला आरंभी विरोध झाला. आपल्या देशातील स्त्रियांच्या परिस्थितीत परिवर्तन घडवून आणण्याच्या कार्याला आणि उद्देशाला त्यांनी विरोध केला. परंतु शाळेचे संस्थापक आणि हितचिंतक ह्यांनी आपल्या बाणेदार वर्तनाने तो विरोध काही प्रमाणात मोडून काढला. आणखी असे की, काही सद्गृहस्थांनी व स्त्रियांनी शाळांना सढळ हाताने साह्य केले, त्यांना वारंवार भेटी दिल्या आणि शाळांच्या कार्याविषयी बरेच अगत्य दाखविले. त्यामुळे शाळांचे विरोधक त्यांच्या कामात अडथळा आणण्यास धजले नाहीत."

"मुलींचे शिक्षण म्हणजे त्यांना लिहिता वाचता येणे एवढीच एतद्देशीय लोकांची कल्पना असल्यामुळे त्यांचा विरोध हळूहळू कमी होऊ लागला. तसेच घरकामाच्या वेळी मुलींचा त्रास कमी होऊ लागला असे मातांना वाटू लागले. कारण मुलींना शाळेत पाठविले म्हणजे त्यांचा तो त्रास आपोआप कमी होई. मुलींच्या अंगावर दागिने असल्यामुळे जे शिपाई मुलींना नेण्या-आणण्याचे काम करीत, त्यांची आस्था, त्यांचा प्रामाणिकपणा व त्यांची सभ्य वागणूक ह्यांमुळे बऱ्याच अडचणी दूर झाल्या. शिवाय शिक्षक मंडळी वात्सल्यपूर्वक

अन् कळकळीने शिकवीत असल्यामुळे मुलींनाही शाळांची ओढ लागलेली असे. त्या आनंदाने शाळेत धावत येत असत." मुलींच्या शिक्षणाच्या कार्यात ज्या अडचणी येतात त्याविषयी ह्या इतिवृत्तात असे म्हटले होते की, बऱ्याच वेळा असे घडे की मुलींची लग्ने झाल्यावर, त्यांच्या सासू-सासऱ्यांच्या लहरी त्यांच्या शिक्षणाच्या आड येत. स्त्रिया आपल्या सुनांस पुढे शिक्षण चालू ठेवण्यास संमती द्यावयास तयार नसत.

"ह्यावरून असे दिसून येईल की, मुलींचे लहान वयात लग्न करण्याच्या चालीचा या देशातील स्त्रीशिक्षणाला कडवा विरोध होत आहे. आणि त्या चालीपासून जे दुष्परिणाम होतात ते कमी करणे किंवा नाहीसे करणे हीच गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. गरीब आईबापांनी मुलींना शाळेत पाठवावे व सासू-सासऱ्यांनी त्यांना शाळेत जाण्याची परवानगी द्यावी म्हणून मुलींना काही मासिक विद्यावेतन देण्याची पद्धत सुरू करावी असा आमच्या संस्थेचा बेत आहे. हा एक खास उपाय आम्ही योजला आहे."

अण्णासाहेब चिपळूणकर हे मुलींच्या शिक्षणाच्या कार्यात मोठ्या आस्थेने व उत्साहाने भाग घेत. मुलींच्या शाळेसाठी त्यांनी मोठे धैर्य करून जागा दिली होती. त्यांनी या समारंभाच्या वेळी स्त्रीशिक्षणाच्या महत्त्वासंबंधी एक जोरदार भाषण केले. ते आपल्या भाषणात म्हणाले, "स्त्रियांनी विद्या शिकावी, अभ्यास करावा, आणि पुरुषांच्या बरोबरीने वागावे हा हिंदूंना अधर्म वाटतो. स्त्रियांनी शिकू नये, धर्मशास्त्राचा अभ्यास करू नये आणि पुरुषांच्या बरोबरीने राहण्याचा दर्जा संपादन करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगू नये, अशी आज्ञा काही प्राचीन शास्त्राधारे ते सांगत असतात. स्त्रियांनी निमूटपणे नि निष्ठेने नवऱ्याची आज्ञा पाळणे किंवा त्याची सेवा करणे हेच स्त्रीचे जीवितकार्य आहे असे त्यांना वाटते. हा त्यांचा समज अत्यंत चुकीचा आहे. माझा विश्वास आहे की, शिक्षणामुळे गृहकृत्ये उत्तम प्रकारे पार पाडण्यास स्त्रिया अधिक कार्यक्षम बनतील. मुलांचे संगोपन आणि त्यांच्या बुद्धीचा विकास करण्याचे कामी त्यांचे चांगले साह्य होईल."

अण्णासाहेबांनी सर्व उपस्थित पाहुण्यांचे आभार मानले. तसेच त्यांनी मुंबईच्या सर्वोच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश आणि शिक्षामंडळीचे माजी अध्यक्ष सर अर्स्किन पेरी यांनी लंडनला जाण्यापूर्वी संस्थेला पन्नास रुपयांची देणगी दिली त्याबद्दल त्यांचे विशेष आभार मानले. मुंबई सरकारचे सचिव जे. जी. लुम्सडेन आणि न्यायाधीश ब्राऊन यांनी प्रत्येकी १०० रुपयांची देणगी दिल्याविषयी त्यांचेही आभारमानले. कार्यवाहांनी तिन्ही शाळांतील पटसंख्या मागील वर्षी ९० होती ती आता सुमारे २७५ पर्यंत वाढल्याबद्दल आनंद प्रदर्शित केला. दक्षिणासमितीने मासिक ७५ रुपयांचे अनुदान दिल्याचेही जाहीर केले.

आपल्या भाषणात चिपळूणकर असेही म्हणाले की, "भारतातील स्त्रियांच्या शिक्षणासाठी युरोपियन लोकांनी सढळ हाताने देणग्या द्याव्या आणि सुशिक्षित श्रीमंत हिंदूंनी त्या प्रश्नांचा विचारही करू नये, ही मोठी लाजिरवाणी गोष्ट आहे. ह्या औदासिन्याविषयी त्यांना परमेश्वराकडून शासन घडेल. आपल्या नातवापणतवांचे भावी हित

लक्षात ठेवून मुलींच्या शिक्षणास साह्य करण्यासाठी त्यांनी पुढे यावे."

मेजर कँडींनी प्राध्यापक फ्रेझर यांना समारंभासाठी अगत्याने उपस्थित राहिलेल्या स्त्रियांचे आभार मानण्याची विनंती केली. प्रा. फ्रेझर म्हणाले, "स्त्रियांच्या शिक्षणासाठी सरकारने, मिशनऱ्यांनी आणि स्वतः देशी लोकांनी जे प्रयत्न चालविले आहेत त्यांनूनच भावी हिंदुस्थानच्या सामाजिक प्रगतीचा आणि कायम स्वरूपाच्या सुधारणेचा परमोच्च बिंदू गाठला जाईल. शिक्षणाने तुम्हांला जी अनिवार्य अशी वैयक्तिक आणि सामाजिक देणगी दिली आहे, त्याची तुम्हांला जाणीव आहे. मानवाची सुधारणा स्त्रियांच्या शिक्षणाच्या प्रगतीबरोबर पावले टाकीत असते. स्त्रियांच्या प्रगतीशी मानवजातीची प्रगती निगडित असते. जगातील ह्या मोठ्या सत्याविषयी तुम्ही अज्ञानी असू नये. मानवजातीच्या प्राथमिक सुधारणावस्थेत जी अस्थिरता होती, त्याला कारण गतकालीन मानवसमाजाकडून झालेली स्त्रियांची अवनती हे होय. ज्या समाजामध्ये स्त्रीला हीन आणि गुलाम समजण्यात येते त्या समाजाला कायम स्वरूपाची प्रगती करता येईल ही अशक्य गोष्ट आहे."[१]

## २

जोतीरावांच्या अतिशूद्रांच्या शाळेची परीक्षा २१ मार्च १८५३ रोजी झाली. ह्या परीक्षेविषयी 'बॉम्बे गार्डियन' पत्रात वृत्तांत देताना एक लेखक म्हणतो, "जोती गोविंदराव फुले या उत्साही आणि उदार अंतःकरणाच्या गृहस्थाने स्थापलेल्या अतिशूद्रांच्या शाळेची वार्षिक परीक्षा शुक्रवार पेठेतील पेशव्यांच्या तालीमखान्यात २१ मार्च १८५३ रोजी सकाळी ७ वाजता झाली. तो समारंभ पाहण्यासाठी प्रतिष्ठित लोकांचा बराच समुदाय प्रातःकाळी जमला होता. महारमांग मुलांमध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी जोतीरावांचे जे प्रयत्न चालले होते त्यांना कितपत यश आले आहे, हे पाहण्यासाठी ते उत्सुक होते.[२] उपस्थित मंडळीत अनेक प्रतिष्ठित एतद्देशीय कुलीन स्त्रिया आणि सद्गृहस्थ होते. त्यांत ब्रिगेडीयर ट्रायडेल यांची पत्नी श्रीमती कोलर्न, न्यायाधीश कीझ, सहायक न्यायाधीश लॉईड, पुणे महाविद्यालयाचे प्राचार्य मेजर कँडी, मिशनरी रे० जे० मिचल, पुण्याचे सिव्हिलसर्जन जे कीथ, सेनापती जेम्स यांचे शरीररक्षक कॅप्टन एच. गिल्मोहोर, प्रा० फ्रेझर, प्रा० नीलकंठ शास्त्री, प्रा० केरो लक्ष्मणशास्त्री, प्रि० सरदार अमीन, अण्णासाहेब चिपळूणकर, अण्णा सहस्रबुद्धे, वामनराव परांजपे, सदाशिव बल्लाळ गोवंडे, मोरो विठ्ठल वाळवेकर, सखाराम यशवंत परांजपे, बाळाजी मानाजी डेंगळे, कृष्णाजीपंत संरजामे प्रभृति व्यक्ती होत्या. अध्यक्षस्थानी न्यायाधीश कीझ हे होते.

---

१. Printed Report attached to G. D. Vol. 27 to 1853, pp. 1 to 10

२. The Bombay Guardian, 16 December 1853.

आरंभी जोतीराव फुले यांनी लिहून आणलेले निवेदन वामनराव परांजपे यांनी वाचून दाखविले. त्या निवेदनात आपण शाळेची स्थापना कशी केली, त्याची वाढ कशी होत गेली, याचा इतिहास जोतीरावांनी कथन केला होता.

जोतीराव हिशेब ठेवण्याचे काम अत्यंत सचोटीने करीत असत. त्यांनी आपल्या भाषणात ज्या उदार देणगीदारांनी महारमांगांच्या शाळेच्या कार्यात उत्साहाने सक्रिय भाग घेऊन साह्य केले होते, त्यांच्या नावांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला. त्यांपैकी बहुतेक जण युरोपियन अधिकारी होते. आवश्यक तेवढे आर्थिक साह्य न मिळाल्यामुळे आपल्या अपेक्षेप्रमाणे शाळेची प्रगती झाली नाही, असेही त्यांनी त्यात म्हटले होते.

वाचन, लेखन, अनुलेखन, व्याकरण, जगाचा सर्वसाधारण भूगोल, विशेषतः हिंदुस्थानचा भूगोल आणि मराठ्यांचा इतिहास हे विषय महारमांगांच्या शाळेत शिकवले जात. त्यावेळी लहुजीबुवा मांग नि राणबा महार यांनी शाळेत शिकण्यापासून कसकसे लाभ होतात हे आपल्या ज्ञातिबंधूंना समजावून सांगून त्यांची खात्री पटविली. तशी ती पटल्यामुळे शाळेत मुले आणण्याचे त्यांनी प्रयत्न केले व ते बरेच यशस्वी झाले. आपल्या निवेदनात जोतीराव पुढे म्हणाले, 'अनेकांनी उदार अंतःकरणाने दिलेल्या देणग्या, आणि वर्गण्या, दक्षिणा प्राईज समितीकडून सरकारने दिलेले साह्य आणि परमेश्वराचा आशीर्वाद ह्यांमुळे शाळा असंख्य अडचणीला तोंड देत देत आजपर्यंत चांगले काम करीत आली आहे. भावी काळातही ईश्वराने या कार्यांत यश द्यावे अशी मी नम्रपणे प्रार्थना करतो."[३]

"ज्या कुलीन स्त्रियांनी, सद्गृहस्थांनी नि एतद्देशीयांच्या हितचिंतकांनी शाळांना साह्य केले, त्यांचा आणि उपस्थित सज्जनांचा मी अत्यंत ऋणी आहे. उपस्थित सभ्य स्त्रिया आणि सद्गृहस्थ यांनी गुणग्राहकता दाखविल्यामुळे मुलांना आपला अभ्यास अधिकाधिक परिश्रमपूर्वक करण्यास प्रोत्साहन मिळेल. आपल्या उपकारकर्त्यांविषयी त्यांनी स्वतः परमेश्वराची प्रार्थना करण्याचा दिवस लवकरच उगवेल अशी मी आशा बाळगतो."

ह्या काळात सरकारी उच्च अधिकारी शाळांना भेटी देत असत. शिक्षणाच्या कार्यास चालना देण्यासाठी ते शिक्षकांना उत्तेजन देत असत. शिक्षामंडळीचे अध्यक्ष जॉर्ज वार्डन यांनी १८५३ च्या जून महिन्यातील शेवटच्या आठवड्यात जोतीरावांनी संस्थेच्या नेतृत्वाखाली चालविलेल्या मुलींच्या शाळांना भेट दिली. जोतीरावांच्या शाळांचा बराच नावलौकिक झाला होता.

आपल्या भाषणात जॉन वार्डन म्हणाले, "मी जेव्हा मुलींच्या पहिल्या शाळेस भेट दिली तेव्हा एक बाई शिक्षिकेचे काम करीत होती. ती शाळा लपून छपून काढलेली होती. परंतु आता ह्या तीन शाळा आहेत व शाळांत २३७ पटसंख्या आहे. तिन्ही शाळांत मुलींची सरासरी हजेरी २०० आहे. त्या वेळी आम्ही असे ऐकले होते की,

---

३. The Bombay Guardian, 16 December 1854.

वाचनामुळे एका मुलीचे डोळे गेले होते; अभ्यास करून करून एक मुलगी मृत्यू पावली होती. मुंबई प्रांतात मुलींच्या आठ शाळा आहेत. त्यांपैकी तीन मराठी, एक गुजराथी व चार पारशी आहेत. त्यांची पटसंख्या ५०० आहे. ग्रामीण भागात मुलींच्या शाळा किती आहेत याविषयी आमच्याजवळ माहिती नाही. ह्या शाळा मुख्यत: पुणे व अहमदाबाद या ठिकाणी आहेत आणि त्यांची पटसंख्या सुमारे ५०० असावी."[४]

याच सुमारास सरदार अमीन रावसाहेब विंचूरकर यांनी आपली मुलगी मुलींच्या शाळेत घालून जे धैर्य दाखविले आणि इतरांस कित्ता घालून दिला, त्याविषयी त्यांचा वृत्तपत्रांत गौरव करण्यात आला. त्याविषयी लिहिताना 'ज्ञानोदया'ने आनंदाने उद्गार काढले, "ज्ञानप्रकाशद्वारें आम्हांस कळलें कीं पुणें येथील सरदार अमीन रावसाहेब कृष्णराव विठ्ठल ऊर्फ बापूसाहेब विंचूरकर, पहिल्या प्रतीचे सरदार, यांनीं आपली कन्या मुलींच्या शाळेंत शिकावयास पाठविली. तर ही गोष्ट मोठी स्तुत्य आहे. कारण असले हे सरदार स्वत: सुधारून सुधारणुकीच्या कामास हात घालतात. येणेंकरून दुसरे जे प्राचीन रीतीनें वागणारे बडे लोक त्यांतीलही कित्येक यांचें उदाहरण घेऊन सुधारतील. थोड्याच वर्षांमागें सदरहू बडे लोकांप्रमाणें कोणी मुलगी शाळेंत पाठविली तर त्यास वेड लागलें, असें दुसरे लोक बोलले. परंतु आज तो समय जाऊन प्रकाशाच्या आरंभाचा समय लागल्यामुळें उपहास न होता सुधारणुकीच्या पुढारीपणास असें फळ प्राप्त झालें आहे."[५] भारतात अशा हा ज्ञानाचा नवप्रकाश फाकत जात होता.

यानंतर थोड्याच दिवसांनी जोतीरावांच्या महारमांगांच्या शिक्षणासाठी काढलेल्या शिक्षणसंस्थेची १० सप्टेंबर १८५३ रोजी सभा झाली. महार आणि मांग यांना शिक्षण देण्यासारखे अधिक महत्त्वाचे आणि अधिक हिताचे काम दुसरे कोणतेही नाही, अशी जोतीरावांची श्रद्धा होती. यास्तव जोतीरावांनी आपल्या कार्यात अधिक उत्साह, सहकार्य नि साह्य लाभावे म्हणून ही महारमांगांची शाळा एका संस्थेच्या स्वाधीन केली होती.

त्या समयी भाषण करताना सदाशिव गोवंडे म्हणाले, "सर्व विषयाची माहिती नसल्यामुळें एतद्देशीय लोक अज्ञानांधकारांत, कुकर्मांत व पारतंत्र्याच्या नरकात बुडाले आहेत. तरी त्यांना तेथून काढून त्यांना चांगल्या मार्गास लावणें हें प्रत्येक एतद्देशीय सुज्ञाचें कर्तव्य आहे असें समजून प्रत्येकानें या कार्यास यथाशक्ति साह्य करावें. या देशांत अज्ञान हा दुष्ट रोग आहे. त्यावर औषधयोजना करुन तो घालवावा असें कोणाच्या मनांत असल्यास त्याच्या मार्गांत जातिभेद व भाषाभेद आड येतात. म्हणून कोणी काढण्यास धजावत नाही. आता सारेच लोक दु:खांत पडलेले पाहून त्यांतून कोणाचें

४. ज्ञानोदय, १५ एप्रिल १८५३.
५. ज्ञानोदय, २ मे १८ १८५३.

सांत्वन आधीं करावें याची भ्रांती पडते. परंतु नीट विचार करून पाहिलें असतां कोणासच साह्य न करतां उगी बसावें हें उचित नव्हे. फारच दुःख ज्याच्यावर असेल त्याचा बंदोबस्त अगोदर करावा. जातिभेदामुळें अनिवार्य दुःखें महारमांग इत्यादि लोकांस सोसावीं लागतात. पाणी सर्व लोकांच्या जगण्यास मुख्य कारण म्हणूनच संस्कृत भाषेंत त्यास जीवन म्हणतात. तें भिक्षा घातल्याशिवाय त्यांस मिळत नाहीं. मग अवांतर पदार्थ कोठून मिळणार? म्हणून या लोकांची दाद विद्याद्वारें लागेल म्हणून त्यांसच प्रथम शिकविण्याची योजना करणें ही गोष्ट उत्तम आहे, असें मला वाटतें." "हे बोलणे होऊन जोतीरावांनी परमेश्वराची प्रार्थना केली व सभा उठली."[६]

महारमांगांच्या शिक्षणासाठी जोतीरावांनी स्थापन केलेल्या शिक्षणसंस्थेविषयी लिहिताना 'ज्ञानोदया'ने म्हटले की, "महारमांग इत्यादि लोकांस विद्या शिकविण्यासारखें या देशाचें दुसरें कोणतेंही हित नाहीं असें जोतीराव व त्यांचे मित्र यांचे मनांत येऊन त्यांतून जोतीराव यांनीं या कामासाठी बहुत दिवस उद्योग चालविला आहे. परंतु एक चांगला विचार करणाऱ्याहून दुसऱ्या विचार करणाऱ्या अधिक लोकांनी तें काम मन घालून केल्यास अधिक चांगलें होईल, म्हणून मंडळी असावी अशासाठी सर्वांनी जमून संस्थापना केली."

तथापि जोतीरावांना मिळत चाललेले यश पाहून पुण्यातील काही लोकांच्या डोळ्यांत ते सलू लागले. सामाजिक बाबतीत त्यावेळी नरमगरम सुधारक असलेल्या 'ज्ञानप्रकाशा'ने जोतीरावांच्या त्यागाविषयी प्रशंसा करताना म्हटले : "आपल्या नीच बंधुजनांस अज्ञान सागरांतून काढून ज्ञानामृताचें सेवन करविण्याकरितां हीं संकटें भोगिलीं हा त्यांचा त्या जातीवर मोठा उपकार आहे. आम्हीही त्यांचे आभार मानीत आहों." 'ज्ञानप्रकाशा'ने जरा कडवटपणे पुढे म्हटले की, "ब्राह्मण लोकांमुळें शूद्रांचें ज्ञानेंकरून व द्रव्येंकरून बिलकूल बरें होऊ नये, अशी उंच जातीची इच्छा खरी; परंतु त्यांत ब्राह्मण काय ते अग्रेसर असल्याचा लिहिण्याचा हेतु कळून येतो. त्याविषयीं पिष्टपेषण करण्याचें कारण नाहीं. प्रायः आम्ही ही गोष्ट खरी मानतों. असें फुलेराव जाणत असतां, ज्या ब्राह्मणांनीं अशाच कामी द्रव्याची वगैरे मदत केली त्यापेक्षा त्यांची स्तुति इतरांपेक्षा जास्त केली पाहिजे व त्यांचें स्मरण सर्वांस रहावें यास्तव त्यांचीं नांवें जोतीरावांनीं रिपोर्टांत अवश्य लिहावीं असें आम्हास वाटतें."[७]

जोतीरावांचे काही सहकारी ब्राह्मण होते. त्यांनी धैर्याने नि निःस्वार्थी बुद्धीने त्यांच्या कार्यास पाठिंबा दिला. ते जोतीरावांनी स्थापन केलेल्या संस्थेचे पदाधिकारी असल्यामुळे त्यांची नावे त्या प्रतिवृत्तात निर्देशिलेली होती. जोतीरावांची वाढती लोकप्रियता हेच 'ज्ञानप्रकाशा'च्या टोमण्याला कारण झाले असावे.

---

६. ज्ञानोदय, १५ डिसेंबर १८५३.
७. ज्ञानोदय, २ डिसेंबर १८५३.

रेव्हिन्यू कमिशनर एच. डब्ल्यू रिव्हज् यांनी मासिक १५ रुपयांची देणगी महारमांग मुलांच्या शाळेसाठी जाहीर केली. यावरून असे दिसते की, जोतीरावांनी महारमांग मुलांच्या शिक्षणासाठी चालविलेल्या कार्याविषयी त्यांच्या देशबंधूंपेक्षा उदारमतवादी युरोपियनांनी अधिक आस्था दाखविली. ज्या अगदी थोड्या ब्राह्मण सहकाऱ्यांनी जोतीरावांना त्यांच्या अंतापर्यंत साथ दिली त्याव्यतिरिक्त इतर प्रतिष्ठित लोकांनी त्यांना या गरीब लोकांच्या शिक्षणाच्या कार्यात विशेष म्हणण्यासारखे साह्य केले नाही, हे उघड आहे.

एतद्देशीय सुशिक्षित आणि श्रीमंत लोकांचे ह्या बाबतीतले साह्य अगदी कद्रूपणाचे होते. उदाहरणार्थ, लोकहितवादी गोपाळराव देशमुख हे एक थोर विद्यावंत आणि विचारवंत म्हणून त्या काळात गाजलेले. पण ह्या महारमांगांच्या शाळेला मासिक एक रुपयाहून अधिक वर्गणी देण्याचे औदार्य त्यांच्यासारख्या सधन व्यक्तीकडून घडले नाही. पुण्यातील नामांकित पंडित आणि पुढारी प्रा० कृष्णशास्त्री चिपळूणकर आणि टिळकांचे गुरु केरो लक्ष्मण छत्रे ह्यांच्यासारखे उदार व सढळ हाताचे म्हणून गाजलेले गृहस्थ ह्या शाळेला महिना चार आणे देत असत. उदार युरोपियन अधिकाऱ्यांनी दाखविलेली गुणग्राहकता आणि केलेले साह्य यांनी भारावून जाऊन जोतीरावांनी आपल्या वार्षिक इतिवृत्तात त्याचा कृतज्ञतापूर्वक निर्देश केला. ते पाहून अनेक एतद्देशीय प्रतिष्ठित सद्गृहस्थांच्या कपाळाला आठ्या पडल्या.

ज्या युरोपियन गृहस्थांनी अतिशूद्रांच्या शाळेला साह्य केले होते, त्यांना जोतीरावांनी आपल्या 'गुलामगिरी' ह्या स्फोटक ग्रंथात मुक्त कंठाने धन्यवाद दिले. रेव्हिन्यू कमिशनर रिव्हज् ह्यांच्याविषयी आपल्या ग्रंथात ते लिहितात : "त्या उदार गृहस्थांपैकी रेव्हिन्यू कमिशनर रिव्हज् साहेब यांनी जी मदत केली ती कधी विसरणार नाही. या उदार गृहस्थांनी फक्त द्रव्यद्वारेच मदत केली नाही तर आपला महत्त्वाचा कामधंदा संभाळून त्या अतिशूद्रांच्या शाळेत वरचेवर येऊन मुलांची विद्येमध्ये किती गती झाली आहे या विषयीची चौकशी करीत असत व मुलांस विद्या शिकविण्याविषयीं उत्तेजन यावे म्हणून फार झटत असत. त्यांचे उपकार अतिशूद्रांच्या मुलांच्या हाडांमध्ये खिळले आहेत. त्यांनी आपल्या कातडीचे जोडे करून त्यांच्या पायांत घातले तरी ते त्यांचे उतराई होणार नाहीत. त्याचप्रमाणे दुसऱ्या काही युरोपियन गृहस्थांनी मला या कामी फार मदत केली त्याबद्दल मी त्यांचे फार आभार मानितो."

जोतीरावांच्या महारमांगांच्या शाळेकडे नामांकित व्यक्तींचे लक्ष वेधले गेले. ती शाळा म्हणजे भारतातील युगप्रवर्तक अशी मोठी घटना आहे, असे अनेकांना वाटले. श्रीमान मोरो वामन ढमढेरे हे ठाणे जिल्ह्यातील तारापुरचे मुन्सफ होते. त्यांनी १८५४ च्या जून महिन्यात ग्वाल्हेरच्या महाराजांचे वकील तात्यासाहेब भिडे आणि श्रीमान अण्णासाहेब चिपळूणकर यांचा समवेत महारमांगांच्या शाळेला भेट दिली. शाळेतील मुलांचा अभ्यास पाहून ते फार खूष झाले. त्यांनी 'राजश्री जोती गोविंद फुले' यांच्या

कार्याची मोठी प्रशंसा करून, विद्यार्थ्यांनी अभ्यास उत्तरोत्तर विशेष करावा, त्यापासून बहुत हित आहे असे सुबोध भाषण केले. दुसरे दिवशी त्यांनी मुलांस खाऊसाठी ५ रु. पाठवून दिले आणि आपण वरचेवर शाळेस भेट देऊ असे आश्वासन दिले. वृत्त-पत्रांनी श्रीमान ढमढेरे यांच्या भेटीचा वृत्तांत प्रसिद्ध केला आणि धनवान लोक त्यांचे उदाहरण डोळ्यासमोर ठेवून गरिबांच्या शिक्षणासाठी व कल्याणासाठी झटतील अशी आशा प्रदर्शित केली.

## ३.

महारमांग यांच्यामध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी या संस्थेचे कार्यवाह असलेले मोरो विठ्ठल वाळवेकर ह्यांनी १६ डिसेंबर १८५३ रोजी मुंबईचे राज्यपाल नामदार व्हिस्काऊंट यांच्याकडे शाळा बांधण्यासाठी जमीन मिळावी म्हणून अर्ज केला. आपल्या अर्जात वाळवेकर म्हणाले, 'महार आणि मांग यांच्या शाळेची अत्यंत केविलवाणी परिस्थिती लक्षात घेऊन सुमारे दीडशे मुलगे आणि १०० मुली यांना बसावयास पुरेल एवढी शाळेची इमारत बांधण्यासाठी राज्यपालांनी आर्थिक साह्य करावे आणि पुण्याच्या जिल्हाधिकाऱ्याकडून ते शाळागृह बांधण्यासाठी योग्य असा जमिनीचा तुकडा द्यावा अशी प्रार्थना आहे.'

महारमांगांच्या कल्याणासाठी निघालेल्या ह्या संस्थेला हरएक बाबतीत उत्तेजन द्यावे असे राज्यपालांचे मत होते. शाळा चालविणाऱ्या संस्थेचे एतद्देशीय सद्गृहस्थ कार्यवाह होते आणि एका एतद्देशीय गृहस्थाने ती शाळा काढली. हे पाहून त्यांना अत्यंत समाधान वाटत होते. यामुळे त्यांनी त्रिंबकजी डेंगळे यांच्या तोफखान्याकडील जमिनीचा तुकडा शाळागृह बांधण्यासाठी देण्यास मान्यता दिली. त्यांनी १८५४ साली पुणे जिल्हाधिकाऱ्यास ५ हजार रुपयांची रक्कम आदा करावयास सांगितली. जर ती रक्कम दक्षिणा प्राईज निधीतून देता आली नाही, तर ती पुणे येथील तिजोरीतून द्यावी, अशी त्यांनी आज्ञा केली. तथापि, शेवटी असे झाले की, संबंधित सरकारी अधिकारी महारमांगांच्या शिक्षणाविषयी अनुकूल नसल्यामुळे ती रक्कम संस्थेला दिलीच गेली नाही. मात्र सहा एकर तेहतीस गुंठे एवढी जागा १८५७मध्ये त्या संस्थेला देण्यात आली. ती जागा भोकरवाडी येथे होती आणि तेथे ती शाळा पुढे अनेक वर्षे चालली.

या सुमारास अस्पृश्यांच्या शिक्षणाविषयी सरकारच्या धोरणात अनकूल असा फरक पडला. ईस्ट इंडिया कंपनीच्या संचालकांनी १८६४ साली 'वुड' नामक संस्मरणीय खलिता पाठविला. त्यात असे म्हटले होते की, जातीचे कारण सांगून कुठल्याही मुलांना सरकारी शाळेत अथवा महाविद्यालयात प्रवेश नाकारता येणार नाही. हा वुडचा खलिता भारतीय शिक्षण क्षेत्राच्या इतिहासात 'शिक्षणाची महान सनद' म्हणून प्रसिद्ध आहे. शिक्षणाच्या वरदानाचा, आतापर्यंत सरकारने अस्पृश्यांना लाभ घेऊ दिला नव्हता. १८५५ च्या ऑगस्टमध्ये अहमदनगरच्या काही रहिवाशांनी अतिशूद्रांसाठी एक शाळा

काढावी म्हणून सरकारकडे अर्ज केला होता. त्याप्रमाणे नोव्हेंबर १८५५ मध्ये सरकारने तेथे एक शाळा घातली. शिक्षामंडळीच्या प्रतिवृत्तात असे म्हटले आहे की, "अस्पृश्य जातींकरिता आम्ही शाळा काढली असा हा पहिलाच प्रसंग आहे."

त्यानंतर १८५६ च्या जून महिन्यात धारवाडमधील सरकारी माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापकाने एका महार मुलाला प्रवेश देण्याचे नाकारले. त्या प्रकरणासंबंधी मुंबई सरकार आणि मध्यवर्ती सरकार यांच्यामध्ये भवती न भवती झाली. मध्यवर्ती सरकार म्हणाले, 'अशा ह्या मुलाला बंगाल प्रांतातील सरकारी शाळेत प्रवेश नाकारता आला नसता.' ह्या विषयावर आपला अभिप्राय देताना लंडन येथील कंपनीचे संचालक म्हणाले, 'सरकारी शिक्षणसंस्था सर्व वर्गांकरिता खुल्या असल्या पाहिजेत, असा आमचा उद्देश आहे.'[८] काही अधिकारी मुंबई सरकारच्या भिडेस्तव युगानुयुगे चालत आलेल्या दूषित पूर्वग्रहाबाबत ढवळाढवळ करण्यास कचरत असत. परंतु आता मुंबई सरकारला समज मिळाल्यामुळे ते शुद्धीवर आले आणि त्याने असे जाहीर केले की, 'सरकारी खर्चाने चालविलेल्या सर्व शाळा जातपात निरपेक्षपणे सर्व वर्गांच्या प्रजाजनांस उघड्या राहतील.'[९]

वर उल्लेखिलेल्या परिस्थितीवरून जोतीराव धडाडीने आणि निःस्वार्थबुद्धीने हाताळत असलेल्या शिक्षणाच्या प्रश्नाचे महत्त्व, गांभीर्य आणि त्यातील गुंतागुंती यांची कल्पना येते. एका बाजूला खालच्या वर्गांच्या शिक्षणाला हात घालावयास न धजणारे सहानुभूतिशून्य परकीय सरकार आणि दुसऱ्या बाजूला मुलींच्या शिक्षणाला आणि खालच्या वर्गांच्या शिक्षणाला विरोध करणारे वरिष्ठ वर्गातील संकुचित वृत्तीचे लोक. अशी ही कोंडी फोडून त्यांना कार्य करावयाचे होते.

जोतीरावांचे बरेच सहकारी ब्राह्मण होते. ते धैर्याने आणि उदार बुद्धीने त्यांना त्यांच्या शिक्षणकार्यात साथ देत होते. परंतु जोतीराव हे खऱ्या अर्थाने सामाजिक क्रांतिकारक होते, तर त्यांचे सहकारी भूतदयावादी होते. ज्याप्रमाणे तीनशे वर्षांपूर्वी एकनाथाने भूतदयेने प्रेरित होऊन अस्पृश्यांवर दया दाखविली, त्याप्रमाणे जोतीरावांचे कनवाळू ब्राह्मण सहकारी अस्पृश्यांवर दया दाखवीत होते एवढेच. परंतु त्यांच्यावर केवळ दया दाखविणे जोतीरावांना मान्य नव्हते. गरीब शेतकरी आणि भूमिहीन कनिष्ठ जाती ह्यांना त्यांचे जन्मसिद्ध मानवी हक्क संपादन करून देण्यासाठी ते निर्भयपणे उभे राहिले होते.

त्या युगात इंग्लंडमध्ये जसे भूतदयावादी लोक होते तसे जोतीरावांचे हे सहकारी भूतदयावादी होते. तथापि भूतदयावादी मनुष्य हा सामाजिक आणि आर्थिक समतेविषयी आस्था बाळगतोच असे नाही. आणि नेमका हाच फरक जोतीराव आणि

---

८. Report of the Director of Public Instruction for the year 1956-57, p. 88.

९. Report of the Director of Instruction for the year 1956-57 p. 93.

त्यांचे सहकारी ह्यांमध्ये होता. त्यांचे परोपकारी सहकारी भूतदयावादी, काहीसे उदार-मतवादी होते, तर जोतीराव पूर्णतया मानवतावादी होते. जो मनुष्य आपली जात इतर जातींपेक्षा श्रेष्ठ आहे अशी भावना मनाच्या तळाशी बाळगतो, तो सामाजिक क्रांतिकारक होऊ शकत नाही. जन्मजात परिस्थितीमुळे समाजात प्रतिष्ठा, विशेषाधिकार आणि सत्ता लाभते ती तो सोडूच शकत नाही. ज्याप्रमाणे ब्रिटिश राजा हा उपजत बुद्धीने समाजवादी होऊ शकत नाही, त्याप्रमाणे सामाजिक दृष्ट्या काही थोर पुरुषांचे तेजस्वी अपवाद सोडले तर ब्राह्मण हा बहुधा सामाजिक क्रांतिकारक होऊ शकत नाही.

जोतीरावांचे मत असे होते की, कनिष्ठ वर्गातील लोकांना अशा तऱ्हेचे शिक्षण द्यावे की ते आपल्या सामाजिक समतेच्या आणि व्यक्तिस्वातंत्र्याच्या हक्कांसाठी झगडण्यास तयार होतील. याच सुमारास जोतीराव आणि त्यांचे सहकारी यांमध्ये शिक्षणाचे ध्येयधोरण आणि व्याप्ती काय असावी याविषयी मतभेद निर्माण झाले. जोतीरावांनी सुरू केलेल्या मुलींच्या शाळा समितीच्या मार्गदर्शनाखाली सुव्यवस्थित चालल्या होत्या. काही विशिष्ट परिस्थितीमुळे महारमांगांच्या शाळांसुद्धा त्यांना एका संस्थेच्या स्वाधीन कराव्या लागल्या होत्या.

जोतीरावांनी आपल्या शाळा संस्थांच्या स्वाधीन केल्यामुळे अर्थातच त्यांचा कारभार त्या संस्थेतील बहुमताप्रमाणे चालू लागला. जोतीरावांनी पुराणे, धर्मशास्त्रे आणि इतिहास यांचा लावलेला अर्थ आणि त्यांतील विचारसूत्रांचे केलेले स्पष्टीकरण हे त्यांच्या सहकाऱ्यांना मानवले नाही. जोतीरावांनी धर्मशास्त्राचा लावलेला अर्थ कनिष्ठ वर्गातील विद्यार्थ्यांच्या मनांत बिंबून त्याचा भलताच परिणाम होईल अशी त्यांना भीती वाटू लागली.

जोतीराव तर स्मृतिसंहिताकार आणि सामाजिक निर्बंधकार यांचे हेतू उघड करून त्यांवर कडक टीका करीत. ह्या गोष्टींची चर्चा होऊन संस्थेच्या बैठकींतून त्या वाद-विवादाचे पडसाद उठता बसता उठू लागले. त्यांच्या सहकाऱ्यांपैकी पुष्कळांचे असे म्हणणे होते की, कनिष्ठ वर्गांना लिहिणेवाचणे आणि गणित एवढेच शिकवावे. तर जोतीरावांचा असा आग्रह होता की, चांगली गोष्ट कोणती आणि वाईट कोणती, हितकारक काय आणि अहितकारक काय यांचे त्यांना चांगले ज्ञान होईल, असे शिक्षण कनिष्ठ वर्गांना दिले पाहिजे. 'आपल्या' हक्कांसाठी त्यांनी लढण्याचीच नव्हे तर त्यांच्या संरक्षणाचीही तयारी केली पाहिजे, असे त्यांचे मत होते. जोतीरावांच्या सहकाऱ्यांना वाटे की, ब्रिटिशांच्या उदारमतवादामुळे आणि कृपेमुळे जर कनिष्ठ वर्गातील जाती विद्यासंपन्न झाल्या, तर त्या ज्यांनी त्यांच्या डोईवर अनेक शतके दुर्धर अडचणींचा आणि दुःखांचा डोंगर ठेवला त्यांचा धिक्कार करतील आणि ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या बाजूच्या होतील अशी भीती त्यांच्या मनामध्ये होती किंवा नव्हती याबद्दल आपण साशंक होतो, असे जोतीरावांनी आपल्या 'गुलामगिरी' ह्या ग्रंथात म्हटले आहे.

ह्या कारणांमुळे आपण शिक्षणसंस्थांतून हळूहळू काढता पाय घेतला, असे जोतीरावांनी

हटले आहे. शाळांचे काम आता व्यवस्थितपणे चालले होते. त्यांच्या घरची परिस्थिती तितकीशी समाधानकारक नव्हती. कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न त्यांना नेहमीच भेडसावीत राहिलेला होता. शाळेत जोतीराव आणि त्यांची पत्नी विनावेतन काम करीत असत. निःस्वार्थपणे आणि उदात्त ध्येयाने पतिपत्नी झगडत होती. शाळांच्या कार्यात धुंद आणि मग्न होऊन त्यांनी काही वर्षे काढली. डोळ्यांत तेल घालून आणि अत्यंत निष्ठेने ते कार्य त्यांनी केले.

जोतीरावांच्या वडिलांनी तर त्यांना केव्हाच घरातून घालवून दिले होते. ना पित्याचा आश्रय, ना स्वतःचा धंदा. त्यामुळे त्यांची संसारात फारच आर्थिक कुचंबणा झाली. अशा परिस्थितीत त्यांना पुण्यातील स्कॉटिश मिशनऱ्यांच्या मुलींच्या शाळेमध्ये शिक्षकाची नोकरी करणे भाग पडले. ही शाळा खिस्ती-मिशनऱ्यांनी १८५४ जुलै महिन्यात मिशनच्या आवारात सुरू केली होती. मुलींचे वसतिगृहही तेथेच होते. त्या संस्थेमध्ये टाकलेली मुले, अनाथ मुले आणि खिस्तीधर्म स्वीकारलेल्या गरीब लोकांची मुले आणि ज्यांच्यावर मिशनचा पूर्ण ताबा होता अशी मुले त्या संस्थेत शिकत होती. जेवणाखाण्याची तेथेच व्यवस्था असे.

ह्या शाळेची माहिती देताना एका इतिवृत्तात चालकांनी असे म्हटले आहे की, 'सध्या आमच्याकडे वसतिगृहामध्ये राहणारी १३ मुले आहेत. दिवसा त्यांचे शिक्षण होत असताना दुसरी ४० मुले त्यांच्याबरोबर शिकतात. पुण्यातील एक अत्यंत उत्साही आणि निपुण शिक्षक आमच्या शाळेत दररोज चार तास शिक्षणाच्या कार्यात साह्य करावयास लाभला आहे याविषयी आम्हांला समाधान वाटते. ते म्हणजे परोपकार-बुद्धीचे आणि कनिष्ठ जातींच्या मुलींच्या शिक्षणासाठी अविरत झगडणारे आणि ज्यांच्या कार्याची शिक्षामंडळीने आणि स्वतः सरकारने मनापासून प्रशंसा केली, ते जोतीराव फुले होत. त्यांनी आमच्या मोठ्यात मोठ्या शिक्षणविषयक आशा फलद्रूप केल्या.[१०] शाळेतील मुलींची प्रगती अत्यंत समाधानकारक आहे.'

त्या अडचणीच्या दिवसांत एक कपडे शिवण्याचे दुकान एका नोकराच्या साह्याने जोतीराव चालवीत असत. शिवाय सावित्रीबाई फुरसतीच्या वेळी काही नोकर बायांच्या साह्याने विक्रीसाठी रजई तयार करण्याचे काम करीत असत. ह्या काळात जोतीरावांनी दाढी वाढविली होती. ते मधून मधून वडिलांची भेट घेत. परंतु वडिलांचे आणि त्यांचे संबंध अद्यापि पूर्ववत झाले नव्हते.

## .४.

त्या काळात धर्मक्षेत्रातील आपल्या प्रतिष्ठेवरून ब्राह्मण अधिकाधिक गडगडत होते. पुराणातील खोट्या गोष्टी ते समाजात पसरवीत होते. शिवाय नवीन खोट्या गोष्टी

---

१०. Oriental Christian Spectator, February 1855.

रचून पसरवीत होते. सत्यनारायणाची कथा हे एक त्यांनी निर्माण केलेले नवीन ढोंग होय. कनिष्ठ वर्गांची पिळवणूक करण्याचे ते एक नवीन साधन त्यांनी निर्माण केले होते. त्यांनी एक नवीन देव निर्माण केला. ते पाहून जुन्या गुलामगिरीप्रमाणे ह्या नवीन मानसिक गुलामगिरीचे शूद्रांच्या गळ्याभोवती पडत जाणारे पाश तोडून टाकण्यासाठी जोतीरावांनी सत्यनारायण कथेच्या द्वारा पसरू घातलेल्या धर्मभोळेपणावर कडाडून हल्ला चढविला.

अठराशे पंचावन्न साली त्यांनी 'तृतीय रत्न' नावाचे एक नाटक लिहिले. त्यांत ब्राह्मणांनी देवाच्या नावाने जे समज पसरविले होते आणि अंधश्रद्धा निर्माण केल्या होत्या त्या सर्व त्यांनी उजेडात आणल्या.

त्या नाटकाची मध्यवर्ती कल्पना अशी आहे की, एक ब्राह्मण भिक्षुक एका खेड्यात फिरत असताना एका शेतकऱ्याच्या गरोदर पत्नीला पाहतो. तो तिला सांगतो की, तुझ्या भावी मुलाचा जन्म तुझ्या नवऱ्याला घातक ठरणार आहे. हे भविष्यकथन ऐकून ती भेदरून जाते. तो ब्राह्मण भिक्षुक तिला सांगतो की हे संकट दूर व्हावे म्हणून तुझ्या कुटुंबाच्या वतीने मी देवाची प्रार्थना करतो. असे म्हणून तो तिचे सांत्वन करतो. त्याची सूचना ती मान्य करते. शेतकऱ्याच्या घरी ही प्रार्थना आणि ब्राह्मणभोजन चालले असताना एक ख्रिस्ती धर्मोपदेशक तिथे योगायोगाने येतो. वादविवादास प्रारंभ होतो. ब्राह्मणाची लबाडी उघडकीस येते.

जोतीरावांनी शेवटी त्या चर्चेपासून असा निष्कर्ष काढला की, मूर्तिपूजेपेक्षा ज्ञान हे श्रेष्ठ होय. जोतीरावांनी शेवटी तो शेतकरी आणि त्याची पत्नी यांना आपण खास काढलेल्या प्रौढांच्या रात्रशाळेत शिकावयास जाण्याचा उपदेश केला. त्या शाळेत जोतीराव आणि त्यांची पत्नी, शेतकऱ्यांना आणि त्यांच्या बायकांना आपल्या घरी प्रत्येक दिवशी रात्री दोन तास विनाशुल्क शिकवीत असत.

जोतीरावांनी आपले हे नाटक दक्षिणा प्राईज समितीकडे बक्षिसासाठी पाठविले होते. परंतु त्याला बक्षीस मिळाले नाही हे सांगावयास नकोच. दक्षिणा प्राईज समितीत ब्राह्मणांचे प्राबल्य होते. त्यांनी जोतीरावांच्या नाटकाला विरोध केला, असे जोतीरावांनी आपल्या 'गुलामगिरी' या ग्रंथात म्हटले आहे. दक्षिणा प्राईज समिती म्हणजे गरिबांच्या दुःखाकडे दुर्लक्ष करणाऱ्या त्या काळच्या पुणे नगरपालिकेची धाकटी बहीणच होय, असे जोतीरावांचे मत होते. दोन्ही संस्था शूद्रांच्या मार्गावर प्रकाश टाकण्याची आणि त्यांचे कल्याण करण्याची पर्वा करीत नसत.

ज्यांनी पाश्चात्त्य पद्धतीचे शिक्षण संपादन केले होते, त्यांना त्या काळी सनातनी लोक मान देत नसत. जोतीरावांच्या ह्या नवीन नवीन उपक्रमांमुळे सनातनी लोकांना मोठा हादरा बसला होता. मुलींच्या व कनिष्ठ वर्गातील मुलांच्या शिक्षणासाठी त्यांनी चालविलेली धडपड आणि अविरत प्रयत्न, त्यांनी चालविलेली रात्रशाळा आणि मिशनऱ्यांच्या शाळेमध्ये त्यांनी स्वीकारलेली शिक्षकाची नोकरी, ह्या गोष्टींमुळे ते द्वेषाने जळफळू लागले.

त्या काळी हिंदुधर्म आणि हिंदूचालीरीती किंवा परंपरा यांची तपासणी झाली पाहिजे असे म्हणणाऱ्या हिंदूला ख्रिस्ती समजण्यात येई. त्याचा धिक्कार करण्यात येई. यासंबंधी त्या काळच्या एका लेखकाने असे म्हटले आहे की, 'जर एखाद्या हिंदूने आपल्या धर्माविरुद्ध कांही चिकित्सकपणे उद्‌गार काढले किंवा किंचितही दोष काढले तर त्याच्या म्हणण्याविषयी कांही किंचितसुद्धा विचार न करता लोक त्याला मिशनरी किंवा येशूचा भक्त म्हणून त्याचा अव्हेर करतात; परंतु मला ही गोष्ट कळत नाही की, आपल्या धर्मावर टीका करणे आणि येशूचा भक्त होणे याचा संबंध काय? हिंदुधर्मावर टीका करणारा असा मनुष्य मुसलमान झाला आहे असे का म्हणत नाही. ते त्याला ख्रिस्ती झाला आहे असे म्हणतात, कारण त्याने इंग्रजीचा अभ्यास केला आहे.'[११]

त्या काळी सुशिक्षित हिंदूंना अनेक अडचणींना आणि अंधश्रद्धांना तोंड द्यावे लागे. परंपरा आणि रूढी ह्यांपासून जर एखाद्याचे पाऊल दूर पडले, तर त्याच्यावर टीकेचा आणि निंदेचा भडिमार होई. त्याच्यावर सामाजिक बहिष्कारही पडे. वानगीदाखल, आपल्या पुढील आयुष्यात सनातनी-सुधारक म्हणून प्रसिद्धीस आलेले विश्वनाथ नारायण मंडलिक यांची गोष्ट सांगता येईल. मंडलिकांच्या वडिलांना कोणीतरी सांगितले की 'रावसाहेब सुधारले!' मंडलिकांचे वडील पक्के सनातनी. ती वार्ता ऐकून त्यांच्या अंगावर काटा उभा राहिला. त्यांनी आपल्या मुलास विचारले, "'सुधारले' ह्या शब्दाचा अर्थ आम्ही प्राकृत लोक वाईट चाल लागली असा करितो. एरवी शब्दार्थ चांगला आहे."

'सुधारलेला' हा शब्द मुंबईत व विशेषतः पुण्यात फार निंद्य असे. 'सुधारलेला' ह्या शब्दाची व्याख्या जातीचे आचरण मोडणारा, मद्यमांस खाणारा व चौपायी उडणारा अशी जुन्या समजुतीचे लोक करीत.[१२] मंडलिकांनी आपल्या वडिलांना कळविले की, "सुधारक शब्दाचा जो वाजवी अर्थ म्हणजे धर्मसंशोधन असा आहे त्या अर्थाने मी सुधारक आहे व धर्माला प्राक्कालीन शुद्ध स्वरूप प्राप्त व्हावे, अशी माझी इच्छा आहे."[१३]

अशा काळात, साहजिकच, जोतीरावांची जहाल सुधारक मते आणि त्यांचा मानवतावाद ही ब्राह्मणांचा बालेकिल्ला असलेल्या पुण्यात, संतापाची लाट उसळवू लागली. जोतीरावांचे आचरण व शिकवणूक ही भ्रष्टाचारी आणि धर्मद्रोही आहेत अशी सनातनी ब्राह्मणांची समजूत झाली होती. ह्या प्रतिगामी मंडळीपैकी काही माथेफिरूंनी त्यांच्या आयुष्याचा शेवट करावयाचे ठरविले. पैसे देऊ करून दोन मारेकरी त्यांनी तयार केले. त्यांपैकी एक रामोशी होता. त्याचे उपनाव होते रोडे. दुसऱ्याचे नाव धोंडीराव नामदेव कुंभार. दोन्ही कनिष्ठ जातीचे. ह्या दोघांच्या करवी आपला दुष्ट हेतू साध्य करण्याचे त्यांनी ठरविले.

---

११. ज्ञानोदय, एप्रिल १८४९.

१२. रेव्ह. बाबा पद्मनजी, अरुणोदय, पृ. ९४.

१३ हवालदार, ग. रा., रावसाहेब वि. ना. मंडलिक यांचें चरित्र, पृ. २८०.

हातांमध्ये नंगे सुरे घेऊन ते क्रूरकर्मे मध्यरात्री जोतीरावांच्या घरात घुसले. इतक्यात जोतीराव आपल्या बिछान्यावर एका कुशीवरून दुसऱ्या कुशीवर वळले. कुणाच्या तरी पावलांची आणि कुजबुजीची त्यांना चाहूल लागली. झोपेतून ते जागे झाले. उठून बसले. समईच्या मंद प्रकाशात त्यांना दोन व्यक्ती अंधुकपणे दिसू लागल्या. 'तिकडे कोण आहे? तुम्ही कोण?' अशी उठता उठता जोतीरावांनी त्यांच्याकडे पृच्छा केली. त्यांनी समईची वात जरा मोठी केली. भयभीत झालेली त्यांची पत्नी सावित्रीबाई गोंधळून पतीच्या बाजूस आ वासून उभी राहिली. त्यावर तो रामोशी त्वेषाने उद्गारला, 'तुमचा निकाल करावयास आम्ही आलो आहोत.' 'तुम्हांस यमसदनास पाठविण्यासाठी आम्हांस धाडले आहे,' असे दुसरा मारेकरी गुरगुरला.

जोतीरावांनी त्यांना अत्यंत शांतपणे विचारले, 'माझा शेवट आणि तो कशाकरिता? मी तुमचा काही अपराध केला आहे काय?' आपला आवाज थोडा चढवून जोतीराव पुन्हा म्हणाले, 'मी तुमचा काही अपराध केला आहे काय?' 'तुम्ही आमचे काही वाईट केलेले नाही. काही लोकांनी तुमचा निकाल लावण्यासाठी आम्हास धाडले आहे.' सामान्य जनतेचे सेवक जोतीराव अत्यंत शांतपणे म्हणाले, 'अरे पण ह्या कृत्यापासून तुमचा काही फायदा होणार आहे काय?' त्यावर उत्तर असे आले की, 'ह्या कामासाठी प्रत्येकी हजार रुपये आम्हांस मिळणार आहेत!'

त्या क्षणीच जोतीराव सद्गदित होऊन म्हणाले, 'अरे, वा! माझ्या मृत्यूने तुमचा फायदा होणार आहे! तर घ्या हे माझे डोके. ज्या गरीब जनतेची सेवा करण्यात मी सद्भाग्य आणि धन्यता मानली, त्यांनीच माझ्या गळ्यावरून सुरी फिरवावी हे माझे सद्भाग्य होय! चला, आटपा! माझे आयुष्य दलितांकरिताच आहे. कसे झाले तरी माझ्या मरणानेसुद्धा गरीबांचेच हित होत आहे!'

गरिबांच्या हिताकरिता जोतीराव मरायला सिद्ध होते. गरीब जनतेच्या उद्धारकर्त्याचे ते अपूर्व अन् तेजस्वी शब्द कानांवर पडताच मारेकऱ्यांचे डोळे उघडले. जोतीरावांच्या निर्भय, निर्विकार नि निर्मळ मूर्तीचे दर्शन मारेकऱ्यांना होताच त्यांच्या हृदयात विवेकरूपी देव जागृत झाला. त्यांना जोतीरावांच्या तेजस्वी चेहऱ्यावर दुःखाची किंवा चिंतेची छटाही दिसली नाही. मारेकरी भानावर आले. अत्यंत पूज्य बुद्धीने त्यांनी पुण्यप्रभावी जोतीरावांचे पाय धरले आणि ते पश्चात्तापपूर्वक म्हणाले, 'तात्यासाहेब, आता एकच भिक्षा घाला. तुमचा जीव घ्यायला टपलेल्या दुष्टांना यमदनास पाठविण्याची आम्हांस परवानगी द्या.'

जोतीराव हे देवासारखे क्षमाशील. भूतलावर चालणारे खरे देवपुरुष! ते त्या गरीब मारेकऱ्यांना म्हणाले, 'जे काही आता घडले आहे त्याविषयी अवाक्षरही बाहेर काढू नका.' ज्यांनी पैशांची लालूच दाखवून हे कृत्य करावयास त्यांना सांगितले होते, त्यांच्याविषयी त्यांनी सूडबुद्धी मनात बाळगू नये, असे त्यांनी बजावले. जोतीराव शेवटी उद्गारले, 'आपण काय करीत आहोत हे बिचाऱ्यांना कळले नाही. देवा, त्यांना क्षमा

कर ! त्यांना दीर्घायुष्य दे !' अपराध्यास क्षमा करणे हा एक सूडाचा अत्यंत उदात्त असा मार्ग आहे !

जोतीरावांना त्या काळी लोक तात्यासाहेब म्हणत. ते दोन्ही मारेकरी त्या दिवसापासून त्यांचे निष्ठावंत भक्त बनले. ते जोतीरावांच्या रात्रशाळेत शिकू लागले. त्यांच्यापैकी रोडे नावाचा तो मांग त्यांचा शरीररक्षक बनला. दुसरा धोंडीराम नामदेव कुंभार हा पुढे जोतीरावांच्या प्रेरणेमुळे पंडित झाला. पुढील काळात जोतीरावांनी काढलेल्या सत्यशोधक समाजाचा आधारस्तंभ बनला. त्याने काही ग्रंथ लिहिले आणि सत्यशोधक समाजाचा संदेश जनतेत पसरविण्याचे मोठे कार्य केले. त्याचे 'वेदाचार' नावाचे पुस्तक प्रसिद्ध आहे. त्याच्या मुखपृष्ठावर खालील मजकूर आढळतो :

> *वेदाचार—रा. रा. स० शो० स०*
> *"पंडितराव धोंडिराम नामदेव"*
> *ज्येष्ठ शृंगेरि कुडलगीचे स्वामी जगद्गुरु*
> *"श्री शंकराचार्य" यांच्या संस्थानचे "सरसुभे"*
> *यांनीं हा ग्रंथ रचला. माहे नोव्हेंबर सन १८९६ इ.*


अनुक्रम ................ पिर ................
क्रमांक ........................ नों. दि. ................

८

# स्वातंत्र्यसमर नि विधवाविवाह

जोतीरावांच्या महारमांगांच्या शाळांचे कार्य व्यवस्थितपणे चालू होते. दक्षिणा प्राईज समिती काही एतद्देशीय सद्गृहस्थ आणि अनेक युरोपियन अधिकारी त्या शाळांना साहाय्य करीत असत. महारमांगांच्या शाळांत मुलांना मोफत शिक्षण मिळे. पुस्तके आणि पाट्याही त्यांना मोफत मिळत. त्या शाळांत चार ब्राह्मण शिक्षक होते. दोन कनिष्ठ वर्गातील होते. सरकारी शिक्षण खात्याच्या संचालकाच्या १८५६ सालच्या इतिवृत्तांत त्या शाळांचे संस्थापक म्हणून जोतीरावांचा उल्लेख आहे. ह्या शाळांतील विद्यार्थ्यांची २९ ऑगस्ट १८५६ रोजी प्रकटपणे वार्षिक परीक्षा घेण्यात आली. त्या वेळी महसूल आयुक्त रिव्हज्साहेब हे अध्यक्षस्थानी होते. पुढील काळात जोतीरावांचे ह्या शाळांवरील लक्ष आणि त्यांविषयींचा उत्साह कमी कमी होत गेला. त्याचा परिणाम असा झाला की, महारमांगांच्या शाळांत एकही मुलगी उरली नाही. त्या तीन शाळांत आठ शिक्षक होते. पटांवर ३०० विद्यार्थी होते.

भारतातील इंग्रजांचे राज्य उलथून पाडण्यासाठी १० मे १८५७ रोजी एक मोठे बंड सुरू झाले. हा हा म्हणता त्याचे रूपांतर एका मोठ्या स्वातंत्र्ययुद्धात झाले. त्याचे पडसाद अधूनमधून सर्व देशभर उठले. रावबाजीच्या राजवटीत भोजनासाठी आणि

दक्षिणेसाठी गर्दी करणाऱ्या हजारो ब्राह्मणांचे भाऊबंद हे त्या वेळी जांभया देत खुशाल पडले होते. हे खरे असले तरी, आणि त्या क्रांतियुद्धाची रणक्षेत्रे महाराष्ट्राबाहेर होती तरी त्या क्रांतियुद्धांचे प्रमुख नेते महाराष्ट्रीय होते हे विशेष होय.

क्रिमियन युद्धात इंग्रजांचा पराभव झाल्यामुळे भारतीयांना असे वाटू लागले की, इंग्रजांना काही अजिंक्यपदाचा ताम्रपट मिळालेला नाही. हिंदी सैनिकांकडून इंग्रजांनी पंजाब पादाक्रांत केला होता. इंग्रज महाराज्यपाल डलहौसी ह्याने भारताला त्याच्या मध्ययुगीन बंधनांपासून तोडून त्याला आधुनिक स्वरूप दिले. त्याच्या प्रभावी धोरणामुळे भारत राजकीयदृष्ट्या एकसंध झाला हे खरे. परंतु त्याने हिंदी संस्थानिकांना दत्तक घेण्याचा अधिकार नाकारल्यामुळे देशी संस्थानांमधून क्षोभाची नि सूडाची भावना उफाळत राहिली होती. इंग्रजांच्या राज्याला भारतात शंभर वर्षे पूर्ण झाली असून त्यांचे राज्य आता संपुष्टात येणार, अशी समजूत भारतातील सामान्य जनतेत पसरू लागली होती.

तथापि क्रांतियुद्धाने पेट घेण्यास जे प्रत्यक्ष कारण घडले ते निराळेच होते. बंदुकीच्या काडतुसांना गोमांसाची व डुकराची चरबी लावण्यात येऊन हिंदी सैनिकांना खिस्ती करण्याचा डाव इंग्रज कार्यकर्ते खेळत आहेत, अशी त्या वेळी सैनिकांच्या मनात भीती निर्माण झाली होती. कारण गाय ही हिंदूंना पवित्र तर डुक्कर मुसलमानांना तिरस्करणीय. शेवटी ते असंघटित क्रांतियुद्ध संघटित सैन्य शक्तीपुढे अपयशी झाले. ते फसले म्हणून बंड ठरले.

निजामाचे दिवाण सालरजंग ह्यांनी इंग्रजांना दिलेला पाठिंबा, शिखांची निष्क्रियता आणि नेपाळने क्रांतियुद्धाच्या नेत्यांना केलेला विरोध ह्यांमुळे इंग्रजांचे हिंदी साम्राज्य लयास न जाता, त्या क्रांतियुद्धातून घायाळ होऊन बाहेर पडले. इंग्रजांना कसाबसा जय मिळाला. १८५७ साली जेव्हा दिल्ली नगरी क्रांतियुद्धाच्या नेत्यांच्या हाती पडली, तेव्हा मुंबईच्या राज्यपालाने हैद्राबादच्या इंग्रज राजदूतास असे कळविले की, 'जर निजामाने बंडखोरांची बाजू घेतली तर सर्व आटोपलेच!' कर्नल ब्रिग्ज यांनी असे म्हटले आहे की, 'जर निजामाने बंडखोरांना सहानुभूती दाखविली असती, तर सर्व दक्षिण हिंदुस्थान पेटून गेला असता. आणि इंग्रजांचे धावे दणाणले असते.' निजामाच्या ह्या भारतद्रोही कृत्याचे उपकार फेडावे म्हणून इंग्रजांनी सर सालरजंग ह्याचे इंग्लंडमध्ये १८७६ च्या जून महिन्यात मोठे राजवैभवी स्वागत करून 'हिंदी साम्राज्याचा रक्षणकर्ता'[१] असा त्याचा गौरव केला. कारण क्रांतियुद्धाच्या वेळी निजामाच्या धोरणास देशद्रोही वळण त्यानेच लावले होते.

काही बाबतीतील जोतीरावांची मते अढळ होती. त्यांना असे वाटले असावे की, हिंदुसमाज जातिभेदाने विस्कळित झाल्यामुळे हिंदु लोकांमध्ये एकी आणि खरा देशाभिमान निर्माण होऊ शकत नाही. त्यामुळे इंग्रजांना हिंदुस्थानवर आपले राज्य

---

१. Indian Statesmen, G. A. Natesan and Co., p. 10.

प्रस्थापित करण्यात यश आले. सत्तावनच्या क्रांतियुद्धाविषयी त्यांना सहानुभूती नव्हती; इतकेच नव्हे तर, इंग्रजांचे राज्य उलथून पाडण्यासाठी उत्तर हिंदुस्थानात जे युद्ध चालले होते त्याविषयी ते अत्यंत उदासीन होते. त्यांच्या उदासीनतेमुळे म्हणा किंवा त्यांच्या विद्यार्थीदशेतील देशाभिमानी वृत्तीमुळे म्हणा, त्यांचे युरोपियन चाहते नि मित्र युद्ध-काळात त्यांच्या हालचालीकडे संशयी दृष्टीनेच पाहत. "तेव्हापासून बरेच युरोपियन सभ्य गृहस्थ माझ्याशी पहिल्यासारखे मनमोकळे करून नीट न बोलता मला पाहिल्या-बरोबर कपाळास आठ्या घालू लागले. तेव्हा मी त्यांच्या घरी जाणे येणे बंद केले."[२] असे जोतीरावांनी आपल्या 'गुलामगिरी' ह्या ग्रंथात म्हटले आहे.

अठराशे सत्तावन सालचे क्रांतियुद्ध अपेशी ठरले याविषयी जोतीरावांच्या मनावर जी प्रतिक्रिया झाली, ती जशी एखाद्या ज्वलंत देशभक्ताच्या मनावर व्हावी तशी झाली नाही. "देवाजीने शूद्रांवर दया करून इंग्रज बहादराच्या हातून भट नानाचे बंड मोडविले म्हणोन बरे झाले. नाहीतर त्या शादावलाच्या पुढल्या लिंगापुढे रुद्र करणाऱ्या सुधारलेल्या भटांनी आज पावेतो कित्येक महारांस एकेरी धोतर नेसल्यामुळे, अथवा कीर्तनामध्ये संस्कृत श्लोकांचा उच्चार केल्यामुळे काळे पाणी दाखविले असते,"[३] असे त्यांनी म्हटले आहे. आपल्या देशबांधवांना हीन दर्जाचे मानणाऱ्या मनुष्यांचा देशाभिमान जोतीरावांना खोटा, बेगडी नि अपवित्र वाटे. जोतीराव म्हणत: "इंग्रज लोक आज आहेत उद्या नाहीत. ते आपल्या जन्मास पुरवतील म्हणोन कोणाच्याने खात्री देऊन सांगवत नाही. यास्तव त्या लोकांचे राज्य या देशात आहे तोच आपण सर्व शूद्रांनी जलदी करून भटांच्या वडिलोपार्जित दास्यापासून मुक्त व्हावे यातच मोठा शहाणपणा आहे."[४]

इंग्रजांचे राज्य आज ना उद्या लयास जाणार ह्याविषयी जोतीरावांची खात्री होतीच. परंतु इंग्रजांच्या राजवटीचा काळ हा सामाजिक सुधारणेला आणि प्रगतीला पोषक आहे, असा त्यांना विश्वास वाटत होता. त्यामुळे शूद्रांनी प्रथम सामाजिक गुलामगिरी झुगारून द्यावी यावरच त्यांनी भर दिला. "सामाजिक सुधारणा करण्यास आजमित्तीस आम्हांस जितकी अनुकूल वेळ आली आहे तितकी पूर्वी कधीही आली नव्हती...यावरून काय दिसते की, सामाजिक व धार्मिक सुधारणा करण्यास पारतंत्र्य जितके अनुकूल आहे, तितके स्वातंत्र्य नाही!"[५] असे पुढे वीस वर्षांनी समाजसुधारक आगरकर यांनीही म्हटले आहे.

जोतीरावांनी त्या क्रांतियुद्धाच्यावेळी इंग्रजांच्या बाजूनेही युद्धकार्यात भाग घेतला

---

२. फुले, जोतीराव गोविंदराव, गुलामगिरी, पृ. १६८.
३ —कित्ता— पृ. १५७.
४. —कित्ता— पृ १५७.
५. अळतेकर, प्रा. माधव दामोदर, संपूर्ण आगरकर, निबंध संग्रह, भाग १ ला, पृ. १३६–३८.

नाही. ते त्यासंबंधी मनाने कांहीसे अलिप्त, एकाकी होते. ते क्रांतियुद्ध खऱ्या अर्थाने जनतेने चालविलेले नसल्यामुळे ते बंडखोर नेते यशस्वी होणार नाहीत, असे त्यांना वाटले असावे. बंडाच्या बाबतीत दक्षिण हिंदुस्थान काहीसा उदासीन होता. पुण्यामध्ये बंड करण्यास कोणी ब्राह्मण नेताही उठला नाही.

परकीय सुराज्य हे स्वराज्याची बरोबरी करू शकणार नाही, त्याला त्याची सर येणार नाही, ह्या तत्त्वावर जोतीरावांचा विश्वास नव्हता असे म्हणणे योग्य होणार नाही. त्याचा अर्थ एवढाच करावयाचा की त्यांच्या मते सामाजिक प्रगतीला नि क्रांतीला प्रतिकूल ठरलेल्या ब्राह्मणी राज्यापेक्षा इंग्रजराज्य परवडले. नानासाहेब पेशवे यशस्वी झाले असते, तर ब्राह्मणाचे जातिश्रेष्ठत्व मानणारे, अन्यायी नि प्रतिगामी ब्राह्मणीराज्य पुन्हा महाराष्ट्रात आले असते अशी त्यांना भीती वाटत होती. त्यांच्या राजनिष्ठेचा हा एवढाच अर्थ होऊ शकेल. त्यामुळे त्या क्रांतियुद्धासंबंधी ते निर्विकारबुद्धीने विचार करू शकले नसावेत. नाहीतर 'बॉम्बे टाइम्स'सारख्या साम्राज्यवादी पत्राने ज्याचा उल्लेख 'एक भयंकर राष्ट्रीय बंड' असा केला, त्याचे मर्म त्यांना कळले असते.

जोतीराव हे राजकीय विचारवंत नव्हते. ज्याप्रमाणे सामाजिक किंवा धार्मिक आंदोलन हे जसे परिवर्तन घडवून आणण्याचे एक साधन आहे, त्याप्रमाणे राज्यक्रांती हीसुद्धा समाजामध्ये परिवर्तन घडवून आणण्याचे एक साधन आहे. तिच्यासंगे नवीन ध्येय नि नवीन जीवनमूल्ये उद्भूत होतात, ह्या गोष्टींचा त्यांनी विचार केलेला नव्हता. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे ह्यांनी तर त्या क्रांतियुद्धाच्या नेत्यांना संन्यस्त, तत्त्वज्ञानी नि अविचारी[६] म्हणून त्यांची संभावना केली आहे. नवशिक्षण नि नवे विचारस्वातंत्र्य यांनी दिपून गेलेल्या त्या पिढीतील नवशिक्षितांना त्या घटनेचा अर्थच आकलन झाला नाही हे काही अंशी खरे असले, तरी ते कुलहीन, राष्ट्रहीन, समाजहीन होते हे राजवाड्यांचे मत अतिरेकी वाटते.

महारमांग मुलांच्या शाळांची परीक्षा बाबाजी मुनाजी यांच्या कोळशाच्या वखारीमध्ये मंगळवार, २ फेब्रुवारी १८५८ रोजी सायंकाळी झाली. प्रतिष्ठित हिंदी आणि युरोपियन गृहस्थांचा मोठा समुदाय त्या समयी उपस्थित होता. पुण्याचे न्यायाधीश सी. एम. हॅरिसन हे अध्यक्षस्थानी होते. पुणे महाविद्यालयाचे प्राचार्यपदी विराजमान झालेले विख्यात इंग्रज लेखक एडविन आरनॉल्ड हे आपल्या पत्नीसह समारंभास उपस्थित होते. इनामंमंडळाचे आयुक्त ले. सी. जे. ग्रिफीत, रे० जे. मिचेल, बापू रावजी, फ्रामजी नसरवानजी, अण्णासाहेब चिपळूणकर आणि इतर सरकारी अधिकारीही अगत्याने उपस्थित होते.

त्या वेळी शाळेचा वृत्तांत वाचून दाखविण्यात आला. महारमांग मुलांनी १८५६ ते १८५८ पर्यंत कसकशी प्रगती केली हे संयुक्त कार्यवाह वामन प्रभाकर यांनी वाचून

---

६. राजवाडे, वि. का., ऐतिहासिक प्रस्तावना, पृ. ३५९.

दाखविले. ह्या शाळांतील अभ्यासात पुढे गेलेल्या मुलांना फ्री चर्च मिशनच्या इंग्रजी शाळांत प्रवेश देण्यात आला. परंतु त्या बहुतेक विद्यार्थ्यांनी पुढे शाळा सोडली. ह्याविषयी चर्चा करणे मोठे कंटाळवाणे होईल, असे त्या इतिवृत्तात म्हटले होते. 'पावसाळ्यात आणि हिवाळ्यात मुलांची उपस्थिती कमी होते. कारण मुलांची घरची परिस्थिती इतकी वाईट असते की, पाऊस आणि थंडी ह्यांपासून रक्षण करण्याइतके त्यांच्यापाशी कपडे नसतात. यास्तव मुलांना अधिक मोठे विद्यावेतन देऊन त्यांच्यासाठी एक स्वतंत्र शिक्षकाची शाळा स्थापन केली पाहिजे. त्यांना उद्योगधंदे आणि कला शिकविण्यासाठी महारमांगांच्या शाळांना औद्योगिक विभाग जोडला पाहिजे. म्हणजे शाळा सोडल्यावर ते आपला उदरनिर्वाह स्वतंत्रपणे आणि निर्धोकपणे करावयास समर्थ होतील.'

त्या इतिवृत्तात आणखी पुढे असे म्हटले होते की, सरकारने पाच सहस्र रुपयांची एक उदार देणगी शाळेची इमारत बांधण्यासाठी संमत केली आहे. त्या इमारतीच्या बांधकामास आता लौकरच सुरुवात होईल. सरकारने आता मोठ्या उदार अंतःकरणाने शाळागृहासाठी जागाही दिली आहे. युरोपियन लोकांनी १८५७ सालच्या क्रांतियुद्धामुळे ह्या महारमांगाच्या शाळांना देणगी देण्याचे थांबविले. त्याविषयी प्रतिवृत्तात म्हटले आहे की, "कित्येक एतद्देशीय आणि युरोपियन सद्‌गृहस्थांनी अलीकडे शाळांना द्यावयाची वर्गणी व देणगी थांबविल्यामुळे संस्थेची आर्थिक परिस्थिती इतकी खालावली आहे की, तिला आपल्या तीन शाळांपैकी कमीत कमी एक शाळा तरी बंद करावयास लागणार आहे, ही मोठी दुःखाची गोष्ट आहे आणि ती अप्रिय अशी गोष्ट करावी लागणार आहे."

"ज्या वेळी महार आणि मांग ह्यांना शिक्षणाची उपयुक्तता कळू लागली आहे आणि ते अधिक चांगल्या शिक्षकांची मागणी करीत आहेत, त्याच वेळी निरुपायाने संस्थेला तीनपैकी एक शाळा बंद करावी लागणार आहे. जर उदार गृहस्थांनी सढळ हातांनी या शाळांना साह्य केले नाही, तर एक शाळा बंद करण्याचे दुःखद कार्य अटळ ठरेल."

न्यायाधीश हॅरिसन आपल्या भावनोत्कट अध्यक्षीय भाषणात म्हणाले, "निःस्वार्थ बुद्धीने प्रयत्न करून ह्या शाळा काढणारा संस्थापक आणि त्याला साह्य करणारे ह्या संस्थेचे सभासद हे सर्व स्तुतीस पात्र आहेत. त्यांच्या कार्यात त्यांना माझी पूर्ण सहानुभूती आहे. आणि त्यांना माझा नैतिक पाठिंबा आहे. एवढेच नव्हे तर, जे जे मला करता येईल ते ते साह्य मी करीन." ह्या घटनेनंतर वीस वर्षांनी हंटर शिक्षणमंडळाला पाठविलेल्या निवेदनात जोतीरावांनी असे म्हटले आहे की, 'मी स्थापन केलेल्या शाळांत मी आणि माझ्या पत्नीने नऊदहा वर्षे कार्य केले.'[७] त्या म्हणण्यास हॅरिसनसाहेबांच्या भाषणावरून दुजोरा मिळतो.

शाळांचे कार्य व्यवस्थित चालू झाल्यानंतर आणि दोन्ही संस्थांतील सभासद आणि

---

७. Education Commission, Bombay, Vol. II, p. 141.

जोतीराव यांचेमध्ये मतभेद वाढू लागल्यामुळे सरतेशेवटी त्यांनी त्या दोन्ही संस्था सोडून दिल्या. 'ज्ञानोदया'ने त्या वेळी असे म्हटले की, युरोपियन लोकांनी ह्या शाळांना मदत करण्याचे बंद केल्यामुळे पुण्याच्या उदार आणि देशाभिमानी एतद्देशीय लोकांनी त्या शाळांना मदत करू नये ही अत्यंत शरमेची गोष्ट आहे. ह्या महारमांगांच्या शाळेकडे पाहण्याचा सरकारी शिक्षणखात्याच्या संचालकांचा दृष्टिकोण निराळा होता. ज्यांना पुस्तकी ज्ञान शिकणे कठीण जाते किंवा निरुपयोगी वाटते, त्यांच्या कल्याणासाठी प्रत्येक जिल्ह्यात एक स्वतंत्र शाळा असावी असे त्यांचे मत झाले होते. आपल्या १८६१/६२ च्या इतिवृत्तात ते पुण्याच्या महारमांगांच्या शाळेविषयी म्हणतात, 'पुण्यातील महार-मांगांच्या शाळांना आलेले ढळढळीत अपयश पाहून माझे मत दृढ झाले आहे. त्या शाळांना गेल्या वर्षापासून अनुदान देण्याचे बंद केले आहे.'[८]

जोतीरावांच्या संस्थेला शाळागृह बांधता आले नाही; कारण सरकारने संमत केलेली रक्कम त्यांना मिळू शकली नाही. त्यांनी शाळांचे काम सोडल्यानंतर त्या शाळांचा ऱ्हास झाल्यामुळे म्हणा किंवा त्या शाळा चालवणाऱ्या संस्थेच्या सभासदांचा उत्साह हळूहळू कमी झाला म्हणून म्हणा, ती रक्कम त्यांना मिळू शकली नाही. जोतीरावांचे एक प्रमुख सहकारी सदाशिवराव गोवंडे हे तर सार्वजनिक सभेचे १८७० साली पहिले प्रमुख कार्यवाह झाले.

महारमांग मुलांची एक शाळा, सरकारने दिलेल्या जमिनीवर उभारलेल्या झोपडीमध्ये चाले. पुढे २४ सप्टेंबर १८७४ या दिवशी झालेल्या सरकारी ठराव क्र. ५४२१ प्रमाणे ती शाळा 'लोकलफंड कमिटी'ला सरकारने चालवावयास दिली. आणि त्यासाठी खास अनुदानही मंजूर केले. शेवटी १३ नोव्हेंबर १८९४ रोजी सरकारी ठराव क्र. १९२१ प्रमाणे ती शाळा पुणे नगरपालिकेच्या स्वाधीन करण्यात आली. दुसऱ्या शाळा १८६९ पर्यंत चालू होत्या. आपल्या १८६८।६९ सालच्या प्रतिवृत्तात सरकारी शिक्षणखात्याचे संचालक म्हणतात, "दक्षिणा निधीतून पुण्यातील मुलींच्या ज्या चार शाळांना अनुदान मिळते त्यांची प्रगती काहीच झालेली नाही."

.२.

जोतीरावांचे लक्ष आता एका महत्त्वाच्या सामाजिक सुधारणेकडे ओढले गेले होते. ते व्यवहारदक्ष समाजसुधारक असल्यामुळे त्यांच्या बुद्धीला, ज्या धार्मिक रूढी आणि घातुक सामाजिक चालीरीती पटत नव्हत्या, त्यांच्यावर प्रहार करावयास त्यांनी आरंभ केला. सामाजिक सुधारणेचे दरवाजे त्यांनी उघडले. समता, स्वातंत्र्य आणि बुद्धि-प्रामाण्य ह्यांच्या पायावरच त्यांना समाजाची नवीन रचना करावयाची होती.

---

८. Report of the Director of Public Instruction for the year 1861-62, p. 44.

पाश्चात्त्य शिक्षण आणि विचार यांच्या प्रकाशात हिंदुस्थान जगातील नवविचारांबरोबर हळूहळू पाऊल टाकू लागला होता. आपल्या जुनाट घोर नि निष्ठुर रूढी आणि दुराग्रही परंपरा झिडकारून टाकू लागला होता. आपल्या बंधूची पत्नी चितेवर स्वतःच जाळून घेऊन मेल्यामुळे शोकाने जणू झपाटले गेलेले राममोहन रॉय यांनी सतीची चाल बंद करण्यासाठी सरकारला साह्य केले. सरकारने ती सतीची चाल १८२९ मध्ये बंद केली. तरीसुद्धा ती क्रूर चाल १८५२ पर्यंत संपूर्णतया नाहीशी झालेली नव्हती असे दिसते. मुंबईच्या 'टेलिग्राफ अँड कूरियर' या वृत्तपत्रात नोव्हेंबर १८५२ मध्ये अशी एक बातमी प्रसिद्ध झाली की, भूज येथे इंग्रज अधिकाऱ्यांनी एका दुर्दैवी बाईला चितेवरून बाहेर ओढण्याचा प्रयत्न केला. त्या बाईला जगण्याची प्रबळ इच्छा होती. चितेच्या भोवती असणाऱ्या ब्राह्मणांनी तिला बळेच चितेकडे ओढीत आणले. पण जेव्हा तिने फिरून पळण्याचा प्रयत्न केला तेव्हा तिच्या डोक्याची त्यांनी छकले केली.

त्या काळी अनेक वेडगळ आणि निष्ठुर रूढींनी लोकांना ग्रासले होते. बंगालमध्ये अशी एक वेडगळ समजूत होती की, आजारी माणसाला गंगेच्या तीरावर उघड्यावर ठेवून मृत्यू आला, तर मृत्युसमयी त्या मरणाऱ्या माणसाच्या मनात गंगेविषयी विचार आल्यामुळे त्याला स्वर्गप्राप्ती होते. आजारी माणसांना घरी शांतपणे प्राण सोडू देत नसत. गंगेच्या तीरावर अशा तऱ्हेने आपल्या नातलग माणसाला मरण येणे, ही मोठी भाग्याची, अभिमानाची आणि धार्मिकतेची गोष्ट समजत. दुःख नि गुन्हा यांना जन्म-देणाऱ्या गंगेच्या घाटावरील त्या खुनांविषयी भयंकर हकीगती 'कलकत्ता रिव्ह्यू' प्रसिद्ध करीत असे. देवासाठी नदीत किंवा कड्यावरून जीव देणे, नरबळी देणे ह्या रूढी काही कमी क्रूर नव्हत्या. लहान मुलींची हत्या करण्याची मध्ययुगीन रूढी हिंदुसमाजातल्या जाडेजा रजपूत जातीत चालू होती. परंतु पुढे इंग्रज राज्यकर्त्यांनी १८७८ साली निर्बंध करून त्या चालीचा नायनाट केला. त्या काळी धर्मभोळ्या व्रतस्थ स्त्रिया अहोरात्र जागून तांदळाचे किंवा गव्हाचे दाणे एक लक्ष होईपर्यंत मोजीत बसत. नंतर ते देवाला भक्तिभावाने अर्पण करीत असत. निरनिराळ्या प्रकारच्या एक लक्ष वाती देवापुढे अनन्यभावे लावीत असत. गाईंना श्रद्धापूर्वक दाणे खायला घालून तिच्या शेणातून बाहेर पडलेले ते दाणे मनोभावाने खाणे हे पुण्यकारक समजत. अशा धर्मभोळ्या लोकांच्या अजाणपणामुळे भटभिक्षुक आपली पोळी पिकवून घेत. धर्मभोळ्या स्त्रियांच्या ह्या उग्रव्रतांचा शेवट ब्राह्मणांना मोठी दक्षिणा आणि भोजन देऊन, त्यांचे पारणे फेडण्यात होई.

ह्या सर्व धर्मभोळ्या आणि वेडगळ समजुतींवर हल्ला करण्याची जोतीराव आता सिद्धता करीत होते. महाराष्ट्रातील पेशव्यांची ब्राह्मणी सत्ता नष्ट झाल्यावर ब्राह्मणांच्या अधिकाराविषयी लोक चिकित्सक दृष्टीने विचार करू लागले. इंग्रज राजवटीत ब्राह्मणांची धार्मिक आणि सामाजिक सत्ता ढासळू लागली. शंकराचार्यांनी १८२७ साली पुण्याला भेट दिली. त्या वेळी ते दक्षिणा म्हणून तोंडास येईल ती रक्कम भाविकांकडे मागू लागले.

शंकराचार्यांच्या या अरेरावीविरुद्ध पुणे जिल्हाधिकाऱ्याकडे काहींनी तक्रार केली. त्या इंग्रज अधिकाऱ्याने शंकराचार्यांना समज दिली की, लोक स्वखुषीने जेवढी दक्षिणा देतील तेवढीच त्यांनी घ्यावी.[९] तोंडास येईल तो दक्षिणेचा आकडा सांगण्याची सवय पेशव्यांच्या राजवटीत शंकराचार्यांना जडली होती. निर्बंधाचा अंमल ब्राह्मणावरही चालू लागला होता. काशीमध्येसुद्धा आता ह्या भूदेवांना शिक्षा होऊ लागली होती.[१०] त्यापूर्वी ब्राह्मणांना गुन्ह्याबद्दल सहसा शिक्षा होत नसे.

दळणवळणाचे नवीन सुलभ मार्ग, पाश्चात्त्य शिक्षण, लोहमार्ग आणि सरकारी अधिकाऱ्यांच्या निरनिराळ्या शहरांतून आणि गावांतून होणाऱ्या बदल्या, ह्यांमुळे हिंदी चालीरीतींच्या कडकपणाला आणि दूषित पूर्वग्रहांना जबरदस्त धक्का बसला. त्याबरोबर प्राचीन एकत्र कुटुंबपद्धतीला तडे जाऊ लागले. आपल्या नोकरीच्या स्थळी आपली पत्नी घेऊन जाण्याकडे प्रत्येक सुशिक्षिताचा कल होऊ लागला. सुशिक्षित मुली आपल्या सहचारिणी असाव्यात असे सुशिक्षितांना वाटू लागले. मुलींनी प्राथमिक शिक्षण घेण्यास सुरुवात केल्यामुळे लग्नाचे वय साहजिकच वाढू लागले होते. त्यामुळे मुलीच्या विवाहाला कमीतकमी वयोमर्यादा काय असावी या प्रश्नाचा विचार होऊ लागला. त्या प्रश्नाबरोबरच विधवाविवाहाची समस्या निर्णयासाठी पुढे येऊ लागली.

मृतपतीबरोबर सती जाण्याची चाल खिस्तपूर्वकालीन भारतात होती. नवव्या शतकापर्यंत विधवाचे केशवपन करण्याची चाल प्रचारात नव्हती. फक्त जोगणी आणि जोगी हेच काय ते मुंडण करीत असत. मुंडण केल्यामुळे विधवेला वैराग्यशीलतेचे स्वरूप येई. तिने आपले पुढचे आयुष्य ब्रह्मचर्यावस्थेत कंठावे अशी अपेक्षा असे. यास्तव तिच्या सौंदर्याचा नाश करण्याची आवश्यकता वाटे. इ. स. १००० पर्यंत बालविधवांचे विवाह होत असत. पूर्वीच्या काळी विधवांचे केशवपन करीत नसत. मात्र त्यांना केसाला तेल लावण्याची मोकळीक नसे. केशवपनाची चाल बाराव्या शतकापासून प्रचारात येऊ लागली. प्रारंभी केवळ ब्राह्मण विधवांचेच केशवपन करीत असत. पुढे ती चाल सरसकट वरिष्ठ वर्गात हळूहळू पसरली. ती दक्षिण हिंदुस्थानपेक्षा उत्तर हिंदुस्थानात अधिक प्रचारात होती. दक्षिण हिंदुस्थानात त्या चालीला श्रीवैष्णवानी कडाडून विरोध केला.[११]

विधवांचा होत असलेला अमानुष छळ पाहून इंग्रज सरकारने १८२९ साली निर्बंध करून जरी सतीच्या चालीला बंदी केली, आणि चितेच्या ज्वालापासून तिला वाचवली, तरी तिला विधवा अवस्थेत हालअपेष्टा नि अपमान ह्यांना जन्मभर तोंड देत देत अतिशय खडतर आयुष्य कंठावे लागे. तिच्या डोक्याचे मुंडण होई आणि अन्यायी वारसा हक्काच्या कायद्यामुळे तिचे अतिशय हाल होत. अत्यंत दुःखी आणि कष्टी असे

९. गोखंडे, डॉ. वि. भा., त्रिमूर्तिदर्शन, पृ. ४३.

१०. फाटक, न. र., न्या. महादेव गोविंद रानडे यांचे चरित्र, पृ. १११.

११ Altekar, Dr. A. S., Position of Women in Hindu Civilization, p. 188.

तिचे जीवन कुटुंबप्रमुख माणसाच्या लहरीवर अवलंबून असे. हिंदुशास्त्रप्रणीत रूढी आणि परंपरा ह्यांनी तिचे आयुष्य करकचून बांधून टाकण्यात आले होते.

विधवेचे दर्शन झाले तर ते एक मोठे अशुभ चिन्ह मानण्यात येई. प्रातःकाळी विधवेचे दर्शन अमंगल म्हणून टाळण्यात येई. सकाळी तिचे मुख पाहण्यास कोणीही राजी नसे. घरात फिरण्याची तिला मोकळीक नसे. तिचे दर्शन अशुभ मानण्यात आल्यामुळे घरातील एखाद्या काळोख्या कोपऱ्यात अपमानित आणि बहिष्कृत असे जीवन तिला कंठावे लागे. तिचे दागिने हिरावून घेण्यात येत असत. तिला चांगले कपडे घालता येत नसत. आपल्या मुलांच्या विवाहसमारंभाला किंवा मुंजीलाही तिला उपस्थित राहता येत नसे. अथवा दुसऱ्या कोणत्याही शुभ प्रसंगी तिला उपस्थित राहता येत नसे. एखाद्या कोपऱ्यात ती खंगून खंगून मरे.

ती आपल्या आईबापांच्याही डोळ्यांत सले. नवऱ्याच्याऐवजी ही अवदसा मेली असती, तर आपली दुसरी मुलगी त्या विधुराला दिली असती, अशा निर्दय शब्दांचा तिच्यावर वर्षाव होई. सुधारक म्हणत, विधवेचे फक्त मंगलसूत्रच काढून घ्यावे. तिच्या बांगड्या, केस, कुंकू नि आंबाडा ही तिच्या कौमार्यावस्थेत असतात तशीच ठेवली पाहिजेत. तो तिचा हक्क आहे. जसे तिचे हातपाय तसे तिचे केस. हातपाय जर तोडले जात नाहीत, तर केशवपन तरी का करावयाचे? केशकलाप मृतपतीला काय कामाचा? स्वतःचे तिसरे चौथे लग्न करणारा स्वार्थी अन् कामुक ब्राह्मण स्वतःच्या मुलीने केस ठेवले तर तिच्या हातचे पाणी घेत नसे. अशा केविलवाण्या स्थितीत ती विधवा म्हणे,

'मी लाडकी, अण्णा तुमची लाडकी! मला कशी करता हो बोडकी!'

कवीमागून कवींनी विधवेच्या या खडतर दुर्दैवाला तोंड फोडले. तिचे दारुण दुःख वेशीवर टांगले. परंतु व्यर्थ. शोकात आणि दुःखातच तिचा अंत एखाद्या कोनाड्यात होई अथवा व्यभिचारात बुडून भ्रूणहत्येने तिचे हात लाल होत. त्यामुळे तिचे आईबाप आणि तिचा नवरा ज्या कुटुंबात जन्मास आलेले असत, त्या सर्व कुटुंबांना काळिमा लागत असे.

महाराष्ट्रात विधवांच्या पुनर्विवाहासाठी १८४० सालापासून प्रचार सुरू झाला. पुण्यातील विष्णुशास्त्री बापट नावाचे एक गृहस्थ हे विधवाविवाहाचे आद्य प्रचारक होत. इ. स. १८४२ त बेळगाव येथे दोन ब्राह्मण विधवांचा पुनर्विवाह झाला. परंतु याचा विशेष बभ्रा झाला नाही. मनु आणि याज्ञवल्क्य यांच्या आज्ञा धुडकावून विधवांना त्यांच्या दुस्सह दारुण स्थितीतून मुक्त करावे असा टाहो लोकहितवादी गोपाळराव देशमुख यांनी फोडला.

मुंबई येथे १८५२ च्या ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात हिंदुसमाजाची ह्यासंबंधी एक जंगी सभा भरली. हिंदु विधवांचा पुनर्विवाह युक्त आहे की अयुक्त आहे याचा विचार करण्यासाठी ती सभा भरली होती. पाचशेवर लोक जमले होते. मुंबईतील त्या काळचे मोठे पंडित गंगाधर अप्पा शास्त्री हे त्या सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारणार

होते. ते विधवांनी पुनर्विवाह करावा अशा मताचे असून त्यांनी आपल्या लिखाणातून तसा प्रचारही केला होता. परंतु सनातन्यांकडून आपला छळ होईल या भीतीने ते त्या सभेस उपस्थित राहिले नाहीत. त्यांच्याऐवजी भवानी विश्वनाथ कानविंदे नावाच्या एका प्रमुख व्यक्तीने मोठ्या धैर्याने अध्यक्षपद स्वीकारले. सुधारकांना विरोध करण्यासाठी सनातनी शास्त्रीमंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. त्याचा परिणाम व्हायचा तोच झाला. कडाक्याचा वादविवाद होऊन सभा मोडली.[१२] समाजामध्ये सदा सनातन्यांचेच बहुमत असते. सुधारक नेहमी अल्पमतातच असतात.

हिंदुस्थानात २५ जुलै १८५६ रोजी विधवाविवाहाचा कायदा हिंदी सरकारने संमत केला. १८५६ च्या ह्या पंधराव्या कायद्याप्रमाणे कोणत्याही हिंदू विधवेला, तिला पसंत असेल तर, पुनर्विवाह करण्याची मोकळीक मिळाली. इतर हिंदू मुलांप्रमाणे तिचीही मुले मालमत्तेवरील वारसाला पात्र आहेत, असे त्या कायद्यात म्हटले होते. ब्रिटिश लोकसभेने १८५७ साली घटस्फोट देण्याचा स्त्रियांचा हक्क मान्य केला. १८५७ साली महाराष्ट्रात आणखी एक महत्त्वाची गोष्ट घडली. ती म्हणजे 'यमुना पर्यटन' या नावाची बाबा पदमनजी यांनी प्रसिद्ध केलेली कादंबरी होय. मराठी भाषेतील ह्या पहिल्या सामाजिक कादंबरीने हिंदू विधवांची दुःखे जगाच्या वेशीवर टांगली.

अठराशे चौपन्न साली शंकराचार्यांनी[१३] एका पतित विधवेच्या प्रकरणाचा निर्णय केला. दक्षिणा म्हणून काही रक्कम घेऊन शंकराचार्यांनी तिच्या बापाला आपल्या पायाच्या आंगठ्याचे तीर्थ आणि पंचगव्य देऊन त्याचा शुद्धिसमारंभ करण्यास आज्ञा दिली. तथापि त्या गरोदर असलेल्या विधवामुलीची शुद्धी कशी करावी, असे त्या ब्राह्मणाने विचारताच, शंकराचार्यांनी आज्ञा केली की, 'त्या व्यभिचारिणी विधवा तरुणीला आम्र-वृक्षाच्या बुंध्याच्या ढोलीत ठेवावे. आणि त्या बुंधाऱ्याला आग लावावी. बरीच धग लागल्यावर तिला बाहेर काढावे. नंतर तिचे वपन करून सहस्र ब्राह्मणांना भोजन घालावे म्हणजे ती शुद्ध होईल.' तात्पर्य काय की कोणत्याही तऱ्हेचे पातक ब्राह्मणांना दक्षिणा देऊन फेडता येते, पुण्य विकत घेता येते अशी समजूत असे. तसेच प्रत्येक धार्मिक किंवा सामाजिक विधी वा संस्कार ब्राह्मणांना दक्षिणा किंवा भोजन देण्याचे एक भले मोठे साधन होऊन बसले होते.

विधवांचे केशवपन करण्याची ही दुष्ट चाल जरी मोडत आली होती, तरी ती विसाव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत कुठे कुठे तग धरून राहिली होती. एका ब्राह्मणाची तरुण भगिनी विधवा झाली. ती मृत्यू पावली. तिने केशवपन केले नसल्यामुळे ब्राह्मणांनी तिचा अंत्यसंस्कार करण्याचे व प्रेतयात्रेस उपस्थित राहण्यास नाकारले. तिचे केशवपन करावे तर मृत विधवेचे केशवपन करण्यास नापित तयार होईना. शेवटी तिच्या ब्राह्मणेतर

१२. The Bombay Guardian, 28 October 1853.

१३. फाटक, न. र., न्या. महादेव गोविंद रानडे यांचें चरित्र, पृ. ११०.

शेजाऱ्यांनी तिला भडाग्नी दिला. अशीच एक गोष्ट १९३० सालच्या दरम्यान घडली. महाराष्ट्रातील सामाजिक समतेचे एक मोठे पुरस्कर्ते आणि अस्पृश्यतेच्या उच्चाटनासाठी झगडणारे समतानंद अनंत हरि गद्रे यांनी आपल्या सुप्रसिद्ध 'निर्भीड' साप्ताहिकामध्ये ती प्रसिद्ध केली होती. नाशिक येथील फाळके घराण्यातील विधवेची ती गोष्ट. ती विधवा निवर्तली. तेव्हा ब्राह्मणांनी तिच्या प्रेतयात्रेस उपस्थित राहण्याचे नाकारले. कारण त्या विधवेने केशवपन केलेले नव्हते. शेवटी निर्दयपणे एका नापिताकडून तिच्या प्रेताचे केशवपन केल्यावर ब्राह्मणांनी तिचे प्रेत उचलले.[१४]

. ३ .

विधवांच्या पुनर्विवाहाचा प्रश्न हा जरी ब्राह्मण आणि तत्सम उच्च जातींशी निगडित होता, तरी विधवांची ती दैन्यावस्था पाहून जोतीरावांचे मन गहिवरले. त्यांचा नैतिक अधःपात पाहून त्यांचे मन द्रवे. भ्रूणहत्त्येच्या रक्ताने माखलेले त्यांचे हात पाहून त्यांच्या मनाला दुःखाचे कड येत. अन्यायाचा प्रतिकार करणे हा जोतीरावांचा बाणा. त्यांनी स्त्रियांच्या पुनर्विवाहाच्या चळवळीस सक्रिय पाठिंबा देऊन तीत पुढाकारही घेतला. हिंदू स्त्रीला तिच्या जुनाट बंधनांतून मुक्त करावयाचे होते. हिंदू स्त्री आता सुधारणेच्या मार्गावर येऊन उभी राहिली होती. तिच्या जीवनात आता मोठे स्थित्यंतर घडणार होते.

शेणवी जातीतील एका विधवेचा एका शेणवी विधुराबरोबर ८ मार्च १८६० रोजी पुण्यात पुनर्विवाह झाला.[१५] ती विधवा अठरा वर्षांची होती. ती बातमी प्रसिद्ध करून 'ज्ञानप्रकाशा'ने असे म्हटले की, 'आम्ही याच्यावर काही मत देण्याची आवश्यकता नाही.' जोतीरावांनी १८६४ साली एका शेणवी विधुराचा पुनर्विवाह घडवून आणला असे जे म्हणतात तो पुनर्विवाह वर उल्लेखिलेला पुनर्विवाहच असावा असे दिसते. अशाच लहान गोष्टी महान सुधारणांच्या आद्यप्रवर्तक ठरतात. ह्या घटनेनंतर चार वर्षांनी विष्णुशास्त्री पंडित ह्यांनी विधवांच्या पुनर्विवाहाच्या प्रसारास आपले आयुष्य वाहून घेतले.

विधवांच्या दुष्कृत्यांमुळे गुन्हे आणि शोककथा निर्माण होत. उक्ती आणि कृती यांचा सुंदर संगम झालेले स्वप्नाळू आणि कृतिशूर जोतीराव यांनी विधवांना गुप्तपणे येऊन बाळंत होण्यासाठी आणि आपली मुले तेथे ठेवण्यासाठी एक बालहत्याप्रतिबंधकगृह स्थापन केले. त्याची माहिती देणारी भिंतपत्रके पुणे शहरात घराघरांवर लावण्यात आली. 'विधवांनो, इथे येऊन गुप्तपणे आणि सुरक्षितपणे बाळंत व्हा. तुम्ही आपले मूल न्यावे किंवा इथे ठेवावे हे तुमच्या खुषीवर अवलंबून राहील. त्या मुलांची काळजी हा अनाथाश्रम घेईल.'

---

१४. निर्भीड, २२ मार्च १९३६.

१५. ज्ञानप्रकाश, १२ मार्च १८६०.

ह्या बातमीने पुण्यातील सनातन्यांची माथी भडकली. ते एकमेकाला विचारू लागले, हे बालहत्याप्रतिबंधकगृह काढणारी ही वल्ली कोण आहे ? अनेक वेळा उत्तर येई, 'अरे ही वल्ली दुसरी कोण असणार? जोतीबा! त्याच चांडाळाचे हे कृत्य असणार.' जोतीरावांचे नाव ऐकले म्हणजे त्यांचा राग अनावर होई. तो आपल्या वागणुकीने सर्व समाजाला काळिमा लावीत आहे असे ते संतापाने उद्गारत. सामाजिक परिवर्तने ही योगायोगाने घडून येत नसतात. ती कृतिशूर नि करारी लोकांच्या निर्धारातून जन्म पावत असतात.

जोतीरावांचे बालहत्याप्रतिबंधकगृह ही भारतातील अशा स्वरूपाची पहिली संस्था होय. ती एका ब्राह्मणेतराने मोठ्या धैर्याने, दयाभूत अंतःकरणाने आणि परोपकारबुद्धीने विशेषतः ब्राह्मणविधवांसाठी काढली होती. ब्राह्मण विधवांना दुष्कीर्ती, भ्रूणहत्त्या आणि बालहत्त्या ह्यांपासून वाचविण्यासाठी, आणि ब्राह्मण विधवांना आत्महत्येच्या व पोलीस कारवाईच्या पाशापासून वाचविण्यासाठी त्यांनी ही संस्था काढली होती. जरी ती संस्था गरोदर स्त्रियांसाठी काढली होती तरी त्या हेतूचा दुसरा एक चांगला कळत न कळत परिणाम घडला. खिस्ती मिशनऱ्यांकडे अशी जी अनाथ मुले जात ती जाणे बंद झाले.

हे बालहत्याप्रतिबंधकगृह चालवावयास समिती नेमावी असे जोतीरावांच्या मनात देखील आले नाही. ते आपली ही संस्था सरकारी साहाय्य आणि ब्राह्मण सहकारी ह्यांवाचून चालवीत असत. ब्राह्मण सभासद असलेल्या संस्थांच्या देखरेखीखाली मुलींच्या शाळा आणि महारमांगांच्या शाळा चालविताना त्यांना वाईट अनुभव आला होता. त्यांचे हात पोळले होते. त्यामुळे त्यांनी ब्राह्मण सभासदांची एखादी समिती नेमून आपले बालहत्याप्रतिबंधकगृह त्यांच्या हाती देण्याचे बुध्याच टाळले. जे लोक आपल्या आयाबहिणींना मानसिक यातना आणि केशवपनाचा दुर्धर प्रसंग ह्यांपासून वाचवू शकत नाहीत, ते ह्या संस्थेचे सभासद होण्यास नालायक आहेत असे ते मोठ्या त्वेषाने बोलत असत. कित्येक ब्राह्मण विधवांनी या बालहत्याप्रतिबंधकगृहात सुरक्षितपणे आणि गुप्तपणे आपली सुटका करून घेतली. अशा तऱ्हेने त्या नाखुषीने पापाचरणी बनलेल्या पापात्म्यांचे ते उद्धारक ठरले. त्यांनी हे बालहत्याप्रतिबंधकगृहाचे उदात्त कार्य अनेक वर्षे चालविले. अनेक नामांकित लोकांनी त्यांच्या ह्या कार्यासंबंधी कळकळ दाखविली.

याच सुमारास जोतीरावांचे वडील गोविंदराव आजारी पडले. जोतीरावांचे राजाराम नावाचे भाऊ आपल्या वडिलांबरोबर राहत असत. तेच सर्व मिळकतीची आणि घरच्या व्यवहाराची व्यवस्था पाहत होते. त्यांनी घरचे संसाराचे व्यवहार नीट चालविले होते. तरी गोविंदरावांना एका गोष्टीची चिंता लागून राहिली होती. जोतीरावांना मूलबाळ नसल्यामुळे त्यांना अत्यंत दुःख होई. त्यांनी दुसरे लग्न करावे म्हणजे त्यांना मुलेबाळे होतील असा ते त्यांना मोठ्या कळकळीने उपदेश करू लागले. जोतीरावांच्या श्वशुरांकडून त्यांना हा मुद्दा पटवून देण्यासाठी त्यांनी बराच प्रयत्न केला. जोतीरावांच्या श्वशुरांकडील मंडळीनेही त्यांनी दुसरा विवाह करावा अशी इच्छा प्रकट केली. जेव्हा त्या मंडळीने हे विचार जोतीरावांपुढे मांडले आणि त्यांनी त्याला संमती द्यावी म्हणून

आग्रह धरला तेव्हा जोतीरावांना अत्यंत दुःख झाले. त्यांना त्या विचाराची चीड आली. 'जर एखाद्या जोडप्याला मूल झाले नाही, तर स्त्रीवर वांझोटेपणाचा आरोप करणे हे अत्यंत निर्दयपणाचे कृत्य आहे. तिच्या पतीत वांझोटेपणाचे काही दोष नसतील कशावरून?' असे आपले विचार ते स्वतंत्रपणे बोलून दाखवीत. अशा स्थितीत त्या स्त्रीने 'मी दुसरा नवरा करणार आहे, असे म्हटले तर तिच्या नवऱ्याला काय वाटेल? त्याला तो अपमान आणि मानखंडना वाटणार नाही काय?' पुरुषाने पहिल्या पत्नीपासून मूल नाही म्हणून दुसरा विवाह करावा ही अत्यंत निष्ठुर अन् हृदयशून्य चाल आहे, असे जोतीरावांचे म्हणणे होते.

'बोले तैसा चाले' असा होता जोतीरावांचा बाणा. परंतु त्यांच्या पिढीतले नेते इतक्या उदात्त ध्येयाने वागत नसत. कृष्णशास्त्री चिपळूणकर ह्या बृहस्पतितुल्य शास्त्र्यांचा निर्देश करून टिळकांनी असे म्हटले आहे की, 'चिपळूणकरांच्या पिढीने पुण्यात दुर्गुण शिष्टमान्य करून सोडला आहे.'[१६] जोतीरावांच्या ह्या समकालीन नामांकित व्यक्तींमध्ये जोतीरावांची नैतिक उंची निःस्तुल होती. यामुळेच कर्मठ आणि बुरसटलेल्या प्रतिगाम्यांच्या प्रहारांना त्यांनी मुळीच दाद दिली नाही. जोतीरावांनी दुसरे लग्न केले नाही. वडिलांची इच्छा पूर्ण केली नाही. त्यांचा अढळ निर्धार पाहून त्यांच्या वडिलांची दारुण निराशा झाली. त्यांचे दुखणे विकोपास गेले. त्यातच त्यांचा अंत झाला.

जोतीरावांनी आपल्या वडिलांचे अंत्यसंस्कार केले. परंतु ब्राह्मणी शास्त्रात सांगितल्याप्रमाणे नव्हे. जीवनाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोण संपूर्णपणे बुद्धिवादी होता. त्यानुसार त्यांनी ते संस्कार केले. कावळ्यांना पिंड अर्पून मृतांना सद्गती मिळते ह्यावर त्यांचा मुळीच विश्वास नव्हता. त्याऐवजी त्यांनी अनाथ, अपंग लोकांना भोजन दिले. गरीब विद्यार्थ्यांना पुस्तके आणि इतर वस्तू दिल्या. वर्षश्राद्धाच्या दिवशी त्यांनी गरिबांना भोजन दिले. विद्यार्थ्यांना पुस्तके वाटली.

वडिलांच्या मृत्यूनंतर वडिलोपार्जित मालमत्ता, जागाजमीन ह्यांविषयी कडवट भाऊबंदकी व भांडणे सुरू झाली. आपल्या चुलत्याच्या कुटुंबाशी जंगम वा स्थावर मिळकतीसंबंधी भांडण करावयाचे जोतीरावांच्या मनात कधीही आले नाही. कौटुंबिक संपत्तीपेक्षा राष्ट्राच्या संपत्तीकडे त्यांचे अधिक लक्ष होते. राष्ट्राची संपत्ती म्हणजे मुले. आपल्या अनाथबालगृहात त्यांची ते जोपासना करीत. संपत्तीचा त्यांना लोभ नव्हता. आपल्या श्रमावर ते आपली उपजीविका करीत. आपल्या निर्वाहासाठी दुसऱ्यावर अवलंबून राहून सामाजिक कार्य करणे त्यांना आवडत नसे.

जोतीरावांचे सर्व आयुष्यच अपूर्व त्यागाचे आणि धैर्याचे प्रतीक होते. प्राचीनकाळी अशी एक चाल पडली होती की, जे जे शूद्र आपल्या बुद्धीच्या आणि कर्तृत्वाच्या बळावर समाजात प्रतिष्ठा पावत, ते ते पराक्रमी शूद्र, विश्वामित्रासारखे वा वाल्मीकीसारखे

१६. लो० टिळकांचे केसरीतील लेख, भाग ४ था, पृ. २९१.

वरिष्ठ वर्गात जाऊन बसत. त्यांच्यात मिसळून जात. ज्या वर्गात त्यांचा जन्म झाला होता, त्या शूद्र वर्गाला ते विसरून जात. त्याची कधी ते विचारपूसही करीत नसत. हिंदुस्थानातील प्राचीन काळचे बहुतेक सारे प्रसिद्ध साधुपुरुष आणि द्रष्टे यांचे जीवन हीच कथा सांगते. परंतु जोतीरावांचे जीवन हा एक तेजस्वी अपवाद ठरला. कनिष्ठ वर्गात जन्मास येऊन आणि वैयक्तिक भाग्योदयाची संधी आणि साधने प्राप्त झाली असताही त्यांचा उपयोग करून वरिष्ठ वर्गातील नामांकित व्यक्तींच्या मालिकेत जाऊन बसण्याची संधी त्यांनी झिडकारली. ते वरिष्ठ वर्गात समाविष्ट झाले नाहीत किंवा त्यांच्याशी त्यांनी तडजोडही केली नाही. यातच त्या अपवादाची अपूर्वाई आहे. कनिष्ठ वर्गांचे शिक्षण आणि त्यांचा उद्धार ह्यांविषयी ते अष्टौप्रहर विचार करीत असत.

जोतीरावांच्या पत्नी सावित्रीबाई, त्या बालहत्याप्रतिबंधकगृहातील मुलांची अविरतपणे वात्सल्याने सेवा करीत, लालनपालन करीत. त्यांना स्वतःला अपत्य नव्हते. तथापि त्या माऊलीने आपल्या दयाळू, उदार स्वभावाला अनुसरून त्या अर्भकांचे अत्यंत प्रेमाने आणि वात्सल्याने संगोपन केले. देवतातुल्य ती साध्वी शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या मुलांना अधूनमधून जेवायला बोलावी. मुलांना भोजन देण्याचा तिचा परिपाठच होता. मुलांना ती जीव की प्राण करीत असे. मुलांमध्ये वावरताना तिला अत्यंत सुखसमाधान लाभे. त्या धन्यतेने तिचे मुख प्रफुल्लित होऊन जाई.

त्या मुलांना कपडे घालण्यासाठी आणि खाणेपिणे देण्यासाठी ती कधीकधी आपल्या शेजारणींना बोलावीत असे. जोतीरावांनी काढलेल्या मुलींच्या शाळांत तिने अनेक वर्षे काम केले होते. ते तिचे कार्य म्हणजे हिंदुस्थानातील स्त्रियांच्या सार्वजनिक जीवनातील एक युगप्रवर्तक अशीच घटना होती. तिच्या कार्याची महत्ता केवढी अपूर्व होती ते पुढील एका गोष्टीवरून प्रत्ययास येईल. एका स्त्रीची १८७३ साली शिक्षिका म्हणून नेमणूक झाली. ही बातमी 'नेटीव्ह ओपिनीयन' ह्या मुंबईतील साप्ताहिकाने मोठ्या उत्साहाने आणि अभिमानाने प्रसिद्ध केली होती. स्त्रीशिक्षणाच्या दृष्टीने अन् देश-हिताच्या दृष्टीने त्या काळी अशी घटना महत्त्वाची मानण्यात येई.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
९६०४०

९

# भिक्षुकशाहीवर विदारक प्रकाश

जोतीरावांनी आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी जे जे शक्य होते ते ते अद्यापपर्यंत केले होते. तथापि त्यांची मिळकत ही त्यांचा संसार चालविण्यास आणि निरनिराळ्या सार्वजनिक कार्यांचा खर्च भागविण्यास पुरी पडत नसे. वडिलांच्या मृत्यूनंतर आपण चार पैसे अधिक मिळवावे असा त्यांनी विचार केला. त्यांच्या मनात सरकारी नोकरी करण्याचा विचार कधीही आला नाही. लोकसेवा आणि लोकजागृती करणे हेच त्यांनी आपले जीवितकार्य मानले होते. त्यांच्यासारख्या शिक्षणसंपन्न, कर्तृत्ववान, प्रामाणिक नि उद्योगशील पुरुषाचा सरकारी नोकरीत फार मोठा उत्कर्ष झाला असता; परंतु आपला उदरनिर्वाह स्वतंत्रपणे करावयाचा, असे त्यांनी ठरविले होते.

याच सुमारास पुण्याजवळील खडकवासला तलाव बांधण्याची मोठी योजना सरकारने जाहीर केली होती. ते बांधकाम प्रचंड स्वरूपाचे होते. जोतीरावांनी सरकारकडून त्या कामासाठी दगड पुरविण्याचा ठेका मिळविला. त्यांचे बालपणापासूनचे स्नेही सखाराम यशवंत परांजपे हे त्या व्यवहारामध्ये भागीदार होते. जोतीरावांच्या एका नातलगाचे चिरंजीव ग्यानोबा ससाणे हे ह्या कामाच्या वेळी त्यांच्याकडे नोकरीस होते. कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी प्रत्येकाने प्रामाणिकपणे उद्योगधंदा करावा अशी जोतीरावांची धारणा

होती. गरीब जनतेच्या उद्धारासाठी झटणारे जोतीराव हे आधुनिक हिंदुस्थानातील अशा विचारांचे जवळ जवळ पहिले सार्वजनिक कार्यकर्ते होते. तरी त्यांनी उदरनिर्वाहासाठी कामधंदा न करता सर्व वेळ सार्वजनिक कार्यकर्ता होण्याचे कधी मनातही आणले नाही.

साधी राहणी आणि उच्च विचारसरणी हे तत्त्व आपल्या अनुयायांच्या मनावर ठसविण्याचा व कृतीत उतरविण्याचा त्यांनी प्रयत्न केला, हे विशेष होय. त्यांनी त्यागाच्या खोट्या कल्पना उराशी बाळगल्या नव्हत्या. खरे पाहता, अपुऱ्या कपड्यात मिरवणारा परंतु पतपेढ्यातील अथांग शिल्कीत लोळणारा त्याग राष्ट्रात ढोंगबाजी अन भ्रष्टाचार जन्मास घालतो हे सांगावयास नकोच.

अठराशे साठ साली हिंदुस्थानात एक मोठे स्थित्यंतर झाले. त्या वर्षी जेम्स विल्सन याच्या 'इनकम टॅक्स' विधेयकाला २४ जुलै १८६० रोजी निर्बंधाचे स्वरूप आले. हिंदुस्थानच्या आधुनिक आर्थिक व्यवहारपद्धतीचा तो संस्थापक. त्यांनीच अर्थसंकल्प तयार करून विचारार्थ मांडण्याचा उपक्रम सुरू केला. हिंदुस्थान सरकारने १८५७ सालच्या क्रांतियुद्धानंतर लागलीच काही वर्षांनी नवीन बांधकामाची कामे सुरू केली. त्याविषयी लिहिताना ब्रिटिश मालकीच्या एका वृत्तपत्राने असे म्हटले आहे की, 'ह्यापूर्वी हिंदुस्थानमध्ये सार्वजनिक हिताची कामे आणि शिक्षण ह्याबाबत काहीही करण्यात आलेले नव्हते. पोलीसदलाची सुधारणा झाली नव्हती. रस्ते नीट बांधले नव्हते. सुधारणेची काहीच पावले पडली नव्हती. शासनसंस्थेतही काही सुधारणा घडली नव्हती.'[१]

दगड पुरविण्याचा सरकारशी करार केल्यामुळे जोतीरावांचा संबंध कामगार, सरकारी अधिकारी, कनिष्ठ वर्गातील सरकारी नोकर आणि विशेषतः अभियंते यांच्याशी आला. कामगारांच्या हिताविषयी अत्यंत कळकळ बाळगणारे प्रामाणिक बुद्धीचे जोतीराव हे कामगारांच्या हितार्थ झगडू लागले. त्यांना आपली कर्तव्ये समजावून देऊ लागले. शिक्षणापासून कोणते हित होते हे त्यांना पटवून देऊ लागले. हिंदूंची समाजव्यवस्था व धर्मव्यवस्था ह्यांनी त्यांच्यावर मानसिक गुलामगिरी कशी लादली आहे हेही विशद करून सांगू लागले. कामगारांच्या संगतीत ते रमू लागले. त्यांची ते संघटना करू लागले. सरकारी कारकून आणि अधिकारी यांच्याकडे बोट दाखवून शिक्षणापासून माणसाला कसे फायदे होतात हे त्या कामगारांना त्यांनी दाखवून दिले. त्यांच्या मनावर असे बिंबविण्याचा प्रयत्न केला की, जर त्यांनी आपल्या मुलांना शिक्षण दिले, तर त्यांची ही दैन्यावस्था दूर होऊन त्यांना चांगल्या स्थितीत जगता येईल. फुरसतीच्या वेळी जोतीराव त्यांच्याशी चर्चा करीत. त्यांच्यापुढे व्याख्याने देत.

अशा परिस्थितीत जोतीरावांनी दोनतीन वर्षे सर्व गोष्टींचे निरीक्षण करून त्याविषयी स्वतःच्या मनात खूप विचार केला. अभियंते नि सरकारी बडे अधिकारी हे लाच कशी

---

१. The Times of India, 7 August 1960.

घेतात, कामगारांची खोटी हजेरी लावून खोटे हिशेब कसे मांडतात आणि अशा रीतीने मिळविलेला पैसा आपसात कसा वाटून घेतात, हे त्यांच्या निदर्शनास आले. त्या काळी कारकून हे बहुशः ब्राह्मण वर्गातीलच असत. हजेरीपटावर कामगारांची खोटी नावे लिहून खोटी हजेरी लावण्यासाठी मेस्त्रीला ते भाग पाडीत. जर एखाद्या प्रामाणिक अधिकाऱ्याच्या दृष्टोत्पत्तीस त्यांची ही लबाडी आली, तर मेस्त्रींनाच ते बळी देत असत.

ब्राह्मण कारकून आणि अधिकारी हे सरकारी नोकरीवर असलेल्या बायांना स्वतःच्या घरी नोकर म्हणून राबवीत असत. त्यांना आपल्या घरची भांडी घासावयास लावीत. कामगार त्यांच्या जोड्यांची निगा राखीत; बिछान्याची व्यवस्था करीत. त्यांचे पाय चेपून त्यांची सेवा करीत. ते ब्राह्मण कारकून पोलिसांना आपल्या घरी बोलावून त्यांच्याशी काही हितगुज करीत. पगाराच्या दिवशी पगार घेण्यासाठी आपल्या ओळखीचे ब्राह्मण आणि आपले स्नेही यांना कार्यालयात घेऊन जात असत व जे काम त्यांनी कधीच केले नव्हते त्या कामाचे वेतन त्यांना लबाडीने देत. वरिष्ठ अधिकाऱ्यांना लाच हप्त्याने देत असत.

वरिष्ठ युरोपियन अधिकारी आपल्या कार्यालयातील कामाच्या वेळी शिकारीस जात. संध्याकाळी घाईघाईने बांधकामाचे काम चालले असेल तेथे ठोकलेल्या तंबूमध्ये परत येत. हाताखालील ब्राह्मण कारकुनांच्या प्रामाणिकपणावर विश्वास ठेवून पत्रव्यवहारावर सह्या करीत. तसेच उरलेले काम त्यांच्यावर सोपवून ब्रँडीचा फडशा पाडीत विश्रांती घेत. हातातील वृत्तपत्र वाचता वाचताच ते डुलक्या घेत. कामगारांच्या कोंबड्या आणि त्यांचे पैसे खात. जर तिजोरीत पैशांचा तुटवडा पडला, तर तो भरून काढण्यासाठी ठेकेदाराला सांगत की, 'तू दगडाऐवजी माती वापर आणि काम कर.'

जोतीरावांना, पेशवेकालीन शेतकऱ्यांकडून वसूल केलेल्या साऱ्यावर ब्राह्मण भिक्षुकांच्या ज्या जेवणावळी होत असत त्यांची आठवण झाली. अशा प्रकारे ते ब्राह्मण कारकून आणि ब्राह्मण अधिकारी कुणब्यांना भिकेस लावीत. शेतकरी जरी अविश्रांतपणे कष्ट करीत असत, तरी ते अन्नान्नदशेस पोहोचलेले असत. ब्राह्मण कारकून मात्र स्वतः भरपूर पैसा करून असत. लाचलुचपतीच्या प्रकरणात सापडण्याची वेळ आली, तर राजीनामा देऊन मोकळे होत.

याविषयी जोतीरावांनी जे काव्य केले आहे, त्यात ते म्हणतात की, आपण जे कथन करीत आहोत त्याचा अनुभव आपण ठेक्याने कामे करीत असताना मिळविलेला आहे. आपल्या काव्यात ते पुढे म्हणतात, 'या गरिबांची दुःखे जर निवारण करावयाची असली तर सरकारने समाजातील सर्व जातींतील लोक नोकरीस ठेवले पाहिजेत. जर सरकार सर्व जातींच्या कल्याणासाठी, हितासाठी आणि न्यायासाठी चाललेले असेल, तर कामगारांची पिळवणूक थांबलीच पाहिजे.'

जोतीरावांना जुलूम, लाचलुचपत, नातलगांना नोकऱ्या देण्याचा पक्षपात आणि लबाडीचे व्यवहार यांचा अतिशय तिटकारा असे. जो मनुष्य स्वतः आचरणाने निर्मळ नि

निर्भय असेल तोच समाजातील जुलूम आणि दुर्गुण यांच्याविरुद्ध उभा राहू शकतो. जे कामगारांना लुबाडतात, सरकारला ठकवतात अन् राष्ट्रीय पुनर्रचनेच्या कामास आतून स्वार्थाचे भुंगे लावतात, अशा भ्रष्टाचारी जनताद्रोही अधिकाऱ्यांचे जोतीराव प्रत्यक्ष कर्दनकाळच होते. समाजातील लाचलुचपतीविरुद्ध अशा प्रकारची ओरड ह्यानंतर जवळजवळ पंचवीस वर्षांनी लो. टिळकांनी केली. ज्या मामलेदारांनी आयुक्ताला लाच देऊन नोकरीत बढती आणि उत्कर्ष साधण्याचा प्रयत्न केला, त्यांची टिळकांनी हजेरी घेतली. या दोन श्रेष्ठ नेत्यांनी अधिकाऱ्यांच्या दुर्गुणावर निर्भयपणे हल्ले चढविले. तथापि, जोतीरावांनी जसा सात्त्विक संतापाने आणि निष्ठुरपणे भ्रष्टाचारावर सतत हल्ला चढविला तसा एकोणिसाव्या शतकात दुसऱ्या कोणत्याही पुढाऱ्याने महाराष्ट्रात चढविलेला आढळत नाही.

युरोपियन अधिकाऱ्यांवर जोतीरावांनी तितक्याच कठोरपणे हल्ला केला. त्यांच्या कार्याविषयी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. ती ही की, त्यांनी सरकारी कारकून, पर्यवेक्षक आणि अधिकारी यांच्यावर जो हल्ला केला तो केवळ ते जातीने ब्राह्मण होते म्हणून नव्हे; तर ते लाचलुचपतीचा व्यवहार करून गरिबांना भिकेस लावीत म्हणून. सर्व ब्राह्मण समाजाला त्यांनी कधीच दोष दिला नाही. ज्या काळात त्यांनी सरकारी नोकरांचा निषेध केला त्या काळात सरकारी नोकरीत मुख्यतः ब्राह्मणच असत. सरकारी धोरण तेच कृतीत आणीत असत. सत्ता लाचलुचपतीला जन्म देते. सचोटीने आणि निःपक्षपाती वृत्तीने काम करणाऱ्या व्यक्ती सर्व समाजांमध्ये आढळतात. हे जोतीराव जाणत होतेच. यामुळेच आपल्या कार्याच्या मुळाशी कोणाचाही द्वेष नसून, कनिष्ठ समाजाला न्याय मिळवून देण्याचे उद्दिष्ट आहे असे जोतीराव म्हणत, ते सत्य होते. कारण निःपक्षपाती, न्यायप्रिय आणि प्रामाणिक ब्राह्मण अधिकाऱ्यांची त्यांनी मुक्तकंठाने स्तुती केलेली आहे.

जर प्रामाणिकपणे उद्योग केला, तर ह्या ठेकेदारीच्या धंद्यात संसार चालविण्यास आणि गरीब लोकांना साहाय्य करण्यास पुरेसा पैसा मिळतो, अशी जोतीरावांची खात्री झाली म्हणून त्यांनी सरकारकडून आणखी एक काम घेतले. येरवडा पुलाचे बांधकाम चालले असता चुना पुरविण्याचा ठेका त्यांनी घेतला. तेथेही त्यांना असाच अनुभव मिळाला. तेथे सरकारी अधिकाऱ्यांचे व्यवहार, सवयी नि कामगारांचा स्वभावधर्म यांचे आणखी निरीक्षण करण्याची त्यांना मोठी संधी मिळाली. त्यावरून त्यांची खात्री होऊन चुकली की, अभियांत्रिकी विभागामधील कामगारांचा वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून भयंकर छळ होतो; त्यांचे अधिकारी त्यांना पिळून काढतात.

. २ .

जोतीराव जरी ह्या ठेकेदारीच्या कामात गुंतले होते, तरी ते आपल्या फुरसतीच्या वेळात वाचन करीत असत. रात्रीसुद्धा त्यांचे अध्ययन सुरू असे. महाराष्ट्रातील

संतकवींची काव्ये, ख्रिस्ती मिशनऱ्यांचे नि विल्यम जोन्ससारख्या ग्रंथकारांचे हिंदी इतिहासावरील ग्रंथ ते आवडीने वाचत असत. हेन्री मीडकृत 'शिपायांचे बंड' हा इंग्रजी ग्रंथ आणि दुसरे कित्येक ग्रंथ त्यांनी वाचून काढले होते.

. ३ .

याच सुमारास म्हणजे १८६५ साली 'जातिभेद विवेकसार' ह्या खळबळ उडविणाऱ्या ग्रंथाची दुसरी आवृत्ती प्रसिद्ध झाली. 'हा ग्रंथ एका हिंदूने केला व राजश्री जोती गोविंदराव फुले पुणेकर यांनी लोकहितार्थ छापून प्रसिद्ध केला.' असा मजकूर ग्रंथाच्या मुखपृष्ठावर छापलेला आहे. तसेच

ज्ञानमेवाश्रयेद्विद्वान् जातिदोषविनाशयेत् ।
जातिदुःखविनाशेन सर्वदुःखविनाशनं ॥

हा पद्मपुराण, सह्याद्रिखंड अ. ४, श्लोक ७५, मुखपृष्ठावर उद्धृत केला आहे. ग्रंथ "मुंबईमध्यें गणपत कृष्णाजी यांच्या छापखान्यांत छापिला. आत्माराम सगुण आणि कंपनी यांजकडे विकत मिळेल. सन १८६५, किम्मत चवदा आणे." असेही आणखी म्हटले आहे.

'एक हिंदु' ह्या टोपणनावाने उपरोक्त ग्रंथ प्रसिद्ध करणारे ग्रंथाचे कर्ते हे जोतीरावांचे स्नेही तुकाराम तात्या पडवळ होत. दुसऱ्या आवृत्तीच्या प्रसिद्धीकरणाच्या वेळी कोणीही प्रकाशक हा ग्रंथ प्रसिद्ध करण्यास पुढे येईना. तेव्हा धैर्य हा ज्यांचा स्थायीभाव होता, त्या जोतीरावांनी आपले नाव प्रकाशक म्हणून छापण्यास पडवळांना संमती दिली.

'हिंदुशास्त्रांत जें जातिभेदाचें स्वरूप वर्णिलें आहे त्यामध्यें व सांप्रत जातिभेदाचा प्रकार लोकांत प्रवृत्तींत आहे त्यामध्यें जो विपर्यास आहे, तो या हिंदुजनांच्या मनास व विचारास आणण्याचा या ग्रंथाचा मूल उद्देश आहे...ज्या शोधांचा लाभ ह्या ग्रंथकर्त्यास झाला आहे ते शोध आपल्या स्वदेशीयांस सांगून त्यांस या जातिभेदामुळें प्राप्त झालेल्या नीचत्वापासून मुक्त करण्यापेक्षां दुसरें कोणतेंही धर्मसंबंधी कार्य साधावयाचें नाहीं.' असे दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत ग्रंथकर्त्याने म्हटले आहे.

विद्या, ज्ञान नि पवित्र आचरण यांचा लेश नसताही आपल्या वंशजांना परंपरेने श्रेष्ठत्व लाभावे व दुसऱ्या सर्व वर्णांतील मनुष्यास केवळ अंकित करून आपली सर्वप्रकारे सेवा करण्यासाठी त्यांस परलोकसुखाची आशा दाखविणारी शास्त्रे व पुराणे ब्राह्मणांनी लिहिली. त्यांनी पुरातन शास्त्रात पदरची नवी नवी वचने घुसडून आपल्या स्वार्थाच्या पुष्कळ कथा लिहिल्या हे सर्व सिद्ध करणारी वचने अनेक संस्कृत पोथ्यांतून नि स्मृतींतून काढून ब्राह्मणांच्या स्वार्थपरायण वृत्तीवर ग्रंथकर्त्याने विदारक प्रकाश टाकला आहे. ब्राह्मण विद्वान असो किंवा अविद्वान असो, तो अनाचारी असला तरी श्रेष्ठ

आहे. शूद्र जरी जितेंद्रिय किंवा सदाचारी असले तरी श्रेष्ठ होत नाहीत, ह्या स्वार्थमूलक ब्राह्मणी तत्त्वाचे त्यात विवेचन केले आहे.

"सर्व जग देवांच्या स्वाधीन, ते दैवत मंत्राच्या स्वाधीन, तो मंत्र ब्राह्मणांच्या स्वाधीन, म्हणून ब्राह्मण माझे दैवत आहे. पृथ्वीमध्यें जीं सर्व तीर्थें आहेत तीं समुद्राच्या ठायीं आहेत आणि समुद्रांतील सर्व तीर्थें ब्राह्मणांच्या उजव्या पायांत आहेत. विवादांत ब्राह्मणांस जिंकू नये. ब्राह्मणांचें वित्त हें मात्र खरें विष आहे; कारण कीं त्यास या पृथ्वीवर उतारा नाहीं."

तुकाराम तात्यांच्या ह्या ग्रंथाची पहिली आवृत्ती ऑगस्ट १८६१ मध्ये प्रसिद्ध झाली. त्या आवृत्तीचे प्रकाशक वासुदेव बाबाजी नवरंगे होते. साधेपणा, दया व परोपकार ह्या गुणांविषयी नवरंगे प्रसिद्ध होते. त्यांचे वर्तन अत्यंत सत्यनिष्ठ असून 'बोले तैसा चाले' असे त्यांचे निर्भय आचरण असे. नवरंगे लंडनमध्ये आपल्या पेढीच्या वतीने काम करीत असता त्यांच्या पेढीचे हिंदुस्थानात दिवाळे निघाले. ह्या गोष्टीची वार्ता लंडनमधील व्यापाऱ्यांना लागू न देता आपण परत मुंबईस यावे, असे त्यांच्या भागीदारांनी त्यांना कळविले. परंतु नवरंगे हे सचोटीचे प्रतीक असल्यामुळे त्यांनी तेथील व्यापाऱ्यांचे सर्व पैसे चुकते करून ते मुंबईस परत आले.

स्वदेशी परत आल्यावर नवरंगे यांनी प्रार्थना समाजाच्या स्थापनेच्या कामात उत्साहाने भाग घेतला. ते अत्यंत कळकळीचे नि निष्ठावंत सुधारक होते. पुढे १८७० साली त्यांनी एका विधवेशी लग्न लावण्यात मोठे धैर्य दाखविले. त्यांच्या ह्या नैतिक नि उदात्त उदाहरणामुळे सामाजिक सुधारणेच्या चळवळीच्या इतिहासात ठसठशीत अशी भर पडली आहे. वासुदेवराव नवरंगे लंडनमध्ये व्यापार करीत असता, मामा परमानंद यांच्यामुळे जोतीरावांचा वासुदेव नवरंगे यांच्याशी संबंध आला. नवरंग्यांनी जोतीरावांना मुशीच्या धंद्याची अडत मिळवून दिली होती. त्या धंद्यात जोतीरावांना काही वर्षे चांगलाच नफा झाला.

'जातिभेद विवेकसार' या ग्रंथाचे कर्ते तुकाराम तात्या पडवळ हे भंडारी समाजातील गृहस्थ होते. त्यांच्या काळची परिस्थिती पाहता ते मराठी आणि इंग्रजी चांगले लिहीत, बोलत. त्यांना वाचनाचा मोठा छंद असे. त्यांच्या लहानपणीच त्यांचे वडील निवर्तल्यामुळे त्यांच्या एका भावजयीने त्यांना दत्तक घेतले होते. त्यांचा जन्म मुंबईत २० मे १८३८ रोजी झाला व तेथेच त्यांचे संगोपन झाले. त्यांनी तरुणपणी काही काळ रेल्वेमध्ये नोकरी केली. मुंबईतील वॉल्कॉट कंपनीतही नोकरी केली. पुढे स्वतंत्र उद्योग करून ते, मलबारीच्या 'इंडियन स्पेक्टेटर'ने म्हटल्याप्रमाणे, 'अत्यंत गरिबीशी झगडून मानाच्या शिखरावर विराजमान झाले.'

तुकाराम तात्या हे मुंबईतील होमिओपथीचे आणि थिऑसफीचे अग्रदूत होते. त्यांनी मुंबईतील कोटामध्ये अनेक वर्षे धर्मार्थ दवाखाना चालविला होता. ते सर्व धर्मांच्या लोकांना उदार अंतःकरणाने साह्य करीत असत. त्यामुळे ते सर्व धर्मीयांना प्रिय झाले होते.

सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी महाराष्ट्रात जी सामाजिक नि वैचारिक चळवळ चालली होती, तीत तुकाराम तात्यांनी निष्ठापूर्वक भाग घेतला होता. तिच्यातील ते आघाडीचे वीर होते. ते परमहंस सभेचे सभासद होते. प्रार्थना समाजाच्या संस्थापकांपैकी एक होते. त्यांचे आयुष्य हे एक पुरोहितांच्या वर्चस्वाविरुद्ध आणि समाजातील कर्मठ जातिबंधनांविरुद्ध चालते बोलते बंड होते. जातिभेदाचे निर्मूलन केल्याशिवाय कनिष्ठ वर्गांची दुःखे नाहीशी होणार नाहीत असा त्यांनी निष्कर्ष काढला होता. कनिष्ठ वर्गांच्या विपन्नावस्थेसंबंधी त्यांच्यामध्ये जागृती करणे नि जातिभेदाच्या गुलामगिरीतून त्यांची मुक्तता करणे यासारखे दुसरे परम पवित्र कार्य कोणतेच नाही, अशी त्यांची मनोमन खात्री झाली होती.

याच ध्येयाने प्रेरित होऊन त्यांनी हा विचार-प्रवर्तक 'जातिभेद विवेकसार' ग्रंथ लिहिला. ग्रंथकर्त्याने पहिल्या आवृत्तीत आपले नाव दिलेले नाही. दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत ग्रंथकार म्हणतात की, "जर ग्रंथकर्त्याच्या नांवानें ह्या ग्रंथास वजन येत आहे अशी या ग्रंथकर्त्याची खात्री झाली तर तो आपलें नांव मोठ्या आनंदानें प्रसिद्ध करील; परंतु अशी त्याची खात्री होत नाही यास्तव या ग्रंथाची दुसरी आवृत्ति ही त्यानें एका हिंदूच्या नांवानें बाहेर काढिली आहे."

आपल्या ग्रंथाच्या अर्पणपत्रिकेत तुकाराम तात्या म्हणतात,

> "प्रिय स्वदेशबंधूंनो ! हा लहानसा निबंध मी तुम्हांस उपयोगी पडेल या आशेनें सादर करितों. याच्या योगानें तुम्हांतून एकाची तरी, आपल्या लोकांमध्यें जो सांप्रत जातिभेद चालत आहे त्याच्या वास्तविक स्वरूपाविषयीं आणि तज्जनित परिणामाविषयीं खात्री झाली असतां, माझी मेहनत व्यर्थ गेली नाहीं असें समजावयास मला कारण होईल.
>
> मुक्काम मुंबई,<br>ता. १ ऑगस्ट १८६१ — आपला नम्र अभिष्टचिंतक,<br>एक हिंदु."

'जातिभेद विवेकसार' ह्या ग्रंथाला जोतीरावांचे नाव प्रकाशक म्हणून दिल्यामुळे आगीत तेल ओतल्यासारखे झाले. हा हिंदुधर्मद्रोह आहे असा त्या पुस्तकाचा धिक्कार केला गेला. पहिल्या आवृत्तीवर टीका करताना पुण्याचा एक ब्राह्मण म्हणाला होता की, 'जातिभेद विवेकसार' ह्या ग्रंथाचा लेखक हा वरभेदी आहे. 'पूना ऑब्झरव्हर', 'ज्ञानोदय' आणि 'बॉबे गार्डियन' ह्यांनी ह्या ग्रंथाविषयी चांगले अभिप्राय व्यक्त केले.

तुकाराम तात्यांनी पुढे 'तत्त्वविवेचक ग्रंथ प्रसारक मंडळी'ही प्रकाशनसंस्था काढून अनेक ग्रंथ प्रसिद्ध केले. खिस्ती मिशनऱ्यांनी ज्या काळात हिंदुधर्मावर टीकास्त्र सोडले होते, त्या काळात ह्या प्रकाशकाने मोठ्या हिरीरीने महाराष्ट्रीय संतकवींची काव्ये, नि त्यांची चरित्रे, तसेच हिंदुधर्मासंबंधी तत्त्वविवेचक ग्रंथ आपल्या तत्त्वविवेचक छापखान्यात छापून प्रसिद्ध करून धर्माभिमान, सुधारणावाद, देशाभिमान नि राष्ट्राभिमान यांचे तेज

दोन पिढ्यांना दिले. हे त्यांचे अमोल कार्य उज्ज्वल नि संस्मरणीय आहे यात संदेह नाही.

जोतीरावांनी आपले नाव प्रकाशक म्हणून देण्याचे मान्य केले; कारण त्या ग्रंथात धर्माच्या नावाखाली ब्राह्मणांनी आपले स्वहित आणि संकुचित स्वार्थवृत्ती ही लपवून तिचा बचाव कसा केला आहे आणि त्यांनी जातिभेदाची तटबंदी उभारून, भेदाभेद करून हिंदुसमाजाच्या जीवनाचे कसे तुकडे तुकडे केले आहेत याचे वर्णन आहे. जोतीरावांच्या प्रत्येक कार्याच्या पाठीमागे ही बंडखोर भूमिका असे. सनातनी आणि प्रतिगामी यांच्यावर ते मोठ्या धैर्याने हल्ला चढवीत असत. समाजाची पुनर्रचना, समता, स्वातंत्र्य आणि बुद्धिप्रामाण्यवाद यावर उभारण्याचे त्यांचे ध्येय होते. आणि जातिभेद हा सामाजिक समता, स्वातंत्र्य आणि बुद्धिप्रामाण्य ह्या तत्त्वांचा शत्रू असल्यामुळे जातिभेदाचे ते कट्टर विरोधक होते.

. ४ .

मध्यंतरी जोतीरावांनी काढलेल्या बालहत्त्याप्रतिबंधकगृहाचे कार्य सुरू होते. सुधारणावादी गृहस्थांनी त्या कार्याविषयी उत्साह दाखविला होता. त्या बालहत्त्या-प्रतिबंधकगृहाला सुधारणावादी लोकांनी भेट दिली आणि त्या स्तुत्य उपक्रमाविषयी आणि ध्येयाविषयी प्रशंसापर उद्गार काढले. फेब्रुवारी १८७१ च्या ज्ञानप्रकाशमध्ये असे प्रसिद्ध करण्यात आले होते की, 'एका परोपकारी सद्गृहस्थानें गरोदर स्त्रिया आणि मुले यांना आश्रय देण्यासाठी एक स्वतंत्र घर बांधलें आहे.' ही संस्था काढून जोतीरावांनी ब्राह्मण विधवांची अब्रू बचावली अन् त्यांना समाजाच्या छळापासून वाचविले. त्या बालहत्त्याप्रतिबंधकगृहात जन्मास आलेल्या मुलांपैकी काही जगली.

त्या बालहत्त्याप्रतिबंधकगृहात १८७३ साली काशीबाई नावाच्या एका ब्राह्मण विधवेस मुलगा झाला. ती बाई गंजपेठेतील केसोपंत सिंदी यांच्या घरात राहत होती. सावित्रीबाईने त्या मुलाची नाळ कापली होती. जोतीराव आणि सावित्रीबाई यांनी त्या मुलाचा नामकरणसमारंभ बाराव्या दिवशी मोठ्या थाटाने केला. त्यांनी त्या मुलाचे नाव यशवंत ठेवले. यशवंत म्हणजे यश मिळवणारा. सावित्रीबाईने वात्सल्याने त्या मुलाचे संगोपन उत्तम प्रकारे केले. जोतीराव आणि सावित्रीबाई यांनी यशवंतला आपला मुलगा मानला. त्या काळी सामाजिक चळवळीमध्ये उत्साहाने भाग घेणारे नामांकित सुधारणावादी लोकहितवादी, विनायकराव भांडारकर, पुढे लघु वाद न्यायालयाचे न्यायाधीश झालेले प्रार्थना समाजाचे विश्वस्त मदन श्रीकृष्ण, मामा परमानंद, वासुदेव बाबाजी नवरंगे, तुकाराम तात्या पडवळ इत्यादी व्यक्तींनी जोतीरावांच्या कार्याविषयी त्यांना धन्यवाद देऊन त्यांच्याविषयी मोठा आदर व्यक्त केला.

अठराशे एकात्तर साली पुण्यास बदली झाल्यावर माधवराव रानडेही जोतीरावांचे चाहते बनले. जोतीरावांच्या सामाजिक चळवळीकडे ते अगत्यपूर्वक लक्ष देत असत.

त्यांनी समाजासाठी केलेली मोठी भरीव कामगिरी आणि त्यांनी अर्भकालय चालविण्यात मिळविलेले यश पाहून रानडे आणि त्यांचे स्नेही लालशंकर उमियाशंकर त्रिवेदी यांनी १८७५ साली जोतीरावांच्या अर्भकालयाच्या धर्तीवर पंढरपूर येथे एक अर्भकालय सुरू केले. देवदूतासारखे हृदय असणाऱ्या लालशंकरांना देवमुन्सफ म्हणत असत. ते त्या वेळी मुन्सफ होते.

तरुण विधवांची दुःस्थिती पाहून त्यांच्या विवाहाच्या प्रश्नालाही चालना देण्याचा जोतीरावांनी विचार केला. विष्णुशास्त्री पंडित यांनी विधवाविवाहाच्या प्रश्नाचे कंकण हाती बांधले नि ते प्रत्यक्ष कृतिक्षेत्रात उतरले. आपल्या विद्यार्थीदशेत ह्या तत्त्वनिष्ठ पुरुषाने जोतीरावांच्या शिक्षणसंस्थेचे सभासद होऊन शैक्षणिक कार्यास हातभार लावला होता. आपल्या कार्यास आरंभ करण्यापूर्वी विष्णुशास्त्री पंडित यांनी आपल्या सरकारी नोकरीचा राजिनामा देऊन 'इंदुप्रकाश' साप्ताहिकाचे संपादकत्व स्वीकारले. 'सुबोधपत्रिका' हे साप्ताहिक प्रार्थना समाजाचे मुखपत्र होते, तसेच 'इंदुप्रकाश' हे त्या काळच्या समाजसुधारकांचे मुखपत्र होते. विष्णुशास्त्री मोठे फरडे लेखक होते. विधवाविवाहाच्या प्रश्नासंबंधी ते जहाल आणि विचारप्रवर्तक लेख त्या साप्ताहिकात लिहीत असत. महाराष्ट्रातील प्रमुख शहरी त्यांची ज्वलज्जहाल भाषणे होत असत. त्यांनी ह्या प्रश्नासंबंधी अनेक पुस्तिकाही प्रसिद्ध केल्या होत्या.

प्रचाराचे प्राथमिक कार्य केल्यावर विष्णुशास्त्री यांनी २८ जानेवारी १८६६ रोजी विधवाविवाहाच्या प्रश्नाला चालना देण्यासाठी पुनर्विवाहोत्तेजक मंडळी नावाची एक संस्था काढली. त्या संस्थेच्या शाखा. रत्नागिरी, पुणे, अहमदाबाद आणि अन्य ठिकाणी होत्या. या संस्थेच्या कृपाछत्राखाली पांडुरंग विनायक करमरकर नावाच्या गृहस्थाचा पुनर्विवाह प्रभाकर परांजपे या गृहस्थाच्या वेणूबाई नावाच्या विधवा मुलीशी मोठ्या थाटाने साजरा करण्यात आला. या विवाहाचे आमंत्रण सात 'ऋषीं'च्या सहीने पाठविण्यात आले होते. समाजसुधारकांचे कैवारी गोपाळ हरि देशमुख, विष्णुशास्त्री पंडित, विष्णु मोरेश्वर भिडे, श्रीकृष्णशास्त्री तळेकर, विष्णु परशुराम रानडे, महादेव गोविंद रानडे आणि जनार्दन सखाराम गाडगीळ हे ते सप्तर्षी होत.

विष्णुशास्त्री हे मोठे कर्ते आणि कळकळीचे सच्चे सुधारक होते. ते महाराष्ट्राचे 'ईश्वरचंद्र विद्यासागर'! एखाद्या व्यक्तीस सुधारणावादाचे कार्य करावयास उद्युक्त करून ते कार्य झाल्यावर त्या व्यक्तीची चौकशी न करण्याएवढे ते बोलघेवडे सुधारक नव्हते. त्या व्यक्तीच्या कार्याची नैतिक जबाबदारीही ते आपल्या शिरावर घेत असत. यास्तव त्यांनी आपल्या संस्थेच्या निधीतून वेणूबाईच्या नावाने दोन हजार रुपयांची रक्कम ठेवली. तीन हजार रुपये किंमतीचा अहेर वधूवरांना अर्पण करण्यात आला.

ह्या पुनर्विवाहामुळे महाराष्ट्रात दोन तट पडले. त्या दोन तटांची पुणे येथे १८७० साली मोठी वैचारिक लढाई झाली. सनातनी आणि समाजसुधारणावादी यांच्यामध्ये विधवाविवाहाच्या प्रश्नासंबंधी मोठा वादविवाद झाला. दोन्ही बाजू शौर्याने लढल्या.

तथापि न्यायमंडळावरील सुधारकांच्या बाजूचा एक सभासद पुढे होणाऱ्या छळाला घाबरून गळाठला. त्यामुळे दोन मते कमी पडून सुधारकांचा पराभव झाला.

सनातनी आपल्यावर सामाजिक बहिष्कार टाकतील या भीतीने गांगरून जाऊन काही सुधारक, सनातन्यांना दाती तृण धरून शरण गेले. त्या शरणागतांमध्ये समाजसुधारणावादी मंडळीचे मुकुटमणी लोकहितवादी गोपाळराव देशमुख होते. पुण्यातील ह्या पराभवाने सुधारकांची बाजू कमजोर झाली, तरी त्यांनी रणांगण सोडले नाही. प्रतिगामी आणि परंपरावादी हे नेहमी बहुसंख्य असतात हे सत्य त्यांना माहीत होते. वरील वाग्युद्धासंबंधी एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. ती ही की, हिंदुस्थानातले त्याकाळचे विख्यात पंडित डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांना पंच नेमण्यास सनातनी ब्राह्मणांनी संमती दिली नाही. कारण ते सारस्वत जातीचे असल्यामुळे त्यांना धर्मनिर्णय करण्याचा अधिकार नाही, असे सनातनी मंडळीने मत व्यक्त केले.[२]

उपदेशापेक्षा प्रत्यक्ष उदाहरणाने गोष्टी लोकांना लवकर पटतात, या वचनावर जोतीरावांचा विश्वास होता. सनातन्यांच्या शिव्याशापांना ते डरले नाहीत. त्यांनी १८६८ साली आपला घराजवळील पाण्याचा हौद महारमांगादी कनिष्ठ जातींना पाणी भरण्यासाठी खुला केला. पुण्यात जागोजागी पेशव्यांनी हौद बांधले होते; परंतु तेथे महारमांगास पाणी मिळण्याची सोय नव्हती. नगरपालिका त्यांची सोय करीना. चैत्र वैशाखी जेव्हा पाण्याचे दुर्भिक्ष पडे तेव्हा कोसाकोसांच्या अंतरावरून येणाऱ्या त्या दीनांना करुणा भाकूनही हौदावरून पाणीपाणी करीत अनेकदा तडफडत परत जावे लागे.

आपला हौद महारमांगांसाठी खुला करून त्या काळी जोतीरावांनी मोठे धाडसाचे कृत्य केले. त्यामुळे सनातन्यांची माथी भडकली. शहरात पुन्हा एकदा विरोधाची लाट उसळली. ज्यांनी आपल्या ऐन तारुण्यात अनेक संकटांना लीलेने तोंड दिले होते, ते जोतीराव आपल्या आवडत्या समाजसुधारणेच्या कार्यसिद्धीसाठी नि प्रगतीसाठी आपल्या मार्गात येणाऱ्या नवीन संकटास थोडेच घाबरणार? जो सिंहावर आरूढ होऊन संचार करीत असतो, तो कोल्हेकुईला थोडीच भीक घालणार? जोतीरावांच्या ज्ञातिबंधूंनी त्यांना वाळीत टाकण्याची धमकी दिली. सनातन्यांचा आणि प्रतिगाम्यांचा बालेकिल्ला असणारी ती पुण्यनगरी, जोतीराव हे खिस्ती झाले आहेत असे म्हणून त्यांचा धिक्कार करू लागली. कारण अस्पृश्यांचा विटाळ त्या काळी फक्त खिस्ती पाद्री मंडळीच मानीत नसत. जो अनाथांना नि अपंगांना जवळ करी, त्यांना कुरवाळी, त्याच्या ठायीं सनातन्यांना आणि प्रतिगाम्यांना देव दिसत नसे. तो त्यांना दानव वाटे!

लोकहितवादी गोपाळराव देशमुख यांनी १८४९ साली १ ऑगस्टच्या 'ज्ञानोदया'मध्ये, आपल्या शतपत्रांपैकी एका पत्रात असे म्हटले आहे की, 'ब्राह्मण महारांची निंदा करतात. त्यांस शिवत नाहींत व इंग्रजांच्या शेजारी प्रीतीने बसतात. हें पाहून मला

---

२. फाटक, न. र., न्या० महादेव गोविंद रानडे यांचें चरित्र, पृ. १४९.

आश्चर्य वाटतें. शास्त्राप्रमाणे पाहिलें असतां महार बरे; परंतु इंग्रजांच्या मंडळींत ब्राह्मण असूं नयेत. तथापि हे ब्राह्मण मूर्ख, त्यांस समजत नाही.' म्हणून लोकहितवादींनी ब्राह्मणांना असा उपदेश केला की, 'भले लोकांनी जातीचा अभिमान कधीं करूं नये...यास्तव जातिअभिमान सोडला तरी जाति कायम राहातील, यांत संशय नाही. परंतु तंटे व भांडणें मोडतील. मत्सर करणार नाहीत. इतका फायदा होईल. सर्व लोक एकत्रपणाने वागतील. ब्राह्मण असें म्हणणार नाहीत की, अमका तो महार आहे, त्याचें तोंड पाहूं नये, त्याचा विटाळ होतो. हा वेडेपणा मात्र जाईल. मग तो महार अर्थातच ब्राह्मणाचे गर्विष्ठपणाचे शब्द ऐकून नीट इंग्रजांच्या घरीं जातो आणि म्हणतो, ब्राह्मण आता फार माजले. मी त्यांस हात दाखवीन. इंग्रज लोकांच्या फौजेंत नीच जातीचे लोक फार असतात; कारण त्यांस ब्राह्मण लोक तुच्छ मानतात. त्यांस उष्टें खावयास घालतात व केवळ जनावरांप्रमाणे समजतात. याजमुळे त्यांस उपाय सुचतो. तो ते करितात. आणि ब्राह्मणांचें काम वाढितात. हा परिणाम जातीअभिमानाचा आहे."[3]

महारांना आणि सुधारकांना ब्रिटिशांचे बगलबच्चे समजणाऱ्या देशाभिमान्यांनी लोकहितवादींचे हे अमोल बोल लक्षात ठेवावेत. लोकहितवादी यांचे म्हणणे यथार्थ होते. अपमानापासून सूडबुद्धी निर्माण होते; परंतु ब्राह्मणांना ही गोष्ट कधीही कळली नाही. महारमांगांवर दोष ठेवून त्यांनी आपल्या समाजद्रोही कृत्यांवर पांघरूण घातले.

लोकहितवादींनी जरी हा इतरांना उपदेश केला असला, तरी तो त्यांच्या स्वतःच्या कृतीत व आचरणात उतरलेला कधीच आढळत नाही. सामाजिक सुधारणेच्या बाबतीत कृतिपूर्ण व अपूर्व असे नेतृत्व करणारे जोतीराव हेच पहिले नेते होत. जोतीराव मोठे निर्भय, स्पष्टवक्ते, सरळस्वभावी, त्यागी होते. त्यांच्या अंगी इतिहास घडविणाऱ्या पुरुषाचे अमर्याद नैतिक धैर्य होते. त्यांनी जो नवीन मार्ग अंगीकारला, त्यात यश मिळविले. स्वतःच्या विचारावर त्यांची अढळ श्रद्धा होती. त्यांचा जन्म जणू ह्या कार्यासाठीच झाला होता. त्यांचे विरोधक सनातनी होते आणि त्यांच्या पाठीशी समाजातील सत्ता, संपत्ती आणि शिक्षित लोकांची बुद्धी नि बळ होते. जोतीरावांच्या पाठीशी सत्य उभे होते. ते दुर्जेय शस्त्र होते. तसेच त्यांच्या पाठीमागे निष्ठावंत असे अनुयायी अन् चाहते होते. त्या सर्वांना जोतीरावांची साधी राहणी आणि उच्च विचारसरणी यांचा सार्थ अभिमान वाटे. आपण जोतीरावांचे सहकारी आहोत याविषयी त्यांना धन्यता वाटे. जोतीराव हे ओबडधोबड का होईना पण खऱ्या अर्थाने विद्यादेवीचे प्रतीक होते. युगानुयुगे तडफडत असलेल्या शूद्रांच्या आत्म्यांचे ते साक्षात अवतार होते.

## . ५ .

ह्यानंतर काही दिवसांनी, जोतीरावांनी एक पोवाड्याचे पुस्तक प्रसिद्ध केले. ब्राह्मण-

---

३. संपादक, टिकेकर, श्री. रा., लोकहितवादींचीं शतपत्रें, पृ. २१५, ४१९.

लोक गरीब वर्गातील लोकांना धार्मिक संस्कार करायला लावून कसे लुबाडतात यावर त्या पोवाड्यात प्रकाश टाकला आहे. त्या पोवाड्यावर 'विविधज्ञान विस्तार'[3] ह्या मासिकामध्ये जो बोचक आणि खोचक अभिप्राय आला आहे, त्यावरून असे दिसते की, जोतीरावांच्या त्या पुस्तकाला त्यांचे बालमित्र विनायकराव भांडारकर, रे. बाबा पदमनजी आणि गंगाधरशास्त्री यांनी बरेच साह्य केले होते. जोतीरावांनी युरोपियन ग्रंथकारांचे हिंदी इतिहास आणि वाङ्मय यांसंबंधी जे ग्रंथ वाचले होते, त्यांतूनच हे पोवाड्यांचे पुस्तक निर्माण झाले होते. त्यातील माहिती संशोधकांच्या दृष्टीने चुकीची आहे असे 'विविधज्ञानविस्तारा'ला[4] वाटल्यामुळे त्या मासिकाने जोतीरावांची टर उडविली. ह्या पोवाड्यांच्या प्रसिद्धीच्या दिवसापासून जोतीरावांच्या मनाने घेतले की ब्राह्मण हेच खरे आर्य होत. आणि त्यांनी क्षत्रियांना निर्दयपणे विपन्नावस्थेत लोटले. त्यांच्या मते क्षत्रिय म्हणजे शूद्र आणि अतिशूद्र यांचा समाज होय. त्यांच्या पुढील सर्व ग्रंथांचे हेच पालुपद होते. त्यांच्या काव्याचेही हेच ध्रुपद बनले.

तथापि, शूद्रांना लुबाडणाऱ्या ब्राह्मणांवरील जोतीरावांचा हा हल्ला बिनतोड होता. त्यांच्या लिखाणात सामाजिक पुनर्रचनेला उपयुक्त अशी पुष्कळ तत्त्वे आढळतात. त्या काळच्या सामाजिक परिस्थितीचे हुबेहुब चित्रण त्यांच्या पुस्तकात आढळते. ब्राह्मण शिक्षक कनिष्ठ वर्गातील विद्यार्थ्यांना कसे बुद्ध्याच निरुत्साही करतात, त्यांना भेडसावून शाळा सोडावयास कसे प्रवृत्त करतात, याचे त्यांनी मोठे मार्मिक नि वास्तव वर्णन केले आहे. शिक्षणखात्यातील ब्राह्मण शाळा-निरीक्षक नेहमी ब्राह्मण शिक्षकांच्या बाजूने खोटी इतिवृत्ते धाडीत. कनिष्ठ वर्गातील मुलांना शिक्षणाची मुळातच गोडी नाही, असा फसवा अभिप्राय ते त्यात व्यक्त करीत.

जोतीराव, खेड्यातील सरकारी हिशेब ठेवणारा कुलकर्णी आणि सर्रास ब्राह्मण असलेले इतर अधिकारी यांची करणी उघड करून सांगतात. कुलकर्णी आणि इतर सरकारी अधिकारी सर्रास ब्राह्मणच असत. ते इतर कारकुनांशी आणि मामलेदारासारख्या महसूल खात्याच्या अधिकाऱ्यांशी आतून सूत जमवीत. ते ब्राह्मण अधिकारी गरीब रयतेच्या तक्रारी किंवा फिर्यादी इंग्रज अधिकाऱ्यांना वाचून दाखवीत असताना त्यातील मुख्य मुद्दे किंवा महत्त्वाची वाक्ये गाळून टाकीत असत. अशा प्रकारे त्या वेळचे शासन हे पक्षपाती होते, अन्यायी होते, लाचलुचपतीने आणि दुष्कृत्यांनी बरबटलेले होते. खेड्यातील मुख्य पोलीस अधिकारी पाटील असे. जरी तो ब्राह्मणेतर असला, तरी तो ह्या चांडाळचौकडीच्या हातांतील एक बाहुले बनलेला असे.

खेड्यातील ब्राह्मण कुलकर्णी हा तेथील लोकात भेदाची आणि दुहीची बीजे पेरून त्यांची आपापसात भांडणे लावून देई. सरकारी नोकरीतील ब्राह्मण अधिकारी हे कारकून, कुलकर्णी, मामलेदार यांच्या जागा ब्राह्मणांनाच मिळवून देत. ब्राह्मण अधिकारी

---

४. पुस्तक २, अंक ८ (१८६८), पृ. ११९–२१.

ब्राह्मणांच्याच बाजूने न्याय देत. खटल्यांचा निर्णय ब्राह्मण सावकारांच्याच बाजूने करीत. गरीब शेतकऱ्यांना मात्र दंड वा शिक्षा करीत. ब्राह्मण अधिकाऱ्यांना खालच्या जातीतील वेश्यांच्या वरीं त्यांचा गोंडा घोळण्याची लाज वाटत नसे. परंतु महार आणि मांग यांना ते ब्राह्मण अधिकारी जोडे फेकून मारीत असत. न्यायाची व मानव्याची ते विटंबना करीत. अशा प्रकारे राज्यकारभार चालल्यामुळे खालच्या जातीतील लोकांना सरकारी अधिकारावर असलेल्या ब्राह्मणांकडून न्याय कसला तो मिळेचना !

सरकारला कर मुख्यतः शेतकऱ्याकडूनच मिळे. तरी शेतकऱ्यांची मुले मात्र अशिक्षितच राहत. ना धड कपडे ना घासभर अन्न. अशी परिस्थिती असे. या सर्वांवर ताण म्हणूनच की काय, ब्राह्मण शिक्षक शाळांतून राजद्रोहाचा प्रचार करीत असत. यासाठी जोतीरावांनी व्हिक्टोरिया राणीला आपल्या पोवाड्यात अशी प्रार्थना केली आहे की, दारिद्र्याने गांजलेल्या या लोकांवर तिने दया करावी. त्यांना ब्राह्मणांच्या निर्दय छळापासून वाचवावे. आपला राज्यकारभार लाचलुचपत आणि दुष्कृत्ये ह्यांपासून दूर करावा. इंग्रज सरकारला त्यांनी असे सुचविले की, कारकून, शिक्षक व दंडाधिकारी यांची नेमणूक सर्व जातींतून करावी आणि समाजाचा छळ करणाऱ्या दुष्टांची साखळी तोडून टाकावी. जर राणी व्हिक्टोरिया हिने गरीब शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय केली, त्यांना शासनामध्ये नोकऱ्या दिल्या, न्यायदानाच्या अधिकारावर नेमले, तर कनिष्ठ वर्गातील लोकांच्या हक्कांचे रक्षण होईल. तसे घडले म्हणजे ते राणीला धन्यवाद देतील. तिचा महिमा गातील.

त्या काळी शिक्षणाच्या बाबतीत ब्राह्मणच आघाडीवर होते. एकतर त्यांच्या कुटुंबातील शिक्षणाची अनेक पिढ्या चालत आलेली परंपरा. दुसरे म्हणजे पेशव्यांचे ब्राह्मणी राज्य गेल्यामुळे नाखुष झालेल्या ब्राह्मणसमाजाला चुचकारण्यासाठी इंग्रजांनी अनुसरलेले अनुकूल अन् प्रोत्साहक धोरण. शिवाय ब्राह्मणवर्गाचे कनिष्ठ वर्गाच्या शिक्षणासंबंधी सहानुभूतिशून्य धोरण. त्यामुळे खालच्या समाजात वरच्या समाजातून शिक्षण झिरपत जाईल अशी जी त्या काळी मतप्रणाली प्रचलित होती ती संपूर्ण अयशस्वी ठरली. कारण शिक्षण हे ब्राह्मण आणि तत्सम वरिष्ठ वर्ग यांतच गुरफटून राहिले. त्याचा परिणाम असा झाला की, मुंबई प्रांतात लोकसंख्येच्या पाच टक्के असणारे ब्राह्मण हेच बहुशः सरकारी शासनात कारकून, शिक्षक, मामलेदार, अभियंते किंवा न्यायाधीश असल्यामुळे सरकारी शासनावर त्यांचेच अप्रत्यक्ष नियंत्रण असे.

दहा वर्षांनंतर म्हणजे जुलै १८७९ मध्ये मुंबईचे त्या वेळचे राज्यपाल सर रिचर्ड टेंपल ह्यांनी तत्कालीन इंग्रज महाराज्यपालांना पाठविलेल्या प्रतिवृत्तात असे म्हटले आहे की, 'जर शिक्षणाचा परिणाम इतर समाजांतील लोकांना नोकऱ्या मिळण्यात झाला असता, तर ब्राह्मणांनी त्यांचा हेवा केला असता. परंतु तशी वस्तुस्थिती नाही. या बाबतीत त्यांना तक्रार करण्यासारखे काहीच नाही. उलटपक्षी असे म्हणता येईल की, पिढ्यानपिढ्या बौद्धिक गुण ब्राह्मणांमध्ये वाढत आल्यामुळे आणि ते सर्व लोकांत हुषार

ठरल्यामुळे ज्या गोष्टी शिक्षणावर अवलंबून आहेत त्या प्रत्येक गोष्टीचा फायदा त्यांनाच मिळतो.'[५]

पुढील काळात जेव्हा ब्राह्मणेतर तरुण जोतीरावांच्या धोरणानुसार शिक्षण घेऊन सरकारी नोकरीच्या क्षेत्रात ब्राह्मणांच्या जागा पटकावू लागले, तेव्हा स्वार्थी आणि धूर्त ब्राह्मण ओरड करू लागले की, 'सुशिक्षित ब्राह्मणेतर नोकरीसाठी परकीय सरकारकडे भीक मागत आहेत; ते राष्ट्रनिष्ठ नाहीत.' यास्तव सरकारी नोकऱ्यांत सर्व जमातींना प्रतिनिधित्व द्यावे यावर जोतीराव भर देत असत. त्यामुळे ब्राह्मणांच्या समाजद्रोही कारस्थानांना शह बसेल असे त्यांना वाटत असे. ज्यांना प्रचलित राज्यव्यवस्था आणि शासन ह्यापासून फायदे होत होते, ते ब्राह्मण स्वतः पक्के जातीयवादी असूनसुद्धा सुधारणावादी आणि देशाभिमानी मतांचा स्वतः बुरखा पांघरून 'जोतीराव हे जातीयवादी आहेत' असा टाहो फोडून त्यांचा धिक्कार करीत. तरीसुद्धा जोतीरावांची विवेकबुद्धी कधीही ढळली नाही. आपल्या एका काव्यात, ख्रिश्चन, मुसलमान, मांग आणि ब्राह्मण यांनी एकमेकांस बंधू मानावे असाच त्यांनी उपदेश केला आहे.

'विविधज्ञानविस्तार' या मासिकाने जोतीरावांच्या उपरोक्त पोवाड्यावर अत्यंत निर्दयपणे टीका केली. 'विविधज्ञानविस्तार' हे मासिक 'स्त्रिया आणि सभ्य गृहस्थ' ह्यांच्या उद्धारासाठी निघाले होते. ते मासिक अशिक्षित, खेडवळ, बहुसंख्य गरीब अशी जी जनता तिच्याविषयी सहानुभूती कशी बाळगणार? जोतीरावांच्या पोवाड्यातील बुद्धिवाद 'विविधज्ञानविस्तार' कर्त्याला मुळी समजलाच नाही. सामाजिक न्याय किंवा सामाजिक समता हे समाजाच्या विचाराला, धारणेला आणि वागणुकीला मूलभूत ठरणारे असे एक तत्त्व आहे याची कल्पना त्या काळी त्या संपादकाच्या गावीही नव्हती. जोतीरावांच्या पोवाड्याचा रोख वरिष्ठ वर्गांच्या विरुद्ध आहे, तो मुख्यतः ब्राह्मणांच्या विरुद्ध आहे म्हणून तो धर्माच्या आणि सदभिरुचीच्या विरुद्ध असलाच पाहिजे असे 'विविधज्ञानविस्तार' कर्त्याला वाटले. हो, स्वबांधवांना आणि स्वधर्मीयांना अस्पृश्य मानणे हा योग्य धर्म आणि सदभिरुची आहे असे त्या शिष्ट व ज्ञानसंपन्न 'विविधज्ञानविस्तार' कर्त्याला वाटणे सहाजिकच होते. धर्माच्या नावाखाली अज्ञानी माणसाला पिळून काढणे आणि त्याला जन्मोजन्मी मानसिक गुलामगिरीत ठेवणे ही अभिरुची बरी आणि खरी, असे त्या 'सभ्य स्त्रिया आणि सभ्य गृहस्थ' यांच्या उत्कर्षाला अर्पिलेल्या 'विविधज्ञानविस्ताराला' वाटणे क्रमप्राप्तच होते. पाद्रीलोक आणि सरकार हे आपल्या स्वार्थाकडे दृष्टी ठेवून ब्राह्मणांचा द्वेष करीत. जोतीरावांनी पूर्वग्रहदूषित अशा युरोपियन पंडितांची मते आणि निर्णय आपल्या प्रचारासाठी वापरली आहेत असा 'विविधज्ञानविस्तारा'ने अभिप्राय दिला. जोतीरावांचे इतिहासावरील विवरण बरेचसे चुकले असेल. पण त्यातले मुद्दे अबाधित होते. जोतीरावांचा हा पोवाडा आज उपलब्ध नाही.

---

५. The Hindustan Times, 8 July 1962.

'विविधज्ञानविस्तार'कर्त्यांने उद्धृत केलेली ती कडवी, 'ब्राह्मणांचें कसब', किंवा 'पवाडा छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा' ह्या काव्यांत आढळत नाहीत.

शिक्षणक्षेत्रात भरीव सेवा केल्यानंतर जोतीराव आपले आयुष्य आळसात घालवीत नव्हते. 'पुणें वर्णन'कर्ते नारायण विष्णु जोशी ह्यांनी 'जोतीबा आपल्या शिक्षण-कार्यानंतर घरी जे स्वस्थ बसले...' असे म्हटले आहे ते त्यांचे म्हणणे विपर्यस्त अन् दिशाभूल करणारे आहे. त्याच सुमारास जोतीरावांनी मोठ्या उत्सुकतेने आणि अभिमानाने रायगड पाहिला. शिवाजीमहाराजांच्या समाधीची दुरवस्था पाहून त्यांचा जीव हळहळला. त्यांनी दगडधोंडे, कचऱ्याचे ढीग समाधीवरून दूर केले. तेथे स्फूर्ती घेऊन शिवाजीमहाराजांवर एक मोठा पोवाडा केला. तो १८६९ मध्ये प्रसिद्ध केला. जरी तो पोवाडा परशुरामाच्या जीवनावरील आणि ब्राह्मणांनी लबाडीने संपादन केलेली सत्ता यांवरील जोतीरावांच्या नवविचाराने भरलेला असला, तरी तो अत्यंत स्फूर्तिदायक आहे. त्या पोवाड्याचे नाव 'पवाडा छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा,' असे आहे. तो 'जोती गोविंद फुले यांनी लोकहितार्थ केला. तो मुंबईत ओरिएंटल छापखान्यांत छापला. सन १८६९.' अर्पणपत्रिकेत जोतीराव म्हणतात: "कै. रावबहादूर राम बाळकृष्ण, परमहंस सभेचे अध्यक्ष, कस्टमखात्याचे माजी असिस्टंट कमिशनर आणि मुंबईचे जस्टिस ऑफ दी पीस ह्यांच्या स्मरणार्थ हा लहानसा पवाडा त्याच्या कर्त्यांनें परम प्रीतीनें व आदरानें अर्पण केला असे."

हा पोवाडा पंचेचाळीस पृष्ठांचा आहे. जोतीराव हे गद्यापेक्षा काव्यातच अधिक लीलेने संचार करू शकतात, हे त्यांच्या काव्यावरून दिसून येते. पोवाडेकर्ते जोतीराव ह्यांनी आपले स्वतःचे वर्णन 'कुळवाडीभूषण' असे केले आहे. पोवाडेकार जोती-रावांचे म्हणणे असे की, ब्रह्मा आणि परशुराम यांच्याशी क्षत्रियांनी झगडे केले. त्यांत 'देश निःक्षत्रिय झाल्यामुळे यवना फावले.'

इंग्रज राजवटीतील महाराष्ट्राचे जोतीराव हे शिवाजीचे पहिले पोवाडेकार होत. अर्वाचीन भारताच्या इतिहासातील शिवाजी हे एक धैर्याचे, स्वाभिमानाचे, देशभक्तीचे आणि वीरत्वाचे प्रतीक होय. भारताचे स्वातंत्र्यवीर आणि मराठी साम्राज्याचे संस्थापक श्रीशिवाजी महाराज यांच्या जीवनापासून अनेक देशभक्तांना आणि क्रांतिकारकांना स्फूर्ती मिळाली. शिवाजीमहाराज हे हिंदी स्वातंत्र्याचे आणि स्फूर्तीचे मोठे स्थान आहे. हिंदुस्थानवर धर्मांध मुसलमानांनी केलेल्या स्वारीचे वर्णन जोतीरावांनी त्या पोवाड्यात खालीलप्रमाणे केले आहे.

**कातूल सोडी, नदांत उडी ॥**
**टेवितो दाढी, हिंदूस पीडी ॥**
**बामना बोडी, इंद्रियें तोडी ॥**
**पींडीस फोडी, देऊळें पाडी ॥**

चित्रास तोडी, लेण्यास छेडी ॥
गोमांसीं गोडी, डुकरां सोडी ॥
खंड्यास ताडी, जेजुरी गडीं ॥
भुंग्यास मोडी, खोडीस मोडी ॥
मूर्तीस काढी, काबूल धाडी ॥
झाडीस तोडी, लुटलीं खेडीं ॥
गडांस वेढी, लावली शीडी ॥
हिंदुस झोडी, धर्मास खोडी ॥

ह्याच पोवाड्यात जोतीराव मोठ्या देशाभिमानाने आणि वीरवृत्तीने गर्जतात की, शिवाजी महाराजांनी आईच्या प्रेरणेमुळे नि आपल्या एकनिष्ठ, निर्भय आणि शौर्यशाली अशा सहकाऱ्यांच्या साह्याने 'रोविला झेंडा हिंदूंचा.'

चित्त थरारून सोडणारे शिवाजीचे चरित्र हे एका उदात्त ध्येयासाठी लढलेले युद्ध आहे, असे जोतीराव पोवाड्यात म्हणतात. शिवाजीच्या स्वभावातील सावधानता, त्याची धाडसाची कृत्ये, त्याचे विमल चारित्र्य, त्याची माणसाची पारख आणि मराठा आरमार स्थापण्यात त्यांनी दाखविलेली दूरदृष्टी यांवर जोतीरावांनी आपल्या पोवाड्यात सुमने उधळली आहेत. लोकांचे प्रेम जिंकण्यासाठी रामदासाला त्याने गुरू म्हणून मानले असे जोतीराव म्हणतात. लोकप्रीती संपादन करण्याला त्यांनी रामदासाला गुरू केले.

जिजीबाईचा बाळ काळ झाला यवनाचा ।
पोवाडा गातो शिवाजीचा ॥
कुळवाडीभूषण पोवाडा गातो भोसल्याचा ।
छत्रपती शिवाजीचा ॥

असे म्हणून त्यांनी आपला पवाडा समाप्त केला आहे.

जोतीरावांच्या पिढीत शिवाजीच्या महान आणि वैभवशाली कार्याकडे महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेणारे जोतीराव हे पहिले महाराष्ट्रीय पुढारी होत. जोतीरावांच्या पोवाड्यानंतर तीन वर्षांनी म. मो. कुंटे ह्या विद्वानाने शिवाजीवर महाकाव्य लिहिण्याचा संकल्प सोडला. कुंटे हे त्या काळचे मोठे नाणावलेले पंडित होते. ते न्यायमूर्ती रानडे यांचे स्नेही व सहकारी होते. ते अर्धवट सनातनी व अर्धवट सुधारक होते. त्यांचे 'राजा शिवाजी' हे महाकाव्य अपूर्ण राहिले. कुंट्यांचे 'राजा शिवाजी' हे महाकाव्य आणि जोतीरावांचा शिवाजीचा 'पवाडा' ही दोन पुस्तके दक्षिणासमितीकडे सरकारी बक्षिसासाठी सादर करण्यात आली होती, असे शिक्षणखात्याच्या संचालकाने आपल्या सन १८६९/७० च्या प्रतिवृत्तात म्हटले आहे. पारितोषिक म. मो. कुंट्यांना मिळाले हे सांगावयास नकोच.

आणखी एक जोतीरावांचा काव्यसंग्रह याच वेळी प्रसिद्ध झाला. त्याचे नाव 'ब्राह्मणांचें कसब.' त्या काव्यसंग्रहात, अज्ञानी आणि देवभोळ्या शेतकऱ्यांची भटभिक्षुक कशी आर्थिक पिळवणूक करतात याचे हुबेहूब आणि उद्‌बोधक वर्णन आहे. तो काव्यसंग्रह १८६९ साली प्रसिद्ध झाला. त्यात धर्मभोळेपणावर आणि ज्या चालीरीतींवर जोतीरावांनी त्वेषाने हल्ला केला आहे, त्यांपैकी काही काळाच्या ओघात वाहून गेल्या आहेत. परंतु तो धर्मभोळेपणा आणि चालीरीती ह्यांमुळे अज्ञानी अशा कनिष्ठ वर्गांवर किती भयंकर परिणाम होत असे याचे जोतीरावांनी ह्या काव्यात वर्णन केले आहे.

आपल्या काव्यात जोतीराव म्हणतात, 'जो ब्राह्मण चांडाळाला भिक्षा घालीत नाही त्याला शूद्रांकडून भिक्षा घेण्यास त्याचा धर्म संमती कसा देतो ?' भटभिक्षुक शेतकऱ्याल कसा नागवितो याची त्यांनी उदाहरणे दिली आहेत. शेतकऱ्याची बायको प्रसूत झाल्यावर तो भटजी तिला सांगतो की, तुझ्या त्या मुलाला अपमृत्यू येण्याचा संभव आहे. साहजिकच ती घाबरते. त्यावर काही उपाय आहे की काय, असे ती भटजीला विचारते. भटजी तिला सांगतो, 'तू काही धार्मिक विधी कर किंवा एखाद्या धर्मग्रंथाचे तुझ्या घरी पारायण चालू ठेव. म्हणजे तुझ्या मुलाचा अपमृत्यू टळेल.' जीत भटाला धन नाही, व इतरांना धाक नि शाप नाही, अशी पोथी सापडणे कठीण ! त्या गरीब शेतकऱ्याजवळ असेल नसेल तो पैसा लुबाडून नेण्याचाच त्यात त्याचा डाव असतो.

कनिष्ठ वर्गातील लग्ने जुळविणे किंवा मोडणे याची किल्ली भटाभिक्षुकांच्याच हाती असते. त्या वर्गातील मुलामुलींचे विवाह जमवून त्यांचे भवितव्य ठरविण्यात भटाचाच शब्द प्रमाण मानण्यात येतो. भटजीचे ज्योतिषशास्त्र आणि त्याची लहर ह्यांवरच एखादे लग्न जुळविणे किंवा न जुळविणे ही गोष्ट अवलंबून असते. कनिष्ठ वर्गातील मुलींचे व मुलांचे भवितव्य त्या भटजीच्या हाती असते. लग्न ठरविण्यात मुलामुलींच्या दोन्ही पक्षांत भटजीचा शब्द निर्णायक ठरे. लग्न ठरविण्याच्या पूर्वी कित्येक वेळी अनिष्टग्रहशांतीकरिता त्या भटजीला यजमानाच्या खर्चाने प्रार्थना करावी लागे. भटजीच त्यातला मुख्य कर्ता सवरता. हे सांगून, जोतीराव आपल्या लोकांना असा उपदेश करतात की, 'त्यांनी आपापले नातलग आणि स्नेह्यांपैकी जाणत्या व्यक्ती निवडून त्यांच्याकरवी लग्ने जुळवावी. त्यांनी स्वतःच देवाची प्रार्थना करून आनंदाने लग्ने करावी. भटजीची तेथे काही आवश्यकता नाही त्याला जमालगोटा द्यावा.'

शेतकऱ्यांच्या घरी त्या काळी दुसरा एक समारंभ होत असे. मुलींची बाल्या-वस्थेत लग्ने होत असल्यामुळे लग्नानंतर त्यांना ऋतुप्राप्ती होई. ऋतुप्राप्तीनंतर शेतकऱ्याला धर्माच्या आणि देवाच्या नावाने भटजींना आणि आपल्या इष्टमित्रांना त्या उत्सवाप्रीत्यर्थ मेजवानी द्यावी लागे. शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्यामुळे त्यांना असल्या समारंभाचा खर्च झेपत नसे. ते कर्जात बुडत. कधी कधी शेतकऱ्याने

नवीन घर बांधल्यावर गृहप्रवेशाचा समारंभ करावा लागे. त्या वेळीसुद्धा ब्राह्मणांना भोजन आणि दक्षिणा देऊन प्रथम त्यांची तृप्ती करावी लागे. ज्यांनी ते घर बांधले ते सुतार, गवंडी व त्या घराचा मालक हे सर्वजण ते फुकटे भटभिक्षुक, भूदेव त्या समारंभाच्या-वेळी जेऊन तृप्त होईपर्यंत, आपली जेवणाची पाळी येईपर्यंत घराच्या एका कोपऱ्यात भटांच्या जेवणावळीचा तो समारंभ पाहत बसत असत.

जोतीरावांनी आणखी एक उदाहरण दिले आहे. एका शूद्राच्या घरी भटजी धार्मिक ग्रंथाचे पारायण करतो. त्या शूद्र शेतकऱ्याची तो मर्जी संपादन करतो. 'मी तुझ्या शेतावरची वसूली करतो,' असे त्याला सांगतो. त्यांच्या कुळांकडून प्रथम प्रथम सर्व वसुली गोळा करून त्या धनिक शेतकऱ्याला खूप करतो. अशा रीतीने त्या धनिक शेतकऱ्याचा विश्वास संपादन केल्यावर काही दिवसांनी तो भटजी वसूल न देण्याबद्दल काही कुळांवर फिर्याद करतो. त्यामुळे कुळे घाबरून जातात. तो भटजी-कारकून त्या कुळांना गुप्तपणे जाऊन भेटतो. 'तुम्ही जर मला पैसे दिलेत तर त्यातून मी तडजोड शोधून काढीन.' आपले अधिक नुकसान होऊ नये म्हणून ती गरीब कुळे त्या भटजी—कारकुनाशी गुपचुपपणे तडजोड करतात. एवढे झाल्यावर तो ब्राह्मण कारकून त्या धनिक शेतकऱ्याला आपल्या कुळाशी तडजोड करण्याचा सल्ला देतो. त्यामुळे तडजोड होते. त्याबरोबर मोठ्या विजयाने हा खलपुरुष घरी शीळ घालीत जातो.

निरनिराळ्या ऋतूंमध्ये आणि दुसऱ्या अनेक धार्मिक व सांस्कृतिक समारंभाच्या वेळी, तो भटजी शेतकऱ्यांना स्वर्गाचे दरवाजे उघडे करण्याकरता त्यांच्या दारी उभा असतोच. अशा रीतीने ती गरीब कुटुंबे देवांच्या आणि भटजींच्या या धार्मिक ओझ्याखाली शरीराने व मनाने अक्षरशः दबली जातात.

शेतकऱ्यांकडून पैसे उकळण्याची भटजीजवळ आणखी एक युक्ती असते. एक म्हातारा शेतकरी अगदी हाडाचा सापळा होऊन रुग्णशय्येवर पडलेला असतो. अनेक वैद्यराज त्याच्यावर झडप घालून मोठ्या घाईघाईने त्याचे पैसे उपटतात. वैद्यराज येऊन गेल्याची वार्ता भटजीच्या कानावर पडते. तो त्याच पावली त्या शेतकऱ्याच्या घरी जातो. आणि त्याच्या घरी धार्मिक ग्रंथाचे पारायण सुरू करतो. मृत्युशय्येवर असलेल्या त्या शेतकऱ्याच्या देवभोळ्या नातलगांना वाटते की, भटजीने शिवलीलामृत ग्रंथ किंवा पांडवप्रताप ग्रंथ वाचला, किंवा दुसरी एखादी पोथी वाचली म्हणजे आजाऱ्याचा मृत्यू टळेल. दोनचार दिवस पोथी वाचल्यावर तो भटजी शेतकऱ्याच्या बायकोकडून तिच्या नवऱ्याचा जीव वाचवण्याकरता दक्षिणा आणि दुसऱ्या काही देणग्या उपटावयाला सुरुवात करतो.

भटजीला दक्षिणा म्हणून द्यावयास जर शेतकऱ्याच्या गोठ्यात गाय नसली, तर निदान भटजीला पायातील जोड्यांची नवी करकरीत वहाण दान म्हणून मिळे. भटाला दिली ओसरी, भट हातपाय पसरी ही म्हण अक्षरशः तो भट कृतीत आणू लागतो. शेतकऱ्याच्या जवळ जाणाऱ्या त्याच्या बायकोला मृत्युशय्येवर पडलेल्या पतीजवळ

जाऊ नको, त्याची झोपमोड करू नको, असे तो भटजी सांगतो. भटजीला अधिकाधिक धान्य देऊन देवाला प्रसन्न करून घेण्याविषयी तिला सल्ला देण्यात येतो. निरनिराळे जप, निरनिराळ्या प्रार्थना, निरनिराळे होम, देवाच्या नावाने करण्यासाठी तिला आग्रह करण्यात येतो. ती तसे निमूटपणे करते. परंतु त्या सर्व जपमंत्राचा आणि पारायणाचा देवावर काही परिणाम होत नाही. तो शेतकरी मात्र शेवटी देवाघरी जातो.

तो भटजी त्या शेतकऱ्याच्या मुलाकडून दहा दिवस धार्मिक विधीच्या रूपाने पैसे उपटतो. मृताचे नातलग आणि त्याचे जातभाई यांना भोजन द्यावे लागते. कावळ्याला पिंड मिळतात आणि ब्राह्मणाला गाय मिळाली नाही तरी दक्षिणा, भांडी, नवीन करकरीत जोडे व छत्री एवढ्या वस्तूंवर त्याचे भागते.

हा सर्व खर्च केल्यावर त्या शेतकऱ्याच्या मुलाला कर्ज होते. त्या वेळी तो भटजीच त्याला कर्ज देतो. काही दिवसांनंतर व्याजाचे हप्ते वेळी मिळत नाहीत म्हणून तो भटजी त्या शेतकऱ्याच्या मुलाकडून नवीन दस्तऐवज करून घेतो. शेतकऱ्याच्या म्हाताऱ्या बायकोची 'ना धान्य ना दात' अशी केविलवाणी परिस्थिती होते. शेवटी नव्या दस्तऐवजाप्रमाणे ब्राह्मणास लिहून दिलेले तिचे शेत कर्जापायी त्या ब्राह्मणाच्या घशात तिला सोडावे लागते. आणि ती भिकेस लागते. शेपूट तुटलेल्या पालीप्रमाणे ती बिचारी विव्हळत असते. भुकेकंगाल होऊन ती सरतेशेवटी प्राण सोडते. तिचा मुलगा भिकेस लागतो. ही गोष्ट कथन करून जोतीराव अत्यंत कळवळ्याने त्या काव्यसंग्रहात म्हणतात : 'हे व्हिक्टोरिया राणी, या शेतकऱ्याला शिक्षण दे. ज्ञान दे. आणि त्याच्या ह्या दुर्दैवापासून त्याला वाचव.' ग्रहणाच्या वेळी, संक्रांतीच्या वेळी आणि श्राद्धाच्या वेळी तो भटजी त्या शेतकऱ्याच्या दारी दत्त म्हणून उभा असतो. धार्मिक क्षेत्राच्या ठिकाणी दक्षिणा गोळा करावयास तो असतोच हे सांगण्याची आवश्यकता नाही. अशा प्रकारे प्रत्येक वेळी आणि प्रत्येक स्थळी शेतकऱ्याच्या धर्मभोळेपणाचा फायदा घेऊन भटजी त्याची पिळवणूक करीत असत.

ब्राह्मण पवित्र जानवी घालतात. परंतु त्यामुळे त्यांचा स्वभाव बदलत नाही. ते पवित्र क्षेत्री स्नान करतात, देवाची हरघडी प्रार्थना करतात, कपाळाला भस्म लावतात. परंतु ते खऱ्या अर्थाने अधार्मिक असतात. ते देवापासून दूर असतात.

सोवळे परिधान करून ब्राह्मण हे स्वतःच अस्पृश्य बनतात. शूद्राच्या स्वच्छ केसाच्या स्पर्शाने ते अपवित्र होतात. शूद्रांना वेदपठण ऐकण्यास त्यांनी बंदी घातली आहे. पण तेच ब्राह्मण युरोपियन लोकांना संस्कृत पठण करावयास शिकवतात. स्वतःस भूतलावरील देव समजून मोठ्या दिमाखाने वागतात. पण वेश्यांच्या पायाजवळ गोंडा घोळतात. ते शूद्रांना अन्न फेकून देतात व शक्तिपंथाचे सभासद होऊन दारू पितात. आपल्या पायाचा आंगठा पाण्यात बुडवून ते पाणी तीर्थ म्हणून शूद्रांना प्यावयास देतात. परंतु अमंगल नि अपवित्र वेश्यांची लाळ घोटतात. मग त्या वेश्या हीन जातीच्या असोत किंवा विधर्मीय असोत. त्याची त्यांना क्षिती नसते. अशिक्षित शूद्र हा निर्लज्ज झाला आहे.

तो ब्राह्मणाचे पाय चाटतो. असे सांगून जोतीराव म्हणतात, 'शूद्रांनी आपल्या अवनती-संबंधी आत्मसंशोधन करावे. आपली परिस्थिती सुधारण्यासाठी प्रयत्नांची कास धरावी. यातच खरे मनुष्यपण आहे.'

विसाव्या शतकातील आम्हां लोकांना जोतीरावांच्या काळातील सामाजिक परिस्थिती समजली नाही, तर जोतीरावांच्या कार्याविषयी आम्हांस नीट उमज पडणार नाही. तत्कालीन सामाजिक परिस्थिती पाहून त्यांचे डोके भणाणले होते. धर्माच्या नावाखाली भटाभिक्षुकांनी शेतकऱ्यांची केलेली निर्दय नि निष्ठुर पिळवणूक पाहून त्यांचा आत्मा दुःखाने चडफडत असे. त्यांचा दृष्टिकोण हा जितका बुद्धिवादी होता तितकाच तो मानवतावादी होता. तो न्यायावर अन नीतीवर अधिष्ठित होता. 'ब्राह्मणांचें कसब' हे काव्य म्हणजे दक्षिणा प्राईज समितीला जोतीरावांनी जे नाटक सादर केले होते, त्यातील मतांचा पुनरुच्चार होय. ते काव्य त्यांनी स्वतः छापून प्रसिद्ध केले होते. जोतीरावांच्या एका मित्राने शिक्षणखात्यातील अधिकाऱ्यांचे भरभारे मन वळवून त्यांच्या पुस्तकांच्या काही प्रती विकत घेण्याविषयी प्रयत्न केला. परंतु काही उपयोग झाला नाही. असे वादग्रस्त मतांचे पुस्तक शाळेत मुलांच्या अभ्यासासाठी व वाचनासाठी कोण घेणार ? ब्राह्मण अधिकारी ही गोष्ट करणे कदापि शक्य नव्हते. कॅथॉलिक शाळेमध्ये ल्यूथरचे लेख वाचण्याची शिफारस करण्यासारखीच ही गोष्ट होती! दक्षिणा प्राईज समितीकडे या पुस्तकासंबंधी तुम्ही वशिला का लावला नाही, असे जोतीरावांना त्यांच्या एका मित्राने विचारले. त्यावर जोतीराव म्हणाले, "अरे बाबा, चांगले काम शेवटास नेण्याकरिता वाईट उपाय योजू नयेत."[६]

---

६. फुले, जोतिराव गोविंदराव, गुलामगिरी, पृ. १६६.

# १०

## "गुलामगिरी"

जोतीरावांच्या ह्या तुफानी प्रचारामुळे अज्ञानी लोकांच्या डोक्यात प्रकाश पडू लागला. त्यामुळे देवधर्मांच्या नावाखाली अज्ञानी गरिबांची पिळवणूक करून व आपल्या सामाजिक प्रतिष्ठेचा आणि शासकीय सत्तेचा दुरुपयोग करून गरिबांना जे नाडीत, त्यांच्या बालेकिल्ल्यावर त्या घणाघाती प्रचाराचे आघात होत. सर्व महाराष्ट्रात जोतीरावांच्या आसूडाच्या फटकाऱ्याचे पडसाद उमटत होते. विरोध अन् संकटे ह्यांना तोंड देणे हे जोतीरावांच्या जवळजवळ अंगवळणी पडल्यासारखे होते. जे विचारवंत होते, त्यांना अधिक मोठा वैचारिक धक्का देण्यासाठी जोतीराव पुन्हा एकदा पुढे सरसावले.

नवीन आणि पुरोगामी ध्येयाची प्रभात महाराष्ट्रामध्ये उदय पावत होती. सामाजिक क्रांतीच्या उद्देशाने प्रेरित झालेली परमहंस सभा मोडकळीस आल्यानंतर मुंबईत ३१ मार्च १८६७ रोजी प्रार्थना समाज हे नाव धारण करून ती पुन्हा जन्मास आली. परंतु ती आता अधिक सात्त्विक, सौम्य आणि उत्क्रांतिवादी बनली होती. प्रार्थना समाजाचे बहुतेक संस्थापक हे परमहंस सभेचे नेते आणि प्रणेते होते. संस्था म्हणजे कल्पनेची अपत्ये असे कार्लाईल म्हणे, ते योग्यच होते.

परमहंस सभा ही एकेश्वरी मताची होती. तिचा भर सामाजिक समतेच्या व्यवहारावर अधिक असे. प्रार्थना समाजाची जरी सामाजिक समतेवर श्रद्धा असली, तरी त्या संस्थेचा आध्यात्मिक गोष्टींकडे अधिक कल होता. परमहंस सभेचे प्रमुख दादोबा तर्खडकर यांच्या स्वभावातील आणि प्रार्थना समाजाचे प्रमुख संस्थापक डॉ. आत्माराम पांडुरंग तर्खडकर, वामन आबाजी मोडक, महादेव गोविंद रानडे आणि डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांच्या स्वभावातील हा फरक होता. प्रारंभी प्रार्थना समाजाच्या प्राथमिक बैठकीमध्ये त्याचे नेते विधवाविवाह, स्त्रीशिक्षण, बालविवाहप्रतिबंध, जातिभेद-निर्मूलन इत्यादी सामाजिक प्रश्नांवर भर देत असत. परंतु शेवटी सामाजिक ध्येयापेक्षा आध्यात्मिक ध्येयाकडेच त्यांची मते अधिक झुकली. रानडे हे प्रार्थना समाजाचे स्फूर्तिदात्या धुरीणांपैकी एक असले, तरी ते प्रत्यक्षपणे १८७० साली प्रार्थना समाजास मिळाले. परमहंस सभेचे संस्थापक हे मुख्यतः समाजसुधारणावादी होते, तर प्रार्थना समाजाचे नेते आध्यात्मिक-सुधारणावादी होते, असे म्हणावयास प्रत्यवाय नाही.

प्रार्थना समाजाची पुणे येथे ४ डिसेंबर १८७० रोजी एक शाखा काढण्यात आली. जोतीराव साहजिकच तिचे सभासद झाले नाहीत. प्रार्थना समाजाचे पुण्यातील कार्यकर्ते हे जोतीरावांचे मित्र आणि चाहते होते. जोतीराव हे एकेश्वरीवादी होते. परमेश्वराचे पितृत्व आणि मनुष्याचे बंधुत्व ते मानीत. परंतु प्रार्थना समाजवादी हे धर्मोपदेश आणि प्रार्थना ह्यांकडेच प्रामुख्याने वळल्यामुळे अन् जनतेकडे त्यांनी पाठ वळविल्यामुळे सामान्य जन प्रार्थना समाजाचे सभासद झाले नाहीत. सर नारायण चंदावरकर यांच्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे 'प्रार्थना समाजाचे नेते ऋषितुल्य होते. त्यांचे जीवन दया, सेवा व समाजाला उपकारक नि उदात्त अशा ध्येयाने प्रेरित झालेले होते.' परंतु ते बहुतेक सर्व नेते सरकारी नोकर होते. जनतेच्या उद्धारासाठी प्रत्यक्ष कृती करण्यात ते फारसा उत्साह दाखवू शकले नाहीत. ते उदारमतवादी होते, परंतु कृतिशूर नव्हते. जोतीरावांना त्यांच्याविषयी ही पूर्ण कल्पना होती.

ह्या वेळी पुण्यातही दुसरे मोठे स्थित्यंतर घडले होते. तेथे २ एप्रिल १८७० रोजी सार्वजनिक सभा स्थापन करण्यात आली. गणेश वासुदेव जोशी तथा सार्वजनिक काका आणि जोतीरावांचे मित्र सदाशिवराव गोवंडे हे ह्या सार्वजनिक सभेचे जसे प्रमुख संस्थापक होते, तसेच आधारस्तंभही होते. जनता आणि वृत्तपत्रे यांची सरकारपुढे गाऱ्हाणी मांडण्याचे कार्य सार्वजनिक सभेने आपल्या हाती घेतले. मोरो विठ्ठल वाळवेकर आणि सखाराम यशवंत परांजपे हे जोतीरावांचे दोन स्नेही कामधंद्याच्या निमित्ताने मुंबईस जाऊन राहिले. सार्वजनिक काका आणि गोवंडे हे सार्वजनिक सभेच्या वतीने लोकांची गाऱ्हाणी व दुःखे सरकारपुढे मांडून ती सरकारकडून निवारण करून घेण्यासाठी प्रयत्न करीत. त्या कार्यामुळे त्यांची प्रतिष्ठा आणि लोकप्रियता नि कीर्ती ही एवढी पसरली की, महाराज्यपाल लॉर्ड लिटन ह्यांनी वृत्तपत्रांची गळचेपी करण्याकरता काढलेल्या निर्बंधाविरुद्ध भारतीय वृत्तपत्रांची ते मोठ्या धैर्याने संघटना करू शकले. जनतेने

स्वदेशी वस्तू वापराव्या अशा प्रचारास त्यांनी आरंभ केला. ही कल्पना अभिनव अशी होती.

शेवटी शेवटी सदाशिवराव गोवंडे यांचे मन वेदान्ताकडे झुकले. त्यांच्या वडिलांनी आयुष्याच्या अखेरीस संन्यासमार्ग चोखाळून आपल्या घराच्या अंगणातच समाधी घेतली होती. कोणा एका साधूच्या भक्तिपाशात गुरफटून सदाशिवपंत गोवंडे यांनी आपल्या आयुष्याची उर्वरित सायंकाळ अध्यात्मचिंतनात घालविली. तरी सार्वजनिक काकांबरोबर मोठ्या कार्याचे कंकण बांधल्यामुळे ते एक वजनदार नेते म्हणून प्रतिष्ठा पावले होते. त्यांचे सहकारी सार्वजनिक काका हे तर देशभक्ती, कार्यशक्ती आणि कल्पकता यांचे एक मोठे चालते बोलते प्रतीक होते. अठराशे एकाहत्तर साली रानड्यांची बदली पुण्यास झाल्यावर त्यांच्या देदीप्यमान व्यक्तिमत्त्वाने आणि त्यांच्या सर्वस्पर्शी मतप्रणालीने सार्वजनिक सभेच्या कार्याला जोराची चालना मिळाली.

सार्वजनिक सभा हीच पुण्यातील पहिली राजकीय संस्था नव्हती. १८५२ सालच्या पूर्वार्धात डेक्कन असोसिएशन नावाची एक राजकीय संस्था पुण्यात स्थापन करण्यात आली होती. हिंदी राज्यव्यवस्थेत १८५३ साली काही घटनात्मक फरक करावेत असा ब्रिटनमध्ये त्या वेळी विचार चालला होता. डेक्कन असोशिएशन ही महाराष्ट्रातील पहिली राजकीय संस्था. तीत सरदार, जहागिरदार आणि सुशिक्षित तरूण मंडळी यांचाच भरणा होता. ते उदारमतवादी असे पाश्चात्त्य शिक्षण संपादन केलेले प्रतिष्ठित लोक होते. आपल्या देशबांधवांच्या वतीने इंग्लंडातील राज्यकर्त्यांकडे लोकांची गाऱ्हाणी मांडणे हेच त्यांचे ध्येय होते. सरकारने धूर्तपणे ह्या संस्थेची शकले केली. तिचे जे प्रमुख आधारस्तंभ होते, त्यांची बदली पुण्याबाहेर करताच डेक्कन असोशिएशन आपोआपच थंडावली अन् काही महिन्यांतच नामशेषही झाली.

डेक्कन असोशिएशन या संस्थेच्यापूर्वी पुण्यात कल्याण्णोन्नायक मंडळी ह्या नावाची संस्था मोरशास्त्री साठे नावाच्या गृहस्थाने स्थापन केली होती. ह्या प्रतिगामी संस्थेची दोन महत्त्वाची तत्त्वे होती. त्यातले पहिले तत्त्व असे की, संस्कृत भाषेतील ग्रंथ सर्वोत्तम व त्यांत सर्वोपयोगी ज्ञान आहे. दुसरे तत्त्व असे की, विधवांनी पुनर्विवाह करू नये. त्यांनी मीठवर्जित जेवण घेत राहावे व उपासतापास करीत जावे. ह्या संस्थेचे सभासद विधवा-विवाहाचे कट्टर विरोधक होते.

पूना असोशिएशन नावाची दुसरी एक राजकीय संस्था पुण्यात १८६७ च्या दरम्यान स्थापण्यात आली होती. त्या संस्थेने विशेष हालचाल केलेली दिसत नाही. त्यामुळेच सार्वजनिक सभा ही जन्मास आली असावी. अठराशे पासष्ट साली वेदसमाचार नावाची मद्रास येथे एक संस्था स्थापण्यात आली होती. ब्रह्मानंद केशवचंद्र सेन या ब्राह्मसमाजाच्या क्रांतिकारक नेत्याच्या भेटीनंतर मुंबई येथे जसा प्रार्थना समाज स्थापण्यात आला, तशीच त्यांनी मद्रासला दिलेल्या भेटीमुळे मद्रास येथेही वेदसमाचार ही संस्था जन्मास आली. ह्या संस्थेचा वेदांशी सुतराम संबंध नव्हता. समाजात विरोधाची किंचितही

बावटळ न उठविता सामाजिक रूढीत सुधारणा करण्याचा ह्या संस्थेच्या सभासदांचा मानस होता. 'आस्ते कदम आगे बढो' हे त्यांचे ब्रीदवाक्य आणि घोषवाक्य होते. जोतीरावांच्या काळातील सामाजिक चळवळीचे असे हे स्वरूप होते.

ह्या असल्या संस्थांच्या ध्येयांवर वा तत्त्वज्ञानांवर जोतीरावांचा काडीचाही विश्वास नसे. कारण त्या संस्था वरिष्ठ वर्गांच्या गाऱ्हाण्यांच्या बाबतीतच विशेष लक्ष घालताना आढळत. कनिष्ठ वर्गाची दुःखे समजावून घेऊन ती सरकारपुढे मांडण्याचे अगत्य त्यांपैकीं कोणीही दाखवीत नसे. त्यांच्या कार्यक्रमात आणि प्रचारात कनिष्ठ वर्गांच्या अस्तित्वाची जाणीव पुसटसुद्धा असलेली आढळावयाची नाही. यामुळेच सार्वजनिक सभेसारख्या संस्थेचे वर्णन जोतीराव 'सार्वजनिक भटसभा' ह्या शब्दांनी करीत. यात आश्चर्य ते कोणते?

महादेव गोविंद रानडे हे समाजाचा रथ, सुधारणेचा मार्ग शोधून काढून, त्यावरून सर्वांगीण उन्नतीप्रत कसा पोहोचविता येईल ह्या एकाच विचाराने सदैव भारलेले असत. ते मोठे विचारवंत आणि दूरदृष्टीचे नेते म्हणून उदयास येऊ लागले होते. रानडे म्हणजे तत्कालीन भारतातील विचारवंत आणि सुधारक यांचे मुकुटमणी. त्यांच्या उदार अन् उदात्त दृष्टीमुळे त्यांचा नि जोतीरावांचा संबंध जडला. ते परस्परांच्या घरी जात येत असत. परस्परांना परस्परांविषयी अत्यंत आदर असे. जोतीरावांच्या घरी जेव्हा रानडे जात असत, तेव्हा त्यांच्या मानास आणि कीर्तीस शोभेल असेच त्यांचे आदरातिथ्य त्यांचे घरी होत असे.

सार्वजनिक सभा आणि प्रार्थना समाज यांच्या कार्यांमुळे रानडे, समाजाचा एक हात बळकट करीत होते, तर जोतीराव समाजाचा दुसरा हात बळकट करीत होते. त्यामुळे साहजिकच जोतीरावांच्या कार्याविषयी रानडे विशेष उत्साह दाखवीत. ते दोघेही परस्परांना सहानुभूती दाखवीत व साह्यही करीत. जोतीराव आणि रानडे हे दोघेही नवीन विचारांचे स्वागत करीत. राष्ट्राची मुक्ती नि उद्धार ह्याचा विचार करता दोघेही योग्य मार्गाने चालले होते. बौद्धिक व आत्मिक दृष्ट्या ते दोघेही सचेतन व सजाग होते. रानड्यांचे व्यक्तिमत्त्व ज्ञान, प्रतिभा नि विशाल दृष्टी ह्यांनी उजळलेले होते; तर जोतीरावांचे अलौकिक अंतःस्फूर्ती नि युयुत्सुवृत्ती यांनी प्रखर बनलेले होते. सामाजिक प्रश्नांकडे पाहण्याची मूलग्राही दृष्टी जोतीरावांत उपजतच असून तिला कर्तृत्वाची स्पृहणीय जोड लाभलेली होती.

समाजातील विकास-विरोधी दोष नष्ट करून व्यक्तीला आत्मविकासाचा मार्ग मोकळा करून देणे हे रानड्यांचे जीवनध्येय होते. समाजाची नवीन पायावर उभारणी करणे हे त्यांचे उद्दिष्ट नव्हते. उलट जोतीरावांचे उद्दिष्ट समाजाचा जीर्ण पाया उखडून टाकून त्या जागी नवीन पाया घालण्याचे होते. दोघांच्या उद्दिष्टांत असा हा जरी फरक होता, तरी नवीन विचारांशी सुसंगत असे नवजीवन जगण्यास समाजाला समर्थ करणे अशी त्या दोघांची समानदृष्टी होती.

मानवाची प्रतिष्ठा आणि त्याची जीवनमूल्ये ह्यांविषयी दोघांनाही अत्यादर वाटे. सामाजिक स्वास्थ्याच्या दृष्टीने मनुष्यामनुष्यामध्ये सदैव समानतेची वृत्ती वास करीत राहिली पाहिजे असे उभयतांचे पायाभूत तत्त्व होते. नवसमाजाविषयी त्यांची जी कल्पना होती त्यात सर्व व्यक्ती जन्माने समान आहेत असे मानले होते. त्यांच्या मते समाजात कोणीही कनिष्ठ वा वरिष्ठ नाही. प्रत्येक व्यक्ती प्रत्येकाशी समान. एका व्यक्तीचे हित दुसऱ्याच्या हिताविरुद्ध असता कामा नये. रानडे आणि जोतीराव हे आपल्या सदसद्विवेक बुद्धीप्रमाणे चालत. त्यांच्या अंतःकरणांत दिव्यतेचे स्फुलिंग फुलत होते.

रानड्यांसारखा हिंदुस्थानातील एक विचारवंत पुरुष जोतीरावांच्या कार्याकडे आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाकडे आकर्षिला जावा ह्याचे इंगित रानड्यांच्या सामाजिक आणि राजकीय विचारसरणीमध्ये आढळते. रानड्यांच्या मतप्रणालीप्रमाणे जोतीरावांची सामाजिक समतेची चळवळ, सामाजिक न्यायासाठी त्यांनी चालविलेला झगडा, बुद्धिवादाची त्यांनी धरलेली कास आणि समाजातील अन्याय दूर करण्यासाठी त्यांनी चालविलेली धडपड ही योग्य होती. कारण द्रष्टे आणि स्रष्टे रानडे म्हणत असत : "तुमच्या राजकीय हक्कांच्या बाबतीत जर तुमची अधोगती झाली असेल, तर तुमची समाजपद्धती चांगली असणे शक्य नाही. तुमची समाजपद्धती विवेक व न्याय ह्यांवर अधिष्ठित नसेल तर तुम्ही राजकीय अधिकार व वैयक्तिक हक्क ह्यांचा उपभोग घेण्यास लायक ठरणार नाही. तुमची समाजव्यवस्था चांगली असल्याखेरीज तुमची आर्थिक घटना चांगली असणे शक्य नाही. तुमची धर्मविषयक ध्येये जर हीन व निकृष्ट असतील तर सामाजिक, आर्थिक किंवा राजकीय क्षेत्रांत तुम्हांला यश मिळणे शक्य नाही. हे परस्परावलंबन योगायोगाने आले नसून हा निसर्गनियम आहे."[१]

अठराशे एकात्तर सालच्या जानेवारीत स्त्रीविचारवती ह्या नावाची एक सामाजिक संस्था सदाशिवराव गोवंडे यांची पत्नी सौ. सरस्वतीबाई गोवंडे व सार्वजनिक काकांची पत्नी सौ. सरस्वतीबाई जोशी ह्यांनी पुण्यात स्थापना केली. रानडे आणि सार्वजनिक काका यांच्या मार्गदर्शनानुसार ह्या संस्थेच्या स्त्रीसभासदांनी २५ एप्रिल १८७३ रोजी हळदीकुंकू वाटण्याचा एक समारंभ साजरा केला. समारंभाच्या स्थानापासून लांब अशा एका दूर कोपऱ्यात का होईना अस्पृश्य जातींच्या स्त्रियांना हळदीकुंकू वाटण्यात आले. ब्राह्मणेतर स्त्रियांना, स्त्रीविचारवती सभेच्या ब्राह्मण स्त्रियांकडून आपल्याला कोणती वागणूक मिळेल याविषयी प्रथम शंका आली. तरी त्यांनी त्या समारंभात भाग घेतला होता. हा अपूर्व असा समारंभ पार पडला.[२] सौ. सरस्वतीबाई गोवंडे आणि सौ.

---

१. Miscellaneous Writings of the Late Hon'ble Mr. Justice Ranade, pp. 231-32.

२. ज्ञानप्रकाश, २० जुलै १८७३.

सावित्रीबाई फुले ह्यांचा जिवाभावाचा स्नेह होता. तरी या समारंभास सावित्रीबाई फुले उपस्थित होत्या किंवा नाही हे कळत नाही.

पुण्यातील स्त्रीविचारवती सभेच्या स्थापनेनंतर नेटिव्ह फिमेल नार्मल स्कूलच्या विद्यार्थिनींनी १४ एप्रिल १८७१ रोजी कलकत्ता येथे एक संस्था स्थापली. तीत वीस स्त्रियांनी भाग घेतला. आपल्या देशबांधवांच्या उद्धाराचे कार्य करण्यासाठी स्त्रियांनी आपल्या मनाची सिद्धता ठेवावी, असा उपदेश त्या संस्थेच्या सभासदांना केशवचंद्र सेन यांनी केला.[३]

. २ .

सामाजिक चळवळीची जोतीराव आता सिद्धता करीत होते. कनिष्ठ वर्गातील लोकांचे अज्ञान, निरक्षरता, दूषित पूर्वग्रह आणि जातिविषयक भावना ही दूर करून जोतीरावांना, त्यांना ब्राह्मणांच्या मानसिक गुलामगिरीतून मुक्त करावयाचे होते. ह्या भव्य ध्येयाने प्रेरित होऊनच त्यांनी ग्रंथ, काव्ये नि पुस्तिका प्रसिद्ध केल्या होत्या. आता ते एक स्फोटक ग्रंथ लिहिण्यात गुंतले होते. त्याचा काही भाग त्यांनी १८७२ च्या आगस्ट–डिसेंबर ह्या काळात पूर्ण केला. त्यातील पहिल्या भागात, ज्या परशुरामाला ब्राह्मणनिर्मित ग्रंथांत आणि पुराणांत चिरंजीव मानण्यात आले आहे, त्याला त्यांनी लोकांच्या समोर पुन्हा येऊन उभे राहण्याविषयी आव्हान दिले आहे. ब्राह्मणी धर्माने प्रसारित केलेल्या अवतारकल्पना मुळासकट उपटून टाकण्यासाठी जोतीरावांनी हा तिच्यावर हल्ला चढविला हे उघड आहे.

ह्या पुस्तकाच्या दुसऱ्या भागात जोतीरावांचा जाहीरनामा प्रसिद्ध केलेला आहे. त्या जाहीरनाम्यात त्यांनी असे म्हटले आहे की "जे दास (क्षुद्र) फक्त आपल्या उत्पन्नकर्त्यास मानून नीतीस अनुसरून स्वच्छ उद्योग करण्याचा निश्चय करून त्याप्रमाणे आचरण करीत आहेत, अशी त्यांजविषयी माझी खात्री झाल्याबरोबर मी त्यास केवळ आपल्या कुटुंबांतील बांधवांप्रमाणे समजून त्यांजबरोबर अन्नव्यवहार करीन, मग ते कोणत्याही देशातील असोत." आपले मानवी अधिकार समजल्याबरोबर आपण त्या ब्राह्मणांच्या 'कैदखान्याच्या कृत्रिम कोटाच्या मुख्य ब्रह्मकपाट दरवाज्याला लाथ मारून बाहेर पडलो आहो' असें त्यांनी जाहीर केले.

शूद्र हे ब्राह्मणांचे दास आहेत असे ज्या ब्राह्मणी ग्रंथांत नि शास्त्रांत उल्लेख आहेत, त्या त्या सर्व ग्रंथांचा व ज्या ज्या ग्रंथांशी ब्राह्मणांचा संबंध असेल, त्या त्या सर्व ग्रंथांचा त्यांनी धिक्कार केला. जो ग्रंथ, सर्वांस सारखा उपभोग घेता येतो असे सांगतो, तो ग्रंथ परदेशातील विचारी पुरुषांनी केलेला का असेना, त्या ग्रंथकर्त्यांचा आपण उत्पन्नकर्त्यांच्या संबंधाने धाकटा भाऊ समजून त्याप्रमाणे वर्तन करू, अशीही त्यांनी घोषणा

---

३. ज्ञानप्रकाश, ८ मे १८७१.

केली. अज्ञानाने गांजलेल्या शूद्र बांधवांतून एखाद्यास भटांच्या दास्यातून मुक्त होण्याची इच्छा झाल्यावर त्यांनी एक वेळ तरी आपले नाव पत्रद्वारे लिहून कळविल्यास या कामी मोठी हिंमत येऊन, आपण त्याचा फार आभारी होऊ, असेही शेवटी जोतीरावांनी म्हटले आहे.

जोतीरावांच्या उपरोक्त जाहीरनाम्यावर मत देताना 'लोककल्याणेच्छु' ह्या पुण्यातील साप्ताहिकाने मोठ्या औपरोधिक सुरात म्हटले: 'आमचे प्रसिद्ध महाज्ञानी, महाविचारी व महाशोधक तत्त्ववेत्ते अजम जोतीराव गोविंद फुले यांनी एका मोठ्या गृहस्थाच्या शिफारशीने एक अप्रयोजक अशा प्रकारचे आत्मश्लाघेचे व ब्राह्मणांच्या निंदेचे पत्र आम्हांकडे पाठविले आहे, त्यास आमच्या पत्रात जागा मिळण्याचा संभव नाही. याबद्दल सदरहू अजम फुले आम्हांस माफी करोत."

कोल्हापूर येथील 'शुभवर्तमान' ह्या नियतकालिकाने जोतीरावांच्या जाहीरनाम्यावर मत देताना म्हटले : "पुण्यातील नेटीव वर्तमानपत्रकर्ते खालच्या मजकुरास आपल्या पत्रात जागा देत नाहीत. म्हणून हा आम्हांकडे पाठविला आहे. हा मजकूर चहूंकडे प्रसिद्ध करावा अशी मि. जोती गोविंद फुले यांची इच्छा असल्यामुळे आम्ही त्यास या अंकात जागा देतो. जरी आमच्या हिंदू मित्रांस हा मजकूर काही अंशी निंदापर वाटेल, तरी यामध्ये जो अभिप्राय दाखविला आहे तो स्तुत्य असे आम्हांस वाटते. कारण वास्तविक पाहिल्यास ब्राह्मणांनी मानल्याप्रमाणे जातिभेद नाही असे मि. जोती यांच्या लक्षात पक्के आल्यावरून मी कोणा पाहिजे त्यांशी अन्नव्यवहार करीन, असे त्याने धैर्याने सांगितले. असे छातीचे पुरूष या देशात पुष्कळ लौकर होवोत."

जोतीरावांनी प्रसिद्ध केलेले हे दोन जाहीरनामे त्यांच्या '(ब्राह्मणीधर्माच्या आड-पडद्यांत) गुलामगिरी' या ग्रंथात दिलेले आहेत. हा ग्रंथ १८७३ च्या जून महिन्यात प्रसिद्ध झाला. आणि मोठा वादग्रस्त ग्रंथ म्हणून ओळखला जाऊ लागला. जोतीराव ह्यापूर्वी जोती अशी सही करीत असत. त्यांनी आता ह्या ग्रंथावर आपले नाव जोतीराव असे दिले.

त्याच विषयावरील पहिल्या तीन पुस्तकांनंतर जोतीरावांचे हे चौथे पुस्तक प्रसिद्ध झाले. पहिली तीन काव्ये होती. तर 'गुलामगिरी' हा ग्रंथ गद्य आहे. स्वातंत्र्य, समता व बंधुता, हाच ह्या सर्व पुस्तकांचा प्रतिपाद्य विषय आहे. "मनुष्याला स्वतंत्रता असणे ही मोठी जरुरीची गोष्ट आहे, व ज्यांस ती नसते त्यांस ती मिळवून देण्यास झटणे प्रत्येक सज्जनाचे कर्तव्य आहे. सर्व जगाचा नियंता आणि सर्वसाक्षी अशा परमेश्वराने मनुष्यमात्रास दिलेले पण स्वार्थसाधू कपटी लोकांनी लपवून ठेवलेले जे आपले मानवी हक्क ते मागून घेण्यास स्वतंत्र मनुष्य कधीही मागे सरणार नाही. योग्य हक्क मिळणे सुखास साधन आहे. प्रत्येकास स्वतंत्रता देऊन अन्यायी जुलमापासून सोडवून सुखी करणे हाच काय तो परोपकारी लोकांचा असे जिवावरचे व कठीण काम पत्करण्याचा हेतू असतो!"

अमेरिकेतील ज्या वीरांनी आणि मुत्सद्यांनी निग्रो लोकांच्या स्वातंत्र्यासाठी अविरत झगडा केला, त्यांची जोतीरावांनी स्तुती गायिली आहे. ज्या दिवशी निग्रो लोकांचे स्वातंत्र्य जाहीर झाले त्या दिवशी निग्रो आया आपल्या मुलींना भेटल्या असतील व निग्रो स्त्रिया आपल्या नवऱ्यांना भेटल्या असतील! तसेच निग्रो भाऊ बहिणींना भेटले असतील व निग्रो पुरूष आपल्या इतर नातलगांना भेटले असतील! हे अत्यंत देवदुर्लभ दृश्य दिव्यचक्षूंनी पाहून जोतीरावांच्या कवी आणि तत्त्वचिंतक मनाला स्वर्गीय आनंद झाला.

ज्या पाशवी वृत्तीमुळे निग्रोंच्या देहाची कातडी सोलली जाई, जाळली जाई, त्यांचे हातपाय मोडून टाकले जात, ती वृत्ती त्या स्वतंत्र झालेल्या नव्या जगातून नाहीशी झाली. ह्या घटनेची दखल जोतीरावांनी मोठ्या हर्षभराने घेतली. चालू समाजव्यवस्थेतील ब्राह्मणांच्या गुलामगिरीतून शेतकरी आणि कामगार हे हिंदुस्थानात मुक्त झाले आहेत, त्यांच्या गडद अंध समजुती लुप्त झाल्या आहेत; त्यांचे भीषण अज्ञान दूर झाले आहे, त्यांच्यावर लादलेले आणि कधीही न संपणारे संस्कार बंद झाले आहेत, ते कर्जमुक्त झाले आहेत आणि ब्राह्मणांनी त्यांना घातलेल्या देवाच्या धाकातून मुक्त झाले आहेत, असे भविष्यकाळातील चित्र जोतीरावांना दिसू लागले.

अब्राहम लिंकन ह्यांनी अमेरिकेत १८६३ साली गुलामगिरी नष्ट केली. ह्या थोर मानवी-स्वातंत्र्याच्या कैवाऱ्याची कामगिरी पाहून स्फूर्ती घेतलेल्या जोतीरावांनी आपला ग्रंथ अमेरिकेतील निग्रोंना मुक्त करणाऱ्या वीरांना अर्पण केला आहे. ग्रंथावरील अर्पणपत्रिकेत ते म्हणतात, "युनायटेड स्टेट्समधील सदाचारी लोकांनी गुलामांस दास्यत्वापासून मुक्त करण्याच्या कामात औदार्य, निरपेक्षता, व परोपकारबुद्धी दाखविली यास्तव त्यांच्या सन्मानार्थ हे लहानसे पुस्तक त्यांस परमप्रीतीने नजर करितो, आणि माझे देशबांधव त्यांच्या या स्तुत्य कृत्याचा कित्ता, आपल्या शूद्रबांधवांस ब्राह्मणलोकांच्या दास्यत्वापासून मुक्त करण्याच्या कामात वळवितील अशी आशा बाळगतो."

'गुलामगिरी' ह्या ग्रंथाचा प्रारंभ 'ज्या दिवशी मनुष्य गुलाम होतो त्या दिवशी त्याचा अर्धा सद्‌गुण जातो,' ह्या होमरच्या सुप्रसिद्ध वचनाने झाला आहे. ग्रंथ प्रश्नोत्तररूपात आहे. त्यात सोळा प्रकरणे आहेत. पहिल्या नऊ प्रकरणांत भारतातील ब्राह्मणी वर्चस्वाचा इतिहास आहे. त्याचे विवेचन जोतीरावांनी आपल्या मतांप्रमाणे केलेले आहे.

ब्राह्मण हे हिंदुस्थानावर स्वारी करण्यापूर्वी एका रूक्ष, वालुकामय आणि डोंगराळ प्रदेशातील मूळ रहिवाशी होते. स्वार्थ, अट्टल धूर्तपणा, उर्मटपणा आणि गर्विष्ठपणा याविषयींच्या विचारांनी ते स्फुरलेले होते. ब्राह्मणांनी क्षत्रियांशी लढाई केली. पूर्वीचे क्षत्रिय म्हणजे आताचे शूद्र आणि अतिशूद्र. क्षत्रिय हे कडवे आणि शूर लोक होते. त्यांनी ह्या आर्यब्राह्मण आक्रमकांचा प्रतिकार केला. परंतु क्षत्रियांचा पराभव झाला. क्षत्रियांचा राजा बळी होता. तो एक आदर्श, लोकप्रिय, उदारमतवादी, न्यायप्रिय आणि

प्रतापी राजा होता. त्याचे राज्य हिमालयापासून लंकेपर्यंत पसरलेले होते. त्याच्या देशाचे नाव बलिस्थान होते.

बळीची राजवट सुरू असता वामन नामक ब्राह्मणांच्या नेत्याने बलिस्थानावर स्वारी केली. पुराणांनी विष्णूचे अवतार मानलेले पहिले चार अवतार हे कदाचित मानवाची उत्क्रांतिदर्शक अवस्था असू शकतील. अशी एक गोष्ट सांगतात की द्यूतामध्ये वामनाने बळीचे राज्य जिंकले किंवा ब्राह्मणभिक्षुकाचे सोंग घेऊन वामन आला आणि त्याने बळीजवळ तीन पावले जमीन भिक्षा म्हणून मागितली. वामनाने एका पावलाने पृथ्वी व्यापली तर दुसऱ्या पावलाने आकाश व्यापून टाकले, तिसरे पाऊल त्याने बळीच्या डोक्यावर ठेवले आणि तात्काळ बळी पाताळात गेला. या पौराणिक ग्रंथकारांना जोतिराव विचारतात, 'अरे हा वामन पृथ्वीपेक्षा आणि स्वर्गापेक्षा आकाराने मोठा होता काय ?' जोतीरावांचा वीरपुरुष बळी हा वामनाशी लढाई करीत असताना धारातीर्थी पडला. बळीराजा अमर झाला.

त्या काळानंतर ब्राह्मणांनी जी पुराणे आणि शास्त्रे लिहिली त्यांत सप्तचिरंजीवांच्या यादीत त्यांनी बळीला स्थान देऊन टाकले. अश्वत्थामा, बळी, व्यास, हनुमान, बिभीषण, कृप आणि परशुराम हे ते सात चिरंजीव होत. बळीचे राज्य इतके लोकप्रिय होते की, आज देखील दिवाळीच्या दिवशी महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर लोक बळीचे राज्य येण्याविषयीच्या आपल्या सुखस्वप्नाचा पुनरुच्चार करतात. 'इडापिडा जावो आणि बळीचे राज्य येवो !'

विष्णूचा सहावा अवतार म्हणजे आर्य ब्राह्मणांचा परशुराम. हा त्यांचा महान नेता. त्याने क्षत्रियांच्या असंख्य पुरुषांचा, निष्पाप, असंरक्षित मुलांचा आणि गरोदर स्त्रियांचा निःपात केला. परशुराम मोठा स्वार्थी, दुष्ट, पाखंड आणि क्रूरकर्मा होता असे जोतीरावांचे मत आहे. नीरो आणि अलारीक यांनी केलेल्या कत्तली परशुरामाच्या ह्या क्रूरकर्मापुढे फिक्याच पडतात. जोतीराव म्हणतात, परशुराम हा देवाचा अवतार नसून तो सैतान होता. आर्य भट क्षत्रियांचा द्वेष करतात. त्यांच्या द्वेषामुळेच क्षत्रिय शूद्र आणि अतिशूद्र अशा दोन तटांत विभागले गेले. त्यांनी क्षत्रियांचे बळ दुभंगून टाकले आणि त्यांना गुलामगिरीत टाकले. जोतीरावांच्या मते शूद्र आणि अतिशूद्र हे एकाच वंशाचे. त्यांनी ब्राह्मण-वर्चस्वाचा प्रखरपणे प्रतिकार केला म्हणून ब्राह्मणांनी त्यांना दस्यु, असुर, राक्षस आणि महार असे संबोधून स्वतःला देव मानले. शूद्रांनी अतिशूद्रांना शिवू नये, अशी त्यांनी आज्ञा केली. अतिशूद्रांना उदरनिर्वाहाचे काहीच साधन न राहिल्यामुळे त्यांना मृत पशूंचे मास खाणे भाग पडले.

त्यानंतर ब्राह्मणांनी धर्मशास्त्रे लिहिली. शूद्रांनी आणि अतिशूद्रांनी धर्मग्रंथ वाचू नयेत, संपत्तीचा संग्रह करू नये, अमूक अमूक धंदे किंवा प्रतिष्ठित व्यवसाय करू नयेत, अशी त्यांना बंदी केली. आपल्या धर्मपुस्तकांत प्रत्येक पिढीत खोट्या कथा घुसडल्या. अशाच धर्मग्रंथांपैकी 'मनुस्मृति' हा ग्रंथ असल्यामुळे जोतीरावांनी तो अपवित्र ग्रंथ

आहे असे म्हणून त्याचा धिक्कार केला आहे. स्वतःस भूदेव मानून स्वतःकडे स्वर्गातील देवाचे अधिकार घेऊन ब्राह्मणांनी जातिव्यवस्था निर्माण केली. दुर्मिळ अशी संपत्ती आणि सर्वोच्च अधिकार व सवलती स्वतःच्या स्वास्थ्याकरिता आणि ख्याली-खुशालीकरिता घेतल्या. शूद्रांना मानवाचे सामान्य अधिकारही त्यांनी नाकारले. शूद्रांना नि अतिशूद्रांना त्यांनी दारिद्र्याच्या आणि गुलामगिरीच्या खाईत लोटले. आपल्या पवित्र ग्रंथांत लपवून ठेवलेल्या निंद्य लबाड्या आणि ढोंगे उघडकीस येऊ नयेत म्हणून आपले पवित्र ग्रंथ शूद्रांनी नि अतिशूद्रांनी वाचू नयेत, असा त्यांनी दंडक घातला.

. ३ .

जोतीराव पुढे म्हणतात, ब्राह्मणी शास्त्राप्रमाणे ब्राह्मणांना कायद्याचे बंधन नाही. त्यांची शास्त्रे असे सांगतात की, जर एखाद्या ब्राह्मणाने मांजर, पक्षी, बेडूक, कुत्रा, पाल, घुबड, कावळा किंवा शूद्र ठार मारला तर थोड्या अवधीच्या उपोषणाच्या पश्चात्तापाने तो पापमुक्त होतो. त्याला ते पातक फेडण्यासाठी अधिक कष्टाची किंवा त्रासाची जरूरी नाही. उलटपक्षी जर शूद्राने एखाद्या ब्राह्मणास ठार मारले, तर त्याला देहांताची शिक्षा होई. कारण ब्राह्मणहत्या हा सर्वांत अधिक भयंकर गुन्हा मानला जाई. ब्राह्मणाची सत्ता आणि प्रतिष्ठा यांची थोरवी किती अमर्याद होती त्याविषयी भृगुनामक ऋषीची गोष्ट जोतीरावांनी कथन केली आहे. या ब्राह्मण ऋषीने विष्णूच्या छातीवर लाथ मारली आणि तिच्या स्पर्शाने विष्णुदेव पवित्र झाला !

पेशव्यांच्या काळातील अन्यायमूलक, अमानुष कायद्यांचे निर्मूलन करून सर्वांना सारखे लेखणारी न्यायव्यवस्था स्थापल्याविषयी जोतीरावांनी ब्रिटिश सरकारचे अभिनंदन केले. जोतीरावांनी आपल्या ग्रंथात ब्राह्मणशास्त्रांतील, ब्राह्मणांची प्रतिष्ठा दर्शविणारी व श्रेष्ठपणा दाखविणारी उदाहरणे उद्धृत केली आहेत. त्या प्रतिष्ठेस वा श्रेष्ठत्वास कुणी धक्का लावला, तर त्या ब्राह्मणी ग्रंथांत त्याला शासन सांगितले आहे. ब्राह्मणांचे ईश्वरदत्त अधिकार असे आहेत :

ब्राह्मण हा सर्व जगताचा पती आहे. तो प्रत्यक्ष देवाच्या बरोबरीचा आहे. त्याची सर्वांनी प्रतिष्ठा ठेवली पाहिजे. इतकेच नव्हे, तर त्याची सेवा आणि पूजा केली पाहिजे. ब्राह्मण हा कधीही अपकृत्य करीत नाही. ब्राह्मणाने जरी सर्व प्रकारचे गुन्हे केले असले, तरी कुठल्याही राजाने त्याची हत्या करू नये. ब्राह्मणाचा प्राण वाचविण्यासाठी प्रसंगी असत्य बोलण्याची वेळ आली, तरी ते खुशाल बोलावे. त्यात पाप नाही. ब्राह्मणाची वस्तू कोणीही हरण करता कामा नये. अडचणीने त्रस्त झालेला असला तरी राजाने ब्राह्मणांकडून कर घेता कामा नये. राजाने ब्राह्मणाला भुकेचे क्लेश देऊ नयेत. नाहीपेक्षा त्याच्या सर्व राज्यावर दुष्काळाचे अरिष्ट कोसळेल.

ब्राह्मणाचे चरण हे पवित्र आहेत. त्याच्या उजव्या पायामध्ये सर्व पवित्र तीर्थांचे तीर्थ आहे. आपल्या पायाचा आंगठा पाण्यात घालून कुठल्याही तीर्थातील तीर्थाइतकी

पवित्रता तो निर्माण करू शकतो. कनिष्ठ वर्गातील कोणत्याही मनुष्याला ब्राह्मण गुलाम म्हणून राबवू शकतो; कारण ब्राह्मणाची सेवा करण्यासाठीच असा मनुष्य ईश्वराने निर्माण केलेला असतो. शूद्राला धन्याने गुलामगिरीच्या अवस्थेतून जरी मुक्त केले, तरी तो मुक्त होऊ शकणार नाही. कारण त्याची गुलामगिरी ही निसर्गसिद्ध आहे आणि निसर्गसिद्ध बंधने कोण तोडू शकेल? ब्राह्मणाने शूद्राला व्यवहाराच्या बाबतीत किंवा आध्यात्मिक बाबतीत सल्ला देऊ नये.

शूद्र कितीही कर्तृत्ववान असला, तरी जरूरीपेक्षा अधिक संपत्तीचा संग्रह त्याने करू नये. कारण गुलामाने जर संपत्तीचा संग्रह केला, तर तो गर्विष्ठ होतो. आणि आपल्या उर्मट वृत्तीने किंवा बेपर्वाईने तो ब्राह्मणाला दुःख देतो.

जर एखाद्या शूद्राने ब्राह्मण बाईशी व्यभिचार केला, तर त्याला देहान्त शासन केले पाहिजे. परंतु जरी एखाद्या ब्राह्मणाने शूद्राच्या धर्मपत्नीशी व्यभिचार केला तरी त्याला शिक्षा देऊ नये. या सर्व नीतीनिर्बंधांचा आणि बंधनांचा उद्देश एकच. गरीब अज्ञानी आणि अशिक्षित शूद्रांना फसवून त्यांच्या माने सभोवती सदा गुलामगिरीचे पाश करकचून आवळणे हा होय, असे जोतीराव म्हणतात.

ह्या अगणित दंतकथा, निरर्थक समजुती, धादांत खोटी लिखाणे ही सर्व दैवी स्फूर्ती म्हणून किंवा देवाचे वचन म्हणून, देवाची उक्ती म्हणून किंवा देवाची कृती म्हणून अज्ञानी जनतेच्या गळी बांधण्यात येतात. जो या जगताचा उत्पन्नकर्ता आहे, नियंता आहे, रक्षणकर्ता आहे आणि प्रत्यक्ष पवित्रपणाचा सागर आहे, त्याच्या नावावर ही असली अत्यंत अनीतीची, अमानुष, अन्यायी कृत्ये खपविली जातात.

जोतीराव म्हणतात, 'जातिभेदाचे मूळ ब्राह्मणांच्या स्वार्थी धर्मांधतेत आणि अहंकारात आहे. या दुष्कृत्याखाली हिंदुस्थानातली जनता पिढ्यानपिढ्या भरडली जात आहे, ती कण्हत पडली आहे.'

शूद्र आणि अतिशूद्र यांची प्रामुख्याने बनलेली ही हिंदी रयत ही दुभती गाय म्हणून पिळली जात आहे. रयतेवर ज्यांचा अधिकार चालतो ते त्यांच्या कष्टावर स्वतः पुष्ट होतात. रयतेच्या कल्याणाची किंवा त्यांच्या परिस्थितीत सुधारणा करण्याची ते पर्वा करीत नाहीत.

भिक्षुकांच्या नात्याने ब्राह्मण कनिष्ठ वर्गाला लुटतो; एवढेच नव्हे तर तो सरकारी अधिकारी म्हणूनसुद्धा तसेच पिळवणुकीचे काम करतो. कारण इंग्रज अधिकाऱ्यांच्या हाताखालच्या सर्व उच्च अधिकाऱ्यांच्या नोकऱ्या ब्राह्मणांनीच पटकाविल्या आहेत. ती जणू त्यांची मक्तेदारीच बनली आहे. ब्राह्मण हा भिक्षुक, सावकार, राज्यकर्ता, खेड्यातील कुलकर्णी, शिक्षक, वकील असतो. ब्राह्मणेतर पोलीस पाटील हा त्याच्या हातातील एक हत्यार असतो. तो रयतेचा व्यवहारातील आणि आध्यात्मिक सल्लागार आणि अडचणीच्या वेळी सावकार. तो खेडुतांमध्ये भांडण लावून आगीत तेल ओतीत असतो. मामलेदार आणि अभियांत्रिकी खात्यातला पर्यवेक्षक म्हणून महसूलखात्यातील

अधिकारी म्हणून व बांधकामखात्यातील अधिकारी म्हणून तो आपले जातभाई, कुलकर्णी आणि सावकार यांच्याशी संगनमत करून रयतेला पिळत असतो. यासाठी सामाजिक आणि सरकारी व्यवस्थेत भ्रष्टाचाराचे, नातलगांना नोकऱ्या देण्याचे आणि पैसे खाण्याचे पेव फुटले आहे.

शासनसंस्थेमध्ये ब्राह्मण या एकाच जातीचे वर्चस्व वाढले आहे. जोतीराव ह्या सर्व अधिकाऱ्यांचा सैतान म्हणून धिक्कार करतात. कुलकर्णी म्हणजे ग्रामरक्षक नसून कलम-कसाई वाटतो. यामुळे त्यांनी इंग्रज राज्यकर्त्यांला अशी सूचना केली की, इनाम जमिनी किंवा निवृत्तिवेतने देऊन खेड्यांतील व्यवहार पाहण्यासाठी आणि त्याचा सरकारकडे वृत्तांत धाडण्यासाठी काही इंग्रजांची नेमणूक करावी.

पाश्चात्त्य विचार नि संस्कृती यांचा परिणाम ब्राह्मणांच्याही मनावर होत होता. पेशव्यांच्या राज्यात जितके ते धर्मांध अन् कर्मठ, निर्दय अन् असहिष्णू होते, तितके ते आता राहिले नव्हते. म्हणून जोतीराव असा प्रश्न विचारतात की, भूतकाळातील आपल्या स्वार्थसाधु वृत्तीविषयी पश्चात्ताप करावयास ब्राह्मण तयार आहेत काय? 'जर सांप्रतची स्थिती व्यवस्थित असती तर गतकालांतील कृत्यांविषयी दुःखे लोकांनी भोगली त्याविषयी झाले ते गेले समजून त्यासंबंधी कुढत बसण्यात काही अर्थ नाही, असे मी म्हटले असते.'

जोतीराव पुढे म्हणतात 'परंतु आमची पूर्ण खात्री आहे की, आपल्या उच्च स्वयंसिद्ध पदावरून ब्राम्हण हा खाली उतरून कुणब्यांशी आणि कनिष्ठवर्गातील लोकांशी बंधुत्वाच्या समान भूमिकेवरून, आम्ही त्याच्याशी झगडा केल्याशिवाय कधीही आपसुक येणार नाही. सुशिक्षित ब्राह्मणांनी समाजातील आपले पद कसे संपादन केले आहे! ज्याला ब्राह्मणाच्या भूमिकेविषयी यथार्थ कल्पना आहे तोसुद्धा आपल्या पूर्वजांच्या चुका मान्य करणार नाही व आपल्या उराशी बाळगलेल्या समाजातील आपल्या प्रतिष्ठेच्या खोट्या कल्पना तो राजीखुषीने सोडणार नाही. या काळात कर्तव्यबुद्धीला जागून नीतिधैर्य दाखवण्याची वृत्ती एकाही ब्राह्मणात नाही. आणि अशी एका जातीने दिमाख दाखवून दुसऱ्या जातीचा नाश करण्याची वृत्ती जोपर्यंत चालली आहे, तोपर्यंत शूद्रांच्या परिस्थितीत काहीही फरक होणार नाही. तोपर्यंत हिंदुस्थानला मोठेपणा प्राप्त होणार नाही.'

. ४ .

यास्तव सरकारने शूद्रांना शैक्षणिक सवलती देऊन त्यांचे अज्ञान आणि पूर्वग्रह दूर करावे अशी सरकारला जोतीरावांनी विनंती केली. सरकारने कनिष्ठ वर्गातील लोकांच्या शिक्षणाची सोय करावी. असे करणे सरकारचे कर्तव्यच आहे. कारण रयतेच्या घामाचा आणि कष्टाचा सरकारला महसूल मिळतो. सरकारी महसुलापैकी मोठा भाग वरिष्ठ वर्गातील लोकांच्या शिक्षणावर खर्च करणे हे न्याय्य नि इष्ट नाही. कारण वरिष्ठ वर्गातील लोक आपल्या शिक्षणाची व्यवस्था स्वतःच करू शकतील. शिक्षण खाली

झिरपत जाईल हे तत्त्व जोतीरावांच्या मते चुकीचे होते. त्यांना ती स्वप्नसृष्टीतील एक कल्पना वाटे. जनतेची नैतिक आणि बौद्धिक सुधारणा करण्यासाठी त्यांच्यामध्ये शिक्षणाचा प्रसार करणे हाच खरा मार्ग होय, असे जोतीराव पुन्हःपुन्हा आक्रोश करून सांगत होते.

शासनसंस्थेतील ब्राह्मणांच्या मिरासदारीचा शेवट करून सरकारने ब्राह्मणेतर वर्गांतील उमेदवारांना सरकारी नोकरीत घ्यावे अशी त्यांनी मागणी केली. कनिष्ठ वर्गांतील उमेदवार निवडावे आणि त्यांना शिक्षण देऊन कुलकर्णी, पाटील आणि शिक्षक यांच्या नोकऱ्या द्याव्या. ब्राह्मणांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांना नोकऱ्या देण्यास आपला विरोध नाही असेही जोतीरावांनी मत व्यक्त केले. महार किंवा मांग यांपैकी एकही पदवीधर असू नये याबद्दल आपल्या मनाला दुःख होते. अशी परिस्थिती निर्माण करून ब्राह्मणांनी शिक्षणखात्याला मोठाच काळिमा लावला आहे, असे ते म्हणाले.

जोतीरावांच्या वरील उद्‌गाराची सत्यता सरकारी शिक्षणखात्याच्या १८८१–८२ च्या इतिवृत्तावरून दिसून येते. मुंबई इलाख्यातील माध्यमिक शाळांत किंवा महाविद्यालयांत १८८१–८२ सालपर्यंत एकही महारमांग मुलगा नव्हता, असे त्या सरकारी इतिवृत्तात म्हटले आहे. खेड्यांतील शाळा या ब्राह्मण शिक्षकांव्यतिरिक्त असाव्या. कारण त्या काळचे ब्राह्मण शिक्षक कनिष्ठ वर्गांतील मुलांना निरुत्साही करीत किंवा त्यांना भीती दाखवून शाळा सोडावयास लावीत.

कनिष्ठ वर्गांतील लोकांना नगरपालिकेच्या खात्यात नोकरीस घ्यावे अशी कळकळीची विनंती जोतीराव करीत. तसे केले तरच कनिष्ठ वर्गांतील रहिवाश्यांचे हित आणि सोयी पाहिल्या जाऊन त्यांना पुरेसे पाणी आणि पुरेसा उजेड मिळण्याची सोय होईल. नगरपालिकांच्या मंडळावर खालच्या वर्गांचे प्रतिनिधी नसल्यामुळे त्यांना पुरेसा पाण्याचा पुरवठा मिळत नसे, असा त्यांचा अनुभव होता. ब्राह्मणांच्या वस्तीमधून असलेल्या हौदांचा वापर जेव्हा अतिशूद्र करू लागले, तेव्हा ब्राह्मणांनी आपल्या हौदांना स्वतंत्र पाणी मिळविण्याची व्यवस्था केली. नगरपालिकेने कनिष्ठ वर्गांतील लोकांना पाणी नि प्रकाश ह्यांचा पुरवठा करण्याची व्यवस्था करणे हे तिचे कर्तव्य होय, अशी जोतीरावांची मागणी होती.

दरोडे घालणाऱ्या रामोशासारख्या अतिशूद्र जमातींतील लोकांची चावडीवर हजेरी ठेवणे ही पद्धत त्यांना अयोग्य वाटे. भटांच्या अनाथ विधवांना पुनर्विवाह करण्यास बंदी असल्यामुळे गर्भपात नि बालहत्त्या करणाऱ्या विधवांपेक्षा दरवडेखोर महार मांग काही अधिक दोषी नाहीत. विधवांचे दुर्वर्तन समाजाला जास्त घातक असल्यामुळे त्यांच्या बाबतीत ही हजेरीची पद्धत ठेवली असती, तर ते अयोग्य झाले नसते. जर ब्राह्मण हे खरे देशभक्त असते तर त्यांनी शूद्रांना आणि अतिशूद्रांना गुलामगिरीत खितपत ठेवले नसते. त्यांच्या हातचे स्वच्छ पाणी जनावरांच्या मूत्रापेक्षाही अपवित्र मानले नसते.

जोतीराव म्हणतात: "ब्राह्मण हे बंधू आहेत; परंतु त्यांच्या दुष्कृत्यांमुळे त्यांना बंधू म्हणावयास आपल्याला लाज वाटते. जरी त्यांनी पूर्वी शूद्रांचा छळ केला आहे, तरी त्यांना आपण बंधू म्हणून मानावयास तयार आहोत. मात्र त्यांनी आजपासून आपल्या वर्तनातील स्वार्थी हेतू टाकून दिला पाहिजे." सर्व मराठी वर्तमानपत्राचे कर्ते भट असल्यामुळे ब्राह्मणांची दुष्कृत्ये उघडकीस आणून ते कनिष्ठ वर्गाला कधीही साह्य करणार नाहीत, अशी जोतीरावांची मनोमन खात्री पटली होती. कनिष्ठवर्ग अशिक्षित असल्यामुळे बहुतेक शूद्रांस आणि अतिशूद्रांस वर्तमानपत्र म्हणजे काय, कोल्हा, कुत्रा की माकड, हे माहीत नव्हते.

वेद हे ईश्वरनिर्मित नसून ते मानवनिर्मित आहेत, असे जोतीरावांचे ठाम मत होते. वेदाने समाजात भेद पाडले. म्हणून वेद म्हणजे भेद असे त्यांना वाटे. ब्राह्मणांच्या पोथीतील जातींच्या उत्पत्तीविषयीची कल्पना त्यांना मुळीच मान्य नव्हती. ब्रह्मदेवाच्या मुखातून ब्राह्मण जन्मले, क्षत्रिय बाहूतून जन्मले, शूद्र त्याच्या पायांतून निघाले आणि हे विधान त्यांना भयंकर आणि धादांत असत्य वाटे. जोतीरावांच्या मते नारद हा क्षत्रिया-क्षत्रियांमध्ये कलागती लावून ब्राह्मण लोकांना जग निर्वेध, निष्कंटक करीत असे. त्यामुळे नारद हा देवदूत नसून खलनायक होता, असे सांगून त्यांनी त्याचा धिक्कार केला आहे.

'मनुस्मृति' ही शूद्रांच्या बोकांडी गुलामगिरी बसविते म्हणून ती अपवित्र आहे, असे म्हणून त्यांनी मनुस्मृतीचा धिक्कार केला आहे. बुद्धाविषयी जोतीरावांना नितांत आदर वाटे. ब्राह्मणांनी आपली गेलेली प्रतिष्ठा पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी दारू आणि गोमांस सोडले आणि बुद्धतत्त्वे आत्मसात करून त्यांनी आपल्या ग्रंथांची सुधारणा केली. शेवटी बुद्धधर्मीयांचा छळ करून त्यांचा निःपात केला, असे त्यांनी म्हटले आहे.

महाराष्ट्रातील संतकवींचा जोतीरावांनी धिक्कार केला आहे. मुकुंदराज, ज्ञानेश्वर, रामदास यांनी ब्राह्मणांच्या दुष्टकर्मांचा उघड रीतीने त्याग करण्याचे धैर्य दाखविले नाही. सबब त्या सर्व दुष्कर्मास कर्ममार्ग नि नास्तिक मतास ज्ञानमार्ग असे निरनिराळे दोन भेद करून पोकळ प्राकृत ग्रंथ करून आपल्या मतलबी जातीला, अज्ञानी शूद्रांस लुटून खाऊ दिले, याबद्दल जोतीरावांनी खेद व्यक्त केला आहे. समाजातील ब्राह्मणांचे वर्चस्व राहण्यासाठी ह्या महाराष्ट्र संतकवींनी साह्य केले, असा जोतीरावांनी निष्कर्ष काढला आहे.

इंग्रजांचे राज्य असेपर्यंत शूद्रांनी आणि अतिशूद्रांनी विद्या संपादन करावी, हाच संदेश ह्या ग्रंथाद्वारे जोतीरावांनी आपल्या कनिष्ठ वर्गातील शूद्रांना नि अतिशूद्रांना दिला आहे. शिक्षण घेऊन स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही संपादन करण्यासाठी आपले अज्ञान आणि पूर्वग्रह दूर सारावे आणि ब्राह्मणांनी त्यांच्या मानेसभोवती टाकलेले गुलामगिरीचे पाश तोडून टाकून आपले मानवी हक्क संपादण्यासाठी सिद्ध व्हावे असाच तो संदेश आहे.

आपल्या 'गुलामगिरी' या ग्रंथात जोतीराव म्हणतात: "ब्राह्मणांकडून तुमची फसव-

णूक कशी होत आहे, हे माझ्या शूद्रबंधूंना सांगण्याच्या उद्देशानेच केवळ मी हा ग्रंथ लिहिलेला नाही. सांप्रतचे बंगालचे राज्यपाल सर जॉर्ज कॅम्बेलसारखे थोर मनाचे नि परम सहानुभूती दाखविणारे मुत्सद्दी यांच्या दृष्टीस 'वरिष्ठ वर्गालाच शिक्षण देऊ इच्छिणारी ही नाशकारक पद्धती' आणून देण्यासाठीही हा प्रयत्न आहे. त्या मुत्स-द्यांनाही सरकारी हिताच्या दृष्टीने ही शिक्षणव्यवस्था अपायकारक आहे असे आढळून येत आहे. आपला मार्ग चुकीचा आहे असे सरकारला लवकरच कळून येईल आणि जे वरिष्ठवर्गांच्या हिताच्या दृष्टीने जगाकडे पाहतात त्या लेखकांवर वा लोकांवर कमी विश्वास ठेवून ब्राह्मणांनी माझ्या शूद्र बंधूच्या मानेभोवती जे गुलामगिरीचे विषारी जाळे विणले आहे ते तोडून त्यांना सरकार मुक्त करील अशी मी आशा बाळगतो."

जोतीराव आत्मविश्वासपूर्वक पुढे म्हणतात: "शूद्र लोक हेच ह्या देशाचे जीवन आणि शक्ती आहेत. आर्थिक, राजकीय संकटाच्या वेळी सरकारने त्यांच्यावरच अवलंबून असले पाहिजे, ब्राह्मणांवर नव्हे. जर शूद्रांचे मन नि हृदय ह्यांत सुखसमाधान निर्माण केले, तर भविष्यकालात त्यांच्या निष्ठेविषयी सरकारला साशंक राहावे लागणार नाही." यास्तव जोतीरावांनी सार्वत्रिक शिक्षणाची जोराने मागणी केली आणि शिक्षण वरिष्ठ वर्गातून खालच्या वर्गात झिरपत जाईल या सिद्धांताचा निषेध केला आहे.

.५.

शूद्र हे मूळचे क्षत्रिय होते हा जोतीरावांनी मांडलेला सिद्धांत पुढे भारतातील एक प्रकांडपंडित, थोर समाजशास्त्रज्ञ आणि विख्यात संशोधक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'शूद्र पूर्वी कोण होते?' या आपल्या ग्रंथात सिद्ध केला आहे. प्राचीन हिंदुस्थानचा इतिहास म्हणजे ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर यांचा झगडा होय, असे जोतीरावांचे निश्चित मत झाले होते. अवैदिक देवतांच्यासंबंधी त्यांनी प्रदर्शित केलेले विचार हे महत्त्वाचे असून समाजशास्त्राच्या दृष्टीने चिंतनीय आहेत. जोतीरावांच्या मते दसरा आणि दिवाळी हे उत्सव आणि रविवार या दिवसाला असलेले पावित्र्य ह्या सर्व गोष्टी मुळात ब्राह्मणेतरांच्या संस्कृतीपैकी होत्या. खंडोबा, जोतीबा, बहिरोबा, मार्तंडमल्हार हे देव ब्राह्मणेतरांचे आहेत.

सरकारी गॅझेटने जोतीरावांच्या ह्या 'गुलामगिरी' ग्रंथावर अभिप्राय दिला. २५ डिसेंबर १८७३ च्या गॅझेटच्या पुरवणीमध्ये तो तुरट नि तिखट अभिप्राय प्रसिद्ध झाला आहे. कदाचित तो अभिप्राय ब्राह्मण अधिकाऱ्याने किंवा ब्राह्मण सहकाऱ्याच्या मदतीने सरकारी अधिकाऱ्याने दिला असावा. त्यात जोतीरावांच्या ग्रंथाचे वर्णन 'ब्राह्मण धर्मा-वरील एक निंद्य चोपडे,' असे केले आहे. जोतीरावांनी आपल्या ह्या ग्रंथाच्या हजार प्रती काढल्या. पुस्तक ११७ पृष्ठांचे होते. ते पुणे 'सीटीप्रेस' मध्ये छापले होते. पुस्तकाच्या हक्काकरिता त्याची नोंदही केली होती. पुस्तकाचे मूल्य १२ आणे होते; शूद्र आणि अतिशूद्र यांच्याकरिता ६ आणे होते.

सरकारी अधिकाऱ्याने त्या पुस्तकाचे वर्णन निंद्य चोपडे म्हणून जे केले, ते वर्णन त्याच्या अभिप्रायासही तंतोतंत लागू पडते. जोतीरावांच्या 'गुलामगिरी' या ग्रंथाविषयी सरकारी गॅझेट पुढे म्हणते : "हे पराकाष्ठेच्या दुष्ट भावनांनी भरलेले पुस्तक आहे आणि याचा बहुतेक भाग पराकाष्ठेच्या पोरकट अद्वातद्वा गप्पांनी भरलेला आहे. कित्येक स्थळी हे बीभत्सही आहे." गुलामगिरीतील जोतीरावांची भाषा काही ठिकाणी ओबडधोबड आहे, कडवट आहे हे खरे. परंतु पुस्तकपरीक्षणकर्त्याला समजूतदारपणाची दृष्टी नसल्यामुळे त्याला त्या ग्रंथाचे सामाजिक महत्त्व आणि त्यातील आशय कळला नाही. त्या अभिप्रायाने सरकारी अधिकाऱ्यांच्या मनावरही प्रकाश टाकला आहे. जोतीराव ज्या मनोवृत्तीशी कठोरपणे लढत होते, त्याच वृत्तीच्या सरकारी नोकरांच्याहीविरुद्ध ते झुंजत होते. 'विविधज्ञानविस्तारा'मध्ये रा. भि. गुंजीकर यांनी गुलामगिरी या ग्रंथाचे परीक्षण केले.[४] ते मासिक 'सभ्य स्त्रिया आणि सभ्य गृहस्थ' यांच्या उत्कर्षासाठी काढलेले होते. जोतीरावांचा 'गुलामगिरी' हा ग्रंथ शेतकऱ्यांसाठी आणि अतिशूद्रांसाठी तसेच त्यांच्या शत्रूंसाठी होता. अर्थातच 'विविधज्ञानविस्तार'[५] मधील पुस्तक-परीक्षकाचे काम आपोआपच जरा तिखट झाले.

गुंजीकर म्हणतात : "'ब्राह्मणीधर्माच्या आडपडद्यात' 'गुलामगिरी' या नावाचे मूर्खत्वमय निंदाप्रचुर चोपडे (त्याला पुस्तक म्हणण्यास शरम वाटते) बरेच दिवसांपूर्वी छापून निघाले आहे. पण ते हल्लीच आमच्या पाहाण्यात आले. त्याचे कर्ते जोतीराव गोविंदराव फुले कोणी आहेत. जोतीराव गोविंदराव फुले या नावाच्या गृहस्थाने काही अशीच वेडगळ आणि निंदक चोपडी छापविली होती, तेच गृहस्थ हे, असे दिसते. या नव्या चोपड्याचे तात्पर्य इतकेच की, सरकारने सर्व ब्राह्मणांचे निःसंतान करावे, त्यांना कोणत्याही प्रकारे आश्रय देऊ नये, ते दुष्ट आहेत, त्यांचे सर्व अधिकार काढून खिस्त्यांस द्यावे, खिस्त्यांना गावोगाव इनामे करून द्यावी. म्हणजे सर्व गोष्टी चांगल्या होतील. यांतील व्याकरणज्ञान, भाषाज्ञान, इतिहासज्ञान, धर्मज्ञान, तर्कज्ञान इत्यादि सर्वच गोष्टी अद्वितीय आहेत."

"हे चोपडे कोणी खिस्ती होऊन फसलेल्या मत्सरी, खुजट, निराश मनुष्याने उत्पन्न करून फुल्यांना टिक्याचा अधिकार दिला आहे असे उघड दिसते. सारांश, हे चोपडे शिव्यांनी, अभद्र भाषणांनी, आणि असह्य गोष्टींनी भरले आहे. मासल्याकरता एकच गोष्ट इथे लिहितो. तो म्हणतो की, आपण तरूण असता, ब्राम्हणांनी आपणास पट्टा खेळण्याचा अभ्यास करावयास सांगितले व कारण विचारता, इंग्लिशांना हाकून देण्याला फार उपयोगी पडेल, असे ते म्हणाले!! पण हा सर्व इंग्रजांचा तोंडपुजेपणा व्यर्थ होऊन, यावर 'गव्हर्मेंट गॅझेट' नामक सरकारी वृत्तपत्रामध्ये असा शेरा आला आहे..."

---

४. रामचंद्र भिकाजी गुंजीकर यांचें संकलित लेख, प्रथम खंड, पृ. ६३.

५ पुस्तक ६, अंक ६, नोव्हेंबर १८७३.

जोतीरावांच्या ग्रंथाची जाहिरात 'सत्यदीपिका' नावाच्या एका मुंबईतील खिश्चन साप्ताहिकाने छापली होती. 'सत्यदीपिके'विषयी 'विविधज्ञानविस्तार'कारांचे विशेष चांगले मत नव्हते. 'विविधज्ञानविस्तारा'च्या मुखपृष्ठावरील 'श्री'मुळे सत्यदीपि-केच्या आत्मशांतीला त्रास होत असे. त्यामुळे 'विविधज्ञानविस्तारा'ने ही संधी साधून जोतीरावांच्या ग्रंथाची 'सत्यदीपिके'ने जाहिरात छापल्याबद्दल 'सत्यदीपिकेवर'ही हल्ला केला.

गुंजीकर पुढे म्हणतात : "असे असता त्याच्या विक्रीची जाहिरात कोठे तर जे Rules of Moral Conduct म्हणजे सदाचाराचे नियम याविषयी व्याख्यान देणारे, व जे म्हणते की, ह्यात कादंबऱ्या (नावेल्स) खेरीज करून चांगली पुस्तके विकण्याच्या जाहिराती स्वस्त दराने छापल्या जातील, त्या खिस्ती 'सत्यदीपिका' नावाच्या पत्रामध्ये. तेव्हा सत्याविषयी स. दी. कारांचे विचार काय बरे असतील! ते चोपडे ब्राह्मणांना शिव्या देणारे असल्यामुळे त्याची योग्यता कादंबऱ्यांपेक्षा मोठी झाली काय?"

'ज्ञानप्रकाश'मध्ये[६] एका ब्राह्मण गृहस्थांनी, जोतीरावांनी ब्राह्मणांना गुलामगिरीची किंमत १२ आणे ठेवली याविषयी नापसंती व्यक्त केली. आपल्या पत्रात ते लिहितात : "सुमारे दोन महिन्यांपूर्वी 'सुधारलेल्या इंग्रजी राज्यात ब्राह्मणी धर्माच्या आडपड्यात गुलामगिरी' या नांवाचे पुस्तक नवीन तयार होऊन प्रसिद्ध झाले. म्हणून ते वाचण्याची मजला इच्छा होऊन व एका मित्रास या पुस्तकाची किंमत विचारून ते विकत घ्यावयास गेलो. व ते पुस्तक पाहून त्याजवर दोन किंमती असल्यामुळे, जरा चकित होऊन त्या पुस्तकाची खरी किंमत काय? म्हणून मालकास विचारले. तेव्हा त्याने मी ब्राह्मण आहे असे पाहून मजला १२ आणे किंमत सांगितली. त्याप्रमाणे बारा आणे देऊन मी ते पुस्तक विकत घेतले. आणि ते साद्यंत वाचल्यानंतर ब्राह्मणास किंमत बारा आणे का याचे कारण समजून आले."

"हे पुस्तक प्रसिद्ध होऊन दोनतीन महिने झाले असता याबद्दल आपल्या पत्रात किंवा दुसऱ्या पत्रात काहीच चर्चा झाली नाही. हे मोठे आश्चर्य वाटले. परंतु मला असे वाटते की, हे पुस्तक पाद्री पुस्तकांप्रमाणे असल्यामुळे त्याजबद्दल टीका करणे आपल्यास किंवा आपले बांधवास प्रशस्त वाटले नाही. अस्तु, प्रथमतः मजला या पुस्तकाचे संबंधाने त्याचे कर्त्यास सांगणे आहे की, ब्राह्मणास बारा आणे व शूद्रादी अतिशूद्रास सहा आणे किंमत ठेविल्याने त्याचे मनांतील हेतू सिद्धीस जाणार नाही. म्हणून त्या पुस्तकाची किंमत काही कमी केल्यास सर्वांस ते पुस्तक घेण्यास सुलभ पडून सहजच त्यांचे मनातला हेतू शेवटास जाईल, किंबहुना इतर जातींपेक्षा ब्राह्मणास कमी किंमत ठेविल्यास पाद्री पुस्तकांप्रमाणे त्याचा जलद फैलाव होऊन ह्या पुस्तककर्त्यांची

६. ज्ञानप्रकाश, ८ सप्टेंबर १८७३.

ख्रिश्चियन मनाचे हिंदू पाद्री या नावाने कीर्ती होईल. कळावे." बिचाऱ्याला कागदी 'गुलामगिरी' महाग वाटली. गुलामगिरीचे दुःख प्रत्यक्ष भोगले नसल्यामुळे त्याची किंमत त्याला कशी कळणार?

धार्मिक समारंभात भटजीला मध्यस्थ म्हणून बोलावू नये, असा जो जोतीरावांनी ब्राह्मणेतरांना संदेश दिला त्याचा परिणाम काही ठिकाणी दिसून येत असे. दापोली-जवळील एका खेड्यातील सोनार गृहस्थाने संस्कृत ग्रंथाच्या साह्याने आपल्या नातलगाचे अंत्यसंस्कार केले. त्याच्या ह्या धैर्यशाली पांडित्यावर आग पाखडणारे पत्र 'ज्ञान-प्रकाश'मध्ये प्रसिद्ध झाले.

जोतीरावांचा सार्वत्रिक शिक्षणाविषयी जो दृष्टिकोण होता तो पुढे बरोबर ठरला. राममोहन रॉय, मेकॉले आदी जोतीरावांच्या वेळचे नाणावलेले शिक्षणतज्ञ त्या वेळी शिक्षण खाली झिरपत जावे या मताचे होते. एच् व्ही. हॅम्टन या नावाच्या गृहस्थाने म्हटले आहे की "बऱ्याच बाबतीत राममोहन रॉय हे आपल्या काळाच्या पुढे होते. तथापि शिक्षण वरिष्ठ वर्गात सुरू होऊन ते खाली झिरपत जावे हे जे त्यांचे मत होते, ते तत्कालीन मताशी सहमत होते. दुसऱ्या कित्येक विचारवंतांप्रमाणे त्यांना असे वाटे की, सुसंस्कृतपणा आणि उपयुक्त ज्ञान हे आपोआप वरून खाली झिरपत जाईल. प्रथम सावकाश झिरपत जाईल, नंतर त्वरेने जनतेपर्यंत पोहोचेल. शिक्षण आणि संस्कार झिरपत जातील असे म्हणणाऱ्यांचा आशावाद विफल ठरला आहे, असे इतिहासाने दाखवून दिले आहे."[७]

जोतीराव हे संशोधक नव्हते. ते पंडित नव्हते. ते भाषाशास्त्रज्ञही नव्हते. परंतु ते मूलग्राही विचारवंत होते. अवतारवादाची कल्पना त्यांना समूळ निर्मूलन करावयाची होती. महाभारताच्या काळापर्यंत ही अवतारवादाची कल्पना नव्हती. नंतर पुराणात ती घुसडली गेली असे दिसते. जोतीराव हे धर्मशास्त्राचे पंडितही नव्हते. तथापि चित्पावन ब्राह्मण हे आफ्रिकेतील पूर्व किनाऱ्यावरून किंवा इराण, इजिप्त किंवा पॅलेस्टाइनमधून आले असावे, हे त्यांचे विधान कोणत्याही इतिहासकाराने खोडून काढलेले नाही. उलटपक्षी काही इतिहासकार आणि संशोधक यांना, जोतीरावांच्या विधानालाच पाठिंबा मिळेल असे पुरावे आढळले आहेत.

विश्वनाथ नारायण मंडलिक या विख्यात संशोधकांनी रॉयल एशियाटिक सोसाय-टीच्या १८६५ च्या अंकात जोतीरावांच्या मतासारखेच मत व्यक्त केले आहे. रामचंद्र भिकाजी गुंजीकर यांनी आपल्या 'सरस्वतीमंडल' या ग्रंथात, लेफ्ट. कर्नल मार्क विल्क्स यांनी आपल्या 'हिस्टॉरिकल स्केच ऑफ दी साऊथ इंडिया' ह्या ग्रंथात, एडवर्ड मूर यांनी आपल्या 'हिंदु पॅन्थीअन' ह्या ग्रंथात, रे. विल्यम टेलर यांनी आपल्या

---

७. Hampton, H. V., Biographical Studies in Modern Indian Education, p. 57.

'ओरिएंटल मॅन्युस्क्रिप्टस' ह्या ग्रंथात आणि दुसऱ्या अनेक ग्रंथकारांनी आपापल्या ग्रंथात, असेच मत व्यक्त केले आहे.

ऐतिहासिक दृष्ट्या जोतीरावांचे विधान बरोबर आहे किंवा चूक आहे, हा वाद बाजूला सारला, तरी या वादातून जी निष्पत्ती होते ती काही कुणाच्याही सोयीची नाही. जे विधान ब्राह्मणांवर हल्ला करण्यासाठी ब्राह्मणांच्याविरुद्ध पुढे करण्यात येते, तेच जर भारतातील आदिवासी आणि गिरिजन यांच्यासंबंधात ब्राह्मणेतरांच्याविरुद्ध पुढे करण्यात आले, तर या देशातले आपण सर्वांत मूळचे रहिवाशी आहोत, अशी बमंड कोणाला मारता येईल ?

ह्या पुस्तकातील कडवटपणा हा त्या काळच्या सामाजिक परिस्थितीचाच परिपाक होता. त्या कडवटपणाला पेशव्यांच्या राज्यकारभाराची पार्श्वभूमी कारणीभूत होती. जोतीरावांनी भिक्षुकशाहीच्याविरुद्ध बंड केले. ब्राह्मणांनी मानलेल्या अवतारकल्पनेविरुद्ध बंड केले. त्यांनी प्रसृत केलेल्या शास्त्रांच्या नि पुराणांच्याविरुद्ध बंड केले. त्यांच्या मते ती शास्त्रे आणि पुराणे ही शूद्रांच्या आणि अतिशूद्रांच्या अनेक पिढ्यांच्या रक्ताने अन् अश्रूंनी न्हालेली होती. अनेक शतके ब्राह्मणांच्या सुखासाठी व सोयीसाठी त्यांना बळी दिले होते. इंग्रज राज्यकारभाराने सर्वांना समान अशी न्यायदानाची पद्धत आणली. स्वतंत्र न्यायमंडळे निर्माण केली. तसेच वैज्ञानिक दृष्टीही आणली. ह्या सर्व सुधारणा आणि नवीनता पेशव्यांच्या राजवटीतील दंगे, लुटालूट आणि अन्याय ह्यांच्या पार्श्वभूमीवर खुलून दिसत होती.

इंग्रज राजवटीने आपल्यासंगे, विज्ञान व ज्ञान आणलेले पाहून जोतीरावांना अतिशय आनंद झाला. इंग्रज राजवटीबरोबर जी सुधारणेची वरदाने आली, त्यांच्या खऱ्या मूल्यापेक्षा जोतीरावांनी त्याला जास्त महत्त्व दिले. सुधारणेचा इंग्रज देव हिंदू जातिभेदावरच बसून आला होता. त्याने जातिभेदावरून खाली उतरण्याची पर्वा केली नाही. हे त्यांच्या तितकेसे लक्षात आले नाही असे दिसते. कारण त्या प्रगतीच्या देवाचे अधिष्ठान जातिभेदावरच असल्यामुळे भारतातील सर्व वर्गांची समान प्रगती होणार नव्हती.

न्या. रानडे आणि लोकहितवादी देशमुख यांच्याशी एका बाबतीत जोतीराव सहमत होते. हिंदूंचा मूर्खपणा आणि त्यांचे दूषित पूर्वग्रह दूर करण्यासाठी हिंदुस्थानावर देवानेच इंग्रज राजवट पाठविली आहे, असे जोतीरावांचेही रानडे आणि लोकहितवादी यांच्याप्रमाणे मत होते. हा फायदा काही कमी नव्हता. तथापि इंग्रजांचे राज्य आज ना उद्या जाईल याविषयी जोतीरावांना शंका नव्हती. जोतीरावांचा हा लढा शूद्र आणि अतिशूद्र म्हणजे शेतकरी आणि भूमिहीन वर्गांच्या उद्धारासाठी होता. त्यांना ब्राह्मणांच्या मानसिक गुलामगिरीतून मुक्त करून त्यांचा उद्धार करावयाचा होता. त्या काळी ब्राह्मण त्यांची पिळवणूक करीत. त्यामुळे तो झगडा ब्राह्मणांच्या विरुद्ध आहे असे त्यास स्वरूप आले.

इंग्रजांची शासनसंस्था चालविणारे नोकर बहुतेक ब्राह्मणच होते. बहुतेक सावकार,

पोलीस अधिकारी, शिरस्तेदार, मामलेदार, दुय्यम न्यायाधीश हे सर्व ब्राह्मणच असत. ते सर्व संगनमत करून कनिष्ठ वर्गांना बंधनांत ठेवून त्यांची पिळवणूक करीत. प्रत्येक खेड्यात ब्राह्मण भिक्षुक, ब्राह्मण सावकार आणि ब्राह्मण वकील हे त्यांचे पैसे लुटायला सर्व प्रकारे सदा तत्पर असत. हे त्रिकूट त्यांची जमीन आणि संपत्ती ही फसवून घेण्यात संगनमत करी. त्यामुळे या झगडयाला नकळत जातिवादाचा रंग चढला. तथापि तो लढा धार्मिक, आर्थिक आणि सामाजिक समतेसाठी होता. कारण त्या झगडयाचे खरे अधिष्ठान आर्थिक आणि सामाजिक होते.

जोतीरावांच्या ग्रंथाचे 'गुलामगिरी' हे नाव चमत्कारिक होते असे म्हणण्यापेक्षा ते अधिक भडक होते असे म्हटले तरी चालेल. 'गुलामगिरी' या शब्दाचा अर्थ ज्या अवस्थेमध्ये मनुष्यप्राणी विकले जातात ती अवस्था होय, असा होतो. त्या अवस्थेत, विकत घेतलेल्या गुलामांना मजुरी दिल्याशिवाय राबविण्यात येते. अशा तऱ्हेची गुलामगिरी इंग्रजी साम्राज्यात १८३३ साली, रशियात व अमेरिकेत १८६३ मध्ये नष्ट करण्यात आली. मनुष्यास गुलाम म्हणून विकण्याची किंवा विकत घेण्याची प्रथा हिंदुस्थानात प्रायः नव्हती.

जोतीरावांच्या हल्ल्याचा रोख हा धर्माच्या नावाखाली ब्राह्मणांनी कनिष्ठ वर्गांवर जी धार्मिक, आर्थिक आणि सामाजिक गुलामगिरी लादली होती त्यावरच मुख्यतः होता. आपल्या ग्रंथात जोतीरावच सांगतात की, 'ब्राह्मण लोक तुम्हाला लुटून खात आहेत हे माझ्या शूद्रबांधवांना सांगण्याच्या हेतूनेच मी हा प्रस्तुत ग्रंथ लिहीत आहे.'

अमेरिकन संस्थानातील निग्रो लोकांच्या स्वातंत्र्यासाठी जो मोठा लढा झाला, त्यापासून सामाजिक न्यायासाठी झगडण्याची स्फूर्ती जोतीरावांनी घेतली होती. लोकहितवादी गोपाळराव देशमुख यांच्यावरसुद्धा अमेरिकन स्वातंत्र्यसमराचा परिणाम झालेला दिसून येतो. जेव्हा हिंदी लोक स्वतःचे राज्य करण्यास पात्र होतील, तेव्हा जर ब्रिटिशांनी त्यांना सत्ता दिली नाही, तर जसे अमेरिकेत घडले तसे हिंदुस्थानात घडेल असे त्यांनी भाकीत केले होते. अमेरिकेच्या स्वातंत्र्यसमराचा आणि गुलामगिरी नष्ट करण्याच्या तिच्या जाहीरनाम्याचा जोतीरावांच्या पिढीतील लोकांवर फारच मोठा परिणाम झाला होता.

जोतीरावांचा हल्ला जरी ब्राह्मणांविरुद्ध होता, तरी त्यांच्या हल्ल्याचा रोख प्रामुख्याने चित्पावन ब्राह्मणांवरच होता असे दिसते. त्यांचे नाव घेतले नाही एवढेच. वेदांमध्ये चित्पावनांचा उल्लेख नाही. वेद त्यांनीच निर्माण केले, असे म्हणता येत नाही. सर्व शास्त्रे आणि पुराणे ही त्यांनीच लिहिली आहेत असे निश्चितपणे म्हणता येत नाही. सतराव्या शतकापर्यंत चित्पावनांचा इतिहासात उल्लेख केलेला आढळत नाही. शिवाजी आणि संभाजी यांच्या राजवटीत त्यांच्या हाती मुळीच सत्ता नव्हती. महाराष्ट्रातील इतर ब्राह्मण चित्पावनांना आपल्या बरोबरीचे मानीत नसत. त्या काळी चित्पावनांचा पेशा स्वयंपाक्याचा आणि जासुदाचा असे.

बाळाजी विश्वनाथ हा पेशवा झाल्यावर चित्पावन हे महाराष्ट्राच्या राजकारणात उदयास आले आणि एक मोठी सन्मान्य व शक्तिमान जात म्हणून प्रतिष्ठा पावले. बाळाजी बाजीराव हा पेशवा गादीवर येईपर्यंत सर्व ठीक होते. तो पेशवेपदावर आरूढ झाल्यावर त्याने चित्पावनांना इतर ब्राह्मणांबरोबरीचा दर्जा प्राप्त करून देण्यासाठी इतर ब्राह्मणांवर मोठे दडपण आणले. गौतमबुद्धाच्या उदयानंतर आणि महानुभावपंथ, गोसावीपंथ आणि भागवतधर्म या पंथांच्या मतप्रणालीचा प्रभाव पडल्यानंतर महाराष्ट्रातील ब्राह्मणांनी सर्व पवित्र पोथ्या, त्यांचा कर्मठपणा नि उच्चनीच भावनेची तत्त्वेही आपल्या घरांत गुंडाळून ठेवली होती.

परंतु पेशवाईत ब्राह्मणांच्या हाती राज्यसत्ता येताच त्यांनी पुन्हा आपल्या पवित्र पोथ्या आणि पुराणे उघडली. आणि कर्मकांडे सुरू केली. त्यामुळे केवळ ब्राह्मणेतर समाजामध्ये असंतोष माजला असे नव्हे, तर ब्राह्मणांच्या निरनिराळ्या पोटजातींमध्येही श्रेष्ठत्वाविषयी तंटे माजले. हे सामाजिक तंटे माधवराव पेशव्याच्या मृत्यूनंतर द्रुतगतीने अधिक चिघळले. चित्पावन ब्राह्मण राज्यकर्त्यांनी ब्राह्मणेतर जातींनाही छळले. देशस्थ आणि चित्पावन ब्राह्मणांतील तंटा तर इतका विकोपाला गेला होता की, नाशिक येथील एका विशिष्ट घाटावर जाण्यास देशस्थ ब्राह्मणांनी रावबाजीला बंदी घातली होती.

उत्तर हिंदुस्थानात क्षत्रिय आणि शूद्र यांच्यापासून ब्राह्मण वेगळे नव्हते. त्यांचे कपडे, अन्न आणि वागणूक सारखीच असे. परंतु नर्मदेच्या दक्षिणेकडील पश्चिम हिंदुस्थानात ब्राह्मणांनी पूर्णपणे मांसाहार सोडून ते शाकाहारी बनले व इतर जातींना ते शूद्र मानू लागले. आणि जेव्हा त्यांच्या हाती पौरोहित्याच्या अधिकाराबरोबर राजकीय सत्ताही आली, तेव्हा त्यांनी उन्मत्तपणे दुसऱ्या जातीचा द्वेष करावयास सुरुवात केली. जोतीरावांचे जीवन हे ह्या सामाजिक परिस्थितीचे आणि सामाजिक असंतोषाचे प्रतीक होय.

११

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. [illegible]
[illegible]
[illegible]

# सत्यशोधक समाज

'गुलामगिरी' हा कनिष्ठ वर्गातील लोकांसाठी उपदेशपर ग्रंथ लिहून झाल्यावर जोतीरावांनी महाराष्ट्रात ब्राह्मणांच्या मानसिक गुलामगिरीतून कनिष्ठ वर्गांना मुक्त करण्याच्या महत्त्वाकांक्षेने प्रेरित होऊन चळवळीस आरंभ करण्याचा निर्धार केला. जोतीराव हे क्रांतिकारक नेते असल्यामुळे त्यांच्या वृत्तीशी सुसंगत व धोरणाला पोषक असे तत्त्वज्ञान व व्यासपीठ निर्माण करणे त्यांना प्राप्त होते.

ह्यापूर्वी पंधरा वर्षे ते आपले विचार जाहीर सभा, पत्रके आणि पुस्तिका ह्यांच्या द्वारा व्यक्त करीत होते. कनिष्ठ वर्गांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन ते त्यांनी आपल्या मुलांना द्यावे, असा ते उपदेश करीत राहिले होते. देवाच्या आणि धर्माच्या नावाखाली भटाभिक्षुकांनी व शास्त्री-पंडितांनी धार्मिक ग्रंथांच्या द्वारा त्यांच्या मानेसभोवती मानसिक गुलामगिरीचे पाश गुंडाळले होते. त्यांच्यावर लादलेली गुलामगिरी व त्यांच्यात प्रसृत केलेल्या दुष्ट चालीरीती व धर्मभोळ्या वेडगळ समजुती ह्या झुगारून देऊन स्वतःस मुक्त करावे असा त्यांनी सतत आक्रोश चालविला होता.

जोतीरावांनी कनिष्ठ वर्गातील लोकांच्या मनावर असे ठसविण्याचा प्रयत्न केला की, ब्राह्मणी शास्त्रांनी त्यांच्यावर लादलेली मानसिक गुलामगिरी ही काही ललाटलिखित

नाही. तसेच ती देवनिर्मित नाही. जन्मतःच ती गुलामगिरी त्यांच्यासंगे येते, ही कल्पना अत्यंत चुकीची आहे. आणि काबाडकष्ट करणाऱ्या वर्गांमध्ये त्यांनी आत्मविश्वास आणि आत्मसन्मान ह्याविषयीची जाणीव जागृत करण्याचा प्रयत्न केला. दारिद्य आणि जातियुक्त सामाजिक अन्याय, जुलमी, अन्यायी, आणि जातिभेदजन्य सामाजिक व्यवस्था यांच्याविरुद्ध त्यांनी बंड करण्यास उठावे म्हणून त्यांच्या ठायी त्यांनी धैर्य निर्माण केले. मानव प्रतिष्ठेच्या नवीन कल्पना, मानवी समानता आणि आत्मोद्धार ह्यांविषयीच्या नवीन विचारांनी त्यांनी त्यांना नवीन प्रेरणा देण्याचा प्रयत्न केला.

जोतीरावांनी आपली भाषणे व ग्रंथ यांच्या द्वारा शेतकरी आणि कामगार ह्यांच्या गाऱ्हाण्यांकडे सरकारचे लक्ष वेधावे ह्यासाठी प्रयत्न केला. सरकारच्या निरनिराळ्या खात्यांतून लाचलुचपतीचे व्यवहार कसे चालतात, गोरगरिबांची कशी पिळवणूक होते, अधिकाऱ्यांचे न्यायाकडे कसे दुर्लक्ष होते, या सर्व गोष्टी ते सतत उघडकीस आणीत राहिले होते. आपले बुद्धिप्रामाण्यवादी आणि पुरोगामी विचार आपले अनुयायी, शेतकरी आणि कामगार यांच्यांत प्रसृत व्हावे म्हणून त्यांनी त्यांची संघटना करण्यास आरंभ केला. शेतकऱ्यांची कशी पिळवणूक होत आहे आणि ते दारिद्र्याच्या चिखलात कसे अधिकाधिक रुतत चालले आहेत, सामाजिक अन्यायाखाली ते कसे पिचत चालले आहेत, हे त्यांना सरकारच्या लक्षात आणून द्यावयाचे होते. तसेच अतिशूद्रांना म्हणजे महारमांगादी अस्पृश्यांना शूद्रांच्या बरोबरीचा दर्जा प्राप्त करून द्यायचा होता.

झगडा केल्याशिवाय नष्ट झालेले मानवी अधिकार परत मिळत नसतात. पांढरपेशा वरिष्ठ वर्ग आणि प्रामुख्याने ब्राह्मण वर्ग आपल्या चळवळीविषयी सहानुभूति दाखविणार नाही; इतकेच नव्हे तर ते अधिकाधिक असहिष्णू बनतील, स्वतःस मिळालेल्या सवलती, अधिकार, सत्ता आणि दर्जा ते सहजासहजी सोडणार नाहीत, अशी त्यांची बालंबाल खात्री होती. कनिष्ठ वर्गांना राजकीय हक्क मिळण्याचा संभवच नव्हता. त्याच्यासाठी झगडा करण्याइतके त्यांच्यात त्राण उरले नव्हते. अशा गोष्टींना आवश्यक असलेल्या संघटनेचा त्यांच्यात अभाव होता. ते लक्षात घेऊन आपल्या मतप्रणालीचा प्रसार करण्यासाठी जोतीरावांनी एक संस्था निर्माण करण्याचा बेत निश्चित केला. त्यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी महाराष्ट्रातील आपले सर्व चाहते आणि अनुयायी यांची पुण्यात एक सभा बोलाविली. महाराष्ट्रातील निरनिराळ्या महत्त्वाच्या केंद्रातून सुमारे साठ कार्यकर्ते जमले. जोतीरावांनी त्यांच्यापुढे एक मोठे परिणामकारक भाषण करून आपल्या चळवळीच्या मार्गदर्शनाला एका मध्यवर्ती संस्थेची कशी आवश्यकता आहे हे त्यांना पटवून दिले. त्या विषयावर दुसरी अनेक भाषणे झाली. भवती न भवती होऊन सर्वांच्या विचाराने एक संस्था २४ सप्टेंबर १८७३ रोजी स्थापण्यात आली.

जोतीरावांच्या सहकाऱ्यांत मोठा उत्साह निर्माण झाला. आपली चळवळ संघटित करून तिच्याद्वारे आपला संदेश सर्व ठिकाणी पोचवावा अशा निर्धाराने व ध्येयाने

जोतीरावांनी ती संस्था स्थापली. त्यांनी स्वतःच तिचे नाव 'सत्यशोधक समाज' असे ठेविले. महाराष्ट्रव्यापी अशी समाजसुधारणेची महाराष्ट्रातील ही पहिली चळवळ होय.

सत्यशोधक समाजाचे पहिले अध्यक्ष आणि कोषाध्यक्ष म्हणून जोतीरावांची निवड झाली. नारायणराव गोविंदराव कडलक यांची कार्यवाह म्हणून निवड झाली. शूद्र आणि अतिशूद्र यांची ब्राह्मण पुरोहितांकडून होणारी पिळवणूक बंद करणे, त्यांना त्यांच्या मानवी हक्कांची अन अधिकारांची शिकवणूक देणे आणि ब्राह्मणी शास्त्रांच्या मानसिक आणि धार्मिक गुलामगिरीतून मुक्त करणे, हे सत्यशोधकाचे ध्येय-धोरण होते.

सत्यशोधक समाजाचे सभासद होताना प्रत्येकाला शपथ घ्यावी लागे. खंडेराव ह्या दैवतापुढे बेलपत्र उचलावे लागे असे म्हणतात. इंग्रज सत्तेशी निष्ठेने वागेन अशी शपथ घ्यावी लागे. जोतीरावांच्या सत्यशोधक समाजानंतर बत्तीस वर्षांनी स्थापन झालेल्या नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांच्या भारत सेवक समाजाने सुद्धा ब्रिटिशांचा हिंदुस्थानशी आलेला संबंध हा देवाच्या अतर्क्य कृपेमुळे हिंदुस्थानच्या उद्धारासाठीच आला आहे असे मानले होते. त्या काळी शहरांतील पाश्चात्त्य शिक्षण घेतलेले सुशिक्षित असे मुठभर लोक राजकीय हक्कांसाठी भीतभीत इंग्रजांकडे प्रार्थना करीत असत.

सत्यशोधक समाजाचे संस्थापक जोतीराव यांच्या मृत्यूनंतर १९११ साली सत्यशोधक समाजाचे जे ठराव प्रसिद्ध झाले, त्यांत सत्यशोधक समाजप्रणीत तीन तत्त्वे गोविली होती. ती अशी—(अ) सर्व माणसे एकाच देवाची लेकरे आहेत व देव त्यांचा आईबाप आहे. (ब) आईला भेटण्यास अगर बापाला प्रसन्न करण्यास ज्याप्रमाणे मध्यस्थाची जरुरी नसते त्याप्रमाणे देवाची प्रार्थना करण्यास पुरोहित किंवा गुरू यांची आवश्यकता नाही. (क) वरील तत्त्व कबूल असल्यास कोणासही सभासद होता येते.[1]

प्रत्येक सभासदाला पुढीलप्रमाणे प्रतिज्ञा घ्यावी लागे. 'सर्व मानव प्राणी एकाच देवाची लेकरे आहेत, सबब ती माझी भावंडे आहेत, अशा बुद्धीने मी त्यांच्याशी वागेन. परमेश्वराची पूजा, भक्ती अगर ध्यानधारणा करतेवेळी अगर धार्मिक विधीचे वेळी मी मध्यस्थाची गरज ठेवणार नाही; दुसऱ्यांनाही तसेच वागण्याबद्दल मी उपदेश करीन. मी माझ्या मुलांमुलींना सुशिक्षित करीन. मी नेहमी राजनिष्ठेने वागेन. परमेश्वरास व सत्यरूपी परमेश्वरास साक्ष ठेवून मी ही प्रतिज्ञा करीत आहे. ह्या प्रतिज्ञेप्रमाणे वागण्यास मला सामर्थ्य येईल अशा प्रकारे आयुष्यक्रम गुदरण्यास योग्य प्रकारे मदत तो मला करो.'

सत्यशोधक समाजाचे सभासदत्व सर्व जातींतील लोकांना मोकळे ठेवले होते. ब्राह्मण, महार, मांग, ज्यू आणि मुसलमान हे त्या चळवळीच्या आरंभी आरंभी सत्यशोधक समाजाचे सभासद होते असे दिसते.

ज्या ठिकाणी सत्यशोधक समाजाच्या शाखा स्थापण्यात आल्या होत्या, त्या ठिकाणी दर आठवड्यास सभा होत असत. पुण्यातील सोमवार पेठेतील डॉ० गावडे

---

१. संपादक, बागल, माधव खंडेराव, सत्यशोधक हीरक महोत्सव ग्रंथ, पृ. १०९.

यांच्या घरी दर आठवड्याला सभा भरत असत./ त्या ठिकाणी दारूबंदी, सक्तीचे शिक्षण, स्वदेशी वस्तू वापरण्याला प्रोत्साहन देणे, ब्राह्मणांची धार्मिक क्षेत्रातील पुरोहितगिरी झुगारून देणे, कुटुंबियांतील लग्ने अल्प खर्चात करण्याची व्यवस्था करणे, ज्योतिष, भुते आणि समंध यांच्या भीतीपासून लोकांना मुक्त करणे, इत्यादी गोष्टींसंबंधी चर्चा होत असे. जातिभेद, मूर्तिपूजा यांच्या विरुद्ध मुख्य प्रचार असे. परमेश्वराचे जनकत्व व मनुष्याचे बंधुत्व या तत्त्वावरही भर देण्यात येत असे./

सत्यशोधक समाजाच्या चळवळीला बाल्यावस्थेतच नख लावण्याच्या उद्देशाने ब्राह्मणांनी सत्यशोधक समाजाच्या विरुद्ध प्रचार करण्यास आरंभ केला. ब्राह्मणांनी घाबरवून सोडलेले ते गरीब अज्ञानी लोक जोतीरावांकडे येऊन त्यांना विचारीत, 'अहो, मराठीत केलेली प्रार्थना देवाला कशी ऐकू जाईल?' जोतीराव त्यांना समजावून सांगत की, 'मराठी, गुजराथी, तेलगू किंवा बंगाली भाषेत परमेश्वराची प्रार्थना केली तर ती परमेश्वरापर्यंत पोचत नाही किंवा रुजू होत नाही असे मानणे ही चुकीची गोष्ट आहे. विधाता हरेक मनुष्याचे मन जाणतो. त्याची आंतरिक इच्छा आणि प्रार्थना त्याला कळतात. लॅटिन, इंग्रजी आणि फ्रेंच या भाषांतून केलेल्या प्रार्थना देवाला ऐकू गेल्या नाहीत काय? तुकाराम, नामदेव, चोखामेळा, सावता माळी यांच्या प्रार्थना देवाच्या कानी गेल्या नाहीत काय?'

सत्यशोधक समाजाचे कोणीही सभासद होऊ नये असा प्रचार ब्राह्मण लोक खेड्यापाड्यांतून करीत आणि त्याबरोबरच धाकही दाखवीत. सत्यशोधक समाजाचे जे सभासद होत, त्यांचा छळ होई. सरकारी नोकरीत ब्राह्मण अधिकाऱ्यांच्या हाताखाली सत्यशोधक समाजाचे सभासद असलेल्या व्यक्ती नोकरीत असल्या, तर त्यांना छळ सोसावा लागे. केव्हा केव्हा त्यांना नोकरीसही मुकावे लागे. नारायणराव कडलक हे सरकारी नोकरीत असून सत्यशोधक समाजाचे कार्यवाह होते. त्यांची बदली हेतुतः पुण्याहून महाबळेश्वरला करण्यात आली. जर ब्राह्मणांच्या उपस्थितीशिवाय कोणताही धार्मिक विधी केला किंवा संस्कार केले तर तसे संस्कार करणाऱ्या कुटुंबावर परमेश्वराचा कोप होईल, किंवा ब्राह्मण आणि त्यांचे देव यांच्या शापामुळे त्यांचे निःसंतान होईल, अशी त्यांना ब्राह्मण भीती दाखवीत असत.

. २ .

सत्यशोधक समाज आणि प्रार्थनासमाज किंवा सत्यशोधक समाज आणि ब्राह्मसमाज यांमधील साम्य-भेदाचा विचार करण्यासारखा आहे. त्यामुळे जोतीरावांसारख्या शेतकरी —तत्त्वज्ञान्याला ह्या स्वतंत्र संस्थेची आवश्यकता का वाटली हे समजून येते. आर्यसमाजाचा जन्म १८७५ पर्यंत झालाच नव्हता. प्रार्थना समाज आणि ब्राह्म समाज हे दोन्ही एकेश्वरी पंथ होते. तसाच सत्यशोधक समाजही एकेश्वरी पंथ होता. ह्या तिन्ही संस्थांच्या मते सर्व मानव एकाच देवाची बालके होत. धार्मिक बाबतीत मध्यस्थ नको,

पुरोहित किंवा गुरू नको. त्याच्या आधाराविना कोणत्याही व्यक्तीला परमेश्वराची प्रार्थना करता येते किंवा धार्मिक विधी करता येतात, अशी त्यांची शिकवणूक होती.

ह्या तिन्ही संस्था दर आठवड्याला सांघिक प्रार्थना आणि सभा घेत असत. राममोहन रॉय यांनी ब्रह्मतत्त्व घेतले. प्रार्थना समाजाने प्रार्थना व जोतीरावांनी सत्य घेऊन आपल्या कार्यास आरंभ केला. यानंतर दोन वर्षांनी दयानंद स्वरस्वती यांनी आर्यतत्त्वाचा पुरस्कार करून आपल्या कार्यास प्रारंभ केला. ब्राह्म समाजवादी आणि प्रार्थना समाजवादी हे आपल्या आध्यात्मिक उन्नतीसाठी प्रार्थना करीत. प्रार्थनेच्या प्रभावावर त्यांचा विश्वास होता. जोतीरावांचा भर प्रार्थनेवर नव्हता किंवा आध्यात्मिक उन्नतीवरही नव्हता. जोतीराव हे भगवद्भक्तीत धुंद झालेले देवभक्त नव्हते.

जोतीरावांच्या सत्यशोधक समाजाचा जातिव्यवस्थेवर विश्वास नव्हता. तसाच तो चातुर्वर्ण्यावरही नव्हता. आवश्यक असेच थोडे धार्मिक विधी ठेवून धार्मिक बाबतीत मध्यस्थांची त्यांनी उचलबांगडी केली. ब्राह्म समाजही तत्त्वतः जातिभेद पाळीत नसे. ब्राह्म समाजाने धार्मिक विधी किंवा संस्कार आपल्या अनुयायांना नेमून दिले नव्हते. प्रार्थना समाजाची तत्त्वे ब्राह्म समाजासारखीच होती. ब्राह्म समाज, प्रार्थना समाज आणि सत्यशोधक समाज या तिघांनीही मूर्तिपूजा त्याज्य ठरविली होती.

अशी वस्तुस्थिती होती तरी राममोहन रॉय यांच्या काळापासून ब्राह्म समाजात केवळ ब्राह्मणांनीच प्रार्थना सांगितली पाहिजे असा अलिखित नेम आणि नियम असे.[२] प्रार्थना सांगणे ब्राह्मणांचीच पवित्र अशी खास मक्तेदारी! त्या मक्तेदारीला ब्राह्मणेतराचा विटाळ सहन होत नसे. या नियमाविरुद्ध केशवचंद्र सेन यांनी बंड केले. केशवचंद्र सेन हे कायस्थ होते. ते उत्साही, कडवे सुधारणावादी आणि तेजस्वी वृत्तीचे नेते होते. त्यांनी राममोहन रॉय आणि देवेंद्रनाथ टागोर यांनी स्वाभाविकपणे ब्राह्मणांच्या बाजूने ठेविलेले हे पक्षपाती धोरण उखडून टाकून ब्राह्म समाजाला ब्राह्मणी चिन्हांपासून मुक्त केले. त्यानंतर ब्राह्मणेतरांना ब्राह्म समाजामध्ये प्रार्थना सांगण्याचा अधिकार मिळाला. 'सन्माननीय ब्राह्मणांनीच व्यासपीठावरून प्रार्थना सांगितली पाहिजे. दुसऱ्या कोणालाही ती करता येणार नाही' हे राममोहन रॉय ह्यांच्या काळापासून ब्राह्म समाजाने अनुसरलेले तत्त्व गुंडाळून ठेवण्यात आले.[३]

प्रार्थना समाजवाद्यांनी यज्ञोपवीताचाही त्याग केला. प्रार्थना समाजामध्ये कोणालाही व्यासपीठावरून प्रार्थना सांगता येत असे. अठराशे सदुसष्टच्या जून महिन्यात भिकोबा-दादा लक्ष्मण चव्हाण या भंडारी जातीच्या शिक्षकाने मुंबईतील प्रार्थना समाजामध्ये

२. Gajendragadkar, P. B., Former Chief Justice, Supreme Court, in his Foreword to 'A Century of Social Reform in India' by S. Natarajan.
३. Mozoomdar, R. C., The Life and Teachings of Keshub Chandra Sen, p. 156.

पुरोहित म्हणून काम केले. साधे, धार्मिक आणि परमदयाळू असे ते भिकोबादादा चव्हाण उदारमतवादी आणि एकेश्वरवादी पुरुष होते.

शाहूराव कुकडे नावाचे 'ज्ञानोदया'चे त्या काळचे नवख्रिस्ती संपादक प्रार्थना समाजातील भिकोबादादांचे ते प्रवचन ऐकून मनात चडफडले. त्यांनी आपल्या 'ज्ञानोदया'मध्ये भिकोबादादा चव्हाण यांना प्रार्थना सांगण्याचा अधिकार दिल्याबद्दल प्रार्थना समाजाला दोष दिला. त्यासंबंधी प्रार्थना समाजाचे इतिहासकार म्हणाले, "भिकोबादादांचा प्रेमळ स्वभाव, ईश्वरावरील निष्ठा, उदार व निश्चयी स्वभाव, लोकांमध्ये, कुटुंबांमध्ये शुद्ध धर्माचा प्रसार व्हावा या संबंधीची त्यांची कळकळ, त्यांची सात्त्विक वृत्ती, साधेपणा यांची माहिती नसल्यामुळे व त्यांचे ते भंडारी लोक वापरतात तसे मोठे पागोटे, जुन्या तऱ्हेचा अंगरखा व धोतर पाहून निराश होऊन त्यांच्यासंबंधी कमीपणाचे उद्‌गार काढले आहेत.' ख्रिस्ती झाल्यावरही जातिनिष्ठ राहिलेल्या त्या टीकाकाराचा सूर लक्षात घेऊन प्रार्थना समाजाचे इतिहासकार कुकड्यांच्या टीकेविषयी आपले मत देताना म्हणाले, "ख्रिस्ती झाल्यावरही जातिविषयक पूर्वसंस्कार कसे कायम राहातात हे त्यांच्या टीकेवरून लक्षात येते."

ब्राह्म समाजाचे संस्थापक राममोहन रॉय यांना येशू ख्रिस्ताचे नैतिक शिक्षण मान्य होते. परंतु त्याचे देवत्व त्यांनी नाकारले. वेद हे ईश्वरनिर्मित ग्रंथ आहेत अशी राममोहन रॉय यांची अढळ श्रद्धा होती.[४] वेद हे ईश्वरनिर्मित नसून मानवनिर्मित आहेत अशी जोतीरावांची खात्री होती. बायबल किंवा कुराण यांसारखे धार्मिक ग्रंथ त्यांना ईश्वरप्रणीत वाटत नसत. राममोहन रॉयांची राजा ही पदवी शेवटच्या मोंगल बादशहाने दिली होती. ब्रिटिश राज्य हे हिंदुस्थानास देवाचे वरदान आहे असे राममोहन रॉयनाही वाटे.

केशवचंद्र सेन यांच्या मनावर येशू ख्रिस्ताच्या महान व्यक्तिमत्त्वाची मोहिनी पडली होती. त्यामुळे ते ख्रिश्चन मताचे आहेत, असा त्यांचे शत्रू त्यांच्याविरुद्ध प्रचार करीत. केशवचंद्रांना येशूख्रिस्ताविषयी मोहिनी वाटत असे म्हणून नव्हे, तर त्यांच्या सामाजिक क्रांतिकारक मतांमुळेच त्यांना ख्रिश्चन संबोधून त्यांचा धिक्कार करण्यात येत असे. जरी प्रार्थना समाजावर वरिष्ठ वर्गाचीच छाप पडली होती, तरी सामान्य माणसाला आपल्या तत्त्वाकडे ओढण्यासाठी त्यांनी आपल्या तत्त्वज्ञानास तुकारामाच्या अभंगाच्या तत्त्वाची सुवासिक पुटे दिली होती. प्रार्थना समाज देवदूतांच्या पंथाचा होता. त्या समाजाचे सभासद भागवत धर्मामध्ये आध्यात्मिक शांती शोधून काढण्याच्या खटपटीत असत. ते सामान्य माणसाकडे पाठ फिरवून आध्यात्मिक जगातील समतेच्या देवाकडे धाव घेत होते.

---

४. Gajendragadkar, P. B., Former Chief Justice, Supreme Court, in his Foreword to 'A Century of Social Reform in India' by S. Natarajan.

ब्राह्म समाज व प्रार्थना समाज ह्यांच्या ठायी लोकांना आपल्याकडे ओढण्याची शक्ती नव्हती. त्यांचे कृतिक्षेत्र हे शहरातच मर्यादित होते. तरीसुद्धा त्यांच्यापैकी कित्येकांनी पुढील काळात सामाजिक परिषदेच्या कार्यात व वादविवादात भाग घेतला. त्यांचे प्रार्थनेच्या वेळचे झगे, त्यांच्या प्रार्थनेच्या जागा, त्यांचे संगीत, त्यांची भाषा ही सत्यशोधक समाजापासून फार वेगळी होती. ब्राह्म समाज व प्रार्थना समाज हे उत्क्रांतिवादी होते. प्रार्थना समाजाचे नेते आणि कार्यकर्ते हे सर्व विद्वान नि बुद्धिवान होते. परंतु त्यांच्या ठायी नीतिधैर्य नव्हते. त्यांचे गाढे ज्ञान, ईश्वरावरील त्यांची निरतिशय भक्ती व शासन संस्थेतील त्यांचे उच्च स्थान ह्यांतच त्यांचा सारा वेळ खर्च होत असे. ह्यामुळे त्यांचा जनतेशी म्हणण्यासारखा संपर्क येत नसे.

सत्यशोधक समाजाला फार मोठ्या बुद्धिवंतांचा पाठिंबा होता असे नाही. त्यांचा तत्त्वज्ञानी पुरुष हा साधा, प्रामाणिक, शेतकरी होता. तो सामान्य शेतकरी असला तरी त्याला आंगिक प्रेरणा आणि बुद्धिप्रामाण्याची देणगी निसर्गतःच लाभली होती. सत्य-शोधकांच्या कार्याच्या प्रेरणेचे स्थान हृदय होते. त्यांची भाषा जनतेची होती. त्यांच्या प्रचाराची स्थळे, सभा, बैठक व शेतावरील मळणीचे स्थान. सत्यशोधक प्रचारकांचा पोशाख म्हणजे एक घोंगडी, पागोटे व धोतर आणि हातात डफ. आपल्या भाषणात ते शेतकऱ्यांच्या कर्जाचा उल्लेख करीत. धर्मविधी व संस्कार यांच्या जाचाखाली शेतकऱ्याचे कसे नुकसान होते व जो काही त्यांच्या गाठी थोडा पैसा असतो तो धूर्त ब्राह्मण भिक्षुक कसा लुबाडतो ह्याकडे ते शेतकऱ्यांचे आणि सामान्य माणसांचे लक्ष वेधीत. आपल्या मुलांना त्यांनी शिक्षण दिले पाहिजे असे ते सांगत. तसे केले म्हणजे त्यांना चांगले काय नि वाईट काय, कायदा, धर्म व देव म्हणजे काय हे समजेल, असा त्यांना उपदेश करीत. सत्यशोधक समाजाचे हे प्रचारक शेतकरी कुटुंबांतलेच होते. त्यामुळे त्यांच्या कार्यात आणि प्रचारात पांडित्य आणि बुद्धिमत्ता यांचे तेज दिसून येत नसे. तथापि त्यांची कार्यशक्ती आणि तळमळ ही फार मोठी होती.

राममोहन रॉय, रानडे व भांडारकर, आणि त्यानंतर दयानंद सरस्वती ह्यांसारख्या द्रष्ट्यांनी काढलेल्या संस्थांच्या बरोबरीची एखादी संस्था काढणे ही काही लहानसहान गोष्ट नाही. इतकेच नव्हे तर, ब्राह्म समाज आणि प्रार्थना समाज ह्यांनी जी गोष्ट करण्याचा प्रयत्न केला नाही ती सत्यशोधक समाजाने केली. ती गोष्ट म्हणजे कनिष्ठ वर्गाचा उद्धार करणे ही होय. आधुनिक भारतामध्ये सामाजिक पुनर्घटनेसाठी चळवळ सुरू करणारी पहिली संस्था म्हणजे सत्यशोधक समाज होय. सत्यशोधक समाजाने सामाजिक गुलामगिरीविरुद्ध आवाज उठविला आणि सामाजिक न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. सत्यशोधक समाजाचा आवाज ही हिंदुस्थानात अनेक शतके दडपून टाकलेल्या कनिष्ठ समाजाची किंकाळी होय.

ह्या तिन्ही समाजांनी एक मोठी ऐतिहासिक कामगिरी बजावली. त्या काळी हिंदुधर्म सोडून खिस्तीधर्माचा स्वीकार करण्याची प्रवृत्ती वाढू लागली होती. तिला

आला"[५] घालण्यासाठी हे तीन समाज काढावे लागले. त्या काळी तो हेतू बहुतांशी सफल झाला.

. ३ .

काही दिवसांनंतर जोतीरावांनी ब्राह्म समाज व प्रार्थना समाज यांचा निषेध केला. वेद आणि गीता यांच्यासारख्या प्राचीन ग्रंथांतील आपल्या पूर्वजांच्या लब्बाड्या झाकण्याच्या उद्देशाने ब्राह्मणांनी हे दोन समाज स्थापन केले, असे जोतीरावांना वाटे. आणि पुढे जोतीरावांचे शिष्य डॉ० बाबासाहेब आंबेडकर यांनी गीता हा राजकीय ग्रंथ आहे असाच अभिप्राय व्यक्त केला.

सत्यशोधक समाजाची स्थापना झाल्यावर, त्याची ध्येये आणि उद्दिष्टे कृतीत उतरविण्यासाठी जोतीरावांनी प्रत्यक्ष कृतीस आरंभ केला. विद्यार्थ्यांकडून शिष्यवृत्तीसाठी अर्ज मागवून घेतले व दहा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली. ह्याविषयी ब्राह्मणेतर लोकांनी जोतीरावांची प्रशंसा केली. जोतीरावांनी लागलीच समाजाची धार्मिक शिकवण कृतीत उतरण्यास आरंभ केला.

जोतीरावांचा एक दूरचा नातलग त्यांच्या दुकानामध्ये नोकर होता. तो अशिक्षित होता आणि तो तरुण असून विधुर होता. फुरसतीच्या वेळी ते त्याला लिहायला वाचायला शिकवीत. थोड्याच दिवसांत त्यांनी त्याचे लग्न जुळविले आणि सत्यशोधक समाजाच्या ध्येयानुसार त्याचा विवाह करण्याचे ठरविले. त्या गरीब तरुणाने सत्यशोधक समाजाच्या नियमाप्रमाणे लग्न करण्यास रुकार दिला.

भटजी बोलाविल्याशिवाय त्या तरुणाचे लग्न करण्याच्या जोतीरावांच्या विचाराची कुणकुण ब्राह्मणांना लागली. ती बातमी आजूबाजूच्या खेड्यांत पसरली. ब्राह्मण भिक्षुकांमध्ये धावपळ सुरू झाली. त्यांनी अशा तऱ्हेच्या विवाहाला विरोध करणे हे साहजिकच होते. कारण त्यांची मिरासदारी, प्रतिष्ठा आणि त्यांची कमाई यांना तडाखा बसणार होता. त्यामुळे त्यांनी चिडून जाऊन अज्ञानी लोकांना सत्यशोधक समाजाच्या पद्धतीने विवाह करण्यास उद्युक्त झालेल्या त्या मुलीच्या बापाविरुद्ध उठविले. देवाब्राह्मणाशिवाय लग्न करणे ही गोष्ट अत्यंत अमंगळ आणि धर्मद्रोही आहे; इतकेच नव्हे तर ती कुळाला आणि समाजाला काळिमा लावणारी आहे, असे सांगून त्यांनी त्या अज्ञानी लोकांना चिडविले.

त्या मुलीची आई जोतीरावांची पत्नी सावित्रीबाई फुले यांची मैत्रीण होती. त्यामुळे ती आपल्या निर्धारापासून ढळली नाही. हा नियोजित विवाह २५ डिसेंबर १८७३ रोजी साजरा झाला. पानसुपारीचा जो काही खर्च आला तेवढाच. इतका हा साधा अन सुटसुटीत समारंभ होता. त्या समारंभाचा मुख्य भाग असा होता की, वधूवरांनी

५. जाधव, भास्करराव, सत्यशोधक हीरक महोत्सव ग्रंथाची प्रस्तावना, पृ. ६.

एकमेकांशी निष्ठेने वागण्याविषयीच्या फुलेरचित शपथा सर्वांच्या देखत घेतल्या. उपस्थित वऱ्हाडी मंडळीने एक सुरात वधूवरांना आशीर्वाद दिला. सत्यशोधक समाजाचे सभासद बहुसंख्येने ह्या विवाहसमारंभास उपस्थित होते. वधूवरांवर देणग्यांचा वर्षाव झाला. लग्नसमारंभ अगदी सुरक्षितपणे पार पडला.

ब्राह्मण भिक्षुकाशिवाय हिंदू विवाह! खरोखर ही एक मोठी आश्चर्यकारक घटना घडली. ब्राह्मणी दृष्टीने जोतीरावांकडून घडलेला हा गुन्हा पहिलाच असल्यामुळे माफ करण्यात आला. परंतु सत्यशोधक समाजाच्या पद्धतीने दुसरा विवाह करण्याचे जोतीरावांनी योजताच त्यांचे प्रयत्न निष्फळ करून त्यांचा नक्षा उतरविण्याचे ब्राह्मण भिक्षुकांनी ठरविले. ग्यानोबा ससाणे नावाच्या गृहस्थाचे लग्न जुळले होते. ब्राह्मण पुरोहिताशिवाय लग्न लावणे हे धर्मबाह्यवर्तन आहे हे त्याच्या लक्षात आणून देण्यासाठी ब्राह्मणांनी ससाणे राहत असेल्या खेड्यात घोडेस्वार पाठविले. त्या खेड्यातील गुंडांनी ग्यानोबा ससाणेला त्या विवाहापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी त्याला ज्ञातिबहिष्काराचा धाकही दाखविला. त्याचे परिणाम वाईट होतील अशी त्याला धमकी दिली.

बिचारा ग्यानोबा ससाणे घाबरून जोतीरावांकडे धावत आला. सामाजिक छळ सोसण्यापेक्षा आपण जन्माचे विधुर राहू असे तो जोतीरावांना कळवळ्याने सांगू लागला. आपल्या तारुण्यदशेपासून जोतीरावांनी असल्या विरोधांना अनेक वेळा तोंड दिले होते. "तुझ्या हक्काचे संरक्षण करावयास इंग्रज सरकार आहे. तू घाबरू नकोस," असे सांगून जोतीरावांनी त्याला धीर दिला. त्यावर ससाणे म्हणाला, "पण सरकारी नोकरीत ब्राह्मणांचा भरणा जास्त आहे." त्यावर जोतीरावांनी अशी ग्वाही दिली की, सरकारी इंग्रज अधिकारी आणि सुधारक ब्राह्मण अधिकारी हे तुझ्या बाजूने उभे राहतील.

दुसऱ्या बाजूने ब्राह्मणांनी जोतीरावांच्या ज्ञातिबांधवांना आणि नातलगांना त्यांच्याविरुद्ध उठविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या चुलतभावाने त्यांच्याविरुद्ध उपाय योजावे असा त्यांनी प्रयत्न केला. जोतीरावांचे चुलतभाऊ आदी मंडळींना त्यांच्या ज्ञातीत विशेषशी किंमत नव्हती. त्यांना वाटले, ब्राह्मणांच्या पाठिंब्याच्या आधारावर आपण जोतीरावांना नमवू. ह्या हस्तकांनी नि भाडोत्री गुंडांनी आपल्या ज्ञातीतील लोकांमध्ये अशी अफवा उठविली की, जोतीराव हे आपल्या लोकांना खिश्चनांच्या जाळ्यात केव्हा अडकवतील, याचा नेम नाही. इतके करून ते थांबले नाहीत. त्यांनी ससाणेच्या विवाहाच्या दिवशी जोतीराव आणि त्यांचे सहकारी यांना ठोकण्याचा घाट घातला. त्याच हेतूने त्यांनी दोन तीन वर्षांच्या मुलामुलीचे लग्न ठरवून ते त्या दिवशीच साजरे करण्याचा व्यूह रचला. पुण्यातील एक नामवंत वकील पोलसानी राजन्ना लिंगू आणि पुण्यातील एक सार्वजनिक कार्यकर्ते गंगाराम भाऊ म्हस्के या दोन वजनदार गृहस्थांकडून जोतीरावांनी त्या ससाणेच्या लग्नाच्या दिवशी पोलीस बंदोबस्त ठेवविला. ससाणेचा विवाह जोतीरावांच्या घरी ७ मे १८७४ रोजी झाला.

वधू पळवून नेण्यात येईल या भीतीने गांगरून जाऊन तिच्या वडिलांनी त्या वधूला विवाहाच्या पूर्वी काही तास जोतीरावांच्या स्वाधीन केली होती. ब्राह्मणांचा आणि ब्राह्मणेतर तरुणांचा बराच मोठा समुदाय हे लग्न पाहण्यासाठी उपस्थित होता. विवाह अत्यंत सरळ आणि साध्या पद्धतीने झाला. खर्च विशेष झालाच नाही. समारंभ मात्र अत्यंत उत्साहाने मंगल वातावरणात पार पडला. बाहेर वातावरण क्षुब्ध झाले होते. जोतीरावांचे महारमांग अनुयायी त्या ठिकाणी मोठ्या संख्येने जमले होते. आपल्या नेत्याच्या आणि कैवाऱ्याच्या रक्षणासाठी ते तिथे डोळ्यात तेल घालून, लोकांच्या हालचालींचे निरीक्षण करीत होते. या विवाहाची खळबळजनक बातमी अनेक वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाली. 'ब्राह्मण पुरोहिताशिवाय हिंदू विवाह' असा त्यांनी मथळा दिला होता.

सर्व पुणे जिल्ह्यात या दोन लग्नांच्या बातमीने ब्राह्मणांची एकच तारांबळ उडाली. ह्या दोन्ही विवाहांचा त्यांनी तीव्र निषेध केला. त्यांनी एकत्र जमून विचारविनिमय केला. ब्राह्मणेतर कार्यकर्त्यांनी मात्र या यशामुळे आपली मान ताठ केली.

कृतिशूर नेत्यांच्या आणि विचारवंतांच्या कृतीने प्रेरित होऊन अनेक लोक त्यांचे अनुकरण करतात. तसेच जोतीरावांच्या बाबतीत झाले. कृष्णराव पांडुरंग भालेकर (१८५० ते १९१०) हे त्या काळचे एक उत्साही, कर्ते व धीट तरुण पुढारी होते. ते आपल्या गटातील कार्यकर्त्यांसहित जोतीरावांना जाऊन मिळाले. पुण्यातील हल्लीचे शिवाजीनगर हे पूर्वीचे भांबुर्डे गाव. ते भालेकरांचे जन्मस्थळ. कृष्णरावांची आई त्यांच्या बाल्यावस्थेतच वारली. वयाच्या सोळाव्या वर्षी कृष्णरावांचे वडीलही कालवश झाले. ते पुण्याच्या जिल्हा न्यायाधिशाच्या कचेरीत नोकरीस होते. ते जातीने फुलमाळीच होते.

वडिलांच्या मृत्यूनंतर साह्याच्या अभावी कृष्णरावांनी आपले शिक्षण सोडले. दोन वर्षांनंतर त्यांनी पुण्यातील जिल्हा न्यायाधिशाच्या कचेरीत नोकरी धरली. दारिद्र्याने पिडलेल्या जनतेविषयी त्यांना अत्यंत कळवळा असे. गरिबांची दुःखे दूर करण्याची त्यांना तळमळ लागून राहिली होती. ह्यामुळे ते सत्यशोधक चळवळीत एक कडवे निर्भय नेते म्हणून प्रसिद्धी पावले. ते कवी आणि संपादक होते. फरडे वक्ते होते. ह्यामुळे ते सत्यशोधक समाजाचे प्रवक्ते बनले.

जोतीरावांच्या कार्याचा प्रभाव पडू लागताच त्यांना अनेक गावांतून मार्गदर्शनासाठी आमंत्रणे येऊ लागली. असेच एक आग्रहाचे आमंत्रण आल्यावरून ते सत्यशोधक समाजाची शाखा उघडण्यासाठी मुंबईस गेले. अनेक महत्त्वाच्या ठिकाणी त्यांनी उपदेशपर व्याख्याने दिली. तेथे त्यांनी गरीब लोकांना सत्यशोधक समाजाचे ध्येय विशद करून सांगितले. कनिष्ठ वर्गातील लोकांनी सत्यशोधक समाजाची तत्त्वे अनुसरून सत्यशोधक समाजाच्या चळवळीस अंतःकरणपूर्वक पाठिंबा द्यावा, अशी त्यांनी त्यांना विनंती केली. ब्राह्मणांच्या मानसिक गुलामगिरीतून कनिष्ठ वर्गाला मुक्त करणे हे

सत्यशोधक समाजाचे ध्येय आहे, असे त्यांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न केला. [कनिष्ठ वर्गांनी कावाडकष्टाचे काम करून पाणक्याचे वा हमालाचे जीवन कंठण्यापेक्षा त्यांनी आपले मानवी हक्क संपादन करून आपली उन्नती करावी असे आपल्या समाजाचे ध्येय आहे], असे त्यांनी विशद करून सांगितले.

सत्यशोधक समाजाच्या कार्यासाठी जोतीराव मुंबईस गेले असताना व्यंकू काळेवार आणि जाया कराडी लिंगू हे मुंबईतील दोघे श्रीमंत ठेकेदार जोतीरावांचे कार्य निकळकळ पाहून त्यांचे भक्त बनले. त्यांच्या परोपकारबुद्धीला वळण देण्याची ती संधी जोतीरावांनी वाया घालविली नाही. ते श्रीमंत गृहस्थ काही दानधर्म करून पुण्य जोडावे म्हणून ब्राह्मणभोजने घालीत असत. त्यांनी ती बंद करून ते पैसे आता कनिष्ठ वर्गातील लोकांच्या शिक्षणासाठी सत्यशोधक समाजाला देणगी म्हणून दिले. नरसू सायबू नावाच्या दुसऱ्या तेलगू श्रीमंत ठेकेदारांनी जोतीरावांना सन्मानदर्शक म्हणून पोशाख अर्पण केला. जोतीरावांनी तो गरिबांना वाटून टाकला. सत्यशोधक समाजाने शिक्षणासंबंधी चालविलेल्या ह्या चळवळीविषयी महाराष्ट्रातील ब्राह्मणेतरांनी त्यांना धन्यवाद दिले.

## .४.

सत्यशोधक समाजाच्या कार्याविषयी 'ज्ञानोदया'मध्ये एक वाचक लिहितो की, 'ज्ञानोदय होऊ लागल्यामुळे मतलबी ग्रंथकारांचा लोप होऊ लागला आहे. आपले हक्क कोणते, परस्परांनी कोणत्या नात्याने वागावे, चांगले काय वाईट काय, हे लोकांना कळू लागले आहे. असे जे काम करतात त्यांपैकीच सत्यशोधक समाज हा होय. त्याचे पुढारी रा. रा. जोतीराव फुले हे होय. काही लोक त्यांना द्रव्यद्वारा मदत करीत आहेत. कामाठीपुऱ्यात राहाणाऱ्या रा. रा. व्यंकू बाळोजी काळेवार यांनी सत्यशोधक समाजास सुमारे बाराशे रुपयांचा छापखाना विकत घेऊन देणगी म्हणून दिला, असे 'सुबोध पत्रिके'वरून कळते. सत्यशोधक समाजास बसण्यास पुरेशी जागा नव्हती. ६ ऑक्टोबर १८७४ रोजी रामभाऊ मनसाराम कॉन्ट्रॅक्टर हे सत्यशोधक सभेत आले आणि त्यांनी रा. रा. फुले यांस अभिवचन दिले की, 'वेताळ पेठेत आमच्या नव्या घराचे काम चालले आहे, ते पूर्ण झाले म्हणजे पुढील दिवाणखाना सत्यशोधक समाजाच्या उपयोगाकरिता देऊ.'[६] वरील वृत्तावरून कळून येईल की, हिंदू समाजामध्ये जे एक मोठे स्थित्यंतर घडून येत होते, त्याचे हे एक प्रतीक होते.

कनिष्ठ जातींतील श्रीमंत आणि वजनदार लोक जोतीरावांच्या ध्वजाखाली गोळा झाले. पोलसानी राजन्ना लिंगू हे त्या लोकांपैकी मोठे वजनदार गृहस्थ होते. हे गृहस्थ तेलगू माळी समाजातील होते. मुंबईमध्ये तेलगू समाजातील माळी लोकांना कामाठी म्हणतात. या तेलगू माळी समाजाने जोतीरावांच्या कार्यात मोठे साह्य केले. रामय्या

---

६. ज्ञानोदय, ५ नोव्हेंबर १८७४.

त्र्यंकय्या आय्यावारू नावाचे एक दुसरे वजनदार गृहस्थ जोतीरावांचे सहकारी झाले. हे श्रीमंत गृहस्थ त्यांच्या चळवळीतील निष्ठावंत कार्यकर्ते होते. जोतीरावांच्या कार्यात ते संकटाच्या आणि झंझावाताच्या काळी त्यांच्या पाठीशी उभे असत.

उपरोक्त तेलगू माळी समाजातील नेत्यांनी जोतीरावांच्या प्रत्येक योजनेला आणि चळवळीला भरवोस असा सक्रिय पाठिंबा दिला. पुण्यातील त्या काळचे सुप्रसिद्ध धनाढ्य गृहस्थ रामशेट बापूशेट उरवणे हे जोतीरावांना येऊन मिळाले. डॉ० अण्णासाहेब नवले यांचेकडील मारुतराव नवले हे एक सत्यशोधक समाजाचे मोठे आधारस्तंभ होते. परंतु सत्यशोधक समाजाच्या चळवळीतील डॉ० विश्राम रामजी घोले यांचे स्थान नि कार्य फार महत्त्वाचे होते. त्या काळी ते सहायक शल्यचिकित्सक होते. आणि नंतर त्यांची नेमणूक महाराज्यपालांचे मानसेवी शल्य-चिकित्सक म्हणून झाली. ते जातीचे गवळी. त्यांचे पणजोबा गोपाळराव घोले हे अंजनवेल येथील किल्ल्यावर पेशव्यांच्या काळी किल्लेदार म्हणून होते. त्यांचे आजोबा संभाजी घोले यांची किल्लेदारी मराठ्यांचे राज्य १८१८ साली संपुष्टात येताच गेली.

विश्राम घोले यांचे वडील रामजी घोले हे सैन्यात सुभेदार होते. विश्राम घोले हे आपल्या तारुण्यात अनेक लहानसहान नोकऱ्या करून शेवटी मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजमधून सहायक शल्यचिकित्साची–असिस्टंट सर्जनची–परीक्षा उत्तीर्ण झाले. अठराशे सत्तरपर्यंत त्यांनी कुमठा येथे साहायक शरीरचिकित्सक म्हणून काम केले. अठराशे चौऱ्याहत्तर साली त्यांची पुणे येथे बदली झाली. सुकार्यास सढळ हाताने जातपात न पाहता निरपेक्ष बुद्धीने साह्य करणारे ते एक मोठे दानशूर गृहस्थ होते. त्यांचे वाचनही दांडगे होते. ते सत्यशोधक समाजाचे एक प्रभावी नेते होते. जोतीरावांच्या अनेक कार्यांत ते मोठे आधारस्तंभ होते. त्यांच्याकाळी ते महाराष्ट्रातील एक नामांकित डॉक्टर आणि थोर नेते होते.

सत्यशोधक समाजाचा पहिला वार्षिक समारंभ मोठ्या थाटाने आणि उत्साहाने साजरा करण्यात आला. त्या वेळी वार्षिक सभेमध्ये कार्यकारी मंडळामध्ये थोडा फेरफार करण्यात आला. नारायण तुकाराम नगरकर यांची कार्यवाह म्हणून निवड झाली; तर भालेकर आणि रामशेट उरवणे यांची कार्यकारी मंडळावर निवड झाली. काही वजनदार ब्राह्मणेतरांना सत्यशोधक समाजाचे सभासद करून घेण्यात आले.

काही तडफदार आणि निष्ठावंत तरुणही जोतीरावांच्या ध्वजाखाली गोळा झाले. त्यांपैकी रामचंद्रराव धामणस्कर, डॉ. संतूजी रामजी लाड आणि नारायण मेघाजी लोखंडे हे प्रमुख होते. धामणस्कर पुढे बडोद्याचे दिवाण झाले. नारायणराव लोखंडे यांनी तर कामगारांची चळवळ सुरू करून भारतातील कामगार चळवळीचे आद्यजनक म्हणून आपले नाव अजरामर करून टाकले आहे. डॉ. संतूजी लाड (१८४१–१९१६) हे धनगर समाजातील आधुनिक काळातील पहिले थोर पुरुष. लाडांचे मूळ गाव पुणे जिल्ह्याच्या हवेली तालुक्यातील चऱ्होली. त्यांचे आजोबा बचाजी हे ठाण्यास

येऊन राहिले. देशावरून बकरी मेंढरे आणून विकणे हा त्यांचा धंदा. संतूजींचा जन्म ठाणे येथे झाला. त्यांचे शिक्षण ठाण्याच्या मिशनऱ्यांच्या शाळेत झाले. पुढे डॉ. कीर्तिकर यांच्या वर्गात त्यांनी डॉक्टरीचा अभ्यास पूर्ण केला.[७] उदरनिर्वाहासाठी जरी त्यांनी काही काळ नोकरी केली, तरी जोतीरावांच्या सत्यशोधक समाजाने जी समाज-क्रांतीसाठी चळवळ केली तिच्यातील ते एक आघाडीवरील नेते होते. त्यांनी कनिष्ठ वर्गाच्या उद्धाराचे कार्य अनेक वर्षे तनमनधन वेचून केले. जोतीरावांच्या सहकाऱ्यांत त्यांचे स्थान लोखंडे नि भालेकर यांच्याइतकेच महत्त्वाचे नि अग्रेसर आहे.

जोतीरावांचे स्नेही सदाशिवराव गोवंडे आणि सखाराम परांजपे हे सत्यशोधक समाजाच्या आरंभी सभासद होते असे म्हणतात. तुकाराम तात्या पडवळ व विनायक-राव भांडारकर हे समाजाचे सभासद नि देणगीदार होते. गणपत सखाराम पाटील, बंडोबा मल्हारराव तरवडे, वासुदेवराव लिंगोजी बिर्जे, डॉ. सदोबा गावडे, देवराव कृष्णाजी ठोसर. विठ्ठलराव हिरवे, लक्ष्मणराव घोरपडे, सिताराम रघुनाथ तारकुंडे, हरिश्चंद्र नारायण नवलकर, रामजी संतूजी आवटे, सरदारबहादूर दर्याजीराव थोरात, धोंडीराम रोडे, पं. धोंडीराम नामदेव कुंभार, गणपतराव मल्हार बोकड, भाऊ कोंडाजी पाटिल-डुंबरे, गोविंदराव काळे, भीमराव महामुनी, माधवराव घाटबळ, दाजीसाहेब यादव पाटील पोळ, सयाजीराव मैराळ कदम राजकोळी, घनःशाम भाऊ भोसले, व भाऊ पाटील शेलार हे सत्यशोधक समाजाचे प्रमुख कार्यकर्ते होते.

सत्यशोधक समाजाच्या कार्याने आणि कळकळीने अनेक विचारवंताचे लक्ष वेधून घेतले आणि त्यांची सहानुभूती मिळविली. सत्यशोधक समाजाला त्याच्या कार्याविषयी धन्यवाद देऊन एका नियतकालिकाने म्हटले की "सत्यशोधक समाजाच्या कार्यापासून मुंबईतील पुनर्विवाह प्रसारक मंडळाने स्फूर्ती घ्यावी, धडा घ्यावा, कित्ता घ्यावा." समाजसुधारणावादी मंडळीतील बोलघेवड्यांना त्याने दिलेला हा टोला आणि टोमणा योग्य होता असे वाटते.

सामाजिक चळवळीतील पुष्कळ नेते हे बोलघेवडे असून केवळ रूढीविरुद्ध निषेध व्यक्त करण्यापलिकडे काही करीत नसत. त्यांच्या अंगी खऱ्या सुधारकांचे नितिधैर्य नव्हते. रानडे हे सुधारकांचे मुकुटमणी, परंतु त्यांच्या भित्र्या आणि पडखाऊ नेतृत्वा-विषयी जोतीरावांनी त्यांची एकदोन वेळा चांगलीच हजेरी घेतली. पहिला प्रसंग माधवराव रानड्यांची बहीण विधवा झाल्यावर ते पुण्यास आले, तेव्हाचा.

माधवराव रानडे १८७१ साली बदली होऊन पुण्यास आले. त्यावेळी त्यांनी आपल्या विधवा बहिणीची करुण कथा जोतीरावांना सांगितली. 'आपल्या भगिनीवर असा हा वाईट प्रसंग आला याविषयी मला दुःख वाटते,' असे जोतीरावांनी रानड्यांचे सांत्वन करताना म्हटले. क्षणभर थांबून जोतीराव पुढे म्हणाले, 'पण रावसाहेब, सुधारकाची

---

७. खराटे, ग. वा., डॉ. संतूजी रामजी लाड, पृ. ५.

बहीण विधवा झाली आहे. या दुर्दैवातून चांगली गोष्ट निष्पन्न करण्यास तुम्हास संधी प्राप्त झाली आहे. जे तुम्ही लोकांना करावयास उपदेश करता तेच स्वतः करून दाखविण्याची देवाने तुम्हांस नामी संधी दिली आहे. धीर करा आणि आपल्या विधवा बहिणीचा पुनर्विवाह करून आपले बोल खरे करा. झगडा केल्याशिवाय कोणतीही चांगली गोष्ट पदरात पडत नाही. सामाजिक सुधारणा आपोआपच घडून येत नसते. ती तुम्ही घडवायची असते. तुम्ही त्यासाठी धैर्य दाखवून आणि त्याग करून लोकांना ती सुधारणा पटवून द्या.' त्यावर रानडे म्हणाले 'जर विधवा बहिणीचा पुनर्विवाह केला, तर माझ्या वडिलांना अपार दुःख होईल आणि पुण्यातील ब्राह्मण माझ्यावर बहिष्कार टाकतील.' त्यावर जोतीरावांनी रानड्यांना खरमरीत उत्तर दिले. ते रागाने म्हणाले, 'रावसाहेब, मग सुधारकाचे ढोंग करू नका.'

माधवराव रानडे यांची हजेरी घेण्याचा दुसरा प्रसंग म्हणजे त्यांची पत्नी १८७३ च्या ऑक्टोबरात मृत्यू पावल्यानंतरचा. पहिल्या पत्नीच्या निधनानंतर रानडे यांनी आपल्या वयाच्या बत्तिसाव्या वर्षी एका अकरा वर्षांच्या मुलीशी विवाह केला. ते ऐकून आणि पाहून सर्व सुधारकांनी आपली तोंडे लपविली. त्या वेळी जोतीरावांनी रानडे यांची, सामाजिक सुधारणेचा विश्वासघात केल्याबद्दल चांगलीच कानउघाडणी केली.

'विविधज्ञानविस्तारा'मध्ये रानड्यांच्या ह्या दुसऱ्या लग्नानंतर सुधारकांविषयी एक स्फुट आले आहे. त्यात मोठ्या दुःखाने असे म्हटले आहे की, 'हिंदुस्थानचे विचारवंत लोक इतक्या अवनतीला आणि अधोगतीला गेले आहेत की, ते सांगण्यास आम्हाला दुःख होते. ×× नी विधवाविवाहाला मोठा तडाखाच दिला आहे, हे आम्ही मान्य करतो. जर जाणते व विश्वविद्यालयातील उच्च पदव्या संपादन केलेले विद्वान आणि आपल्या पिढीतील समाजाच्या नेतृत्वपदी असलेले थोरहृदयी आणि बुद्धिवान पुरुष हे आणीबाणीच्या प्रसंगी वडिलांची विनंती आणि धमकी यांना तोंड देऊ शकत नाहीत आणि आपल्या तत्त्वाप्रमाणे देव, आणि समाज यांच्यापुढे केलेल्या प्रतिज्ञेप्रमाणे सामाजिक सुधारणेवर येणारी संकटे आणि धमक्या यांना तोंड देण्याचे धैर्य दाखवू शकले नाहीत, तर ज्या लोकांचे ते नेते आहेत त्यांची प्रगती कधीच होणार नाही आणि त्यांचे श्रम मुलांच्या खेळण्याप्रमाणे वाया जातील.'[८]

जोतीरावांच्या काळचे दुसरे मोठे समाजसुधारक म्हणजे लोकहितवादी गोपाळराव देशमुख. त्यांनी तर एकदा सनातन्यांना शरणचिठ्ठी देऊन प्रायश्चित्तही घेतले! आपला मुलगा शिक्षणासाठी इंग्लंडला पाठवून आपण धर्मबाह्य वर्तन केले अशी त्यांनी कबुली दिली; इतकेच नव्हे तर, इंग्लंडमध्ये भारतीय आर्थिक व्यवहाराची चौकशी करणाऱ्या मंडळापुढे साक्ष देण्याला सरकारकडून विचारणा होताच त्यांनी ब्राह्मण लोकांच्या बहिष्काराला डरून इंग्लंडला जाण्यास साफ नकार दिला. त्या काळी समुद्रपर्यटन करणे

८ Vol. II, No. 9.

म्हणजे धर्म, जात, कूळ यांना काळिमा लावणे अशी ब्राह्मणांची समजूत होती. असे उक्ती नि कृती यात महान अंतर बाळगणाऱ्या लोकहितवादींना महाराष्ट्रातील आद्य सुधारक म्हणतात, ही एक मोठी गंमत खरी !

आपल्या सामाजिक सुधारणेच्या आचारात लोकहितवादी यांनी घसरगुंडीचा कळसच केला. त्यांनी आपल्या नातवंडांची लग्ने सहाव्या आणि आठव्या वर्षीच केली. लोकहितवादींची भेट होताच निस्पृह आणि निर्भय अशा जोतीरावांनी त्यांची कशी कानउघाडणी केली असेल ही कल्पनाच केलेली बरी.

'नेटिव्ह ओपिनियन' ह्या साप्ताहिकाने गोपाळराव देशमुखांची हजेरी घेऊन त्यांचे वर्णन यथायोग्य शब्दांत केले आहे. 'नेटिव्ह ओपिनियन' म्हणते, 'सुधारक हा शब्द आमच्या मते फार स्वस्त झाला आहे. परंतु हाती असलेल्या दस्तऐवजांचे काळजीपूर्वक अवलोकन करून आमची अशी खात्री झाली आहे की, हे अधिकारी गृहस्थ (गोपाळराव देशमुख) हे सुधारक या पदवीस योग्य आहेत असे आम्हांस वाटत नाही. जसजसे दिवस जातील तसतसे ते अनुभवाने सुधारक होतील अशी आम्ही आशा करतो. परंतु ल्यूथर आणि तुकाराम यांच्या श्रेणीत आम्ही त्यांना मान्यता देण्यापूर्वी त्यांना आयुष्यभर स्वार्थत्याग, अखंड उद्योग आणि चिकाटी दाखवावी लागेल.'[१]

'नेटिव्ह ओपिनियन'ने सांगितलेली ही कसोटी जर भारतातील समाजसुधारकांना लावली, तर त्यांच्यापैकी खऱ्या सुधारकांच्या यादीत किती नावे शिल्लक राहतील ? ज्यांची नावे हाताच्या बोटांवर मोजण्याइतकी राहतील त्यांच्यामध्ये जोतीरावच अग्रस्थानी शोभतील. इमर्सन म्हणत असे की, 'कृतीत उतरले नाही तर सद्विचारांचे मूल्य हे सुखस्वप्नापेक्षा अधिक नाही.' रोमारोलाँ यांनीही तेच सांगितले आहे. विचार म्हणजे कृती आणि कृतीनेच विचाराला मूल्य येते.

जेव्हा कसोटीची वेळ येई त्या वेळी समाजसुधारकांची पाचावर धारण बसे. वासुदेवराव नवरंगे, सदाशिवराव पांडुरंग केळकर, विष्णुशास्त्री पंडित यांनी समाजसुधारणेचे कार्य पुढे रेटण्यासाठी जे धैर्य दाखविले त्यामुळे ते उल्लेखनीय असे अपवाद ठरतात. समाजसुधारणावाद्यांना हाच मोठा शाप होता. 'बोले तैसा चाले,' 'उक्ती तशी कृती,' असे त्यांच्या बाबतीत घडले नाही.

त्यांनी उराशी उच्च ध्येय बाळगले होते हे खरे. सुट्टीच्या दिवशी सामाजिक समतेवर आणि आत्मोन्नतीच्या तत्त्वज्ञानावर ते सुमधुर आख्याने लावीत आणि व्याख्याने देत. परंतु समाजातील बहुसंख्य लोकांच्या प्रश्नांसंबंधी ते उदासीन असत. आपल्या मुलामुलींची लग्ने बापाच्या, आईच्या वा पत्नीच्या आग्रहास्तव बाल्यावस्थेतच उरकून घेऊन किंवा मुंजीसारखे समारंभ करून आपल्या सुधारणावादाला काळिमा लावीत. त्यांच्या

१. विविधज्ञानविस्तार, पुस्तक ११, अंक ११, पृ. २३६.

ह्या तत्त्वभ्रष्ट वर्तनामुळेच विष्णुशास्त्री चिपळूणकर व लोकमान्य टिळक हे निर्दयपणे त्यांच्यावर कडाडून हल्ला चढवीत. त्यांच्या सुधारणावादाची टर उडवीत.

समाजसुधारकांच्या या दयनीय उदाहरणाला विष्णुशास्त्री पंडित हे मोठे अपवाद ठरतात. ते पट्टीचे विद्वान होते. चारित्र्याने विमल होते. हाती घेतलेल्या कार्यावर त्यांचा अढळ विश्वास होता. 'बोले तैसा चाले' अशा बाण्याचा हा सुधारकांचा एकच मोठा पुढारी होता. जेव्हा सामाजिक चळवळीशी त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रतारणा केली तेव्हा विष्णुशास्त्र्यांनी मोठ्या धैर्याने आपल्या पत्नीच्या मृत्यूनंतर एका विधवेशी १८७४ च्या डिसेंबरमध्ये पुनर्विवाह केला. यामुळे विष्णुशास्त्री पंडितांची त्यांच्या शत्रूंनी आणि मित्रांनी सारखीच प्रशंसा केली आहे. त्या प्रशंसेस ते सदैव पात्र ठरतात.

समाजसुधारकांच्या कार्याविषयी जोतीराव सहानुभूती दाखवीत असत. अडचणीच्या वेळी त्यांना साह्यही करीत. तथापि त्यांच्या सामाजिक कार्यावर त्यांचा फारसा विश्वास नव्हता. कारण त्यांच्या समाजसुधारणेच्या चळवळीचे उद्दिष्ट आणि व्याप्ती ब्राह्मण समाजापर्यंतच होती. माधवराव रानडे यांच्या आमंत्रणावरून स्वामी दयानंद सरस्वती हे १८७५ च्या जुलैमध्ये मुंबईहून पुण्यास गेले. पुण्यास जाण्यापूर्वीच त्यांनी मुंबईस आर्यसमाजाची स्थापना केली होती. या द्रष्ट्या पुरुषाने सर्व उत्तर हिंदुस्थान व बंगाल यांत विजयी दौरे काढले होते. अनेक संस्थांवर आणि व्यक्तींवर त्यांनी आपला प्रभाव पाडला होता. आपल्या तेजस्वी संदेशाने त्यांनी हिंदूंना पुनरुज्जीवनाची स्फूर्ती दिली होती. दयानंद सरस्वती यांनी 'जातिभेद मोडून अस्पृश्यतेचा नायनाट करा' अशी हिंदूंना शिकवणूक देऊन धार्मिक आणि सामाजिक चळवळ सुरू केली होती. तथापि वेदांत सर्व काही ज्ञान आहे अशी त्यांची समजूत असल्यामुळे वेदांच्या पलीकडे ज्ञान आहे असे त्यांना वाटेना. मुसलमानांना जसे कुराणाच्या पलीकडे ज्ञान नाही असे वाटते; तसेच दयानंदानाही वेदाच्या पलीकडे ज्ञान नाही असे वाटे.

महाराष्ट्रात जातिभेदाचा प्रभाव अधिक होता. त्यामुळे आर्य समाज तेथे मूळ धरू शकला नाही. पेशव्यांच्या ब्राह्मणी राज्यामुळे तेथील जातिभेदाची बंधने अधिक कडक झाली होती. दयानंदांचा वैदिक धर्म जनसमूहाला समजला नाही. तसेच प्रार्थना समाजाची शिकवण महाराष्ट्रातील जनतेपर्यंत पोहोचली नाही. ह्यानंतर जवळजवळ आठ वर्षांनी प्रार्थना सभाजाचे प्रमुख तत्त्वज्ञानी माधवराव रानडे यांनीच ग्वाही दिली की, ब्राह्म समाज हा हिंदु धर्माचा एक भाग आहे.[१०]

पुण्यातील सनातन्यांना, प्रतिगामी वृत्तीच्या पुढाऱ्यांना समाजसुधारणेच्या भीतीचे मधूनमधून झटके येत असत. जो जो सामाजिक स्थित्यंतर, सुधारणा, नवीन ज्ञान, अस्पृश्यतानिवारण, सामाजिक न्याय आणि सामाजिक समता ह्या तत्त्वांच्या बाजूने उभा राहील तो तो हिंदुधर्माचा आणि हिंदुस्थानचा शत्रू आहे असा ते टाहो फोडीत

---

१०. सुबोध पत्रिका, २१ फेब्रुवारी १८८१.

त्याचा त्याचा धिक्कार करीत. पुण्यात दयानंदांची अनेक व्याख्याने झाली. पुण्यातील सनातनी पंडितांना मात्र दयानंदांच्या संस्कृत भाषेत आणि तत्त्वज्ञानात काही दोष दिसले. त्या द्रष्ट्याचा आणि ज्ञानी पुरुषाचा आवाज पुण्यात बरेच दिवस अहोरात्र घुमत राहिला होता. त्यानंतर सातारा येथेही त्यांची व्याख्याने झाली.

अशी बरेच दिवस व्याख्याने झाल्यानंतर दयानंदांची मोठ्या समारंभपूर्वक मिरवणूक काढावयाची असे पुण्यातील सुधारकांनी ठरविले. पुण्यातील सनातनी आणि प्रतिगामी लोकांनी ती मिरवणूक उधळून लावायची असे ठरविले. या लढाईला ५ सप्टेंबर १८७५ रोजी तोंड फुटले. आदल्या दिवशी सुधारकांनी जोतीरावांकडे जाऊन साह्याची विनंती केली होती. दयानंदांच्या सामाजिक समतेचे तत्त्व आणि त्यांचा अस्पृश्यता-निवारणाचा झगडा या दोन गोष्टी जोतीरावांच्या जीवितकार्याशी निगडित होत्या. जरी कनिष्ठ वर्गातील लोकांपर्यंत दयानंदांचा संदेश पोहोचला नाही, तरी जोतीरावांनी समाज-सुधारकांना दयानंदांच्या मिरवणुकीसंबंधी आपल्या लोकांनिशी साह्य करण्याचे ठरविले.

सुशोभित केलेल्या एका हत्तीवर दयानंदांना बसविण्यात आले. पालखीमध्ये पवित्र ग्रंथ ठेवण्यात आले. ताशे, वाजंत्री, शंख, भेरी मिरवणुकीच्या अग्रभागी वाजत आणि गर्जत चालली होती. जोतीरावांनी त्या मिरवणुकीमध्ये स्वतः भाग घेतला होता. ते आणि रानडे इतर समाजसुधारकांच्या बरोबर मिरवणुकीत चालत होते. जोतीरावांचे अनुयायी समाजसुधाकांचे संरक्षण करण्याकरिता त्या मिरवणुकीत मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुण्यातील सनातन्यांनी आणि त्यांच्या गुंडांनी ही मिरवणूक नीट अन् बिनघोक जाऊ द्यावयाची नाही असे ठरविले होते. त्यांनी त्याच दिवशी एक गाढव शृंगारून तयार ठेवला. त्यांचे नाव गर्दभानंद असे ठेवले. त्या गर्दभानंदाच्या पाठून हे सनातनी शहाणे धर्ममार्तंड आणि त्यांचे गुंड मिरवणुकीने निघाले. दयानंदांची मिरवणूक ठरलेल्या ठिकाणी पोहोचते न पोहोचते तोच ती गर्दभानंदाची मिरवणूक तेथे पोहोचली. आणि तेथे गुंडांनी नि गाढवाने गोंधळ केल्यामुळे मारामार जुंपली. माधवराव रानड्यांनी अगोदर पोलीसबंदोबस्ताचीही व्यवस्था केली होती. पोलिसांनी लाठीमार करताच लोकाची पांगापांग झाली. गाढव आणि त्याचे नंद यांना पळता भुई थोडी झाली.

माधवराव रानडे जोतीरावांचे स्नेही होते. रानडे हे डॉ० बाबासाहेब आंबेडकर यांचे वडील रामजी सकपाळ यांचेही स्नेही होते. डॉ० आंबेडकर हे जोतीरावांना बुद्ध आणि कबीर ह्यांच्या बरोबरीने आपला तिसरा गुरु मानीत. दुसऱ्या मनुष्यातील मोठेपणा समजण्यास स्वतःच्या व्यक्तिमत्वामध्ये मोठेपणा असावा लागतो. जोतीरावांच्या ठायी असलेले मोठेपण रानड्यांनी ओळखले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पुढे दोन तपे हिंदुस्थानातील सनातन्यांशी अस्पृश्यतेच्या निर्दालनासाठी व सामाजिक समतेसाठी मोठा लढा केला.

दयानंद सरस्वतींचे जीवितकार्य आणि त्यांचा मोठेपणा महाराष्ट्रातील तीन वैचारिक नेत्यांनी ओळखला. समाजातील अन्यायी प्रवृत्तींचा निषेध करणारे लोकहितवादी

गोपाळराव देशमुख हे त्यांपैकी पहिले होत. उत्क्रांतिवादी समाजसुधारक माधवराव रानडे हे दुसरे होत. देशात सामाजिक समतेची क्रांती घडवून आणलीच पाहिजे असे म्हणणारे वीर सावरकर हे तिसरे समाजक्रांतिकारक होत. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी संकुचित वृत्तीचे धोरण स्वीकारले. पण या तिघांची सामाजिक दृष्टी न्यायप्रिय आणि उदारवृत्तीची होती.

. ५ .

मध्यंतरीच्या काळात रामचंद्र हरी शिंदे आणि कृष्णराव भालेकर यांच्यासमवेत जोतीरावांनी पुणे कमर्शियल आणि कॉन्ट्रॅक्टिंग कंपनी काढली. ह्या कंपनीने पुण्या-जवळील खडकवासला कालव्याच्या उजव्या बाजूच्या कामाला दगड पुरविण्याचा ठेका मिळविला. या कामात त्यांना बराच नफा झाला.

अठराशे पंचात्तर साली सत्यशोधक समाजाचा दुसरा वार्षिक समारंभ साजरा कर-ण्यात आला. त्या वेळी जोतीरावांनी समाजाचे अध्यक्षपदाची धुरा समाजाचे एक प्रभावी व तरुण नेते डॉ० विश्राम रामजी घोले यांच्या खांद्यावर दिली. कोषाध्यक्षपद रामशेट उरवणे यांना दिले. जो नेता खरा संघटक असतो तो आपल्या चळवळीतील तेजस्वी तरुणांना स्फूर्ती देऊन जबाबदारीने काम करण्याची संधी देतो. तरुण कार्यकर्त्यांच्या कर्तृत्वशक्तीचा वा बुद्धीचा तो हेवा करीत नाही. अशा खऱ्या नेतृत्वापैकीच जोतीरावाचे नेतृत्व होते. त्या वर्षी इलैया सालोमन नावाच्या एका ज्यूला कार्यकारी मंडळाचा सभासद करून घेतलेले होते. वार्षिक समारंभ यशस्वी रीतीने पार पडला. त्या सुमारास अहमदाबाद येथे नदीला पूर येऊन तेथील लोकांचे अतोनात नुकसान झाले होते. सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांनी तेथील लोकांच्या साह्यार्थ काही निधी गोळा करून अहमदाबादला पाठविला.

सत्यशोधक समाजाचे सभासद प्रत्येक रविवारी संध्याकाळी जमत असत. प्रत्येक पंधरवड्यात एका शनिवारी तत्त्वप्रचारासाठी कार्यकर्ते तयार व्हावेत म्हणून त्यांच्यापुढे व्याख्याने होत असत. त्यांना वक्तृत्वकलेची शिकवण देण्यात येत असे. अठराशे पंचात्तरच्या नोव्हेंबर महिन्यात इंग्लंडच्या राजपुत्राने पुण्यास भेट दिली. त्या वेळी सत्यशोधक समाजाच्या एका सभेत धोंडीराम नामदेव कुंभार आणि कृष्णराव भालेकर यांनी राजपुत्राच्या सन्मानार्थ गीते गायिली.

सत्यशोधक समाजाने जोतीरावांचे 'गुलामगिरी' व 'ब्राह्मणांचें कसब' ह्या दोन ग्रंथांच्या प्रती हिंदी संस्थानिक आणि समाजातील प्रतिष्ठित लोक यांना विनामूल्य पाठविल्या. जोतीरावांनी आपल्या उपरोक्त ग्रंथांच्या प्रती सत्यशोधक समाजाला देणगी म्हणून दिल्या होत्या. अनेक लोकांना आणि संस्थानिकांना आपल्या संस्थेची घटना नि नियमही पाठविले होते. वार्षिक सभेच्या वेळी मुंबई वरिष्ठ न्यायालयातील भाषांतरकार राघवेंद्र-राव रामचंद्रराव त्यांनी समाजाला योग्य तो सल्ला दिल्याबद्दल त्यांचे आभार मानले.

सत्यशोधक समाज जी लग्ने करीत असे ती कायदेशीर होती असा सल्ला राघवेंद्रराव रामचंद्रराव यांनी सत्यशोधक समाजाला दिला होता. राघवेंद्ररावांचे मत महाराष्ट्रातील सत्यशोधक समाजाच्या सर्व शाखांना कळविण्यात आले होते.

सत्यशोधक समाजाचे ध्येय कनिष्ठ वर्ग तसेच शेतकरी आणि कामगार यांच्या उद्धाराचे असल्यामुळे त्यांचे विचार आणि कार्यही याच वर्गाच्या प्रश्नांशी निगडीत असे.

ह्याच काळात सत्यशोधक समाजाने एक निबंधस्पर्धा जाहीर केली. त्यासाठी दोन बक्षिसे ठेवली. 'हिंदी शेतकीची सुधारणा कशी करता येईल?' हा निबंधाचा विषय होता. ब्रिटनमधील शेतकी–पद्धती लक्षात घेऊन हा निबंध लिहावयाचा होता. या निबंधावरून सत्यशोधक समाजाचे कार्य कोणत्या पद्धतीने चालले होते आणि त्या समाजाचा नेता जोतीराव यांचा दृष्टिकोण कसा व्यापक आणि विधायक नि आर्थिक दृष्ट्या कसा महत्त्वाचा नि मूलगामी होता याची कल्पना येते. पुण्यातील सत्यशोधक समाजाने पुण्यातील कनिष्ठ वर्गातील मुले रस्त्यांतून गारुड्यांचे खेळ बघत वा तमाशे पाहत भटकू नयेत म्हणून अशा मुलांवर देखरेख करण्यासाठी एका शिपायाची नेमणूक केली. त्या शिपायाचे काम त्या मुलांना शाळेत नेऊन बसविणे हे होते.

जोतीराव जसे सार्वजनिक ठिकाणी उपदेशपर भाषणे करीत, तसेच ते शाळांतील शिक्षकांना आदर्श पाठ देऊन शिक्षकांनी मुलांच्या हिताच्या दृष्टीने योग्य ती साधने नि उपकरणे वापरावी म्हणून शिक्षकांनाही उत्तेजन देत असत. स्थापत्यशास्त्र महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडे सत्यशोधक समाजाने एक अर्ज केला. त्या महाविद्यालयामध्ये काही प्रमाणात गरीब ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांना निःशुल्क शिक्षण द्यावे, अशी त्यांनी प्रार्थना केली होती. त्या अर्जातील त्यांचा हेतू सफल झाला.

अठराशे शहात्तर सालच्या मे महिन्यात एक खास वक्तृत्वस्पर्धा ठेवण्यात आली. त्यासाठी दोन विषय ठेवले होते. 'मूर्तिपूजा उपयुक्त आहे किंवा कसे?' आणि दुसरा विषय 'जातिभेद आवश्यक आहे किंवा कसे?' यशस्वी उमेदवारांना बक्षिसे देण्यात आली. पुण्यातील सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांनी ग्रामीण भागात शिक्षणाचे लोण पोचविण्यास सुरुवात केली. त्यांनी पुण्याजवळील हडपसर गावी एक शाळा काढली. हडपसर हे सत्यशोधक समाजाचे एक मोठे केंद्र बनले. कनिष्ठ वर्गातील पाच टक्के विद्यार्थ्यांना निःशुल्क शिक्षण द्यावे, असे शिक्षणखात्याचे संचालक चेटफिल्ड यांनी सरकारी शाळांना जे आज्ञापत्रक काढले होते त्याविषयी चेटफिल्ड साहेबांचे सत्यशोधक समाजाने आभार मानले. सत्यशोधक समाजाच्या कार्याविषयी आपुलकी दाखवून त्या कार्याला प्रसिद्धी देणाऱ्या 'सत्यदीपिके'ला, 'सुबोधपत्रिके'ला, आणि 'ज्ञानप्रकाशा'ला धन्यवाद देण्यात आले. सत्यशोधक समाजाने चालविलेल्या शिक्षणकार्याच्या प्रसारासाठी हरिरावजी चिपळूणकर यांनी जे मोठे साह्य केले त्याबद्दल त्यांना धन्यवाद देण्यात आले. त्यांच्या ह्या औदार्याची दखल घेऊन हिंदी संस्थानिक त्यांचे अनुकरण करतील, अशी आशा व्यक्त करण्यात आली. समाजाचे सभासदांची संख्या २३२ वरून ३१६ पर्यंत गेली.

सत्यशोधक समाजाच्या कार्यालयासाठी जागा मिळविण्यात आली. रामचंद्र मनसाराम धावरेनाईक या पुण्यातील ठेकेदाराने आपली मोठी इमारत महिना दहा रुपये भाड्याने समाजाच्या कार्यासाठी दिली. हरि गणेश पटवर्धन तथा अण्णासाहेब सांगलीकर या ब्राह्मण दात्यांनी कनिष्ठ वर्गातील लोकांच्या उद्धारासाठी चाललेल्या कामाकडे लक्ष देऊन जे साह्य केले, त्याविषयी त्यांची सत्यशोधक समाजाने मनःपूर्वक प्रशंसा केली. जाया करडू लिंगू आणि तुकाराम तात्या पडवळ यांनी समाजाने चालविलेल्या शिक्षणप्रसाराच्या कार्यासाठी जी देणगी दिली त्याविषयी त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानण्यात आले.

जाया एल्लापा लिंगू हे सत्यशोधक समाजाचे मोठे अभिमानी व देणगीदार होते. त्यांच्या मृत्यूविषयी एक ठराव करून समाजाने दुःख व्यक्त केले. कनिष्ठ वर्गातील गरीब विद्यार्थ्यांसाठी ग्रामीण भागात एक वसतिगृह बांधून त्यात त्यांची जेवणाची व राहण्याची सोय व्हावी म्हणून एक वसतिगृह स्थापण्यासाठी कोणते प्रयत्न करावे याचा विचार करण्यासाठी गंगाराम भाऊ म्हस्के, जोतीराव, राजन्ना लिंगू, लक्ष्मण हरी शिंदे आणि विनायकराव भांडारकर यांची एक समिती नेमण्यात आली. व्यंकू बाळोबा काळेवार, रामय्या व्यंकय्या आय्यावारु ह्या दोघा उदार सत्यशोधक नेत्यांनी एक मुद्रणालय खरेदी करून पुण्यातील सत्यशोधक समाजाच्या स्वाधीन केले. परंतु काही मतभेद झाल्यामुळे मुंबईतील कार्यकर्त्यांकडे ते परत पाठविण्यात आले.

सत्यशोधक समाजाच्या १८७६ सालच्या प्रतिवृत्तात 'कनिष्ठ वर्गातील शिक्षण प्रसाराच्या कार्याला त्या वर्गातील सधन लोकांनी साह्य करावयास पुढे यावे' असे कळकळीचे आवाहन केले होते. इंग्रज राजवटीत शिक्षणाची चालून आलेली संधी जर कनिष्ठ लोकांनी वाया घालवली, तर त्यांच्या मुलांना भावी काळात अत्यंत खडतर जीवन जगावे लागेल, असा त्यांना इशारा देण्यात आला.

# १२

## प्रतिगाम्यांचा प्रतिहल्ला

पुणे नगरपालिकेच्या मंडळावर कनिष्ठ वर्गांचे प्रतिनिधी नसल्यामुळे त्यांच्या सुखसोयींकडे व गाऱ्हाण्यांकडे नगरपालिका लक्ष देत नाही, असे जोतीरावांनी मत व्यक्त केले होते. त्या नगरपालिकेच्या पाणीपुरवठाखात्यातील अधिकारी ब्राह्मण असल्यामुळे तो ब्राह्मणांच्या वसतींना पाण्याचा भरपूर पुरवठा करीत असे. गरिबांच्या वसतींना कमी पुरवठा व्हावयाचा. पाण्याचे दुर्भिक्ष ही नेहमीचीच ओरड असावयाची. पाणीपुरवठा, उजेड आणि आरोग्य यांची व्यवस्था वरिष्ठ वर्गांच्या सोयीच्या दृष्टीनेच होत असलेली आढळायची. नगरपालिकेच्या समितीवर आता जोतीराव नियुक्त झाले होते.

(पुणे नगरपालिका १८५० च्या नगरपालिका कायद्यान्वये १ जून १८५७ रोजी जरी स्थापण्यात आली होती,)तरी तिचे प्रत्यक्ष काम २० मे १८५८ पासून सुरू झाले. सर्व सभासद सरकारनियुक्त असत. पुढे महाराज्यपाल लॉर्ड रिपन ह्यांनी १८८२ सालच्या स्थानिक स्वराज्य कायद्याप्रमाणे निवडणुकीचे तंत्र अमलात आणले. जोतीराव १८७६ ते १८८२ सालपर्यंत पुणे नगरपालिकेचे सभासद होते.

सत्यशोधक समाजाच्या १८७६ चे वार्षिक प्रतिवृत्त वृत्तपत्रांकडे १८७७ च्या मार्च

महिन्यात पाठविण्यात आले. महाराष्ट्रातील प्रमुख मासिके आणि नियतकालिके यांनी त्यांची दखल घेतली.

सत्यशोधक समाजाच्या कार्यावर अभिप्राय देताना 'विविधज्ञानविस्तारा'ने असे म्हटले की, "ही संस्था इतक्या थोड्या काळात झाली हे समाजास समाधान वाटण्याजोगे आहे. तसेच तीन वर्षेपर्यंत समाज सजीव राहून उमेदीने शूद्र लोकांचे विद्यावृद्धीकडे लक्ष देत आहे, हेही या समाजाचे पुढारी लोकांस भूषणावह आहे. नाही तर आमच्याकडे 'समाज' 'सभा' 'कंपनी' 'असोशिएशन' वगैरे नावांच्या लहान पोरांपासून तो थोरांपर्यंत अनेक लोकांच्या सभा पावसाचे पाखरांप्रमाणे क्षणात उत्पन्न होऊन दोन गिरक्या मारून निर्ध्वस्त होतात. व पुढे मागे त्यांचा मागमूसही राहत नाही. आता आमची ही स्थिती प्रस्तुतची आहे असे नाही. आमचे गुणवर्णन पूर्वीच कोणी एका कवीने 'आरंभशूराः खलु दक्षिणात्याः' असे म्हणून करून ठेविले आहे, ते बहुतेकांस माहीत असेलच. या समाजाच्या मागून पुणे येथे जन्मास आलेले समाज लयास गेले अशी वदंता असता हा समाज अद्याप कायम आहे; इतकेच नव्हे तर वृद्धिंगत होत आहे व त्याचे स्तुत्य व सत्य उद्देश समजून बाहेरगावची मंडळी सभासद होत आहे हे या सत्यशोधकांस भूषणास्पद आहे."

"आता हे भूषण कायम राखणे सभासदांकडे आहे. कोणत्याही कामात पहिली ताजी उमेद तशी पुढे राहत नाही हे खरे, परंतु ती तशी राखणे हे सर्वांचे कर्तव्य होय...कोणत्याही सभेच्या सभासदांनी सभासद होण्यापूर्वी पूर्ण विचार करावा व एकदा सभासद झाल्यावर मागेपुढे पाहणे किंवा अंग चोरणे हे रास्त नाही. कारण सोंग घेईतोपर्यंत विचार करावा. एकदा घेतल्यावर मग जितकी उत्तम वतावणी होईल तितकी करावी हा प्रशस्त मार्ग. नाहीतर थोरवी मिरविण्याकरिता प्रथमतः सभासद होऊन मागाहून प्रायश्चित्त घेणे, स्वीकृत कार्यातून अंग काढून घेणे, किंवा वेळ घेतल्यावर आपण त्या गांवचेच नाही असे दाखविणे ही सज्जनाचाराविरुद्ध कार्ये होत. अस्तु."

तथापि 'विविधज्ञानविस्तार' कर्त्यांनी सत्यशोधक समाजाचा ब्राह्मणांवरील रोख पाहून आपली नापसंती व्यक्त केली. "आता याशिवाय आणखीही काही कामे समाजाने हाती घेतली आहेत ती काही फायदेशीर आहेत असे आम्हांस वाटत नाही. त्यांतील कित्येक तर अहितकारक आहेत असा आमचा ग्रह आहे. आजच्या आपल्या देशस्थितीकडे पाहिले असता एकीची जितकी जरूरी दृष्टीस पडते तितकी दुसऱ्या कोणत्याही गोष्टीची नाही हे कोणीही कबूल करील. सत्यशोधक समाजवादी आपण शूद्र आहोत असे म्हणण्याने आपण हिंदुधर्मबाह्य नाही हे आपणच ग्रहण करीत असता, जर हिंदुधर्मा-विरुद्ध आचरण करितात तर त्यांचे व शुद्ध हिंदूंचे कितपत मेतकूट जमेल!"

"आमच्या मते तर जर एकीचे काही वारे असेल तर तेही दूर होणार. त्यामुळे होणारा परिणाम अनिष्ट आहे हे त्यांस विचार करतील तर स्पष्टपणे कबूल करावे लागेल. एकी होण्याची जी इतर अनेक साधने आहेत त्यांत धर्माप्रमाणे बलवत्तर कोणचेच

साधन नाही. हे सिद्ध करण्यास जगाचा इतिहास कंबर बांधून तयार आहे."

"धर्मासारखा दृढबंध अन्य फार थोडा, असे असता तो बंध तोडून शूद्र जातीचे एकंदर कल्याण हा सत्यशोधक समाज कसा करू पहातो हे आमच्या तरी निदान ध्यानात भरत नाही. आम्हांस असे वाटते की जर हा समाज नांवाप्रमाणे वागत असता तर सर्वांचे कल्याणाचे साधन एकी आहे व एकीस धर्म हे मुख्य कारण आहे, हे सत्य सकृतदर्शनीच त्यास सापडले नसते असे नाही. तसेच दुसरे एक सत्य त्यांस सहज दृष्टीस पडले असते; ते हे की, जगात म्हणून जितके धर्म आहेत व जितके नवीन धर्म एक मनुष्य किंवा समुदाय आपल्या बुद्धीने काढील तितक्यातून एकही निर्दोष व निर्गुण असा सापडणार नाही. काहीत काही दोष व गुण आहेतच. आजवर हजारो विद्वान, समंजस, सुज्ञ, चतुर म्हणून अनेक धर्मपंथ उपस्थित केले, परंतु एकही निर्दोष सापडत नाही. सर्वांवर प्रतिपक्षांच्या कोट्या आहेतच. मग स्वधर्मत्याग करून परधर्म स्वीकारणे किंवा नवीन एक पंथ काढणे काही विशेष हितकर नसून बरेच अनिष्टकारक आहे. आगीतून निघून फोफाट्यात पडणे हे कसे हितावह असेल ते असो."

"सारांश, असल्या प्रकारची सहज दृष्टीस पडणारी सत्ये सोडून कोणत्या प्रकारचे सत्याचा शोध समाज करीत आहे याचा या रिपोर्टावरून काही पत्ता लागत नाही. आमची या समाजास अशी सूचना आहे की त्याने नावाप्रमाणे काही कृती ठेवावी अगर कृतीप्रमाणे काही दुसरे नाव घ्यावे...सत्यशोधक समाजाच्या स्थापण्याचा उद्देश पुष्कळसे शब्द घालून गूढ करून टाकला आहे. कदाचित लिहिणाराचे मनात तो उद्देश स्पष्ट असेल, परंतु स्पष्ट कळेल असा लिहिला नाही. आता आम्हांला जो काही कळला आहे त्यावरून असे वाटते की समाज-स्थापना जितक्या विचाराने व्हावी तितक्या विचाराने झाली नाही, हे एक व दुसरे हिंदुधर्माचा मोड करून परधर्मांची सोयीसोयीने वृद्धी करावी व तिसरे ब्राह्मणादी ज्ञाती व इतर ज्ञाती यांमध्ये द्वेष उत्पन्न करावा, हे शेवटले ब्राह्मणांस व तद्ग्रंथास दुःसह विशेषण पुष्पांजली वाहिली आहे त्यावरून स्पष्ट होते."[1] वरील विचारसरणी अनेक शतके गरिबांच्या मनावर बिंबविण्यात येत होती हे जोतीरावांना माहीत होते. समाजातील वरिष्ठ वर्ग नेहमी गरिबांना एकीच्या आणि धर्माच्या नावाखाली असाच पिळून व दडपून टाकतो. जे पिळले जातात त्यांनी पिळवणूक करण्याच्याविरुद्ध ओरड करू नये, अशीच त्यांची सदा भावना असते. 'विविधज्ञानविस्तार' कर्त्याने सत्यशोधक समाजाच्या वृत्तांतातील भाषेत चुका आहेत असे सांगून ब्राह्मण पुरोहित हे भिक्षुक असून शूद्र त्यांचे धनिक होत, अशी सारवासारव केली आहे.

'विविधज्ञानविस्तारा'च्या संपादकाच्या घरी व्याकरण पाणी भरीत असले, तरी जोतीरावांच्या सत्यशोधक समाजाच्या कार्यातील आशय समजण्याइतके त्यांचे मन

१. विविधज्ञानविस्तार, पुस्तक ९, अंक ३, ३ मार्च १८७७.

न्यायप्रिय नि उदार नव्हते. कनिष्ठ वर्गाची अवनतावस्था आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा युगानुयुगे झालेला तेजोभंग ह्याचे ज्ञान व्याकरणाने होत नसते. तिचे ज्ञान होण्यास मानवी सहानुभूती आणि विशुद्ध बंधुभावना यांचा विचारवंताच्या ठायी संगम झालेला असणे आवश्यक असते. धर्माच्या आणि राष्ट्रीय एकतेच्या नावाखाली वरिष्ठ समाजातील तथाकथित विचारवंत, गरिबांची गाऱ्हाणी आपल्या भाषेच्या फुलोऱ्याने अप्रत्यक्षपणे दडपून टाकून त्यांची गळचेपी करीत असतात. त्यांना अन्यायाच्याविरुद्ध आवाज उठवू देत नाहीत. सामाजिक न्यायाकरिता त्यांनी मारलेली आरोळी आपल्या शब्द-जंजाळात व तर्कटात ते गुदमरून टाकतात.

जोतीरावांच्या सत्यशोधक समाजावर हल्ला चढविण्यास दुसरे एक महारथी पुढे सरसावले. ते आपणांस हिंदुधर्माच्या रूढी व हिंदुधर्म परंपरा यांचे शास्त्रीपंडित समजून स्वतःस मराठी भाषेचे शिवाजी मानीत. मूर्तिभंजकाच्या आवेशाने त्यांनी जोतीरावांवर हल्ला केला. त्या महारथीचे नाव विष्णुशास्त्री चिपळूणकर. त्यांचा जन्म १८५० साली पुण्यास एका नामांकित शास्त्री कुटुंबात झाला. त्यांना नष्ट झालेल्या पेशव्यांच्या राज्याचा ध्यास अहोरात्र लागून राहिला होता.

विष्णुशास्त्र्यांच्या विचारसरणीत उजेडापेक्षा उष्णता अधिक होती. विचारापेक्षा विकारच अधिक होता. सरकारी माध्यमिक शाळेत आपली भाषाशास्त्राची भवानी परजत असता, त्यांनी १८७४ च्या जानेवारीत निबंधमाला सुरू केली. इंग्लंडातील 'स्पेक्टेटर'मधील ॲडिसन व जॉन्सन यांची जोरदार आणि वाक्प्रचुर भाषाशैली हा निबंधमालेचा आदर्श. लेखक म्हणून चिपळूणकरांचे कर्तृत्व आणि शक्ती अजोड होती. त्यांनी आपल्या देशाभिमानी विचारांनी सुशिक्षित तरुणांमधील देशाभिमानाच्या भावनेला जोराची चालना दिली आणि देशोद्धाराची कामे तरुणांनी हाती घ्यावी अशी त्यांना स्फूर्ती दिली हे खरे. त्यांनी महाराष्ट्रातील सुशिक्षित तरुणांना ज्वलंत देशाभिमानाची दीक्षा दिली आणि मायभूमीच्या विमोचनासाठी त्यांना उभे केले. त्यांच्या देशाभिमानी लेखनापासून स्फूर्ती घेतलेल्या तरुणांनी, देशाचे पुनरुज्जीवन करण्यासाठीं इतिहास, शिक्षण, उद्योग आणि वाङ्मय—ह्या क्षेत्रांत त्यागाने आणि निष्ठेने काम करावयास आरंभ केला.

तथापि, चिपळूणकरांच्या लेखनांतील विचारांचा भर भारताच्या गतकालीन वैभवाचे पोवाडे गाण्याकडे विशेष होता. त्यापासूनच त्यांना स्फूर्ती मिळे. त्यांचे स्फूर्तिस्थान भौगोलिक आणि ऐतिहासिक कल्पनांवर अधिष्ठित असल्यामुळे, देश म्हणजेच जनता ही त्यांची कल्पना नसून देश म्हणजे त्यांतील भौगोलिक स्थळे, भाषा आणि परंपरा, जुन्या रूढी आणि प्रसिद्ध व्यक्तींचा इतिहास, अशी होती. ह्या सर्वांबद्दलचा अभिमान हाच खरा स्वदेशाभिमान, अशी व्याख्या त्यांच्या मनावर बिंबली होती. त्यामुळे हिंदुधर्मावर, हिंदुरूढीवर, परंपरेवर आणि संस्कृतीवर जो जो टीका करी, हल्ला करी, त्याच्या त्याच्यावर चिपळूणकर त्वेषाने तुटून पडत. पेशव्यांच्या राजवटीविषयी त्यांच्यात

परमोत्कट पूज्य भावना वसत असे. त्या राजवटीत काही अन्याय झाला, दुष्कृत्ये घडली, असे त्यांना दिसले नाही. हिंदूंच्या इतिहासात, धर्मात व समाजव्यवस्थेत सर्व कांही ठीक होते. केवळ दुर्दैवामुळे हिंदूंचे स्वातंत्र्य नष्ट झाले, असा त्यांचा पक्का समज होता.

चिपळूणकरांच्या विचारांपासून ज्यांनी स्फूर्ती घेतली, ज्यांनी त्यांचे विचार व देशाभिमान शिरोधार्य मानला, त्यांतील बहुतेकांनी ब्राह्मणेतर जरी हिंदू असले तरी त्यांनी आपले धर्मग्रंथ जे वेद ते वाचण्याच्या हक्कासाठी भांडू नये असेच मत प्रतिपादन केले. कारण त्यांच्या मते हिंदूंचे धर्मग्रंथ वेद हे फक्त ब्राह्मणांनीच वाचावे असे होते. ब्राह्मणेतरांनी ते वाचू नयेत असें होते. परंतु ते वेद वंदनीय समजून त्यांतील ब्राह्मण सांगतील तो धर्म पाळावा, असे चिपळूणकरपंथीयांना वाटे.

हिंदुधर्म, चालीरीती आणि परंपरा यांचे संरक्षण करण्यासाठी आपण अवतरलो आहोत असा बाणा बाळगणाऱ्या विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी यच्चयावत समाजसुधारकांवर परशूने हल्ला चढविला. सुधारक हे यंत्रयुगाचे, नवीन विचारांचे, धर्मातीत शिक्षणाचे, नवीन विचारासंबंधी चौकस बुद्धीचे, व जातिभेदाच्या निर्मूलनाच्या विचारांचे स्वागत करीत आणि विधवाविवाहाला उत्तेजन देत. यास्तव चिपळूणकर सुधारकांवर जळफळत असत. मोडकळीस आलेली जुनी समाजव्यवस्था नि समाजातील दुष्ट चालीरीती यांना विरोध करून, समाजात समता आणावी आणि सर्वांना सारखी संधी मिळावी अशा तत्त्वांचा समाजसुधारक पुरस्कार करीत. चिपळूणकरांना पेशव्यांचे गेलेले राज्य मिळवावयाचे होते. त्याकडे त्यांचे लक्ष लागून राहिलेले होते. सुधारकांचे लक्ष नवीनयुगाच्या प्रभातकडे लागले होते. आपले भावी स्वराज्य हे सामाजिक समता, शास्त्रीय दृष्टिकोण, सामाजिक न्याय व बुद्धिप्रामाण्यवाद ह्यांवर अधिष्ठित असावे, असे समाजसुधारकांचे ध्येय होते.

चिपळूणकरांच्या निबंधमालेतून त्वेषाचा, तुच्छतेचा आणि देशाभिमानाचा पूर वाहत असे. पण त्वेषाने, तुच्छतेने आणि द्वेषाने भरलेल्या असल्या लिखाणाचे ठायी जे एक वैगुण्य असते, तेच वैगुण्य चिपळूणकरांच्या लिखाणात दिसून आले. ते वैगुण्य म्हणजे त्या लिखाणाची बुद्धिवाद व वास्तववाद ह्यांच्यापासून झालेली फारकत हे होय. मालाकारांच्या विचारांत आत्मनिरीक्षणापेक्षा आत्मसमर्थनावरच अधिक भर होता. जळजळीत उपरोध आणि बोचक कुत्सितपणा त्यांच्या लिखाणातून घोंघो करीत होता. जे काही थोडेबहुत इतिहासाचे ज्ञान त्यांच्यापाशी होते, त्याचे प्रदर्शन त्यांचे अहंकारी व्यक्तिमत्त्व मोठ्या आक्रमक वृत्तीने आणि आत्मसमर्थक दृष्टीने करी. समाजसुधारकांची दृष्टी नि शहाणपण ही देशाच्या कल्याणाच्या दिशेने कार्य करीत होती, तरी हिंदुधर्मातील दोषांवर त्यांनी सतत टीकेची धार धरल्यामुळे आणि स्वतः उक्तीप्रमाणे कृती करण्याचे धैर्य न दाखविल्यामुळे त्यांच्याविषयी तरुण पिढीच्या मनात आदर वसत नसे. चिपळूणकरांनी समाजसुधारकांच्या स्वभावधर्मातील ह्या अधू बाजूवरच धूर्तपणे टीकेचा भडिमार करून त्यांची निर्दयपणे धुळधाण उडविली.

हिंदुस्थानच्या गतवैभवाच्या विचारांनी भारावलेल्या चिपळूणकरांना युगधर्माची हाक

ऐकू आली नाही. नव्या युगाचे लक्षण त्यांना कळलेच नाही. आपल्या काळातील सामाजिक दुःखांची तीव्रता त्यांना जाणवत नव्हती. हिंदुस्थानच्या सामाजिक, धार्मिक, राजकीय आणि आर्थिक जीवनामध्ये पुनर्रचना झाली पाहिजे अशी मागणी करणाऱ्या अनेक संस्था उदयास येत होत्या. त्याविषयी त्यांनी क्षणभरही गंभीरपणे विचार केला नाही. ब्रिटिश सत्तेच्याविरुद्ध पांढरपेशा मध्यमवर्गीयांना उठविणे हेच त्यांचे ध्येय होते. समाजातील अन्याय व विषमता दूर करून त्याची सुधारणा करणे हे त्यांचे ध्येय नव्हते. त्यांनी ब्राह्म समाज, प्रार्थना समाज व आर्य समाज आणि शेवटी सत्यशोधक समाज ह्यांवर प्रखर हल्ले चढविले. आर्यसमाजासहित उपरोक्त तीन समाज कमी-अधिक प्रमाणात सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठीच झगडत होते; आर्यसमाजी नेते राजकारणातही भाग घेत असत.

आपल्या निबंधमालेत चिपळूणकरांनी सतत एक वर्षभर लोकहितवादींवर आपल्या टीकास्त्राचा वर्षाव चालू ठेवला होता. त्यांनी त्या धुंदीत माधवराव रानडे ह्यांच्यावरही हल्ला करून ते दुष्ट व नीच आहेत असे त्यांचे वर्णन केले. दयानंदांचे वेदमूर्तित्व व शास्त्रपारंगतत्व ही वेताग्राताचीच आहेत असे म्हणून त्यांनी त्यांची निर्भर्त्सना केली. त्यांच्या संस्कृत भाषेची टर उडविली आणि बेफामपणे त्यांच्यावर तीक्ष्ण शब्दबाण सोडले. दयानंदांच्या मिरवणुकीच्या वेळी जी धुळवड उडाली त्याचे वर्णन चिपळूणकरांनी मोठ्या बोचक वक्रशैलीत बेहोप होऊन केले.

. २ .

चिपळूणकरांनी आता जोतीरावांवर टीकास्त्राचा भडिमार सुरू केला. सत्यशोधक समाजाच्या वार्षिक प्रतिवृत्तावर अभिप्राय देण्याच्या मिषाने त्यांनी 'गुलामगिरी' आणि 'ब्राह्मणांचें कसब' हे जोतीरावांचे दोन ग्रंथ चर्चेसाठी घेतले.[२] त्यांच्या मते जोतीरावांना व्याकरणाचे व शुद्ध लिहिण्याचे ज्ञान नाही. त्यांनी धर्मशास्त्र, इतिहास, व्युत्पत्तिशास्त्र ह्यांत लुडबूड न करिता व्याकरणाकडे अधिक लक्ष पुरवावे असे मालाकारांनी सुचविले. जोतीरावांनी परशुरामास दिलेल्या आव्हानाची आठवण करून देऊन चिपळूणकर खवचटपणे म्हणाले, 'परशुराम येत नाही. तेव्हा जोतीसाहेबांस 'निर्वीरमुर्वीतलम्' होऊन त्यांनी ब्राह्मणांवर हल्ला केला. एक धोंडिबासारखा मानसपुत्र उत्पन्न केला, कारण आपली ज्ञानजोत मालवली तर ब्रह्मराक्षस पुन्हा डोके वर करील.' चिपळूणकरांनी जोतीरावांचे शूद्रजगद्गुरू, शूद्र कवी, शूद्र धर्मसंस्थापक असे वर्णन केले आहे. ते ब्राह्मणांवर भोक्तात असेही म्हटले आहे.

ह्याच सुमारास १८७९ च्या जानेवारीत कृष्णराव भालेकर यांनी 'दीनबंधु' साप्ताहिक सुरू केले. सत्यशोधक समाजाच्या कार्यांचा प्रसार करणे, शेतकरी कामगार

---

२. चिपळूणकर, विष्णुशास्त्री, निबंधमाला, पृ. ४४०–५७.

यांची गाऱ्हाणी मांडणे हे 'दीनबंधू'चे ध्येय होते. 'दीनबंधू'ने चिपळूणकरांना उत्तर देताना म्हटले की, 'मालाकरांचा झोक चरचरीत लिहिण्याकडे असतो व दुसऱ्याचा पाणउतारा करण्याची ऐट असते. फुले यांनी आपले बुकात पुराणे व स्मृत्या ह्यांबद्दल चांगले विवरण केले आहे. फुले यांनी जे जे लिहिले आहे ते ते स्मृतिपुराणे यांचे प्रमाणांनी असत्य असे व्यक्त करून दाखविले असते तर त्यांची तारीफ करता आली असती. ईश्वरकृपेने या देशावर इंग्रजी राज्य झाले म्हणूनच आज पुढारी ज्ञातीशिवाय इतरांस काहीतरी ज्ञान प्राप्त होऊन आपले हक्क कळू लागले आहेत. मालाकार आपले ज्ञातीच्या स्वभावाप्रमाणे दीर्घ दर्शी आणि गुप्तद्वेषी मतलबीही आहेत. इतर ज्ञातींची सुधारणा त्यांस अगदी आवडत नाही. आता मालाकार यांनी धूर्तांनी नाडलेले, दारिद्र्याने पीडलेले आणि अज्ञानात गढलेले अशा गाईबापड्या गरीब शूद्रांवर हत्यार धरणे म्हटले म्हणजे फारच विपरीत समजले पाहिजे.'[३]

त्यावर मालाकार चिपळूणकरांनी एखाद्या ब्रिटिश साम्राज्यवादी कवीच्या वा अरे-रावाच्या दर्पोक्तिपूर्ण सुरात म्हटले, "आमच्या शूद्र प्रतिपक्षांनी नेहमी लक्षात ठेवावे की, चित्पावन हे चितेपासून जिवंत झालेले असोत किंवा इराणातून आलेले असोत, त्यांचे नैसर्गिक गुण जे यापूर्वी प्रगट झाले व अद्यापही होत आहेत ते छप्पन्न 'गुलाम-गिऱ्यांनी' व शंभर 'जातिभेदसारांनी'ही लवमात्रही कमी होणारे नव्हेत. चित्पावनांनी गेल्या शतकात सारा हिंदुस्तान दणाणून देऊन आपल्या क्षत्रकुलांतक क्षेत्रपतीप्रमाणे दिग्विजय केला, व अद्यापही त्यांचे बुद्धिवैभव जसेचे तसेच जागृत आहे, या गोष्टी सर्वजनश्रुत आहेत."[४] चिपळूणकर पुढे म्हणाले, "ब्राह्मण कितीही लबाड असले व कितीही दुष्ट असले तरी एक गोष्ट निर्विवाद आहे, ती ही की ज्ञानभांडाराच्या किल्ल्या त्यांच्या कंबरेला आहेत. त्यांच्या साह्याशिवाय इतर ज्ञातींस ज्ञानाचा लाभ होण्याचा बहुधा मुळीच मार्ग नाही."[५]

चिपळूणकर आपल्या उपहासात्मक शैलीत आणखी म्हणाले, "पण ज्याअर्थी जोतीबांचा समाज अद्याप बाल्यावस्थेतच आहे, एकीकडे हडपसर व दुसरीकडे भांबुरडे यात्र त्याच्या प्रचंड सीमा होत, त्या अर्थी असल्या 'क्षुद्र' सभेवर हत्यार धरण्यास आम्ही उत्साह पावत नाही. स्वामींच्या आर्य समाजाप्रमाणे त्याचा जेव्हा अवाढव्य विस्तार होईल, व सत्यसमाज-मंदिराच्या अग्रभागी जोतीरावांचा संगमरवरी पुतळा त्यांच्या शुभ्र यशाचा स्मारक म्हणून स्थापला जाईल, तेव्हा त्यांच्या यथार्थत्वाविषयी विचार करता येईल!"[६]

---

३. चिपळूणकर, विष्णुशास्त्री, निबंधमाला, पृ. १०२०.

४. —कित्ता—पृ. १०२३.

५. —कित्ता—पृ. १०२४.

६. —कित्ता—पृ. ४५३.

चिपळूणकरांनी आपल्या जातीच्या वतीने जोतीरावांवर हत्यार धरले हे वरील हल्ल्यावरून स्पष्ट होते. ज्या पुरुषाने धर्मातील कर्मकांडे नि खोटे पूर्वग्रह यांचा धिक्कार केला होता, त्याच्यावर भटभिक्षुकांच्या जातभाईने हल्ला केला हे उघड आहे. जो मनुष्य महाराष्ट्रातील बहुसंख्य दलित व मूक जनतेतून अवतरला, जो त्यांची भाषा बोले, त्यांची दुःखे वेशीवर टांगी, त्यांच्या भयंकर दारिद्र्याकडे जगाचे लक्ष वेधी, आणि जो सनातन्यांवरील हल्ल्याचा आघाडीवरील भालाईत बनला होता, त्याच्यावर चिपळूणकर तुटून पडले होते. चिपळूणकरांनी जोतीरावांचे वर्णन ब्राह्मणद्वेष्टा असे केले आहे. परंतु चिपळूणकर हे स्वतः ब्राह्मणेतरांचे कडवे द्वेष्टे होते हे त्यांच्या दर्पावरून सिद्ध झाले. आपण स्वतः जणू ब्राह्मणांच्या स्वर्गातून अवतरलो आहोत अशा थाटात चिपळूणकर बोलत चालत होते.

चिपळूणकरांचा जोतीरावांवर दात होता. कारण त्यांनी आपल्या 'गुलामगिरी' ग्रंथात 'रांडेने गुलाम केलेला प्रतिबृहस्पती'[७] असे नाव न घेता चिपळूणकरांच्या वडिलांचे अकारण वर्णन केलेले होते. त्यामुळे चिरंजीवाच्या हल्ल्याला विशेष धार आली होती. वामन आणि बळी ह्यांचेच जणू हे युद्ध सुरू झाले असे वाटावे! ब्राह्मणांच्या सत्ते-विषयी, नेतृत्वाविषयी आणि पराक्रमाविषयी चिपळूणकरांच्या ठायी रसरसत असलेल्या अतिरेकी अभिमानामुळे त्यांना ब्राह्मणेतरांचे दुःख, दारिद्र्य आणि अज्ञान ह्यांविषयी विचार करणे अशक्य झाले. ते स्वयंमन्य मराठी भाषेचे शिवाजी होते. आपल्या झगझगीत लिखाणात ते लोकांच्या खोट्या पूर्वग्रहांविषयी प्रासंगिक ओझरते उल्लेख करीत, परंतु ते दूर करण्यासाठी जे समाजसुधारक धीटपणे झगडत होते त्यांच्याविषयी त्यांनी सहानुभूतीचा एक शब्दही उच्चारला नाही. सामान्य जनतेविषयी, दलितांविषयी, कनिष्ठ जातींविषयी त्यांना सहानुभूती कसली ती वाटतच नव्हती. त्यांच्या डौलदार डोक्याला ती कल्पना शिवलीच नव्हती.

त्या काळी महाराष्ट्रात भयंकर दुष्काळ पडले. शेतकऱ्यांचे दंगे झाले. सर्वत्र अशांतता पसरली. लोक अन्नान्न करीत होते. परंतु चिपळूणकरांची लेखणी पूर्वजांच्या पराक्रमाचे गोडवे गाण्यात गढली होती. ज्या जोतीरावांना हिंदुधर्माचा वैरी म्हणून त्यांनी धिक्कारले, त्यांची सामाजिक भूमिका, व मानवी समानतेचा संदेश समजण्याएवढी त्यांची बुद्धी आणि दृष्टी परिपक्व नि विशाल नव्हती.

चिपळूणकरांनी जोतीरावांवर जो चिखल फेकला त्याचे रूपांतर आता गौरवाच्या गुलालात झाले आहे. महाराष्ट्रातील बहुतेक विचारवंतांनी, जोतीरावांनी सामाजिक क्रांतीत मार्गदात्याचे कार्य केले, त्यासाठी त्याग केला, धैर्य दाखविले याविषयी मान्यता दर्शविली आहे. तसे मान्य करताना कोणी त्यांच्या अभिव्यक्तीला दोष दिला असेल, परंतु आशयाला नाही.

---

७. फुले, जोतीराव गोविंदराव, गुलामगिरी, पृ. ८९.

चिपळूणकरांचे मराठी भाषेवर प्रभुत्व होते. परंतु त्यांना सामाजिक दृष्टी नव्हती. त्यामुळे त्यांच्या लेखणीत जोतीरावांच्या विचारप्रणालीवर टीका करण्याचे सामर्थ्य नव्हते. त्यांचे विरोधक शेतकरी-तत्त्वज्ञ जोतीराव यांची भाषा कबीरासारखी ओबडधोबड होती, परंतु दृष्टी दिव्य होती आणि विचार मूलगामी होते. चरचरीत वाक्प्रचार, स्वाभिमान, धार्मिकता आणि देशाभिमान हे चिपळूणकरांच्या रसरशीत व आक्रमक भाषाशैलीचे गुणविशेष होते. त्यायोगे त्यांनी मराठी भाषेच्या इतिहासात नवीन पर्व निर्माण केले. तथापि, चिपळूणकरांनी जोतीरावांसंबंधी द्वेषाच्या भरात केलेले भविष्य खरे ठरले आहे. जोतीरावांची भाषा व व्याकरण शुद्ध नसली तरी त्यांचे पुतळे अनेक ठिकाणी त्यांची धवलकीर्ती व्यक्त करीत आहेत. मराठी भाषेच्या स्वयंमन्य शिवाजीचे पुतळे मात्र पुण्याबाहेर शोधून पाहवे लागतील.

चिपळूणकरांनी त्यांच्या नेहमीच्या खवचटपणाला अनुसरून लिहिले की, 'जोती हे वयाने चांगले पोक्त आहेत म्हणून ऐकतो.' जोतीरावांना जणू आपण ओळखीत नाही असा चिपळूणकरांनी आव आणला आहे तो त्यांना शोभत नाही.

जोतीरावांच्या शाळेच्या कार्यकारी मंडळाचे चिपळूणकरांचे वडील कृष्णशास्त्री हे सभासद होते. जोतीरावांची पुण्यात शेकडो भाषणे झाली होती. पुण्याच्या नागर जीवनातील ते एक प्रमुख नेते होते. त्यांचा असा उल्लेख केवळ भाषेचा परिणाम साधण्यासाठी करावा हे अत्यंत निर्दयपणाचे, सडलेल्या अहंकाराचे द्योतक आहे. ह्या अपकाराची फेड जोतीरावांनी पुढे उपकाराने कशी केली ते पुढे दिसेलच.

ज्ञानभांडाराच्या किल्ल्या ब्राह्मणांच्या कंबरेला आहेत ही चिपळूणकरप्रणीत बढाईची दुसरी एक अभिव्यक्ती होय. संस्कृत भाषेचा अभ्यास आपसात कुजत ठेवण्यापलीकडे ब्राह्मणांनी भारतात ज्ञानप्रसाराचे कार्य केले नाही. भारतात ब्राह्मणेतरांमध्ये ज्ञानप्रसार केल्याचे श्रेय कोणास द्यायचेच असेल तर ब्रिटिश राज्यकर्त्यांना. त्यांनी भारतात शिक्षण सर्वांना खुले केले. ज्ञानभांडाराच्या किल्ल्या ब्राह्मणांच्या कंबरेला तशाच लोंबकळत राहिल्या.

चिपळूणकरांच्या ठायी असलेली सामाजिक परिवर्तनाविषयी बेपर्वाई, जे समाजसुधारक समाजात समभाव नि बंधुभाव वाढविण्याचा प्रयत्न करीत होते त्यांच्यावर त्यांनी केलेले हल्ले, आणि ब्राह्मणशाही नि ब्राह्मण्य यांचा त्यांनी केलेला जयजयकार ह्यांमुळे समाजसुधारकांनी सामाजिक ऐक्यभावनेचे, समतेचे नि न्यायाचे जे कार्य चालविले होते ते विस्कळित झाले. चिपळूणकरांनी समाजसुधारकांवर आणि विशेषतः जोतीराव आणि सत्यशोधक समाज ह्यांवर कठोरपणे हल्ला केल्यामुळे महाराष्ट्रातील सामाजिक ऐक्याला तडे गेले. अशा प्रकारे चिपळूणकरांच्या लेखणीने महाराष्ट्र दुभंगून टाकला.

यानंतर थोड्याच दिवसांनी विष्णुशास्त्री चिपळूणकरांचा वैचारिक वारसा टिळकांकडे आला. त्यांनी समाजसुधारकांना हाणून पाडण्यासाठी चिपळूणकरांनी अनुसरलेल्या टीकापद्धतीची परंपरा चालू ठेवली. त्यांनी चिपळूणकरांप्रमाणे ब्राह्मण्याचा अभिमान

बाळगून वेदोक्त प्रकरणात ब्राह्मणांची बाजू घेतल्याने महाराष्ट्रातील सामाजिक वातावरण एक दोन पिढ्यांपर्यंत कसे गढूळ झाले व त्यायोगे समाज कसा दूषित झाला ह्याची साक्ष इतिहास देत आहे. जोतीरावांचे अनुयायी हे पुण्यातील चिपळूणकर-टिळकप्रणीत राजकीय कार्यकर्ते, त्यांची विचारप्रणाली नि राजकारण ह्यांपासून दूर राहिले. पुढे म. गांधींनी १९३० साली शेतकऱ्यांना आणि अस्पृश्यांना काँग्रेसमधून आवाहन केले. त्यामुळे महाराष्ट्रातील जोतीरावांच्या विचारसरणीच्या लोकांनी राष्ट्रीय सभेत प्रवेश केला.

अठराशे सत्याहत्तर सालच्या पूर्वार्धात सत्यशोधक समाजाच्या अनुयायांना बुद्धिवादी नि शास्त्रीय दृष्टी देण्याच्या हेतूने अनेक विचारप्रवर्तक व्याख्याने पुणे येथे वेताळ पेठेतील सत्यशोधक समाजगृहात करविण्यात आली. फेब्रुवारीत केशवराव गोडबोले ह्यांनी चंद्रग्रहणावर व्याख्यान दिले; तर मार्च महिन्यात गणपतराव कोरटकरांचे 'विद्या व लोकशिक्षण' आणि म. मो. कुंटे यांचे 'आमच्या लोकव्यवस्थेची मूळ बीजे' ह्या विषयांवर व्याख्याने झाली. रावजी चोभे ह्यांचे 'हिंदुस्थानास दारिद्र्य प्राप्त होण्याची कारणे' ह्या विषयावर व्याख्यान झाले. शनिवार १२ मे १८७७ रोजी स्वतः जोतीरावांनी 'स्वदेशीय म्हणविणाऱ्या राज्यापेक्षा परदेशी राजाकडून काळ्याच्या संबंधाने शूद्र लोकांस किती फायदा झाला आहे' ह्या विषयावर समाजगृहात निबंध वाचला.

जोतीरावांनी सत्यशोधक समाजाबाहेरील विद्वानांना आणून व्याख्याने करविली. त्याचप्रमाणे त्यांनी एप्रिल महिन्यात एक योजना जाहीर केली. त्या योजनेप्रमाणे वक्तृत्वाच्या चढाओढीसाठी एक पारितोषिक आणि निबंधस्पर्धेसाठी दुसरे पारितोषिक ठेविले होते. त्यावेळी सत्यशोधक समाजाचे कार्यवाह जोतीराव असल्यामुळे त्यांच्याच सहीने त्या योजना जाहीर करण्यात आल्या. अशी चढाओढ ठेविण्यात हेतू असा होता की 'आपल्या लोकांना निबंध लिहिता यावे, आणि भाषण करता यावे.' निबंधाचा विषय काल्पनिक परंतु मनोरंजक होता. व्हिक्टोरिया राणी हिंदुस्थानातून प्रवास करीत असताना ती एका खेड्याजवळ आली: तेथे महारमांगांनी आपल्या डोक्यांवरील मोळ्या खाली उतरून महाराणीला आपल्या समाजाची पेशवाईत कशी दैन्यावस्था होती हे कथन केले व इंग्रज राजवटीतही त्यांना कसा त्रास होत आहे हेही निवेदिले. पुढे जोतीरावांनी ह्याच विषयावर 'अस्पृश्यांची कैफियत' या नावाची एक पुस्तिका प्रसिद्ध केली.

वक्तृत्वस्पर्धेसाठी ठेवलेला विषय फार महत्त्वाचा होता. 'सतत दुष्काळ पडण्यास कारणे कोणती आणि शूद्रच त्यात प्रथम बळी पडून भुकेने का मरतात? दुष्काळ टाळण्यासाठी काय उपाय योजावेत?' हा विषय होता. जर एखाद्या स्पर्धकाने आपल्या निबंधात राजकीय प्रश्न उपस्थित केले, तर त्याचा निबंध पारितोषिकासाठी विचारात घेतला जाणार नाही, अशी एक अट होती. जर एखाद्या स्पर्धकाने आपल्या भाषणात राजकीय प्रश्नाचा उल्लेख केला तर तो बक्षिसास अपात्र ठरेल, अशीही एक अट होती. हा समारंभ ७ जून १८७७ रोजी शुक्रवार पेठेत श्री रामभाऊ मनसाराम नाईक, कॉन्ट्रॅक्टर यांच्या दिवाणखान्यात रात्री साडेआठ वाजता सुरू झाला.

समाजाचे अध्यक्ष डॉ. वि. रा. घोले यांनी त्या प्रसंगी एक भाषण करून ब्राह्मणेतरांना उतारा दिला. ते म्हणाले, "हिंदुधर्मांचे कर्ते केवळ ब्राह्मणच नव्हते. इतर जातींचेही पुष्कळ लोक होते. निबंधात स्पर्धकांनी दिलेली ऐतिहासिक माहिती कशाच्या आधारे दिली आहे, ते स्पष्ट होत नाही. ती स्वकपोलकल्पित वाटते. निबंधाचा विषय तऱ्हेवाईक होता. राणीसाहेब म्हणतील, 'दुःखे सहन होत नाहीत तर तुम्ही ख्रिस्ती व्हा. महारमांगांची स्थिती अमेरिकेतील गुलामाप्रमाणे नव्हती. अमेरिकेतील गुलामांची त्यांच्या बायकापोरांवर सत्ता नसे. त्याला ठार मारण्याचा हक्कही धन्याला असे."[८] 'ज्ञानप्रकाशा'ने हे भाषण तीन अंकांत देऊन, सत्यशोधक समाजाचे कित्येक कोत्या बुद्धीचे दुराग्रही व मूर्ख सभासद यांनी ह्या भाषणाचे चांगले मनन करावे, असा टोला देण्याची संधी घेतली. वक्तृत्वस्पर्धेसाठी दुष्काळ हा विषय ठेवण्याचे कारण १८७६/७७ सालांत दुष्काळाने महाराष्ट्रात कहर उडविला होता. त्यांच्यापाठून टोळधाडीने येऊन लोकांच्या दैन्यात भर टाकली होती.

दुष्काळाच्या दिवसांत जोतीरावांनी सत्यशोधक समाजाचे चिटणीस म्हणून १७ मे १८७७ रोजी सभासदांना एक निवेदनपत्रक पाठविले. ते 'ज्ञानप्रकाशात' २४ मे १८७७ रोजी प्रसिद्ध झाले. त्यात ते म्हणाले, "मेहेरबान पुणे मुंबई वगैरे ठिकाणचे सभासद यांस वि. वि. समाजाचे हुकुमावरून आपणांस विनंतीपूर्वक असे कळविण्यात येते की, समाजाचे मार्फत व्हिक्टोरिया बालाश्रम स्थापन केला आहे."

"त्या घरात दुष्काळपीडित लोक आपली मुले सोडून जाऊ लागले आहेत व त्याप्रमाणे इंदापूर, मिरज व तासगांवकडील ब्राह्मणजात खेरीजकरून बाकी सर्व जातींतील कित्येक अनाथ लोक आपली मुलेबाळे घेऊन जमले आहेत. कधीकधी दोनदोन तीन-तीन दिवस उपास काढून त्यांची हाडे मात्र उरली आहेत. शिवाय त्यांचे वस्त्रावाचून इतके हाल झाले आहेत की, त्यांचे येथे इत्थंभूत वर्णन करण्यात मला दुःख वाटते. यास्तव गृहस्थांनी कृपाळू होऊन आपल्या शक्तीनुसार काहीना काहीतरी ही जाहिरात पाहताच मदत पाठविण्याची त्वरा केल्यास आपण आपले कर्तव्यकर्म अशा वेळी बजावल्याचे श्रेय होणार आहे. ता. १७ माहे मे सन १८७७ इ० आपला सेवक, जोतीराव गोविंदराव फुले. स. शो. स. चिटणीस."

अठराशे साठ सालापासून महाराष्ट्रात अधूनमधून दुष्काळानेही कहर केला होता. अठराशे पंचाहत्तर साली अहमदाबाद, पुणे, सातारा, सोलापूर येथे शेतकऱ्यांनी बंडे केली होती. शेतकरी आणि सावकार यांच्यामधील संबंध बिघडण्यामुळे हे दंगे निर्माण झाले होते. शेतकरी आणि गरीब वर्ग हे दंग्याच्या परिस्थितीमुळे हैराण झाले होते. जोतीरावांना त्यांच्या भवितव्याविषयी चिंता वाटू लागली. सावकार लोक अज्ञानी शेतकऱ्यांकडून कर्जाऊ दिलेल्या रकमेपेक्षा मोठ्या रकमेचे दस्तऐवज करून घेत.

---

८. ज्ञानप्रकाश, १८, २१, २५ जून १८७७.

त्याच्या ठकबाजीविरुद्ध त्यांनी अनेक वेळा ओरड केली होती. त्यांनी याविरुद्ध १८६९ पासून टाहो फोडला होता. शेवटी सर्वत्र ओरड झाल्यावर आणि परिस्थिती फारच बिघडल्यावर सरकारने या बाबतीत चौकशी करण्यासाठी एक चौकशी मंडळ नेमले. या मंडळाने केलेल्या वृत्तांतानुसार 'डेक्कन ॲग्रिकल्चरिस्ट्स् रिलिफ ॲक्ट' हा सरकारने संमत केला.

शेतकरीवर्गाला ऋणातून मुक्त करावे, सावकार व शेतकरी यांच्यामधले संबंध सुधारावे ह्या उद्देशाने हा निर्बंध करण्यात आला होता. सावकारांनी आपल्या दप्तरांत आणि खतपत्रांत लबाडी करू नये व शेतकऱ्यांच्या हक्कांचे नि हिताचे रक्षण व्हावे म्हणून त्यात काही तरतुदी केल्या गेल्या. जोतीरावांच्या पक्षाच्या 'दीनबंधु' साप्ताहिकाने ह्या निर्बंधाला मनःपूर्वक पाठिंबा दिला होता. त्या निर्बंधानुसारे गरीब व अज्ञानी शेतकऱ्यांना जमिनीस व मालमत्तेस मुकविण्यास प्रतिबंध केला होता. सावकारांच्या आणि ब्राह्मण भिक्षुकांच्या अमर्याद अधाशीपणामुळे शेतकऱ्यांना ती वाईट स्थिती प्राप्त झाली होती. जर शेतकरी आणि सावकार यांच्यामध्ये देण्याघेण्याचे कमीत कमी संबंध आले, तर शेतकरी स्वावलंबी व उद्योगी होतील आणि आपल्या उत्पन्नावर जगू शकतील; त्यांचा अज्ञानीपणा व अशिक्षितपणा यामुळेच त्यांची अशी अन्नान्नदशा झाली आहे, असे 'दीनबंधू'ने मत व्यक्त केले.

आपल्या २४ नोव्हेंबर १८७९ च्या अंकात 'दीनबंधू'ने पुन्हा त्या निर्बंधाच्या बाजूने आपले विचार व्यक्त केले. त्यांत 'दीनबंधू'ने म्हटले की, 'ब्राह्मणांनी चालविलेल्या वृत्तपत्रांनी या शेतकऱ्यांच्या दुःखनिवारण्याच्या कायद्याविरुद्ध ओरड केली आहे. कारण ह्या कायद्याच्या अंमलबजावणीमुळे ब्राह्मण सावकारांचाच तोटा होणार आहे. यास्तव सरकारने या ब्राह्मण पत्रकारांच्या निषेधाची पर्वा करू नये. इतकेच नव्हे तर, हा कायदा सर्व बाबतीत कृतीत उतरला आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी आणखी एक मंडळ नेमावे.' अवर्षण किंवा योग्य वेळी पाऊस न पडणे हा महाराष्ट्रास मोठा शाप आहे. त्यामुळे अनेकवार महाराष्ट्रात दुष्काळाने कहर उडविला आहे. त्या दुष्काळात धनाढ्य शेतकरीही अनेकदा धुळीस मिळाले. आणि ते नोकऱ्या व इतर धंदे यांच्या शोधात भटकू लागले. लक्षावधी लोक भुकेकंगाल होऊन मेले.

दुष्काळपीडित लोकांना साह्य देण्याच्या कार्यात जोतीरावांनी पुढाकार घेतला होता. त्यात त्यांनी अपरिमित कष्ट करून मोठे कार्य केले. लोकांना काम व अभय द्या अशी सरकारला त्यांनी 'दीनबंधू' मधून पुन्हा पुन्हा विनंती केली. दुष्काळात सापडलेल्या भागांतून ते स्वतः लोकांना धीर देत फिरत असत. शेकडो निष्पाप मुलांचे भूकबळी पाहून जोतीबांचे मन गहिवरे. धनकवडी कॅंपमध्ये त्यानी जवळजवळ दोन हजार मुलांची सोय केली होती. दोन ते बारा वर्षांपर्यंतच्या मुलांना तेथे दररोज सकाळ-संध्याकाळ भाकरी देण्यात येई. या कार्यात जोतीरावांना रामशेट उरवणे, हरि रावजी चिपळूणकर व पुणे नगरपालिकेचे मुख्य अधिकारी सिनप्पा यांनी फार मोठे साह्य केले. दुष्काळ-

पीडितांना साह्य करण्याचे काम मे १८७९ च्या अखेरपर्यंत चालले होते.[१]

जोतीरावांनी निबंधाची आणखी एक स्पर्धा जाहीर केली. ह्या निबंधाचा विषय असा होता की, 'ज्या शूद्र समाजाने शिवाजीमहाराज, शिंदे, होळकर, गायकवाड ह्यांसारखे संस्थानिकराजे निर्माण केले तो समाज इतका हतबळ झाला की तो केवळ ब्राह्मणांच्याच वस्त्रांची निगा राखतो असे नाही तर त्यांच्या बायकांच्या वस्त्रांची निगा राखतो. उलट ब्राह्मण कितीही दारिद्र्याने गांजला तरी असले हीन दर्जाचे काम स्वीकारायास तयार होत नाही.' ही निबंधस्पर्धा १८७८ च्या फेब्रुवारीत जाहीर झाली होती.

जोतीरावांच्या पूना कमर्शियल ॲण्ड कॉन्ट्रॅक्टिंग कंपनीने घेतलेले दगड पुरविण्याचे काम सुरूच होते. उपरोक्त निबंधाच्या चढाओढीच्या प्रसिद्धिपत्रकावरून असे दिसून येते की, त्याकाळी रामशेट बापूशेट उरवणे हे जोतीरावांचे भागीदार झाले होते व भागीदार शिंदे यांनी स्वतंत्र नोकरी धरल्यामुळे भागीदारी सोडली होती. हे कंपनीचे काम १८७९ च्या मध्यापर्यंत चाललेले होते. 'दीनबंधु'कार कृष्णराव भालेकर हे जोतीरावांचे वरील कंपनीत भागीदार होते. त्यांनीही आता भागीदारी सोडली होती.

पुणे नगरपालिकेमध्ये जोतीराव हे अत्यंत जागृतपणे आणि कळकळीने काम करीत असत. ऑक्टोबर १८७८ मध्ये नगरपालिकेच्या १८७९/८० सालच्या अर्थसंकल्पावर चर्चा चालली असताना त्यांनी अशी सूचना केली की, ५० रु. मासिक वेतन नेमून एक कारकून नेमण्यापेक्षा ३० रु. आणि २० रु. मासिक वेतन देऊन दोन कारकून नेमावे, कामाच्या उरक होण्यासाठी त्यांनी केलेली ही व्यवहार्य सूचना नगरपालिकेने मान्य केली. थोड्याच दिवसांनंतर १८६५।६८ ते १८७७।७८ पर्यंतच्या काळातील नगरपालिकेच्या हिशेबाची तपासणी करण्यासाठी एक उपसमिती नेमण्यात आली. त्या समितीवर जोतीरावांची सभासद म्हणून निवड करण्यात आली.

याच सुमारास 'दीनबंधू'ने प्रार्थना समाजावर कडक टीका केली. त्यात त्यांनी असे म्हटले की, 'प्रार्थना समाजाच्या पुढाऱ्यांना गरीब वर्गामध्ये शिक्षणप्रसार करण्याची इच्छा नाही; ते गरिबांच्या हक्कांचे रक्षण करण्याविषयी चकार शब्दही काढीत नाहीत. प्रार्थना समाज ही सभा आमच्यामते केवळ मतलबसिंधु समाज आहे.' त्यावर प्रार्थनासमाजाच्या सुबोधपत्रिकेने उत्तर दिले की, "सत्यशोधक समाज व त्याचे दृढीकरणासाठी झटणारे वर्तमानपत्र 'दीनबंधु' यांचा उद्देश स्तुत्य आहे याविषयी अगदी संशय नाही. त्या कामास यश यावे अशी आमची मनापासून ईश्वरास प्रार्थना आहे. प्रार्थना समाजात ब्राह्मणवर्गात मोडणारे लोक बरेच आहेत. परंतु त्यांचा उद्देश ब्राह्मणज्ञातीचे स्वाभाविकपणे नष्ट होणारे वर्चस्व पुनः उदयास आणावे हा बिलकूल नाही. ही गोष्ट जगप्रसिद्ध असून विनाकारण त्या लोकांवर या गोष्टीचा आरोप करणे म्हणजे आमच्या समजुतीने अगदीच गैर होय. प्रार्थना समाजात ब्राह्मण बरेच आहेत पण हा त्या लोकांचा अपराध

१. ज्ञानप्रकाश, २ जून १८७९.

नव्हे, तर विद्येचा अपराध होय. समाजात पुष्कळ शूद्र येऊन मिळाल्यास त्यांची अधिक संख्या होऊन तेच समाजाचे पुरस्कर्ते होतील." [१०]

गंमत कशी आहे पहा. प्रार्थना समाज आणि सत्यशोधक समाज हे दोघेही समूहाने प्रार्थना करणारे. तरीसुद्धा 'दीनबंधू'ने टवाळखोरपणे म्हटले की, प्रार्थना समाजाचे सभासद बकसाधुत्वाचे मिष घेऊन डोळे मिटून मोठ्या आनंदाने व प्रेमाने प्रार्थना करितात. कनिष्ठ वर्गाच्या उद्धाराचे कार्य प्रार्थना समाजाने मोठ्या प्रमाणावर व तडफेने केले नाही हे खरे असले, तरी ब्राह्मणांनी चालविलेल्या संस्था कितीही उदारमतवादी व परोपकारी असोत त्यांच्या कार्याकडे दूषित पूर्वग्रहाने पाहण्याची काही सत्यशोधकांना खोड जडलेली होती त्याचे निदर्शक अशी ही उपरोक्त टीका होती. प्रार्थना समाजाचे काही सभासद पायांत घुंगुर बांधीत व भक्तीत तल्लीन होऊन नाचत हे अनेकांना आवडत नसे. जोतीरावांनाही गोष्ट आवडलेली नसावी. जोतीरावांची विश्वाच्या देवावर श्रद्धा होती. त्यापलीकडे देवाला खूष करण्यासाठी जोतीरावांच्या धर्माला कसलीही गरज भासत नसे.

'दीनबंधू'ने ब्राह्मणांवर चालविलेल्या कडक टीकेविषयी काही ब्राह्मणेतर वर्तुळांत नापसंती व्यक्त करण्यात येत होती. सोलापूरच्या 'कल्पतरू' [११] नावाच्या साप्ताहिकाने हळुवारपणे नापसंती व्यक्त करून असे म्हटले की, 'ब्राह्मणांविरुद्ध चालविलेल्या ह्या टीकेमुळे काही हित साधणार नाही. अशी टीका हितावह ठरणार नाही.' 'कल्पतरू'चे संपादक हे भागवतधर्माचे मोठे अभिमानी असत. ब्राह्मणांविरुद्ध ती कडक टीका पाहून त्यांच्या मनाने दहशत घेतली असावी. भक्तीने भाविकतेची उंची वाढते; पण मन कमकुवत बनते असे दिसते.

जोतीरावांचे सर्व भागीदार या ना त्या कारणास्तव त्यांच्यापासून वेगळे झाले. त्यांच्या स्वभावातील अन् व्यवहारातील कठोरपणा त्यांना मानवत नसावा. त्यामुळे ग्यानोबा ससाणे ह्यांना त्यांनी आपल्या धंद्यात येऊन मिळण्याचा आग्रह केला. ह्याच वेळी पूना कमर्शियल ॲण्ड कॉन्ट्रॅक्टिंग कंपनीने एक नवीन धंदा सुरू केला. त्या कंपनीच्या वतीने पुण्याच्या मंडईत भाज्या खरेदी करण्याचे काम ग्यानोबाने जवळजवळ चार महिने केले. मुंबईच्या बाजारात ती भाजी पाठविली जात असे. तथापि हा धंदा विशेष फायदेशीर ठरला नाही, त्यामुळे मोठ्या नाखुषीने जोतीरावांनी तो धंदा बंद केला व ग्यानोबा ससाणे यांनाही नोकरीतून मुक्त केले. त्यांच्या आग्रहामुळे ग्यानोबांनी सरकारी नोकरी सोडून ते जोतीरावांना येऊन मिळाले होते. ससाण्यांनी एकनिष्ठेने जोतीरावांकडे नोकरी केली. त्याविषयी गुणग्राहकता दाखविण्याच्या दृष्टीने जोतीरावांनी ग्यानोबा ससाणे यांना एक

१०. सुबोधपत्रिका, २२ डिसेंबर १८७८ आणि १२ जानेवारी १८७९.

११. कल्पतरू, २१ नोव्हेंबर १८७९.

प्रशस्तिपत्र दिले. त्यात ते म्हणाले, ‘जरी ग्यानोबा शाळेत गेले नाहीत तरी मोडी मराठी उत्तम लिहितात. ते वक्तशीर आणि मेहनती आहेत...’ बिचाऱ्या ग्यानोबा ससाण्यांनी आपल्या धन्याने दिलेले ते प्रशस्तिपत्र अनेक वर्षे एक स्मृती म्हणून जपून ठेवले होते.

भालेकरांनी सुरू केलेल्या ‘दीनबंधू’चे प्रारंभी आठ वर्गणीदार होते. तो दुष्काळाचा काळ असल्यामुळे वर्गणीदारांच्या संख्येत विशेष भर पडली नाही. परंतु ‘दीनबंधू’ची गर्जना मात्र फार दूरवर ऐकू जाई. ‘दीनबंधू’चे असे नम्र मत होते की, कनिष्ठ वर्गांना तांत्रिक शिक्षण देऊन आणि ज्या जातिभेदाने हिन्दुस्थानचा नाश केला आहे त्या जातिभेदाला मूठमाती देऊन हिंदुस्थानचे पुनरुज्जीवन साधता येईल.

पुणे नगरपालिकेच्या कामकाजात जोतीराव अत्यंत उत्साहाने भाग घेत असत. शहरातील कचरा गोळा करण्यासाठी कोणती जागा निवडावी हे ठरविण्यासाठी नगरपालिकेने १८७९ मध्ये जोतीरावांची निवड केली. नगरपालिकेच्या सभासदांच्या हक्कांविषयी जोतीराव अत्यंत जागरूक असत. अठराशे एकोणऐंशीच्या सप्टेंबरात डॉ. घोले आणि जोतीराव फुले यांनी आपल्या बाजूला बहुसंख्य मते मिळवून पुणे नेटीव्ह जनरल लायब्ररीसाठी बुधवारवाड्याच्या जागेवर खोल्या बांधण्याविषयी नगरपालिकेपुढे जी सूचना आली होती, ती फेटाळून लावली. वासुदेव बळवंत फडके यांच्या बंडाच्यावेळी बुधवारवाडा जाळून टाकण्यात आला होता.

पुणे नेटीव्ह जनरल लायब्ररीसाठी मागितलेली जागा नाकारण्यात ज्या सभासदांनी मत दिले, त्यांनी कांही विशेष बहादुरी केली असे आपल्याला वाटत नाही, असे ‘ज्ञानप्रकाश’ने म्हटले. रावबहादूर खंडेराव विश्वनाथ रास्ते यांनी तो ठराव मांडला होता आणि रावबहादूर विजयारंगम आर्य मुदलियार यांनी त्याला अनुमोदन दिले होते. आरोग्यविषयक कारणे पुढे करून ती मागणी फेटाळण्यात आली होती. जर सरकारने आणि नगरपालिकेने तशी परवानगी दिली असती तर ज्या पेशव्याने तो बुधवारवाडा बांधला त्याच्या नावाला आणि प्रतिष्ठेला धक्का बसला असता, असे त्या काळी एका नगरपित्याने उद्‌गार काढले.

पुणे नगरपालिकेच्या कार्यकारी मंडळाने सर्वसाधारण सभेच्या अनुमतीशिवाय काही रक्कम खर्च केली होती. कार्यकारी मंडळाच्या या नियमबाह्य वर्तनाचा निषेध करण्यासाठी हरि रावजी चिपळूणकर यांनी एक ठराव मांडला. त्याला जोतीरावांनी पाठिंबा दिला. सर्वसाधारण सभेच्या संमतीशिवाय कार्यकारी मंडळाने कोणताही खर्च करू नये असा ठराव संमत झाला.

त्या काळी पुणे शहर एका मोठ्या वादळात सापडले होते. वासुदेव बळवंत फडके यांनी ब्रिटिशसत्तेच्या विरुद्ध बंड केले. त्यासरशी महाराष्ट्रात देशाभिमानाची लाट उसळली होती. फडके यांचा जन्म ४ नोव्हेंबर १८४५ रोजी झाला. पुण्यातील सैनिकी वित्त विभागात त्यांनी काही दिवस कारकून म्हणून नोकरी केली. इंग्रजी राज्य उलथून पाडण्याच्या उद्देशाने स्वतःची तयारी व्हावी म्हणून त्यांनी लहुजीबुवा मांग यांच्याकडे

सैनिकी शिक्षण घेतले. ह्याच लहुजीबुवा मांगाकडे जोतीरावांनीही १८४७ साली सैनिकी शिक्षण घेतले होते. जोतीरावांच्या शाळांत महारमांगांची मुले आणण्याचा लहुजीबुवा मांग हे प्रयत्न करीत असत. वासुदेव बळवंतांच्या बंडाने मार्च ते मे १८७९ पर्यंत सर्व महाराष्ट्र गदगदा हादरून सोडला. देशी आणि परदेशी वृत्तपत्रांची पाने त्या बातमीने थरारली. मराठी लोकांची राजकीय आणि लष्करी नेतृत्वाची स्मृती अद्याप जागृत होती हे वासुदेव बळवंतांनी सिद्ध केले. वासुदेव बळवंतांचा पराभव झाला. त्यांचा अभियोग पुणे येथे २२ ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर १८७९ पर्यंत चालला. त्यांना काळ्यापाण्याची शिक्षा झाली. पुढे १७ फेब्रुवारी १८८३ रोजी ह्या महान देशभक्ताने एडन येथील तुरुंगात देह ठेवला.

फडक्यांच्या सैनिकांना जोतीरावांनी भाकऱ्या पुरविल्या असे काही जण म्हणतात. फडक्यांच्या बंडानंतर दहा वर्षांनी जोतीरावांनी 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक' या नावाचा ग्रंथ लिहिला. त्यात त्यांनी फडक्यांचा उल्लेख काहीसा तिरस्काराने दरवडेखोर किंवा बंडखोर असा केला आहे. त्यामुळे ब्रिटिश राज्य उलथून पाडू इच्छिणाऱ्या फडक्यांचे कार्य त्यांना मान्य नसण्याचा संभवच अधिक. त्या काळीं सर्वच नेत्यांनी फडके यांच्या बाबतीत सारखेच मत प्रदर्शित केले असे दिसते. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी फडक्यांना यःकश्चित दरवडेखोर म्हटले तर रानड्यांनी त्यांना माथेफिरू देशभक्त म्हटले. दुसऱ्या कित्येक व्यक्तींनी आणि वृत्तपत्रांनी त्यांना दूषण दिले आहे. हा काळाचा महिमा आहे.

वासुदेव बळवंत हे पुण्यातील त्या काळचे एक युयुत्सू वृत्तीचे कार्यकर्ते होते. त्यांचा जोतीरावांशी चांगलाच परिचय होता. दोघांनीही लहुजीबुवा मांग यांच्याकडे शिक्षण घेतले होते. या गुरुबंधुत्वामुळे आणि दाट परिचयामुळे फडक्यांच्या उपाशी सैनिकांनी सोसलेल्या हालअपेष्टा आणि दाखविलेले शौर्य याविषयी त्यांचे मन द्रवले असावे. जर जोतीरावांनी १८७९ साली भर बंडाच्या वेळी फडक्यांच्या सैनिकांना साह्य करण्यात सक्रिय भाग घेतला असता, तर आपल्या १८८९ सालच्या ग्रंथात त्यांनी फडक्यांचा जसा तिरस्कारपूर्वक निर्देश केला तसा केला नसता. त्यांनी त्याविषयी कदाचित मुग्धता पाळली असती. जोतीराव हे वृत्तीने राजकारणी पुरुष नव्हते. आपण फडक्यांच्या अभियोगात अडकविले जाऊ या भीतीने फडक्यांच्या पराभवाच्या काळात मुत्सद्दीपणाने त्यांचा धिक्कार करण्याएवढे जोतीराव राजकारणी पुरुष नव्हते.

जोतीराव 'दीनबंधू'मध्ये अनेक विषयांवर लेख लिहीत. 'दीनबंधू'तील जोतीरावांचे ते लेख वाचून त्यांचे सहकारी, अनुयायी व चाहते त्या विचारांचा खेड्यापाड्यांतून प्रचार करीत. सक्तीचे सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण सरकारने शक्यतो लवकर सुरू करावे अशी मागणी जोतीरावांनी 'दीनबंधू'मधून १८७९ सालच्या शेवटी नि १८८० सालच्या आरंभी सतत सुरू ठेवली होती. ब्रिटिश सरकारने १८७० सालच्या शिक्षणविषयक कायद्याप्रमाणे इंग्लंडमध्ये सर्वच ठिकाणी शाळा चालण्याचे ठरविले आणि १८८० साली

प्राथमिक शिक्षण वयाच्या १० वर्षापर्यंत सक्तीचे केले.[१२] ब्रिटनमध्ये जेव्हा जेव्हा प्रगतीसाठी स्थित्यंतरे घडत तेव्हा तेव्हा त्यांचे प्रतिध्वनी हिंदुस्थानात उठत.

इंग्लंडमध्ये उपरोक्त शिक्षणविषयक कायदा झाल्यावर जोतीरावांनी सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची पुन्हा मागणी केली. आणि सरकारला त्याविषयी विचार करण्यास कळकळीची विनंती केली. यशाने जोतीराव हुरळून जात नसत. तसेच कष्टाने आणि अपयशाने ते निरुत्साही होत नसत. स्कॉटलंडमध्ये १८९० साली आणि आयर्लंडमध्ये १८९२ साली सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू झाले. ही लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

खडकवासला येथील काल्व्याचे काम पूर्ण झाल्यावर त्या काल्व्याचे पाणी शेतकीसाठी खुले करण्यात आले. तथापि त्या काल्व्याच्या पाण्याचा उपयोग आपल्या शेतांसाठी करण्यास शेतकरी राजी नव्हते. कुठलाही नवीन प्रयोग वा सुधारणा अंगीकारण्यास शेतकरी उत्साही नसतात. त्यांना नवीन प्रयोगाची भीती वाटत असते. सरकारने शेतकऱ्यांना चांगले वियाणे, उपकरणे आणि खत द्यावे याविषयी आपल्या लेखांतून आणि भाषणांतून जोतीरावांनी मागणी केली होती. सरकारने कालवे काढून मोठी उपयुक्त सुधारणा केली याविषयी जोतीरावांनी जी स्तुती केली, ती उगाच नव्हती. अज्ञानामुळे आणि भोळ्या समजुतीमुळे शेतकरी शेतकीच्या नवीन पद्धतींना विरोध करीत होते, याची कल्पना जोतीरावांना होती. त्यांचे ते अज्ञान आणि भोळी समजूत घालवून त्यांच्यापुढे चांगले उदाहरण ठेवावे म्हणून त्यांनी दोनशे एकर जमीन खरेदी करून त्यात स्वतः नवीन पद्धतीने शेती करण्यास आरंभ केला. त्यासाठी त्यांनी काल्व्याचे पाणी घेतले. शेतात बटाटे, नारिंगे, कॉलीफ्लॉवर, ऊस यांची लागवड केली. पुण्या-जवळील मांजरी जंगलातील जोतीरावांची आंबराई प्रसिद्ध होती. जोतीरावांचे उदाहरण पाहून काही शेतकऱ्यांनी त्यांचे अनुकरण केले आणि पुणे जिल्ह्यामध्ये नवीन तऱ्हेच्या शेतीची पद्धत सुरू झाली.

१२. Somervell, D. C., Modern Britain, 1870-1939, p. 5.

१३

# कामगार चळवळ व दारूबंदी

जोतीराव मुंबईस वारंवार जात असल्यामुळे त्यांना गिरणी कामगारांच्या हालअपेष्टांविषयी चांगली कल्पना आली होती. सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत बिचारे कामगार कामास जुंपलेले असत. दुपारी जेवणापुरतीच काय ती त्यांना थोडा वेळ सुट्टी मिळावयाची. जोतीरावांचे मुंबईतील मुख्य सहकारी नारायणराव मेघाजी लोखंडे ह्यांनी गिरणी कामगारांच्या उन्नतीसाठी आणि त्यांच्या कष्टमय परिस्थितीत पालट घडवून आणण्यासाठी झगडण्याचे ठरविले.

कृष्णराव भालेकर यांनी चार वर्षे तोटा सोसून 'दीनबंधू' पुण्यात चालविला. शेवटी नारायणराव लोखंडे नि रामजी संतुजी आवटे ह्यांनी 'दीनबंधू' मुंबईस आणला. त्या दोघांनी एक छापखाना विकत घेऊन 'दीनबंधू' भागीत सुरू करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे तो १८८० च्या मे महिन्यापासून मुंबईत प्रसिद्ध होऊ लागला.[१] 'दीनबंधू'चे संपादकत्व दामोदर सावळाराम यंदे ह्या बहुश्रुत, तडफदार, मधुभाषी, लोकसंग्रही आणि योजनाकुशल व्यक्तीकडे सोपविण्यात आले. हे इंग्रजी-मराठी साप्ताहिक थोड्याच काळात

१ पाटील, मुकुंद गणपत, हिंदु आणि ब्राह्मण, पृ. १७.

लोकप्रिय झाले. त्याची वार्षिक वर्गणी सव्वा रुपया होती. त्यातील लेखांतील तडफ नि तळमळ पाहून त्याच्या वर्गणीदारांची संख्या वाढली. परंतु आवस्त्यांचे लोखंड्यांशी जमेना. आपले भाग-भांडवल परत घेऊन ते वेगळे झाले. त्यांच्याबरोबरच यंदेही 'दीनबंधू' सोडून गेले.[२] पुढे इंग्रजी विभागात एक उच्चपदस्थ गृहस्थ लिहीत असत, तर मराठी विभागात लोखंडे गर्जत असत. 'दीनबंधु' सोडल्यावर कृष्णराव भालेकर १८८१ ते १८८३ पर्यंत नीरा कालव्याचे कामावर सब ओव्हरसिअर म्हणून नोकरी करीत असत. वेळात वेळ काढून ते शेतकऱ्यांच्या गाऱ्हाण्यांकडे लक्ष पुरवीत.

कामगारांच्या उद्धारासाठी जीवित व्यतीत करणाऱ्या नारायणराव लोखंड्यांचा जन्म माळी समाजातील एका कुटुंबात ठाणे येथे १८४८ साली झाला. तेथेच त्यांचे माध्यमिक शाळेत शिक्षण झाले. त्यानंतर ते मुंबईस येऊन भायखळा येथे राहिले. तेथे त्यांनी फाझलभाई नानशी नावाच्या एका खोजा व्यापाऱ्याशी मैत्री संपादन केली. त्यांना ते सल्लामसलत देत. नारायणरावांनी प्रथम रेल्वेखात्यात काही काळ नोकरी केल्यावर टपालखात्यात कारकुनाची नोकरी केली. नंतर मांडवी विभागातील एका कापड गिरणीत कोठीकारकून म्हणून ते काम करू लागले.

कामगारांना अडचणींना आणि कष्टांना तोंड द्यावे लागते याचा त्यांनी तेथे बारकाईने अभ्यास केला. ते सत्यशोधक समाजाचे तरुण नेते होते. जोतीरावांच्या मार्गदर्शनाखाली गिरणी कामगारांच्या उद्धाराचे काम करण्यास त्यांनी आरंभ केला. मुंबई प्रांतात स्पिनिंग अँड विव्हिंग कंपनी नावाची पहिली गिरणी ७ जुलै १८५४ रोजी कावसजी दावर[3] ह्या पारशी गृहस्थांनी स्थापन केली. त्यांचे सहकारी वेगवेगळ्या धर्मांचे असत. कावसजी दावर हे त्या वेळी एकूणचाळीस वर्षांचे असून त्यांचे वडील एक मोठे व्यापारी होते. काही आठवड्यांनंतर माणेकजी पेटीट यांनीही एक गिरणी उघडली.

मुंबईत गिरण्याचा धंदा सुरू करावा, ही कल्पना १८५० साली डॉ. भाऊ [४]दाजी लाड यांनी प्रथम बोलून दाखविली होती. तथापि त्यांची निश्चित अशी काही योजना बाहेर पडली नाही. त्यानंतर हळूहळू गिरण्यांचा धंदा वाढत गेला, तरी कामगारांची गाऱ्हाणी मुखर करणारी एकही संस्था नव्हती. सोराबजी शापुरजी बंगाली नावाचे एक पारशी विद्वान आणि समाजसुधारक होते. ते गिरणी कामगारांच्या बाजूने गिरणी-मालकांची सहानुभूती जागृत करण्याचा व्यक्तिशः प्रयत्न करीत. काही उदारमतवादी व्यक्ती सोराबजी शापुरजी यांना पाठिंबा देत असत.

अठराशे पंचाहत्तरच्या मार्चमध्ये गिरणीकामगारांच्या परिस्थितीचा विचार करण्यासाठी

---

२. तारकुंडे, सीताराम रघुनाथ, ब्राह्मणेतर व मराठे ह्यांच्या चळवळीचा पूर्वेतिहास आणि मराठ्यांची पूर्वपीठिका, पृ. ६.

३. Mehta, S. D., The Cotton Mills in India, 1854 to 1954, p. 7.

४. —कित्ता—पृ. ७.

सरकारने एक मंडळ नेमले. त्याचे सर्व सभासद प्रमुख गिरणीमालक होते. बाल्यावस्थेत असलेल्या कापड धंद्यावर कोणत्याही तऱ्हेची बंधने लादू नयेत, असे त्यांचे मत पडले. तरुण मुलांना सर्व दिवसभर कष्टाची कामे करावी लागत. स्त्रियांना गिरणीत दर दिवशी पुष्कळ तास राबावे लागे. ह्या गोष्टींची त्यांनी मुळीच दखल घेतली नाही. त्या वेळी मुंबईत ४१, कलकत्त्यात ५, मद्रासमध्ये २, कानपूरला २, नि हैद्राबाद, इंदूर व नागपूर येथे एक एक अशा प्रकारे हिंदुस्थानात एकंदर ५३ गिरण्या होत्या.

'दीनबंधू'चे संपादक होताच जोतीरावांच्या प्रोत्साहनामुळे लोखंड्यांनी मुख्या गरीब कामगारांच्या गाऱ्हाण्यांना वाचा फोडण्याचे कार्य मोठ्या धैर्याने हाती घेतले. आरंभी त्यांचा दृष्टिकोण काहीसा तडजोडवादी असे. त्यामुळे गिरणीमालक त्यांच्या संघटनेला विशेषसा विरोध करीत नसत. लोखंडे यांची कार्यशक्ती दांडगी होती. त्यांनी मुख्यतः गिरणी कामगारांच्या चळवळीचे कार्य हाती घेतले, तर कृष्णराव भालेकरांनी शेतकऱ्यांच्या कल्याणार्थ अविरत चळवळ सुरू केली. जोतीरावांचे हे दोन प्रमुख सहकारी, कामगार आणि शेतकरी ह्यांचे बिकट प्रश्न सोडविण्याचे महत्कार्य करीत होते.

दिवसाचे सुमारे १४ तास कामगारांना हाडांची काडे करून काम करावे लागते, अशी 'दीनबंधू'मध्ये[५] लोखंड्यांनी ओरड करण्यास सुरुवात केली. त्यावर गिरणी-मालक म्हणत की, 'बहुतेक कामगार हे ठेकेदारीने काम करतात. त्यांचे वेतन ठरलेले नाही. यास्तव कामगारांनी अखंडपणे काम करणे हे त्यांच्या हिताचे आहे.' कामगारांना एकाच स्थितीत कोंडलेल्या जागी अनेक तास काम करावे लागते, असे 'दीनबंधू'चे दुसरे गाऱ्हाणे होते. त्यावर गिरणीमालक म्हणत की, 'कामगारांना पाळीपाळीने बाहेर मोकळ्या हवेत सोडण्यात येते.' त्याला 'दीनबंधू' असे उत्तर देई की, 'वस्तुस्थिती अशी आहे की जर कामावरून थोडा वेळ रजा घेतली, तर कामगारांना प्रत्येकी चार आणे दंड करण्यात येतो. म्हणून कामगारांची शक्ती पिळून काढणारे ते काम थांबवून विश्रांती घेण्याला त्यांना तशी खरी मोकळीक कसली ती नसते. लहान मुले गिरण्यांमध्ये नोकरीस आहेत आणि आपला सर्व वेळ गिरण्यांत ती काम करीत असतात. तरी ती आपले काम विशेष ताण न पडता सावकाशपणे करीत असतात असे जे मत १८७५ साली सरकारने नेमलेल्या मंडळाने व्यक्त केले आहे, त्याला पुरावा नाही.'

कामगारांचा प्रश्न हा गरीब जनतेचा प्रश्न असल्यामुळे बिचारा 'दीनबंधु' त्यांच्या उद्धारासाठी त्या वेळी एकाकीच लढत राहिलेला होता. राष्ट्रोद्धाराचे कंकण बांधून तत्प्रीत्यर्थ समरांगणावर उतरण्याची द्वाही दुमदुमत ठेवणारे स्वयंमन्य शिवाजी विष्णु-शास्त्री चिपळूणकर, ॲडिसन आणि जॉन्सन यांच्या वाङ्मयाचा रसास्वाद घेण्यात गुंग होऊन गेले होते. शेतकरी आणि कामगार यांच्या पिळवणुकीसंबंधी त्यांच्याजवळ सांगण्यासारखे काहीच नसे. 'रास्त गोफ्तार' नावाचे एक गुजराती साप्ताहिक होते. ते

५. दीनबंधु, १८ जानेवारी १८७९.

सामाजिक सुधारणावादी असे. परंतु ते राजकीय दृष्ट्या सुधारणावादी नव्हते. ते साताहिक कामगारांच्या आशाआकांक्षेविषयी सहानुभूती बाळगीत असे. तथापि कामगारांच्या उद्धारार्थ वाहिलेले सत्यशोधकाचे मुखपत्र 'दीनबंधु' हेच हिंदुस्थानातील कामगारांचे पहिले वर्तमानपत्र होय.[६] जोतीराव आणि लोखंडे मुंबईत कामगारांच्या सभांतून भाषणे करीत. त्या काळी मुंबईतील गिरणीकामगार हे जवळजवळ सर्वच मराठी भाषिक असत.

ह्या सर्व गोष्टींमुळे नारायणराव लोखंडे यांना हिंदुस्थानातील कामगार संघटनेचा आद्य-जनक म्हणतात ते यथार्थ आहे. अठराशे ऐंशी सालच्या प्रारंभी त्यांनी आपली 'मिल हॅण्ड असोसिएशन सोसायटी' स्थापन केली. ती भारतातील कामगारांची पहिलीवहिली संस्था होय. लोखंडे हे त्या संस्थेचे अध्यक्ष असत. कामगाराची संस्था स्थापण्याला गिरणीमालकांनी विरोध केला नाही. फॅक्टरी कमिशन नावाचे एक मंडळ सरकारने कामगारांची परिस्थिती पाहण्याकरिता नेमले. त्या वेळी लोखंड्यांनी फॅक्टरी कमिशनवर कामगारांचा प्रतिनिधी निवडण्यासाठी परिषद बोलाविली. त्या परिषदेने लोखंड्यांनाच प्रतिनिधी म्हणून निवडले.

त्या काळी पुण्यात डेक्कन सोशल रिफॉर्म असोसिएशन नावाची संस्था ब्राह्मणांनी स्थापली होती. त्या सभेचे अध्यक्ष प्रा. केरो लक्ष्मण छत्रे हे होते. त्या संस्थेचे वार्षिक संमेलन १४ ऑक्टोबर १८८० रोजी भरले. त्या संस्थेच्या कार्यकारी मंडळाची सभा मार्च १८८० मध्ये झाली होती. कार्यकारी मंडळाने १८८० मध्ये कुस्त्यांचे सामने भरवून आणि इतर खेळांचे सामने भरवून होळीचा सण साजरा करण्याचे ठरविले. जरी ह्या संस्थेच्या नावात 'सामाजिक सुधारणा' होती, तरी ती 'नाव सोनुबाई हाती कथलाचा वाळा' अशी असल्यामुळे अशा निरुपयोगी संस्थेचे सभासद होणे जोतीरावांना आवडले नसावे, हे उघड आहे. ती संस्था आपोआपच काळाच्या उदरात गडप झाली.

पुण्यातील गणेश वासुदेव जोशी तथा सार्वजनिक काका हे २५ जुलै १८८० रोजी निधन पावले. ते खऱ्या अर्थाने जनतेचे सार्वजनिक काका होते. देशहिताची अनेक कार्ये त्यांनी आरंभली होती. सार्वजनिक काकांचा उत्साह अमर्याद होता. जनतेची सेवा करणे हाच त्यांच्या आयुष्याचा स्थायीभाव होता. एका ब्राह्मण बाईला काही ब्राह्मण ठकवीत होते. त्या बाईच्या वतीने अभियोग चालवून त्यांनी त्या ब्राह्मणांना शिक्षा करविली. सार्वजनिक काका हे स्वदेशीचे उद्गाते होते. धैर्य व स्वाभिमान हे त्यांच्या स्वभावाचे वैशिष्ट्य होते.

लोकहितवादी गोपाळराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यातील लोकांनी सार्व-जनिक काकांच्या मृत्यूनंतर एक शोकसभा भरविली. त्या सभेत काकांचा त्याग आणि देशाभिमानयुक्त लोकसेवा ह्याविषयी एक ठराव संमत करण्यात आला. सरदार टी.

---

६. Mehta, S. D., The Cotton Mills in India, 1854 to 1954, p. 134.

एन्. राजमाचीकर यांनी दुसरा ठराव मांडला. त्याला वामन शिवराम आपटे यांनी दुजोरा दिला. 'चालू आणीबाणीच्या परिस्थितीत हिंदी सरकारला सहानुभूती दाखवून कंदाहारमध्ये इंग्रज सैन्याची जी कत्तल झाली आणि त्यांच्या प्रतिष्ठेला धक्का बसला, ती प्रतिष्ठा लवकर भरून येवो,' असे त्या ठरावात म्हटले होते.

तिसरा ठराव जोतीरावांनी मांडला. त्या ठरावाला विनायक बापूजी भांडारकर यांनी पाठिंबा दिला. त्या ठरावात असे म्हटले होते की, 'क्रमांक २ चा उपरोक्त ठराव मुंबईच्या राज्यपालांकडे पाठवून तो ठराव महाराज्यपाल तसेच महाराणी व्हिक्टोरिया यांजकडे पाठविण्याची त्यांना प्रार्थना करावी.' त्यावेळी जोतीरावांनी भाषण केले.[७] त्यात ते सार्वजनिक कार्यांविषयी काही विशेष बोलले की त्यांनी ब्रिटिश सैन्याची कंदाहारमध्ये कत्तल झाली त्याविषयी सहानुभूती दाखविली हे 'ज्ञानप्रकाश'च्या वृत्तावरून नीटसे समजत नाही.

पुणे नगरपालिकेतील जोतीरावांचे कार्य सुरळीतपणे चालले होते. जून १८८० मध्ये हरि रावजी चिपळूणकर ह्यांनी 'नगरपालिकेच्या कार्यकारी मंडळाची निवडणूक दर वर्षी कामकाजाचे वर्ष सुरू होण्यापूर्वी सर्व सभासदांच्या मताने व्हावी,' अशी शिफारस करणारा ठराव मांडला. दर सहा महिन्यांनी नगरपालिकेचे सभासद बदलत असत. त्यामुळे नगरपालिकेच्या कार्याकडे भरपूर वेळ देऊन लक्ष केंद्रित करण्याला सभासदांना वाव मिळत नसे. या ठरावाला जोतीरावांनी पाठिंबा दिला.[८] कांही सभासदांनी त्या ठरावाला दुरुस्त्या सुचविल्या. परंतु त्या फेटाळण्यात आल्या आणि मूळ ठराव संमत झाला. या ठरावाचा मुख्य उद्देश असा होता की, कार्यकारी मंडळ हे सर्वसामान्य समितीला जबाबदार असले पाहिजे. जोतीराव हे जनहितदक्ष असल्यामुळे ज्या सूचनेमुळे सत्ता एखाद्या कंपूच्या हाती जाऊन लोकांच्या हिताकडे दुर्लक्ष होईल अशा कोणत्याही सूचनेला ते विरोध करीत असत.

ह्या ठरावानंतर दोन महिन्यांनी पुणे नगरपालिकेपुढे एक महत्त्वाचा ठराव विचारासाठी आला. वेताळपेठेत भाजीपाल्याच्या बाजारासाठी एक नवीन इमारत बांधावी असे त्या ठरावात म्हटले होते. त्या ठरावाला हरि रावजी चिपळूणकर ह्यांनी एक दुरुस्ती सुचविली. जोतीरावांनी हरि रावजींच्या सूचनेला पाठिंबा देताना म्हटले की, ते छप्पर उभारण्यासाठी खर्च संमत करावा. परंतु दुकानदाराला चार आण्यापेक्षा अधिक मासिक भाडे लावू नये.[९] नगरपालिकेत काम करताना जोतीरावांची दृष्टी नेहमी गरिबांच्या हिताविषयी जागरूक असावयाची. गरिबांच्या हिताचे रक्षण करणे व त्यांच्या हिताच्या दृष्टीने ठराव आणणे हे आपले आद्य कर्तव्य आहे, असे ते मानीत.

---

७. ज्ञानप्रकाश, ९ ऑगस्ट १८७९.

८. मंगुडकर, डॉ. मा. प., पुणे नगरसंस्था शताब्दी ग्रंथ, पृ. ५०४.

९. —कित्ता—पृ. ५०४.

जोतीरावांचे निर्भयता आणि निस्पृहता हे गुण सरकारी महान अधिकाऱ्यांच्या बाबतीतही कसे अबाधित राहत हे दिसून येते. हिंदुस्थानचे महाराज्यपाल लॉर्ड लिटन हे पुण्याला भेट देणार होते. त्यानिमित्त सर्व शहर सुशोभित करावयाचे होते. नगरपालिका त्यासाठी पैसा खर्च करणार होती. मुद्रणकायदा जारी करून हिंदुस्थानातील वर्तमानपत्रांची लिटन साहेबांनी मुस्कटदाबी केली होती. त्यामुळे सर्व देशभर हाहा:कार उडाला होता. लोकमत त्यांच्याविरुद्ध क्षुब्ध झालेले होते. अशा झोटिंगशहाचा सत्कार करण्याचा उद्देश निवेदन करणारे एक परिपत्रक पुणे नगरपालिकेच्या अध्यक्षांनी ३० नोव्हेंबर १८८० रोजी सर्व सभासदांना पाठवून, महाराज्यपालांच्या भेटीप्रीत्यर्थ शहर सुशोभित करण्यास एक सहस्र रुपये खर्च करण्यास सभासदांची अनुमती विचारली.

नगरपालिकेचे एकूण ३२ सभासद होते. पैसे खर्च करण्यास ३१ सभासदांनी होकार दिला. एकट्या जोतीरावांनी जनतेचे पैसे अशा रीतीने खर्च करण्यास विरोध केला. महाराज्यपालाच्या भेटीप्रीत्यर्थ होणाऱ्या खर्चाला अशा रीतीने उघड विरोध करण्याचे धैर्य त्या काळी एकट्या जोतीरावांनी दाखविले. जोतीराव म्हणाले की "नामदार व्हाइसरॉय साहेबांच्या मानपत्रासाठी पैसा खर्च करण्यापेक्षा पुणे शहरातील गरीब नागरिकांच्या शिक्षणासाठी ती रक्कम खर्च केली तर अधिक चांगला उपयोग होईल."[१०] गरिबांचे जे जे हित साधता येईल ते ते साधावे, अशीच त्यांची धारणा होती. महाराज्यपाल लॉर्ड लिटन ह्यांनी पुण्यास भेट दिली. त्यांचा सन्मानही करण्यात आला. परंतु नगरपालिकेच्या इंग्रज अधिकाऱ्याने केलेली लोकहितविरोधी सूचना धुडकावून लावण्याचा नगरपालिकेला हक्क आहे असे सिद्ध करून जोतीरावांनी इतर सभासदांना मोठे स्वाभिमानाचे उदाहरण घालून दिले, ही गोष्ट राज्यपालाच्या भेटीपेक्षा महत्त्वाची ठरली. पुढील काळात एखाद्या नगरपालिकेच्या राष्ट्रीयसभावादी सभासदांनी एखाद्या लॉर्डसाहेबाच्या मानपत्रास विरोध केला असेल. पण ते कडवे प्रयत्न राष्ट्र जागृत झाल्यावर झाले. जोतीरावांच्या काळी तरी अशी घटना घडणे ही विलक्षण धाडसाची गोष्ट होती, हे लक्षात ठेवले पाहिजे.

२

वर उल्लेखिलेल्या प्रसंगानंतर जोतीराव पुन्हा एकदा सरकारला विरोध करावयास पुढे आले. त्या काळी दारूचे व्यसन पुरविण्यासाठी सरकार दारूच्या गुत्त्यांची संख्या वाढविण्याचा विचार करू लागले होते. दारूच्या व्यसनाला जोतीरावांचा विरोध होता. त्यामुळे त्यांनी पुणे नगरपालिकेच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष प्लंकेट ह्यांना या बाबतीत १८ जुलै, १८८० रोजी कडक भाषेत एक पत्र लिहिले. त्यात ते म्हणाले की, "नगरपालिकेने बराच पैसा खर्च करून लोकांचे आरोग्य सांभाळण्याच्या उद्देशाने बराच मोठा

---

१०. मंगुडकर, डॉ. मा. प., पुणे नगरसंस्था शताब्दी ग्रंथ, पृ. ५०५–०६

नोकरवर्ग नेमला आहे. लोकांचे आरोग्य सांभाळण्याचे दृष्टीने तसे एक खातेसुद्धा ती चालवीत आहे. तथापि ज्या पुणे शहराला दारूचे गुत्ते परिचित नव्हते, त्यात आता भरवस्तीत दारूचे गुत्ते उघडल्यामुळे लोकांच्या नैतिक अधःपाताची सर्व प्रकारची बीजे पेरली जात आहेत. त्यामुळे शहराचे आरोग्य सांभाळणे हा जो नगरपालिकेचा एक उद्देश आहे, त्याला बाध येत आहे."

जोतीराव पुढे म्हणाले, "दारूचे व्यसन हे नागरिकांच्या नैतिक आचरणाला बाधक आहे; एवढेच नव्हे तर, त्यांच्या आरोग्यालाही अतिशय अपायकारक आहे. हे माझे म्हणणे बहुतेक लोक आपखुषीने मान्य करतील. दारूचे गुत्ते शहरात उघडल्यापासून दारूबाजी इतक्या प्रचंड प्रमाणात वाढली आहे की, त्यामुळे अनेक कुटुंबांचा संपूर्ण नाश झाला आहे. आणि ह्या दुर्गुणाला आता शहरात सराईतपणा आला आहे."

"ह्या व्यसनाच्या प्रसाराला काही प्रमाणात तरी आळा बसावा म्हणून मी नगरपालिकेला अशी सूचना करतो की, नगरपालिकेने या दारूगुत्त्यांवर ते ज्या प्रमाणात हानी करतात त्या प्रमाणात कर बसवावा. मला असे कळते की, कुठल्याही नगरपालिकेने अशा गुत्त्यांवर कर बसविलेला नाही; मात्र त्यांच्यावर मध्यवर्ती सरकारचा कर असतो. या बाबतीत आवश्यक तर नगरपालिकेने चौकशी करावी. माझा हा ठराव नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेपुढे ठेवल्यास मी आपला आभारी होईन."

जोतीरावांनी दारूबंदीच्या बाबतीत अशा तऱ्हेचे पत्र लिहिले आहे असे समजताच, सर्व शहरात खळबळ उडाली. पुण्यातील 'ज्ञानप्रकाशा'ने तर जोतीरावांची प्रशंसाच केली. आणि जोतीरावांच्या म्हणण्याला पाठिंबा दिला. 'ज्ञानप्रकाश' वृत्तपत्र म्हणाले, 'जोतीरावांनी प्रथमच नगरपालिकेचे ठळक लक्ष ज्या विषयाकडे जोराने वेधले आहे, तो विषय फार महत्त्वाचा आहे असा आमचा विश्वास आहे. त्यांच्या ह्या कृत्यामुळे फुले हे निःसंशयपणे अभिनंदनास पात्र ठरले आहेत.' जोतीरावांना त्या पत्राची पोच मिळाल्यानंतर कार्यकारी मंडळाच्या पहिल्याच सभेवर ते पत्र ठेवण्यात आले आणि त्यासंबंधी पुढील ठराव करण्यात आला.

"हा विषय सर्वसाधारण सभेच्या पुढे ठेवावा की काय याचा विचार अध्यक्षमहाशयांनी करावा. मध्यवर्ती सरकारच्या तारीख २२ आक्टोबर १८७७ च्या क्रमांक ३००४ ह्या ठरावाप्रमाणे दारूवर कर बसविता येत नाही. सभा अशी आशा व्यक्त करीत आहे की, पुढील काळात पुण्यातील दारूगुत्त्यांची संख्या कमी करता येणे शक्य होईल."

कार्यकारी मंडळाचा तो ठराव आणि जोतीरावांचे मूळ पत्र नगरपालिकेचे अध्यक्ष रिचे ह्यांच्या स्वाधीन करण्यात आली. त्यांनी तो ठराव नि ते पत्र ही २७ जुलै रोजी हेन्री डिक्सन ह्या अबकारी अधिकाऱ्याकडे अभिप्रायासाठी पाठवून दिली. डिक्सन यांनी ३० जुलै रोजी शेरा मारून ते प्रकरण अध्यक्षांकडे परत पाठविले. आपल्या शेऱ्यात ते अबकारी अधिकारी म्हणाले, "आम्ही नम्रपणे निवेदन करतो की, १८७३–७४

ते १८७६-७७ पर्यंत पुणे शहरात चार दारूगुत्ते होते. अठराशे सत्याहत्तर-अठ्ठयाहत्तरपासून सहा दारूगुत्ते वाढविल्यामुळे त्यांची संख्या आता दहा झाली आहे."

"हे नवे सहा दारूगुत्ते वाढविण्याची परवानगी जिल्हाधिकारी यांनी दिली. कारण असे झाले की, शहरात ज्या ठिकाणी आता गुत्ते काढले आहेत, त्या ठिकाणी चोरट्या दारूचा सुळसुळाट झाला होता. चोरट्या दारूला उत्तेजन मिळू नये या उद्देशाने ही गोष्ट करण्यात आली. पुण्यात आलेली चोरटी दारू ही अत्यंत अशुद्ध आणि आरोग्याला अपायकारक असे. अठराशे चौऱ्याहत्तर साली दारूचा खप १५६९७ गॅलन होता, तो १८७९ मध्ये २२९१२ गॅलनपर्यंत वाढला."

अबकारी अधिकारी डिक्सन याने पाठविलेल्या प्रतिवृत्तावरून जोतीरावांच्या पत्रातील विधानाची सत्यता जिल्हाधिकाऱ्यांना पटली, असे 'ज्ञानप्रकाशा'ने म्हटले आहे. दारूचे व्यसन पुणे शहरात अत्यंत झपाट्याने वाढत होते, हे जिल्हाधिकाऱ्यांना पटले. 'लोकांना दारू मिळण्याच्या सोयी वाढल्यामुळे ज्या अनेक लोकांत दारूची चव निर्माण होणे कदाचित अशक्य होते, त्यांच्यामध्ये दारू पिण्याची आवड निर्माण झाली.' असा शेरा त्या पत्रव्यवहारावर जिल्हाधिकाऱ्यांनी मारला.

रिचे यांनी ८ ऑगस्ट १८८० रोजी पोलीस पर्यवेक्षकाकडे हे प्रकरण धाडले. त्या पोलीस अधिकाऱ्याने २७ ऑगस्ट रोजी उत्तर धाडले की, "लोकांमध्ये दारूचे व्यसन झपाट्याने वाढत आहे अशी प्रचलित समजूत आहे. याचे कारण असे की, पूर्वी श्रीमंत लोक कदाचित दारू पीत नसावे आणि आता यांच्यामध्ये दारूचे व्यसन शिरले आहे. परंतु आताही ते गावठी दारू यथेच्छ झोकतात असे नाही."

त्या पोलीस अधिकाऱ्याने आपल्या वृत्तांतात व्यवहारी दृष्टिकोण पुढे ठेवून म्हटले की, "कोणत्याही व्यसनाला योग्य वेळी आळा घातला नाही, तर त्याचा कल वाढण्याकडे असतो. या नियमाला दारूचे व्यसन अपवाद नाही. जर हे व्यसन सुरू आहे असे मानले, तर जोतीराव गोविंदराव फुले यांनी सुचविलेला उपाय हा त्याला आळा घालण्यासाठी समर्थ होईल असे वाटत नाही. शहरातील दारूच्या गुत्त्यांची संख्या कमी करून दारूचा खप मुळीच कमी होणार नाही. सोयीच्या ठिकाणी दारूचे गुत्ते उघडून दारू जेवढी उघडपणे खपेल तितकीच चोरटी गावठी अशुद्ध दारू संपेल. मग लोक दारू-गुत्त्यांत जाऊन सरळ पितील किंवा गुत्त्यांत ते एवढी दारू पितील की तो लांब असल्यामुळे गुत्त्यांत त्यांना पुन्हा जाण्याची इच्छा होणार नाही. लोकांच्या प्रकृतीला इतर गोष्टींपेक्षा ह्यामुळेच विशेष अपाय होण्याचा संभव आहे, म्हणून गुत्ते कमी न करता त्यांत वाढ करावी अशी आमची सूचना आहे."

हा सर्व पत्रव्यवहार जिल्हाधिकारी रिचे यांनी पुणे नगरपालिकेकडे परत पाठविला. त्यावर त्यांनी असा शेरा मारला की, 'दारूचे गुत्ते वाढविल्यामुळे व्यसन वाढले आहे असे म्हणता येत नाही.' या प्रकरणात 'ज्ञानप्रकाशा'ने शेवटी म्हटले आहे की, दारूच्या गुत्त्यांत वाढ झाल्यामुळे दारूचे व्यसन फैलावले आहे हा मुद्दा विचारासाठी

घेतलेला नव्हता. या व्यसनाच्या प्रसाराला आळा घालण्यासाठी काही उपाययोजना करता येईल की नाही हा प्रश्न होता. जोतीराव फुले यांच्या पत्रावरील आपल्या ठरावात नगरपालिकेने अशी इच्छा प्रदर्शित केली होती की, भविष्यकाळात दारुगुत्त्यांची संख्या कमी होईल, या दृष्टीनेच पुढील व्यवहारात काळजी घ्यावी, याची 'ज्ञानप्रकाशा'ने नगरपालिकेच्या सभासदांना आठवण दिली.''

ब्रिटिश राज्यकर्त्यांचे म्हणणे असे होते की, शुद्ध दारूचे व्यसन हे गावठी चोरट्या अशुद्ध दारूच्या व्यसनापेक्षा आरोग्याला कमी धोक्याचे आणि कमी अपायकारक आहे. दारूचे व्यसन फैलावू नये अशी जोतीरावांची इच्छा होती. संपूर्ण दारूबंदीच्या स्वर्गाची त्यांनी कल्पना केली होती असे म्हणता येत नाही. हिंदुस्थानातील महान ग्रंथांतून आणि आधुनिक हिंदी भाषांत दारुला जी अनेक नावे सापडतात ती पाहिली असता वेदकालापासून दारू गाळण्यात येत असे, याविषयी शंका बाळगण्याचे कारण नाही.

तथापि दारूच्या व्यसनाविरुद्ध ओरड करणारे जोतीराव हे पहिले महाराष्ट्रीय होत असे म्हणता येणार नाही. अठराशे बावन्न साली सातार्‍यातील लोकांनी दारूच्या भट्ट्या आणि दारूचे गुत्ते नष्ट करण्यासाठी ब्रिटिश सरकारकडे एक अर्ज धाडला होता. सी. डब्ल्यू. बेल ह्या सरकारी अधिकार्‍याने १८६९ साली मुंबई सरकारच्या अबकारी धोरणासंबंधी सरकारला एक प्रतिवृत्त सादर केले होते.[१२] त्यात त्यांनी असे म्हटले होते की, पेशव्यांच्या राजवटीतील शेवटच्या काळात दारूचे व्यसन वाढले होते. त्यापासून उत्पन्न होणारा करही वाढत होता. म्हणून त्यासंबंधी गुन्हेगारांना कडक शिक्षा ठेवल्या होत्या.

## ३

जुलै अठराशे ब्यायशीच्या शेवटी हरि रावजी चिपळूणकर आणि जोतीराव फुले यांनी नरसो रामचंद्र नावाच्या एका म्युनिसिपल अधिकार्‍याच्याविरुद्ध अविश्वासाचा ठराव मांडला. नगरपालिकेच्या उपयोगासाठी त्याने जे पत्रे विकत घेतले, त्यासाठी भरमसाट पैसे खर्च होण्यास तो अधिकारी जबाबदार होता. परंतु तो ठराव केवळ दप्तरी दाखल करण्यात आला. कारण त्या अधिकार्‍याची चौकशी करण्याइतका भरपूर पुरावा पुढे आलेला नव्हता.

कोणत्याही धर्मग्रंथात अथपासून इतिपर्यंत संपूर्ण सत्य सांगितले नाही, अशी जरी जोतीरावांची धारणा होती, तरी ज्याप्रमाणे ब्राह्मणी धर्मावर ते तुटून पडले त्याप्रमाणे ते खिस्तीधर्मावर टीका करीत नसत. त्यांच्या सहकार्‍यांनी मात्र खिस्ती धर्मावर आणि खिश्चनांवर टीका केली. खिस्ती पाद्र्यांच्या सेवाभावाचा जोतीरावांच्या मनावर जो काही काळ पगडा बसला होता, तो आता कमी झाला होता. ह्या विषयावर 'ज्ञानोदया'त एक

११. ज्ञानप्रकाश, २७ सप्टेंबर १८८०.

१२. मौज, रौप्यमहोत्सव अंक, पृ. १०७.

वाद-विवाद होऊन गेला. सरतेशेवटी 'ज्ञानोदया'ने म्हटले की, 'ज्याला त्याला आपल्या धर्मांचा श्रेष्ठ अभिमानही वाटतो.'

जोतीरावांच्या सहकाऱ्यांनी सरकारवरही टीका केली. त्यांचे तरुण सहकारी भालेकर आणि लोखंडे यांनी शेतकरी आणि कामगार यांची जमीनदार, सावकार आणि गिरणी-मालक यांच्याकडून आणि इंग्रजांकडून जी पिळवणूक चालली होती त्याविरुद्ध ओरड केली. विशेषतः भालेकर यांनी देशाभिमानाने प्रेरित होऊन आपल्या पोवाड्यात व काव्यात इंग्रज सरकारच्या स्वार्थी धोरणावर खरमरीत टीका केली आहे. जर त्या काळच्या देशाभिमानी नेत्यांनी व विचारवंतांनी सावकारशाही, नोकरशाही आणि भटशाही यांनी शेतकरी, कामगार आणि गरीब रयत ह्यांची जी पिळवणूक चालविली होती तिला उघडपणे विरोध केला असता, तर या सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांनी त्यांना पाठिंबा दिला असता. परंतु त्या काळच्या देशभक्तांच्या गावीही हे विचार नसावयाचे!

जोतीरावांचे उत्साही कार्य आणि त्यांचे नेतृत्व यांची छाप महाराष्ट्रात अनेक ठिकाणी दिसून येऊ लागली. फलटण संस्थानामधील कार्यकर्त्यांनी जोतीरावांना व्याख्यानासाठी बोलाविले. जोतीरावांचे मुखातून दलितांची दुःखे आणि गाऱ्हाणी व्यक्त होत असत. सामाजिक विषमता आणि सामाजिक अन्याय, समाजातील मक्तेदारी आणि जन्मजात प्रतिष्ठा यांच्याविरुद्ध जोतीरावांनी जेवढ्या त्वेषाने आणि भावनोत्कटतेने ओरड केली, तेवढ्या त्वेषाने त्यांच्या पिढीतील कोणत्याही नेत्याने वा विचारवंताने केलेली नाही. लोकांच्या मनावरील अज्ञानाची जळमटे दूर करून त्यांचा सुस्तपणा घालवून टाकण्यासाठी जोतीरावांनी आटोकाट प्रयत्न केले. सामाजिक कार्यकर्त्यांना नवीन युगाची आणि नवीन जीवनाची कल्पना देऊन त्यांची उदासीनता दूर करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या परि-स्थितीत काही सुधारणा घडवून आणावी आणि खेड्यापाड्यांतील संकुचित अन् गोठलेले जीवन व्यापक व प्रवाहशील बनवावे असे जोतीरावांचे ध्येय होते. प्रत्येक खेड्यात शाळा असावी; शेतकऱ्यांनी आधुनिक उपकरणे वापरून शेती करावी; घाणेरड्या सवयी, दारूचे व्यसन आणि कर्ज ह्यांच्या जीवघेण्या मगरमिठीतून खेडूत आणि शेतकरी सुटावे, धार्मिक निष्ठुर रूढी आणि जातिभेदाच्या दुष्ट कल्पना यांपासून त्यांची मुक्तता व्हावी, ह्यांसाठी ते प्रयत्न करीत होते. ते त्यांचे एक भव्य स्वप्न होते. गरिबांच्या मनात आशा निर्माण करून ते त्यांना अभय देत. दुःखितांचे आणि संकटग्रस्तांचे ते सांत्वन करीत.

जोतीरावांची चळवळ समाजात मूळ धरू लागली असे पाहताच सावकार, जमीनदार आणि वरिष्ठ ऐतोबा तसेच भटांचा वर्ग हे सर्व जोतीरावांवर शिव्याशापांचा वर्षाव करू लागले. जोतीरावांनी त्याच वेळी सावंतवाडीला भेट दिली. तेथेही त्यांची आवेशपूर्ण अशी शिक्षणाच्या महत्त्वाविषयी आणि सामाजिक समतेविषयी व्याख्याने झाली. सामान्य जनतेला जागृत करून तिचे अज्ञान, धर्मभोळ्या समजुती व सुस्तपणा ह्यांपासून तिची मुक्तता करण्यासाठी महाराष्ट्रात दौरा काढणारे पहिले नामवंत नेते म्हणजे

जोतीराव होत. लोकमान्य टिळक यांचे विवेकी नि विख्यात चरित्रकार साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांनी टिळकचरित्रात असे म्हटले आहे की, अठराशे ऐंशी साली न्यू इंग्लीश स्कूलचा जन्म होण्यापूर्वीच महाराष्ट्रात ब्राह्मणेतर चळवळ सुरू झाली होती. [१३] ते त्यांचे म्हणणे यथार्थ आहे.

वरवर पाहता सत्यशोधक समाजाच्या चळवळीचे स्वरूप ब्राह्मणेतर होते असे दिसे. तथापि जोतीरावांच्या काळात आणि पुढील काही वर्षेपर्यंत ती मुख्यतः ब्राह्मणेतर चळवळ नव्हती. ब्राह्मणांच्या हाती शासनसंस्था आणि आर्थिक व्यवहाराची साधने, त्याचप्रमाणे धार्मिक व सामाजिक सत्ता, असल्यामुळे आणि बहुसंख्य ब्राह्मणेतरांना हालअपेष्टा भोगाव्या लागत असल्यामुळे त्यांच्या त्या चळवळीला साहजिकच ब्राह्मणेतर स्वरूप प्राप्त झाले. आणखी असे की सत्यशोधक चळवळीचा रोख नागरी आणि ग्रामीण भाग यांमधील ज्ञान, संस्कृती या दृष्टीने अंतर कमी करण्यावर होता. देशाच्या नागरी भागात आणि जगात ज्या काही सुधारणा घडून येत होत्या, त्याविषयी ग्रामीण भाग अगदीच अज्ञानात होता. जोतीरावांची चळवळ ग्रामीण भागातील जीवनाचा सर्व दृष्टीने विचार करीत होती. ती खेड्यांतील लोकांना ज्ञान आणि जगातील घडामोडी यांची माहिती देत असे. तिचे कार्यकर्ते अज्ञान आणि पूर्वग्रह यांची जळमटे दूर करण्याचा प्रयत्न करीत होते. समाजसुधारणेची खेड्यांत पोहोचलेली अशी ही पहिलीच चळवळ होय.

याच संधीस रत्नागिरी येथील सरकारी माध्यमिक शाळेत सामान्य शिक्षकाची नोकरी करीत असलेले विष्णुशास्त्री चिपळूणकर हे वडिलांच्या मृत्यूनंतर मे १८७९ मध्ये पुण्यास परत आले. त्यांनी सरकारी नोकरीचा राजीनामा दिला आणि बाळ गंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर यांच्या सहकार्याने एक इंग्रजी शाळा १८८० च्या आरंभी सुरू केली. जानेवारी १८८१ मध्ये या त्रिमूर्तींनी 'केसरी' नावाचे मराठी व 'मराठा' नावाचे इंग्रजी अशी दोन साप्ताहिके आपल्या देशबांधवांना आपल्या देशातील घडामोडींची माहिती देण्यासाठी सुरू केली. 'केसरी'चे पहिले संपादक आगरकर, 'मराठ्या'चे पहिले संपादक टिळक होते. थोड्याच काळात विष्णुशास्त्र्यांचे चित्त अध्यापनव्यवसायातून उडू लागले. चित्रशाळा, किताबखाना व निबंधमाला यांच्या व्यवस्थेकडेच ते अधिक लक्ष देऊ लागले.

विष्णुशास्त्री स्वभावाने अबोल होते. अध्ययनशील होते. पण शेवटी शेवटी ते शाळेच्या व्यवस्थेविषयी उदासीन झाले. त्यांचे मन थकल्याभागल्यासारखे दिसे. 'केसरी' 'मराठ्या'चे संपादक ब्रिटिश राज्यकर्त्यांची तसेच देशी संस्थानिकांची भीड मुर्वत ठेवत नसत. ते जनतेचे कैवारी होते. त्याच सुमारास कोल्हापूर संस्थानातील कारभाराकडे त्यांचे लक्ष वेधले.

कोल्हापूर संस्थानाच्या गादीसाठी दत्तक घेतलेले राजपुत्र शिवाजीराव यांना वेड

---

१३. केळकर, न. चिं., लो० टिळक यांचें चरित्र, पूर्वार्ध. पृ. ७१.

लागण्याचे मागे काही कारण असावे की काय अशी लोकांमध्ये १८७७ सालापासून शंका उत्पन्न झाली होती. त्या वेळी महाराणीला हाताशी धरून दिवाण माधवराव बर्वे हे शिवाजीरावाला गादीवरून काढून टाकण्यासाठी काही कारस्थान रचीत आहेत अशी एक आवई उठली होती. राजपुत्र शिवाजीराव यांना काही विषारी औषधे देऊन हे कार्य त्यांना साधावयाचे होते, अशी बोलवा होती. कोल्हापूर आणि पुणे येथे ह्या कारस्थानाविषयी अनेक सभांतून ओरड करण्यात आली. राजपुत्राला दुसऱ्या एखाद्या नवीन पालकाच्या स्वाधीन करावे अशी लोक मागणी करू लागले.

'केसरी' आणि 'मराठा' ह्या दोन साप्ताहिकांनी, ह्या कारस्थानातील बर्वे हेच खलपुरुष आहेत, असे आपल्या स्तंभांतून प्रतिपादन केले. त्यामुळे 'केसरी' व 'मराठा' ह्यांवर बर्व्यांनी अब्रुनुकसानीची फिर्याद केली. 'ज्ञानप्रकाशा'त बर्व्यांच्या विरुद्ध त्याच प्रकारचे लेख आल्यामुळे त्यावरही बर्व्यांनी फिर्याद केली. त्या वेळी जोतीरावांच्या सांगण्यावरून टिळकांना जामीन राहण्यासाठी रामशेट उरवणे हे पुढे आले. जोतीरावांच्या मते टिळकांनी घेतलेली बाजू ही न्यायाची आणि सत्याची असल्यामुळे, जोतीरावांचे सहकारी आणि अनुयायी असलेले रामशेट उरवणे हे टिळकांना जामीन राहिले.

बर्वे अब्रुनुकसानीचा खटला मुंबईत चालला असताना विष्णुशास्त्री चिपळूणकर एकाएकी फार आजारी पडले. त्या वेळी त्यांचे वय जेमतेम बत्तीस वर्षांचे असेल. ते मृत्युशय्येवर असताना त्यांच्या पोटात उष्णतेचा डोंब उसळला होता. त्यामुळे त्यांनी कलिंगडाची थोडी कापे खाल्ली. चिपळूणकरांच्या चुलत्यांनी डॉ. विश्राम रामजी घोले यांना पाचारण केले. डॉ. घोले म्हणजे फुल्यांच्या चळवळीचे आधारस्तंभ. डॉ. घोले आले तेव्हा चिपळूणकर बेहोष होऊन ओरडले, 'काका, मला धरा. मी मरतो आहे. मला थोडे पाणी प्यायला द्या.' डॉ. घोल्यांना पाहताच ते एकदम ओरडले, 'मी तुमचे औषध घेणार नाही. मला विष घेऊन मरायचे नाही. याद राखा, तुम्हाला जाब द्यावा लागेल. हा कोल्हापूर महाराजांचा खटला आहे.'[१४] डॉ. घोल्यांनी विष्णुशास्त्र्यांना औषध देण्यास नकार दिला. 'आपण उद्या एखाद्या वैद्याला औषध द्यायला सांगू,' असे ते म्हणाले.

विष्णुशास्त्री चिपळूणकर १७ मार्च १८८२ रोजी पहाटेस निवर्तले. शास्त्रीबोवा आत्मसंतुष्टपणे एकलकोंडे राहून युगधर्माच्या प्रवाहापासून दूर असलेल्या संकुचिततेच्या डबक्यात जीवन कंठीत होते. संकुचित जीवन कोणालाही शाश्वत महत्पदास पोचवू शकत नाही. एखाद्यास ते काही काळ लाभतेही; नाही असे नाही. परंतु ते अल्पकाळच टिकते. तसेच केवळ पांडित्यामुळे मनुष्यास मोठेपणा प्राप्त होत नाही. कारण त्यामुळे त्याच्या हृदयात न्यायप्रियता किंवा सहानुभूती निर्माण होतेच असे नाही.

---

१४ चिपळूणकर, ल. कृ., कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचें चरित्र, पृ. २५६–५७

चिपळूणकरांच्या आक्रमक लिखाणातील देशाभिमानाचा फेस आता विरून गेलेला आहे. जनताहिताच्या दृष्टीने वा वैचारिक महत्त्वाच्या दृष्टीने पाहता त्यांनी विद्यार्थ्यांसाठी लिहिलेल्या 'जॉन्सन', 'इंग्रजी भाषा', 'मोरोपंत' आणि 'वक्तृत्व' या निबंधांत विशेष काही सार उरले नाही. त्यांतील भाषेचा डौल आणि जोष ही आता इतिहासजमा झाली आहेत. त्यांनी लोकहितवादी, दयानंद आणि जोतीराव यांच्यावर केलेल्या टीकेची राख कालप्रवाहात वाहून गेली आहे. आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात लोकहितवादींचे स्थान विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या स्थानापेक्षा श्रेष्ठ आहे. आणि जोतीराव व दयानंद हे दोघेजण आधुनिक हिंदुस्थानातील सत्यशील, पवित्र असे महापुरुष म्हणून ओळखले जात आहेत. चिपळूणकर या देशभक्तापेक्षा ते अनेक पटींने श्रेष्ठ ठरले आहेत.

कोल्हापूरप्रकरणाचा चिपळूणकरांच्या मनावर फारच ताण पडला होता. त्यांचे मानसिक स्वास्थ्य पार बिघडून गेले होते. त्यामुळे त्यावेळी अशी वदंता उठली की, कोल्हापूर खटल्याची दहशत घेऊन चिपळूणकरांनी विष घेऊन आत्महत्त्या केली. म्हणून पोलिसांनी चिपळूणकरांच्या इष्टमित्रांना असे सांगितले की, 'चिपळूणकरांना नैसर्गिक मृत्यू आला आहे असा तुम्ही डॉक्टराकडून दाखला आणल्याशिवाय आम्ही त्यांचे प्रेत उठवू देणार नाही.' चिपळूणकरांच्या डॉक्टर स्नेह्यांनी त्यांना औषध दिले होते. परंतु त्यांनीही आवश्यक तो दाखला देण्याचे साफ नाकारले.

प्रा. केरो नाना छत्रे आणि शहरातील दुसरे काही वजनदार व प्रमुख नागरिक हे डॉ. घोल्यांकडे साह्य मागण्यासाठी धावले. मृत्यू पावलेल्या आपल्या विरोधकाची जोतीरावांना कीव आली. 'मरणांन्तानि वैराणि' अशीच त्यांची वृत्ती असल्यामुळे, त्यांनी आपले सहकारी डॉ. विश्राम घोले यांच्याकडून पोलिसांना आवश्यक तो पुरावा दिला.[१५] त्यासरशी चिपळूणकरांची प्रेतयात्रा स्मशानाकडे धावत पळतच गेली. कसेबसे तेथे एकच भाषण झाले. कारण पोलीस प्रेतावर पुन्हा झडप घालतील अशी प्रेतयात्रेस गेलेल्या लोकांना प्रत्येक क्षणाला भीती वाटत होती.

कोल्हापूरचा खटला पुढे चालून टिळक आणि आगरकर ह्यांना प्रत्येकी चार महिन्यांची शिक्षा झाली. बर्व्यांची त्या दोघांनी सपशेल माफी मागितली होती. परंतु बर्व्यांनी त्यांना क्षमा केली नाही. चिपळूणकरांचे सहकारी टिळक–आगरकर हे चिपळूणकरांसारखे केवळ वाचिवीर नसून ते कृतिवीर होते. त्यांचे धैर्य आणि कार्य हे युगप्रवर्तक पुरुषांचे होते. त्या दोघांनी १२० दिवस तुरुंगवास भोगल्यानंतर मुंबई येथील डोंगरी कारागृहातून त्यांची २६ डिसेंबर १८८२ रोजी सुटका झाली. जोतीरावांचे सहकारी नारायणराव लोखंडे आणि दामोदर सावळाराम यंदे या दोघांनी त्या तरुण नेत्यांचा मुंबईत जयजयकार केला. तसेच पुणे येथे स्वतः जोतीरावांनी त्यांचा निर्भयपणे जाहीर सत्कार केला.

---

१५ पाटील, पंढरीनाथ सिताराम, महात्मा जोतीराव फुले यांचा अल्पपरिचय (१९३८), पृ. ४३

जोतीरावांनी टिळक आणि आगरकर यांच्या स्वागतसमारंभात जो भाग घेतला त्याचे कारण एकतर त्या दोघांनी जोतीरावांना अभिमान असलेल्या शिवाजीच्या वंशजांची बाजू घेतली; आणि दुसरे असे की, त्यांनी सत्याने प्रेरित होऊन संकटास तोंड देण्याचे धैर्य दाखविले. त्यामुळे जोतीरावांना त्यांच्याविषयी अभिमान वाटला असावा. 'केसरी'चे संपादक आगरकर यांनी जोतीरावांचे 'केसरी'तून जाहीररीत्या आभार मानून आपल्या संकटाच्या वेळी आपणांस जे त्यांनी साह्य केले आणि आपल्या सत्कार-समारंभात जो भाग घेतला त्याविषयी त्यांना धन्यवाद दिले होते असे म्हणतात.

. ४ .

जुलै १८८२ च्या शेवटच्या आठवड्यात तुकाराम नथू नाईक नावाचे अधिकारी पुणे नगरपालिकेतून सेवानिवृत्त झाले. त्या वेळी साने नावाचे नगरपिते म्हणाले की, 'नाईकाने केलेल्या निष्ठापूर्ण नोकरीबद्दल नगरपालिकेने गुणग्राहकता दर्शवावी.' त्यावर जोतीरावांनी असा ठराव मांडला की, 'नाईक यांनी नगरपालिकेची उत्तम नोकरी केली. म्हणून त्यांना २०० रुपये किंमतीचे एक घड्याळ द्यावे.' परंतु तो ठराव फेटाळण्यात आला. जो अधिकारी वा नोकर निष्ठेने आणि प्रामाणिकपणे नोकरी करतो, त्याच्या गुणांचे चीज व्हावे ह्या हेतूने नाईक ह्यांना पारितोषिक द्यावे आणि इतर नोकरांपुढे नाईकांचे उदाहरण ठेवावे, हाच जोतीरावांचा हेतू होता.

सत्यशोधकांचे मुखपत्र 'दीनबंधु' हे शिवाजीच्या वंशजाच्या बाजूने लढणारे देशभक्त टिळक आणि देशभक्त आगरकर यांचा केवळ सत्कारच करून थांबले नाही, तर त्या साप्ताहिकाने रायगडावरील शिवाजीमहाराजांची समाधी मोडकळीस आलेली होती, तिच्याकडे सर्व महाराष्ट्राचे लक्ष वेधले. जोतीराव आणि लोखंडे यांनी शिवाजी-महाराजांच्या समाधीच्या दुरुस्तीसाठी निधी गोळा करण्यासाठी मुंबई आणि पुणे या ठिकाणी अनेक सभा घेतल्या.

जेव्हा महाराष्ट्रातील समकालीन नेते शिवाजीमहाराजांच्या अमर कृतीला विसरले होते, तेव्हा जोतीरावांनी त्यांच्या पराक्रमाचे नि वैभवशाली राजवटीचे पोवाडे गायिले होते. हिंदुस्थानच्या नकाशावर शालिवाहन राजांनंतर शिवाजीमहाराजांनी महाराष्ट्राला अग्रस्थान मिळवून दिले. त्यामुळे जगाच्या नकाशात स्वाभिमानी असा हिंदुस्थान दिसू लागला. जोतीरावांनी रायगड किल्ल्याला भेट देऊन शिवाजीमहाराजांच्या अष्टकोनी समाधीवरील पालापाचोळ्याचा ढीग दूर केला आणि ती स्वच्छ केली.

ह्यानंतर जेम्स डगलास यांनी आपल्या 'ए बुक ऑफ बॉम्बे' नावाच्या ग्रंथात मराठ्यांनी शिवाजी महाराजांच्या समाधीकडे दुर्लक्ष केल्याबद्दल त्यांची खूप हजेरी घेतली. आपल्या ग्रंथात डगलास म्हणाले,[१६] 'या एवढ्या विस्तीर्ण राज्यात ज्या शिवाजीला

१६. Douglas, James, A Book of Bombay, p. 433.

पूर्वी नेता नि भाग्यविधाता म्हणत त्याच शिवाजीची आता कोणीही कदर करीत नाही. मराठी साम्राज्याच्या संस्थापकाच्या समाधीची दुरुस्ती करण्यास वा तिची व्यवस्था ठेवण्यास एक रुपया देणगी द्यायला कोणी तयार नाही.' जी राष्ट्रे टिकून राहतात, ती आपल्या वीर्यशाली स्वातंत्र्यवीरांना विसरत नाहीत. जे लोक आपले स्वातंत्र्यवीर आणि उद्धारकर्ते यांच्याकडे स्फूर्तीसाठी पाहत नाहीत, ते भावी पिढ्यांच्या हाती ती स्वातंत्र्याची आणि वैभवाची ज्योत देऊन त्यांना मार्गदर्शन करण्यास क्वचित पात्र ठरतात.

अठराशे पंचाऐंशी सालच्या प्रारंभी पुण्यातील हिराबाग येथे सातारा महाराजांचे गुरू गुरुमहाराज चाफळकर स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली एक जंगी सभा भरली. त्या सभेमध्ये जोतीरावांनी आणि पुण्यातील इतर नामांकित देशभक्तांनी भाषणे केली. सिंक्लेअर नावाच्या ठाण्याच्या जिल्हाधिकाऱ्याने स्वखर्चाने शिवाजीमहाराजांची समाधी दुरुस्त केली. सरकारनेही पंचवीस रुपये खर्च करून त्या समाधीची दुरुस्ती केली आणि सभोवती कठडा केला; समाधीची व्यवस्था करण्यासाठी दरवर्षी चार रुपयांचे वर्षासन मंजूर केले. यामुळे पुढे जोतीराव, त्यांना ह्या बाबतीत पाठिंबा देणारे लोक आणि ती चळवळ ह्यांचा उत्साह कमी झाल्याचे दिसते.

शिवाजी महाराजांच्या समाधीची डागडुजी करण्याविषयीची ती चळवळ पुढे टिळक आणि इतर नेते यांनी सुरू ठेवली. जून १८९५ मध्ये छत्रपती शिवाजीमहाराजांच्या समाधीची डागडुजी करण्यासाठी निधी गोळा करून, त्यांनी त्या चळवळीस मोठे स्वरूप दिले. तेथे समाधीवर एक देऊळ बांधण्याचे त्यांनी ठरविले. त्या देवळाची व्यवस्था करण्यासाठी आणि वार्षिक उत्सव अखंड सुरू राहण्यासाठी व्यवस्था करावी असे त्यांनी ठरविले. अशा रीतीने १८८० साली जोतीरावांनी शिवाजी महाराजांच्या समाधीविषयी जे कार्य सुरू केले, ते टिळकादी पुण्यातील नेत्यांनी १८९५ साली तडीस नेले.

# १४

# सार्वत्रिक लोकशिक्षणाविषयी विचार

हिंदुस्थानातील शिक्षणविषयक प्रश्नासंबंधी विचार करण्यासाठी सरकारने १८८२ साली सर वुइल्यम हंटर ह्या गृहस्थांच्या अध्यक्षतेखाली चौकशी करून सुधारणा सुचविण्यासाठी एक मंडळ नेमले. 'हंटर कमिशन' ह्या नावाने ते ओळखले जाते. हे शिक्षणमंडळ त्या उद्देशानुसार सार्वजनिक क्षेत्रातील प्रमुख व्यक्तींच्या भेटीगाठी घेत, चौकशी व चर्चा करीत सर्व देशभर हिंडत होते. ह्या मंडळास साह्य करण्यासाठी ब्रिटिश भारतातील सर्व प्रांतांत एक एक समिती स्थापण्यात आली. ह्या प्रांतिक समितीने आपल्या प्रांतातील शिक्षणविषयक परिस्थितीची माहिती ह्या चौकशी मंडळाला सादर करावयाची होती. ह्या व्यवस्थेनुसार शिक्षणमंडळाने प्रत्येक प्रांतातील शिक्षणविषयक प्रश्नांची आणि शिक्षण-तज्ञांच्या साक्षी घेतल्या. काहीजणांनी लेखी निवेदनाच्या द्वारे आपले विचार ह्या समितीला कळविले. अशा निवेदकांपैकी जोतीराव हे एक होत.

शिक्षण हे वरच्या वर्गाच्या थरांतून खालच्या वर्गाच्या थरांत स्वाभाविकपणेच झिरपत जात असते, असा जो एक शिक्षणविषयक तत्त्वविचार त्या काळी प्रचलित होता, तो जातिभेदव्यवस्थेमुळे, पूर्णपणे पोकळ ठरला होता. त्या तत्त्वाचे जे उद्गाते आणि प्रवर्तक होते त्यांच्या अपेक्षेप्रमाणे त्यांच्या विचाराला फळे आली नाहीत. खिस्ती

धर्माधिकारी तर धर्मातीत धोरणाच्या सरकारी शाळांना अधर्मी समजत. प्रचलित शिक्षणामुळे शहरांत एक लहानसा सुशिक्षित वर्ग निर्माण झाला. परंतु शिक्षण काही खालच्या वर्गांपर्यंत झिरपत गेले नाही. 'न्यू इंग्लिश स्कूल'चे पर्यवेक्षक वा. शि. आपटे ह्यांनी शिक्षणसमितीला सादर केलेल्या आपल्या निवेदनात प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण यांची जबाबदारी सरकारने लोकांवरच सोपवावी अशी मागणी केली. ह्या निवेदनात त्यांनी असेही म्हटले होते की, 'खिस्ती धर्मोपदेकांचे शाळा स्थापण्याचे प्रयत्न हे काही स्वदेशी प्रयत्न नव्हेत. त्यांचे ध्येयही शुद्ध शैक्षणिक स्वरूपाचे नाही.' खिस्ती धर्माधिकाऱ्यांनी चालविलेल्या शाळांतून जर 'बायबल' शिकविण्यात आले, तर त्यांना वार्षिक अनुदान देऊ नये, अशीही त्यांनी मागणी केली.

पुण्यातील एक प्रसिद्ध विद्वान रावसाहेब महादेव मोरेश्वर कुंटे यांचीही शिक्षण समितीपुढे[१] साक्ष झाली. ह्या साक्षीविषयीचा उल्लेख या पूर्वीच्या एका प्रकरणात आलेलाच आहे.

उपरोक्त निवेदने आणि साक्ष ह्यांवरून असे सहज अनुमान काढता येईल की, या वरील संस्थांचा उद्देश मुख्यत: समाजातील बुद्धिवान वर्गांची मिरासदारी उत्पन्न करण्याकडेच होता. गरीब ग्रामीण लोकांच्या हिताशी त्याचा काडीमात्रही संबंध नव्हता. समाजातील काही कर्तृत्ववान लोकांचे बुद्धिवैभव वाढले, तर ते समाजापासून फटकून वागतात आणि सर्वसाधारण समाजाला त्यांचा तादृश उपयोग काहीही होत नाही. महाविद्यालयीन शिक्षण मिळाल्याने जनहिताविषयी सुशिक्षितांच्या मनात सहानुभूती निर्माण होण्यास चालना मिळालेली नाही,—असे दिसून आले.

त्यामुळे शिक्षणाचा प्रसार वरिष्ठ वर्गांपुरताच मर्यादित ठेवणे ही गोष्ट हिताची आहे किंवा कसे असा प्रश्न, जनतेच्या शिक्षणाच्या दृष्टीने ज्या थोड्या व्यक्ती झटत होत्या, त्यांनी उपस्थित केला. त्या काळी हिंदुस्थानातील सर्व विचारवंत शिक्षण वरच्या वर्गापासून सुरू करावे अशा मताचे होते. 'सरकारने कनिष्ठ वर्गातील लोकांच्या शिक्षणाची आबाळ केली आहे,' असे सरकारला स्पष्टपणे सांगणारे जोतीराव ह्यांच्याव्यतिरिक्त अन्य कोणी प्रवक्ते नव्हते. खेड्यांतील बहुसंख्य सामान्य जनतेला शिक्षण देऊन तिला नैतिक नि भौतिकदृष्ट्या उच्च पातळीवर आणल्याशिवाय आणि तिच्या ठायी सामाजिक दायित्वाची जाणीव उत्पन्न केल्याशिवाय देशाचा उद्धार होणार नाही, असे जोतीरावांचे प्रांजल मत होते.

जोतीरावांनी १९ ऑक्टोबर १८८२ रोजी सादर केलेल्या आपल्या निवेदनात स्वतःचे वर्णन एक व्यापारी, शेतकरी, नगरपिता असे केले आहे. आपल्या निवेदनात त्यांनी आपण स्थापन केलेल्या शाळांची आणि आपल्या शैक्षणिक कार्यांची सविस्तर हकीगत दिली आहे. आपण किती वर्षे शिक्षक म्हणून कार्य केले आणि आपला शिक्षण-

१. Report of the Education Commission, 1883, p. 514.

क्षेत्रातील अनुभव किती आहे ह्यांविषयी त्यांनी त्यात माहिती ग्रथित केलेली आहे. 'गुलामगिरी' ह्या ग्रंथातील काही उतारे देऊन आपल्या निवेदनास प्रारंभ केला आहे. आपल्या निवेदनात ते म्हणतात : 'सरकार असे सुखस्वप्न बाळगत आहे की हे वरिष्ठ वर्गातील लोक कनिष्ठ वर्गातील लोकांमध्ये शिक्षणप्रसार करतील. हे सुखस्वप्न उराशी बाळगून गरीब शेतकऱ्यांकडून सरकार जो सारा गोळा करते त्या सर्व वसुलाचे उत्पन्न सरकार वरिष्ठ लोकांच्या शिक्षणावर उधळते. विद्यापीठे श्रीमंतांच्या मुलांना शिक्षण देतात आणि त्यांची ऐहिक उन्नती साधण्यासाठी साह्य करतात. परंतु त्या विद्यापीठांतून निघालेल्या सुशिक्षितांनी आपल्या देशबांधवांच्या उन्नतीच्या कार्यात काहीही भर घातली नाही.'

'विद्यापीठांतून पदव्या घेऊन बाहेर पडलेल्या तरुणांनी सर्वसाधारण जनतेसाठी काय केले? आपल्या आयुष्यक्रमाच्या योगे त्यांनी तिच्यावर कोणता परिणाम घडवून आणला? अभागी आणि अज्ञानी अशा आपल्या बांधवांच्या शिक्षणासाठी स्वतः आपल्या घरी किंवा दुसरीकडे त्यांनी शाळा सुरू केल्या काय? मग कोणत्या कारणामुळे असे सांगण्यात येते की, जर लोकांची नैतिक आणि बौद्धिक पातळी वाढवावयाची असेल तर वरिष्ठ वर्गातील शिक्षणाचा दर्जा वाढवला पाहिजे? राष्ट्राच्या कल्याणाची वृद्धी झाली आहे किंवा नाही हे समजण्याचे एकच साधन आहे. ते म्हणजे महाविद्यालयात किती विद्यार्थी शिक्षण घेत आहेत आणि विश्वविद्यालयीन पदव्यांच्या याद्या ही होत. ज्याप्रमाणे जंगलातील शिकारीविषयक कायदा केल्याने किंवा १० पौंड कर भरणाऱ्यांना मतदानाचा हक्क दिल्याने घटनेची कल्याणकारकता सिद्ध होत नाही, त्याप्रमाणे विद्यापीठांतून रँगलर बाहेर पडल्याने किंवा तेथे देशी व्यक्तींची डीन आणि प्रॉक्टर म्हणून नेमणूक केल्याने, ते सारे देशहिताचे आहे असे सिद्ध होत नाही.'

'उच्च वर्गाच्या सरकारी शिक्षणपद्धतीची एक ढळढळीत अशी प्रवृत्ती दिसून येते की सर्व सरकारी वरिष्ठ जागा ह्या ब्राह्मणवर्गाची मक्तेदारी झाल्या आहेत. सरकारला जर जनतेच्या कल्याणाची खरी कळकळ असेल, तर हे अनेक दोष दूर करणे सरकारचे आद्य कर्तव्य आहे. दुसऱ्या जातींच्या थोड्याथोड्या लोकांची नेमणूक करून दिवसेंदिवस ही ब्राह्मणांची मक्तेदारी मर्यादित केली पाहिजे. हे आताच्या परिस्थितीत शक्य नाही, असे काही लोक म्हणतील. त्यावर आमचे असे उत्तर आहे की, जर सरकारने उच्च शिक्षणाकडे थोडे लक्ष दिले आणि जनतेच्या प्राथमिक शिक्षणाकडे थोडे अधिक लक्ष दिले, तर नीतीने आणि वागणुकीने बरेच चांगले असे लोक नोकरी करण्यासाठी शिकून तयार करण्यात अडचण पडणार नाही. वरिष्ठ वर्गातील लोक आपल्या उच्च शिक्षणाची सोय स्वतःच करतील.' असे जोतीरावांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे.

जोतीरावांनी पुढे म्हटले आहे की, 'मुंबई इलाख्यात प्राथमिक शिक्षणाची अगदीच आबाळ झाली आहे. प्राथमिक शाळांना योग्य ती उपकरणे पुरविण्यात येत नाहीत.

सरकार शिक्षणाकरिता खास कर घेते. आणि तो पैसा ज्या कामासाठी उभा केला जातो त्या कामासाठी मात्र खर्च होत नाही, ह्याविषयी दुःख वाटते. या प्रांतातील जवळजवळ ६० गावे म्हणजे जवळजवळ १० लाख मुले यांची प्राथमिक शिक्षणाची काहीच सोय केलेली नाही, असे म्हणतात. त्यांचे बरेचसे दारिद्र्य, त्यांच्या ठायी असलेला स्वावलंबनाचा अभाव आणि सुशिक्षित नि बुद्धिवान वर्गावर सर्वस्वी अवलंबून राहण्याची त्यांची सवय ह्याला कारण शेतकऱ्यांमधील शिक्षणाची दुःस्थिती होय. शेतकरी आणि दुसरे गरीब वर्ग हे प्राथमिक शिक्षणाचा काही फायदा घेऊ शकत नाहीत. त्यांच्यापैकी काही थोड्याच लोकांची मुले प्राथमिक आणि माध्यमिक शाळांतून आढळतात. परंतु ती शाळेत फार काळ टिकून राहत नाहीत. कारण त्यांचे पालक दारिद्र्यामुळे अतिशय गांजलेले असतात. शेतकरी आणि गरीब वर्ग यांना आपली मुले गुरे राखण्यासाठी व शेतीचे काम करण्यासाठी हवी असतात.'

'त्यांना शाळेत टिकवून धरण्यासाठी त्यांना शिष्यवृत्त्या किंवा बक्षिसे यांचे प्रलोभन सरकारने ठेवलेले नाही.' ह्यासाठी जोतीराव गाऱ्हाणे मांडताना कळकळीने म्हणतात की, 'माझे असे मत आहे की, जनतेमध्ये प्राथमिक शिक्षण काही वयोमर्यादेपर्यंत सक्तीचे करावे. निदान बारा वर्षे वयोमर्यादेपर्यंत ते करावे. मराठी आणि इंग्रजी यांची आवड नसल्यामुळे मुसलमानही शिक्षणापासून दूरच राहिलेले आहेत. जेथे त्यांची भाषा शिकविली जाते अशा तुरळक शाळा आहेत.'

महार, मांग आणि दुसऱ्या अतिशूद्र जाती यांना तर जातिभेदाच्या दूषित पूर्वग्रहांमुळे शाळांतून जवळजवळ वगळण्यात आले आहे. वरिष्ठ वर्गांतील मुलांच्या शेजारी त्यांना बसविण्यात येत नाही. म्हणून त्यांच्यासाठी सरकारने वेगळ्या शाळा काढल्या आहेत. परंतु त्या शाळा फक्त मोठ्या शहरांतून आहेत. (महारमांगांची) पाच हजारावर वस्ती असलेल्या सर्व पुणे शहरामध्ये फक्त एकच शाळा आहे आणि त्या शाळेत जेमतेम तीस मुलगे उपस्थित असतात. शिक्षणखात्यातील अधिकाऱ्यांना ही गोष्ट भूषणावह नाही. म्हणून मी सरकारला अशी कळकळीची विनंती करतो की, ज्या गावात महार, मांग आदी इतर कनिष्ठ जातीची बरीच वस्ती असेल तेथे त्यांच्यासाठी वेगळ्या शाळा चालू कराव्या. कारण जातिभेदाच्या दूषित पूर्वग्रहांमुळे त्यांना इतर जातींच्या मुलांशेजारी बसविण्यात येत नाही.'

'शिक्षणाच्या प्रचलित परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या परिक्षेतील यशावर शिक्षकांच्या वेतनाचे प्रमाण ठरविणे ही गोष्ट गरीब आणि अज्ञानी लोकांमध्ये शिक्षणप्रसार करण्याच्या दृष्टीने योग्य नव्हे. कारण त्या खालच्या वर्गात शिक्षणाची मुळी आवडच निर्माण करण्यात आलेली नाही. ह्या गरीब विद्यार्थ्यांसाठी स्वतःच्या दायित्वावर कुठलाही शिक्षक शाळा चालवणार नाही असे मला वाटते. कारण त्याला पोटापुरतीसुद्धा त्यात मिळकत होणार नाही. त्यांच्यामध्ये शिक्षणाची आवड निर्माण होण्यासाठी सरकारने शाळा सुरू ठेवाव्या व त्यांच्यासाठी विशेष प्रलोभने ठेवावीत.'

'सरकारी शाळांमधून जे प्राथमिक शिक्षण देण्यात येते, ते पक्क्या आणि समाधानकारक पायावर उभारले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्यक्रमात ते उपयुक्त आणि व्यवहारोपयोगी ठरले पाहिजे. अभ्यासक्रम आणि शिक्षकयंत्रणा यांची आमूलाग्र सुधारणा व्हायला हवी. शिक्षकांच्या नोकरीचे नियम आणि अटी या अधिक सोयीच्या अन् स्वास्थ्यदायी पाहिजेत. त्यांच्या पगारात आणि दर्जात वाढ केली पाहिजे. अध्यापनशास्त्राची परीक्षा दिलेल्या शिक्षकांच्याच नेमणुका मुख्यत्वे व्हायला हव्यात.'

'प्राथमिक शाळांत सध्या जे शिक्षक नेमले गेले आहेत, ते बहुतेक ब्राह्मण आहेत. त्यांच्यापैकीं काहीजण नार्मल शिक्षकविद्यालयातून उत्तीर्ण झालेले आहेत. उरलेले बहुसंख्य शिक्षक हे साधे शिक्षक आहेत. त्यांचे वेतन अगदी निकृष्ट आहे. त्यांचे मासिक वेतन १० रुपयांपेक्षा अधिक क्वचितच असते. त्यामुळे त्यांची कामगिरीही तशीच तोकडी अन् असमाधानकारक बनते. परंतु सर्वसाधारणपणे ते शिक्षक निरुपयोगी आणि अव्यवहारी असतात. जे मुलगे त्यांच्या हाताखाली शिकतात, ते बहुधा त्यांच्यासारखे आळशी स्वभावाचे होतात. आपले घरगुती धंदे किंवा दुसरे मेहनतीचे काम किंवा स्वतंत्र धंदा-उद्योग करण्याचे टाळून ते नोकरीच्या शोधात राहतात.'

'माझे असे मत झाले आहे की, प्राथमिक शाळांतील शिक्षक हे शक्यतो अध्यापनाची परीक्षा उत्तीर्ण झालेले असले पाहिजेत. आणि ते शेतकरी वर्गातील असावेत; कारण ते त्या गरीब मुलांच्या गरजा, भावना या ब्राह्मण शिक्षकांपेक्षा अधिक लीलेने समजून घेऊन त्यांच्याशी सहजपणे मिसळतील. ब्राह्मण हे आपल्या धार्मिक दूषित पूर्वग्रहांमुळे त्या कनिष्ठ वर्गातील मुलांशी मिसळू शकत नाहीत. त्यांची मने जाणू शकत नाहीत. त्या कनिष्ठ वर्गातील मुलांवर त्यामुळे नैतिक आणि हितकर असा परिणाम होईल. तसे वरिष्ठ वर्गातील शिक्षक नेमल्यामुळे घडणार नाही. कनिष्ठ वर्गातील शिक्षकांना वेळी नांगर धरावयास किंवा सुताराची पातळी धरण्यास कमीपणाचे वाटत नाही. खालच्या वर्गातील लोकांशी ते शिक्षक सहजपणे समरस होतील. त्यांच्या शिक्षणक्रमात इतर सर्वसामान्य विषय असावेत, परंतु त्यांना शेतकीचे आणि आरोग्याचे प्राथमिक शिक्षण असावे.'

'जे शिक्षक लायक आहेत ते अध्यापनाची परीक्षा उत्तीर्ण झाले नसले, तरी त्यांना ठेवून घेऊन बाकीचे शिक्षक अध्यापनाची परीक्षा उत्तीर्ण झालेलेच ठेवावे. अधिक चांगले शिक्षक मिळविण्यासाठी त्यांना अधिक वेतन देऊन त्यांच्या परिस्थितीत सुधारणा केली पाहिजे. बारा रुपयांपेक्षा त्यांचे वेतन कमी असता कामा नये. मोठ्या शहरांतून त्यांचे वेतन १५ रुपयांपेक्षा कमी असता कामा नये. कुलकर्ण्यांचे हिशेब तपासण्याचे काम त्यांना द्यावे किंवा दस्तऐवज करण्याचे वा खेड्यातील पोष्टमास्तराचे किंवा स्टँप विकणाऱ्याचे, काम देऊन त्यांचा दर्जा वाढवावा. ज्या लोकांमध्ये ते राहतात, त्या लोकांवर हितकर असे वजन ते पाडतील, असा त्यांच्या दर्जा वाढवावा. खेड्यांतील शिक्षकांपैकी ज्यांच्या शाळेत अधिक मुले उत्तीर्ण होतील, त्यांना उत्तेजन म्हणून मासिक वेतनाशिवाय आणखी काही विशेष वेतन द्यावे.'

.२.

ग्रामीण भागांतील शिक्षणाविषयी जोतीरावांच्या विशिष्ट अशा काही कल्पना होत्या. ग्रामीण भागांतील अभ्यासक्रमात मोडी आणि बालबोध वाचन, हिशेब, इतिहास, भूगोल आणि व्याकरण यांचे सर्वसाधारण ज्ञान असावे; शेतकीचे प्राथमिक ज्ञान असावे, नैतिक आणि आरोग्यविषयक काही पाठ त्यांच्याकरिता तयार केलेले असावेत, असे त्यांचे मत होते.

'शहरांतील अभ्यासक्रमापेक्षा ग्रामीण भागांतील अभ्यासक्रम हा सोपा आणि सुटसुटीत असावा. परंतु तो त्यांच्या दैनंदिन व्यवहाराला सोडून असता कामा नये. शेतकीविषयक शास्त्रशुद्ध ज्ञान देण्यासाठी 'एक आदर्श शेता'ची योजना व्हावी, त्यामुळे विशेष फायदा होईल. आणि जर ते आदर्श शेत व्यवस्थितपणे चालविले तर त्याच्या पासून देशाचे अतिशय कल्याण होईल. प्राथमिक आणि अँग्लो-व्हर्नाक्युलर शाळांत जी क्रमिक पुस्तके आहेत, त्यांची सुधारणा नि पुनर्रचना केली पाहिजे. कारण ती व्यवहार्य नाहीत किंवा त्यांच्यांत प्रगतीला वाव नाही. तांत्रिक, नैतिक, आरोग्यविषयक, शेतकीविषयक आणि काही उपयुक्त अशा कला यांविषयी, मधूनमधून वाढत्या प्रमाणात पाठ देण्याची योजना व्हावयाला हवी.'

शाळांवर देखरेख करणारी व्यवस्था सदोष आणि अपुरी होती असे जोतीरावांचे मत होते. 'उपशिक्षणतपासनीस शाळेला वर्षातून एकदा भेट देतो. त्या भेटीपासून विशेष फायदा होत नाही. ग्रामीण भागांतील शाळांची तपासणी वर्षातून निदान चार वेळा किंवा त्यापेक्षा अधिक वेळा झाली पाहिजे. शाळेच्या तपासणीविषयी शिक्षकांना पूर्वसूचना न देता शाळांना अचानक भेटी देणे ही गोष्ट उपयुक्त ठरेल. त्यासाठी जिल्ह्यांतील किंवा खेड्यांतील अधिकाऱ्यांवर अवलंबून राहून चालणार नाही. त्यांना अनेक प्रकारची कामे असतात. शाळांना भेट देण्यास त्यांना सवड होत नाही. त्यांनी केलेली शाळेची तपासणी ही बहुधा उथळ आणि अपूर्ण असते. युरोपियन अधिकाऱ्याची देखरेख अधूनमधून आवश्यक आहे. त्यामुळे शिक्षकांवर नियंत्रण राहण्यास साह्य होईल.'

'(१) प्राथमिक शाळांची संख्या वाढवावी. त्यासाठी ज्या देशी शाळांतून प्रमाणपत्र असलेले शिक्षक आहेत त्यांना सढळ हाताने अनुदान द्यावे.

(२) शेतकऱ्यांकडून सरकार सारा घेते त्याचा अर्धा भाग केवळ प्राथमिक शिक्षणावर खर्च करावा.

(३) नगरपालिकांच्या हद्दीतील प्राथमिक शाळा नगरपालिकांनी स्वखर्चाने चालवाव्या. यासाठी सरकारने योग्य तो कायदा पसार करावा.

(४) सरकारने प्रांतिक किंवा मध्यवर्ती निधीतून नगरपालिकांना भरपूर अनुदान देऊन, नगरपालिकांनी आपल्या स्वतःच्या खर्चातून आपल्या हद्दीतील प्राथमिक शाळ

चालविल्या पाहिजेत असे करावे. तथापि शाळांचा संपूर्ण कारभार नगरपालिकांच्या हाती सोपवू नये. शिक्षणखात्याच्या देखरेखीखालीच त्या शाळा असाव्यात.'

'ज्या माध्यमिक आणि खाजगी इंग्रजी शाळा सरकारी विद्याखात्याच्या नियमाप्रमाणे चालतील, त्यांना नगरपालिकांजवळ पैसे असले तर अनुदान द्यावे. मात्र ते प्रमाण परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या मुलांच्या संख्येच्या प्रमाणावर अवलंबून ठेवावे. नगरपालिकांनी खाजगी व माध्यमिक शाळांना असे अनुदान देण्यास कायदा करून भाग पाडावे.'

'प्राथमिक शिक्षणासाठी खर्च होणाऱ्या निधीवर शिक्षणखात्याच्या संचालकाचे सामान्यपणे नियंत्रण असावे. जर जिल्हा किंवा स्थानिक मंडळावर सुशिक्षित आणि बुद्धिवान लोकांची नियुक्ती झाली, तर जिल्हाधिकाऱ्याच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या शिक्षणाचा निधी त्यांच्या स्वाधीन करावा. सांप्रत अज्ञानी आणि अशिक्षित लोक जिल्हामंडळावर निवडले जातात, ते पाटील, इनामदार, सरदार किंवा दुसऱ्या अशाच व्यक्ती असतात. त्यांना त्या निधीवर योग्य तऱ्हेने नियंत्रण ठेवता येणार नाही.'

देशी प्राथमिक शाळांविषयी आपला अभिप्राय व्यक्त करताना जोतीराव म्हणाले, 'त्या शाळा खेड्यांतील जुन्या वळणाप्रमाणे ब्राह्मण समाजातील बहुधा टाकाऊ लोकांनी चालविलेल्या असतात. त्यांचे ज्ञान, मराठी वाचन आणि लेखन कसेबसे समजण्यापुरतेच असते. आणि त्यांना साधे त्रैराशिक येते. पोट भरण्याचा शेवटचा उपाय म्हणूनच ते शाळा काढतात. देशी शाळांकरिता शिक्षक तयार करण्यासाठी ग्रामीण भागांत काहीच सोय नाही. जर खेड्यांतील शाळांत अध्यापनविषयक प्रमाणपत्र मिळविलेले अथवा अध्यापनाचे काम पार पाडण्यास लायक असे शिक्षक असतील तरच त्यांना अनुदान द्यावे.'

माध्यमिक शाळांविषयी जोतीरावांचे मत असे होते की, 'त्यांत शिक्षणाची चांगली व्यवस्था होती. जनतेच्या शिक्षणाची मात्र आबाळ झाली होती. तथापि कोणताही देशहितेच्छू सरकारने माध्यमिक शाळांचे अनुदान थांबवावे असे आजच्या परिस्थितीत म्हणणार नाही. कारण तसे करणे शिक्षणप्रसाराच्या कार्यास हितावह होणार नाही. मध्यम आणि कनिष्ठ वर्गाच्या मुलांमध्ये उच्च शिक्षणाची प्रगती झालेली दिसत नाही. जर माध्यमिक शाळांचे अनुदान थांबविले, तर या मुलांना नालायक आणि जातिनिष्ठ शाळांचा आसरा ध्यावा लागेल. आणि त्यामुळे शिक्षणाच्या कार्याचे नुकसान होईल.' जोतीरावांनी आपल्या निवेदनात पुढे असे म्हटले की, 'पुढील अनेक वर्षेपर्यंत शिक्षणखात्यावर सर्व प्रकारे सरकारचेच संपूर्ण नियंत्रण असले पाहिजे. खाजगी माध्यमिक शाळा काढणाऱ्यांना उदरनिर्वाह होईल एवढे उत्पन्न मिळत नाही. त्यांचे प्रयत्न हे शाश्वत स्वरूपाचे होऊ शकत नाहीत. विष्णुशास्त्री चिपळूणकर किंवा भावे यांच्यासारख्यांच्या खाजगी शाळांना भरपूर अनुदान दिले, तर त्या शाळा भरीव कार्य करतील. तथापि सरकारी माध्यमिक शाळांची आवश्यकता भासू नये एवढी त्यांची कार्यशक्ती वाढण्याचा संभव नाही.'

'ख्रिस्ती मिशनरी शाळांना पन्नास टक्केमुद्धा यश येत नाही. याचे कारण सरकारी माध्यमिक शाळांकडे जेवढी मुले आकर्षिली जातात त्यांच्या निम्मेही त्या शाळांकडे आकर्षिली जात नाहीत. सरकारी शाळा अधिक योग्यतेच्या व कार्यक्षम अशा वाटतात. त्याचे कारण त्यांतील शिक्षकांना मिळणारे भरपूर वेतन हे होय. असे वेतन देणे खासगी शाळांना परवडण्यासारखे नसते.'

'प्रचलित माध्यमिक शिक्षण हे सर्वसामान्यांच्या जीवनाच्या दृष्टीने अव्यवहार्य व अयोग्य आहे,' असे आपले मत व्यक्त करून जोतीराव म्हणाले : 'कारकून आणि शिक्षक निर्माण करणे एवढाच काय तो त्याचा उपयोग. शिक्षक आणि विद्यार्थी हे मॅट्रिक परीक्षेत उगाच गढून जातात. त्या अभ्यासक्रमाला व्यावहारिक स्वरूप नाही. विद्यार्थ्यांच्या भावी स्वतंत्र जीवनास समर्थ करील असे ते शिक्षण नसते. जरी प्रवेश परीक्षेकरिता बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या, देशातील ज्ञानप्रसाराची मर्यादा लक्षात घेता, मुळीच मोठी नाही, तरी ती संख्या सरकारी नोकऱ्यांतील आवश्यकता लक्षात घेता मोठी आहे असे दिसते. जर शिक्षण सर्वांना सक्तीचे असून सर्वांच्या आवाक्यात असते, तर ही संख्या आणखी मोठी झाली असती; तशी ती होईल अशी मला आशा आहे.'

'उच्च शिक्षणाची व्यवस्था अशा रीतीने करावी की, ते घेणे सर्वांना सहज शक्य होईल. आणि मॅट्रिक परीक्षेकरिता नेमलेल्या विषयांची पुस्तके जशी मद्रास व बंगाल येथे सरकारी गॅझेटमध्ये छापतात, तशी मुंबई सरकारने गॅझेटमध्ये प्रसिद्ध करावी. असे करण्याने खाजगी विद्यार्थ्यांना उत्तेजन मिळेल आणि ज्ञानप्रसाराच्या दृष्टीने देशाला अधिक साह्य होईल.'

मुंबई विद्यापीठाचा गौरव करून जोतीराव म्हणाले, "मुंबई विद्यापीठ खाजगी रीतीने शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षांना बसावयास देते हे एक लोकांना मोठे वरदान आहे. उच्च शिक्षणाचेही बाबतीत विद्यापीठांच्या अधिकाऱ्यांकडून असेच वरदान लोकांना लाभेल अशी मी आशा करतो. बी. ए., एम्. ए. ह्या पदव्यांकरिता खाजगीरीत्या केलेला अभ्यास विद्यापीठाने मान्य केला तर बरेच तरुण लोक खाजगीरीत्या अभ्यास करावयास झटतील. त्यांनी असे केले तर शिक्षणप्रसाराचे पाऊल अधिक पुढे पडेल.'

शिष्यवृत्ती देण्याच्या सरकारी पद्धतीविषयी जोतीराव म्हणाले की, 'शिष्यवृत्ती देण्याची पद्धत ही अशा रीतीची बनवावी की जिच्यायोगे ज्या वर्गात शिक्षणाची प्रगती झाली नाही, त्या वर्गातील मुलांना काही शिष्यवृत्त्या मिळतील. शिष्यवृत्तीकरिता चढाओढ ठेवून शिष्यवृत्ती देण्याची पद्धत जरी तत्त्वतः न्याय्य असली, तरी त्यामुळे खालच्या वर्गात शिक्षणप्रसाराला हातभार लागणार नाही.'

'ज्या सुशिक्षित लोकांना सरकारी नोकरी मिळत नाही त्यांना तांत्रिक किंवा व्यावहारिक अशा तऱ्हेचे शिक्षण न मिळाल्यामुळे हाताने कष्ट करण्याचे किंवा दुसरे रोजगाराचे काम करण्यास त्यांचे मन घेत नाही. म्हणून ज्या सुशिक्षित लोकांना नोकरी नाही अशा सुशिक्षित लोकांची भाऊगर्दी बाजारात झाली आहे.'

देशातील लोकसंख्या पाहता सांप्रत सुशिक्षित लोकांची संख्या अगदी ल्हान आहे आणि ही सुशिक्षितांची संख्या शेकडो पटींनी वाढेल असा काळ दूर नाही. आणि ते सर्व उपयुक्त धंदे करण्याच्या वृत्तीचे होतील आणि नोकरीच्या पाठीमागे कोणी जाणार नाही असा आपण विश्वास बाळगू या. शेवटी मला ह्या शिक्षणविषयक चौकशी समितीकडे एकच विनंती करावयाची आहे की, त्यांनी मुलींचे शिक्षण मोठ्या प्रमाणावर सुरू करण्यासाठी कृपया काही उपाय योजावे.'[२]

'शेतकऱ्याचा असूड' ह्या आपल्या पुस्तकात जोतीरावांनी म्हटले आहे की, हंटर शिक्षणमंडळाने शेतकऱ्यांच्या साक्षी घेतल्या नाहीत. त्यांनी पारशी, ख्रिश्चन आणि ब्राह्मण यांच्या साक्षींवरच सारा भरवसा ठेवला आणि त्या समितीने ह्या वर्गांनी दिलेली मानपत्रे स्वीकारली, म्हणून त्या मंडळाचे प्रतिवृत्त अशिक्षित आणि गरीब लोक यांना उपयुक्त होणार नाही.'

. ३ .

पुणे नगरपालिकेच्या समितीपुढे ३० आक्टोबर १८८२ रोजी पशुवैद्यक महाविद्यालय काढण्याविषयी एक ठराव आला.

जोतीरावांनी ह्या विषयाच्या संदर्भात अशी सूचना केली की, अशा तऱ्हेचे महाविद्यालय मद्रास नगरपालिका चालवीत असल्यामुळे त्या नगरपालिकेकडे अशा महाविद्यालयासाठी किती खर्च येतो याची चौकशी करावी. जोतीरावांचा ठराव संमत झाला. नगरपालिकेच्या शाळांतून प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्त्यांची संख्या वाढवावी असा दुसरा ठराव नगरपालिकेपुढे चर्चेस आला. जोतीरावांनी त्यात अशी दुरुस्ती सुचवली की, प्राथमिक शाळा सरकार आपल्याकडून काढून दुसऱ्या संस्थांच्या स्वाधीन कराव्या किंवा काय याविषयी निर्णय करीपर्यंत तो ठराव अनिर्णित ठेवावा. परंतु मूळ ठराव संमत झाला.

बाजारासाठी एक इमारत बांधावी असा एक ठराव ४ डिसेंबर १८८२ रोजी नगरपालिकेकडे चर्चेस आला. त्या ठरावाला अनुकूल असलेले सभासद आणि अधिकारी तो ठराव विद्यमान सभासदांकडून मान्य करून घेण्याची घाई करीत होते. कारण स्थानिक स्वराज्याच्या कायद्याप्रमाणे नवीन निवडणुकीनंतर नवीन सभासद यावयाचे होते. तीन लक्ष, पंचवीस हजार एवढी मोठी रक्कम बाजाराच्या इमारतीकरिता खर्च करू नये, असे जोतीराव व हरि रावजी चिपळूणकर यांचे मत होते. इमारतीसाठी एक लक्ष रुपये खर्च करावे, अशी मूळ कल्पना होती. जोतीरावांचे मत असे होते की, तो सर्व पैसा गरिबांच्या शिक्षणासाठी खर्च करावा. दुसऱ्या तीन उपसूचना मांडण्यात आल्या. परंतु बहुसंख्य मतांनी असा ठराव झाला की, दोन लक्ष किंमतीची २००

२. Education Commission, Bombay, Vol. II., pp. 140-45.

दुकाने ज्यात असतील अशी एक इमारत बांधावी. खासगीवाले आणि चिमय्या यांच्या मालकीची मोठी बाग बाजाराच्या इमारतीसाठी निश्चित करण्यात आली.

'केसरी' पत्राने या ठरावाला जोराचा विरोध केला. 'अशी महागडी इमारत बाजाराकरिता नको' असे त्या पत्राने मत दिले. सर्व विरोध बाजूला सारून इमारत-बांधणीचे काम सुरू करण्यात आले आणि त्या काळच्या हिंदुस्थानातील एका प्रचंड मंडईची इमारत १८८५ सालापर्यंत बांधून पूर्ण करण्यात आली.

त्या वेळी लॉर्ड रिपन हे हिंदुस्थानचे महाराज्यपाल होते. कॅथॉलिक धर्मानुयायी अशा ह्या महाराज्यपालांनी लोकहितकारक असे अनेक चांगले कायदे करून हिंदुस्थानात नवीन युगाला प्रारंभ केला. हिंदी लोकांच्या विचारस्वातंत्र्यावर दडपण आणणारा अत्यंत घातक असा देशी मुद्रणालयाचा कायदा रद्द केला. तसेच त्यांनी स्थानिक स्वराज्याचा कायदा करून स्थानिक स्वराज्याचे युग सुरू केले. त्या कायद्याप्रमाणे १८ मार्च १८८६ रोजी नगरपालिकेच्या नवीन निवडणुका घेण्यात आल्या. जोतीरावांनी वेताळपेठेतून निवडणूक का लढविली नाही याबद्दल आश्चर्य वाटते. कदाचित निवडणुकीच्या वार्डांची अशा तऱ्हेने विभागणी करण्यात आली असावी की हा गरिबांचा वाली निवडून येणे अशक्य व्हावे.

ह्यापूर्वी काही थोडे दिवस आधी सार्वजनिक सभेच्या नियतकालिकाने असे जाहीर केले होते की, 'स्थानिक स्वराज्याला लोकांनी खरे स्वराज्य म्हणू नये; कारण त्या दोहोंमध्ये फार मोठे अंतर आहे.'

ह्याच सुमारास 'दीनबंधू'ने रेव्हरंड तुकाराम नथुजी ह्या नवख्रिस्ती मिशनऱ्यावर कडक टीका केली होती. सत्यशोधक चळवळीच्या धोरणाचा हा एक नवीन पैलू होता. 'ज्ञानोदया'ने 'दीनबंधू'च्या ह्या प्रवृत्तीविषयी साहजिकच कडवटपणे विषाद व्यक्त केला.[3]

३. दीनबंधु, ५ ऑक्टोबर १८८२.

१९

# हिंदी शेतकऱ्यांची कहाणी

अठराशे ऱ्यायशीच्या आरंभापासून जोतीराव 'शेतकऱ्याचा असूड' नावाचा ग्रंथ लिहिण्यात गुंतले होते. तो ग्रंथ त्यांनी शूद्रांच्या हिताच्या दृष्टीनेच लिहावयास घेतला होता. त्याच्या हस्तलिखिताची जसजशी प्रकरणे पूर्ण होत तसतशी ती ते प्रवासात आपल्या चाहत्यांना वाचून दाखवीत असत. त्यांतील काही प्रकरणे त्यांनी पुणे, ठाणे, जुन्नर, ओतूर, हडपसर, वंगणी आणि दुसऱ्या काही ठिकाणी काही उत्साही सामाजिक कार्यकर्त्यांना आणि वजनदार व्यक्तींना वाचून दाखविली. त्या ग्रंथात उल्लेखिलेल्या गोष्टी सत्य आहेत, असा ऐकणाऱ्या लोकांनी त्यांना निर्वाळा दिला.

जोतीरावांनी १८८३ सालच्या एप्रिल महिन्यात तो ग्रंथ मुंबईत वाचून दाखविला. याच सुमारास ते बडोद्यास गेले व बडोद्याचे तरुण महाराज श्रीसयाजीराव गायकवाड यांना तो हस्तलिखित ग्रंथ वाचून दाखविला. बडोद्याचे महाराज १८८१ साली गादीवर आल्यानंतर त्यांना जोतीराव पुण्यात भेटले होते. सयाजीरावमहाराज यांना त्यांच्या विद्यार्थीदशेत एफ्. ए. एच्. एलिएट नावाच्या प्रसिद्ध प्राध्यापकाने उत्तम शिक्षण दिले होते. बडोद्याचे दिवाण सर टी. माधवराव यांनीही त्यांच्या मनावर चांगले संस्कार घडविले होते. त्यामुळे बडोद्याचे सयाजीरावमहाराज तरुणपणीच एक मोठे कर्ते पुरुष

आणि जनहितपरायण राजे म्हणून त्यांची ख्याती पसरू लागली होती. ते जिज्ञासू, ज्ञानाभिलाषी, कार्यकुशल नि बुद्धिमान पुरुष होते. सामाजिक प्रश्नांविषयीचा त्यांचा समज स्वच्छ असे. तलस्पर्शी अशी त्यांची बुद्धी असल्यामुळे एखाद्या घटनेची कारणे व तिचे परिणाम ते स्पष्टपणे समजू शकत आणि तिच्या संदर्भात कोणी नवे विचार मांडल्यास त्यांचे आकलन त्यांना चटकन होई. त्यांना कनिष्ठ वर्गातील लोकांच्या हिताची काळजी असल्यामुळे कनिष्ठ वर्गाचे कैवारी जोतीराव यांच्या बडोद्याच्या भेटीविषयी त्यांनी विशेष उत्साह दाखविला हे सांगावयास नकोच. 'शेतकऱ्याचा असूड' या ग्रंथाची हस्तलिखित प्रकरणे जोतीरावांनी सयाजीराव महाराजांना वाचून दाखविली. त्यांनी ती अप्रतिम उत्साहाने लक्षपूर्वक ऐकली. महाराजांनी जोतीरावांना आर्थिक साह्य केले आणि त्यांना शालपागोटे देऊन त्यांचा बहुमान केला.

जोतीरावांनी तो ग्रंथ जुलै १८८३ मध्ये पूर्ण केला. त्यानंतर त्यांनी बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड आणि हिंदुस्थानचे महाराज्यपाल यांना हस्तलिखिताची एक एक प्रत पाठविली. महाराज्यपालांना पाठविलेल्या प्रतीवर त्यांनी लिहिले की, 'महाराज्यपाल सर फ्रेडरीक हॅमिल्टन टेंपल, अर्ल ऑफ डफरीन यांना ग्रंथकार २८ जुलै १८८३ रोजी सादर करीत आहे.'

जोतीरावांनी २ जून १८८६ रोजी मुंबईतील मामा परमानंद यांना लिहिलेल्या पत्रावरून असे दिसून येते की, तो ग्रंथ छापून प्रसिद्ध झाला नव्हता. मामा परमानंद हे त्या वेळी मुंबईतील एक प्रमुख राजकीय विचारवंत होते. आपण मागे राहून आपल्या पिढीतील कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणारे ते एक ऋषितुल्य द्रष्टे होते. त्यांचा आणि जोतीरावांचा विशेष परिचय होता. परमानंदांना पोवाड्यांविषयी काही माहिती पाहिजे होती. त्यासाठी त्यांनी जोतीरावांना पत्र लिहिले होते. आपल्या उत्तरात जोतीराव म्हणाले, 'जर तुम्हाला 'शेतकऱ्याच्या असूडा'ची प्रत पाहिजे असेल तर ती मी पाठवीन. पण हस्तलिखिताची प्रत करावयास दोन महिने लागतील.'

आपल्या ग्रंथाच्या उपोद्घातात जोतीराव म्हणतात,

विद्येविना मती गेली; मतीविना नीती गेली; नीतीविना गती गेली!
गतीविना वित्त गेले; वित्ताविना शूद्र खचले; इतके अनर्थ एका अविद्येने केले.

उपोद्घातात पुढे म्हटले आहे की, सांप्रत शेतकरी म्हटले म्हणजे त्यामध्ये तीन भेद आहेत. शुद्ध शेतकरी अथवा कुणबी, माळी व धनगर. मूळचे जे लोक शुद्ध शेतकीवर आपला निर्वाह करू लागले ते कुळवाडी किंवा कुणबी; जे लोक आपले शेतकीचे काम सांभाळून बागायती करू लागले ते माळी. जे हे दोन्ही धंदे करून मेंढरे बकरी यांचे कळप बाळगू लागले ते धनगर. ह्या तीन जातींचा सांप्रत आपसात बेटीव्यवहार होत नाही. बाकी अन्य सर्व काही होते. यावरून ह्या तीन जाती पूर्वी एकाच शूद्रजातीच्या असाव्यात. पुढे या तिन्ही जातींचे लोक आपला मूळचा शेतकीचा धंदा निरुपायाने सोडून उदरनिर्वाहास्तव नाना तऱ्हेचे धंदे करू लागले. ज्यांच्याजवळ थोडेबहुत अवसान आहे

ते आपली शेती सांभाळून राहतात. पण बहुतेक अक्षरशून्य, देवभोळे व भुकेकंगाल आहेत. ज्याला बिलकूल थारा उरला नाही ते गवताचा, लाकडाचा किंवा कापडाचा व्यापार करू लागले. कोणी कंत्राटे घेऊ लागले, तर कोणी लेखकाची नोकरी करू लागले. ते इस्टेटी करून ठेवतात, पण त्यांची गुलहौशी मुले विद्येची गोडी नसल्यामुळे थोड्याच काळात भिकेस लागतात.

शिपाईगिरीच्या व शहाणपणाच्या जोरावर काहींनी जहागिरी व इनामे कमावली. शिंदे-होळकरांसारखे प्रती राजेच बनून गेले. परंतु हल्ली त्यांचे वंशज अज्ञानी, अक्षरशत्रू असल्यामुळे आपापल्या जहागिरी व इनामे गहाण टाकून कर्जबाजारी होऊन अन्नासही मोताद झाले आहेत. बहुतेक इनामदार-जहागीरदारांना आपल्या पूर्वजांनी कसे पराक्रम केले, कसकशी संकटे भोगली याची कल्पना नसल्यामुळे ते आयत्या पिठावर रेघा ओढतात. ते अशिक्षित असल्यामुळे दुष्ट व व्यसनी लोकांच्या संगतीत ऐषआरामात गुंग होऊन कर्जबाजारी होतात. त्यांचे आसपासचे लोक व ब्राह्मण कारभारी इतके मतलबी, धूर्त, धोरणी असतात की, ते आमच्या राजेरजवाड्यांस विद्येची अन् सदभिरुचीची गोडी चाखू देत नाहीत. यामुळे आपल्या खऱ्या वैभवाचे स्वरूप न ओळखून, आपल्या पूर्वजांनी केवळ आमच्या चैनीकरिताच राज्य संपादन केले असे मानून, धर्माच्या योगाने अंध जाहलेले राज्यकारभार स्वतंत्र रीतीने पाहण्याचे अंगी सामर्थ्य नसल्यामुळे, केवळ दैवावर भार टाकून ब्राह्मण कारभाऱ्यांच्या ओंजळीने पाणी पिऊन, ते दिवसा गोप्रदाने व रात्री प्रजोत्पादन करीत स्वस्थ बसतात. राजेरजवाड्यांच्या हातून आपल्या शूद्र जातबांधवांचे कल्याण होण्याचा संभव विशेष, परंतु त्यांच्या मनात तो विचार कधीही आला नाही व जोपर्यंत 'ब्राह्मणो मम देवतं' हे वेड त्यांच्या डोक्यांतून जोपर्यंत निघाले नाही, तोपर्यंत कितीही कपाळकूट केली तरी ती व्यर्थच ठरणार. इतके करून तसे करण्यास कोणी प्रवृत्त झाल्यास बाळपणापासून मनावर झालेल्या दृढ संस्कारांमुळे या मतलबी धर्माच्या विरुद्ध चार गोष्टी ऐकून त्यांचा विचार करण्याचे त्यांस कोठून रुचणार व जवळचे कारभारी अगोदर अशा निस्पृह व जात्यभिमान्याची डाळच शिजू देणार नाहीत.

'शेतकऱ्याच्या असूडा'च्या पहिल्या प्रकरणात ब्राह्मण शूद्रांना पाळण्यापासून स्मशानापर्यंत, गर्भाधानापासून तीर्थयात्रेपर्यंत धर्माच्या नावाखाली कसा छळतो आणि त्याने शूद्रांवर लादलेले धार्मिक संस्कार आणि विधी कसे अखंडपणे चालू असतात याविषयी साद्यंत माहिती दिली आहे. ज्या ब्राह्मणांना उच्च शिक्षण घेता येत नाही ते संन्याशाचे सोंग घेऊन समाजातील अज्ञानी आणि आशिक्षित लोकांवर कसे वर्चस्व गाजवितात अन् त्यांची पिळवणूक करतात, हे दाखविले आहे.

'मुलांना शिक्षण देण्यासाठी शेतकऱ्यांजवळ पैसा नसतो. मजा मारीत फिरणाऱ्या इंग्रज अधिकाऱ्यांना त्यांच्या गाऱ्हाण्यांकडे लक्ष द्यावयास वेळ मिळत नाही. ते अधिकारी आपल्या हाताखालील ब्राह्मण नोकरांच्या सल्ल्यानुसार काम करतात. शेतकऱ्यांच्या संग्रही

कुटुंबाला पुरेल इतके धान्य नसते. अंगावर वस्त्र नसते. इंग्रजांचे राज्य हे भरमसाट पगार मिळविणाऱ्या अधिकाऱ्यांनी चालविलेले एक अत्यंत महागडे सरकार आहे. सेवानिवृत्तीनंतर त्यांना देण्यात येणाऱ्या मोठमोठ्या वेतनांच्या अप्रत्यक्ष बोजाखाली शेतकरी साफ चिरडून गेले आहेत.'

'बुद्धधर्माने ब्राह्मणी धर्माची दुष्कृत्ये उघड करून त्या धर्मापासून गरीबांना वाचविण्याचा प्रयत्न केला. शंकराचार्यांनी तुर्की लोकांना मराठ्यात सामील करून घेऊन त्यांच्याकडून तरवारीने बुद्धांचा मोड केला. शंकराचार्यांनी ब्राह्मणांना गोमांस खाण्यास आणि दारू पिण्यास बंदी केली.'

'शूद्रांच्या मुलांना संस्कृत पाठशाळेत ब्राह्मण घेत नाहीत. दुसऱ्या बाजीरावाने ब्राह्मण पंडितांना राजाश्रय दिला. परंतु त्यांनी जे शेतकरी राज्याच्या उत्पन्नाचे मुख्य आधार होते, त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची कधीही चिंता केली नाही. जे ब्राह्मण कारकून आणि अधिकारी सरकारी कोर्टकचेऱ्यांतून कामे करतात आणि शासनसंस्था चालवितात ते भ्रष्टाचार करण्यात पटाईत असतात. ते शेतकऱ्यांचा अर्ज ब्रिटिश अधिकाऱ्यांपुढे वाचताना महत्त्वाचे मुद्दे गाळून वाचतात. दस्तऐवज आणि साक्षीपुरावे यात बनावटगिरी करतात. आणि जो जास्त लाच देईल त्याच्या बाजूने निर्णय देतात.'

जोतीरावांच्या मते शेतकऱ्यांच्या आत्यंतिक दारिद्र्याची अनेक कारणे होती. 'ब्रिटिश राज्य येण्यापूर्वी राजेलोकांनी व संस्थानिकांनी पदरी मोठी सैन्ये ठेवली होती. त्यात मोठ्या संख्येने लोक नोकरी करीत. त्यामुळे शेतजमिनीवर मोठा भार पडत नसे. पेशव्यांचे राज्य लयास गेल्यावर मराठ्यांच्या सैन्यातील लोक घरी बसले. ब्रिटिशांचे राज्य आल्यामुळे देशात शांतता प्रस्थापित झाली. त्यामुळे बेकारी प्रचंड प्रमाणावर वाढली. सैन्यातील लोक घरी आल्यामुळे शेतजमिनीवर त्यांचा भार पडला. शांततेच्याकाळी लोकसंख्याही वाढली. कुटुंबातील वाटपामुळे शेतजमिनीचे लहानलहान तुकडे पडले. त्याची गती थांबेना. तुकडे झालेल्या शेतजमिनीच्या उत्पन्नावर आपल्या कुटुंबाची आणि गुरांढोरांची गुजराण करताना शेतकऱ्यांच्या नाकी नऊ येऊ लागले. जंगलखात्याने ग्रामीण भागांतील कुरणे घशात घातली. त्यामुळे शेळ्यामेंढ्यांना चरावयास जागा राहिली नाही. शेतकऱ्यांना आधारासाठी पडीक जमीन उरली नाही. जमीन धुपून गेली त्यामुळे तिचा सुपीकपणा कमी झाला.'

'शेतजमिनीचे जे तुकडे पडले ते ज्या मोठ्या शेतकऱ्यांजवळ नांगर नि बैल होते त्यांना कसावयास किंवा विकत देण्यात आले आणि भूमिहीन झालेले शेतकरी कोष्ट्यांकडे, सुतारांकडे, लोहारांकडे उदरनिर्वाहासाठी काम मिळावे म्हणून वणवण फिरू लागले. परंतु लहानलहान धंदे करणारे कोष्टी, सुतार आणि लोहार यांच्याकडेही पूर्वीसारखे काम चालेना. कारण ब्रिटनमधून भारतात येणाऱ्या मालाशी ते स्पर्धा करू शकत नव्हते. चाकू, कात्र्या, सुऱ्या, शिवणकामाची यंत्रे, दोरा, कुलपे, चाव्या, लोखंडी पत्रे, डांबर, भाते, निरनिराळ्या तऱ्हेच्या गाड्या आणि कपडा ही ब्रिटनमधून जकातीशिवाय

हिंदुस्थानात आयात होत. त्याचा परिणाम असा झाला की, एतद्देशीय व्यापाऱ्यांचा धंदा अतिशय खालावला. कोष्टी, लोहार, सुतार यांना विपन्नावस्था प्राप्त झाली. आपल्या जवळील कच्चा माल ते सावकारांना विकू लागले व वाट फुटेल तिथे जाऊ लागले. ते लपूनछपून दिवस काढू लागले. गव्हाच्या वा तांदळाच्या कोंड्यावर व आंब्यांच्या कोयांवर कशीबशी प्राणधारणा करून राहू लागले. रिकाम्या पोटात कावळे ओरडू लागले की, ते ताडी किंवा माडी पिऊन आपली भूक शमन करीत. त्यांचा आत्मा त्यांच्या स्वाधीन राहिला नाही. आणि इंग्रज नोकरांचे जीवन पाहवे तर ते निरनिराळ्या प्रकारची उत्कृष्ट दारू, पाव, बिस्किटे, गरम कपडे यांचा उपभोग घेऊन मजेत राहत. हिंदी शेतकरी मात्र दारिद्र्यात पिचत, विव्हळत पडलेला असे.'

. २ .

अटकेपुढे प्रवास करू नये किंवा परदेशात जाऊ नये अशी जी बंधने हिंदुधर्मात घातलेली आहेत, त्याला जबाबदार ब्राह्मण आहेत असे 'शेतकऱ्याचा असूड' या ग्रंथात जोतीरावांनी म्हटले आहे. 'त्यामुळे हिंदू संकुचित दृष्टीचे झाले. बाहेरील जगाचा त्यांचा संबंध तुटला आणि स्वतःला ते कमी प्रतीचे मानू लागले. ब्राह्मणांचे हेतू सफल झाले. त्यांना शूद्र आपली सेवा करावयास आणि शेतीवर राबावयास अन् कपडे विणावयास गुलाम म्हणून लाभले. तथापि जोतीरावांच्या काळातील ब्राह्मणांना आपली ही घोडचूक कळली आणि आपल्या चुका सुधारण्याचे सोंग करून ते म्हणू लागले, 'आपण आपल्या चालीरीतींची, रूढींची सुधारणा करू या.' परंतु ते निव्वळ ढोंग होते.'

जे ब्राह्मण शिक्षक खेड्यांतील शाळांत शिक्षकाचे काम करीत होते, ते शिक्षकाची परीक्षा उत्तीर्ण झालेले नव्हते. ते अशिक्षित होते. ते शिकविण्याची कला कशी साधेल ह्याची काळजी करण्यापेक्षा आपल्या सोवळया-ओवळयाचीच जास्त काळजी घेत असत. ते स्वार्थी आणि ज्ञानशून्य होते. जर अब्राह्मण मुले शिकली आणि शासनयंत्रणेत घुसली, तर ब्राह्मणांना त्यांच्या दारी भीक मागावी लागेल, असे ते शेतकऱ्यांच्या मुलांना सांगत असत. ब्राह्मण धूर्तपणे इंग्रज अधिकाऱ्यांची खुषामत करीत. त्यांना मानपत्रे देत आणि त्यांवर श्रीमंत पण अज्ञानामुळे मूर्ख बनलेले शूद्र सह्या करीत. आपल्याला दिलेल्या बहुमानांची परतफेड करण्यासाठी ते ब्रिटिश अधिकारी त्या ब्राह्मणांना रावबहादूर किंवा रावसाहेब अशा पदव्या देत. यावरून जोतीरावांनी असा निष्कर्ष काढला की, ह्या देशाला एकवार टोळधाड व दुष्काळ ह्यांपासून वाचविणे शक्य होईल; परंतु ब्राह्मण नोकर मजा मारणाऱ्या इंग्रज अधिकाऱ्यांच्या हाताखाली काम करून जो कहर उडवीत आहेत, त्यापासून या देशाला कोणीही वाचवू शकणार नाही. कोकणातील खोत अज्ञानी शेतकऱ्यांचा नाश करीत होते, असे त्यांनी त्यात म्हटले आहे.

जोतीरावांनी दुसऱ्या प्रकरणाच्या शेवटी असे म्हटले आहे की, आपण सरकारी खात्यांतील ब्राह्मण नोकरांविरुद्ध जे आरोप केले आहेत, त्याची शहानिशा करावयाची

असल्यास सरकारी न्यायालयांनी दिलेले जे निर्णय प्रसिद्ध झाले आहेत, त्यांत किती ब्राह्मणांना शिक्षा झाली आहे हे पाहावे. म्हणजे त्यांची खात्री पटेल.

ह्या ग्रंथाच्या तिसऱ्या प्रकरणात जोतीरावांनी असे सांगितले आहे की, शहाणपण आणि शौर्य हे गुण काही आनुवंशिक नाहीत. एकाच आईबापाच्या पोटी जन्मास आलेले दोन मुलगे गुणवत्तेने समान असतातच असे नाही. एक मूर्ख असेल तर दुसरा शहाणा नि शूर असेल. स्त्री-पुरुषांची संभोगकाली ज्या प्रकारची शारीरिक व मानसिक अवस्था असेल तिजनुसार त्यांच्या संततीवर प्रामुख्याने परिणाम होत असतात, असे त्यांनी मत दिले आहे. आईबापांची त्या काळची मनाची जी परिस्थिती असेल तीच मुलामध्ये प्रामुख्याने दिसून येते. शिवाय भोवतालच्या परिस्थितीचाही मुलाच्या जीवनावर परिणाम होत असतो. पराक्रमी सेनापती व राजे हे अनेक वेळा शेतकरी, भिकारी आणि धनगर यांच्या पोटी जन्मास आले असल्याचे आढळून येते.

भक्त प्रल्हाद आणि त्याच्यासारखे अनेक लोक भेकड व धैर्यहीन होते, असे जोतीरावांचे मत होते. कारण त्यांनी आपल्या देशबांधवांच्या वतीने शत्रूंस धैर्याने तोंड दिले नाही. ब्राह्मणांनी त्यांना आपल्या धर्मात समाविष्ट करून घेतले व त्यांना देशस्थ ब्राह्मण ही संज्ञा दिली. देशस्थ ब्राह्मणांचे रंगरूप, चालीरीती आणि देवतांची पूजाअर्चाही शूद्रांप्रमाणेच आहेत. यामुळेच देशस्थ आणि कोकणस्थ यांच्यामध्ये रोटी-बेटी व्यवहार होत नसे. जोतीराव म्हणतात, ब्राह्मण, शूद्र आणि अतिशूद्र यांना फिरंग्यांनी जबरदस्तीने ख्रिस्ती केले व त्यांना सुखी केले. मुसल्मानांनी छळले जाणाऱ्या शूद्र व अतिशूद्र यांना इस्लामची दीक्षा देऊन त्यांना आर्यधर्माच्या पेचातून मुक्त केले व आपल्या बरोबरीचे मुसलमान करून सुखी केले. जोतीरावांच्या या सर्व लिखाणाचा मथितार्थ असा की, 'छळले गेलेले, तुडविलेले आणि दारिद्र्यात पिचलेले लोकच ख्रिस्ती किंवा मुसलमान झाले.'

ह्या तिसऱ्या प्रकरणामध्ये त्यांनी एक महत्त्वाचा विचार मांडला आहे. त्यात त्यांनी प्रजासत्ताकराज्याचे महत्त्व गायिले आहे. शूद्रांनी प्रजासत्ताक राज्यपद्धती सोडली म्हणूनच त्यांना त्यांच्या पापाचे प्रायश्चित्त म्हणून गुलामगिरी प्राप्त झाली. ग्रीकांनी आपली प्रजासत्ताक राज्ये टिकवून धरली हे त्यांनी शूद्रांच्या निदर्शनास आणून दिले आहे. जोतीरावांनी स्पार्टातील शौर्यशाली वीरांची मुक्तकंठाने स्तुती केली आहे. इराणी सैन्याची त्यांनी उडविलेली दाणादाण याचे वर्णन केले आहे. रोमन लोकांनी ग्रीक प्रजासत्ताकापासून स्फूर्ती घेऊन हनीबॉलचा प्रतिकार केला. प्रजासत्ताकाच्या ध्येयाकडे दुर्लक्ष करून ज्युलियस सीझर याने लोकराज्य बळकावून आपल्या हाती सर्व सत्ता केंद्रित केली. यास्तव जोतीरावांनी ज्युलियस सीझरचा धिक्कार केला आहे.

ज्युलियस सीझर हा प्रजासत्ताक राज्याच्या ध्येयापासून च्युत झाला होता. खुषामत करणारे ऐषआरामी सरदार त्याचे दास बनले होते. पण ब्रूटसने ज्युलियस सीझरला ठार मारून अनियंत्रित राज्याच्या कारभारापासून लोकांवर जी भयंकर संकटे कोसळतात

त्यांपासून त्यांना वाचविले. यास्तव जोतीरावांनी ब्रूटसचे वर्णन 'महापवित्र, स्वदेशाभिमानी' असे करून त्याचा गौरव केला आहे.

'मुसलमानांनी इराण देश जिंकून हिंदुस्थानवर स्वारी केली व हिंदुस्थान जिंकला. परंतु ते त्यानंतर ऐषआरामात लोळत राहिले. त्यामुळे इंग्रजांनी हिंदुस्थान जिंकला. इंग्रजांनी हिंदुस्थान जिंकला ही मोठी शौर्याची गोष्ट केली असे जोतीरावांना वाटत नाही. नऊदशांश भारतीयांना ब्राह्मणांनी विद्या, ज्ञान आणि शौर्य ह्यांपासून दूर ठेऊन त्यांनी धर्म आणि राजकारण यांत धुडगूस घालून समाजात भेद निर्माण केल्यामुळे इंग्रजांना हिंदुस्थान जिंकता आला. इंग्रजांनी भारतीय समाजातील ब्राह्मणांच्या नेतृत्वाचे महत्त्व ओळखून शूद्रांचा दुबळेपणा जाणला. त्यामुळे त्यांनी धूर्तपणे ब्राह्मणसमाजाचा उपयोग आपली शासनसंस्था चालविण्यात करून घेतला. शूद्रांवर ब्राह्मणाचा कारभार आणि ब्राह्मणांवर इंग्रजांचा कारभार असे त्या नवीन राज्याचे स्वरूप झाले. कनिष्ठ वर्गावर वाढते कर बसवून आणि गरिबांच्या मिठावरदेखील कर बसवून ब्राह्मणांनी आणि इंग्रजांनी मजा मारली.'

शेतकीसाठी काढलेल्या कालव्याचे पाणी शेतकऱ्यांना वेळेवर मिळत नसे. जर वेळी पाणी मिळाले तर ते पुरेसे नसे. याला कारण त्या खात्याच्या कारभारात पक्षपात आणि लबाडीचा व्यवहार चालत असे. भाजीविक्रेते आणि फेरीवाले यांसारख्या लहानलहान धंदे करणाऱ्या गरिबांच्या दृष्टीने नगरपालिकेने त्यांच्यावर बसविलेला कर हासुद्धा जोतीरावांच्या मते जुलमी होता. आणि त्यात वाईट गोष्ट अशी की, भाजीपाल्याच्या व्यवहारात किंवा फेरीवाल्यांच्या धंद्यात प्रत्यक्ष विक्रेत्यांना विशेष फायदा न होऊन तो अडत्यांच्याच खिशात पडे. विश्वनाथ दाजी नावाच्या एका ब्राह्मण अधिकाऱ्याची जोतीरावांनी मुक्तकंठाने प्रशंसा केली. कारण विश्वनाथ दाजी हे गरीबांचे कैवारी होते आणि आपल्या कामात ते निःपक्षपाती असून निर्मळ मनाचे होते. करांचे ओझे गरीब कामगारांवर नि शेतकऱ्यांवर पडल्यामुळे त्यांची दैन्यवस्था झाली. जवळ जवळ चार कोटी लोकांना दिवसा एकदाही पोटभर अन्न मिळत नव्हते. अन्नाशिवाय रस्त्यावर तडफडत असणारे लोक दिसत नाहीत असा दिवस जात नाही, अशी त्या काळी स्थिती होती.

शेतीवर वाजवी कर बसवावा. शेतकऱ्यांचे अज्ञान दूर करावे. भोळ्या समजुतींपासून त्यांना दूर करावे म्हणजे ते ब्राह्मणांच्या बंडात सामील होणार नाहीत आणि त्यांचा नाश टळेल, अशी जोतीरावांनी सरकारला विनंती केली. ब्रिटनमधील कामगार यंत्रांवर काम करीत असल्यामुळे ते स्वस्त दराचा माल निर्माण करीत. ब्रिटिश व्यापारी हिंदुस्थानातून कापूस, चामडी यांसारखा कच्चा माल घेऊन आपल्या देशात त्याचा पक्का माल करून तो हिंदुस्थानात विकून भरमसाट फायदा मिळवीत.

'याचा परिणाम असा झाला की, भारतातील कारागीर आणि कामगार हे वाढत्या प्रमाणात धुळीस मिळत आहेत. शेतकरी आपला पैसा लग्नसमारंभात भरमसाट खर्च

करतात हे सरकारी अधिकाऱ्यांचे प्रतिवृत्त खोटे आहे. ब्रिटिश भांडवलदारांनी अनेक वर्षे भरमसाट व्याज आकारून पैशांची पुंजी केली आहे. जर हिंदी शेतकऱ्यांविषयी सरकारला खरी कळकळ वाटत असेल, तर ब्रिटिश भांडवलदारांना व्याजाच्या रूपाने दर वर्षाला जे पाच कोटी रुपये मिळतात ते त्यांनी बंद करावे आणि हिंदी शेतकऱ्यांना कर्जमुक्त करावे. हे सत्कृत्य सरकारने केले तर त्याविषयी शेतकरी त्यांना दुवा देईल. लहानसहान सावकारांना मिळणारे व्याज बंद करून विशेष काही होणार नाही.'

मोठ्या पगाराचे अधिकारी कमी करावे. राज्यकारभारावर खर्च होणारा पैसा कमी करावा. सरकारने हिंदी लोकांचा पैसा युद्धावर खर्च करू नये. नवीन पतपेढ्या सुरू करून शेतकऱ्यांचा प्रश्न सुटणार नाही; यापेक्षा वेडरबर्न साहेबांनी ब्रिटिश भांडवलदारांना व्याजाच्या रूपाने जो पैसा पाठविण्यात येतो तो बंद करण्याचे प्रयत्न करावेत. शेतकऱ्यांना कर्जमुक्त करावे. त्यांना पुरेसे अन्न मिळावे. त्यांच्या मुलांना शिक्षण देण्यास ते समर्थ झाले पाहिजेत. अशा सूचना त्यांनी केल्या आहेत.

## . ३ .

'जरी शेतकरी आणि त्याचे कुटुंब हे अष्टौप्रहर राबत असतात, तरी त्यांचे सर्वांचे मिळून मासिक वेतन ३१ रुपये होते. तर एकटा युरोपियन अगर एतद्देशीय अधिकारी आपल्या चैनीवर दर महिन्याला १५ किंवा अधिक रुपये खर्च करतो. जिल्हाधिकारी आणि दुसरे अधिकारी यांना जो भरमसाट पगार देण्यात येतो त्यामुळे सरकारचे कसे अन्यायी धोरण आहे हे दिसून येते.'

'इंग्रज सैनिकाचे उत्पन्न प्रामाणिक, कष्टाळू अशा हिंदी शेतकऱ्याच्या उत्पन्नापेक्षा १० पटीने अधिक असते. शेतकरी आणि त्याचे कुटुंब शेतावर सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत खपत असते. शेतकरी अनवाणी चालतो. कमरेभोवती पंचा गुंडाळतो. त्याच्या कमरेस पानसुपारीची एक चंची असते. डोक्याला फाटका रुमाल बांधलेला असतो. त्याच्या अंगावर ह्याहून वेगळे काही नसते. भर उन्हात तो काम करतो. त्याच्या हातात लाकडी नांगर आणि जिभेवर जुने सुंदर गाणे असते.'

'शेतकरी जेव्हा न्यायालयात जातो तेव्हा खादीचे कुडते घालतो. पायांत फाटकी पादत्राणे असतात. त्याच्या जेवणात जोंधळ्याची किंवा नाचणीची भाकरी, रताळी, गाजरे आणि शक्य झाल्यास मांसाची आमटी असते. जेवणाच्या वेळी चटणीचा गोळा मात्र वर्षभर न चुकता असतो. शेतकऱ्याच्या ह्या दैन्यावस्थेची ब्रिटिश सैनिकाच्या सुस्थितीशी जोतीराव तुलना करतात. सैनिक उत्तम गणवेश अंगावर घालतो. लांडी विजार, पैरण, टोपी, पायमोजे, बूट चढवून, खांद्यावर बंदूक घेऊन तो परेड मैदानावर ऐटीत जातो. आरोग्याच्या दृष्टीने म्हणाल तर शेतकऱ्याचे घर शेणाने सारविल्यामुळे त्याला घाण येते. शेजारच्या गोठ्यातील घाण दरवळत असते. स्वयंपाकघरात मातीची

भांडी, खोलीमध्ये फाटक्या गोधड्या आणि चटया आणि एखाद्या कोपऱ्यात कललेली कणंग. असे असते शेतकऱ्याचे घर.'

अतिशूद्रांच्या परिस्थितीविषयी जोतीराव लिहितात: 'हेन्री फॉसेट यांनी इंग्लंडचे मुख्य प्रधान ग्लॅडस्टन् यांचेबरोबर भारतात यावे आणि अतिशूद्रांच्या परिस्थितीची पाहणी करावी व एखादद्दुसरा आठवडा त्यांच्यामध्ये राहवे. तसे जर त्यांनी केले तर अतिशूद्रांच्या परिस्थितीविषयी बडबड करण्यापेक्षा ते अमेरिकेसच पळून जातील, अशी माझी खात्री आहे.' हेन्री फॉसेट हे निधड्या छातीचे ब्रिटिश राजकारणी होते. ते हिंदी लोकांची बाजू ब्रिटिश लोकसभेपुढे मांडीत असत. हिंदी लोकांचे पैसे इंग्लंडमधील राज्यकर्त्यांनी आपल्या स्वार्थासाठी वापरू नयेत याविषयी ते आरडाओरडा करीत.

'जसा ख्रिस्त्यांना एकच प्रमाणभूत बायबल ग्रंथ आहे, मुसलमानांना एकच कुराण आहे, तसा सर्व हिंदूंना प्रमाणभूत असा धर्मग्रंथ नाही. शूद्रांना आपला धर्म कोणता हेच माहिती नाही. ब्राह्मणाच्या आंगठ्याने शुद्ध झालेले पाणी ते अज्ञानाने पितात व अज्ञानपणे धातूच्या मूर्ती पूजतात. गाय, सर्प, तुळशी आणि भुते यांची पूजा करतात. शेतकऱ्यांच्या मुलांना सरकारने सक्तीचे प्राथमिक शिक्षण दिले पाहिजे. खेड्यांतील प्रचलित इंग्रजी आणि मराठी शाळा बंद कराव्या. कनिष्ठवर्गातील शिक्षक निवडावे आणि त्यांना शिक्षकीचे प्रशिक्षण द्यावे. शेतकऱ्यांच्या मुलांकरिता खास वसतिगृहांची सोय करावी. त्यांच्या मुलांना एका विशिष्ट वयोमर्यादेपर्यंत शाळेत जाण्यास भाग पाडावे. शूद्रवर्गातील अशा रीतीने तयार केलेल्या नवीन शिक्षकांची नेमणूक खेड्यांतील शाळांत करावी शेतकऱ्यांच्या मुलांना पाट्या, पुस्तके व कपडे पुरवावे. शेतकऱ्यांच्या मुलांना शिकविण्यात ब्राह्मण शिक्षक आनंद मानीत नाही. त्यांना तसे करणे मनापासून आवडत नाही. म्हणून ते भाडोत्री शिक्षक ठरतात. शेतकऱ्यांच्या सुशिक्षित मुलांना विलायतेतील शेतकी शाळा सरकारी खर्चाने दाखवून आणाव्या.'

'कारागीर, कामगार, सुतार, लोहार, सोनार, चांभार आणि गुन्हेगार जाती यांच्या मुलांसाठी निराळ्या शाळा काढून त्यांना त्यांच्या धंद्याचे शिक्षण द्यावे म्हणजे गुन्हेगार जातींतील मुले कुकर्मांपासून परावृत्त होतील. युरोपातील आणि अमेरिकेतील कामगारांप्रमाणे ते आपली परिस्थिती सुधारतील. जर ते शाळेत गेले नाहीत, तर त्यांना शाळेतील हजेरी सक्तीची करावी.'

'पारशी, मुसलमान आणि हिंदू यांनी एकी केली पाहिजे असा ब्राह्मण चळवळे उपदेश करतात. ते सत्य सांगत नाहीत. ती शुद्ध लबाडी आहे. जोपर्यंत त्यांनी महार-मांगांचा प्रश्न सोडविण्याची तयारी दाखविली नाही, तोपर्यंत त्या ब्राह्मण चळवळ्यांच्या हितोपदेशावर आपण विश्वास ठेवणार नाही. जे शूद्र अशिक्षित आहेत तेच फक्त त्यांच्या भाषणांनी आणि लेखांनी फसून जातात.'

डॉ. बेंजामिन फ्रॅंकलीन आणि थॉमस पेन यांनी आपल्या देशातील जनतेच्या उद्धाराचे जे कार्य केले त्याबद्दल जोतीरावांनी त्यांची प्रशंसा केली. ब्राह्मणांनी आपले ज्ञान वेदा-

भ्यासापलीकडे न वाढविल्यामुळे युद्धविद्या व विज्ञान ह्या विषयांचे त्यांचे ज्ञान विकास पावले नाही. त्यामुळे त्यांना दुर्बिणीचा उपयोग कळला नाही. दुर्बिणीच्या साह्याने लढाईत अचूकपणे मारा कसा करावा हे त्यांना माहीत नव्हते, असे त्यांनी म्हटले आहे.

ब्राह्मण संस्थानिक हे बहुधा शूद्र अतिशूद्रांच्या कार्याला साह्य करीत नाहीत. परंतु ब्राह्मणेतर संस्थानिकांना ब्राह्मण फसवितात ही गोष्ट जोतीरावांच्या नजरेतून सुटली नाही. जर गरीब लोकांना आणि भिकाऱ्यांना ब्राह्मण पक्षपातीपणाने वागवितात, तर ब्राह्मणेतरांना ब्राह्मण देणगी देणार नाहीत हे सांगावयास नकोच. जोतीरावांच्या म्हणण्याची प्रचीती रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक यांनी केलेल्या दानधर्मावरून येईल. मंडलिक हे त्या काळचे मुंबई प्रांतातील मोठे नामांकित नेते. ते चित्पावन ब्राह्मण. त्यांनी आपल्या एकसष्टीच्या वेळी तुळा करून ते धन केवळ ब्राह्मणांनाच वाटले. जातीयवृत्तीच्या ह्या दानधर्मावर 'सुबोधपत्रिकेने' टीका केली आहे.[1]

'जर ब्राह्मणांना देशाचा खरोखर उद्धार करावयाचा असेल, तर त्यांनी जातिभेद आणि उच्चनीच भावाचे तत्त्व शिकविणाऱ्या आपल्या धर्माचा निषेध केला पाहिजे. जातिभेदाचा उच्छेद केला पाहिजे. विषमता शिकविणारा जातिभेद नष्ट केला पाहिजे. जर सामाजिक समता प्रस्थापित झाली नाही, तर खरी एकी होणार नाही. देशाच्या उद्धाराच्या कार्यात अर्धवट सुशिक्षित शूद्रांना आपल्या बाजूला वळविण्यात काही ब्राह्मणांना यश आले असे दिसले, तरी खरी परिस्थिती कळून यायला त्यांना वेळ लागणार नाही. शेवटी त्या अर्धवट सुशिक्षित शूद्रांचा भ्रमनिरास होऊन त्यांना अंती दुःख होईल.'

'शेतकऱ्याने नीतीने वागावे याबद्दल सरकारने कटाक्ष ठेवावा. तसा त्यांनी उपदेश करावा. त्यांनी चोरी करू नये आणि अनीतीने वागू नये. जे शेतकरी आणि शूद्र अनीतीने वागतात, त्यांना शिक्षा केली पाहिजे. त्यांनी एकापेक्षा अधिक लग्ने करू नयेत. त्यांनी आपल्या मुलांची लग्ने बालपणी करू नयेत.'

'सरकारी नोकरीत ब्राह्मणांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात नोकऱ्या द्याव्यात. शूद्र शिकून तयार होईपर्यंत सरकारी नोकरीत मुसलमान, शीख व दुसरे ब्राह्मणेतर यांना नेमावे. जसजसे कनिष्ठ वर्गातील लोक शिकून तयार होतील तसतसे त्यांना मामलेदारसारख्या अधिकाऱ्यांच्या जागा द्याव्या. त्यामुळे सरकारचे उत्पन्नही वाढेल आणि शेतकऱ्यांना हितकर्तेही मिळतील.'

## . ४ .

जोतीरावांनी आपल्या ह्या ग्रंथात आणखी एक महत्त्वाची सूचना केली आहे. ती अशी की, जे मारवाडी आणि व्यापारी भेसळीचे जिन्नस विकतात किंवा खोटी मापे

---

१. सुबोधपत्रिका, १५ सप्टेंबर १८७८.

वापरतात त्यांच्यावर सरकारने पाळत ठेवावी. शेतकरी आणि सावकार ह्यांच्यामधील व्यवहारावर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारने जो कायदा केला, त्या कायद्याइतकीच ही सूचना महत्त्वाची आहे. दारू पिणाऱ्या पोलीसपाटलावरही देखरेख असावी, असे त्यांनी सुचविले आहे.

'नवीन धर्तीची उपकरणे वापरण्याचा शेतकऱ्यांना सराव होईपर्यंत त्यांना शिक्षण द्यावे. हिंदुस्थानातील युरोपियन आणि हिंदी मुसलमान यांना कायद्याने गोमांस खाण्याची बंदी करावी. त्याऐवजी त्यांना शेळ्यामेंढ्यांचे मांस खाण्यास भाग पाडावे. त्यांनी पाहिजे तर आपल्यासाठी गोमांस परदेशांतून मागवावे. कायद्याने गोमांसाला बंदी केल्याशिवाय हिंदी शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारणार नाही. गोमांसाची बंदी झाली म्हणजे शेतकऱ्यांना शेतीसाठी बैलांचा भरपूर पुरवठा होईल.'

'सरकारने शांततेच्या वेळी गोरे आणि काळे सैन्य व पोलीसदल कामास लावून नदीवर धरणे बांधावी. जेव्हा जेव्हा पाऊस अवेळी पडतो तेव्हा तेव्हा तो शेतामध्ये मुरवून टाकला पाहिजे आणि पाट काढून ते नदीला मिळविले पाहिजेत म्हणजे जमीन धुपून जाणार नाही. पालापाचोळा, हाडे आणि निरनिराळ्या प्रकारचे खत ही वाहून जाता कामा नये. हे कार्य करीत असताना सैनिकांना मोकळी हवा मिळेल अन् त्यांचे आरोग्य व तरतरीतपणा कायम राहील. आणखी असे की देशाची संपत्ती वाढविल्याचे श्रेय सैनिकांना मिळेल. राखीव पोलीसदलाचाही असाच उपयोग केला पाहिजे. टेकड्यांवर तलाव बांधावे. नद्यांवर धरणे बांधावी. हाडे, राख व शेण ही वाहून जाऊ नयेत अशी खबरदारी घ्यावी. नदीचे पाणी विहिरींतून साठवून ते फळबागांसाठी आणि शेतांसाठी उपयोगात आणावे. ज्या ठिकाणी पाणी पडते ती जमीन धुपून जाऊ नये यासाठी दक्षता बाळगावी.'

'जे शेतकरी सरकारी मार्गदर्शनाशिवाय किंवा मदतीशिवाय स्वतः विहिरी खणतील त्यांना उत्तेजनार्थ योग्य ती बक्षिसे द्यावी. तलाव, तळी आणि नद्या यांतील गाळ शेतकऱ्यांना विनामूल्य द्यावा. गावांतील कुरणे शेतकऱ्यांच्या स्वाधीन करावी. सरपणाला लाकूड म्हणून पालापाचोळा त्यांना द्यावा. परंतु वृक्ष तोडू नये. झाडे तोडू नयेत म्हणून कायदा करावा. नवीन शेळ्यामेंढ्यांची उपज करण्यासाठी चांगल्या चांगल्या जातीच्या शेळ्या परदेशांतून आणून शेतकऱ्यांना द्याव्या म्हणजे लोकरीचा पुरवठा होईल आणि त्यांच्या लेंड्यांचा शेतीसाठी उपयोग होईल. शेतीचे रक्षण करण्यासाठी त्यांना बंदुका द्याव्यात. जर शेतांची डुकरादी प्राण्यांनी नासधूस केली, तर पोलीस अधिकाऱ्यांना जबाबदार धरून त्यांच्या पगारातून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई करून द्यावी. असे घडले तर शेतकऱ्यांना रात्री भरपूर विश्रांती आणि झोप मिळेल. श्रावणमासात शेतकऱ्यां-साठी प्रदर्शने भरवावी. जो शेतकरी उत्तम पीक काढील त्याला आश्विनात त्याच्या नांगरणीच्या उत्तम कलेबद्दल व उत्तम पीक काढल्याबद्दल बक्षिसे द्यावी. कोंगाटी आणि तमासगीर यांना अश्लील गीते म्हणण्याची बंदी करावी. जोगिणी, मुरळ्या, कोल्हाटणी,

कसबीणी यांच्यावर लक्ष ठेवून त्यांना वेगळ्या वस्त्यांमध्ये ठेवावे. असे झाले तर शेत-कऱ्यांची नवीन पिढी निरोगी, मजबूत व बळकट होईल.'

'शेतकऱ्यांना शेतीविषयी ज्ञान देणारी पुस्तके द्यावीत. न्यायालय, पोलीसखाते आणि सैन्यविभाग यांत मोठ्या पगाराच्या जागा असल्यामुळे सरकारी उत्पन्नापैकी बराच मोठा भाग त्यावर खर्च होतो व शेतकऱ्यांना साधे अन्नही मिळत नाही. कनिष्ठश्रेणीच्या नोकरांचे पगार वाढवावे, कनिष्ठ कामगारांच्या वेतनाचे दर वाढवावे. शेतकऱ्यांपासून जो कर वसूल केला जातो तो शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणावर खर्च केला पाहिजे. जर सरकारी तिजोरीतील पैसा ब्राह्मणांच्या शिक्षणावर खर्च केला आणि उद्या त्यांनी सरकारचा पराभव केला, तर सरकारला, ज्या शेतकऱ्यांच्या काबाडकष्टांमुळे सारा येतो त्यांच्याकडे दुर्लक्ष केल्याबद्दल, ही चांगली अद्दल घडेल.'

जोतीरावांच्या 'शेतकऱ्याचा असूड' ह्या ग्रंथावरून एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी हिंदी शेतकऱ्यांची परिस्थिती कशी होती, याचे हुबेहुब दर्शन घडते. शेतकी विज्ञान-निष्ठ असावी अशी जोतीरावांची धडपड होती. गुरांचीही वीण शास्त्रीय पद्धतीने व्हावी असे त्यांना वाटे. गुरांचे खाणे, सरपण, खत यांचे त्यांना महत्त्व समजत होते. जमिनीचा जास्तीत जास्त उपयोग करावा असे त्यांना वाटे. शेतीचे कमी होत जाणारे उत्पन्न आणि जमीनधुपणी यांविषयी त्यांना चिंता वाटे. त्यामुळे सरकारने शेतकऱ्यांना संरक्षण देऊन त्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी काही योजना आखावी असे त्यांना वाटे. हिंदी शेतकऱ्याचा जीवनकलह फार विकट आणि भयंकर झाला आहे. तो अशिक्षित, अज्ञानी असून वर्षाचे चार महिने तो कसा निरुद्योगी असतो, याचे हुबेहूब चित्र त्यांनी रेखाटले आहे. त्याच्या कुटुंबापेक्षा त्याच्या जनावरांची भयंकर उपासमार होत आहे. जनावराची निपज चांगली होत नाही आणि त्यांचा उपयोगही चांगला करण्यात येत नाही. त्याच्या शेतीची उपकरणे जुन्या तऱ्हेची त्रेतायुगातील आहेत. आणि शेतजमीन तर पाण्याच्या अभावी वाळलेली आहे. पावसाच्या दयेवर शेतकऱ्याचे भवितव्य अवलंबून असता कामा नये, टांगते ठेवू नये. कारण पाऊस हा लहरी आणि बेभरवशाचा असतो. ग्रंथांतील पाच प्रकरणांचा हा असा गोषवारा आहे.

हिंदी शेतकीची परिस्थिती कशी आहे, त्यासंबंधी काय चुकत आहे हे जोतीरावांच्या पुस्तकावरून दिसून येते. दऱ्यांत आणि नद्यांवरून धरणे बांधण्याचे त्या काळी जोती-रावांना दिसणारे दृश्य स्वतंत्र भारतात खरे ठरले आहे. परंतु शेतीची पद्धत आणि अवजारे ही अद्यापही बहुतेक जुनीच आहेत. सावकारांच्या तावडीतून शेतकऱ्यांना सोडविण्यासाठी सरकारने कायदा केला आहे. जमीनदारीपद्धती नष्ट होत आहे. तथापि सुधारलेल्या देशांत प्रत्येक एकरी जेवढे पीक येते त्याच्यापेक्षा कितीतरी पटीने कमी भारतात येते. भारतातील शेतकऱ्यांची प्रचंड लोकसंख्या जवळजवळ उपासातच जीवन कंठीत असते. ज्या दिवशी हे लक्षावधी शेतकरी भरलेल्या पोटाने नि सुखासमाधानाने

झोपी जातील तो भारताचा सुवर्णदिन ठरेल. शेतकरी सुखी तर देश सुखी अशीच जोतीरावांची धारणा होती हे यावरून दिसून येते.

आपल्या ग्रंथाच्या शेवटी, पुण्यातील स्कॉटिश मिशन आणि सरकारी संस्था यांनी आपल्याला मनुष्याच्या हक्कांविषयी जे ज्ञान दिले, त्याविषयी त्यानी कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला आहे. ज्या सच्छील युरोपियन सद्‌गृहस्थांनी त्यांच्या कार्याला आर्थिक साहाय्य केले होतें, त्यांच्याविषयी त्यांनी त्यांना धन्यवाद दिले. ज्या ब्रिटिश राजवटीत मोकळे-पणाने आणि निर्भयपणाने ते आपले विचार मांडू शकले, त्या ब्रिटिश राजवटीलासुद्धा त्यांनी धन्यवाद दिले ! विधाता शेतकऱ्यांना त्यांच्या खडतर जीवनाची जाणीव उत्पन्न करो, अशी त्यांनी शेवटी प्रार्थना केली आहे.

· ५ ·

जोतीरावांचे अनुयायी सामाजिक सुधारणेत थोडथोडी प्रगती करीत होते. त्यांना थोडेबहुत यशही लाभत होते. जोतीरावांचे एक प्रमुख सहकारी आणि शिष्य रामय्या आय्यावारु यांनी मुंबई येथील कामाठीपुऱ्यामध्ये स्त्रियांसाठी एक संस्था स्थापिली होती. कामाठीपुरा येथे त्या काळी तेलगू समाजाचे लोक राहत असत. हा समाज फुलमाळी जातीचा असून ह्या समाजाने महाराष्ट्रातून १२९६ च्या दुष्काळात तेलंगण येथे स्थलांतर केले होते. वर उल्लेखलेली स्त्रियांची संस्था दर शनिवारी रामय्या व्यंकय्या यांच्या घरी सभा भरवीत असे. सत्यशोधक समाजाने चालविलेल्या सामाजिक क्रांतीतील हे एक पुढचे पाऊल होते. फुलमाळी समाजातील व इतर कनिष्ठ समाजातील स्त्रिया यांनी एकत्र येऊन काही सामाजिक प्रश्नांचा विचार करणे ही त्या काळी अपूर्वच अशी गोष्ट होती.

त्या समयास दक्षिण हिंदुस्थानमध्ये सामाजिक चळवळ पाय रोवीत होती असे दिसते. त्या काळच्या शंकराचार्यांनी व त्यांच्या अनुयायांनी राजमहेंद्री येथील हिंदू मुनसफावर बहिष्कार टाकला होता. त्याने एका विधवेच्या पुनर्विवाहाच्या समारंभात भाग घेतला होता. त्यांच्या दृष्टीने त्याच्या हातून हा मोठा अपराध घडला होता. मुन्सफाने शंकरा-चार्य आणि त्यांचे साथीदार यांच्याविरुद्ध फिर्याद दाखल केली. कनिष्ठ न्यायालयात मुनसफाच्या बाजूने निर्णय लागला आणि शंकराचार्य व त्यांचे साथीदार यांना दोनशे रुपये दंड झाला.[२] दंड न भरल्यास त्यांनी वीस दिवसांची सजा भोगावयाची होती. धार्मिक आणि सामाजिक विचारांच्या प्रगतीबरोबर धर्माधिकारी जाऊ शकत नव्हते. ते मागे पडत चालले होते. प्रगतिपर विचार किंवा कृती यांची कास न धरता धर्मक्षेत्रातील प्रमुख आपले आयुष्य ऐदीपणात घालवीत होते. धर्माधिकाऱ्यांच्या प्रतिष्ठेला आणि सत्तेला आता ओहोटी लागली होती.

---

२. केसरी, ३ मे १८८३.

याच काळात हिंदी स्त्रिया आणि मुले यांच्यासाठी युरोपातून स्त्री डॉक्टर आणण्याकरिता मोठा निधी उभारण्यात आला. एका पारशी लक्षाधिशाने एक लक्ष रुपयांची देणगी दिली. एडीथ पेशी फिप्सन् ह्या डॉक्टरीणबाईंना कामा इस्पितळची प्रमुख डॉक्टर म्हणून १८८३ साली आणण्यात आले. याच डॉक्टरबाईंनी १८८५ साली गाजलेल्या रुक्मिणीबाई प्रकरणात प्रमुख भाग घेऊन रुक्मिणीबाईंना लंडनला जाण्यात साहाय्य केले. स्त्रियांना कारकुनाची नोकरी द्यावी म्हणून त्या काळी काही सुधारक मताचे लोक सरकारदरबारी प्रयत्न करीत होते. स्त्रियांना सरकारी नोकरीत घेतले, तर त्यांना फारसे मोठे वेतन द्यावे लागणार नाही असे ते सरकारला पटविण्याचा प्रयत्न करीत. पण अशी सुधारणा करण्याची वेळ अद्याप या देशात आलेली नाही, असे सांगून सरकारने त्यांची विनंती धुडकावून लावली.[3] त्या काळी कलकत्ता येथील वैद्यक महाविद्यालयामध्ये एक हिंदू मुलगी शिकत होती[4] आणि विजगापट्टण येथे एक हिंदी स्त्री वकिलीचा धंदा करीत असे.

'शेतकऱ्याचा असूड' या ग्रंथास जोडलेल्या परिशिष्टात आणि काही काळानंतर लिहिलेल्या 'सत्सार' या पुस्तिकेमध्ये जोतीरावांनी पंडिता रमाबाई यांना हिंदुधर्मांत ठेवण्यात ब्राह्मणांना अपयश लाभले म्हणून त्यांची थट्टा केली आहे. हिंदुधर्माची महती गाणाऱ्यांना त्यांनी असे विचारले आहे की, 'जर हिंदुधर्मांची महती आणि थोरवी मॅक्समुल्लरला कळली आहे, तर त्यांनी स्वतः वैदिकधर्मांची दीक्षा का घेतली नाही ?'

पंडिता रमाबाई यांचा जन्म एका चित्पावन ब्राह्मण कुटुंबात झाला. रमाबाईंचे वडील संस्कृत भाषेचे महान पंडित होते. वेद आणि वेदांत ह्या शास्त्रांचे ते एक मोठे अधिकारी पुरुष गणले जात. वडिलांच्या देखरेखीखालीच रमाबाईंचा आणि त्यांच्या बंधूंचा संस्कृत वाङ्मयाचा अभ्यास झाला. त्यांनी वेद आणि इतर हिंदुशास्त्रे यांच्यावर मोठे प्रभुत्व मिळविले होते. त्यांचे वडील १८७४ च्या जुलै महिन्यात निधन पावल्यानंतर आठ महिन्यांनी त्यांची बहीणही कालवश झाली. पुढील सहा वर्षे रमाबाई व त्यांचा बंधू ह्यांनी सर्व हिंदुस्थानात संचार केला. प्रवासात त्यांना अतिशय कष्ट झाले, भयंकर अडचणींना तोंड द्यावे लागले. नद्या, पर्वत व टेकड्या ओलांडताना त्यांचा जीव मेटाकुटीस आला.

आपल्या प्रवासात रमाबाई भागवत ग्रंथ वाचत असत. त्या काळी त्या विष्णुभक्त होत्या असे दिसते. पुढे रमाबाईंच्या प्रवासात त्यांना हालअपेष्टा भोगाव्या लागल्यामुळे प्रचलित हिंदुधर्मावरील त्यांचा विश्वास उडाला असावा. जगात देव एकच असावा असा त्यांचा विश्वास दृढ होऊ लागला. भारतीय कीर्तीची 'पंडिता' म्हणून कलकत्त्यात त्यांचा उदय आणि गौरव झाला. कलकत्त्यात त्यांनी केलेल्या भाषणांमुळे त्यांच्या कीर्तीच्या लाटा हिंदुस्थानभर पसरत गेल्या.

---

३. इंदुप्रकाश, ९ जुलै १८८३.

४. इंदुप्रकाश, ३० जुलै १८८३.

रमाबाईंशी लग्न करण्याची इच्छा हिंदुस्थानातील निरनिराळ्या प्रांतातील पंडितांनी प्रदर्शित केली. शेवटी त्यांनी बाबू विपीन विहारी दास यांच्याशी विवाह केला. बाबू बिपीन विहारी हे वकील असून ब्राह्मसमाजी होते. पंडिता रमाबाईंचे बंधू १८८० साली मृत्यू पावले. त्यांचे पतीही १८८२ च्या फेब्रुवारी महिन्यात परलोकवासी झाले.

त्यानंतर पंडिता रमाबाई मुंबईस आल्या. स्त्रियांच्या उद्धारासाठी आपण आपले जीवित व्यतीत करावे असे ठरवून त्यांनी मुंबई येथे 'आर्यमहिलाश्रम' नावाची संस्था स्थापन केली. त्या मोठ्या महत्त्वाकांक्षी होत्या. त्यांचे नीतिधैर्य मोठे होते. त्यांचा उत्साह अलौकिक होता. त्यांच्या ठायी संघटनाचातुर्य होते. प्रार्थना समाजाच्या नेत्यांशी त्यांचे बंधुभावाचे नाते होते. पुढे त्या ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या आग्रहावरून इंग्लंडला पुढील शिक्षणासाठी गेल्या. तेथे आपला स्वतःचा अभ्यास करून एका महाविद्यालयात संस्कृतच्या अध्यापिका म्हणून काम करू लागल्या. त्या वेळी लोकांत अशी वदंता पसरली होती की, आपण वैद्य व्हावे अशी रमाबाईंची इच्छा आहे.

पंडिता रमाबाईंनी ख्रिस्तीधर्म स्वीकारण्यापूर्वी एक महिना अगोदर त्यांनी आपल्या एका पत्रात असे लिहिले होते की, 'ख्रिश्चनधर्म स्वीकारण्याचा माझा बेत नाही, कारण सर्व धर्मांत काहीना काही दोष आहेतच. वाईट चालीरीतीही आहेत.' त्यांचे हे पत्र मुंबईतील त्यांच्या स्नेहीमंडळीने अनेकांकडे माहितीसाठी पाठविले होते. 'ख्रिश्चनधर्म स्वीकारण्याची माझ्या मनात कल्पनाही आलेली नाही. युरोपियन कुटुंबात प्रवेश करण्याची माझी इच्छा नाही वा पाश्चिमात्य चालीरीती वा सवयीही लावून घेण्याची माझी इच्छा नाही.' असे अभिवचन आपल्या मुंबईतील मित्रमंडळींना त्यांनी दिले होते. त्यांचे उपरोक्त पत्र प्रसृत करण्यात त्यांच्या चाहत्यांना मोठा अभिमानच वाटला. परंतु रमाबाईंनी एकाएकी आपले मत बदलले आणि ख्रिस्तीधर्म स्वीकारला.[५]

त्यावर प्रार्थना समाजाचे मुखपत्र 'सुबोधपत्रिका' यात पंडिता रमाबाईविषयी कडक टीका करण्यात आली. पंडिता 'रमाबाईविषयी आपणाला वाटत असलेला संशय खरा ठरला' असे म्हणून इंदूप्रकाशने म्हटले, 'तारुण्य, पांडित्य आणि सौंदर्य ह्यांनी संपन्न अशा पंडितेची ही शोकांतिका आहे. अरेरे, पवित्र व्यक्ती होण्यासाठी तुम्ही एवढा वेळ घ्यावा, हे तुमचे सुदैव आहे. तुम्ही पंडिता आहात परंतु अबला आहात, हेच खरे!'[६]

पंडिता रमाबाईंच्या धर्मांतरासंबंधी 'सुबोधपत्रिका' आणि मलबारींचे 'इंडियन-स्पेक्टेटर' ह्यांमध्ये मोठी खडाजंगी झाली. त्या वादविवादाचा समारोप करताना मलबारी म्हणाले, 'पंडिताबाईंनी दाखविलेला विचित्रपणा आणि आपल्या देशबांधवांची केलेली फसगत याचे समर्थन करण्याची आमची इच्छा नाही. परंतु आमचे अजून असे

---

५. इंदुप्रकाश, २८ ऑक्टोबर १८८३.

६. –कित्ता–.

ठाम मत आहे की, त्यांचे धर्मांतर ही गोष्ट काही क्षणिक लहरीचा परिणाम नव्हे- या बाबतीत त्यांची वर्तणूक योग्य नव्हे हेच खरे.'[७]

तथापि जाता जाता मलबारींनी प्रार्थना समाजाच्या नेत्यांची हजेरी घेतली. रमाबाईंच्या त्या वडवड्या चहात्यांनी तिच्या बाबतीत विशेष काहीच केले नाही. जे घडले ते त्यांना टाळता येण्यासारखे होते. रमाबाईंची जी त्यांनी तजवीज केली होती ती पुरेशी नसावी किंवा त्यासंबंधात रमाबाईंना ज्या त्यांनी अटी घातलेल्या असतील त्या, त्या मानी आणि उत्साही महिलेला अपमानकारक वाटल्या असाव्या, असेही ते पुढे म्हणाले. रमाबाईंचे जे पत्र प्रार्थना समाजाच्या नेत्यांनी मोठ्या दिमाखाने प्रसृत केले होते, त्याची त्यांना आठवण देऊन मलबारी शेवटी म्हणाले, 'जेव्हा ते पत्र हे बिचारे लोक प्रसृत करीत होते तेव्हा त्या बिचाऱ्यांना माहीत नव्हते की, ती गरीब अबला स्वतःला फसवत होती.'[८]

थोर मनाचे मलबारी यांचे हे रमाबाईंच्या धर्मांतराविषयी मत पाहिले म्हणजे ज्या जोतीरावांनी धर्मांतराच्या कल्पनेला कधीही पाठिंबा दिला नाही, त्यांनी या प्रसंगाचा उपयोग ब्राह्मणांना नाक खाजवून दाखविण्यासाठी करावा हे साहजिकच आहे. रमाबाईंनी हिंदुधर्माच्या विवेचनार्थ जेव्हा पुण्यात तेजस्वी भाषणे केली, तेव्हा त्यांनी इतर धर्मांचा अभ्यास केला नव्हता असे जोतीरावांनी मत दिले. बिचाऱ्या पंडिता रमाबाईंना स्त्री आणि शूद्र यांना हिंदुधर्माने किती हीन दर्जा दिला होता याची कल्पनाही नव्हती. परंतु इंग्लंडमध्ये गेल्यावर हिंदुधर्माने स्त्री आणि शूद्र यांना जो दर्जा दिला आहे त्याविषयी त्यांना कल्पना आली असावी, असा जोतीरावांनी रमाबाईंच्या धर्मांतराच्या प्रकरणाचा अर्थ केला.

जोतीरावांनी धर्मांतराच्या विरुद्ध जो पवित्रा घेतला तो भारतातील थोर पुरुषांच्या मोठ्या परंपरेस धरून होता. पुढील काळात महात्मा गांधी व गुरुदेव टागोर यांनी तोच पवित्रा घेतला. विवेकानंद, लजपतराय, टिळक आणि सावरकर यांसारख्या महावीरांच्या विषयी तर बोलायलाच नको. धर्मांतराच्या बाबतीत ते अगदी स्पष्टपणे कडवे विरोधक होते. ज्या व्यक्तीने स्वतः बाटून आपल्या मायभूमीतील स्त्रियांचे खिस्तीकरण करण्याची हाव बाळगली, ती व्यक्ती हिंदुस्थानातील भावी पिढ्यांच्या स्तुतीस पात्र ठरणार नाही, हे सांगावयास नकोच. धर्मांतरानंतर रमाबाईंच्या आत्म्याची थोरवी आणि भव्यता ही नष्ट झाली होती. धर्मांतरानंतर बाईंची भूमिका ना उरली संताची ना राष्ट्रीय विमोचकाची. खिस्ती धर्म स्वीकारल्यानंतर पंडिता रमाबाईंनी 'मेरी' हे नाव धारण केले. त्यामुळे त्यांच्या जीवितकार्यांचा, बंधुप्रीतीचा व परोपकार बुद्धीचा कणाच मोडून गेला. म. गांधी, टागोर आणि नेहरू यांनी आपल्या जीवितकार्याच्या परिपूर्तीसाठी जर खिस्तीधर्म

---

७. The Indian Spectator, 18 November 1883.

८. –कित्ता—२८ नोव्हेंबर १८८३.

स्वीकारला असता, तर ज्या उच्च स्थानावर म. गांधी आणि नेहरू यांना बसविण्यात आले ते स्थान त्यांना मिळाले असते काय?

जोतीरावांना व्यक्तिशः धर्मांतराचा तिटकारा असे. त्यांच्या शाळेतील महार शिपाई खिस्ती धर्म स्वीकारण्याच्या बेतात असताना त्यांनी त्याचे मतपरिवर्तन केले. त्याला आपले स्नेही जगन्नाथ सदाशिव गोवंडे यांच्याकडे नेऊन साह्य करविले आणि त्याच्या पगारात वाढ केली. तरी राजारामशास्त्री भागवत आणि जोतीराव यांचे पंडिता रमाबाई-विषयी असलेले चांगले मत अबाधितच राहिले. रमाबाईंचा हिंदुधर्मद्वेष इतका पराकोटीस गेला होता की, त्यांनी आपल्या मुलीस संस्कृत शिकण्याचीही बंदी केली होती. जोतीराव आणि राजारामशास्त्री भागवत हे दोन समाजसुधारक रमाबाईंचे खरे कार्य पाहवयास जगले नाहीत. हिंदू स्त्रिया व मुले यांना खिस्ती धर्माच्या दावणीत बांधण्याच्या कामीच रमाबाईंच्या कार्याचा शेवट झाला.

पंडिता रमाबाईंच्या धर्मांतराविषयी खिस्तीधर्माचे प्रसारक 'ज्ञानोदय' या पत्राने म्हटले,[१] 'रमाबाई लंडनला जावयास निघण्यापूर्वी मुंबई व पुणे येथील प्रार्थना समाजाच्या नेत्यांनी रमाबाईंची मर्जी संपादन करण्याकरिता ज्या गोष्टी केल्या, त्या त्यांच्या शब्दांशी विसंगत होत्या. त्यामुळे रमाबाईंचे समाजाविषयी असलेले चांगले मत वाईट झाले.' उपरोक्त बोलणी कोणत्या प्रकारची होती हे कळत नाही. खिस्ती धर्माचा स्वीकार करण्याच्या दिवसापर्यंत रमाबाईंची प्रार्थना समाजाच्या नेत्यांशी चांगला संबंध होता. त्यांना त्यांच्याविषयी आदर होता हे सिद्ध होते. 'ज्ञानोदया'चा उपरोक्त आरोप खरा नसावा असे वाटते.

---

१. ज्ञानोदय, १८ ऑक्टोबर १८८३.

# १६

## चळवळीचे नवे पर्व

जोतीरावांचे तरुण सहकारी नारायणराव लोखंडे हे गिरणी मजुरांच्या उद्धारासाठी जिवापाड मेहनत करीत होते. भारतातील मजुरांची चळवळ करणारी संस्था ही प्रारंभी सत्यशोधक समाजाची एक शाखा होती. अठराशे एक्याऐंशी साली गिरणी-कामगारांच्या हितासाठी एक कायदा करण्यात आला. परंतु तो कृतीत उतरविला गेला नाही. गिरणी मालकांच्या मनात भीतीचे वारे पसरू लागले. त्यामुळे मँचेस्टर येथील कापड गिरण्यांतील मिडकिंग नामक कारखानातपासनीस यांची, मुंबई येथील गिरण्यांत १८८१च्या कायद्याप्रमाणे कसे कामकाज चालले आहे, याचे निरीक्षण करून एक प्रतिवृत्त सादर करण्यासाठी नेमणूक करण्यात आली.

त्याप्रमाणे त्यांनी मुंबईस येऊन पाहणी केली आणि आपले प्रतिवृत्त सादर केले. आपल्या प्रतिवृत्तात काही शिफारशी करताना मिडकिंग म्हणाले,[१] "आठ वर्षांतील मुलांना कारखान्यात कामास ठेवू नये. मुलींना आणि स्त्रियांना सकाळी सहाच्या पूर्वी किंवा सायं-काळी सहानंतर काम करावयास लावू नये. कामाच्या वेळांत विश्रांतीसाठी सुट्टी असावी."

१. Mehta, S. D., The Cotton Mills in India from 1854 to 1954, pp. 127, 194.

मिडकिंगच्या प्रतिवृत्ताचा असा परिणाम झाला की, मुंबईचे जिल्हाधिकारी डब्ल्यू. बी. मुलक यांच्या अध्यक्षतेखाली मे १८८४मध्ये नवीन चौकशीमंडळ नेमण्यात आले. एम. बी. जिजीभाई, मंचेरजी एन. बानाजी, सोराबजी एस. बंगाली, मंचेरजी मुरबान, डॉ. थॉमस ब्लॅने आणि जी. कॉटन हे सभासद होते. तसेच डॉक्टरांची एक खास समिती नेमून त्या समितीस गिरण्यांतील कामगारांच्या आरोग्यरक्षणाची व्यवस्था कशी काय ठेवली गेली आहे याविषयी प्रतिवृत्त सादर करावयास सांगण्यात आले. लोखंडे आणि दुसऱ्या पस्तीस जणांनी चौकशीमंडळापुढे साक्षी दिल्या. ह्या मंडळाच्या प्रतिवृत्ताप्रमाणे कारखान्यात कामावर घेतल्या जाणाऱ्या मुलांचे वय किमान साताऐवजी नऊ करण्यात आले. जास्तीत जास्त वय १२ ते १४ असावे. मुलाने सकाळी सात ते सायंकाळी पाचपर्यंत काम करावे. जेवण नि विश्रांती ह्यासाठी मध्ये एक तास सुट्टी देण्यात यावी. मुलांना नि स्त्रियांना महिन्यातून चार सुट्या देण्यात याव्या. जो कायदा करण्यात यावयाचा आहे त्यात आरोग्यविषयक काही नियमांचा उल्लेख असावा, असे त्या मंडळाने आपले मत दिले.

कामगारांच्या चळवळीकडे जोतीराव अत्यंत कळकळीने लक्ष देत असत. मुंबईस गेल्यावर लोखंड्यांना भेटून कामगार चळवळीला ते गती देत असत. त्यातील कार्यकर्त्यांना कार्यप्रवण करीत असत. कामगारांची परिस्थिती सुधारणे हेच त्या चळवळीचे ध्येय होते. सत्यशोधक समाज शेतकरी आणि कामगार यांच्या गाऱ्हाण्यांना तोंड फोडीत असे. चळवळीचा मुख्य भर कामगार नि शेतकरी यांची आर्थिक बाबतीत सुधारणा घडवून आणणे नि त्यांना सामाजिक न्याय मिळवून देणे यावर होता. त्या चळवळीचे, धार्मिक संस्कार नि सामाजिक चालीरीती यांच्या नावाखाली त्यांचे जे शोषण चालले होते ते बंद करणे, हे एक दुसरे उद्दिष्ट होते.

जोतीरावांच्या तरुण सहकाऱ्यांनी 'दीनबंधु सार्वजनिक सभा' ह्या नावाची संस्था १८८४च्या मे महिन्यात स्थापन केली. त्या संस्थेचे प्रमुख संस्थापक कृष्णराव भालेकर हेच होत. प्रत्येक रविवारी डॉ. सदोबा गावडे यांच्या वाड्यात चालू प्रश्नांची चर्चा होत असे. तेथे ब्राह्मणेतर पुढाऱ्यांची भाषणे होत.

सार्वजनिक सभेच्या धर्तीवरच तिची रचना केली असल्यामुळे, ती दीनबंधु सार्वजनिक सभा जनतेची गाऱ्हाणी सरकारपुढे मांडण्याचे काम करीत राही. जनतेत ज्ञानाचा प्रसार करी. अज्ञानी जनतेत ज्या वाईट चालीरीती वंशपरंपरागत आल्या होत्या, त्यांचा ती नायनाट करण्याचा प्रयत्न करी. सभेत धर्मतत्त्वविषयी चर्चा होत नसे. सभासदत्वाची मासिक वर्गणी एक आणा असे. जनतेची गाऱ्हाणी दूर करणे म्हणजे देवाची सेवा होय, अशी त्यांची धारणा असे.

दीनबंधु सार्वजनिक सभेचें ध्येय आणि उद्दिष्ट उद्धृत करून 'दीनमित्र'[२] पाक्षिक

---

२. दीनमित्र, २ जुलै १८८८.

म्हणते, 'हिंदुस्थानात ब्रिटिशांचे राज्य हेही या देशाला मोठे वरदानच ठरले आहे. आमच्या वाडवडिलांना ज्या गोष्टी उपभोगावयास मिळत नसत, त्या आता आम्हांला उपभोग घेण्यास मिळतात. जरी आम्ही एका परकीय सत्तेच्या राजवटीत आहोत तरी सध्याचे हिंदी सरकार हे आजपर्यंत झालेल्या सरकारांत सर्वोत्कृष्ट आहे. परंतु कायदे पसार करण्यापूर्वी वृत्तपत्रे, सार्वजनिक संस्था आणि उच्च सरकारी अधिकारी यांच्याकडून जी माहिती सरकारला मिळते, ती बरोबर नसते. म्हणून जे आम्ही स्वतःही गरीब शेतकरी, छोटे व्यापारी, कारागीर आणि अज्ञान जनता या वर्गाचे आहोत, त्यांनी दीनबंधु सार्वजनिक सभा स्थापन केली आहे.'

'ही सभा स्थापन करण्यात आमचे उद्दिष्ट असे आहे की, आमच्या सर्वसामान्य खऱ्या अडचणी आणि गाऱ्हाणी मायबाप सरकारच्या पुढे कायदेशीर अन् राजनिष्ठ मार्गाने मांडणे हे होय. जेव्हा जेव्हा सरकार नवीन कायदे करण्यासाठी लोकांची गाऱ्हाणी समजून घेण्याची इच्छा व्यक्त करते, तेव्हा तेव्हा ही सभा ह्या राज्यातील जनतेची खरी स्थिती आणि खरी मते देऊन योग्य व सरळ असे निवेदन सादर करते.'

जोतीरावांचे स्नेही व सहकारी सदाशिवराव गोवंडे हे ८ एप्रिल १८८४ रोजी कालवश झाले. गोवंड्यांनी समाजाच्या कल्याणासाठी उदारपणे कार्य केले. आपला एका काळचा जिवश्चकंठश्च स्नेही जग सोडून जाताच जोतीरावांच्या मनःचक्षूंपुढून जीवनचित्रपटच गेला असेल. गोरगरिबांविषयी गोवंडे यांना खरीखुरी सहानुभूती होती. सामाजिक आणि राजकीय प्रश्नांचे त्यांना चांगले ज्ञान होते. त्यांची उदार सहानुभूती, सखोल विचार, धैर्यशाली वागणूक ह्या गुणांमुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व वैशिष्ट्यपूर्ण बनले होते. सामाजिक, शैक्षणिक व राजकीय विचार नि कार्य यांचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी ते तनमनधन व्यतीत करून झगडले.

आयुष्याच्या उत्तरार्धात गोवंडे सार्वजनिक सभेचे नेते म्हणून कीर्ती पावले. तरी त्यांनी कनिष्ठ वर्गाच्या उन्नतीच्या कार्यासंबंधी आपली सहानुभूती कधीही कमी होऊ दिली नाही. महाराष्ट्र गोवंड्यांचा अत्यंत ऋणी आहे. तरीसुद्धा मराठी इतिहासकारांनी त्यांच्या सेवेची आणि कार्याची जेवढी दखल घ्यावयास पाहिजे होती तेवढी घेतली नाही, ह्याविषयी खेद वाटतो.

दीनबंधु सार्वजनिक सभेने आणि सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांनी खेड्यांतील कामाला जोराचे उत्तेजन दिले. त्या कार्यकर्त्यांनी आपले नेते जोतीराव फुले यांना आपले सामाजिक तत्त्वज्ञान विशद करून सांगण्यासाठी, खेड्यापाड्यांतून भाषणे करण्यासाठी आमंत्रिले. ओतूरचे भाऊ कोंडाजी पाटील ह्यांनी त्यांना आपला संदेश देण्यासाठी आमंत्रिले.

ओतूर हे त्या काळी आजूबाजूच्या खेड्यांतील एक मोठे केंद्र. जोतीरावांचा संदेश एकण्यासाठी आजूबाजूच्या गावांतून शेकडो लोक जमा झाले. त्यांपैकी कित्येकांनी जाहीर

सभेचे दृश्य कधीही पाहिले नव्हते. जोतीरावांना त्या गरीब जनतेची भाषा कळे. मन कळे. गाऱ्हाणी कळत. देवाच्या नावाखाली देवशत्रु ब्राह्मण गरिबांचे कसे शोषण करीत होते, हे त्यांना कळत होते. अशा विचाराने भारावून गेलेले जोतीराव ओतूर आणि जुन्नरसारख्या अनेक खेड्यांतून सामान्य जनतेचे हृदय हालविणारी व्याख्याने देत असत.

आपल्या व्याख्यानाचा त्या जनतेवर केवढा मोठा परिणाम झाला होता, त्याचे वर्णन जोतीरावांनी एका कडव्यात केले आहे.

ओतूर गांवीं भाऊ भडकला।
जुन्नरकर शेट्या थडकला॥
आर्य (भट) त्यांमध्ये फुल्यास पाहाती।
सोवळीं भांडीं घेउनी पळती॥
पत्रांमध्यें हायहाय करिती।
'शंकराचार्य' हाका मारिती॥
जिकडे तिकडे पोथ्या वाचिती।
अज्ञानांचीं मनें गोविती॥
अहो काशी यमुनाबाई।
उपाशी मरतो गे ताई॥
शिंद्यांनी फिरवली द्वाही।
पोटासाठी घ्या तरी कांहीं॥

'ज्ञानोदया'च्या[3] संपादकाच्या एका स्नेह्याने जुन्नरमधील ह्या वातावरणाचे मोठे मार्मिक वर्णन केले आहे. जुलै १८८४च्या आपल्या एका लेखामध्ये त्या स्नेह्याने म्हटले आहे की, 'अलीकडे शहर जुन्नर व त्याच्या आसपासची गावे येथील लोकांत ब्राह्मणांविषयी मोठाच बखेडा चालला आहे. सुमारे दहा पंधरा वर्षांपासून ब्राह्मण जातीतील भटांनी साळी, माळी, तांबोळी वगैरे लोकांची लग्ने, उत्तरक्रिया करण्यासाठी मोठमोठाले कर बसविल्या कारणाने शहर जुन्नर व त्याच्या आसपासच्या सुमारे शंभर गावांनी भटांचे कररूपी जू आपल्या मानेवरून अजिबात काढून टाकण्याचा प्रयत्न चालविला आहे. आणि त्याकरिता पुणेकर जोतीराव फुले आणि 'दीनबंधू'चे मालक नारायणराव लोखंडे वगैरे वजनदार पुढारी जुन्नरास जमून मोठी सभा झाली.'

या सभेस माळी, सोनार, शिंपी इत्यादी अनेक हिंदू जातींचे सुमारे दोन तीन हजार लोक जमले होते. त्या वेळी त्यांच्या दोन तीन सभा झाल्या. त्या वेळी फुले व दुसरे मराठे गृहस्थ यांनी फारच सुरेख व्याख्याने दिली. त्या प्रसंगी मराठे

३. ज्ञानोदय, २४ जुलै १८८४.

लोकांशिवाय मुसल्मान, खिस्ती व सरकारी अंमलदार हेही आलेले होते. त्या वेळी सभासदांनी त्यांचा आदरसत्कार बराच ठेविला; पण भट-ब्राह्मणांपैकी कोणी एकही नजरेस पडले नाही. त्यांचे जे हेर आले होते, त्यांना दूर उभे राहवे लागले; इतकेच नव्हे तर मराठे लोक महारमांगांपासून दूर राहून त्यांचा तिटकारा करतात तसा प्रकार भटांविषयी दिसण्यात आला.'

'व्याख्यानकारांनी आपल्या व्याख्यानांत ब्राह्मण लोकांची ठकबाजी, जुलूम व दुर्वर्तन दाखविण्याची पराकाष्ठा केली. आणि पाहू गेले असता ज्या ज्या गोष्टी व्याख्यानांत आणिल्या होत्या, त्या त्या बहुशः खऱ्या होत्या. त्या ऐकून भटाभिक्षुकांस लाजिरवाणे होऊन खाली पाहणे भाग पडले. व त्यातून कित्येकांच्या तळपायाची आग मस्तकास जाऊन ते खट्टू होऊन बोटे मोडीत आपल्या घरास जाते झाले.'

'व्याख्यानांतील मुद्दे जरी खरे होते तरी त्यांत त्यांजकडून थोडीशी अतिशयोक्ती झाली. फुले यांनी आपल्या व्याख्यानात असे दाखविले की, जिकडे जावे तिकडे पुढे ब्राह्मण. एतद्देशीय सरकारी अंमलदारात, म्हणजे न्यायखाते घ्या, पोलीस खाते घ्या, रेव्हिन्यू खाते घ्या, शिक्षणखाते घ्या, वैद्यखाते घ्या, की पाहिजे ते खाते घ्या, सर्व ऑफिसे, कोर्टकचेऱ्या ब्राह्मणांनी गच्च भरलेल्या आहेत. इतकेच केवळ नाही, तर या भट्टा-भिक्षुकांनी आपली ब्रह्मक्रिया विसरून म्लेंच्छ लोकांच्या भाषा शिकून, शास्त्री, पंडित, वैदिक अशा त्यांच्या प्राचीन पदव्या गोमुखीत घालून बी. ए., एम्. ए., बी. डी., एल् एल्. बी. अशा पदव्या संपादून, सर्व विद्येची मुख्यासने आपलीशी करून, आपल्या पांढरपेशा लोकांखेरीज, कुत्रेदेखील कोणत्याही ऑफिसात, कोर्टात किंवा कचेरीत शिरकू देत नाहीत.'

'फार काय सांगावे! ब्राह्मणांपैकी ज्यांनी खिस्ती धर्माचा स्वीकार केला आहे ते खिस्ती ब्राह्मणसुद्धा शूद्र, महार, मांग अशा लोकांस पुढे होऊ न देता, त्या धर्माच्या संबंधाने जे हुद्दे निघतात किंवा निघाले आहेत ते आपणच बळकावून पाद्री अधिकाऱ्यांकडे या गरीब लोकांचा रीघसुद्धा होऊ देत नाही.' अशा प्रकारच्या बहुत गोष्टी त्यांनी सभेत सांगितल्या.'

'व्याख्यानकारांचे म्हणणे ब्राह्मणांमधून खिस्ती झालेल्या लोकांस कितपत लागू आहे याचे एथे विवरण करणे न लगे. कारण हल्ली खिस्ती लोकांच्या पालक वर्गात व मिशनच्या इतर कामगारांत कोणकोणते लोक आहेत याविषयी सदरहू व्याख्यानकारांस माहिती नसल्याकारणाने त्यांजकडून अशी अतिशयोक्तीची चूक झाली असावी. असो.'

'सभा विसर्जन झाल्यावर फुले यांनी जुन्नरात एका ठिकाणी मारुतीच्या मूर्तीची स्थापना केली. आणि शहरात व आसपासच्या कित्येक गावांत लग्नेही लावली. त्या वेळी ज्यांच्या घरी लग्ने होती, त्यांच्या पूर्वापार उपाध्यांस लग्नमंडपात बसूदेखील न देता हाकून लावले. त्या भटांतून कोणी मॅजिस्ट्रेटकडे गिल्ला केला, पण म्लेंच्छ कायद्यान्वये यांची डाळ शिजली नाही, म्हणून त्यांस निराश होऊन उगीच बसणे प्राप्त झाले.'

'वर सांगितलेल्या व्याख्यानात, ब्राह्मणांच्या वर्चस्वाविषयी व्याख्यानकारांनी जी उदाहरणे दिली होती, ती जसे खिस्ती लोक जातिभेदाविषयी हिंदू लोकांस उपदेश करताना देत असतात तशीच होती. असो. आता मराठे लोकांनी ह्या नवीन पंथ काढल्यावरून हिंदूंचे वेद, शास्त्र, पुराणे, मनुधर्मशास्त्र यांस कितपत आडवे येते हे सूज्ञांस सांगणे नको. आणि ही सुधारणा कोणत्या थरास जाईल हेही सांगणे नको. सदरहू कामे त्यांनी कोणत्या ग्रंथधाराने केली असतील ती असोत. हिंदुशास्त्रात तर असे म्हटले आहे की,

देवाधीन जगत सर्वं । मंत्राधीनं च देवताः ॥
ते मंत्राः ब्राह्मणधीनाः । ब्राह्मणो मम देवतम् ॥

'फुले यांनी वेदशास्त्र, पुराणे व बैबल ही तीन प्राधान्य धरून अशी शिफारस केली की, महार-मांग वगैरे लोकांनी खिस्तीधर्म स्वीकारून आपली सुधारणा करून घ्यावी. यावरून त्या तिन्ही शास्त्रांविषयी व्याख्यानकारांनी काय अभ्यास केला असेल तो असो. याविषयी ते पुढे एखाद्या व्याख्यानात स्पष्टीकरण करतील, तर ते बरे होईल, कारण 'जातिभेद विवेकसार' या नांवाचे एक पुस्तक एका हिंदू गृहस्थाने काही वर्षांमागे प्रसिद्ध केले आहे. त्याचे तात्पर्य सर्व जाती एकच आहेत असे आहे. असे असता फुले यांनी महारमांगांसच खिस्तीधर्म स्वीकारण्याची शिफारस केली यावरून नवल वाटते. जर त्यांनी सदरहू पुस्तक वाचले असते, तर महारमांगांसच खिस्ती होण्याची जरूर आहे, किंवा सर्वांसच आहे याविषयी त्यांची खात्री झाली असती. कारण हिंदुधर्माचे ठायी त्यांचे जे अनुयायी आहेत, त्यांची सुधारणा करण्याची शक्ती नाही, असे व्याख्यानकारांच्या शिफारशीवरून दिसते.'

सारांशरूपाने प्रसिद्ध केलेल्या ह्या लेखात दोन मुद्दे संशयास्पद आहेत. महारमांगांनी खिस्तीधर्म स्वीकारावा असे जोतीरावांनी म्हटलेच असेल, तर ते कोणत्या संदर्भात म्हटले, किंवा त्यांचे ह्या बाबतीतील स्पष्ट म्हणणे काय होते ते बहुधा खिस्ती असलेल्या ह्या लेखकाने बुद्ध्याच लपवून ठेवले आहे.

महार, मांग, माळी, धनगर, साळी हे एकाच शूद्र जातीचे आहेत असे जोतीरावांचे पक्के मत होते. त्यांना ते आपले लोक म्हणत. कनिष्ठ वर्गातील लोकांच्या धर्मांतरास त्यांनी कधीही संमती दिली नाही. एखाद्या ब्राह्मणाने खिस्तीधर्म स्वीकारला म्हणजे ब्राह्मणांना डिवचण्यासाठी ते कधीमधी 'भले झाले' असे म्हणत. स्वतःस भूदेव मानणारे हे ब्राह्मण, परधर्मप्रसाराला कसे बळी पडत होते हे त्यांना दाखवीत. वरील लेखातील दुसरा संशयास्पद मुद्दा म्हणजे जोतीरावांनी जुन्नर येथे मारुतीची मूर्ती स्थापिली हे वृत्त होय. ही गोष्ट खरी आहे की नाही हे कळणे कठीण आहे. जोतीराव देव मानीत. परंतु तो देव दिसतो, किंवा फळांफुलांनी प्रसन्न होतो असे त्यांना वाटत नव्हते. शिवाय जोतीराव हे मूर्तिपूजक नव्हते.

. २ .

'ज्ञानोदया'च्या संपादकांनी ठाणे येथील 'अरुणोदय' नावाच्या मराठी साप्ताहिकातील एक उतारा उपरोक्त अंकात उद्धृत केला. 'अरुणोदया'चे ब्राह्मण संपादक म्हणाले होते की, 'अलीकडे या देशात जो चहूंकडे धर्मासंबंधी बखेडा व गोंधळ चालू झाल्याचे दिसते, त्याचा शेवटी परिणाम काय व कसा होणार हे काहीच समजत नाहीसे झाले आहे. जे लोक पूर्वी ब्राह्मणांस अती पूज्य मानीत होते, तेच आज ब्राह्मणांचा अगदी छळ करण्यास तयार झाले आहेत. त्याबद्दल आम्हांस काहीच वाईट नसून, उलट एक प्रकारचा आनंदच होतो.'

'फार पुरातन काळापासूनचा इतिहास पाहू लागले तरी, ब्राह्मण हे या राष्ट्राचे पुढारी असे मानले जात होते व त्या वेळी त्यांचे आचरणही तसेच होते. पण आज त्यांचे आचरण इतके नीच झाले आहे की, ते अगदी नीच कर्मे करण्यास पुढारी झाले असल्यामुळे त्यांस आता इतरांनी का पूज्य मानावे हे समजत नाहीसे झाले. व यामुळे इतर लोक ब्राह्मणांचा छळ करण्यास प्रवर्तक झाले, हे योग्यच झाले असे होते.'

'आज ब्राह्मणांचे आचरण असे नीच झाले, तरी शेकडो पिढ्यांपासून कमावलेली जी त्यांच्या वंशांतील बुद्धी ती अजून नाहीशी झाली नसून, मडके खाली गेल्यावाचून भरून येत नसते हा सिद्धांतच असल्यामुळे, इतक्यातच ब्राह्मणांचा छळ होऊ लागल्यामुळे, ते शुद्धीवर येऊन ते आपल्या विशाल बुद्धीच्या योगाने आपले गेलेले वर्चस्व मिळविण्याच्या उद्योगास लागण्याचा संभव असल्यामुळे हल्लीचा प्रकार पाहून एका अर्थाने आम्हांस आनंदही वाटतो.'

'आजपर्यंत जे ब्राह्मणांचे वर्चस्व होते ते धर्मसंबंध व राजकीय संबंध या दोन्हींतही होते. पण धर्मशास्त्राविरुद्ध ब्राह्मण सर्व कामे करू लागून दारू पिऊन गटारातही पडू लागले, तेव्हा त्या संबंधाने त्यांचे वर्चस्व जाणे रास्तच आहे.'

'त्याचप्रमाणे सवाई (?) माधवरावांसारख्यांनी जरी राजकीय संबंधाने सर्व हिंदुस्थानास थरारून सोडले, तरी शिवाजीच्या आद्य गादीस त्यांनीच बुडविले आणि ती सर्व राजसत्ता परकीय लोकांच्या हाती दिली असल्यामुळे त्या बाबतीतही त्यांची छी:थू होणे वाजवीच आहे. मिळून अनेक प्रकारचे लोक ब्राह्मणांवर जे अनेक प्रकारचे आरोप आणीत आहेत ते काही वावगे दिसत नाही. पण इतके असून कित्येक लोक बळेच ब्राह्मण होऊ पाहत आहेत याचे नवल वाटते.'

'तसेच जे लोक ब्राह्मणांचा छळ करण्यास तयार झाले आहेत, ते तरी आपले गेलेले वैभव संपादन करण्याच्या उद्योगात असते, तर ते स्तुतीस पात्र झाले असते. पण तेही दिसत नसून त्याच्या उलट प्रकारच चालू आहे असे दिसते. सबब त्यांनी तरी ब्राह्मणांस का हसावे हे समजत नाही.'

'तुमचे सर्व वैभव ब्राह्मणांनी नष्ट केले, अशी जर तुमची खात्री झाली आहे व ते

नाहीसे करून आपले वैभव आपण मिळवू अशी जर तुमची खात्री आहे, तर त्या सर्व ब्राह्मणांस एकदम समुद्रात बुडवून टाका आणि आपले गेलेले वैभव आपल्या हातात घ्या. तसे करण्यास कोणाची आडकाठी नसून आडकाठी आणण्यास कोणी समर्थही होणार नाही. मात्र भाऊबंदकीचा वाद करून तिसऱ्याची अधिक धन करू नका. तुम्हा दहा भावांस जर तुमचा एक भाऊ त्रास देतो, तर त्यास ठार करा आणि आपल्या आईबापाचे व कुळाचे नाव राखा. तुम्ही तसे करण्यास तयार झाल्यास ब्राह्मण काळे करून निघून जाण्यास मागे सरणार नाहीत.'

'अरुणोदया'तील उपरोक्त विचारावर अभिप्राय देताना 'ज्ञानोदय' म्हणतो : 'आमच्या ठाणेकर बंधूचे म्हणणे बऱ्याच अंशी खरे आहे. शूद्रांनी आपले गेलेले वैभव मिळविण्याचा यत्न का करू नये? असे यत्न करण्याचे सोडून त्यांनी ब्राह्मण होण्यास का पहावे; आणि गळ्यात जानव्याचे व त्याबरोबर ब्राह्मणांच्या कर्मठ व घातुक चालींचे लोढणे गळ्यात का घालून घ्यावे?'

'रहाटाचे मडके खाली गेले म्हणजे भरून येते हे खरे. पण तसे ब्राह्मणांच्या वर्चस्वाचे मडके आता खाली चालले आहे ते पुन: भरून येण्याकरिता चालले आहे असे दिसत नाही. अजून ते पुरते रिते तरी कोठे झाले आहे? सुंभ जळाले, पण त्याचा पहिला पीळ गेला नाही. मडक्यास बहुत भोके पडली आहेत म्हणून ते खाली पोचल्यावर पूर्ववत भरून येईल ही आशा व्यर्थ आहे.'

जोतीरावांच्या झेंड्याखाली ब्राह्मणेतर जनता मोठ्या संख्येने जमू लागली. त्यांची शिकवणूक कृतीत आणण्याचे अनुयायांनी ठरविले. बाळाजी कुसाजी पाटील नावाच्या गृहस्थाने सत्यशोधक समाजाच्या नियमाप्रमाणे संस्कार करून आपल्या मुलाचे लग्न केले. ब्राह्मणांनी त्या विवाहास विरोध केला. ब्राह्मण पुरोहिताच्या अनुपस्थितीमुळे विवाह यथाविधी झाला असे म्हणता यावयाचे नाही, असा त्यांचा दावा होता.

सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते नि ब्राह्मण पुरोहित वर्ग यांनी एकमेकांस आव्हान दिले. ओतूरच्या आसमंतातील ब्राह्मणांनी ओतूरास एक सभा भरविली. ब्राह्मण पुरोहिताशिवाय लग्न लावणे म्हणजे ब्राह्मण पुरोहितांच्या हक्कांवर हे आक्रमण आहे, असा त्यांनी त्या सभेत गडगडाट केला. कार्यवाहक ब्राह्मण पुरोहिताशिवाय लग्न करता यावयाचे नाही. म्हणून त्यांनी ओतूरचे ग्रामपुरोहित वामन जगन्नाथ आणि शंकर बापूजी यांना बाळाजी कुसाजी यांच्याविरुद्ध न्यायालयात अभियोग करावयाचा आग्रहपूर्वक सल्ला दिला.

अशाच तऱ्हेचा एक अभियोग १८७८ साली मुंबईच्या सर न्यायालयामध्ये चालला होता. दिनानाथ आबाजी नि दुसरे काही ग्रामजोशी ह्यांनी सदाशिव हरि माधवे आणि दुसरे काहीजण यांच्याविरुद्ध फिर्याद केली होती. ग्रामोपाध्यायाचा दावा असा होता की, माधवे यांनी आपल्या घरी धार्मिक संस्कार करण्यासाठी नेहमीच्या अधिकृत ब्राह्मणपुरोहितांना डावलून दुसऱ्या पुरोहितांकडून काम करून घेतले. ते संस्कार

करण्यासाठी जी दक्षिणा दिनानाथ बाबाजीला नेमले असता मिळाली असती ती त्याला मिळाली पाहिजे.

आता प्रश्न असा उद्भवला की, जर एखाद्या ग्रामपुरोहिताला त्याच्या गावात धार्मिक संस्कार करण्यास बोलाविले नाही आणि ते संस्कार दुसऱ्या पुरोहिताकडून करून घेतले, तर त्या अधिकृत पुरोहितास, नवीन पुरोहितास दिली तेवढी दक्षिणा दिली पाहिजे की काय ? महादेव गोविंद रानडे हे त्यावेळी पुणे येथे पहिल्या वर्गाचे दुय्यम न्यायाधीश म्हणून काम पाहत असत. त्यांनी फिर्यादी ब्राह्मण पुरोहित यांच्या बाजूने अभियोगाचा निवाडा केला होता. आपल्या निर्णयात रानडे यांनी असे म्हटले होते की, यजमानाची इच्छा असो वा नसो, त्याच्या घरी संस्कार करण्याचा ब्राह्मण पुरोहिताचा हक्क आहे; तसाच त्याला दक्षिणा घेण्याचा हक्क आहे.

असले हे ब्राह्मण पुरोहितांचे हक्क बंगाल नि वायव्य सरहद्द प्रांत यांतील न्यायाधिशांनी धुडकावून लावले होते, तरी वरिष्ठ वर्गातील सुधारकाग्रणी नि दुय्यम न्यायाधीश रानडे यांनी कायद्याचा असा अर्थ केला की, जरी यजमानाची इच्छा नसली, तरी फक्त ग्रामपुरोहितालाच त्याच्या घरी धार्मिक समारंभाच्या वेळी संस्कार करण्याचा हक्क आहे. आणि जरी फिर्यादींनी त्या यजमानाकडे पुरोहिताचे काम केले नाही, तरी त्या यजमानाने त्यांना नेहमीप्रमाणे दक्षिणा दिलीच पाहिजे.

पुण्याच्या जिल्हान्यायाधिशांकडे रानड्यांच्या आज्ञापत्राविरुद्ध जेव्हा पुनरावेदन करण्यात आले, तेव्हा जिल्हान्यायाधिशाने रानड्यांच्या निवाड्यात थोडा बदल केला. जरी ग्रामजोश्यांना यजमानाने बोलाविले नाही, तरी त्याला यजमानाच्या घरी ज्या पुरोहिताने वा पुरोहितांनी ते धार्मिक कार्य केले असेल त्यांना यजमानाकडून जेवढी दक्षिणा मिळाली असेल तेवढी त्या मूळ ग्रामपुरोहितांना दिली म्हणजे झाले. ते पुरोहित या वहिवाटदार पुरोहितांनी कामास पाठविलेले नसले तरी चालेल. ग्रामजोश्यांचा दक्षिणेवरील हक्क जिल्हान्यायाधिशांनी मान्य केला; परंतु त्याला यजमानाने संस्कार करावयास बोलाविलेच पाहिजे असे नाही, असा त्या निर्णयाचा अर्थ झाला.

पुरोहितांचे समाधान त्याही निर्णयाने न झाल्यामुळे त्यांनी मुंबई येथील सर्वोच्च न्यायालयात पुनरावेदन केले. त्या वेळचे मुंबईचे मुख्य न्यायमूर्ती सर एम्. आर. वेस्ट्राप यांनी मुंबईच्या सर्वोच्च न्यायालयाच्या स्थापनेपूर्वी अशाच तऱ्हेचा एक अभियोग एका न्यायाधिशाने निकालात काढला होता, त्याचा उल्लेख केला आणि पुणे जिल्हान्यायाधिशाने दुय्यम न्यायाधिशाच्या निवाड्यात जो बदल केला होता, त्यालाच मान्यता दिली. निर्णय जाहीर करताना सरन्यायाधीश म्हणाले, "जिल्हान्यायाधिशाने आज्ञापत्रात जो फरक केला आहे त्यालाच मान्यता देत आहोत. फिर्यादींनी अभियोगाचा खर्च द्यावा. मूळ आज्ञापत्रात जिल्हान्यायाधिशाने थोडासा फरक केला म्हणून फिर्यादींनी त्याविरुद्ध पुनरावेदन करावे याविषयी आम्हांस आश्चर्य वाटते."

मुंबईच्या सर्वोच्च न्यायालयात ब्राह्मण पुरोहितांची बाजू सनातनी सुधारक रावबहादूर

विनश्वाथ नारायण मंडलिक ह्यांनी हिरीरीने मांडावी यात नवल काहीच नव्हते. हा अभियोग मंडलिकांच्या मताविषयी बोलके प्रतीक आहे. तसेच तो निर्णय बुद्धीचे समतोल म्हणून पुढील काळात विख्यात झालेले, पण त्या काळी दुय्यम न्यायाधीश असलेले रानडे यांच्या तत्कालीन मताविषयी बोलका आहे, असे वाटते.

जर दुय्यम न्यायाधीश रानडे यांच्या निवाड्यात वरिष्ठ न्यायाधिशांनी बदल केला नसता, तर प्रत्येक गावात इनामे मिळणाऱ्या कारागिरांनी काम न करताच पुरोहिता-प्रमाणेच आपला हक्क गाजविला असता. कुंभाराने हट्ट धरला असता की, माझीच भांडी विकत घेतली पाहिजेत. पुढे काही दिवसांनी मद्रास येथील वरिष्ठ न्यायालयानेही असले हक्क धाब्यावर बसविले. त्या न्यायालयात दिनानाथ आबाजींच्या अभियोगातील निवाडा पुरोहितांनी आपल्या दाव्याला बळकटी आणण्यासाठी दाखल केला होता![४]

. ३ .

ह्या 'सदाशिव हरी' अभियोगाप्रमाणेच बाळाजी कुसाजी पाटील यांच्या मुलाच्या लग्नातून अभियोग निर्माण झाला. ओतूर येथे ब्राह्मणांनी ठराव केल्याप्रमाणे तेथील ग्रामजोश्यांनी बाळाजी पाटलांवर फिर्याद केली. पुण्यातील ब्राह्मणांनी त्या ब्राह्मण पुरोहितांना खंबीरपणे पाठिंबा दिला. पुरोहितांचा दावा असा होता की, ते ओतूरचे पिढीजाद ग्रामपुरोहित होते. प्रतिवाद्यांनी आपल्या मुलांच्या लग्नाच्या वेळी त्यांना पुरोहिताचे काम करण्यास पाचारण केले नाही. ते संस्कार करण्याचा त्यांचा जन्मसिद्ध हक्क होता, आणि तशी इच्छा नि सिद्धताही होती. प्रतिवाद्यांनी त्यांना त्यांची दक्षिणा न दिल्यामुळे त्यांना भरपाई करून द्यावी.

बाळाजी पाटील साह्यासाठी दुसरीकडे कुठे जाणार? पाटलांनी आपले नेते जोतीराव यांच्याकडे मार्गदर्शनासाठी धाव घेतली. त्या काळी त्यांना ब्राह्मण वकील सल्लामसलती-साठी मिळणे कठीण होते. परंतु जोतीराव हे नेकीचे नेते. तत्त्वास नि सत्त्वास जागणारे. अनुयायांना फशी पाडणे, परिणामी कानाडोळा करणे हे त्यांचे ब्रीद नव्हते. त्यांनी पुण्यातील पोलसानी लिंगू नावाच्या वकिलांचा सल्ला घेतला. कनिष्ठ न्यायालयात दुय्यम न्यायाधीश ब्राह्मण होते. त्यांनी बेधडक पुरोहितांच्या बाजूने न्याय दिला. पाटलांनी पुणे येथील पहिल्या वर्गातील दुय्यम न्यायाधिशाकडे पुनरावेदन केले.

प्रतिवादी बाळाजी पाटील आपल्या निवेदनात म्हणाले की, फिर्यादीचा पुरोहितपदावर अधिकार आहे ही गोष्ट आपणास मंजूर नाही. आपल्या वाडवडिलांच्या चालीप्रमाणे आपण आपल्याच ज्ञातीतील पुरोहित लग्नासाठी आणले होते. पुणे येथील न्यायाधिशांनी खालच्या न्यायाधिशाचा निवाडा फिरविला नि तो पाटलांच्या बाजूने केला. ब्राह्मणांना

४. लट्ठे, प्रा० आण्णा बाबाजी, यांनी 'धर्म आणि ब्राह्मण' ग्रंथातील 'सत्यशोधक समाज विरुद्ध जोशी' ह्या लेखात सर्व कज्ज्यांची माहिती दिली आहे.

त्यामुळे धक्काच बसला. जुन्नर आणि पुणे येथे ब्राह्मणांनी सभा भरवून त्यात ठरविल्या-प्रमाणे त्यांनी त्या अभियोगाचे मुंबई येथील सर्वोच्च न्यायालयाकडे पुनर्न्यायासाठी पुनरावेदन केले.

हा अभियोग म्हणजे दोन समाजांमधील लढा होता. एक परंपरावादी नि दुसरा सुधारक. एक सरंजामी वृत्तीचा, तर दुसरा क्रांतिकारी विचारसरणीचा! त्यामुळे पुणे दोन भागांत विभागले गेले. एक भाग ब्राह्मण तर दुसरा ब्राह्मणेतर. पूर्व पुणे विरुद्ध पश्चिम पुणे. पगडीवाले विरुद्ध फेटेवाले. आपल्या शिकवणीतून निष्पन्न झालेल्या अडचणींना तोंड देण्याचे दायित्व आपल्या शिरावर घेणारे जोतीरावांसारखे फारच थोडे पुढारी असतात. आपण सुरू केलेल्या चळवळीचे भवितव्य ह्या अभियोगातील यशावर अवलंबून आहे ही जोतीरावांनी मनाशी खूणगाठ बांधल्यामुळे ते स्वतः ह्या अभियोगाच्या कार्यात जिवापाड मेहनत करीत होते. त्यांनी या कामी युरोपियन बॅरिस्टरचाही सल्ला घेतला होता.

ह्या अभियोगाची महाराष्ट्रभर चाललेली चर्चा, त्यासंबंधी प्रसिद्ध झालेली वर्णने ह्यावरून त्या काळी केवढी खळबळ उडाली होती हे दिसून येते. तसे जोतीरावांच्या प्रभावाचीही कल्पना येते. जुन्नर तालुका हा ह्या हिंदी मार्टिन ल्यूथरचा बालेकिल्ला होता. व्यक्तिस्वातंत्र्यासाठी त्याने ब्राह्मणशाहीवर चढाई केली होती. युद्ध जाहीर केल्याशिवाय ती लढाई जुंपली होती.

ह्यानंतर काही दिवसांनी जुन्नर येथे शेतकऱ्यांत अशांतता पसरली. त्यांनी सरकारला एक निवेदन सादर केले. आपणांस सावकार नि जमीनदार यांच्यापासून संरक्षण मिळावे अशी त्यांनी मागणी केली. सावकार नि जमीनदार हे बहुतेक ब्राह्मण असत.

मुंबईच्या 'नेटिव्ह ओपिनियन'मध्ये या निवेदनावर टीका करताना एक बातमीदार म्हणाला, 'या आठवड्याची एक दुःखमिश्रित गमतीची बातमी अशी आहे की, जुन्नर तालुक्यातील कुणबी, माळी आणि इतर शेतकऱ्यांनी तेथील सरकारी नोकरीतील ब्राह्मण कारकुनांविरुद्ध एक अर्ज श्री. विन्टर यांच्याकडे धाडला आहे. त्यांच्या तक्रारींचे स्वरूप असे आहे की, कुणब्यांना फसवून त्यांच्याकडून अनेक मार्गे ब्राह्मण कर्मचारी लाच उपटतात. सरकारी कचेरीत ब्राह्मण जातीचे कारकून बहुसंख्य आहेत. ब्राह्मण पुरोहित कुणब्यांच्या इच्छेविरुद्ध त्यांच्याकडे लग्नादी कार्यांत पुरोहितपणा करून पैसे उकळतात. भटांच्या ह्या त्रासामुळे कुणबी भिकेस लागले आहेत. ते त्यांना काही देऊ शकत नाहीत.'

'नेटिव्ह ओपिनियन'चा[५] बातमीदार पुढे म्हणाला, 'जर ह्या तक्रारी खऱ्या असल्या, तर त्या खरोखरीच गंभीर स्वरूपाच्या आहेत. परंतु येथील खेड्यांतील भटांचा वार्षिक सरासरी फायदा वीस रुपयांपेक्षा क्वचितच जास्त असतो, ही गोष्ट लक्षात घेता

---

५. The Native Opinion, 11 July 1884.

शेतकऱ्यांच्या भयंकर दारिद्र्याचे कारण आपण दुसरीकडेच शोधले पाहिजे. ब्राह्मणद्वेषाचा रोग हा सर्वसाधारणपणे युरोपियन अधिकाऱ्यांत पसरला आहे. त्या रोगाने जे ब्राह्मणेतर पछाडले आहेत, तेच ह्या बखेड्याचे विष पेरीत आहेत.'

हा वार्ताहर मोठा धूर्त अर्थशास्त्रज्ञ असला पाहिजे. तो म्हणाला, 'शेतकऱ्यांच्या भयंकर दारिद्र्याची जबाबदारी इंग्रज भांडवलदार, कुणब्यांना रोजंदारीस बुडविणारी हिंदी रेल्वे, आणि शेतकऱ्यांकडून भरमसाट कराची मागणी करणारे सरकार यांच्या माथी मारली पाहिजे.'

शेतकऱ्यांनी एक वर्षभर जमिनी तशाच पाडून ठेविल्या. त्या करण्यास त्यांनी नकार दिला. सावकार नि जमीनदार यांच्याविरुद्ध त्यांनी जी गाऱ्हाणी मांडली होती, त्यांचे निवारण करण्याची त्यांनी विनंती केली. ह्या चळवळीचे नेतृत्व जोतीरावांनी केले. शेवटी सरकारी अधिकारी, सावकार नि जमीनदार यांनी शेतकऱ्यांचे पुढारी जोतीराव यांच्याशी तडजोड केली. आणि त्यानंतर शेतीवरील बहिष्कार उठला. त्या काळी ब्राह्मण पुढारी शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यास क्वचित पुढे येत असत. कारण सावकार आणि जमीनदार हे बहुतेक ब्राह्मण आणि मारवाडी असत. ब्राह्मणांच्या प्रभुत्वाखाली असलेल्या संस्था नि वृत्तपत्रे शेतकऱ्यांच्या गाऱ्हाण्यांचा निर्देश करून त्यांच्याविषयी कोरडी सहानुभूती व्यक्त करीत. त्यांची वरवर सहानुभूती शेतकऱ्यांकडे नि त्यांचा खरा पाठिंबा शेटजीभटजींच्या हक्काला. अशीच त्यांची मतलबी मल्लिनाथी असावयाची.

'इंदुप्रकाश'[६] हे अँग्लो-मराठी साप्ताहिक ह्या शेतकरी अशांततेविषयी आपले मत प्रदर्शित करताना म्हणाले, 'शेतकरी जनतेची परिस्थिती अशी आहे की, विचारवंत लोकांना मोठी चिंता निर्माण व्हावी. ह्या गंभीर स्थितीची सरकारला पूर्णपणे जाणीव झालेली आहे. आणि अनेक उदारहृदयी लोक त्यांच्या दुःखाचे परिमार्जन करण्यासाठी मार्ग शोधून काढण्याचा प्रयत्न करीत आहेत.'

तथापि 'इंदुप्रकाशा' ने असे मत प्रतिपादिले की, 'शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेला सावकारांची अतृप्त तृष्णा नि लबाडी हीच केवळ कारणीभूत आहेत असे नाही. आम्ही मान्य करतो की, शेतकरी हे सावकारांइतकेच दोषास पात्र आहेत. आम्ही अनेकदा असे मत दिले आहे की, शेतकऱ्यांचे दारिद्र्य हे अनेक गुंतागुंतींच्या कारणांचा परिपाक आहे. सर्व दोषांचे खापर सावकारांच्या माथी फोडणे ही प्रथाच पडून गेली आहे. भोळ्या शेतकऱ्यांना सावकारांसारख्या लांडग्यांच्या कचाट्यातून सोडविण्याच्या उद्दिष्टानेच नामदार होपल यांनी 'रिलिफ ॲक्ट' संमत करून घेतला आहे.' 'इंदुप्रकाशा'ने पुढे म्हटले की, 'रयतेच्या विपत्तीला सरकारी साऱ्याचे ओझे आणि तो गोळा करण्यात दाखविलेली कठोरता ही काही कमी जबाबदार आहेत असे नाही, असे देशी वृत्तपत्रांनी निदर्शनास आणून दिलेले आहे.'

---

६. इंदुप्रकाश, २२ जुलै १८८४.

हार्ट-डेव्हिस यांनी 'नादारी निर्बंध' करण्यासाठी जो ठराव आणला होता, त्यावर टीका करताना 'इंदुप्रकाश'ने म्हटले: 'हार्ट-डेव्हिस यांनी नादारी निर्बंध करण्यासाठी जो ठराव आणला आहे, त्यामुळे सावकारांचा समूळ सत्यानाश होईल आणि शेतकऱ्यांना आपल्या प्रामाणिक वचनांतून मोकळे होण्याचे ते एक प्रकारचे प्रोत्साहनच आहे. ज्यांनी नादारी निर्बंधाचा वापर मुंबईत पाहिला आहे, त्यांना ह्या कायद्याखाली अफरातफर आणि लबाडी यांचीच पोळी पिकेल आणि लोक आपल्या पैशास कसे नागविले जातील, हे सांगावयास नको. शेतकरी सावकाराविना राहू शकणार नाही, असे आढळून आले आहे. आणि नियोजित कायदा त्यांपैकी एकाचेही हित न करिता त्यांच्यामधील ऐक्यभाव मात्र संपुष्टात आणील किंवा डेक्कन ॲग्रिकल्चरिस्ट रिलीफ ॲक्टने, जे ऐक्य ग्रामीण शेतकरी आणि ग्रामीण सावकार यांच्यामध्ये होते, ते नष्ट होईल आणि त्यामुळे ग्रामीण भागातील समाज अगदी अस्थिर होईल.'

'डेक्कन ॲग्रिकल्चरिस्ट रिलीफ ॲक्ट आणि नियोजित नादारीचा निर्बंध यांत समाजवादाचे जे मूलतत्त्व आहे ते त्यांतील परोपकारी उद्दिष्टांमुळे स्पष्टपणे दिसून येत नाही. परंतु ज्या परोपकारवृत्तीने त्यांना निर्बंध करण्यास उत्तेजन दिले आहे त्याचे दुसरे नाव नागेश्वराला नागवून सोमेश्वराला घाट बांधणे आहे. कारण जोपर्यंत ऋणको आपली वचने प्रामाणिक उद्योग करून पाळीत नाही, तोपर्यंत निर्बंधानुसार जबरदस्तीने दिलेले साहाय्य म्हणजे सावकाराच्या फायद्यातून केलेली कपातच ठरेल.'

'ह्या उपरोक्त उपाययोजनेतील तरतुदींमुळे, ज्याला हर्बर्ट स्पेन्सर कायद्यातील राजकीय गती असे म्हणतो, तिजकडे दुर्लक्ष होईल. आम्हांला असे वाटते की, खाजगी करारात कायद्याने ढवळाढवळ करणे हे अत्यंत विघातक आहे. आपला शेतकरीवर्ग हा गरीब आहे. परंतु त्याने कर्ज करून त्याची परतफेड करावयाची नाही, असे जर आपण त्याला शिकविले तर त्याचे दारिद्र्य वाढेल.'

'त्यांना दारिद्र्यातून बाहेर काढण्याचा आमच्या मते एकच मार्ग दिसतो. तो म्हणजे त्या वर्गाच्या मनावर स्वावलंबन आणि प्रामाणिक काबाडकष्ट करणे या गुणांचे महत्त्व बिंबविणे हा होय. सध्या त्यांच्यावर असलेल्या कर्जाच्या भाराने ते चिरडून जाऊ नयेत, म्हणून त्यांच्या बाबतीत ते जास्तीत जास्त करण्यासारखे आहे ते हे की, त्यांना काही सवलती देता येतील, कर्जफेडीची मुदत लांबविता येईल, व्याजाचा दर कमी करता येईल. त्यांच्या उपजीविकेच्या साधनास ते मुकू नयेत अशी खबरदारी घेता येईल. 'दक्षिणेतील शेतकरी दुःख निवारण्याच्या' कायद्याचा काही भाग ही उद्दिष्टे साधण्यासाठी हितकारक आणि वादातीत आहे. परंतु जेव्हा ऋणको आपले पूर्वीचे हिशेबात कायद्याच्या आधारे दुरुस्त्या करू शकतो किंवा आपल्या कर्जातून कायदेशीर रीत्या सुटू शकतो, तेव्हा तो स्वावलंबी किंवा प्रामाणिक होण्याची इच्छा धरील अशी आशा करणे व्यर्थ आहे.'

जोतीरावांच्या काळी ज्यांना पुरोगामी म्हणत, त्यांचा दृष्टिकोण हा असा होता.

त्यामुळे जोतीरावांनी त्यांच्याशी संबंध ठेवला नाही. आपल्या शोषकांची हाजी हाजी करू नये असा त्यांनी शेतकऱ्यांना उपदेश केला. 'इंदुप्रकाशा'तील वर उल्लेखिलेला लेख खेड्यांतील सावकारांच्या मताचे समर्थन करण्यासाठीच लिहिण्यात आला होता. त्यात असे भासविले होते की, खेड्यातील सावकार हा अत्यंत प्रामाणिकपणे आणि शांतपणे वेताबाताचे उत्पन्न मिळविणारा गृहस्थ होय. 'सार्वजनिक सभा' ही 'इंदुप्रकाश'चीच बहीण असल्यामुळे ती त्याच मताची होती. ती हेच मत प्रतिपादन करीत असे. भारतीय अर्थशास्त्राचे उद्गाते न्यायमूर्ती रानडे यांच्या संरक्षक पंखाखाली त्या दोन्ही संस्था काम करीत होत्या.

जोतीरावांनी शेतकऱ्यांचे दुर्गुण आणि दोष यांजकडे कधीही कानाडोळा केला नाही. त्या बाबतीत ते त्यांची नेहमी कानउघाडणी करीत असत. शेतकऱ्यांच्या अंगी असलेले दोष आणि त्यांना सोसाव्या लागणाऱ्या परिस्थितिजन्य अडचणी ही त्यांच्या दारिद्र्याची आणि दैन्याची कारणे होती, हे त्यांना दिसत होते. परहितबुद्धीने प्रेरित झाले नसले तरी परकीय सरकारसुद्धा शेतकऱ्यांच्या परिस्थितीची पाहणी करण्याचा प्रयत्न करीत होते. त्या सरकारला त्या बाबतीत त्या वेळचे पुढारी विरोध करीत होते. ह्यानंतरच्या काळातील टिळक आणि गोखले हेसुद्धा त्या बाबतीत अपवाद नव्हते. दारिद्र्याने पिचलेल्या शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी जी उपाययोजना आखण्यात येत होती तिच्याविरुद्ध 'इंदुप्रकाशा'ने भीतीची आरोळी उठविली; त्या उपाययोजनेत त्यांना 'समाजवादा'चे भयंकर भूत दिसू लागले होते.

शेतकऱ्यांची आणि कामगारांची पिळवणूक थांबविण्याचे उद्दिष्ट बाळगणाऱ्या समाजवादाने सगळ्या जगातील विचारवंतांचे कामगारवर्गाच्या दारिद्र्यावर लक्ष केंद्रीभूत केले आणि सर्व जगास गर्जून सांगितले की, 'प्रत्येक मनुष्यास अन्न, वस्त्र व आसरा मिळणे हा त्याचा जन्मसिद्ध हक्क आहे.' हे तत्त्वज्ञान विशेषाधिकार असलेल्या समाजाच्या प्रतिनिधींना भीतिदायक वाटणारच. ह्यामुळेच जोतीरावांचा अशा पुढाऱ्यांच्या नेतृत्वावर विश्वास नव्हता.

**. ४ .**

जोतीरावांच्या चळवळीने आता चांगले मूळ धरले. आपल्या चळवळीचे लोण उदारहृदयी मराठी संस्थानिकांच्या राज्यांपर्यंत नेऊन पोचवावे अशी त्यांची मनीषा होती. शिक्षणातील प्रगतीमुळे कनिष्ठ वर्गातील उत्साही आणि तेजस्वी तरुण महाराष्ट्राच्या क्षितिजावर उगवू लागले होते. रामचंद्र विठोबा धामणस्कर हे त्यांपैकी एक होत. जाधव नावाच्या मराठा घराण्यात त्यांचा जन्म झाला. रत्नागिरीच्या ईशान्येस आठदहा मैलांवर असणाऱ्या धामणसे ह्या गावच्या खोतीचे अधिकार ह्या कुटुंबाकडे होते.

रामचंद्र धामणस्करांचे पणजोबा पेशवाईत रत्नागिरी किल्ल्याचे किल्लेदार होते. त्यांचे वडील विठोबा हे मुन्सफच्या पदापर्यंत चढले होते आणि ते १८६० साली

अहमदनगर येथे निधन पावले. विठोबा धामणस्करांना पाच मुले होती. त्यांपैकी रामचंद्र यांचा जन्म राजापूर तालुक्यातील भालावली गावी १८४८ साली झाला. विठोबा धामणस्करांच्या मृत्यूनंतर रामचंद्राच्या आईने आपले कुटुंब रत्नागिरीस नेले. आपले सर्व दागदागिने विकून तिने आपल्या मुलांचे संगोपन केले. रामचंद्र हा हुशार विद्यार्थी रत्नागिरी सरकारी माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक रा. गो. भांडारकर यांचा आवडता विद्यार्थी होता. त्याने एकोणिसाव्या वर्षी शिक्षकाची नोकरी धरली. नंतर कारकुनी करून तो मामलेदारपदापर्यंत चढला.

अत्यंत गरिबीतून स्वपराक्रमाने झगडत उच्चपदी चढल्यामुळे रामचंद्रपंतांना गरिबां-विषयी खुरीखुरी सहानुभूती वाटे. कनिष्ठ वर्गांतील गरीब नि गरजू मुलांच्या शिक्षणासाठी ते सढळ हाताने खर्च करीत. सातान्याला ते मामलेदार असताना सत्यशोधक समाजाच्या सामाजिक तत्त्वज्ञानाचा त्यांना परिचय झाला. ते सत्यशोधक समाजाचे सभासद झाले आणि जोतीरावांचे एक कट्टर निष्ठावंत चाहते बनले.

रामचंद्रपंतांची शिफारस रानडे आणि तेलंग यांचे राजकीय ऋषी मामा परमानंद यांनी त्या काळचे बडोद्याचे दिवाण काजी शहाबुद्दिन यांजकडे केली. त्यामुळे त्यांनी १८८४ साली धामणस्करांची बडोदे संस्थानात सहायक सरसुभे म्हणून नेमणूक केली. त्या काळी बडोद्याचे तरुण महाराजे सयाजीराव गायकवाड हे संस्थानचा राज्यकारभार चालविण्यासाठी लायक, उत्साही आणि बुद्धिमान व्यक्तींच्या शोधात असत. पुढे काही वर्षांनंतर धामणस्कर दिवाणपदी विराजमान झाले.

मध्यंतरी सयाजीराव महाराजांना उद्देशून जोतीरावांनी ‘दीनबंधू’त एक अनावृत्त पत्र लिहिले. ते पत्र काव्यात होते. त्यात जोतीराव म्हणतात :

“येऊं द्या दया मना ॥ दया मना ॥ भटे केली दैना ॥ ध्रु० ॥
विद्यावंदी मूळ पाया केला दैनवाणा।
आर्याजीने शूद्रा आणिला खरा पशुपणा ॥ १ ॥
मौजेसाठी खर्च स्त्रियांची करता हेळणा।
तमाशांत मर्द नाचती उणे पुरुषांना ॥ २ ॥
वेसवेचे गाणें ऐकतां मळवी नीतींना।
मुळ पातकी होती दोष देती गरतींना ॥ ३ ॥
वसूलाचा पैसा खर्चून खिचडी ऐद्यांना।
कष्टकरी शेतींत खाती चटणी-भाकरींना ॥ ४ ॥
वर्षासनें भटजी नेती खुला खजीना।
शेतकरी कष्ट करुनी करती भरणा ॥ ५ ॥
शेतांतील बैल मरती औती आगोलींना।
गोप्रदानें भटजी खाती सोयरींकी म्याना (?) ॥ ६ ॥

पक्वान्नांची नित्य भोजनें आर्य भटांना।
जन्मांतरी शेतकऱ्याला तुकडा मिळेना ॥ ७ ॥
हात जोडून भटास देनीं रोख दक्षणा।
सार्वजनिक सूट नाहीं कधीं कुळंब्यांना ॥ ८ ॥
नाचे पोरे भटाभिक्षुका शालजोड्या दाना।
उत्तम शेती करितो त्याला बक्षीस कां द्याना ॥ ९ ॥
दारूवर कर लादीला वढती दुर्गुणा।
परिणामी काय होईल कैसें उमजेना ॥ १० ॥
अक्षरशुन्य शुद्रादीका कांहींच कळेना।
अशा मुक्यांचें जाण आतां तुम्हींच कां व्हाना ॥ ११ ॥
कष्टाळूंची दैना दाविली मुख्य प्रधाला।
दयानिधी आहा म्हणूनी लिहिलें पदांना ॥ १२ ॥
गेली घडी पुन्हां येईना माहीत सर्वांना ॥
सर्वकाळ पूर वाहीना पर्वती द्न्यांना ॥ १३ ॥
उदकाची किंमत ती ठावी रणीं शिपायांना।
काशीकर तुच्छ मानीतो गंगाबाईंना ॥ १४ ॥
फुले जोतीबा सयाजीरायाला करतो प्रार्थना।
वाहत्या गंगेमध्यें एकदा हात कां धुवाना ॥ १५ ॥

ह्या पत्रानंतर धामणस्करांनी बडोदे येथे जोतीरावांची सयाजीराव गायकवाडांशी १८८४ मध्ये भेट घडवून आणली. धामणस्करांचा जोतीरावांसंबंधी पूज्य भाव असल्यामुळेच ही गोष्ट घडली. जोतीरावांचे व्यक्तिमत्त्व विलोभनीयच होते. त्यांचे धैर्य आणि निस्पृहता, सामान्य मनुष्याच्या उद्धारासाठी त्यांनी अविरतपणे केलेले कार्य, दलितांचा कैवारी म्हणून त्यांची असलेली ख्याती, त्यांची निःस्वार्थबुद्धी आणि त्यांचे धवल चारित्र्य ह्यामुळे तरुण महाराजांच्या मनावर फारच चांगला परिणाम झाला.

जोतीरावांनी बडोद्यात काही प्रमुख ठिकाणी व्याख्याने दिली. सयाजीराव महाराज आणि त्यांचे खासगीतील लोक यांच्यासाठी त्यांची दोनतीन ठिकाणी व्याख्याने झाली. महाराजांनी त्यांची भाषणे चित्त देऊन ऐकली. ही जोतीरावांची बडोद्याची दुसरी भेट होय. पहिल्या भेटीच्या वेळी त्यांनी 'शेतकऱ्याचा असूड' ह्या ग्रंथाची प्रकरणे महाराजांना वाचून दाखविली होती. अशा प्रकारे धामणस्करांनी आपले नेते नि तत्त्वज्ञानी जोतीराव यांच्या जीवितकार्यात महत्त्वाची अशी भूमिका वठविण्यास प्रारंभ केला.

या व्याख्यानानंतर काही दिवसांनी भटांना खिचडी देण्याची प्रथा बंद केली हे मात्र खरे. खिचडी म्हणजे तांदूळ आणि डाळ. केवळ जोतीरावांच्या भेटीमुळेच ही गोष्ट घडली नाही असे कोणी म्हटले, तरी जोतीरावांच्या स्पष्टोक्तीचा महाराजांच्या धोरणावर प्रभाव पडला असला पाहिजे, असे मानणे वावगे होणार नाही.

# १७

## राष्ट्रीय सभा व कनिष्ठ वर्ग

आपण सुरू केलेली चळवळ फोफावत आहे हे पाहून जोतीरावांना अतिशय आनंद झाला. सत्यशोधक समाजाच्या नेत्यांनी एप्रिल १८८५ मध्ये गुढीपाडव्याच्या दिवशी एक मोठी मिरवणूक काढावयाचे ठरविले. पुण्यासारख्या सनातन्यांच्या नगरीमध्ये अशा रीतीने आपले विचार प्रदर्शित करण्याचे धाडस करणे आणि पुण्यातील धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रांतील सनातनी विचारांच्या प्रतिष्ठेला आणि नेतृत्वाला आव्हान देणे ही काही साधी गोष्ट नव्हती.

सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते व महाराष्ट्रातील काही वजनदार व्यक्ती यांना त्या समारंभात भाग घेण्यासाठी आमंत्रिले होते. आठ फूट लांब आणि नऊ इंच जाड अशा एका बांबूला हिरव्या, पिवळ्या आणि तांबड्या रंगांची पागोटी गुंडाळली होती. बांबूच्या टोकावरून हिरव्या आणि पिवळ्या रंगाचे ध्वज फडफडत होते. तो बांबू दोन स्वयंसेवकांनी बैलांच्या गाडीत उचलून धरला होता. मिरवणुकीच्या अग्रभागी बँड होते. मागून महार वाद्ये वाजवीत व गीते गात चालले होते. महारांच्या मागून ताशे, वाजंत्री वाजत होती. त्यांच्यामागून ढोल व तुतारी वाजविणाऱ्यांचा ताफा चालला होता. आणि ध्वज वाहणारी ती गाडी त्यांच्या मागून चालली होती. गाडीच्या मागून सत्यशोधक

समाजाचे कार्यकर्ते व नेते चालले होते. त्यांच्या मागून लोकांचा मोठा समुदाय चालला होता.

मिरवणुकीमध्ये भाग घेणाऱ्या व्यक्तींमध्ये जोतीराव, रामय्या व्यंकय्या आय्यावारू, महादेव गोविंद रानडे, कृष्णराव भालेकर, तरवडे, डॉ० सदोबा गावडे, एल. के. घोरपडे, देवराव ठोसर, एच. एल. नवल्कर प्रभृति व्यक्ती होत्या. मिरवणूक भवानी पेठेतील विठोबाच्या देवळापासून सायंकाळी चार वाजता निघाली आणि ती सदोबा गावडे यांच्या घराजवळ मिरवत मिरवत रात्री नऊ वाजता पोचली. त्या प्रचंड जनसमुदायापुढे आय्यावारू, रानडे आणि जोतीराव यांची व्याख्याने झाली.

कनिष्ठ वर्गामध्ये स्वाभिमान आणि स्वावलंबन या दोन सद्‌गुणांची जोपासना करण्यासाठी जोतीरावांनी आरंभिलेल्या चळवळीचे महत्त्व दूरदृष्टिसंपन्न माधवराव रानड्यांना कळत असल्याने त्यांनी या समारंभात भाग घेतला होता, हे उघडच आहे.

मराठी लेखकांची दुसरी वार्षिक परिषद २४ मे १८८५ रोजी पुण्यातील सार्वजनिक हॉलमध्ये कृष्णशास्त्री राजवाडे यांच्या अध्यक्षतेखाली भरली. सुमारे तीनशे लेखक उपस्थित होते. जे लेखक परिषदेस उपस्थित राहू शकले नाहीत, त्यांपैकी काही जणांची पत्रे वाचण्यात आली. अशा त्रेचाळीस पत्रांपैकी जोतीरावांचे पत्र पहिल्यानदा वाचण्यात आले.

रा. ब. महादेव गोविंद रानडे यांच्याकडून परिषदेस उपस्थित राहण्यासाठी जोतीरावांना पत्र आले होते. त्याची पोच १३ मे १८८५ रोजी त्यांस लिहिलेल्या पत्रात देऊन जोतीराव म्हणाले होते : "विनंती विशेष. आपले ता. १३ माहे मजकुरचे कृपापत्रासोबतचे विनंतीपत्र पावले यावरून मोठा परमानंद झाला. परंतु माझ्या घाल्मोड्या दादा, ज्या गृहस्थांकडून एकंदर सर्व मनुष्यांच्या मानवी हक्काविषयी वास्तविक विचार केला जाऊन त्याचे त्यास ते हक्क, त्यांच्याने खुषीने व उघडपणे देववत नाहीत व चालू वर्तनावरून अनुमान केले असता पुढेही देववणार नाहीत, तसल्या लोकांनी उपस्थित केलेल्या सभांशी, व त्यांनी केलेल्या पुस्तकांतील भावार्थाशी आमच्या सभांचा व पुस्तकांचा मेळ मिळत नाही. कारण त्यांच्या पूर्वजांनी आम्हांवर सूड उगविण्याचा इराद्याने, आम्हांस दास केल्याचे प्रकर्ण त्यांनी आपल्या बनावट धर्मपुस्तकांत कृत्रिमाने दडपले. याविषयी त्यांच्यातील जुनाट खल्लड ग्रंथ साक्ष देत आहेत. यावरून आम्हा शूद्रादी अतिशूद्रांस काय काय विपत्ती व त्रास सोसावे लागले व हल्ली सोसावे लागतात हे त्यांच्यातील उंटावरून शेळ्या वळणाऱ्या ग्रंथकारांस व मोठमोठ्या सभास्थानी आगंतुक भाषण करणारांस कोठून कळणार ?"

"हे सर्व त्यांच्या सार्वजनिक सभेच्या उत्पादकांस जरी पक्के माहीत होते, तरी त्यांनी फक्त त्यांच्या व आपल्या मुलाबाळांच्या क्षणिक हिताकरिता डोळ्यावर कातडे ओढून त्याला इंग्रज सरकारातून पेन्शन मिळताच तो पुनः अट्टल जात्याभिमानी, अट्टल

मूर्तिपूजक, अट्टल सोवळा बनून आपल्या शूद्रादी अतिशूद्रांस नीच मानू लागला; व आपल्या पेन्शनदात्या सरकारने बनविलेल्या कागदाच्या नोटीससुद्धा सोवळ्याने बोट लावण्याचा विटाळ मानू लागला ! अशीच का शेवटी ते सर्व आर्यब्राह्मण या हतभाग्य देशाची उन्नती करणार ! असो, आता यापुढे आम्ही शूद्र लोक आम्हांस फसवून खाणाऱ्या लोकांच्या थापांवर भुलणार नाही."

"सारांश, त्यांच्यात मिसळल्याने आम्हा शूद्रादी अतिशूद्रांचा काही एक फायदा होणे नाही. याबद्दल आमचा आम्हीच विचार केला पाहिजे. अहो, त्या दादांना जर सर्वांची एकी करणे असेल, तर त्यानी एकंदर सर्व मानवी प्राण्यांस परस्पर अक्षय बंधुप्रीती काय केल्याने वाढेल याचे बीज शोधून काढावे व ते पुस्तकद्वारे प्रसिद्ध करावे. अशा वेळी डोळे झाकणे उपयोगाचे नाही. या उप्पर त्या सर्वांची मर्जी. हे माझे अभिप्रायादाखल छोटेखानी पत्र त्या मंडळींच्या विचाराकरिता तिजकडे पाठविण्याची मेहेरबानी करावी. साथे होके बुड्ढेका येह ये पहिला सलाम लेव.

आपला दोस्त,
जोतीराव गो. फुले"

'ज्ञानोदया'च्या संपादकांनी ११ जून १८८५च्या अंकात जोतीरावांच्या ह्या पत्रावर ब्राह्मण पत्रकारांनी फार संतापून लिहिले आहे, असे सांगून पुढे म्हटले की, 'हे पाहून कित्येक लोकांस ते पत्र आपल्या अवलोकनात यावे अशी इच्छा झाली. आम्हासही ती झाली. यास्तव आम्ही ते पत्र उतरून घेतो. वाचकांस दिसून येईल की, त्यांत ब्राह्मण लोकांस त्वेष वाटण्यासारख्या काही गोष्टी आहेत खऱ्या. पण त्या विचार करण्यासारख्या आहेत.'

जोतीरावांनी मराठी लेखकांशी सहकार्य केले नाही. ते का केले नाही हे सहज कळून येण्यासारखे आहे. त्या लेखकांच्या महत्त्वाकांक्षा, कल्पनासृष्टी, कादंबऱ्या, नाटके आणि काव्य ह्यांतून बहुसंख्य गरीब जनतेच्या प्रश्नांविषयी विचार क्वचितच व्यक्त करण्यात येत. मराठी नाटकांच्या आरंभीच्या काळात नाटकांचे विषय पौराणिक असत. सामाजिक प्रश्नांविषयी जी काही नाटके लिहिली गेली ती वरिष्ठ वर्गाच्या प्रश्नासंबंधी असत. ते लेखक आपल्या संस्कृतीविषयी विशेष अभिमान बाळगीत असत. परंतु शेकडा नव्वद लोकांच्या वाट्याला त्या तथाकथित संस्कृतीचा क्षुद्र अंशही येत नसे याची त्यांना पुसट कल्पनाही नसे. त्याच वर्षी श्रावण महिन्यात जोतीरावांचे अनुयायी आणि पुण्यातील सनातनी यांच्यामध्ये खटके उडाले. ते दिवस श्रावणीचे होते. जोतीरावांच्या विचारप्रणालीप्रमाणे शूद्र आणि अतिशूद्र हे क्षत्रिय होत. तो सिद्धांत विशद करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी असे म्हटले आहे की, पूर्वकाळी क्षत्रियांचे ब्राह्मणांशी फार मोठे बखेडे झाले. यास्तव ब्राह्मणांनी त्यांचे यज्ञोपवीतदानाचे समारंभ करण्याचे नाकारले. त्यामुळे ते क्षत्रिय चौथ्या वर्णात लोटले गेले. ह्या चौथ्या वर्णाला शूद्र म्हणण्यात येऊ लागले. त्यापूर्वी चौथा वर्ण नव्हता. दक्षिण हिंदुस्थानात तर ब्राह्मणांचा

उद्दामपणा याहीपुढे एक पाऊल गेला होता. त्यांच्या मते प्रचलित हिंदुसमाज ब्राह्मण आणि शूद्र यांच्यामध्येच विभागला गेला होता; क्षत्रिय आणि वैश्य हे महाराष्ट्रातून तर केव्हाच नष्ट झालेले होते.

ज्या शिवाजी महाराजांना ब्राह्मण पुढे गोब्राह्मण प्रतिपालक म्हणू लागले, त्यांच्या राज्याभिषेकावर त्यांनी बहिष्कार टाकला होता. जोतीरावांच्या अनुयायांनी यज्ञोपवीते धारण करण्याचा तो समारंभ ब्राह्मणांचा विरोध बाजूला सारून पार पाडला. त्यामुळे ब्राह्मण चिडले. जोतीरावांच्या अनुयायांचीही कृती जरा चमत्कारिकच दिसते. एका बाजूने ब्राह्मणी चालरीतींची कुचेष्टा करावयाची व दुसऱ्या बाजूने त्याच चालीरीती आपण पुढे चालवावयाच्या. जोतीरावांना ही गोष्ट मान्य होती किंवा काय हे कळण्यास मार्ग नाही. श्रुतीच्या काळी ब्राह्मणांना अत्यंत वंदनीय मानले जात असे, ते यज्ञोपवीत वापरत होते म्हणून नव्हे; तर त्यांचा त्याग, पवित्र कार्य आणि ज्ञान ही पाहून तसे मानले जाई.

अठराशे पंचाऐंशी सालच्या पावसाळ्यात सयाजीराव गायकवाड पुण्यात दोन महिने राहिले होते. तेव्हा ते काही शाळांतील समारंभांना उपस्थित राहिले. जोतीराव आणि त्यांचे अनुयायी ह्यांनी महाराजांच्या सन्मानार्थ एक मोठा समारंभ घडविला. महादेव गोविंद रानडे आणि डॉ. भांडारकर ह्यांना ह्या समारंभाचे आमंत्रण देण्यात आले होते. ह्या समारंभाच्या पूर्वी काही दिवस रानड्यांनी महाराजांच्या गौरवार्थ पुण्यामध्ये काही भाषणे केली होती. ह्या समारंभाच्या वेळी जोतीराव आणि त्यांचे कार्यकर्ते ह्यांनी सत्यशोधक समाजाच्या मतप्रणालीचे विवेचन करणारी भाषणे केली.

ह्या प्रसंगी 'मराठे आणि महाराष्ट्र' ह्या विषयावर माधवराव रानड्यांनी एक महत्त्वाचे भाषण केले. आपल्या भाषणात रानडे म्हणाले की, 'पूर्वी जरी जातिभेद होते, तरी राष्ट्राच्या प्रगतीला त्यांनी काही अडथळा केला नाही. तीस वर्षांपूर्वी शेतकऱ्यांची जी परिस्थिती होती त्यापेक्षा ती आता अधिक चांगली झाली आहे.' 'ज्ञानप्रकाश' पत्राने रानड्यांना त्यांच्या भाषणाविषयी धन्यवाद दिले आणि जोतीरावांचे भाषण हे एकांगी आणि हटवादीपणाचे होते, असे म्हणून त्यांना दोष दिला.

'ज्ञानप्रकाशा'च्या ह्या टीकेनंतर महिन्याभरात जोतीरावांनी रानडे आणि 'ज्ञानप्रकाश' ह्यांना उत्तर देणारी एक पुस्तिका प्रसिद्ध केली. त्या पुस्तिकेचे नाव 'इशारा.' मुळांत ती पुस्थिका त्यांनी १८८५ जून महिन्यात लिहिली होती. पण सप्टेंबर महिन्यात रानड्यांचे उपरोक्त भाषण झाल्यावर त्यांनी त्या पुस्तिकेला खास प्रस्तावना लिहून ती ताबडतोब प्रसिद्ध केली. सयाजीराव महाराजांच्या समोर रानड्यांनी जे उपरोक्त अप्रस्तुत भाषण केले होते, त्यावर त्यांनी कडाडून हल्ला चढविला.

## . २ .

'आर्य ब्राह्मणातील पहिला दिवाभीत, गृहस्थाचा डाल घालून पुण्याचा रहिवासी असता मुंबईकर बनून विद्वान श्रीमान महाराज गायकवाड सरकारांस पोकळ ज्ञान

शिकवितो की, 'जातिभेद असला म्हणून आपल्या इष्ट हेतूस तो (जातिभेद) बिलकूल (या देशाचे उन्नतीस) आडवा येत नाही. तथापि असल्या शूद्रादी अतिशूद्रद्वेष्ट्या वाचाळ उपदेशकांच्या मतलबी पोकळ पांडित्याचा आम्हांला यत्किंचित अचंबा वाटत नाही; कारण जातिभेद मोडल्यापासून आर्य ब्राह्मणांनी अतिशूद्रांस विद्या शिकविण्याचा केलेला ब्रह्मराक्षसी प्रतिबंधाचा धिक्कार करून ते सर्व विद्वान होतील, त्या वेळी भटब्राह्मणांची सर्व दुष्कर्मे उघडकीस येताच त्यांचे मतलबी ग्रंथांस कोणी हातीसुद्धा धरणार नाहीत. अठरा वर्णांमध्ये ब्राह्मण श्रेष्ठ म्हणून कोणी त्यांची पत्राज चालू देणार नाहीत. चोरेकुऱ्या ब्राह्मणांस कोणी फुकटाफाकट तूपपोळ्यांची प्रयोजने देणार नाहीत. तबलजी ब्राह्मणांस कोणी भाव देणार नाहीत व खोटेनाटे करणाऱ्या ब्राह्मणांस कोणी मान देणार नाहीत. दारापाशी उभे करणार नाहीत.'

'परंतु आर्य ब्राह्मणांतील दुजा नूतन शंकराचार्यांच्या तोलाचा विद्वान लहान मोठ्या सभांत उड्या मारून प्रतिपादन करीत फिरतो की, पूर्वीच्या तीस वर्षांपेक्षा हल्ली शूद्र शेतकऱ्यांची स्थिती बरी आहे.' या त्याच्या धाडसाविषयी मात्र थोडेसे नवल वाटते; कारण शूद्र शेतकऱ्यांपासून गोळा केलेल्या करपट्टीतून आमच्या इंग्रज सरकारने लक्षावधी रुपये खर्ची घालून भटब्राह्मणांस विद्यादान केल्याचे सार्थक पालथ्या घागरीवर समुद्र पालथा केल्याप्रमाणे झाले. कारण आज हजारो वर्षांपासून खुनशी आर्य ब्राह्मणांनी बनविलेल्या खोडसाळ धर्माचे आडून अज्ञानी, शूद्र शेतकऱ्यांवर चहूकडून जुलूम करीत आले आहेत, व ते सर्व डावपेची जुलूम परोपकारी युरोपियन ग्रंथकारांच्या लेखी शोधांवरून, व युरोपियन आणि अमेरिकन कनवाळू लोकांनी आपले पदरचे पैसे खर्ची घालून या हतभागी देशात पाठविलेल्या धर्मोपदेशकांच्या शिक्षणावरून, अज्ञानी शूद्र शेतकऱ्यांच्या स्थितीत कोठे कोठे थोडासा पालट पडत चालला आहे, म्हणजे या तीस वर्षांत शूद्र शेतकऱ्यांवरील आर्य ब्राह्मणांचा धर्मरूपी जुलूम काही अंशी कमी झाला, हे उघडपणे कबूल करण्याची लाज वाटून तो मोघम म्हणतो की, पूर्वीचे तीस वर्षांपेक्षा (शूद्र) शेतकऱ्यांची हल्ली स्थिती बरी झाली आहे. अहो! हे धूर्त आमचे अज्ञानी शूद्र शेतकऱ्यांची 'सोजरी' भाषा अजाणत्या गव्हर्नर जनरलसारख्या कामगारांची समजूत काढण्याकरिता वापरून हमेशा कशी तरी वेळ मारून नेतात.'

'याच्या एका तरी ब्राह्मणाच्या कुटुंबांतील बायकांमुलांस, आम्हा शूद्र शेतकऱ्यांचे बायकांमुलांसारखे उन्हातान्हात उपाशीतापाशी शेती कामे करण्याचा इंगा माहीत आहे काय? या सर्व भटब्राह्मणांतील एकाने तरी सोनखताच्या पाट्या वाहून झाडांच्या खोडाशी टाकल्या आहेत काय? यांचे आर्य भटबंधू आम्हा शूद्र शेतकऱ्यांचे निढळाचे श्रमाची वीसवीस रुपयांची गोप्रदाने दररोज घेऊन नायकिणींच्या भरीस घालतात, याविषयी कोणाही ब्राह्मणांची वाचा उसळत नाही.'

'असो. हे त्यांचे म्हणणे पूर्वीचे गायागुरांचे कळप वळणाऱ्या, वल्कले नेसून पर्णकुटीत वास करणाऱ्या, कंदमुळांवर निर्वाह करून जंगलोजंगली भटकत फिरणाऱ्या

आर्य भटब्राह्मणांपेक्षा हल्लीचे भिल्ल, कोळी, मांग व महारांची स्थिती फार नामी आहे, असे म्हणण्यासारखे होते. अहो, हे मतलबी विद्वान भटब्राह्मणसुद्धा पुन्हा अज्ञानी देवभोळ्या शूद्रातिशूद्र शेतकऱ्यांचे जन्मांतरात ब्रह्मघोळ करू पाहतात. याविषयी आमचे शूद्रातिशूद्रांसह आर्यभट ब्राह्मण बांधवांस स्पष्ट दिसून यावे म्हणून या चोपडीस ‘इशारा’ नाव दिले आहे.’

दुसऱ्या बाजीरावाच्या राज्यात शेतकऱ्यांचे जे अनन्वित हाल झाले, त्याचे हृदयद्रावक वर्णन जोतीरावांनी ह्या पुस्तिकेत दिले आहे. ‘प्रजेच्या अकल्याणात त्यांस मोठा संतोष वाटावा. ते प्रजा याचा अर्थ काडीकस्पट, ढेकूण अथवा काही एक प्रकारची जनावरे समजत; त्यांचा उपयोग म्हटला म्हणजे त्यांनी राजे व त्यांचे जातींच्या लोकांकरिता, त्यांचे स्त्रियांकरिता व त्यांच्या मुलांबाळांकरिता धान्य उत्पन्न करावे, वस्त्रे विणावीत, त्यांच्याकरिता उन्हातान्हात खपावे आणि त्यांस ज्या ऐषआरामाच्या गोष्टी लागतात त्या सर्व पुरवाव्यात, याशिवाय दुसरा काही नाही.’

राज्य करणे म्हणजे प्रजेस दुःख देणे, तिला मारणे, तोडणे, लुटणे किंवा त्रस्त करणे असा अर्थ ते समजत असत. म्हणून ‘त्यांचे राज्य परमेश्वराने हरण करून, शूद्रादी, अतिशूद्र प्रजेस परमन्यायी, हितावह, सौख्यकारक, सदाचारी आणि शांत असे राज्य इंग्रज सरकारच्या अंमलाखाली प्राप्त करून दिले, सबब ती प्रजा त्यास रात्रंदिवस अशी प्रार्थना करीत आहे की, ‘हे प्रभो, आम्हांस हे राज्य चिरकाल असू दे. कारण हे राज्य झाल्यामुळे प्रजेस पूर्वीच्या राज्यात भटशाहीमध्ये जे काही द्वेषामुळे, धर्मसंबंधाने, नीतीसंबंधाने, राज्यसंबंधाने व दुसऱ्या अनेक गोष्टींच्या संबंधाने जुलूम होत असत, त्या सर्वांतून ती सुटली.’

‘पूर्वी प्रजेने मिळविलेली मालमत्ता लुटारू लोकांपासून असुरक्षितपणे होती. एवढेच नव्हे, परंतु तिजला मोठमोठ्या अधिकारी व राजे लोकांच्या पेंढारी लोकांपासून अक्षयी भीती असे आणि अर्थात् लोकांस स्वकष्टार्जित पैशांचा उपभोग घेण्यास किंवा त्याचा संचय करून ठेवण्यास अनेक अडचणी असल्यामुळे दिवसानुदिवस त्यांची उमेद खचत जाऊन ते आळशी निरुद्योगी, दारिद्र्याने त्रस्त होत चालले होते. तसेच हल्ली स्वमेहनतीने संपादन केलेल्या पैशास अगदी धोका नाही...लोकांस प्रवास करण्याविषयी आनंद वाटू लागला. आता जिकडे पहावे तिकडे सरकारने प्रजेच्या कल्याणाकरिता अनंत खटपटी करून अनेक सुधारणा केल्या आहेत. त्याचप्रमाणे सरकारने प्रजेच्या कल्याणाकरिता पूल केले, मोठमोठाली विद्यालये स्थापन केली, दवाखाने बांधिले, सर्व जातींच्या गरीब-गुरीब लोकांसाठी धर्मशाळा बांधल्या.’

‘सरकारचे सर्वोत्कृष्ट काम म्हणजे जागोजाग डोंगरांच्या आसपास डोंगरांच्या खिंडी बुजवून मोठमोठाले विस्तीर्ण पाण्याचे तलाव केले आहेत. सरकारने त्या स्थळांपासून अनेक सुंदर कनाल काढून सरकार जागोजागी त्यांचे पाणी सर्व आसपासच्या गरीबगुरीब शेतकरी लोकांस अक्षय शेतीचे काम चालावे व ज्या ठिकाणी मनुष्यास पाणी पिण्यास

देखील मिळण्याची पंचाईत ती दूर केली. शेकडो वर्षे भटराजांनी प्रजेवर बाकेतोपर्यंत कराचे ओझे लादून कोट्यवधी रुपये वशात टाकिले. त्यांनी आपले जातीचे भट लोकांकरिता देवाची संस्थाने स्थापन करून तेथे फक्त ब्राह्मणांस तूपपोळीचे, आणि केशरीभाताचे, लाडूचे जेवण घालून त्यांना वीस-वीस रुपये दक्षिणा आणि शालजोडी व पागोटी देऊन प्रजेस अती दुःख देऊन वसूल केलेल्या सर्व पैशांची अशी नासाडी करून टाकीत.'

'शेतकऱ्यांची मुले भुकेने तडफडून मरत. त्यांना दररोज जोंधळ्याच्या, नाचण्याच्या अथवा बाजरीच्या भाकऱ्या मिठाच्या खड्याबरोबर, मिरचीबरोबर किंवा कांद्याबरोबर खाव्या लागत. वेळेस भाजीस तेल मिळाले तर मीठ मिळू नये, मीठ मिळाले तर मिरची मिळू नये, कधी नुसतीच भाजीच उकडून खावी किंवा जंगलातील उंबरेच खाऊन त्यावर आपला गुजारा करावा. कधी कधी तर नुसते पाणीच पिऊन व पोट दोरीने आवळून शेतात खपावे लागे. ब्राह्मणांचे मात्र ओकारी येईपर्यंत जेवण होई.'

'शेतकऱ्याच्या डोक्यावर फाटकी जीर्ण लांब चिंधी. पाच-सात ठिकाणी सांधलेला आणि तुकड्यांनी बांधलेला पायात फाटका जोडा. नेसण्यासाठी सव्वा हात लांबीचे फडकेदेखील त्याला मिळण्याची भ्रांत.'

'स्त्रियांच्या पोशाखाविषयी सांगण्यास आम्हास दुःख वाटते. एखादा जाडा बोंगडा मिळाला तर एक दोन वर्षेपर्यंत तो वापरावा लागे. सोडवणीला दुसरे वस्त्र नसे. पाठीमागे कामाचा रगाडा असल्यामुळे तेच लुगडे त्यांस चारचार पाचपाच दिवस न धुता नेसावे लागे. एखाद्या वेळेस कामातून सवड सापडली तर नदीवर जाऊन लुगड्याचा अर्धा भाग मोठ्या लज्जेने दुःखित होत्साता अंगावरून काढून तो प्रथम धुवावा. तो धुतल्यानंतर ओलाच असताना त्याने आपले शरीर आच्छादित करावे. नंतर शरीरावरील दुसरा भाग काढून त्यास धुवावे. त्याप्रमाणे ते लुगडे जीर्ण होऊन चालल्यामुळे प्रथम अंगावरील अर्ध्या भागास शिवावे व तो नेसल्यानंतर दुसरे नेसलेले अर्ध्या भागास शिवावे. पुढे ते लुगडे फाटून फाटून त्याचा सात किंवा आठ हात लांबीचा धड्या राहून त्यास इतकी ठिगळे असावयाची की, मुळचे हे कोणत्या रंगाचे लुगडे होते हे सांगता येत नसे. अशा प्रकारच्या अंगास अपूर्त्या लुगड्याचा धडया मोठे कष्टाने नेसून डोक्यावर गोवऱ्याची पाटी घेऊन भर बाजारात जावे. हरहर! किती ही दुःखाची गोष्ट बरे!'

ह्या पुस्तिकेत जोतीरावांनी एका ब्राह्मण सावकाराची गोष्ट दिली आहे, ती वाचून अंगावर शहारे येतात. ब्राह्मण, सावकार, मारवाडी आणि दुसरे सावकार शेतकऱ्यांची जमीन कशी लुबाडीत, गोड बोलून खोटे दस्तऐवज बनवून त्यांना कसा भिकेस लावीत ह्याचे हृदयद्रावक वर्णन यात केले आहे. ते एक क्रौर्याचे आणि कपटनीतीचे कथानकच आहे.

जोतीरावांनी 'सत्सार' नावाची एक पुस्तिका १८८५ सालच्या जूनमध्ये प्रसिद्ध केली. 'ह्या पुस्तकाचे पुढचे अंक आम्ही अमक्या वेळी प्रसिद्ध करीत जाऊ म्हणून

आम्ही वचनाने बांधले जात नाही. परंतु या आमच्या अल्पशा प्रयत्नास आमचे निःपक्षपाती विचारशील महंमदी, खिस्ती व हिंदू बांधवांनी उदार आश्रय दिल्यास यापुढचे अंक दर आठवड्यासमुद्धा सादर केले जातील,' असे जोतीरावांनी उपोद्‌घातात म्हटले आहे.

ह्या पुस्तकात संवाद आहेत. पहिल्या प्रकरणात पंडिता रमाबाईंच्या धर्मांतरासंबंधी उल्लेख आहे. जोतीरावांना पंडिता रमाबाईविषयी काहीसा आदर वाटत असावा असे दिसते. पंडिता रमाबाईंचा धिक्कार करण्याऱ्या दारुड्या ब्राह्मणांना ते खिजविण्यासाठी

> **धूर्त आर्यांची मती खुंटली । रमा पंडिता बरी वाटली ॥**
> **मद्य पिउशा आता वाटली । दे ब्रांडीची मला वाटली ॥**

असे एक मर्मभेदक कडवे म्हणून जोतीरावांचे शिष्यगण ब्राह्मणांची थट्टा करीत असत. खिस्ती धर्मोपदेशकांनी तिच्या डोक्यावर थोडे पाणी शिंपडले आहे, दुसरे काही केले नाही. जे लोक दारुडे आणि दुर्गुणी आहेत त्यांना रमाबाईंचा धिक्कार करण्याचा अधिकार नाही असे त्यांचे मत दिसते.

प्रार्थना समाज आणि ब्राह्म समाज यांसंबंधी 'सत्सार'मध्ये जोतीराव म्हणतात की, 'जोपर्यंत शूद्र अतिशूद्र यांच्याशी ह्या समाजांतील कार्यकर्ते आणि त्यांचे अनुयायी मिळूनमिसळून वागत नाहीत, त्यांना आपल्यात सामावून घेत नाहीत, तोपर्यंत त्यांनी शूद्र लोकांनी आपल्या संस्थेत यावे अशी भाषा करू नये. ब्राह्मणांनी व्यास आणि वसिष्ठ यांना आपल्या जातीत समावेश करून घेतला हे म्हणणे बनावट आहे. कारण ह्या ऋषींचे बाप ब्राह्मण होते म्हणून ब्राह्मणांनी त्यांना ब्राह्मण जातीत घेतले. ब्राह्मण बाई आणि शूद्र नवरा यापासून झालेली संतती त्यांनी ब्राह्मण जातीत कधीच घेतली नाही.'

ब्राह्मण संख्येने लहान असताना त्यांच्या दसपट संख्येने असणाऱ्या ब्राह्मणेतरांवर त्यांनी प्रभुत्व आणि सत्ता कशी गाजविली असा प्रश्न विचारला असता, त्याचे उत्तर जोतीरावांनी प्रतिप्रश्न विचारूनच दिले. ते म्हणाले, मूठभर महमदी व इंग्रज लोक कोट्यवधी हिंदूंचे भूपती कसे झाले? तसेच हे घडले. ब्राह्मणांनी धर्माच्या नावाने कनिष्ठ वर्गांना भिकेस लावले. उदारहृदयी खिश्चन आणि मुसलमान यांच्याशी ब्राह्मणेतरांनी तुसडेपणाने वागू नये. मिशनऱ्यांशी भांडणे ब्राह्मणांना सोपे वाटते. परंतु मुसलमानांशी धार्मिक मुद्यांवर भांडणे त्यांना सोपे नाही. त्यांच्याशी त्यांचा गमजा चालणार नाही, असे जोतीरावांचे स्पष्ट मत होते.

स्त्रियांचे शिक्षण आणि ब्राह्म समाज व प्रार्थना समाज ह्या संस्था यांची उत्पती इंग्रजी शिक्षणातूनच झाली. ब्राह्मणांनी आपल्या धार्मिक ग्रंथांत धर्माच्या अगणित व्याख्या देऊन त्यांनी धर्माचा खऱ्या अर्थाचा अनर्थ करून टाकला आहे. ब्राह्मणांची सेवा करणे हाच शूद्रांचा शेवटी धर्म झाला. तुम्ही कोणत्या धर्माचे आहांत? असे जोतीरावांना विचारताच जोतीराव कडवटपणे म्हणाले, 'ब्राह्मणधर्माने देवास फसविले आणि शूद्रांवर

गुलामगिरी लादली. ब्राह्मणांनी शूद्रांच्या कल्याणासाठी नक्राश्रू ढाळू नये. शूद्र लोक मुसलमान किंवा दुसरा एखादा धर्म निर्माणकर्त्यांशी मागून घेतील."

ह्या पुस्तिकेच्या दोन हजार अंकांपैकी जोतीरावांच्या मित्रांनी १०५० प्रती विकत घेऊन निरनिराळ्या गावी वाटल्या.

या पुस्तिकेच्या शेवटच्या भागात जोतीराव आणि एक ब्राह्मण ह्यांमधील एक संवाद दिला आहे. ब्राह्मणांशी ते नेहमी काहीसे कडवटपणे आणि खरमरीत सुरात बोलत असत. जरी जोतीरावांचे जीवश्चकंठश्च मित्र ब्राह्मण जातीतले होते, तरी ब्राह्मणेतरांची भयंकर दुःखे आणि अगणित हालअपेष्टा पाहून त्यांचे हृदय तिळ तिळ तुटे. ब्राह्मणेतरांवरील प्रेमाचे रूपांतर ब्राह्मणांविषयी त्वेषाने बोलण्यात होई.

. ३ .

आपल्या लिहिण्याबोलण्यात जोतीराव हिंदू वा हिंदुधर्म अशी संज्ञा वापरीत नसत. परंतु जेव्हा लॉर्ड रिपन यांनी स्थानिक स्वराज्याचे अधिकार दिले, तेव्हा जोतीरावांनी, 'एकट्या आर्यभटांस' हिंदू समजून अधिकार दिल्याबद्दल महाराज्यपालांना दोष दिला आहे.[1] जोतीरावांच्या उपरोक्त उद्‌गारावरून आणि ब्राह्मणेतरांना शूद्र ही संज्ञा ते लावीत असत त्यावरून शूद्रांना ते हिंदू मानीत याविषयी शंकाच नाही.

जोतीरावांनी धर्मांतराला कधीच अनुकूलता दर्शविली नाही. सत्यशोधक समाजाची दीक्षा घेताना नवीन सभासदास जे संस्कार करून घ्यावे लागत ते हिंदुधर्मानुसारी असत. अनुयायी जानवी वापरत, ते तर ब्राह्मणी धर्माचेच लक्षण होते. लग्नसमारंभ तर हिंदू संस्कारांचे एक शुद्ध स्वरूप. ब्राह्मण आपल्याला भूदेव समजत असल्यामुळे आणि शूद्र हा सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रांत आपल्या बरोबरीचा नाही असे ते मानीत असल्यामुळे या सर्व समारंभांतून त्यांना वगळण्यात आले होते. एखाद्या हिंदू व्यक्तीने आपण धर्मांतर करतो असे जोतीरावांना सांगितले, तर त्या विचारापासून ते त्याला परावृत्त करीत. जोतीरावांबरोबर कार्य केलेले कार्यकर्ते आणि त्यांचे सहकारी अभिमानाने ह्या गोष्टी सांगत असत. यावरून जोतीरावांचा धर्मांतराला कसा विरोध होता हे दिसून येते.

जोतीरावांनी 'सत्सार'चा दुसरा अंक १८८५च्या ऑक्टोबरमध्ये प्रसिद्ध केला. अंक बावीस पृष्ठांचा असून त्याची किंमत एक आणा होती. त्यांत जोतीरावांनी पुरुषोत्तम मारुती, जाया कराडी लिंगू, राजन्ना बाळू कॉंट्रॅक्टर, धर्माजी बाबूराव धायरकर वगैरे मित्रांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत. 'हल्ली ह्या देशातील इंग्रज बहादराच्या राज्याच्या प्रतापाने, गांजलेल्या स्त्रियांस तुरळक लिहितावाचता येऊ लागले आणि तेणेकरून आज हजारो वर्षांपासून आर्य धूर्तजनांकडून एकंदर सर्व स्त्रियांचा सर्वोपरी छळ झाला व होत आहे, ही सर्व पुरुषांची ठकबाजी स्त्रियांच्या डोळ्यांपुढे आणून मांडावी

१ फुले, जोतीराव गोविंदराव, सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक, पृ. ८७.

म्हणून या अंकात थोडासा प्रयत्न केला आहे,' असे जोतीरावांनी उपोद्घातात म्हटले आहे. सत्साराच्या प्रारंभी त्यांनी म्हटले आहे :

> स्त्रीपासुनि उपजुनिया त्यांची जातीच निंदशील जरी ॥
> उमटावे कान तुझे त्वन्मातेनेंची व्यर्थ इतर करी ॥

'अनाथांचे बंधू म्हणून पत्रकर्ते मिरवितात. परंतु शूद्र जसे दीन आहेत तशीच स्त्रीही दीन आहे.' तिच्यावर हे बुद्धिहीन लोक शस्त्र धरतात याविषयी जोतीरावांनी त्यांचा निषेध केला आहे. हिंदुधर्मांचे उत्पादक आर्य ब्राह्मण यांनी स्त्री व शूद्रादिअतिशूद्रांवर आग पाखडून अनेक प्रकारचे जुलमी लेख लिहून ठेवले. त्यांपैकी स्त्रीजातीविषयी अतिशय जुलमी लेख लिहिले आहेत. त्या लबाड्या भटब्राह्मणांच्या लेकीबाळींच्या लक्षात आल्या, तर सर्व देवळांतील पुराणिकांची फटफजिती होईल, आणि त्यांची रेवडी-रेवडी करून सोडतील, असे जोतीरावांनी त्यात म्हटले आहे.

हिंदुधर्मशास्त्रात स्त्रियांविषयी जे अन्यायी, जुलमी आणि पक्षपाती धोरण आखले त्याविषयी जोतीरावांनी त्यांच्यावर कडाडून हल्ला केला. स्त्रियांच्या दुःखाला वाचा फोडली. स्त्रीशिक्षणाचा आणि त्यांच्या उद्धाराचा इतिहास लिहिणाऱ्या प्रामाणिक इतिहासकारांनी याची नोंद घ्यावी.

ह्या दुसऱ्या अंकानंतर 'सत्सार'चा अंक पुढे निघाला नाही.

अठराशे पंचाऐंशी सालच्या पूर्वार्धात जोतीराव एकदोन पुस्तिका लिहीत होते. 'अस्पृश्यांची कैफियत' नावाची एक पुस्तिका त्यांनी थोड्याच दिवसांत प्रकाशित केली. अस्पृश्यांच्या दारुण हालअपेष्टांवर त्यांनी त्यात प्रकाश टाकला आहे. एक महार आणि एक मांग हे भारताच्या दौऱ्यावर असलेल्या महाराणी व्हिक्टोरियाला आपल्या वस्तीत येण्याचा आग्रह करीत आहेत अशी कल्पना केली आहे. ते तिला अत्यंत आर्जवाने आमंत्रण देतात आणि मोठ्या भक्तिभावाने आपल्या वसतींना भेट देण्याचा तिला आग्रह करतात. तुमच्या राज्यात आमची काही सुधारणा झाली आहे का ते पहा अशी तिला विनंती करतात.

महाराणी त्यांच्या वसतींना भेट देते. पेशव्यांच्या राज्यात अस्पृश्यांना फार निर्दयतेने वागवीत असत, असे त्यांनी तिला सांगितले. त्यांना कुत्र्यामांजराचे जीवन जगावे लागे. त्या काळी त्यांना इमारतीच्या पायाखालीसुद्धा जिवंत गाडीत असत. त्यांना बळे वेठीस धरीत असत. ब्रिटिश राजवटीत त्यांचे जीवन सुरक्षित झाले. परंतु रस्त्यांतून त्यांना अजून मोकळेपणाने चालता येत नव्हते. बाजारात ते मोकळेपणाने फिरू शकत नव्हते. दारिद्र्यामुळे ते आपली मुले शाळेत पाठवू शकत नव्हते. त्यांची आर्थिक परिस्थिती पूर्वीसारखीच दुःसह होती. त्यांच्याजवळ उपजीविकेची काही साधने नव्हती. गावाच्या सार्वजनिक पाणवठ्यावर त्यांना काही प्रवेश मिळत नव्हता. 'आमचे दारिद्र्य आणि आमची दुःखे आम्हांस इतर माणसांप्रमाणे माणसांचे हक्क देऊन दूर करावीत,' अशी

त्यांनी महाराणीला प्रार्थना केली. आपले सरकार तुमच्या गाऱ्हाण्यांची चौकशी करील आणि ती दूर करील, असे आश्वासन महाराणीने दिले.

अस्पृश्यांचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने जोतीरावांनी आणखी एक मोठी कामगिरी केली. त्यांनी प्रत्यक्ष अस्पृश्य समाजातच कार्यकर्ते निर्माण केले. अस्पृश्य वस्त्यांना ते नेहमी भेट देत असत आणि त्यांतील उत्साही आणि बुद्धिमान तरुणांनी अस्पृश्यांच्या कल्याणासाठी झटावे म्हणून त्यांना उत्तेजन देत असत. त्यांना लिहायला आणि भाषणे करायला शिकवीत असत; समाजकार्य कसे करावे ह्याचे मार्गदर्शन करीत असत.

अशा कार्यकर्त्यांपैकी गोपाळबाबा वलंगकर हे आद्य व प्रमुख होत. ते जोतीरावांचे विद्यार्थी. जोतीरावांच्या शिकवणीमुळे आणि मार्गदर्शनामुळे ते लेखक झाले, पक्षाचे प्रचारक झाले, उत्तम वक्ते झाले. लष्करातील पायदळ विभागातील आपली नोकरी सोडल्यानंतर अस्पृश्यता निवारण्याच्या कार्याला त्यांनी आपले जीवित वाहून घेतले. 'दीनबंधु' आणि 'सुधारक' ह्या साप्ताहिकांमध्ये त्यांनी बरेच जळजळीत लेख लिहिले. महाराष्ट्रातील अनेक गावांत त्यांनी व्याख्याने दिली. महारमांगांना त्यांच्या परिस्थितीची जाणीव करून देऊन त्यांच्यामध्ये त्यांनी जागृती निर्माण केली. वलंगकरांच्या दौऱ्याला लागणारे साहाय्य जोतीराव करीत. त्यांच्या संसारातही ते त्यांना साहाय्य करीत.

अस्पृश्यता ही मानवनिर्मित आहे, देवनिर्मित नाही असे त्यांचे गुरू जोतीराव यांच्याप्रमाणेच वलंगकरांचे मत होते. पुढे १८८८ साली वलंगकरांनी एक पुस्तिका लिहिली आणि अस्पृश्यतेची रूढी ही देवनिर्मित आहे असे सिद्ध करा, असे सनातनी हिंदूंना आव्हान दिले. स्वधर्मीयांशी हिंदू किती अमानुषपणे वागत होते हे त्यांच्या लक्षात आणून देण्यासाठी ते अष्टौप्रहर झटत असत. अस्पृश्यांच्या उद्धारासाठी झटणाऱ्या काही संस्था त्यांनी स्थापिल्या होत्या. त्यांनी १८९५ सालच्या सामाजिक परिषदेमध्ये भावना हालवून सोडणारे एक भाषण केले होते. सवर्ण हिंदूंनी शाळा, उतारूबंगले, पाणवठे, सरकारी नोकऱ्या आणि व्यापार ह्यांत आपल्या अस्पृश्य बांधवांना इतर हिंदु-धर्मीयांप्रमाणे प्रवेश द्यावा, असे त्यांनी आपल्या प्रभावी भाषणात आवाहन केले.

'अखंड' नावाचे जोतीरावांनी अनेक अभंग केले. अभंगांच्याऐवजी ते त्यांना 'अखंड' म्हणत. अशा एका अखंडात त्यांनी महंमद पैगंबराच्या कार्याची महती गायिली आहे. पैगंबराचे शौर्य, त्याचा उत्साह आणि त्याने आपल्या अनुयायांमध्ये सामाजिक समानतेची आणि बंधुभावाची निर्माण केलेली भावना पाहून जोतीरावांनी महंमद पैगंबराची मोठी प्रशंसा केली आहे. सत्याकरिता महंमद पैगंबर एकटा लढला. समाजात कनिष्ठ आणि वरिष्ठ अशी भावना नसावी; सर्वच समान आहेत असा त्याने उपदेश केला. त्याने आपल्या अनुयायांतील मतभेद मिटविले. त्याच्या मताप्रमाणे देव एकच. त्याचा मूर्तिपूजेला विरोध असे. महंमदाच्या धर्माने दस्यूंना म्हणजे शूद्रांना आर्यब्राह्मणांच्या गुलामगिरीतून मुक्त केले. हिंदू समाजामध्ये बेकी आणि मतभेद असल्यामुळे मुसलमानांनी त्याचा फायदा घेतला, असे जोतीरावांना सुचवायचे होते.

दुसऱ्या एका अखंडात जोतीरावांनी गणपतीचे वर्णन केले आहे. पशूचे शीर्ष आणि मनुष्याचा देह असणारा हा देव अस्पृश्यांना चार हात दूरच ठेवतो आणि भटांवर मेवामिठाईची खैरात करतो. गणपत्युत्सवात खूप धन उधळण्यात येते. मारवाडी गरिबांना पिळून काढतात आणि स्वतःच्या लौकिकासाठी त्या पैशातून देवळे बांधतात. देवाच्या नावाने ते जगाचा छळ करतात आणि नरकात जातात. देवाचे खरे भक्त कष्ट करून आपल्या कुटुंबाचे पालनपोषण करतात. अशिक्षितांना सुशिक्षित करणे आणि अपंगांना अन्न देणे हीच खरी देवाची भक्ती होय. रामदास हा रामाचा धूर्तपणे भक्त बनला. शिवाजीला भेटला आणि ब्राह्मणांच्या हितासाठी त्याने आपले वजन खर्च केले. असे त्यांनी दुसऱ्या एका अखंडात म्हटले आहे.

गुढीपाडव्याच्या दिवशी काढलेल्या मिरवणुकीच्या वेळी ठाण्याचे डॉक्टर संतूजी रामजी लाड हे पुण्यास गेले होते. त्या वेळी जोतीरावांनी सत्यशोधक समाजाच्या सभासदांकडे होणाऱ्या विवाहाच्या वेळी मंगलाष्टके म्हणण्यासाठी रचली होती ती त्यांना दाखविली. ती जोतीरावांच्या 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक' यात दिली आहेत. त्या मंगलाष्टकांचे वैशिष्ट्य असे की, वधू आणि वर ह्यांनी आळीपाळीने स्वतः मंगलाष्टके म्हणावयाची आणि उपस्थित पाहुणे मंडळीने त्या नूतन वधूवरांस एका पद्यात आशीर्वाद द्यावयाचा. जुना रिवाज असा होता की, भटाने मंत्र म्हणावे, त्या मंत्रांचा अर्थ त्याचा त्यालाच कळत नसे, वधूवरांसही कळत नसे आणि वऱ्हाडी मंडळींनासुद्धा त्याचा काही बोध होत नसे. जोतीरावांच्या नवीन मंगलाष्टकांप्रमाणे वर वधूला कोणते अभिवचन देत आहे, पत्नीची व स्त्रीवर्गाची प्रतिष्ठा कशी ठेवावी हे त्याला कळत असे; वधूला आपली कर्तव्ये कोणती याची जाणीव होत असे.

जोतीराव १८८५ सालच्या सप्टेंबरात मुंबईस गेले होते. त्या वेळी कामगार वस्तीत निरनिराळ्या ठिकाणी त्यांनी व्याख्याने दिली. थोड्याच दिवसांपूर्वी त्यांनी वंगणी येथे एका मुक्कामात अनेक व्याख्याने दिली होती. त्यांच्या व्याख्यानाचा विषय सामाजिक तत्त्वज्ञान हा होता. तेथील जनता आपल्या ज्वलजहाल आणि निर्भय अशा पुढाऱ्याची व्याख्याने तन्मयतेने ऐकत असे. ब्राह्मणांच्या मानसिक गुलामगिरीतून आपणांस मुक्त करण्याचा आपला नेता प्रयत्न करीत आहे अशी त्यांची भावना दृढ होऊ लागली. नंतर जोतीराव ठाणे येथे सत्यशोधक समाजाच्या वार्षिक उत्सवासाठी गेले. डॉ. संतूजी लाड हे ठाण्यातील त्या काळचे एक नामांकित नेते होते. जोतीरावांची सल्लामसलत घेऊन त्यांनी तो समारंभ तेथे घडवून आणावयाचे ठरविले होते. सत्यशोधक समाजाचे अनुयायी, कार्यकर्ते आणि नेते आपल्या नेत्याला मानाचा मुजरा करण्यासाठी तेथे प्रचंड संख्येने जमा झाले. त्यांचा उत्साह अमर्याद होता. कार्यकर्त्यांनी व नेत्यांनी त्या उत्सवात केलेल्या भाषणांवरून दिसून आले की, त्यांनी जोतीरावांचे तत्त्वज्ञान अंगी बाणविले होते.

ह्या वार्षिक समारंभामध्ये असे ठरले की, 'सत्यशोधक निबंधमाला' नावाचे निबंध

नारायणराव लोखंडे ह्यांनी प्रसिद्ध करावेत. त्याप्रमाणे लोखंड्यांनी काही निबंध प्रसिद्ध केले. त्यात ब्राह्मणशाहीच्या ढोंगीपणावर मोठाच हल्ला केला. त्या निबंधात पांडित्याचे पाणी नसेल. पण त्यातील युक्तिवाद बोचक आणि जहाल होता. निबंधमालेचे शीर्षक 'सत्यशोधक निबंधमाला अथवा हिंदुधर्माचे खरे ज्ञान' असे होते. डिसेंबर १८८५मध्ये पुन्हा जोतीराव बडोद्यास गेले होते. बडोद्याचे तरुण महाराज यांच्या विवाहानिमित्त ती खास भेट होती, किंवा दुसऱ्या काही कामासाठी होती हे निश्चित कळत नाही.

.४.

आधुनिक हिंदुस्थानच्या इतिहासात सन १८८५ हे वर्ष मोठे युगप्रवर्तक ठरले. त्या वर्षी हिंदी राष्ट्रीय सभेचा जन्म झाला. राष्ट्रीय सभा म्हणजे राजकीयदृष्ट्या भावनात्मक राष्ट्रीय एकीकरणाचा हिंदुस्थानातील पहिला महान प्रयत्न होय. ब्रिटिश सत्तेला आव्हान देणारी प्रचंड शक्ती राष्ट्रीय सभेच्या रूपाने हिंदुस्थानात अवतरली. अशा तऱ्हेची राजकीय संस्था आशियात तर ती पहिलीच. कालांतराने काही दुसऱ्या शक्तींबरोबर ही राष्ट्रीय सभा ब्रिटिशांच्या सत्तेचा शेवट करण्यात यशस्वी झाली.

त्या काळच्या राष्ट्रीयसभेच्या नेत्यांवर जोतीरावांचा मुळीच विश्वास नव्हता. जोपर्यंत काँग्रेसचे नेते महार, मांग आणि शेतकरी यांच्या हिताची कळकळ बाळगीत नाहीत आणि त्यांच्या मानवी व्यक्तिमत्त्वाविषयी आदर बाळगीत नाहीत तोपर्यंत राष्ट्रीय सभा ही खऱ्या अर्थाने राष्ट्रीय होऊ शकत नाही, 'एकमय लोक Nation' होऊ शकत नाही,[२] असे त्यांचे मत होते. राष्ट्रीय सभा ही तिच्या आरंभीच्या काळात मूठभर सुशिक्षित देशाभिमानी आणि प्रबुद्ध लोकांची संस्था होती. हिंदी राज्यकारभार चालविणाऱ्या शासनसंस्थेत हिंदी लोकांना काही अधिकाराच्या जागा मिळाव्या अशी त्यांची मागणी होती.

ब्रिटिशांचे हिंदी साम्राज्य अस्तास जावे असे त्यांच्यापैकी कोणाचेही मत नव्हते. काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनात ब्रिटनचे राष्ट्रगीत गायिले जाई. ब्रिटिशांचा राष्ट्रीय ध्वज युनियन जॅक हाही त्या वेळी उभारण्यात येई. भारतात प्रस्थापित केलेली शांतता, शिक्षण व रेल्वे ह्यांसारख्या केलेल्या सुधारणा आणि प्रत्येक व्यक्ती कायद्यासमोर समान आहे हे ब्रिटिशसत्तेने प्रस्थापित केलेले तत्त्व, ह्यांमुळे जोतीराव व त्यांचे अनुयायी हे ब्रिटिश राजवटीने भारले गेले होते. ब्रिटिश राज्य हे काही आपल्या जन्मास पुरणार नाही असे जरी जोतीरावांना वाटत होते, तरी त्यांच्या अनुयायांना ब्रिटिश राजवट तशीच पुढे चालावी असे वाटे.

त्या काळी ब्रिटिश राज्य हे एक ईश्वरी वरदान आहे असे अनेक नेत्यांना वाटे.

---

२. फुले, जोतीराव गोविंदराव, सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक, पृ. ८६.

राष्ट्रीय सभेचे एक संस्थापक महादेव गोविंद रानडे आणि दुसरे एक बडे नेते फिरोज-शहा मेहता ह्यांसारख्यांची ब्रिटिश राजवट हे देवाचे एक वरदानच आहे अशी भावना होती. राष्ट्रीय सभेचे ब्रिटनमधील पाठीराखे मुत्सद्दी, राष्ट्रीय सभा ही भारतातील लोकांचा राग आणि बंड यांची वाफ बाहेर जावी म्हणून निर्माण केलेले एक झडप आहे असेच मानीत असत. एकोणिसशे अठरा साली इंग्लंडमधील न्यायालयामध्ये टिळकसुद्धा धूर्तपणे का होईना असे म्हणाले की, 'भारताचे विमोचन म्हणजे जास्त अधिकाराची मागणी हे होय. जर विमोचन याचा अर्थ ब्रिटिश राज्यसत्तेपासून पूर्ण स्वातंत्र्य, असा असेल तर आपण तसा प्रचार करीत नाही.'

इंग्रज राजवटीच्याविरुद्धही जोतीरावांची गाऱ्हाणी होती. महार, मांग, शेतकरी आणि कामगार लोक यांच्याकडे इंग्रज सरकार दुर्लक्ष करते असा त्यांचा आरोप होता. जर राष्ट्रीय सभेने कनिष्ठ वर्गाच्या हिताकडे लक्ष दिले नाही, तर ती राष्ट्रीय होऊ शकणार नाही, हे जोतीरावांचे म्हणणे अयोग्य नव्हते. पुढील काळात लोकमान्य टिळकांनी मध्यम वर्ग जागृत केला, महात्मा गांधींनी सर्वसाधारण जनतेत जागृती केली आणि डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्य वर्गात जागृती केली.

जोतीरावांचे म्हणणे असे होते की, हिंदुधर्माच्या नावाने सार्वजनिक सभा आणि काँग्रेस ह्या संस्थांकरवी ब्राह्मण लोक अधिक हक्क मिळविण्याची चळवळ करतात. परंतु ते हक्क स्वतःच्या फायद्यासाठी उपटतात. हिंदुधर्मातील इतर वर्गापर्यंत त्या हक्कांचे लोण जाऊ देत नाहीत. त्या वर्गातील लोकांना ते हीन, मनुष्याहून खालच्या थरातले आणि अस्पृश्य म्हणून मानतात. परस्परविरोधी मतांचे, चालीरीतींचे, धर्मांचे आणि निरनिराळ्या राहणींचे हिंदी लोक यांचे एक राष्ट्र 'Nation' बनणे अशक्य आहे, असे त्यांना वाटे.

हिंदी लोक उच्चनीचतेच्या आणि जातिभेदाच्या कल्पना उराशी बाळगीत असल्या-मुळे त्यांना एकराष्ट्रीयत्वाची दीक्षा देणे हे अवघड काम होते. जर शूद्र लोक काँग्रेसमध्ये गेले, तर त्यांचे दोन्ही बाजूंनी नुकसान होईल. जे ब्रिटिश राज्यकर्ते त्यांच्या स्थितीत सुधारणा व्हावी म्हणून सहानुभूती दाखवीत होते, त्यांना मनुष्याचे अधिकार मिळावे म्हणून प्रयत्न करीत होते, त्यांची ते सहानुभूती गमावून बसतील. इंग्रज सरकारचे 'शूद्रादी अतिशूद्रांचेविषयी' मन विटेल[3] आणि काँग्रेसमध्ये ब्राह्मणांचे प्राबल्य व प्रभुत्व असल्यामळे ते सामाजिक समतेच्या दृष्टीने त्यांच्या प्रश्नांचा विचार करणार नाहीत. त्यांना शिक्षण, अन्न आणि निवारा मिळण्याचे अधिकार देणार नाहीत, असे जोती-रावांना वाटे.

काँग्रेस ही पूर्वकाळात राष्ट्रीय भावनेने स्फुरण पावलेल्या शहरांतील मूठभर वरिष्ठ वर्गाची चळवळ होती. त्यावरून असे स्पष्ट दिसत होते की, वरिष्ठ वर्गातील नेत्यांची

३. फुले, जोतीराव गोविंदराव, सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक, पृ. ८७.

मागणी सरकारने मान्य केली असती, तर वरिष्ठ वर्गातील मूठभर अरेरावांच्या हाती सत्ता गेली असती. जोतीरावांच्या मनात ही शंका मूळ धरून बसली होती असे दिसते.

लक्ष्मण जगन्नाथ वैद्य नावाचे एक कर्तृत्ववान पुरुष १८८६ सालच्या ऑगस्टमध्ये बडोद्याचे दिवाण झाले. त्यांना राज्यकारभाराचे कामी यश चिंतून लोकोद्धार हेच एकमेव ध्येय त्यांनी मनी बाळगावे अशी जोतीरावांनी एका अखंडाद्वारे प्रार्थना केली होती. महार, मांग, ब्राह्मण यांचे ऐक्य होऊन त्यांनी एकत्र जेवावे अशी त्यांनी इच्छा प्रदर्शित केली. ब्राह्मण अधिकारी मांसाहार करतात. ब्रिटिशासंगे दारू पितात. परंतु इतर जातींना सोवळ्याओवळ्याचे प्रस्थ माजवून दाखवितात आणि महारमांगांचा द्वेष करतात. न्यायदानाचे कार्य करतांना लाच घेतात. मुसलमान वेश्यांचे चुंबन घेतात. पण महारांना तिरस्काराने वागवितात. असे विकृत अन् उफराट्या वृत्तीचे ब्राह्मण आहेत. त्यांच्यावर बहिष्कार टाकावा, असे त्यांनी म्हटले आहे.

राष्ट्रीय सभा सर्व धर्मीयांची बनवावी असे जोतीरावांचे म्हणणे होते. जातिभेदाच्या रूढीवर ब्राह्मणांची अतिशय निष्ठा आहे. ती त्यांना हितकारक आहे, पण दुसऱ्या जातींना हानिकारक आहे. कारण ब्राह्मण हे जन्माने श्रेष्ठ आहेत, असे जातिभेद-व्यवस्था मानते. शूद्रांची पिळवणूक करण्यासाठीच त्यांनी ती शक्कल शोधून काढली होती. ब्राह्मण आणि मुसलमान, खिश्चन आणि मांग यांमध्ये असला भेदाभेद करू नये. प्रत्येकाने जात, धर्म नि देशनिरपेक्ष बुद्धीने वागले पाहिजे. देव एकच आहे आणि त्याची पूजा करण्यात सर्वांनी एकत्र यावे असे त्यांचे म्हणणे होते, हे त्यांच्या अखंडांवरून दिसून येते.

जोतीरावांचे धारदार, बाणासारखे तीक्ष्ण लेख 'दीनबंधू'त प्रसिद्ध होत. त्यावर प्रतिक्रिया म्हणून विरोधकांकडून प्रखर टीका होई. गुंजीकर आणि राजारामशास्त्री भागवत ह्या दोन ग्रंथकारांच्या लेखांमुळे जी तेढ वाढत होती त्यांत जोतीरावांच्या कडक लेखांमुळे भर पडली. 'सरस्वतीमंडल' नावाच्या आपल्या पुस्तकात गुंजीकरांनी चित्पावनांवर तिखट टीका केली होती. त्या टीकेला राजरामशास्त्री भागवतांनी 'जशास तसे'नावाचे पुस्तक लिहून सणसणीत उत्तर दिले. ही दोन्ही पुस्तके आणि जोतीरावांचे 'दीनबंधू'तील लेख ह्यांमुळे रिकामा वाद उत्पन्न होतो. वैमनस्ये वाढतात. म्हणून अशा ग्रंथरचनेच्या भरीस आमच्या समंजस मंडळीने पडू नये हे उत्तम, असे 'इंदुप्रकाश'ने म्हटले आहे.[४]

.५.

जोतीरावांचे जीवितकार्य आणि त्यांची पुस्तके यांनी मुंबईतील नेत्यांचे ऋषी नारायण-राव परमानंद तथा मामा परमानंद यांच्यासारख्या नेत्यांचे लक्ष वेधले होते. अत्यंत

४ इंदुप्रकाश, ३ ऑगस्ट १८८४.

प्रतिकूल परिस्थितीला तोंड देऊन स्वतःच्या कर्तृत्वाने मुंबई प्रांताच्या सार्वजनिक जीवनात महत्पदास चढलेले मामा परमानंद हे रानडे, तेलंग आणि भांडारकर यांचे राजकीय ऋषी, मार्गदर्शक आणि तत्त्वज्ञानी होते. त्यांच्या विचारांचा प्रभाव रानडे, तेलंग, वडेरबर्न आणि मोतीलाल घोष यांवरही पडला होता, हे पाहिले म्हणजे त्यांची योग्यता कळून येते.

ए. ए. अॅस्क्वर्थ आणि शंकर तुकाराम शाळीग्राम ह्यांना ते संपादन करीत असलेल्या मराठी पवाड्याच्या पुस्तकासाठी काही माहिती मिळवून द्यावयाची व काही मुद्यांचा जोतीरावांकडून खुलासा करून घ्यावयाचा होता म्हणून त्यांनी त्यांना एक पत्र लिहिले. जोतीराव हे शिवाजीवर पवाडे रचणारे कवी असल्यामुळे त्यांच्याकडून ती माहिती मिळेल असे परमानंदांना वाटले.

परमानंदांना २ जून १८८६ रोजी लिहिलेल्या आपल्या उत्तरात जोतीराव म्हणतात, 'शिवाजीने गोपीनाथपंताच्या साहाय्याने अफझुलखानाचा निकाल कसा लावला व तानाजीने सिंहगड कसा काबीज केला ह्या हकीकतींचे खरे पवाडे माझे पाहण्यात नाहीत. इंग्रज नि युरोपियन ग्रंथकारांनी शूद्रांच्यासंबंधी भटांच्या सांगण्यावरून व ब्राह्मण अधिकाऱ्यांनी पुरविलेल्या माहितीवरून इतिहास लिहिला. ब्राह्मणांतील काही सुशिक्षित तरुण पवाडे करीत आहेत आणि लोकांच्या पुढे ठेवीत आहेत. अशा काही पवाड्यांची मला माहिती आहे, परंतु ते बनावट असल्यामुळे मी आपल्या संग्रही ठेविले नाहीत.' जोतीरावांच्या मते दादाजी कोंडदेव आणि ब्राह्मण यांच्या कार्याला त्या पवाड्यांत फाजील महत्त्व देण्यात आले आहे.

ब्राह्मणांनी लिहिलेल्या इतिहासाच्या सत्यतेविषयी केवळ जोतीरावांनाच संशय होता असे नाही. ब्राह्मणेतर नेत्यांनाही असे वाटत असे की, ब्राह्मण-ग्रंथकार इतिहासाची नोंद व अर्थ अशा पद्धतीने करतात की, ब्राह्मणेतर नेते कितीही बुद्धिमान वा पराक्रमी असले, तरी ब्राह्मणांच्या साहाय्यावाचून त्यांना कोणतीही मोठी कामगिरी करता यावयाचीच नाही. थोर पुरुषाच्या यशाला अनेक गोष्टी कारणीभूत असतात हे खरे. त्याला साहाय्य करणाऱ्या आजूबाजूच्या व्यक्तींना काही श्रेय दिले पाहिजे हेही खरे. परंतु रामदास शिवाजीचा गुरू आणि मार्गदाता होता येथपर्यंत ब्राह्मण इतिहासकारांनी इतिहासातले सत्य ताणावे हे योग्य नाही. कारण भारतात नवीन युग सुरू करणारा शिवाजी हा एक महापुरुष, तर रामदासाचे महत्त्व महाराष्ट्राच्या विशिष्ट काळापुरते अन वर्गापुरते निगडित होते एवढेच. रामदासाच्या मोठपणाचा पट ताणून ताणायचा तरी किती ! रामदास हा चिपळूणकर–टिळकपंथाचा प्रभावी गुरू असला, तरी त्याची शिवाजीच्या युगप्रवर्तक कर्तृत्वाच्या गुरुपदी स्थापना करणे अयोग्य आहे.

या सुमारास पुण्यातील मार्केट प्रकरणाने मोठे भयंकर स्वरूप धारण केले. नवीन इमारत १८८५ साली बांधून पूर्ण झाली. त्या वेळचे मुंबईचे राज्यपाल लॉर्ड रे यांचे नाव त्या इमारतीस देण्यात आले. इमारत वापरास तयार झाली तरी व्यापारी त्यातील दुकाने भाड्याने घेईनात. अधिकाऱ्यांना भीती वाटे की, जनता भाजीपाला विकत

घेण्यासाठी मार्केटपर्यंत मुळी येणारच नाही. काही भाजीपाला-विक्रेत्यांना रे मार्केटमध्ये जाण्यासाठी मारझोड करण्यात आली. दुकानांचे भाडे फार असल्यामुळे व्यापारी तेथे जाईनात. मार्केटसाठी नवीन इमारत बांधण्याच्या ठरावाला 'केसरी'ने प्रारंभापासूनच विरोध केला होता.

लोकांना इमारतीची निकड आणि विशेष आवश्यकता वाटत नसतानाही लाखो रुपये तिच्यासाठी खर्च करावे, ह्या गोष्टीला जोतीरावांचा सक्त विरोध होता. त्याऐवजी ते पैसे जनतेच्या शिक्षणावर खर्च करावे, असे त्यांचे मत होते. हे पैसे गरिबांनी दिलेल्या करातूनच खर्च होणार होते. त्या गरिबांना दुकानाची एवढी मोठी भाडी भरता येण्यासारखी नव्हती. म्हणून जोतीरावांनी भाजीविक्रेत्याच्या बाजूने त्या प्रकरणी हस्तक्षेप केला. त्यांनी नगरपालिकेचे सभासद आणि सरकारी अधिकारी यांची भेट घेतली आणि त्या गरीब विक्रेत्यांची परिस्थिती विचारात घेऊन त्या प्रश्नाकडे पाहवे अशी त्यांना विनंती केली. सरकारने त्या गरीब विक्रेत्यांवर कर बसवू नये, असे जोतीरावांचे मत होते.

जोतीरावांनी त्यांची बाजू मांडतांना म्हटले की, 'भाजीचे विक्रेते हे अत्यंत गरीब लोक असतात. दर दिवशी ते माल खरेदीसाठी आठ आणे किंवा एक रुपया सावकाराकडून कर्ज काढतात आणि उन्हातान्हातून सर्व वस्तीतून फिरून भाजी विकतात. त्यांना आपले जीवन जगणे कठीण, कष्टाचे वाटते. कचेरीतून काम करणारे लोक आणि ज्यांना उसंत मिळते असे बहुतांशी ब्राह्मणवर्ग हेच त्या भाजीविक्रेत्यांची गिऱ्हाइके. ब्राह्मण वर्ग मितव्ययी नि काटकसरीने वागणारा. जर भरमसाट दर वाढविला तर ते भाजी विकत घेणार नाहीत आणि असे चालले तर त्या गरीब विक्रेत्यांवर कराचे ओझे पडेल.' परंतु सरकारी अधिकारी नि नगरपालिकेचे सभासद यांनी जोतीरावांच्या सूचनेस विरोध केला.

जोतीरावांनी नवीन मंडईच्या इमारतीच्या कल्पनेसच विरोध केला होता. त्या मंडईला राज्यपालाचे नाव दिल्यावरसुद्धा जोतीरावांचा विरोध थांबेना. त्यामुळे इंग्रज अधिकारी जोतीरावांवर नाखूष झाले. जोतीराव सरकारच्या विरोधीपक्षात एका बाबतीत तरी एकदाचे सापडले, हे पाहून सामाजिक चळवळीतील त्यांच्या विरोधकांना अत्यंत समाधान झाले. जोतीरावांचे सारे लक्ष त्या गरिबांच्या हिताकडे होते. जेव्हा जेव्हा गरिबांच्या हिताच्या दृष्टीने एखादी योजना जोतीरावांना अपायकारक वाटे, तेव्हा तेव्हा त्यांच्या हितरक्षणासाठी ते पुढे येत आणि त्या योजनेला निर्भयपणे विरोध करीत. या मार्केटच्या नव्या इमारतीस विरोध करण्यात त्यांचा हेतू हाच होता. परंतु योगायोग कसा विचित्र पहा! पुढे अनेक वर्षांनी त्याच 'रे मार्केट'ला 'फुले मार्केट' असे अभिधान देण्यात आले. त्यांच्या ह्या विरोधाचे असे हे त्यांच्या स्मारकात रूपांतर झाले!

वरील प्रकरणाचा वचपा काढावा म्हणून नगरपालिकेतील दुष्ट प्रवृत्तीच्या सभासदांनी जोतीरावांचा सूड घेतला. घाण घेऊन जाणाऱ्या गाड्या जोतीरावांच्या घरावरून ते पाठवू

लागले. संतापाने जोतीराव उद्गारले, "ह्या म्युनिसिपालिटीत भट पडो! तिचे नाव माझ्यासमोर काढू नका!"

असा अनन्वित छळ झाला तरी जोतीरावांनी त्याविरुद्ध गाऱ्हाणे मांडले नाही. त्यांनी तो छळ शांतपणे सोसला. एक मुसलमान तांबोळी जोतीरावांकडे नगरपालिकेच्याविरुद्ध अशाच प्रकारचे एक गाऱ्हाणे घेऊन गेला होता. गरीब मनुष्य. दुसरीकडे जाणार कुठे? त्या गरिबांचा त्राता, प्रवक्ता, नेता सर्व काही जोतीरावच! त्याला बोलता बोलता असे आढळून आले की, मैला जेथे टाकतात ते कुंड जोतीरावांच्या घराच्या शेजारीच आणून ठेवण्यात आले होते व त्या मैल्याच्या गाड्या त्यांच्या घरावरून जात. ती हकीगत ऐकून त्या मुसलमानाचा संताप अनावर झाला. त्याने 'दीनबंधू'त पत्र प्रसिद्ध करून जोतीरावांच्या विरोधकांचे हे नीच कृत्य जनतेच्या निदर्शनास आणून दिले.

गरीब जनतेच्या सच्च्या प्रवक्त्यांशी नि कैवाऱ्यांशी, जो वर्ग आपणास सुसंस्कृत समजतो नि ज्याला रिकामपणामुळे उपाधी निर्माण करण्यास सवड असते, त्याची अशाच रीतीने वागण्याची प्रथा असते. ह्या छळाची वार्ता जेव्हा खेड्यापाड्यांतून पसरली तेव्हा जोतीरावांच्या अनुयायांचा नि त्यांच्या चाहत्यांचा त्यांच्याविषयी असलेला पूज्यभाव दुणावला, आणि त्यांच्या शत्रूंनी जो त्यांच्या नेत्याचा छळ केला त्याचे त्यांच्या मनावर कायमचे ठसे उमटले.

[illegible]
अनुक्रम [illegible]
[illegible] नोंद दि. [illegible]

# १८

# आधुनिक भारताचा पहिला महात्मा

सत्यशोधक समाजाच्या पद्धतीनुसार महाराष्ट्रात अनेक गावी लग्ने होऊ लागल्यामुळे ब्राह्मण आणि सत्यशोधक समाजाचे अनुयायी यांमध्ये तेढ वाढू लागली. अठराशे सत्त्याऐंशीच्या मार्चमध्ये 'दीनबंधू'चे संपादक नारायणराव लोखंडे पुणे जिल्ह्याच्या खेड तालुक्यातील आपल्या कणेरसर नावाच्या पूर्वजांच्या गावी एका नातलगाच्या लग्नसमारंभासाठी गेले होते. तेथे त्यांना एका ब्राह्मणाने सांगितले की, 'जुन्नरचे सत्यशोधक समाजाचे पुढारी भाऊ कोंडाजी पाटील हे ब्राह्मणांना शरण गेले आहेत.' त्यावर लोखंडे ह्यांनी त्या ब्राह्मणाची थट्टा केली आणि म्हटले, 'पाटलांना आपण ब्राह्मणांपेक्षा चांगले ओळखतो.' अशी वार्ता पसरविण्यात ब्राह्मणांचा हेतू असा असे की, सत्यशोधक समाजाच्या अनुयायांमध्ये त्यांच्या नेत्यांविषयी संशय निर्माण व्हावा आणि ते पुढारी निरुत्साही व्हावे.

जुन्नर तालुक्यातील तळवणे गावी सत्यशोधक समाजाच्या एका अनुयायाने आपले लग्न सत्यशोधक समाजाच्या पद्धतीने केले. त्यांचे नाव गुणाजी बापूजी पाटील–शिंदे असे होते. लग्नाच्या पूर्वी ब्राह्मणांनी गुणाजी पाटलांच्या नातलगांना उठविले आणि सत्यशोधक समाजाच्या पद्धतीने लग्नविधी करण्यास त्याला विरोध करविला. तथापि भाऊ कोंडाजीने पोलिसांच्या साहाय्याने ते लग्न ब्राह्मणांच्या नाकावर टिच्चून केले.

ब्राह्मणेतरांनी आपल्याकडील लग्नेच केवळ भटाशिवाय करावीत असे नाही; तर इतर धार्मिक विधीही त्याचे साहाय्य न घेता करावेत, अशी सत्यशोधक समाजाची शिकवण असे. त्यामुळे भटाला दक्षिणा, देणगी, कपडे आणि मेजवानी देण्यात जो पैसा खर्च व्हायचा तो वाचे. अशा रीतीने वाचलेला पैसा ब्राह्मणेतर मुलांच्या शिक्षणासाठी वापरण्यात येई.

जून १८८७ मध्ये या चळवळीने फारच उग्र स्वरूप धारण केले. पुणे जिल्ह्यातील ढमढेऱ्यांच्या तळेगावी सत्यशोधक अनुयायांच्या निकडीच्या आमंत्रणावरून जोतीराव गेले. तेथे त्यांनी एका न्हाव्याचे लग्न ब्राह्मणांचा विरोध बाजूला सारून सत्यशोधक समाजपद्धतीने केले. जोतिरावांनी पुण्यासारख्या शहरातील ब्राह्मणांना धाब्यावर बसविले, तर तळेगावच्या भिक्षुकांना ते काय दाद देणार! भट आणि त्यांचे पाठीराखे यांनी जोतीरावांच्याविरुद्ध कुणब्यांना लाच देऊन उठविण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांचे काही चालले नाही. कारण ब्राह्मणेतर समाजातील बहुसंख्य लोकांवर सत्यशोधक समाजाचा प्रभाव पडत चालला होता. जोतीराव व त्यांचे अनुयायी यांनी तो लग्नसमारंभ निर्धाराने पार पाडला.

तळेगावच्या या तेढीचा परिणाम असा झाला की, तेथील न्हाव्यांनी ब्राह्मणांच्या हजामती करण्याचे नाकारले. परंतु आपणच न्हाव्यांवर बहिष्कार टाकला आहे, अशी हूल ब्राह्मणांनी उठविली. तेथील ब्राह्मणांनी एकमेकांची हजामत केली. काखेत धोकट्या लावून ब्राह्मण शहरात फिरू लागले. ब्राह्मणांनी आपली नाके कापली; पण न्हाव्यांवर थुंकण्यास कमी केले नाही. ब्राह्मणेतर नेत्यांच्या आदेशावरून तेथील जनतेने न्हाव्यांची बाजू घेतली आणि तो लढा दूरवर पसरू लागला. सरतेशेवटी ब्राह्मण ब्राह्मणेतरांना शरण गेले. तेथील कुलकर्णी अप्पाने मात्र भीष्म प्रतिज्ञा केली. तो म्हणाला, 'मी ब्राह्मणाचा खरा बच्चा आहे; याचा ब्राह्मणेतरांवर सूड घेतल्याशिवाय राहणार नाही!' परस्परांत झालेली तडजोड फार काळ टिकू शकली नाही. त्यामुळे सत्यशोधक समाज पद्धतीची लग्ने पूर्ववत सुरू झाली.

ब्राह्मणांनी वेद टाकून वस्तरा हाती घेण्याची अशी ही पहिलीच वेळ नव्हती. अठराशे साठ साली पुणे येथे एका न्हाव्याच्या नवीन घराची वास्तुशांती काही भटांनी केली. त्या भटांवर पुण्यातील ब्राह्मणांनी सामाजिक बहिष्कार टाकला. त्या बहिष्कारास प्रत्युत्तर म्हणून 'जे ब्राह्मण त्या गरीब भटांना छळीत होते,' त्यांच्या हजामती करावयाचे पुण्यातील न्हाव्यांनी नाकारले. अठराशे पंचाहत्तर सालच्या जून महिन्यात पुणे येथील न्हाव्यांनी हजामतीचे दर वाढविल्यामुळे काही दिवस ब्राह्मणांनी एकमेकाच्या हजामती केल्या होत्या.

'नेटिव्ह ओपिनियन'[१] या पत्राने १८७५ सालच्या ह्या न्हावी प्रकरणावर चांगली

---

१ The Native Opinion, 11 July 1875.

चरचरीत, उपरोधपूर्ण अशी टीका केलेली आहे. 'ब्राह्मण न्हावी' असे एक स्फुट लिहून 'नेटिव्ह ओपिनियन' म्हणाले: "आमच्या ऐकण्यात असे आले आहे की, पुणे शहरातील काही ब्राह्मणांनी न्हाव्यास पैसा जास्त द्यावा लागतो म्हणून स्वतंत्र हजामती करण्याचे काम पत्करिले आहे. काळाला अनुसरून हा व्यवसाय फार चांगला दिसतो. 'वर्णांना ब्राह्मणो गुरु:' सर्व वर्णांचे व 'शापादपि शरादपि' शाप तर सत्य युगादी युगातच नाहीसे झाले. शर म्हणजे तलवार. ती त्यांचे पूर्वज पेशवे यांनी गाजविली. आता शाप गेले, तरवार इंग्रज सरकारने नेली. मग राहिले ते काय? काही आले नाही म्हणजे प्रचारात म्हणण्याची अशी प्रौढी आहे की, 'काही येत नाही तर हजामती तरी करा.'"

"अर्थात म्हणीस अनुसरणे भाग पडले. आता हा नवीन उपक्रम नव्याच लोकांत झाला किंवा जुन्या लोकांनी केला हे अद्याप पक्केपणी समजले नाही. असो. कोणतीही मंडळी असली तरी त्यांस हा मार्ग कसा सुचला असावा बरे? आम्हांस असे वाटते की, पुण्यात वक्तृत्वोत्तेजक सभेच्या समाजापुढे बोलण्यासाठी वक्त्यांस तीन विषय नेमून दिले होते. त्यांतील एक विषय हा होता की, 'आली सिंहस्थ पर्वणी, न्हाव्या भटा झाली धणी.' ह्या तुकारामबोवांच्या अभंगास उद्देशून काही उपदेशपर भाषण करावे. वक्त्यांची सुरस भाषणे ऐकून या मंडळींच्या मनात असे आले की, हरहर! हे उत्पन्न दोन्ही-(न्हावी व भट) कडे विभागले जावे तर तसे काही उपयोगी नाही. तर अभंगामध्ये दोन वेगळाले शब्द आहेत. त्यांचा एकच सामासिक शब्द करून दोन्ही उत्पन्नांचा ओघ आपणाकडेच वळवावा. असे केले म्हणजे जसा तीर्थोपाध्येपणाचा हक्क सांगता येतो तसाच क्षौरहक्कही सांगता येईल. आता पुण्यातील ब्राह्मण न्हाव्यांनी दुसरी एक युक्ती काढली पाहिजे, ती अशी की काही हुशार न्हावी-भट तयार करून त्यांस नाशिक, वाई, कोल्हापूर, पंढरपूर व काशी अशा मोठमोठ्या क्षेत्रांचे ठायी पाठवून शाळा स्थापन करवाव्या व तेथल्या ब्राह्मणांस ही नवीन साध्य केलेली विद्या शिकवावी. म्हणजे हे काम लवकर साध्य होऊन यत्न सफळ होईल. हरहर! काय निकृष्ट अवस्थेस ब्राह्मण येऊन पोचले हे! विनाशकाल प्राप्त झाला म्हणजे विपरीत बुद्धी व्हावयाचीच; ती कधी चुकणार नाही. अहो, परदेशांतल्या कलाकौशल्याने तुम्हास जेरीस आणून सोडले आहे. त्यांशी लढाई करण्याचे काही मनावर घ्या. हातात वस्तरे घेऊन ते काम कसे साधेल? त्यांचे वस्तरे घेण्याबद्दल त्या न्हाव्यांस वस्तरे करून द्याल तर बरे होईल. तूर्त जरी एखादा पैसा जास्त न्हाव्याकडे गेला, तर तो आपल्याच देशात आहे असे समजा. तुम्ही रणधीर, शूर शिपाई जर आहात तर परदेशस्थ कलाकौशल्यरूपी व्याघ्रावर स्वारी करा; बिचाऱ्या मेंढरांच्या पाठीस लागून तुम्हांस काय मिळणार आहे?"

जोतीरावांनी १० जुलै १८८७ रोजी आपले मृत्युपत्र केले. त्यात ते म्हणाले, "माझा वडील भाऊ राजाराम गोविंदराव फुले होता. तो मयत झाला. तो व मी विभक्त झाल्या दिवसापासून प्रत्येकाने आपआपला स्वतःचा उदीम व्यापार करून स्थावरजंगम मिळकत मिळविली आहे. तिचा ज्याचा तो मालक आहे. व माझे

लग्नाचे स्त्रीचे पोटी पुत्र नसल्याकारणाने गंज पेठेत केसोपंत सिंदीचे वाड्यात राहाणाऱ्या काशी नांवाच्या स्त्रीस मुलगा होताच माझे लग्नाच्या स्त्रीने त्या मुलाची स्वतः नाळ कापून त्याचे आपल्या पोटच्या मुलासारखे संरक्षण केले व आम्ही उभयतांनी त्याचे बारसे करून यशवंत नाव ठेविले. त्याची उमर आता सुमारे तेरा वर्षांची आहे."

"उभयतांचे पश्चात आमचा मुलगा यशवंत आमचे स्थावरजंगम व इतर प्रकारचे वगैरे सर्व प्रकारचे मालमिळकतीचा मालक असून तो जाणता व सज्ञान झाल्यावर त्याजला केवळ तशी वहिवाट व मालकी करून त्याने आपले वंशपरंपरेने सुखरूप उपभोग घेऊन मालकी करावी. आमचे मिळकतीवर आमचे भाऊबंद व पुतण्या गणपतराव राजाराम फुले वगैरे कोणाचा वारसा मालकी नाही. आमचा मुलगा यशवंत हा अज्ञान आहे. सबब मी व माझे कुटुंब सावित्री त्याचे पालनपोषण करून त्यास विद्या शिक्षण देत आहोत. त्याचे मुख्य कारण हेच की, चिरंजीव यशवंताने ईश्वरप्रीत्यर्थ, आपले सर्वोपरी गांजलेले अज्ञानी दीन दुबळ्या शूद्रादिअतिशूद्र बांधवांस त्यांचे मानवी अधिकाराचे हक्क समजावून देऊन त्यांची धूर्त, ठक, मानवद्रोही आर्यभट ब्राह्मणांचे कचाट्यापासून सुटका करण्याचे कामी आपले आयुष्य, आपले सर्वस्व खर्ची घालून, चिरंजीव यशवंताने जन्माचे सार्थक करून घ्यावे. आपणास तारणाऱ्या इंग्रज सरकारच्या हरएक कामी उपयोगी पडण्याकरिता आपल्या जीवाकडे पाहू नये. आम्हा उभयतांचे मृत्यूनंतर आम्हा उभयतांविषयींचे सर्व विधी सत्यसमाजोक्त करावयास फक्त चिरंजीव यशवंतास मात्र अधिकार आहे. व आम्हा उभयतांच्या शवास वडिलोपार्जित रिवाजाप्रमाणे शक्त्यनुसार मिठात घालून पुरावे."

"माझे मृत्यूमागे चि. यशवंताने नेहमी शाळेत जाऊन योग्य अभ्यास करून मॅट्रिक पास होऊन बाकीच्या पदव्या संपादन करण्याकरिता प्रयत्न न करिता उनाड परकी लोकांचे मुलांसारखी वर्तणुक करू लागला, तर माझे स्त्रीने सत्यशोधक समाजातील सभासदांचे बहुमताने चि. यशवंतास माझे वाटणीचे पुण्यातील घर नं. ३९४चे अथवा खानवडी येथील माझे वाटणीच्या वाड्यातील, शेतांतील, मळ्यांतील व विहिरीतील हिस्सा देऊन त्यास बाकी सर्व इस्टेटीमध्ये रद्द करावा. आणि समाजातील सभासदांचे बहुमताने यशवंतचे जागी माळी, कुणबी, धनगर वगैरे शूद्र समाजातील जो कोणी मुलगा सर्व मुलांत हुशार व लायक निघेल त्यास माझ्या मालमिळकतीचा मालक करून त्याच्या हातून सर्व कामे चालवून घ्यावी. सारांश शूद्रादी अतिशूद्रांस दासानुदास मानणाऱ्या आर्यभटब्राह्मण जातीसह त्यांच्या अनुयायाचीसुद्धा माझे शवावर व तत्संबंधी करीत असलेल्या विधीवर सावली सुद्धा पडू देऊ नये."

जोतीरावांनी यशवंताच्या शिक्षणाची विशेष काळजी घेतली होती. शाळेच्या अभ्यासात त्याला काही कमी पडू दिले नाही. प्रत्येक सवलतीचा आणि संधीचा त्याने सदुपयोग करावा अशीच त्यांची मनीषा होती. त्याने शूद्रांच्या विमोचनासाठी चाललेल्या झगड्यात एक खंदा वीर म्हणून चमकावे अशी त्यांची अपेक्षा होती. ते स्वतः कडक

शिस्तीचे भोक्ते असले तरी स्वभावाने अत्यंत कनवाळू होते. जोतीरावांच्या आशा-आकांक्षा पूर्ण करणे हे कठीण कर्म आहे असे त्या मुलाला कळून चुकले असेल. जोतीराव हे जन्मजात शिक्षक असल्यामुळे यशवंताने त्यांच्याकडून बरेच ज्ञान संपादन केले असावे.

. २ .

जोतीरावांना सर्व लोक 'तात्यासाहेब' ह्या नावाने संबोधीत असत. त्यांची देहयष्टी सुदृढ, गंभीर आणि आकर्षक होती. गैर वर्तणूक करणाऱ्या लोकांना त्यांचा वचक वाटत असे. रस्त्यात त्यांचा छळ करण्यासाठी त्यांचे वैरी केव्हा केव्हा गुंडांना हाती धरत असत. हे भाडोत्री गुंड सभांच्या वेळी जिवंत किंवा मेलेले विषारी जिवाणू ज्यांत लपवून ठेवलेले असे, असे हार त्यांना घालीत असत. ब्राह्मणांपेक्षा वरचढ वाटणाऱ्या प्रभावी उपदेशकाचे कार्य ते करीत असल्यामुळे असे दुष्ट प्रवृत्तीचे अज्ञानी लोक त्यांना अटीतटीच्या वादविवादात गुंतविण्यासाठी प्रक्षोभक प्रश्न विचारीत असत.

तथापि जोतीरावांचे मन विशाल आणि क्षमाशील होते. अशा प्रक्षोभक प्रश्नांची उत्तरे ते शांतपणे देत. प्रश्न विचारणाऱ्या लफंग्यांना आणि लुच्चयांना ते क्षमा करीत असत. आपल्या अनुयायांनी चिडून जाऊन त्यांच्यावर हात उगारू नये अशी खबरदारी घेत. ज्यांत विषारी जिवाणू लपवून ठेवली आहेत असे हार त्यांच्या गळ्यात घालणाऱ्या लोकांना पर्यायाने वाटावे की, विषारी जनावरेसुद्धा त्यांच्या समोर येताच निरुपद्रवी होऊन जातात.

एके दिवशी अस्पृश्यांच्या वस्तीकडे जोतीराव जात असता त्यांना एक घाणेरडा, शेंबडा मुलगा ओक्साबोक्शी रडत असताना दिसला. त्या मुलाचे आईबाप कामावर गेले होते. जोतीरावांनी त्या मुलाला उचलून घेतले. त्याचे तोंड पुसले, त्याला कुरवाळले आणि त्याला काही खाऊ विकत घेऊन दिला. जोतीरावांना ओळखणाऱ्या एका गृहस्थाने ही गोष्ट पाहिली. 'इतक्या घाणेरड्या शेंबड्या मुलाला तुम्ही कसे कुरवाळिता याचा मला अचंबा वाटतो,' असे तो जोतीरावांना म्हणाला. त्यावर जोतीराव म्हणाले, 'ह्या मुलाच्या आईबापांच्या दारिद्र्यामुळे हा अशा स्थितीत आहे. तुमच्यासारखे लोक त्यांना पाणी, साबण, कपडे पुरवीत नाहीत म्हणून ही मुले अशी घाणेरडी असतात. हा त्यांचा दोष नव्हे; ही समाजाची जबाबदारी आहे. ह्या मुलाचा देहच काय तो धुवावा लागेल. परंतु तुमचे तर मन धुतले पाहिजे!' जोतीरावांचा तो टोला वर्मी बसताच तो परिचित मनुष्य आपल्या मार्गाला लागला.

एके दिवशी जोतीराव आपल्या दुकानावरून घरी परत येत होते. भर दुपारची वेळ. पाहतात तो त्यांच्या घराजवळ एक भिकारी ओणवा राहून धान्याचे कण गोळा करीत होता. ज्या जीर्ण कपड्यात त्याने ते धान्य बांधले होते, तो कपडा फाटून त्याचे सर्व धान्य इतस्ततः पसरले होते. तो भिकारी म्हणाला, 'ह्या घरातील दयाळू माऊलीने

मला भीक घातली. परंतु माझ्या दुर्दैवाने माझा फडका फाटला आणि सर्व धान्य खाली पडले.' तो फाटका तुकडा त्याला टाकावयास सांगून जोतीरावांनी आपले खांद्यावरील उपरणेच त्याला देऊन टाकले. तो भिकारी सद्‌गदित होऊन उद्‌गारला, 'त्या देवतेने मला भरपूर भीक घातली आणि ती बांधायला तुम्ही चांगले कापड दिले. तुम्ही दोघेही देवासारखी माणसे आहात.' भिकाऱ्याने ज्या बाईचा देवता म्हणून उल्लेख केला ती बाई म्हणजे जोतीरावांची पत्नी सावित्रीबाई.

जोतीराव एकदा काही कामानिमित्त आळंदीला जात होते. महाराष्ट्राच्या मायबोलीतून जनतेस अध्यात्म आणि धर्म समजावून सांगणाऱ्या ज्ञानेश्वरांच्या समाधीचे आकर्षण काही आगळेच वाटते. म्हणून प्रतिवर्षी हजारो लोक ज्ञानेश्वरांच्या समाधीच्या दर्शनास जातात. जोतीराव मूर्तिपूजक नव्हते. तरी ते आळंदीच्या यात्रेच्या वेळी आळंदीला जात होते. जोतीराव आणि त्यांचे सहकारी ह्यांना रस्त्यावर यात्रेकरूंचा एक घोळका भेटला. त्या घोळक्यातील एका मनुष्याने जोतीरावांना ओळखिले. 'ज्ञानेश्वराचे तुम्ही भक्त नसताना तुम्ही आळंदीला का जात आहात?' असे त्याने जोतीरावांना विचारले. जोतीराव उत्तरले, 'ईश्वर सर्व ठिकाणी आहे याविषयी गरीब लोकांची खात्री पटवून देण्यासाठी आम्ही आळंदीला जात आहोत!'

त्यांचे असे बोलणे चालले असतांना, पुढे थोड्या अंतरावर घेरी येऊन पडत असलेला एक म्हातारा त्यांनी पाहिला. यात्रेकरूंच्या त्या घोळक्यातील एक म्हातारा घेरी येऊन पडणाऱ्या त्या म्हाताऱ्याला उद्देशून उद्‌गारला, 'ह्या वयात तू यात्रा कशाला करतो आहेस? तू आता स्वर्गातच जाशील.' जोतीराव आणि त्यांचे सहकारी रस्त्यात पडलेल्या त्या म्हाताऱ्याजवळ धावत गेले. जोतीरावांनी त्या माणसाचे मस्तक आपल्या मांडीवर घेतले आणि आपल्या लोकांना पाणी आणावयास पाठविले. जोतीरावांनी त्या म्हाताऱ्याच्या डोक्यावर पाणी शिंपडले आणि तो म्हातारा शुद्धीवर आला. तो पाणी प्याला आणि जोतीरावांनी दिलेली भाकरीही त्याने खाल्ली. तो ताजातवाना झाला व कृतज्ञतेने जोतीरावांचे गुणगान करू लागला. 'तुझ्यासाठी मी विशेष काही केले नाही. आपल्यासांगाती चालत असलेला प्रवासीबंधू म्हणून एका म्हाताऱ्याच्या बाबतीत मी माझे कर्तव्य केले. मी तुझ्यासारखाच आता म्हातारा होणार आहे. तुझ्याप्रमाणे माझीही कोणाला तरी काळजी घ्यावी लागेल, शुश्रूषा करावी लागेल. परोपकार करण्यात मनुष्याचा काही तोटा होत नाही,' असे जोतीराव उत्तरले.

गोवंड्यांच्या कुटुंबाशी जोतीरावांचा अतिशय घरोब्याचा संबंध होता. गोवंड्यांची पत्नी सरस्वतीबाई ही फुल्यांची पत्नी सावित्रीबाई यांची जिवाभावाची मैत्रीण होती. ह्या दोन्ही मैत्रिणी मिळून अनेक वेळा समारंभाला जात असत. गप्पांत रंगत असत. एकमेकांच्या घरी बराच वेळ थांबत असत. एके दिवशी सरस्वतीबाईंना घेऊन सावित्रीबाई एका लग्नसमारंभास गेल्या होत्या. त्यांना घरी यावयाला बरीच रात्र झाली. सावित्रीबाईंना पोचविण्यासाठी त्यांच्या सोबत सरस्वतीबाई आल्या. जोतीरावांनी सरस्वतीबाईंना पाहिले

नाही. सावित्रीबाई घरी फार उशिरा आल्याबद्दल ते रागावले. परंतु सरस्वतीबाईंचा आवाज ऐकल्याबरोबर त्यांनी आपली भाषा बदलली आणि जणू काहीच घडले नाही अशा रीतीने पुढे बोलू लागले. सदाशिराव गोवंडे आणि त्यांच्या पत्नी यांच्याविषयी जोतीरावांना फारच मोठा आदर वाटत असे.[२]

जोतीरावांचे सहकारी नारायणराव लोखंडे आणि कृष्णराव भालेकर हे त्यांचे निष्ठावंत सहकारी असले तरी परस्परांतील मतभेदांमुळे त्यांचे त्यांच्याशी मधून मधून खटके उडत. लोखंडे आणि भालेकर हे मोठे कर्तृत्ववान नेते होते. प्रभावी वक्ते होते. कनिष्ठ वर्गांना जोतीराव शूद्र आणि अतिशूद्र म्हणत. लोखंडे आणि भालेकर त्यांचे वर्णन कनिष्ठ हिंदू म्हणून करीत. ते दोघेजण जोतीरावांच्यापेक्षा अधिक जुळते मिळते घेणारे आणि लवचिक होते.

मुंबईतील सत्यशोधक समाजाच्या अनुयायांनी पुण्यातील सत्यशोधक समाजाच्या उपयोगाकरिता जेव्हा १८७० साली एका मुद्रणालयाची सामग्री पाठविली होती, तेव्हा जोतीरावांनी छापखाना आपण स्वतः चालविला नाहीच, पण तो भालेकरांनाही चालवावयास दिला नाही. भालेकर हे निर्भय, उत्साही व महत्त्वाकांक्षी होते. जोतीरावांच्या या करड्या वागणुकीमुळे त्यांचे मन दुखावले गेले असावे. लोखंडे हेसुद्धा बुद्धिमान, उत्साही आणि स्वतंत्र वृत्तीचे होते. ते कुशल संघटक होते. या तरुण पुढाऱ्यांना मतभेदामुळे स्वतंत्र रीतीने चळवळ करण्यास जोतीराव फारसा वाव देत नसावे असे दिसते.

सत्यशोधक समाज ही एक चळवळ होती. तो काही राजकीय पक्ष नव्हता. मूठभर लोकांच्या फायद्यासाठी जेव्हा असंख्य लोक वेडेपणा करतात तेव्हा त्यांच्या समुदायाला राजकीय परिभाषेत थट्टेने राजकीय पक्ष असे म्हणतात. टिळकांचा उदय भारताच्या राजकीय क्षितिजावर होण्यापूर्वी भारतात राजकीय पक्ष असा नव्हता. स्वार्थत्याग आणि त्यागबुद्धी या गुणांचे बीजारोपण राजकीय कार्यकर्त्यांच्या हृदयांत टिळकांनी केले. भारतातील राजकीय चळवळ आरंभी ह्या गुणांवरच अधिष्ठित होती. जोतीरावांच्या काळी संघटित पक्षाची कल्पना नव्हती. राष्ट्रीयसभा हीसुद्धा एक त्या काळी चळवळ होती. तिचे नेते सुट्टीच्या दिवसात वर्षातून एकदा एकत्र जमत, व्याख्याने देत आणि घरी परतत.

जोतीरावांचे काही सहकारी ब्राह्मण वर्गाचा धिक्कार करण्यात जोतीरावांच्याही पुढे चार पावले गेले. जोतीरावांनी भटशाहीविरुद्ध बंड पुकारले होते. जोतीरावांचे सहकारी 'दीनबंधू'मध्ये ब्राह्मण जातीवर निर्घृण असे हल्ले करीत असत. त्यांच्यावर व्याख्यानांतून टीकेची आग ओतीत असत. त्यांच्या ह्या बेताल प्रचारामुळे, सत्यशोधक समाजाविषयी सहानुभूती बाळगणाऱ्या राजारामशास्त्र्यांसारख्या समाजसुधारकांच्या मनात भीतीची

२. गोवंडे, डॉ. वि. भा., त्रिमूर्तिदर्शन, पृ. १४२.

धडक वसे. राजारामशास्त्र्यांनी त्यांचा तो बेताल प्रचार थांबविण्याविषयी त्यांना इशारा दिला. राजारामशास्त्री हे थोर इतिहास संशोधक होते. निर्भय समाजसुधारक होते. आणि विख्यात भाषाशास्त्रज्ञ होते. ब्राह्मणजातीवर जे निर्दयपणे हल्ला करीत, त्यांना त्यांनी तसे न करण्याविषयी लेख लिहून इशारा दिला. 'जे ब्राह्मण तुम्हांस कुळंबट किंवा क्षुद्र म्हणतील व तुमच्या वित्तादिकांचा अभिलाष करतील, त्यांच्याबरोबर तुम्ही वाद खुशाल चालवावा; परंतु सर्व ब्राह्मण जातीचा धिक्कार करणे आणि जातीजातींमध्ये फूट पाडणे हे योग्य नाही,' असे[3] त्यांचे मत होते. राजारामशास्त्री खरे समाजसुधारक होते. ब्राह्मणेतर चळवळ महाराष्ट्रात पसरविण्यासाठी त्यांनी पुढे प्रयत्न केले.

ब्राह्मणांनी चालविलेली मासिके आणि साप्ताहिके ह्यांनी 'दीनबंधु' आणि सत्यशोधक ह्यांच्यावरही त्याहीपेक्षा अधिक कवडटपणे हल्ला केला. ह्या साप्ताहिकांपैकी 'वार्ताहर' नावाचे एक साप्ताहिक पुण्यात होते. आपल्या १२ जून १८८७ च्या अग्रलेखात 'वार्ताहर' म्हणतो : "ब्राह्मणांची निंदा करण्याकरता 'दीनबंधू'चा अवतार आहे. म्हणून त्या अवताराचा अंमल मोडण्यासाठी 'वार्ताहरा'चा अवतार आहे."[४]

## . ३ .

सन १८८८ हे जोतीरावांच्या जीवनातील एक महत्त्वाचे वर्ष ठरले. त्या वर्षाच्या मध्यापर्यंत जोतीरावांची प्रकृती ठीक होती. गेली चाळीस वर्षे त्यांनी अनेक गावी व्याख्याने दिली होती. महत्त्वाच्या अशा काही संस्था चालविल्या होत्या. कनिष्ठ वर्गांच्या उद्धाराचे अविरत आणि अखंड कार्य केले होते. त्यांच्या प्रकृतीवर आणि शक्तीवर फारच ताण पडला होता. त्यांचे सर्व जीवन संकटांनी, हालअपेष्टांनी आणि झगड्यांनी भरले होते. तरीसुद्धा आयुष्याच्या सायंकाळी ते आपले काम उत्साहाने, अविरतपणे करीत होते.

हरि रावजी चिपळूणकर ह्यांनी २ मार्च १८८८ रोजी ड्यूक आणि डचेस ऑफ कॅनॉट ह्यांना पुण्यात मेजवानी दिली. रा. ब. हरि रावजी चिपळूणकर ह्यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण येथे १८४१ साली झाला. त्यांच्या लहानपणीच त्यांचे आईबाप निवर्तले. ह्या पोरक्या मुलाचे शिक्षण ठाणे व पुणे येथे झाले. जोतीरावांच्या सांगण्यावरून भोलागीर मोंगीर बावा नावाच्या पुण्यातील एका धनाढ्य व वजनदार गृहस्थाने ह्या बुद्धिवान आणि महत्त्वाकांक्षी तरुणाला त्याच्या वयाच्या एकोणिसाव्या वर्षी आपल्या ताब्यात घेतले. त्या काळी पुण्यात बाबा गोखले नावाचे एक नामांकित शिक्षक होते. भोलागीर बावांनी हरि रावजीकरता बाबा गोखल्यांची शिकवणी ठेवली. नंतर त्यांचे लग्न आपल्या एकुलत्या एक मुलीशी करून देऊन त्याला आपल्या धंद्यात

३. भागवत, दुर्गा, कै. राजारामशास्त्री भागवत यांचे निवडक लेख, पृ. ७४.

४. —कित्ता—पृ. २२९.

घेतले. 'अनंत हस्ते कमलावराने । देता किती घेशिल दो कराने' ह्या वचनात म्हटल्याप्रमाणे हरि रावजीवर दैवाने संपत्तीचा वर्षाव केला.

भोलागिरींच्या मृत्यूनंतर त्यांचा भरभराटलेला धंदा आणि प्रचंड मालमत्ता याचे धनी हरि रावजी झाले. आपल्या बुद्धिचातुर्याने त्यांनी धंद्यात चांगले यश संपादन केले. पुढे लवकरच पुणे शहराच्या नागरजीवनामध्ये त्यांनी उत्साहाने भाग घेतला. मागासलेल्या जातींच्या शिक्षणाकडे त्यांचे विशेष लक्ष असे. म्हणून हे तरुण, गरिबांचे हितकर्ते जोतीरावांच्या नगरपालिकेतील कार्याला नगरपालिकेचे सभासद म्हणून फार मोठे साहाय्य करीत असत. आपल्या आकर्षक व्यक्तिमत्त्वामुळे हरिरावजींनी अनेक इंग्रज अधिकाऱ्यांची मैत्री संपादिली होती. सेवानिवृत्त होऊन आपल्या मायदेशी परत जाणाऱ्या इंग्रज अधिकाऱ्यांना ते समारंभपूर्वक निरोप देत असत. अठराशे अठ्याऐंशी साली ते पुण्याचे मानसेवी दंडाधिकारी होते.

ड्यूक ऑफ कॅनॉटचे हरि रावजी हे मोठे चाहते होते. त्यांच्याशी त्यांचे स्नेहसंबंध होते. त्यामुळे त्यांच्या सन्मानार्थ त्यांनी एक मोठी मेजवानी दिली. समारंभाचे स्थळ सुशोभित करण्यासाठी त्यांनी पाण्यासारखा पैसा खर्च केला होता. पुण्यामुंबईच्या धनाढ्य लोकांना आणि दुसऱ्या अनेक नामांकित व्यक्तींना त्यांनी त्या समारंभाचे आमंत्रण दिले होते. समारंभाच्या व्यवस्थेकडे बारकाईने लक्ष देण्यात आले होते. कोणी कुठे बसावयाचे, कुठून प्रवेश करावयाचा, व्यासपीठावर कोणी बसायचे ह्या गोष्टी ठरविण्यात आल्या होत्या. प्रवेशपत्रिकाद्वारे प्रवेश देण्याचे ठरविले होते. पोलीस आणि पहारेकरी समारंभाच्या स्थळाकडे जाणाऱ्या रस्त्यावर मोक्याच्या जागी ठेवण्यात आले होते.

आमंत्रित पाहुणे मंडळी त्या नव्या प्रशस्त इमारतीत येऊ लागली. प्रतिष्ठित सज्जन आपापल्या जागी स्थानापन्न झाले. समारंभ सुरू व्हायला काही क्षणाचा अवधी होता. इतक्यात एक खेडवळ दिसणारा मनुष्य एका प्रवेशद्वाराजवळ आला. डोक्यास पागोटे, कंबरेस पंचा, अंगात साधा बंदांचा अंगरखा, डाव्या खांद्यावर घोंगडी, उजव्या हातात काठी, पायात फाटक्या वहाणा, असे ते ध्यान प्रवेशद्वाराजवळील पहारेकऱ्यांना दिसले. त्यांनी त्या खेडुतास प्रवेश देण्यास नाकारले. त्याने त्यांना प्रवेशपत्रिका दाखविली. परंतु त्यांची खात्री पटेना. ते त्याला आत पाठवीनात.

विनंतीवरून प्रकरण हळूहळू वादावर आले. उत्तराला प्रत्युत्तर मिळू लागले. त्या बोलाचालीचा आवाज कानावर पडताच स्वतः हरि रावजी प्रवेशद्वारापाशी धावत गेले. त्यांनी जोतीरावांना पाहिले. त्यांना ते हसतमुखाने आत घेऊन आले. शेतकऱ्यासारख्या दिसणाऱ्या व्यक्तीस स्वतः हरि रावजींनीच व्यासपीठावर बसविले असे पाहताच काही आमंत्रित सज्जनांचे कुतूहल जागे झाले. तो मनुष्य कोण आहे ते कळण्याची त्यांना उत्कंठा लागली. त्यांच्यामध्ये कुजबूज सुरू झाली. शेवटी त्यांना कळले की, ज्यांचे नाव सर्वांना परिचित आहे ते जोतीराव फुले ते हेच !

मोठ्या उत्साहाने मेजवानीस सुरुवात झाली. राजपुत्र नि त्याची पत्नी यांना आरोग्य नि सौख्य इच्छिणारी भाषणे झाली. त्यानंतर जोतीरावांना भाषण करण्यास विनंती करण्यात आली. ते गंभीर मुद्रेने आजूबाजूला पाहत उभे राहिले. ज्यांना जोतीरावांचे कार्य नि स्वभाव यांची ऐकून माहिती होती त्यांना वाटले की जोतीराव आता सर्वांची हजेरी घेणार, निर्भयपणे टोला हाणणार ! मुंबईपुण्यातील ज्या सरकारी अधिकाऱ्यांनी नि व्यक्तींनी त्यांचे भाषण ऐकले नव्हते ते त्यांचे भाषण ऐकण्यास उत्कंठित झाले.

जोतीरावांनी आपले भाषण प्रामुख्याने राजपुत्रास उद्देशून केले. ते म्हणाले, 'समारंभास आलेल्या व्यक्तींच्या मौल्यवान कपड्याकडे नि चकाकणाऱ्या हिऱ्यांकडे पाहून तुम्हांस असा भास होईल की, हिंदुस्थान देश मोठा सुखी नि समाधानी आहे. परंतु वस्तुस्थिती निराळीच आहे. सुवर्णालंकारांनी मढलेले नि सुवासिक वस्त्रे परिधान केलेले श्रीमंत लोक हे या देशातील जनतेचे खरे प्रतीक नाहीत. देशातील बहुसंख्य लोक जे शेतकरी, त्यांचे हे प्रतिनिधी नाहीत.'

'खरा हिंदुस्थान' जोतीराव पुढे म्हणाले, 'खेड्यांत दिसतो. खेड्यांतील लोक निर्धन, भुकेकंगाल, बेघर असतात आणि अनवाणी चालतात. बहुसंख्य ग्रामीण जनतेला आपली लाज लपवायलासुद्धा कपडा मिळत नाही आणि त्यांचा पेहराव वत्सयाने ज्या तऱ्हेचा केला आहे, त्याच तऱ्हेचा पण विटलेला असतो. जर राजपुत्रांना खरा हिंदुस्थान पाहायचा असेल आणि राणीला खरा वृत्तांत निवेदन करावयाचा असेल, तर त्यांनी आजूबाजूच्या काही खेड्यांना भेटी द्याव्यात आणि अज्ञान जनतेचे दारुण दारिद्र्य प्रत्यक्ष पाहावे. त्यांनी महारमांगांच्या काही वस्त्यांनाही भेटी द्याव्यात आणि त्या वस्त्या उकिरड्यापेक्षा वाईट असून मनुष्यवस्तीला अयोग्य आहेत की नाही ह्याविषयी खात्री करून घ्यावी. खरा हिंदुस्थान असा आहे. राजपुत्राने आणि त्यांच्या पत्नीने महाराणी व्हिक्टोरिया हिला असे सांगावे की, गरीब जनता दारिद्र्यामध्ये पिचत असून त्यांना शिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे. हा आमचा त्यांना निरोप द्या.'

राजपुत्र जोतीरावांचे निर्भय नि स्पष्ट भाषण ऐकून चकित झाले. काही शिष्ट जोतीरावांवर नाराज झाले आणि म्हणाले, 'जोतीरावांना बोलण्याची संधीच देता कामा नये होती.' काही थोड्या व्यक्तींनी, शिष्ट श्रोत्यांना जोतीरावांनी चपराक मारल्याबद्दल समाधान व्यक्त केले. स्तिमित झालेल्या लोकांना जोतीरावांची ओळख करून देताना हरि रावजी म्हणाले, 'जोतीराव हे शेतकरी कामकरी लोकांचे एक प्रमुख नेते आहेत.' तथापि जोतीराव क्रांतिकारक राजकारणी पुरुष नाहीत हे पाहून त्यांनी आनंद व्यक्त केला असावा. वासुदेव बळवंतांच्या बंडाची ब्रिटिशांना ताजी आठवण होती.

तसे पाहिले तर जोतीराव हे महात्मा गांधींचे अग्रगामी. जोतीराव शेतकरी आणि कामकरी यांच्यामध्येच जीवन कंठीत, त्यांच्या आर्थिक सुधारणेविषयी अहोरात्र विचार करीत आणि त्यांनी आपल्या मानवी स्वातंत्र्यासाठी झटावे म्हणून त्यांना प्रेरणा देत. जोतीरावांची काठी, साधे कपडे, गरिबांविषयीची तळमळ, सत्यावरील प्रेम ही सर्व

म. गांधींच्या जीवनात आढळून येतात. मात्र सामाजिक दृष्ट्या जोतीराव क्रांतिकारक होते, तर गांधी सनातनी सुधारक होते. आपल्या नेतृत्वाखाली जोतीरावांनी शेतकरी आणि न्हावी यांच्या चळवळीत असहकारितेचे धोरण कृतीत आणून दाखविले होते. दोघेही सत्यशोधक होते. 'सत्यमेव जयते' हे ब्रीदवाक्य जोतीरावांच्या पत्रावर झळकत असे. सत्याइतकेच जोतीराव कठोर होते. सत्याला बट्टा लागेल असे आपल्या अनुयायांनी नि सहकाऱ्यांनी वर्तन करू नये अशी त्यांची शिकवण असे.

जोतीरावांचे सहकारी रामय्या व्यंकय्या आय्यावारू यांनी ख्रिस्तीधर्मावर टीका करणारी एक पुस्तिका लिहिली. हिंदुधर्मावर रे. बाबा पदमनजीसारखे ख्रिस्ती धर्मोपदेशक जसा नवा प्रकाश टाकीत तसा आय्यावारूंनी ख्रिस्तीधर्मावर निर्विकार बुद्धीने प्रकाश टाकून त्यातले दोष दाखविले. त्यावर अभिप्राय देताना 'दीनबंधू'ने म्हटले की, 'सदर पुस्तिका ख्रिश्चनांशी धार्मिक वादविवादाकरिता हिंदूंना उपयुक्त ठरेल.' व्यक्तीशः जोतीराव हिंदुधर्माची ब्राह्मणधर्म म्हणून संभावना करीत आणि त्यावर हल्ला चढवीत. ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी हिंदुधर्मावर जे आरोप केले, त्याचे खंडन करण्यास ते कधीही पुढे सरसावले नाहीत. तथापि जोतीरावांच्या अनुयायांनी ख्रिश्चन धर्मोपदेशकांच्या कोल्हेकुईला त्रासून त्यांना उत्तरे देण्यास सुरुवात केली.

कृष्णराव भालेकरांनी 'दीनमित्रा'त अनेक लेख लिहिले. हे पत्र १८८८ च्या एप्रिलमध्ये त्यांचे भाचे गणपत सखाराम पाटील ह्यांनी सुरू केले होते. 'दीनमित्र' हा अज्ञानी, दीन, दुबळे यांचा मित्र होता. 'बळीबा पाटील आणि १८७७ चा दुष्काळ' नावाची कादंबरी भालेकरांनी लिहिली होती. ती 'दीनमित्रा'च्या एप्रिल १८८८ च्या अंकापासून क्रमशः प्रसिद्ध करण्यात आली होती.

'दीनमित्रा'त कधी कधी जोतीरावांवरही टीका येई. 'धर्मगुरू म्हणविणारांस ताकीद' असे त्यात लेख येत असत. त्यांतील 'ताकीद ४ थी' ही सत्यशोधक समाजाचे धर्मगुरू जोतीराव यांना उद्देशून दिलेली होती. आपल्या ७ जुलै १८८८ च्या अंकात 'दीनमित्र' म्हणतो : "सद्धर्म दाखविणारा तो धर्मगुरू. म्हणून गुरू म्हणविणारांनी नांवाप्रमाणेच करणी करून दाखवावी. नाहीपेक्षा धर्मगुरूंच्या कळपापासून निराळे होऊन शिष्यवर्गात राहावे. हल्ली सत्यशोधक म्हणून एक नवीन पंथ होऊ लागला आहे. परंतु या नूतन पंथाची गती इतर पंथांच्याच धर्तीवर जाऊ पाहात आहे. हिंदू धर्मगुरूंचे हरएक विधी त्या सत्यसमाजियनांनी स्वीकारले आहेत! हिंदू धर्मगुरूंस सस्पेंड करून त्यांच्या जागी सत्यसमाजियनांतील कित्येकांची स्थापना होत आहे. सुधारणा केली म्हणतात, ती हीच! म्हणून सत्यशोधक समाजाच्या पुढाऱ्यांस ताकीद देणे वाजवी आहे. व त्यांनाही इकडे लक्ष देऊन वेळीच सावध व्हावे, अशी त्यांस अत्यादरे आग्रहपूर्वक प्रार्थना आहे."

"सत्यशोधक समाजान्वये" 'दीनमित्र' पुढे म्हणतो, "किंवा मार्फत अथवा तर्फे अमुक ठिकाणी अमुक अमुक विधी झाले, असे मजकूर अलिकडे फार प्रसिद्ध होऊ लागले आहेत. व तसे मजकूर प्रसिद्ध करण्याविषयी कित्येकांनी सूचना केल्यावरून

आम्हांसही एक दोन वेळा प्रसिद्ध करावे लागले. म्हणून आम्ही दोनच विधी पाहिले, असे नाही; पुष्कळ पाहिले आहेत. व बहुत ऐकिले आहेत. परंतु सर्व ठिकाणी एक पद्धती कशी ती नाहीच. असणार कोठून? सर्वानुमते नियमच झाले नाहीत, म्हणून कसा गोंधळ झाला आहे तो पाहा :

"कोणी म्हणतो, गंध अडवा लावावा; कोणी म्हणतो, उभाच ठीक आहे; कोणी म्हणतो, गंधच लाऊ नये! त्यात काय आहे? कोणी म्हणतात, आपस्त्याच्या झाडाची पूजा आम्ही स्वतः करतो! कोणी म्हणतात, पूजा केली न केली, झाडास काय समजणार? तुळशीची लग्ने आम्ही आमची अष्टके म्हणून लावतो. कोणी म्हणतात, अष्टकांच्या सुरात कोणतेही श्लोक म्हणून कार्य तर साधून घ्या! कोणी म्हणतात, तुमची नवी अथवा जुनी किंवा तुम्ही जे काही बडबडता ते वनस्पतीस कसचे कळते. कोणी म्हणतात, आपणा सर्वांस जानवी घालण्याचा अधिकार आहे! कोणी म्हणतात गळदोऱ्यापेक्षा कडदोरा काय वाईट? कोणी म्हणतात, सत्यशोधक समाजामार्फत आपली लग्ने वेदोक्त होतात! तीच खरी! कोणी म्हणतात, पुराणोक्तही होतात! तीही बरी. फार सुलभ. कोणी म्हणतात, पुराणोक्त व वेदोक्त हे तर भट्टांचे उष्टे! छेः ते काय करायचे? आपणांतील कोणीही केलेल्या नवीन अष्टकांनी लग्ने उरकून घेत जाऊ. कोणी म्हणतात, अष्टके नि फष्टके, लज्जाहोम नि बिज्जाहोम करायचा काय? रिकामा पोरखेळ. वधूवर अज्ञात असोत! अगर पाळण्यात निजोत! वधूने वराच्या गळ्यात माळ घातली की उलगडले!"

"कोणी म्हणतात, माळेतच विशेष काय आहे? टाळी वाजविली की, झाले लग्न! खाशी युक्ती. कोणी म्हणतात, टाळ्या वाजविणे चांगले नव्हे. वधूवरांनी परस्परांच्या हातात अंगठ्या घातल्या असता पुष्कळ दिवस पुरावा राहणार आहे! कोणी म्हणतात, आम्ही स्वतः सत्यनारायणाची पूजा करतो! व पोथी वाचितो! कोणी म्हणतात, दशक्रियेचे ताटवाटी, जोडा, काठी, छत्री वगैरे सामान घेऊ नये. कोणी म्हणतात, आम्ही तर बुवा खुशाल घेतो! पण समाजफंडात जमा करतो. कोणी म्हणतात, विधी करते वेळी—

**महाबळी निर्माणकर्त्रे नमः ॥**
**महाजोतीबा निर्माणकर्त्रे नमः ॥**
**काळबहिरी निर्माणकर्त्रे नमः ॥**
**महासुभा निर्माणकर्त्रे नमः ॥**

इत्यादी म्हणून मूर्ती वगैऱ्यांची पूजा आम्ही निःशंक करतो! कोणी म्हणतात, या समाजात परधर्मी लोक सामील झाले तर त्यांनाही "येशू निर्माणकर्त्रेनमः ॥ नोहा निर्माणकर्त्रे नमः ॥ महमद निर्माणकर्त्रे नमः ॥ गौतम निर्माणकर्त्रे नमः ॥ विष्णु निर्माणकर्त्रे नमः ॥ असे म्हणावे लागेल किंवा कसे?

वगैरे गोंधळाचा पुढारी मिरविणारे व त्याचा सूर ओढणारे त्यांनी अद्याप विचार केला नाही! हे नवल आहे. तर असे न करता येथून पुढे तरी याचा बंदोबस्त करावा. आम्ही त्यांनाही वरगुती सूचना करीत आहोत. तरी 'सोनारांनी कान टोचल्यास रड्र येत नाही, व घरी टोचल्यास येते.' अशा स्वभावास आमचाही नाइलाज आहे."

"हा विषय हाती घेण्याचे कारण कोणाचा कोणाशी मेळ नसल्यामुळे लोक याबद्दल फार कुरकुरत आहेत. व त्यांची ती कुरकूर थट्टेवारी नेण्याजोगी आहे, असे कोण म्हणेल? फार कशाला, सारच पुरे आहे. थोड्यात उमजावे. धर्मासारख्या महत्त्वाच्या गोष्टीत धरबंद नसणे लोकांच्या नाशास कारण आहे. सबब सत्यशोधक समाजातील सुज्ञ मंडळींनी एक वेळ मुंबईस अथवा ओतुरास अथवा जुन्नरास किंवा पुण्यास अगर कोठे तरी एकत्र जमून सर्वांस सर्व ठिकाणी सर्व काळी लागू होतील, असे सत्य नियम करून तेच सुरू करविण्याची खटपट करावी."

"आज हे लिहिण्याचे कारण इतकेच की, असा गोंधळाचा विचार केला नाही, तर हा बहुरूपी गुण व अप्रयोजकपणा कोणाकडे? आम्हांस पुढारी मात्र म्हणा, आमची स्तुती गा, आम्हांस मदत करा आणि आमच्या नावाने जिकडे तिकडे डोळे झाकून भटका! खाशी वेगडी कीर्ती मिळविण्याची युक्ती, असे जर कोणी म्हटले, तर त्यांची समजूत आम्ही कशी घालावी! म्हणून पुढारी म्हणविणाऱ्यांनी व त्यांच्या साह्यकारी गृहस्थांनी वरचेवर एके ठिकाणी जमून त्या हालचालीविषयी विचार करून धरबंद लावावा. नाही तर कोण लावील? 'खानेकू मै और लढनेकू मेरा चिच्चा' किंवा प्रसंगी काही तरी सबब काढून घरी बसणे चांगले नाही. कोणी मदत करू लागल्यास तेही पाहावत नाही!! मत्सरी व दांभिकपणा मोडण्यासाठी सारी खटपट! येथेच १९ वे शतक का नाही?"

ऑगस्ट १८८८ च्या अंकात ही लेखमाला पूर्ण करण्यात येऊन त्यात जोतीरावांना उद्देशून म्हटले आहे की, "कालमानाने सर्वच बदलते. काळाला अनुसरून लोकांचे आचारविचार बदलतात." ही लेखमाला कृष्णराव भालेकरांनी लिहिली असावी.

'दीनमित्र' कर्त्याने आपल्या टीकाकारांना जो इशारा दिला आहे तो लक्षात ठेवण्या-सारखा आहे. तो म्हणतो, "जातिमत्सराचे बीज जोपर्यंत खणून काढले जाणार नाही तोपर्यंत कनिष्ठ वर्गांची सुधारणा होणार नाही. व उंच वर्णांचा अभिमान बाळगिणारांचे सुधारणा करण्याकडे लक्ष लागणार नाही. एकंदरीत देशातील लोकसमूह जेथल्या तेथे शिथिल होणार. जातिमत्सर जोपर्यंत नष्ट होणार नाही, तोपर्यंत आमची दुःखे टळणार नाहीत."[५]

आजचे सुधारक उद्याचे सनातनी ठरतात, परंपरावादी ठरतात. आपल्या अनुयायांच्या कृत्याकडे, रीतीरिवाजांकडे, आचारविचारांकडे जोतीरावांनी उत्साहाने लक्ष पुरवावे अशी मागणी त्यांचे जागरूक असणारे सहकारी करू लागले. सन १८८८ च्या मे महिन्यात

५. दीनमित्र, सप्टेंबर १८८८.

पुणे येथील फुलमाळी समाजाच्या पंचांची निवड झाली. फुलमाळी समाजाची संख्या सुमारे पाच सहस्र असावी. त्यांपैकी पंधराशे लोकांनी मतदानात भाग घेतला. ह्या ज्ञातिसंस्थेच्या कार्यात जोतीरावांनी भाग घेतला नाही. ज्ञातिसंस्थेत त्यांना रस वाटत नसे. महारमांग हे माझ्या रक्तामांसाचे आहेत असा संदेश देणारा सागरोपम विशाल हृदयाचा महात्मा ज्ञातीच्या त्या संकुचित कूपात डुंबत राहणे अशक्य होते. मात्र ह्या वरील बोचक लेखाचा परिणाम जोतीरावांवर झालाच. त्यांनी आपल्या सत्यशोधक पंथातील लोकांच्या उपयोगासाठी नि त्याप्रमाणे आचरण ठेवावे म्हणून नीतिधर्माचे नियम करण्याचे ठरविले.

.४.

जोतीरावांचे ज्ञातिबंधू पंचांच्या निवडणुकीत गुंग झाले होते, त्या वेळी जोतीराव मुंबईस ओतूरच्या अभियोगाचे काम पाहत होते. त्यात यश मिळावे म्हणून बाळाजी कुसाजी पाटील यांच्याबरोबर ते मुंबईस धडपडत होते. त्या प्रकरणी त्यांनी बऱ्याच वकिलांशी आणि बॅरिस्टरांशी विचारविनिमय केला. शेवटी घनःश्याम नीळकंठ नाडकर्णी यांना तो अभियोग मुंबई येथील सर्वोच्च न्यायालयात चालविण्याच्या कामी वकीलपत्र दिले. ह्या व्यवस्थेच्या कामी त्यांना अती कष्ट करावे लागले. त्यात त्यांचा खूप वेळ गेला. बरीच शक्ती खर्ची पडली. ते अतिशय थकले. ब्राह्मण पुरोहितांनी महादेव चिमणाजी आपटे ह्या प्रसिद्ध व प्रवीण विधिज्ञास आपल्या वतीने वकीलपत्र दिले होते. तो अभियोग १८८८ च्या अखेरीअखेरीस न्यायालयापुढे आला.

अशा वेळी जोतीरावांच्या अनुयायांनी, त्यांनी अनेक वर्षे कनिष्ठ वर्गाच्या उन्नतीसाठी जो अविरत झगडा चालविला होता त्याविषयी कृतज्ञता दाखवून त्यांचा सन्मान करण्याचे ठरविले. जोतीरावांना नुकतीच ६० वर्षे पूर्ण झाली होती. जोतीराव हे मानवांतील संतपुरुष होते आणि संतांतील वीर पुरुष होते. कनिष्ठ आणि दलित वर्गांच्या उद्धारासाठी अविरतपणे जागणारा आणि झटणारा जोतीराव हा महाराष्ट्रातील पहिला जननेता होय. ह्या भव्य ध्येयपूर्तीसाठी त्यांनी जो लढा केला, जी सेवा केली आणि जो त्याग केला त्याला महाराष्ट्रात तोड नव्हती.

जोतीरावांच्या चळवळीतील कार्यकर्त्यांनी, नेत्यांनी आणि चाहत्यांनी त्यांचा आता जाहीर सत्कार करण्याचे ठरविले. गावोगावच्या कार्यकर्त्यांना आमंत्रण देण्यात आले. आपल्या अलौकिक नेत्याच्या सत्काराचा दिवस त्यांनी ११ मे १८८८ हा ठरविला. मुंबईतील काही प्रतिष्ठित व्यक्तींनाही आमंत्रण देण्यात आले. सयाजीराव महाराज यांनाही आमंत्रण देण्यात आले होते. जोतीरावांना हिंदुस्थानचे 'बुकर टी वॉशिंग्टन' अशी पदवी द्यावी असा निरोप दामोदर सावळाराम यंदे यांच्याकरवी सयाजीरावांनी पाठविला होता.

मांडवी येथील कोळीवाडा सभागृहामध्ये ११ मे १८८८ रोजी दुपारी एकच गर्दी

लोटली. आपल्या उद्धारकर्त्यांचे कृतज्ञतेने ऋण फेडण्यासाठी सामान्य जनता त्या ठिकाणी मोठ्या स्फूर्तीने जमून तो भव्य समारंभ घडवून आणीत होती. सभागृह सुशोभित करण्यात आले होते. गरीब जनतेचे नेते लोखंडे आणि लाड उपस्थित होते. जोतीरावांच्या चळवळीतील ते आवाडीचे नेते होते. सभागृहात एकच गर्दी उसळल्यामुळे त्याच्या भोवतालची उघडी जागासुद्धा भरून गेली होती. डोक्याला विटके मळकट फेटे बांधलेले, तेलकट टोप्या घातलेले, अंगावर फाटके सदरे असलेले असे ते लोक आपल्या डोळ्यांतून अभिमान, प्रेम, कृतज्ञता आणि भक्ती ह्यांनी तुडुंब भरलेल्या भावनांचा वर्षाव जोतीरावांवर करीत राहिले होते. आधुनिक भारतातील नेत्याला दलित भुकेकंगाल जनतेने गौरवाच्या शिखरावर चढविले, असे हे अपूर्व दृश्य होते. आपल्या नेत्याने चालविलेल्या अखंड झगड्यामुळे आपल्याला भावी काळात काहीसे बरे दिवस पाहवयाला मिळतील अशी आशा बाळगणारा तो गरीब जनतेचा विराट समुदाय भक्तिभावाने रोमांचित झाला होता. त्या काळी धनाढ्य आणि उदार व्यक्तींचा सन्मान झालेला असेल, राजकीय गुलामगिरीत पिचणाऱ्या देशांतील राजकीय नेत्यांचा आणि वीरांचा त्यांनी केलेल्या त्यागाबद्दल व भोगलेल्या कष्टांबद्दल गौरव झाला असेल, परंतु आधुनिक हिंदुस्थानातील थोर पुरुषाचा अशा रीतीने आणि अशा भावनेने पूर्वी कधीच गौरव झाला नव्हता.

सर्व नेत्यांनी भावनोत्कट आणि स्फूर्तिदायक भाषणे करून जोतीरावांनी जो असामान्य त्याग केला, कनिष्ठ आणि दलित समाजाची उदात्तपणे अखंड अशी तीस वर्षांवर दीर्घकाळ सेवा केली, त्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली. गरीब आणि दलित जनतेचा तो लढा जोतीरावांनी एकट्याने चालवून कनिष्ठ वर्गातील अज्ञानाविरुद्ध, वरिष्ठ वर्गातील विशेष अधिकारांविरुद्ध, सनातन्यांनी उराशी बाळगलेल्या सामाजिक रूढींविरुद्ध जो युगप्रवर्तक धैर्याने दलितांच्या उद्धारासाठी झगडा केला तो अपूर्व आणि अलौकिक होता, असे म्हणून त्यांनी आपल्या नेत्यावर प्रेम आणि कृतज्ञता यांचा अभिषेक केला. आणि गगनभेदी टाळ्यांच्या कडकडाटात जोतीरावांना 'महात्मा' ही पदवी अर्पण केली. आपल्या चाहत्यांनी, कार्यकर्त्यांनी आणि दलित जनतेने व्यक्त केलेली अमर्याद प्रेमाची, भक्तीची आणि कृतज्ञतेची भावना पाहून जोतीरावांचे हृदय गहिवरले. उत्तरादाखल केलेल्या भाषणात ते म्हणाले, 'माझ्या कनिष्ठ आणि दलित बंधूंच्या बाबतीत जे माझे कर्तव्य होते ते मी केले, त्यासाठी मी झगडलो, लढलो. माझ्या अनुयायांनी सत्यशोधक समाजाच्या कार्याचा आणि संदेशाचा अदम्य उत्साहाने, नेटाने आणि चिकाटीने खेड्यापाड्यांतून प्रसार करावा.' मुंबईच्या सर्वोच्च न्यायालयात सत्यशोधक समाजाच्या तत्त्वाच्या प्रस्थापनेसाठी अभियोग लढवीत असलेले बाळाजी पाटील ह्यांचाही ह्या सभेत गौरव करण्यात आला. सत्यशोधक समाजाच्या तत्त्वाच्या संरक्षणासाठी त्यांनी जो पवित्रा घेतला होता आणि जे धैर्य दाखविले होते, त्याविषयी त्यांना धन्यवाद देण्यात आले.

जोतीराव हे आता जनतेचे महात्मा ठरले. खरे महात्मा ! ज्याचे मन आणि आत्मा उंचावलेली आहेत असा तो पुरुष ! सामान्य जनतेने ज्याच्या चरणी भक्ती वाहिली असा तो महात्मा ! महात्मा ही पदवी त्यांना सामान्य जनतेनेच स्वयंस्फूर्तीने दिली. असे दुसरे उदाहरण दुर्मिळच.

आधुनिक भारतातील दलित आणि कनिष्ठ वर्गाकडून उच्चतम अशी ही पदवी मिळविलेला पहिला महापुरुष म्हणजे जोतीरावच होत. महात्मा म्हणजे मानव जातीचा विश्वभक्त. जोतीरावांच्या हृदयात वास करीत असलेला महात्मा अखिल मानवावर प्रेम करणारा विश्वभक्त होता. पुढे काही वर्षांनंतर स्वामी श्रद्धानंद आणि शिशिरकुमार घोष यांना महात्मा ही पदवी मिळाली. परंतु गांधीजींची महात्मा ही पदवी त्यांच्या राजकीय नेतृत्वामुळे फारच गाजली. त्यामुळे त्यांना फुल्यानंतरचे दुसरे महात्मा असे मानण्यात येते.

भालेकरांचे जोतीरावांशी असलेले मतभेद वाढत जात होते. भालेकरांचा भाचा संपादन करीत असलेल्या ' दीनमित्रा ' मधून ते व्यक्त केले जात असत. जुलै १८८८ च्या ' दीनमित्रा 'च्या अंकात जोतीराव आणि त्यांचे पुत्र यशवंतराव फुले ह्यांनी ' दीनमित्रा 'च्या संपादकाकडे दहा पैसे पाठविल्याचा उल्लेख आहे. सत्यशोधक समाजाच्या अनुयायांना धार्मिक विधी आणि अंत्यसंस्कार करून जी दक्षिणा मिळाली होती ती सर्व त्यांनी जोतीरावांकडे पाठविली होती. जोतीरावांनी ते पैसे सत्यशोधक समाजाच्या हिशेबात नोंदवून ठेवावे आणि असले पैसे सत्यशोधक समाजाच्या संमतीशिवाय खर्च करू नयेत अशी विनंती करून संपादकाने ते पैसे परत जोतीरावांकडे पाठविले. संस्थेचा दहा पैशांचा हिशेब इतक्या सचोटीने, काटेकोरपणे ठेवणारा जोतीरावांसारखा नेता विरळाच.

जोतीरावांचा दत्तक मुलगा यशवंत हा आता सुमारे सोळा वर्षांचा झाला. तो माध्यमिक शाळेत शिकत असे. सत्यशोधक समाजाच्या कार्याची त्याला गोडी लागावी अशी जोतीरावांची शिकवण असे. त्या काळच्या रिवाजाप्रमाणे यशवंताचे लग्नाचे वय होऊन गेले होते. त्याच्या लग्नाला फारच उशीर झाला होता. आणि तो एका ब्राह्मण विधवेचा मुलगा असल्यामुळे त्याला मुलगी कोण देणार हा एक प्रश्नच होता. जोतीराव आणि सावित्रीबाई ह्यांनी आपला मुलगा म्हणूनच त्याचे संगोपन केले. त्याच्या लग्नाचा विचार ठरताच एक दिवस ग्यानोबा ससाणे ह्या आपल्या सहकाऱ्याकडे जोतीरावांनी प्रश्न काढला. आपली मुलगी यशवंताला देणार काय असा जोतीरावांनी ससाण्यांना प्रश्न केला. आपल्या नेत्याच्या मागणीला त्यांनी रुकार दिला. ससाण्यांचा तो निर्णय त्यांच्या दृष्टीने धाडसाचाच होता. त्यांची मुलगी राधा ही त्या वेळी मराठी शाळेत तिसऱ्या इयत्तेत होती. जोतीरावांनी त्या भावी सुनेस घरी आणली. त्यांनी तिचे शिक्षण आपल्या देखरेखीखाली सुरू केले. आपल्या घरास योग्य असे तिला वळण लावायला त्यांनी सुरुवात केली. जोतीरावांची पत्नी त्यांच्या शेवटच्या दिवसापर्यंत स्वतःच घरातील कामकाज करीत असे आणि राधेला आपला अभ्यास करावयास सवड देत असे.

जुलै १८८८ मध्ये जोतीरावांना अर्धांगवायूचा झटका आला. त्यांच्या शरीराचा उजवा भाग विकल झाला. डॉ. विश्राम रामजी घोले यांनी आपल्या नेत्यास औषधोपचार केले. सयाजीराव महाराज आणि नागेश्वरगीर कल्याणगीर बुवा ह्यांनी त्यांना तावडतोब आर्थिक साह्य केले. आणि त्यांची चिंता दूर केली. ह्या साह्याविषयी जोतीरावांनी एका अखंडामध्ये त्या सर्वांना मुक्त कंठाने धन्यवाद दिले आहेत. डॉ. घोल्यांनी आपल्या नेत्याच्या बाबतीत आपले कर्तव्य केले. त्यांनी औषधोपचाराबाबत एक पैसुद्धा घेतली नाही हे सांगण्याची आवश्यकता नाही. जोतीराव फार अशक्त झाले होते. म्हातारपणी त्यांनी दाढी वाढविलेली नव्हती.

अर्धांगवायूमुळे त्यांच्या जीवनशक्तीच्या प्रवाहाची गती अर्धी मुर्धी शिल्लक राहिली, तरी त्यांच्या प्रबळ इच्छाशक्तीचा पंखा तसाच फिरत राहिला होता. त्यांच्या अनुयायांनी धार्मिक नि सामाजिक बाबतींतले विधी नि चालीरीती सर्वत्र सारख्या असाव्यात म्हणून आग्रह धरला होता. त्यासाठी कोलाहल माजविला होता. त्यांच्या पंथातील भालेकरांसारखे काही कार्यकर्ते त्यांच्यावर त्या बाबतीत उघडपणे टीकाही करीत होते. सर्व ठिकाणी नियम, विधी नि चालीरीती सारख्याच असाव्यात अशी ओरड करीत होते. जोतीरावांचा उजवा हात लुळा पडला असला, तरी मनुष्याने सदाचाराने नि सत्यवर्तनाने कसे जगावे ह्याविषयी एक ग्रंथ लिहिण्यास त्यांनी तेव्हाच्या त्या विकलांग स्थितीतही प्रारंभ केला. कृती करणे हा त्यांच्या जीवनाचा स्थायीभाव होता. ती त्यांच्या जीवनाची गुरुकिल्ली होती. कृती हीच त्यांच्या जीवनाची प्राणशक्ती होती. त्यांनी १८८८ च्या शेवटी शेवटी तो ग्रंथ पूर्ण केला.

सप्टेंबर ते डिसेंबर १८८८ हे चार महिने जोतीराव अंथरुणास खिळले होते. त्या मुदतीत ग्यानोबा ससाणे यांच्याशी त्यांचा जो पत्रव्यवहार झाला, त्यावरून जोतीरावांच्या मनाचे बरेच पैलू स्पष्टपणे दिसून येतात. पहिली नजरेत भरणारी गोष्ट म्हणजे ते आपल्या पत्रावर 'सत्यमेव जयते' असे ब्रीदवाक्य लिहीत असत ही होय. त्या सुभाषितातून प्राचीन काळापासून आलेला संदेश व्यक्त होतो. स्वतंत्र भारताने राष्ट्रीय प्रतीक म्हणून ते सुभाषित स्वीकारले आहे. सत्यशोधक जोतीरावांचा आत्मा 'सत्यमेव जयते' या संदेशाने भारलेला होता. त्यांची उक्ती आणि कृती याच संदेशाने स्फुरलेली होती.

ग्यानोबा हे सत्यमूर्ती आहेत, असे जोतीरावांनी त्यांचे वर्णन केले आहे. त्या भावी वधूला हडपसर येथे वडिलांच्या घरी पाठवावयाची होती. परंतु सावित्रीबाईंच्या कळकळीच्या विनंतीवरून तिला आणखी काही दिवस ठेवून घेतली आहे, असे जोतीरावांनी ग्यानोबांना कळविले. आज्ञा करणाराने प्रथम आज्ञा पाळण्यास शिकले पाहिजे, हा नियम जोतीराव कठोरपणे पाळीत असत. आपली भावी सून बुद्धिवान आहे,

तिची स्मरणशक्ती चांगली आहे हे पाहून जोतीरावांना आनंद झाला. तिने हाकेला ओ देताना 'जी' म्हणावे आणि घरातील शिष्टाचार आवडीने पाळावे असे जोतीरावांना वाटे. परंतु ती लाजाळू मुलगी या बाबतीत त्यांना त्यांच्या मनाप्रमाणे साथ देऊ शकली नाही. डिसेंबर १८८८ मधील शेवटच्या आठवड्यात जोतीरावांना अर्धांगवायूचा दुसरा झटका आला. त्या वेळी त्या मुलीने प्रेमळपणे व कर्तव्यनिष्ठेने जोतीरावांची सेवा केली.

जोतीराव आजारी असताना सत्यशोधक समाजाचा प्रचार 'दीनमित्रा'मधून पाटील आणि भालेकर मोठ्या धडाडीने करीत होते. त्यांचे लेख फार तिखट आणि खोचक असत. 'सोवळ्या वर्तमानपत्रांचे कसब' या लेखात 'दीनमित्र'कार म्हणतात: "आपल्या महाराष्ट्र देशात वर्तमानपत्रांचे पीक वर्षानुवर्षे बरेच चढत्या मानाने येत आहे...ती आम्ही समग्र वाचितो. त्यावरून आमची तर पूर्ण खात्री झाली आहे की, ही वर्तमानपत्रे आम्हा शेतकरी, कारागीर वगैरे अज्ञान लोकांच्या सुधारणेसाठी बिलकूल प्रयत्न करीत नाहीत. त्यांच्या वर्तमानपत्रांत पुढील विषयांपैकी काही विषय असावयाचेच—पुनर्विवाह, स्त्रीशिक्षण, राष्ट्रीय सभा, गोरक्षक सभा, ब्राह्मणांची पायमल्ली, म्युनिसिपल कमेट्या, नोकऱ्यांची महागाई, धर्मसूत्रे शिथिल होत चालली, आमची पूर्वीची सुखे लयास गेली, पेशवाईची आशा, वरिष्ठ प्रतीचे शिक्षण व या अर्थाचे विषय नेहमी वर्तमानपत्रांत असतात. तेव्हा असे हे विषय कोणाच्या सुधारणेकरिता? अज्ञान वर्गाच्या? आम्हांतील कोट्यावधी पुरुषांस श्रीदेखील काढता येत नाही. तो यांच्या स्त्रीशिक्षणाचा दिवटा मध्येच मिरवू लागला. आमच्या कोट्यवधी लोकांच्या दुःखाविषयी विचार करण्याचे सोडून देऊन बोडक्यांची विरहबाधेने त्रेधा होते म्हणून गोंगाट! लाखो रुपये दरसाल लोकलफंड घेत असता मुले ढ राहिली आहेत त्याचा विचार न करिता आम्हांस मोठमोठे हुद्दे द्या म्हणून ओरड. दहा गावांस एकदेखील शाळा नाही अशी तर शिक्षण देण्याची तऱ्हा! तीविषयी विचार करण्याचे सोडून मोठमोठ्या परीक्षांची उपपदे नावापुढे लटकविण्यासाठी कॉलेजे मोडू नका, हायस्कूले बंद करू नका म्हणून गोंगाट. वगैरे शेकडो प्रमाणे देता येतील. याप्रमाणे आज कित्येक वर्षे वर्तमानपत्रे निघत आहेत. त्यांचा आमच्या लोकांस पुड्या बांधण्यापेक्षा जास्त उपयोग नाही."

"शेतकऱ्यांच्या कायद्यापासून सावकार ठार बुडाले' असे लिहिता येते, पण शेतकऱ्यांच्या झोपड्यांचे वासेसुद्धा सावकारांनी ठेवले नाहीत, शेतकऱ्यांच्या बायकांच्या नाकांत कवडीसुद्धा बांधावयास उरली नाही, सावकरांनी अज्ञान शेतकऱ्यांस फाटक्या जोड्यासह व लंगोटीसह गट्ट केले! याचा विचार त्यांच्या मनात कोठून येणार!"[६]

'दीनमित्र'कारांनी दुसऱ्या एका लेखामध्ये 'आकाशवाणी' दिली आहे. त्यातील मथितार्थ उपरोधाने भरलेला आहे. तिची वाणी थेट 'दीनमित्र' पक्षाचे गुरू जोतीराव

---

६. दीनमित्र, नोव्हेंबर १८८८.

फुल्यांसारखी! 'आकाशवाणी' म्हणते: "अहो, तुम्ही मृत्युलोकवासी हिंदू लोकहो, पुढील नोटिशीकडे चांगले लक्ष द्या; तुम्ही स्वर्गलोकी आपल्या मृत वडिलांस पोचविण्यासाठी आजपर्यंत शिधा पाठवीत आहात. त्यामुळे कच्चे धान्य व पीठ खाऊन तुमच्या वडिलांच्या प्रकृती बिघडल्या आहेत. कित्येक अजीर्णाने आजारी आहेत. कित्येकांस अमांशाचा विकार झाला आहे. त्याप्रमाणे कच्चे अन्न खाऊन ते अगदी धरणीवर पडले आहेत. तुमच्या वडिलांची प्रकृती नीट व्हावी अशी जर तुमची मनापासून इच्छा असेल, तर मृत्यू लोकांतील कमिशन एजंटांस औषधोपचार करा, म्हणजे इकडे स्वर्गलोकी तुमच्या वडिलांची प्रकृती नीट होईल. आणि यापुढे डाळ, तांदूळ, गूळ, भोपळ्याची फाक, गव्हाचे पीठ वगैरे अपक्व पदार्थ पाठवीत जाऊ नका. कारण असा शिधा पाठविल्याने तो शिजविण्याची मोठी अडचण पडते; तुम्हांतील कित्येकांच्या वडिलांस मृत्युलोकी स्वयंपाक करण्याची माहिती नसल्यामुळे व स्वयंपाकाचे सामान नसल्यामुळे इकडे फार कठीण पडते. यासाठी यापुढे तुम्ही आपल्या वडिलांस पाठविण्यासाठी जे पदार्थ एजंटाकडे रवाना कराल, ते पदार्थ दळून मळून शिजविलेले असावे. त्यांत तुमच्या वडिलांस आवडणारी मिष्टान्ने व मांस पक्वान्नेही असावी."

"आता तुमची शिधाच पाठविण्याची इच्छा असेल, तर कृपा करून आपल्या वडिलांच्या सोयीसाठी चूल, तवा, पळी, पातेले, लाटणे, फुंकणी, गोवऱ्या व लाकडेही पाठवावी. म्हणजे त्यांस स्वयंपाक करवून घेता येईल."[७]

हिंदुधर्मातील भाबड्या रूढीवर नि तिच्या आधारे होणाऱ्या धर्मकर्मांच्या उत्पन्नावर पोळाप्रमाणे माजलेल्या भिक्षुकशाहीवर हा कडवट नि कठोर हल्ला होता. त्यांचे उद्धारक जोतीराव यांच्या संदेशाशी तो अगदी सुसंगत होता, अनुरूप असाच होता. आस्तिक नि नास्तिक, बुद्धिप्रामाण्यवादी नि धर्मवादी ही भाकड प्रथा टाकून देईनात. कारण ती ब्राह्मणांना आर्थिकदृष्ट्या हानिकारक होती. बुद्धिप्रामाण्यवाद्यांत धैर्याचा अभाव असल्यामुळे म्हणा वा त्यांचीही ब्राह्मण भिक्षुकांना आंतरिक सहानुभूती असल्यामुळे म्हणा, ह्या भाबड्या रूढीविरुद्ध त्यांनी कधीच उठाव केला नाही.

फेब्रुवारी १८८९ च्या पूर्वार्धात यशवंताचा विवाह झाला. वधूचे नाव विवाहापूर्वीच लक्ष्मी असे ठेवले होते. ते कायम झाले. आपल्या मुलाचे लग्न चांगल्या घराण्यातील एका हुशार, उत्साही आणि बुद्धिवान मुलीशी झाले हे पाहून जोतीरावांना समाधान झाले. सत्यशोधक समाजाच्या नियमाप्रमाणे मंगलाष्टके वधूवर नि वऱ्हाडी मंडळी ह्यांनी म्हणून हा विवाह लावण्यात आला होता. वधू व वर यांनी आपण संसारात प्रेमाने, निष्ठेने नि कर्तव्याने वागण्याचे अभिवचन दिले. नवदांपत्याने भारतीय स्त्रियांच्या उद्धारासाठी नि त्यांना त्यांचे अधिकार संपादन करून देण्यासाठी लढू असे आश्वासन दिले. वऱ्हाडी मंडळीने वधूवरांस आशीर्वाद दिला.

---

७. दीनमित्र, नोव्हेंबर १८८८.

. ६ .

जोतीराव अंथरुणास खिळले असता त्याच दिवसात पुणे शहरात १८८९ च्या नोव्हेंबरमध्ये ब्रिटिश राजपुत्राचे आगमन झाले. पुणेकरांनी त्याचे स्वागत करून त्याचा गौरव केला. जोतीरावांच्या सहकाऱ्यांनी त्या स्वागतात मोठ्या उत्साहाने भाग घेतला होता. 'इंडियन स्पेक्टेटर'[८] ह्या साप्ताहिकाने ह्या स्वागतसमारंभाची हकीगत दिली आहे. ते साप्ताहिक म्हणते : "राजपुत्राच्या पुण्यातील वास्तव्यात घडलेला एक प्रसंग मोठा गमतीदार आहे. त्या शहरात मागासलेल्या नि अशिक्षित वर्गांच्या हितासाठी झगडणारी एक संस्था आहे. ती दीनबंधू सार्वजनिक सभा ह्या नावाने लोकांना माहीत आहे. कनिष्ठ वर्गातील मुलांना फुकट शिक्षण देणारी शाळा ही संस्था चालविते. राजपुत्र ज्या मार्गाने जाणार होते त्या मार्गावर एके ठिकाणी ह्या शाळेची सुमारे १५० मुले खालील वाक्ये लिहिलेल्या लाल आलवानाच्या पाट्या हाती धरून उभी होती.

'आपल्या आजीला सांगा आम्ही सुखी राष्ट्र आहोत—
तथापि एकोणीस कोटी शिक्षणाशिवाय आहोत.'

असे सभेचे मुखपत्र 'अंबालहरी' ह्यावरून समजते."

"ही वाक्ये वाचून राजपुत्र ड्यूक ऑफ कॅनॉट व राज्यपाल ह्यांना कळवळा आला. ती सर्व वाक्ये विचारात घेता परिणाम घडवून आणण्याइतक्या त्या गमतीदार होत्या खऱ्या, परंतु त्यामुळे राजपुत्राविषयी सहानुभूती नव्हती असे म्हणता येणार नाही. शेवटच्या ओळीने तर लॉर्ड डफरिनच्या कलकत्त्यातील भाषणाला पुरवणी जोडली आहे. ते म्हणाले होते की, 'हिंदुस्थानात सुशिक्षित लोकांची संख्या दुर्बिणीतून पाहावी लागेल.' उदारमतवादी शिक्षणावर सरकारी खर्च सतत कमी कमी प्रमाणात करावा असे सरकारने ठरविले आहे. अशिक्षित लोकांच्या प्राथमिक शिक्षणावर जो पैसा खर्च झाला असता तो वाचवून सरकार वरील धोरण स्वीकारते. जे ब्रीदवाक्य पुण्याच्या दीनबंधू सभेने राजपुत्राच्या निदर्शनास आणून दिले त्याचा हाच अर्थ आहे. म्हाताऱ्या राणीच्या माहितीसाठी, तशीच हिंदुस्थानातील तिच्या प्रतिनिधींना ती सूचना होती. हिंदुस्थानातील ९५ टक्के जनता निरक्षर आहे हे त्यांच्या लक्षात यावे हाच ते निदर्शन घडवून आणण्यात उद्देश होता."

कृष्णराव भालेकर ही पराक्रमी व्यक्तीच ह्या निदर्शनामागे होती. जोतीरावांच्या शिकवणीचा प्रभाव त्यांच्या सहकाऱ्यांच्या मनावर किती प्रगाढ पडला होता हे यावरून लक्षात येते. त्यांची सर्वांत प्रथम मागणी होती सार्वजनिक प्राथमिक शिक्षणाची. सरकारी तिजोरीत कनिष्ठ समाजाकडून व शेतकरी-मजुरांकडून येणारा कर २३ कोटी लोकांपैकी वरिष्ठ वर्गाच्या लहान संख्येवर खर्च करावा ही सरकारास काळिमा आणणारी गोष्ट आहे अशी

८. The Indian Spectator, 17 November 1889.

सत्यशोधक समाजाची ओरड होती. "शेतकरी वगैरे लोकांस प्राथमिक शिक्षण फुकट व सक्तीने देण्याची आवश्यकता आहे" अशी त्यांची मागणी होती.

जोतीरावांच्या अनुयायांनी आपल्या नेत्याच्या आजारीपणात आणखी एक सूचक असे निदर्शन केले. सत्यशोधक समाजाचे मत राष्ट्रीय सभेस अनुकूल नव्हते. समाजाचे नेते राष्ट्रीय सभेवर टीकाप्रहार करीत. 'राष्ट्रीय सभा म्हणजे राष्ट्राची सुखदुःखे माहीत करून घेऊन ती राजास कळविणारी व प्रजेची स्थिती सुधारणारी जी सभा तीस राष्ट्रीय सभा म्हणतात. राष्ट्रीय सभेविरुद्ध मुसलमान लोक जातात न जातात, तोच पुढारी मंडळीस मोठी भीती पडली, व त्यांनी त्या मुसलमानांची मनधरणी करून त्यांस निदान वरकांती तरी आपणास अनुकूल करून घेतले. या सभेने ज्या मागण्या केल्या आहेत त्या पुढारी मंडळीस विशेष फायदेशीर आहेत यात संशय नाहीच. पण शेतकरी, कामकरी, कारागीर वगैरे अज्ञान वर्गासाठी या सभेने सरकारास काय सांगितले याचे उत्तर पुढारी मंडळीने द्यावे. तेवीस कोटी प्रजा अज्ञानांधकारात खितपत पडली असता, त्यांना विद्या मिळत नसता, त्यांची पशूपेक्षाही दैना होत असता केवळ दोन कोट प्रजेच्या हितार्थ उठाठेव करणारी सभा राष्ट्रीय या नावास शोभेल कशी?'[९] असा त्यांचा सरळ प्रश्न होता. राष्ट्रीय गाडा मराठे, माळी, कुणबी महार, मांग, भिल्ल ओढीत आहेत. त्यात युरोपियन अधिकारी आणि इतर श्रेष्ठ वर्गातील अधिकारी नि कर्मचारी बसले आहेत. वाटेत मोठमोठ्या टेकड्या आल्या व कोठे उतरण लागली तरी आत बसलेली मंडळी खाली उतरत नाहीत. युरोपियन कामगारांशी देशी बडे लोक सरकून बसण्यासाठी भांडत आहेत, त्यांची कुरबुर सुरू आहे. परंतु बिचाऱ्या बैलांना पोटास चारा नाही. पाणी नाही. इतकेच नव्हे तर त्यांच्या डोळ्यांवर अज्ञानाची टोपणे बसलेलीसुद्धा कोणी काढीत नाही! अशी त्यांची राष्ट्रीय गाड्याची कल्पना होती.'[१०] भालेकरांनी असे एक मार्मिक नि मर्मभेदक चित्रही प्रसृत केले होते.

आपल्या मतांची नि गाऱ्हाण्यांची जाणीव राष्ट्रीय सभेस व्हावी म्हणून सत्यशोधक कार्यकर्त्यांनी मुंबई येथे १८८९ च्या डिसेंबरमध्ये राष्ट्रीय सभा भरली असता तेथे गवताचा पेंढा भरलेला शेतकऱ्याचा एक पुतळा उभारून राष्ट्रीयसभेच्या मंडपापुढे लोंबत ठेवला. त्याच्या अंगावर चिंध्या, त्याचे पोट पाठीस लागलेले, गालफडे बसलेली, भुकेमुळे भकास दृष्टीने पाहणारे डोळे असा तो पुतळा शेतकऱ्यांचे दारिद्र्य नि दुःख ह्याची जाणीव राष्ट्रीय म्हणविणाऱ्या नेत्यांना देत होता.

जिचे पितृत्व इंग्रज मुत्सद्यांकडे नि मातृत्व हिंदी नेत्यांकडे होते, अशा राष्ट्रीय सभेचे जोतीराव फुल्यांच्या काळचे सर्व नेते म्हणत, 'आमची उच्च देशभक्ती नि देशहित ह्यांची मागणी अशी आहे की, इंग्रजाचे राज्य येथे चिरकाल टिकावे.' देशाच्या उद्धारासाठी

---

९. दीनमित्र ७ ऑक्टोबर १८८८.

१०. –कित्ता–

ते ब्रिटिश न्यायप्रियतेवर अवलंबून होते. १८८९ सालच्या मुंबई राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष विल्यम वेडरबर्न यांनी सांगितले की, 'जर्मन शेतकरी बँकेच्या धर्तीवर हिंदी शेतकऱ्यांचे कर्जनिवारण करणारी एक योजना ब्रिटिश सरकारकडे विचारासाठी पाठविण्यात आली होती. परंतु भारतमंत्र्याच्या कार्यालयाने तिला नख लावले. हिंदी नेत्यांच्या श्रमास फळे येऊन त्यांच्या विचारामुळे सार्वभौम राणी आणि तिच्या ताब्यातील मुलुख यांना सुरक्षितता, मान नि सुस्थिती लाभो.' याच अधिवेशनात चार्ल्स ब्रॅडलॉ आपल्या सत्काराच्या प्रसंगी म्हणाले, 'राष्ट्रीय सभा ही पहाट आहे, मला उगवत असलेला दिवस दिसत आहे.'


...ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ...
अनुक्रम ........................ दि: ....................
... ........................ नोंद दि ....................

१९

# जोतीरावांची तत्त्वप्रणाली

म. जोतीरावांनी अनेक अभंग केले. आपल्या अभंगाला ते अखंड म्हणत. त्यांमधून ते सदाचार, विवेक, न्यायप्रियता नि सहिष्णुता यांची शिकवण देत असत. सत्यप्रिय मनुष्य कोण? जो निर्मळ आहे, निर्दोषी आहे, शुद्ध विचारांचा असून प्रपंचात सदा सत्याचारी असतो, सूर्याप्रमाणे सत्याचा प्रकाश पाडतो, चंद्राप्रमाणे शीतलता आणि शांती सर्वांना देतो, जो ब्राह्मणाप्रमाणे भूदेव म्हणून मिरवीत नाही, मानवांना पीडित नाही, अशा सज्जनासच सत्यप्रिय मनुष्य म्हणावे. त्याची थोरवी गावी; त्याचे गुण गावे.

ज्याला सत्याचा साक्षात्कार झाला आहे तो दुसऱ्याला नाडणार नाही. असा मनुष्य कायावाचामने स्वतःस ब्राह्मण समजून शूद्रांना श्रेष्ठत्वाचा दिमाख दाखविणार नाही. मातापित्यामुळे कोणी कुलीन होत नाही. ज्याने क्रोधाला विटाळ मानला आहे, जो सत्यधर्म पाळतो तोच खरा मानवांमध्ये बळी. अशा मनुष्याच्या हृदयात सर्वाभूती कोमल दया असते. त्याचा आपल्या इंद्रियांवर ताबा असतो. त्याच्या वासनेस मुळीच डाग नसतो. कमळांच्या पानाला पाण्याचे डाग लागत नाहीत. जो सद्‌गुणी ब्राह्मण असेल त्याला वंदन करावे. ज्या कृष्णाला पारध्याने मारले तो काल्पनिक कृष्ण

ब्राह्मणांनीच निर्मिला. भूत वर्तमान भविष्य काळास जो भीत नाही, जो त्रिकाळसत्याने वागतो, सर्वांना सुख देतो, त्यासच म्हणावा बुद्ध महाजन, तोच मानवी भूषण. कोणीही गर्व करू नये.

देवाने मनुष्यास शरीर आणि बुद्धी ही दिली आहेत. सत्तेचा उपयोग सर्वांच्या हितासाठी करावा. मानवाने मानवतेच्या सेवेसाठी, सत्याच्या सेवेसाठी आयुष्य व्यतीत करावे. अशा वर्तनामुळे निर्मिक खूष होईल आणि आयुष्यात शांतता लाभेल. ज्या मनुष्याचे धैर्य सत्यप्रीतीपासून निर्माण होते, तो स्थिर, कनवाळू, शूर आणि सत्यवचनी असतो. ज्याने आपल्या कामक्रोध विकारांवर ताबा मिळविला आहे, त्याला सद्गुणी मनुष्य म्हणावे. असा मनुष्य मानवांना भूषणभूत ठरतो. दुसऱ्या मनुष्याच्या सुखदुःखांचा तो विचार करतो आणि सर्वांना समभावाने वागवितो, असा मनुष्य खरा सद्गुणी नि थोर असतो. निर्मिक एकच आहे. त्याने सर्वांची व्यवस्था केली आहे. पुरुषांस नि स्त्रियांस त्यांच्या हक्कांची शिकवणूक द्या, म्हणजे ते बंधुभावाच्या नात्याने वागतील. ब्राह्मण शिक्षक मुसलमानांच्याविरुद्ध शिवाजीच्या नावाचा उपयोग करतात. त्यांची देशभक्ती ही शुद्ध लबाडी आहे. स्वदेशबांधवांची पिळवणूक आणि छळ करणे म्हणजे देशभक्ती नव्हे. तो धर्मही नव्हे. भिल्ल आणि कोळी हे आद्य क्षत्रिय होत. त्यांची डोंगरांत हकालपट्टी करण्यात आली. तेथे ते कंदमुळांवर जगतात.

जसे ख्रिस्ती लोक आपला धर्मग्रंथ सार्वजनिक ठिकाणी उघडपणे वाचतात तसे ब्राह्मणांचे धार्मिक ग्रंथ चव्हाट्यावर वाचले पाहिजेत, म्हणजे त्यांतील विषमता, दंभ आणि अन्याय दिसून येतील. गाय घाण खाते आणि ब्राह्मण तिला माता म्हणतात. प्राचीन काळी ब्राह्मण यज्ञात गाई आणि घोडे खात असत. अंत्यज हे ब्राह्मणांचे बंधू; परंतु त्यांना ते छळतात आणि त्यांना आपल्या देवापुढे बळी देतात. ब्रॅडलॉसाहेबास हिंदुस्थानात आणा. अहो, ब्रिटिश लोक हो, त्याचे कान पकडून त्याला ही दुष्ट शास्त्रे आणि ब्राह्मणांचा मुजोरीपणा दाखवा. शूद्रांना ह्या देशात किती हाल भोगावे लागतात ह्याची ब्रॅडलॉसाहेबास कल्पना नाही. त्याला प्रत्यक्ष अनुभव नाही. त्याला ह्या विषयाची खरी माहितीही नाही.

मंत्राने नि जपाने पाऊस पडतो असे समजणे हा शुद्ध मूर्खपणा आहे. मंत्राने मुले होतात हाही समज चुकीचा आहे. जर मंत्राने मुले झाली असती तर एकही ब्राह्मण निपुत्रिक मरणार नाही. मंत्राशिवाय विधवांना संतती होते.

शूद्रांनी म्हणजे क्षत्रियांनी अंगी उद्योगशीलता बाणवली पाहिजे. त्यांनी प्रामाणिकपणे कष्ट करून आपल्या कुटुंबाचे आनंदाने पालनपोषण केले पाहिजे. मुलांना शाळेत पाठविले पाहिजे आणि गरीब मुलांना अन्नपाणी पुरविले पाहिजे. म्हाताऱ्या मनुष्यांनी मुलांना विनावेतन शिकवावे. दुर्गुणी मनुष्य, खोटे बोलणारा, राजद्रोहाचा फैलाव करणारा आणि दारू पिणारा ह्यांना साह्य करू नये. ख्रिस्ती, मुसलमान, मांग आणि ब्राह्मण ह्यांना बंधुभावाने वागवावे. आपली मातृभाषा प्रत्येकाने शिकावी आणि तीत प्रभावी

भाषणे करावी. चाळीशीनंतर मनुष्याने आपले उर्वरित आयुष्य सत्कार्यास वाहून घ्यावे.

निर्मिकाचा धर्म एकच आहे. त्याविषयी चर्चा, वितंडवाद करून उपयोग नाही. जगात सत्यासारखा अन्य धर्म नाही. सत्य म्हणजे कृती. मराठी, इंग्रजी नि हिंदी ह्या तीन महत्त्वाच्या भाषा आहेत. त्यांत नैपुण्य मिळवा, सद्‌गुण अंगी धरा. जगाला सुखी करा.

सत्य म्हणजे मानवधर्म. सत्य म्हणजेच नीती. स्वच्छतेने न वागणारा मनुष्य हा डॉक्टराचे धन होय. घाणेरड्या मनुष्याविषयी लोक टीका करतात. स्नानाने मनुष्याच्या मनाला जोम येतो. आणि मनुष्य आपल्या कामाला उत्साहाने लागतो. घाणेरड्या कपड्याने रोग निर्माण होतात. मानवी व्यक्तिमत्त्व हे पवित्र आहे. मनुष्याची बुद्धिमत्ता निरनिराळी असेल; परंतु बुद्धिमत्ता ही आनुवंशिक नसते. ज्याचे मन सत्याने पवित्र झाले आहे, तो जगातील सर्वांत पवित्र मनुष्य. ज्या मनुष्याला मनाच्या पावित्र्याचे महत्त्व कळत नाही, तो मनुष्य धरणीस भार ठरतो. निर्दोषी आणि उद्योगी जीवन मनुष्याला आरोग्य नि संपत्ती देते. तो आपल्या कष्टाचे फळ उपभोगतो. आळशी मनुष्य हा दुष्ट असतो आणि तो समाजाचा शत्रू बनतो. उद्योगी आणि शुद्ध चरित्र्याचा मनुष्य हा गरिबांचा वाली असतो; तो अनेकांना सुखी करतो. दुर्गुणी तरुण आपले म्हातारपण दुःखात कंठितो. आळशी मनुष्य कधीही सुखी नसतो. त्याचे मन कधीच स्थिर नसते.

आळशी मनुष्य हा मूर्तिमंत दारिद्य होय. जुगार सर्वांना नाशास नेतो. शेअरबाजारात फक्त दलालांचीच धन होते. तो धंदा नाशास नेतो. त्याला दुरूनच नमस्कार करा. त्या व्यापारातले जे लोक आपण श्रीमंत आहोत असे दाखवितात ते अंती दिवाळखोर ठरतात. दुसऱ्यांची वाट लावून स्वतः आत्महत्त्या करतात. भागीत धंदा करा, परंतु हिशेब खरे ठेवा.

शूर मनुष्य विपत्काली किंवा आजारात धीर सोडीत नाही. तो घरी शांतता राखतो, आपले कर्तव्य तळमळीने पार पाडतो. सुडाची भावना हृदयात बाळगीत नाही. सहिष्णुतेचे पर्यवसान सुखात नि शांततेत होते. दुष्ट मनुष्याची कृत्ये त्याला नाशाला नेल्याशिवाय राहत नाहीत. तो मग देवाला दोष देतो.

जे सत्याचा अव्हेर करून धर्मासंबंधी उतावळे होऊन अविवेकाने चर्चा करतात, ते शेवटी हातघाईवर येतात. आणि त्याचा शेवट रक्तपातात होतो. सहिष्णुता ही शांततेची नि एकीची किल्ली आहे.

जो मनुष्य दुसऱ्याच्या सुखाने सुख पावतो, सद्‌गुणी होऊन सद्‌गुण जागृत करतो, दुसऱ्यास ज्ञान देतो, तो योग्य मनुष्य होय. जो मनुष्य सर्व गोष्टींसाठी अधाशीपणा दाखवितो, स्वार्थासाठी धडपड करतो, नाव मिळवितो; परंतु आत्मपरीक्षण कधीच करीत नाही तो मनुष्य भला नव्हे. जो मनुष्य आत्मनिरीक्षण करीत नाही, परंतु आत्मसमर्थनाची कास धरतो, तो अत्यंत स्वार्थांध होय. त्याच्यावर जे भोळे लोक अवलंबून राहतात ते निराशा पावतात. सर्व ज्ञानांत आत्मज्ञान हे अत्यंत महत्त्वाचे होय. स्वार्थी मनुष्य आत्मनिरीक्षण करू शकत नाही. आत्मनिरीक्षण हे बुद्धीचे खरे लक्षण होय.

आपल्या उत्पन्नापेक्षा जे अधिक खर्च करतात ते कर्जबाजारी होतात. स्वार्थी मित्र, नातलग नि स्तुतिपाठक गोड बोलून पैसे उकळतात. प्रत्येकाने कुटुंबाच्या बाबतीत आपले कर्तव्य करावे.

सत्यप्रीती, निर्मळ मन आणि शांत हृदय ह्यांतून धैर्य निर्माण होते. सद्वर्तनातून धैर्य निर्माण होते. धैर्यशाली मनुष्य हालअपेष्टा सहन करतो, संकटावर मात करतो, दुःखितांना अभय देतो. दुष्ट कृत्यांनी मनाची शक्ती पंगु होते. दुष्ट चेहेऱ्यावर चिंता नि काळजी प्रतिबिंबित होते. खोटे बोलणाऱ्याच्या मनाला शांती लाभत नाही.

परपीडा पाप आहे. नम्र, कृतज्ञ आणि समाधानी वृत्तीने राहा. वाईट वर्तणुकीमुळे रोग नि दुःखे निर्माण होतात. विपन्नावस्था ही प्रारब्धलिखित आहे अशी श्रद्धा बाळगणे ही आत्मवंचना आहे. दारूबाजाच्या घरी कलह चालून येतात आणि त्या घरातून शांतता पसार होते. ज्याचा समाधानाला सत्याचा नि धैर्याचा पाठिंबा आहे, तो संकटात सापडला तरी अचल राहातो.

उदारमनस्क साक्रेतिसाला 'द्वेषाने विष देऊन मरणाप्रत नेले.' तरीसुद्धा त्याच्या मनाची शांती ढळली नाही. त्याचे ग्रंथ पहा. जगाच्या कल्याणासाठी जे सत्याने नि विवेकाने जगतात ते स्वतःस आणि भावी पिढ्यांना सुखी करतात. जे वेदान्ती आहेत त्यांनी भेदाभेद पाळू नयेत आणि दुराग्रही बनू नये. बुद्धिवादी हा धार्मिक संस्कार नि मंत्रतंत्र यांचा स्वीकार करीत नाही. अशा तऱ्हेची साधना निरुपयोगी आहे. बुद्धिवादी मनुष्य विधवांचे केशवपन करणार नाही आणि दगड, धातू आणि झाडे पुजणार नाही.

जोतीराव हे गद्यापेक्षा पद्यात अधिक लीलेने विहार करतात. त्यांच्या काव्यात ओघ आहे. त्यांचे गद्य हे रानफळ आहे. ते मधुर नाही, परंतु औषधी आहे. त्यांचे गद्य ओबडधोबड नि अकृत्रिम आहे. परंतु अकृत्रिमता म्हणजे सत्याची जननी. त्यांच्या गद्यात व्याकरणाच्या चुका आहेत आणि क्वचित ठिकाणी अश्लील शब्द डोकावतात. जोतीरावांचे काव्यातून शहाणपण नि मानवतावाद प्रकट होतो.

## . २ .

जोतीरावांनी मृत्यूपूर्वी 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक' नावाचा एक ग्रंथ लिहिला. तो त्यांच्या मरणोत्तर प्रसिद्ध झाला. तो धर्मग्रंथ असून नीतिधर्माचा अमरकोश आहे.

ह्या ग्रंथाला जोतीरावांनी १ एप्रिल १८८९ रोजी प्रस्तावना लिहिली आहे. त्यात ते म्हणतात: "या आपल्या अमर्याद विस्तीर्ण पोकळीमध्ये निर्मिकाने अनंत सूर्यमंडळांसह त्यांच्या ग्रहोपग्रहांसहित तत्संबंधी एकंदर मानवस्त्रीपुरुषांनी त्याचे स्मरण मनी जागृत ठेऊन एकमेकांशी कोणत्या तऱ्हेचे आचरण केल्यामुळे त्यांस आनंद होणार आहे: यास्तव मी त्यांच्या कृपेने एकंदर सर्व मानव स्त्रीपुरुषांच्या हितासाठी हा लहानसा ग्रंथ रचिला आहे. तो सर्वांस ग्राह्य होऊन आम्ही सर्वांनी निर्मिकाच्या सत्यमय राज्याचा सारखा उपभोग घेऊ लागावे म्हणून माझी त्यापाशी मागणी आहे."

जोतीरावांनी जरी ब्राह्मणी धर्मग्रंथाविरुद्ध बंड केले तरी ते हिंदु तत्त्वज्ञानातील मुख्य तत्त्वाला चिकटूनच राहिलेले दिसतात. देवाच्या राज्याची ह्या भूतलावर स्थापना व्हावी ऐहिक साम्राज्याची नव्हे, हाच त्या तत्त्वाचा प्राण आहे.

जोतीरावांनी हिंदूंच्या भोळ्या समजुती, चालीरीती, कर्मठ नि तर्कदुष्ट संस्कार, धार्मिक विधी, धर्मतत्त्वे ह्यांचा त्याग केला आणि इतर हिंदु संस्कारांना साधे नि संक्षिप्त रूप दिले. हे सत्यशोधक समाजाच्या बहुतेक नेत्यांनी मान्य केले आहे.

डॉ. विश्राम रामजी घोले हे १८८८ सालच्या एप्रिल महिन्यात नोकरीतून निवृत्त झाले. त्यांनी जोतीरावांच्या ह्या ग्रंथाला प्रस्तावना लिहिली आहे. त्यात ते म्हणतात : "असत्य धर्म, मूर्तिपूजा व जातिभेद यांच्या योगाने हिंदुस्थानात किती गोंधळ व हानी झाली आहे, त्याचे ह्यात दिग्दर्शन उत्तम रीतीने केले आहे....परमेश्वर कसा आहे, त्याची आकृती कशी आहे, त्याला कोणी पाहिले नाही असे असता त्याची मूर्ती कशी करिता येईल...जातिभेद ज्या रीतीने हल्ली प्रचारात आहेत त्यापासून अनेक तोटे होत आहेत, हे सर्वांच्या लक्षात येऊन चुकले आहे. त्याविषयी येथे आम्ही इतकेच म्हणतो की, हिंदुस्थानास निकृष्टदशा प्राप्त होण्याला, परस्पर द्वेष वाढण्याला, अनेक तंटे उपस्थित होण्याला व आपणांस दास्य येण्याला हे एक प्रखर कारण आहे."

"सुमारे गेल्या चाळीस वर्षांत" डॉ. घोले पुढे म्हणतात : "रा. रा. जोतीराव गोविंदराव फुले यांनी धार्मिक व व्यावहारिक विषयांवर अनेक व्याख्याने दिली. स्वबांधवांशी वादविवाद करून लोकांच्या मनावरील भ्रम उडविला. काही ग्रंथ व पोथ्या लिहून लोकांस अर्पण केल्या. वर्तमानपत्रांत या विषयांवर चर्चा करीत आले व करीत आहेत; अनेक कवने करून लोकांस उपदेश केला. इत्यादि कामे करून आपला देह लोकसेवेत झिजविला व अजून लोकसेवा करीत आहेत. त्यांनी धर्मप्रकरणी सत्यासत्य व कार्यकारण भाव यांचा शोध लावण्यास लोकांस संवयी लावल्या. अमूक चाली बऱ्या किंवा वाईट यांचा न्याय त्यापुढे मांडला. मूर्तिपूजेचे खंडन केले. एकेश्वरी धर्माचे मंडण केले."

"धर्म, कर्म व व्यवहार यांत लोक नाडले जाऊ नयेत म्हणून त्यांच्या समजुती पाडल्या, इत्यादि कार्ये करून त्यांनी लोकांवर सदुपकार केले. ह्यांच्या बहुत वर्षांच्या मेहनतीचे वृक्ष जिकडे तिकडे वाढून त्यांस आता फळे येऊ लागली आहेत व पुष्कळ लोक हळूहळू एका परमेश्वरास मानू लागले आहेत. असत्य धर्मांचा भोपळा फुटत चालला आहे. व त्यांतील मर्मे लोकांस समजू लागली आहेत. पुराणे ही केवळ कादंबऱ्या व कल्पित गोष्टी आहेत असा लोकांचा समज होत चालला आहे." डॉ. घोले यांनी जोती-तत्त्व-प्रणालीचा निष्कर्ष काढला तो असा : "एका ईश्वरास भजावे. सद्वर्तनाने वागावे. सर्वांनी बहीण भावंडांप्रमाणे वर्तावे. सर्व मनुष्यांना सारखेच हक्क असावेत. जातिभेद नसावा. स्त्रियांना व पुरुषांना सारखेच हक्क असावे व हल्लीच्या अनेक वाईट चाली ज्यांचा संबंध धर्माशी लावला आहे, त्या सोडाव्या...ह्या ग्रंथातील भाषा सुलभ आहे ह्यातील हितोपदेश चांगला आहे."

"धर्मभोळेपण व धर्मवेड, ह्या ग्रंथ वाचल्याने जाईल अशी आमची खात्री आहे. ह्या ग्रंथ यहुदी, हिंदू, ख्रिस्ती व मुसलमान वगैरे सर्व धर्मांतील लोकांनी संग्रहास ठेवावा अशी आम्ही शिफारस करितो."

जोतीरावांनी 'सत्यवर्तन केल्याशिवाय मानवप्राणी जगात सुखी होणार नाही,' ह्या तत्त्वाने ग्रंथास आरंभ केला आहे.

**सत्य सर्वांचें आदी घर ॥ सर्व धर्मांचें माहेर ॥ ध्रु ॥**
**जगांमाजीं सुख सारे ॥ खास सत्याचीं तीं पोरें ॥ १ ॥**
**सत्य सुखाला आधार ॥ बाकी सर्व अंधकार ॥**
**आहे सत्याचा बा जोर ॥ काढी भंडाचा तो नीर ॥ २ ॥**
**सत्य आहे ज्याचें मूळ ॥ करी धूर्तांची बा राळ ॥**
**बळ सत्याचें पाहुनी ॥ बहुरूपी जळे मनीं ॥ ३ ॥**
**खरें सुख नटा नोव्हें ॥ सत्य ईशा वजूं पाहे ॥**
**जोती प्रार्थी सर्व लोकां ॥ व्यर्थ डंभा पेटूं नका ॥ ४ ॥**

आपल्या ग्रंथात जोतीराव पुढे म्हणतात : "ह्या पृथ्वीच्या पृष्ठभागावर जेवढी म्हणून मानवांनी धर्मपुस्तके केली आहेत त्यांपैकी एकाही धर्मग्रंथात आरंभापासून शेवटापर्यंत सारखे सार्वजनिक सत्य नाही. कारण प्रत्येक धर्मपुस्तकामध्ये काहीएक व्यक्तींनी त्या वेळच्या प्रसंगास अनुसरून हेकडपणा केल्यामुळे, ते धर्म एकंदर सर्व मानवी प्राण्यांस सारखे हितकारक न होता सहजच त्यांमध्ये अनेक फळ्या होऊन त्या एकमेकांचा मनापासून हेवा व द्वेष करू लागतात."

सबंध ग्रंथाचा सारांश शक्यतो जोतीरावांच्याच शब्दांत दिला आहे : 'जर निर्माणकर्ता आपणा सर्वमानवांचा निर्मिक आहे तर एकंदर सर्व मानवी प्राण्यांपैकी प्रत्येक व्यक्तीस त्याने कृपाळू होऊन एकंदर सर्व उत्पन्न केलेल्या मानवी अधिकारांचा यथायोग्य उपभोग घेता यावा. असे घडून येत नसल्यामुळे त्यास अनेक प्रकारच्या दुःसह अडचणी सोसाव्या लागतात. पृथ्वीवरील अनेक देशांतील लोकांचा एकमेकांशी वैरभाव माजून प्रत्येकामध्ये देशाभिमानाचे व धर्माभिमानाचे खूळ व्यर्थ माजले आहे. पृथ्वीवरील अनेक देशांतील नद्या महासागरास मिळतात. त्यांपैकी एकाच देशांतील नदी पवित्र कशी असेल? कारण ती महापवित्र नदी श्वानाचे मलमूत्र पोटात घेऊन समुद्रात वाहून नेते. एकंदर सर्व मानवी प्राणी अवयवाने व बुद्धिकौशल्याने एकसारखे असून, त्यांपैकी काही लोक पिढीजात पवित्र बनून श्रेष्ठ कसे होऊ शकतील? सर्वांसारखे त्यांस जन्ममरण व सर्वांप्रमाणे सद्‌गुणांत व दुर्गुणांत ते निपुण असतात.'

'निर्माणकर्ता कसा नि कुठे आहे, हे जाणण्याची मनुष्याने इच्छा न केलेली बरी. विश्वाची पोकळी अथांग, अनंत आहे. एकाही दिशेचा मनुष्यास शोध लावणे अशक्य आहे. तेव्हा यत्किंचित मानवास निर्मात्याचा शोध करणे अशक्य आहे. तो अज्ञेय

आहे. कल्पित विष्णूच्या नाभिकमळातून उत्पन्न झालेल्या ब्रह्मदेवासही निर्मात्याचे दर्शन झालेले नाही.'

'पृथ्वीवरील पुष्पे नि सुवासिक पदार्थ मानवाच्या उपभोगासाठी निर्माणकर्त्याने उत्पन्न केले आहेत, तर ते त्याला वाहून त्याची पूजा करण्यात अर्थ नाही. स्वपरिश्रमाने आपल्या कुटुंबाचे पोषण करून रात्रंदिवस जगाच्या कल्याणासाठी झटणारे–म्हणजे अज्ञानी मानव बांधवांस आपमतलबी व स्वकार्यसाधू लोकांच्या जाळ्यांतून मुक्त करणारे –अशा सत्पुरुषांस फुलांच्या माळा करून ईश्वराच्या नावाने अर्पण कराव्यात म्हणजे पुष्पांचे सार्थक होईल."

'दगडाच्या मूर्तीवर पुष्पे वाहून नामस्मरण केल्यास मनुष्यास काही फायदा नाही. पीतांबर नेसून धूप घालून, नाक धरून, डोळे मिटून निर्मिकाचे दर्शन होत नाही. मानवांबरोबर सरळ सात्त्विक आचरण केल्याने निर्मिकाच्या नावावर आपल्या मातापित्यांचे पालनपोषण होणार नाही. आपल्या परिश्रमाने उदारनिर्वाह न करिता अथवा जगाच्य हितासाठी न झटता आपले पोट जाळण्याप्रीत्यर्थ बहुरूप्यासारखे ढोंगी बैराग्याचे सोंग घेऊन सर्वकाल भांग पिऊन तिच्या अमलात अज्ञानी भोळ्या जगाचे मिष्टान्नावर नित्य ताव मारून निरर्थक नामस्मरण करितात ते विचारवंताच्या उपहासास पात्र होतात. ईश्वराचे भय मनात बाळगून सर्वांनी बहिणभावंडांसारखे वागले असता, एकंदर सर्व मानवप्राणी सुखी होऊन साक्षात निर्मिकाचा अंमल बसून त्याचे राज्य होणार आहे.'

'निर्मिकाला नैवेद्याची जरूरी नाही. साधुपुरुषांना विपत्काल आला, तर त्यांना किंवा पंगु माणसांना साहाय्य केले तर निर्मिकास नैवेद्य अर्पण केल्याचे श्रेय मिळेल. कोणत्याही प्रकारचा भेदाभेद न करता एकंदर सर्व मानवांपैकीं जो कोणी आपल्या कुटुंबाचे पोषण करून जगाच्या कल्याणासाठी सतत रात्रंदिवस झटतो, मग तो भटभिक्षुक असो किंवा रेडइंडियन असो किंवा मृतप असो, त्याला साहाय्य केले तर तो निर्मिकासच नैवेद्य अर्पण होणार आहे.'

'स्वर्ग हे एक बुजगावणे आहे. सर्व धर्मपुस्तकांत स्वर्ग वर्णिला आहे. तो कल्पित आहे. पृथ्वीवर असा स्वर्ग नावाचा भूभाग नाही.'

## . ३ .

'स्त्री आणि पुरुष ह्या उभयतांमध्ये स्त्री श्रेष्ठ आहे. सर्वांचे उपकार फिटतील, परंतु आपल्या जन्मदात्या मातुःश्रीचे उपकार फिटणार नाहीत. स्त्री घरात असल्याशिवाय घर शोभत नाही. ती निरपेक्षपणे सर्वांचा पाठिराखेपणा करते. स्त्री अबला असते. पुरुष लोभी नि धाडसी, तिला त्यांनी दडपून ठेविले. तिला मानवी हक्क समजू नये म्हणून तीस विद्या शिकविण्याचा प्रतिबंध केला.'

'बहुपत्निकत्वाची चाल वाईट आहे. पुरुषाच्या लोभामुळे हेवा, द्वेष, नाना तऱ्हेचे दुर्गुण निर्माण झाले. व्यसनी पुरुष स्वस्त्रीशी प्रतारणा करून अनेक बायका करितात. आणि

त्यांजबरोबर मनःकामना तृप्त करण्याचे नादात पडल्यामुळे नाना प्रकारचे घाणेरडे रोग निर्माण होऊन ते सर्व ठिकाणी पसरतात. मदोन्मत्त पुरुषाने रजस्वला स्त्रीबरोबर संग केल्यामुळे महारोग होतो. तो संततीतसुद्धा पसरतो. जरठ विधुर लावण्यवती अज्ञानी मुलींशी लग्न करून त्या अबलांच्या तारुण्यात माती कालवितात. परंतु त्या मुली विधवा झाल्या म्हणजे त्यांना द्वितीय संबंध करावयास देत नाहीत. त्या गर्भपात, बालहत्या करतात. आर्यभट्टांनी विधवाविवाहास बंदी केली. भोळसर अज्ञानी कुळवाडी, सोनार वगैरे जातींतील लोकांनी त्यांचे अनुकरण केले. वैदिक काळी आर्य ब्राह्मणाला भावजयीशी संभोग करून मुले निर्माण करण्यास परवानगी होती.'

'लोभी पुरुष दोन तीन लग्नाच्या बायका करून नांदतात. त्यासाठी धर्मग्रंथाचा आधार दाखवितात. दोनतीन नवरे करून एक स्त्री एका घरात नांदू लागली तर कसे होईल? स्त्रियांस एक नियम व पुरुषांस दुसरा नियम करणे हा पक्षपात आहे. धाडसी पुरुषांनी स्वार्थासाठी बनावट मतलबी धर्मपुस्तकांत स्त्रियांविषयी असे अपमतलबी लेख करून ठेविले आहेत.'

'स्वतःस मात्र सुख भोगण्याकरिता एकंदर सर्व मानवी प्राण्यांस कायिक व मानसिक पीडा दिली नाही म्हणजे त्यासच पुण्य म्हणावे. परोपकाराय पुण्याय। पापाय परपीडनम्. धर्माच्या नावावर गरिबांची फसवणूक करून ब्राह्मणांना भोजन देणे म्हणजे पुण्य नव्हे. वेश्यागमन करणे, मटण दारू यांवर चैन करणे आणि ते झाल्यावर अस्पृश्यता पाळणे हे पुण्य नव्हे."

'जातिभेद पाळणे हा धर्म नव्हे. मानवी प्राण्यात मूळ जातिभेद नव्हते. जातिभेद हे एक थोतांड आहे. ब्राह्मणांनी आपल्या स्वार्थासाठी हे जातिभेद निर्माण केले. जर हलालखोरिणीची जात नीच मानली तर आपली माता त्याच वर्गाची ठरवावी लागेल आणि आपल्या आईला नीच म्हणणारा असा निर्दय, कृतघ्न कोणी मनुष्य नसेल. मानवप्राण्यांत त्यांच्या गुणावरून जातिभेद ठरविता येणार नाही. सद्‌गुण व दुर्गुण हे काही पिढीजाद स्वभाव नाहीत. ब्राह्मणांची मुले स्वभावाने नेहमी शंकराचार्यांच्या तोलाची सद्गुणी निपजत नाहीत. अतिशूद्र चांभाराची मुले सद्गुणी निवडल्यास शंकराचार्यांच्या तोलाचे महामुनी होणार नाहीत, असे न्यायी पुरुषाच्याने म्हणवणार नाही.'

'पशुपक्षी नि मानव यांत स्वाभाविक भेद आहे. तो भेद म्हणजे निर्मिकाने मानवप्राण्यास सारासार विचार करण्याची बुद्धी दिली आहे. बुद्धीहीन पशुपक्ष्यादी प्राणी या लोभी मानवांपेक्षा फार मोठे आहेत.'

'धंदा म्हणजे धर्म नव्हे. हजामत करणे हा न्हाव्याचा धंदा आहे, धर्म नव्हे. कपडे धुणे धोब्याचा धंदा आहे, धर्म नव्हे. तो धंद्याने धोबी आहे, जातीने किंवा धर्माने नव्हे. अज्ञानी जनापासून लाच खाणे हा सरकारी कामगाराचा धर्म नव्हे, हे त्याचे सरकारशी दगेबाजी करण्याचे कसब होय. मेहनत न करिता अज्ञानी जनांस लुटून आयते खावे हा आर्यभटाचा धर्म नव्हे, ही उघड ठकबाजी होय. वेश्यांचा मुखरस

पिऊन घरी आल्यावरोबर सोवळेचार करणे हा सज्जन मानवांचा धर्म नव्हे. ही अपवित्रता होय. निर्वाहाकरिता पडझड जनावरे खाणे हा मांगमहार यांचा धर्म नव्हे. हा त्यांचा लाचारपणा. निरुपाय होय. रयतेचे संरक्षण करण्यासाठी रयतेकडून करपट्टी घेणे हे राजाचे कर्तव्यकर्म होय, धर्म नव्हे. जन्मदात्या आईबापांचे त्यांच्या वृद्धापकाळी पालनपोषण करावे. बैरागी, गोसावी हे समाजाच्या जिवावर आपला निर्वाह करतात. ते आईतखाऊ होत.'

'निर्मिकाने सर्व मानवी स्त्रीपुरुषांच्या सुखासाठी अन्न, फळे, फुले, पाणी निर्माण केली. परंतु मानव स्त्रीपुरुषांनी एकमेकांविषयी बहीणभावंडपणाची पवित्र वृत्ती जागृत न ठेविल्यामुळे जगामध्ये सत्याचा ऱ्हास होत गेला व यामुळे एकंदर सर्व जगात असंतोष होऊन दुःखाचे प्राबल्य झाले. सत्यास स्मरून वागल्याशिवाय त्यांमध्ये निर्मळ भाऊपणा जागृत होणार नाही. मानवांनी आपली माता, भगिनी, कन्या, सुना ह्यांना दासीसारखे वागविले. जर त्यांच्या मानवी हक्कांच्या आड ते आले नसते, तर जगामध्ये निर्मिकाचे राज्य होऊन एकंदर सर्व मानवस्त्रीपुरूष संतोषी होऊन सुखी झाले असते. जसे माणसांनी तुम्हांशी वर्तावे म्हणून तुमची इच्छा आहे तसेच तुम्हीही त्यांशी वर्ता, असे महासत्पुरुषाचे वचन आहे.'

'आर्यांच्या धर्मात भट्टब्राह्मणांखेरीज बाकीच्या एकंदर सर्व लोकांस नीतीचा सारखा उपभोग घेण्यासारखी मुळीच मोकळीक नाही. रामायण व भागवत यांच्या इतिहासात एकंदर सर्व नीती खरी व विश्वसनीय नाही. जर रावण हा मानवाव्यतिरिक्त राक्षसाच्या जातीचा होता, तर जनकराजाने या परजातीच्या रावणास आपल्या मुलीच्या स्वयंवराच्या समारंभास येण्याचे आमंत्रण दिले नसते. रामायणातील इतिहास खरा नाही. त्या वेळच्या गप्पाड्या नाटक्यांनी केवळ लोकांची मते रिझविण्याकरिता हा ग्रंथ कल्पून रचिला असावा. या सर्वांत नीतीचा गंध नाही.'

'महंमदी धर्मात खुदाने निर्माण केलेल्या मानवास एकमेक भावंडांप्रमाणे मानितात. त्याचप्रमाणे एकंदर सर्व मानवांस त्यांचे पवित्र कुराण वाचून पाहण्याची व त्याप्रमाणे आचरण करण्याची मोकळीक आहे. सर्वांस बरोबरीचे हक्क देऊन त्याचबरोबर रोटी व बेटी व्यवहार सुरू करण्याची मोकळीक आहे.'

'आपल्या सर्वांच्या निर्मिकास संतोष देण्यासाठी सार्वजनिक सत्याचे भय मनी धरून जो कोणी इतर मानवबांधवांबरोबर आचरण करील त्यास नीति म्हणावी. मग तो खिस्ती असो, महंमदी असो, सत्यशोधक समाजनीय असो, अथवा एखादा गावडेकरी अज्ञानी असो.' राम आणि श्रीकृष्ण यांची काही बाबतीतली वागणूक देवाला शोभण्यासारखी नव्हती, असे जोतीरावांनी म्हटले आहे. त्यांनी ज्ञानेश्वरीच्या बाराव्या नि तेराव्या अध्यायांवर कडक टीका केली आहे.

'दैव, ब्रह्मलिखित, पूर्वसंचित, नशीब, प्रारब्ध, प्रावक्तन, सुकृत, ललाटरेषा हे सर्व कल्पित धोरणाने मानलेले कर्म आहे. ते सर्व मिथ्या आहे. मना त्वांचि रे पूर्वसंचित केले ।

तयासारिखे भोगणे प्राप्त झाले। हे रामदासांचे म्हणणे चुकीचे आहे. स्वभावतः विद्या शिकण्याची गोडी नसेल तो मुलगा नापास झाला तर लोक म्हणतात, विद्या शिकणे त्याच्या दैवात नव्हते. एखाद्याने आपण होऊन अभ्यास केला, तर त्याच्या नशिबात विद्या होती असे म्हणतात. धंद्याची पूर्ण माहिती नसल्यामुळे व पूर्वतयारी न केल्यामुळे आणि अज्ञानामुळे अपयश येते.'

'बायबल सर्वांना वाचण्याची मोकळीक आहे. कुराण सर्वांना खुले आहे. वेद सर्वांना खुले नाहीत. बायबल आणि कुराण ह्यांवर विश्वास असणाऱ्या लोकांना दुसरी कसली भीती वाटत नाही. वेदावर विश्वास असणारे भितात. कारण त्यांतली लबाडी उघडकीस येईल असे त्यांना वाटते. ब्राह्मणी ग्रंथ हे बाह्यात्कारी धर्मसंबंधी, परंतु आतून ते शुद्ध राजकीय आहेत. वेद हे सार्वजनिक ईश्वरप्रणीत सत्याच्या नावाला बिलकूल शोभण्या सारखे नाहीत.'

.४.

सत्यवर्तन करणारे कोणास म्हणावे?

'स्त्रीपुरुष हे उभयतः जन्मताच स्वतंत्र व एकंदर सर्व अधिकाराचा उपभोग घेण्यास मात्र केले आहेत असे कबूल करणारे त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावे. जे तारे, दगड यांची पूजा न करिता विश्वाच्या निर्मिकास मान देतात, ते सत्यवर्तन करतात असे म्हणावे. निर्माणकर्त्याने निर्माण केलेल्या सर्व वस्तूंचा यच्चयावत् प्राणीमात्रास उपभोग घेऊ न देता ते निर्मिकास अर्पण करून जे त्याचे पोकळ नामस्मरण करितात ते सत्यवर्तन करीत नाहीत. जे प्राणीमात्रांस कोणत्याही प्रकारचा निरर्थक त्रास देत नाहीत, ते सत्यवर्तन करतात. जे दुसऱ्यांस मानवी अधिकार उपभोगू देतात, त्यांना व्यक्तिशः वा संघिकरीत्या विरोध करीत नाहीत ते सत्यवर्तन करतात.'

'सर्व स्त्रीपुरुषांस धर्म व राजकीय स्वतंत्रता आहे. जो दुसऱ्याचे हक्क समजून घेऊन इतरांस पीडा देत नाही, त्याचे नुकसान करीत नाही तो सत्यवर्तन करणारा म्हणावा. पुरुषाने आपली पत्नी, स्त्रीने आपला पती ह्यांखेरीज इतर स्त्रीपुरुष बंधुभगिनी आहेत असे जे मानतात त्यांना सत्यवर्तन करणारे म्हणावे.'

'सर्व स्त्रीपुरुषांस सर्व मानवी हक्कांविषयी आपले विचार, मते, बोलून दाखविण्यास अथवा लिहिण्यास आणि प्रसिद्ध करण्यास स्वतंत्रता दिली आहे; परंतु त्या विचारांपासून व मतांपासून दुसऱ्याचे नुकसान होऊ नये म्हणून जे खबरदारी घेतात त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावे. दुसऱ्याच्या मतांवरून किंवा राजकीय मतांवरून जे त्यास नीच मानून त्याचा छळ करीत नाहीत, त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावे. गावकी किंवा मुलकी अधिकाराच्या जागा स्त्रीपुरुषांच्या योग्यतेनुरूप व सामर्थ्यानुरूप मिळाव्यात असे मान्य करतात, त्यांना सत्यवर्तन करणारे म्हणावे.'

'धर्म, गावकी व मुलकी यासंबंधाची प्रत्येक मानवाची स्वतंत्रता, मालमत्ता, संरक्षण

आणि त्याचा जुल्मापासून बचाव करण्याविषयी जे कोणी बाध आणीत नाहीत त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावे.'

'स्त्री अथवा पुरुष जे मानव वृद्ध शिष्टांस सन्मान देतात, वृद्ध मातापित्यांचा परामर्श घेतात त्यांना सत्यवर्तन करणारे म्हणावे. स्त्री अथवा पुरुष जे वैद्याच्या आज्ञेवाचून अफू, भांग, मद्य वगैरे अमली पदार्थांचे सेवन करून नाना तऱ्हेचे अन्याय करण्यास प्रवृत्त होत नाहीत अथवा ते सेवन करणारास आश्रय देत नाहीत त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावे.'

'स्त्री अथवा पुरुष जे पिसू, ढेकूण, ऊ वगैरे कीटक; विंचू, सरपटणारे सर्प, सिंह, वाघ लांडगे वगैरे, त्याचप्रमाणे जे लोभी मानव दुसऱ्या मानवांचा वध करतात किंवा आत्महत्या करतात ह्यांखेरीज दुसऱ्या प्राण्याची वा मानवाची हत्या करीत नाहीत अथवा हत्या करणारांस मदत देत नाहीत त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावे.'

'स्त्री अथवा पुरुष जे आपल्या हितासाठी दुसऱ्याचे नुकसान करण्याकरिता लबाड बोलत नाहीत अथवा तसे बोलणारास मदत करीत नाहीत त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावे.'

'स्त्री अथवा पुरुष जे व्यभिचार करीत नाहीत अथवा व्यभिचाऱ्यांचा सन्मान ठेवीत नाहीत त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावे.'

'स्त्री अथवा पुरुष जे चोरी करीत नाहीत अथवा चोरीस मदत करीत नाहीत त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावे.'

'स्त्री अथवा पुरुष जे स्वतःच्या हितासाठी न्यायाने राज्य करणाऱ्या संस्थानिकावर अथवा राज्यावर अथवा एकंदर सर्व प्रजेने मुख्य केलेल्या प्रतिनिधीवर बंड करून लक्षावधी लोकांची कुटुंबे उघडी पाडीत नाहीत अथवा बंड करणारांस मदत करीत नाहीत, त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावे. जगाच्या हितासाठी धर्मपुस्तक तयार केले आहे अशी बढाईने वाचाळपणा करणारे, परंतु ते धर्मपुस्तक स्वतःच्या बगलेत मारून इतर मानवांस न दाखविणारे अशा कपटी बढाईखोरांवर जे स्त्रीपुरुष विश्वास ठेवीत नाहीत त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावे.'

'स्त्री अथवा पुरुष जे आपल्या कुटुंबासह आपल्या भाऊबंदांस, आपल्या सोयऱ्या-धायऱ्यांस आणि इष्टमित्र साथ्यांस मोठ्या तोऱ्याने पिढीजाद श्रेष्ठ मानून आपल्यास पवित्र मानीत नाहीत आणि दुसऱ्या मानवांना पिढीजाद कपटाने अपवित्र मानून त्यांस नीच मानीत नाहीत त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावे.'

'स्त्री अथवा पुरुष जे पूर्वी कपटाने लिहिलेल्या ग्रंथांच्या वहिवाटीवरून काही मानवांस पिढीजाद दास मानीत नाहीत अथवा दास मानणाऱ्याचा बोज ठेवीत नाहीत त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावे.'

'स्त्री अथवा पुरुष जे आपल्या लोकांचे वर्चस्व राहण्याकरिता शाळेमध्ये शिकविताना इतर लोकांच्या मुलांविषयी दुजाभाव बाळगीत नाहीत अथवा शाळेत शिकविताना

दुजाभाव करणाऱ्याचा धिक्कार करितात त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावे. स्त्री अथवा पुरुष जे न्यायाधिशाचा हुद्दा चालवताना अन्यायी लोकांना त्यांच्या अन्यायानुसार योग्य शिक्षा करण्याच्या कामी कधीही पक्षपात करीत नाहीत, अन्यायाने पक्षपात करणाऱ्यांचा धिक्कार करतात त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावे.'

'स्त्री अथवा पुरुष जे शेतकी अथवा कारागिरी करून पोटे भरणारांस श्रेष्ठ मानितात आणि शेतकरी वगैऱ्यांस मदत करणारांचा सत्कार करितात त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावे.'

'जे स्त्री अथवा पुरुष चांभाराच्या घरी का होईना बिगाऱ्याचा धंदा करून आपला निर्वाह करणाऱ्यांस तुच्छ मानीत नाहीत आणि त्या कामी मदत करणारांची वाहवा करितात त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावे.'

'स्त्री अथवा पुरुष जे स्वतः काही उद्योगधंदा न करिता निरर्थक धार्मिकपणाचा डौल घालून अज्ञानी जनांस नवग्रहांची पीडा दाखवून त्यांस भोंदाडून खात नाहीत अथवा तत्संबंधी पुस्तके करून आपली पोटे जाळीत नाहीत त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावे.'

'स्त्री अथवा पुरुष जे भाविक मूढांस फसवून खाण्याकरिता ब्रह्मर्षीचे सोंग घेऊन त्यांस अंगारा धुपारा देत नाहीत, अथवा तत्संबंधी मदत करीत नाहीत, त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावे.'

'स्त्री अथवा पुरुष कल्पित देवाची शांती करण्याच्या निमित्ताने जनांस भोंदाडून खाण्याकरिता जपजाप्य करून आपली पोटे जाळत नाहीत अथवा तत्संबंधी मदत करणारांचा बोज ठेवीत नाहीत, त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावे.'

'स्त्री अथवा पुरुष जे आपली पोटे जाळण्याकरिता अज्ञानी जगात कलह उपस्थित करीत नाहीत अथवा तत्संबंधी मदत करणाऱ्यांच्या सावलीसदेखील उभे राहत नाहीत त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावे.'

'स्त्री अथवा पुरुष जे स्त्रीपुरुषांमध्ये कोणत्याच तऱ्हेची आवडनिवड न करिता त्यांचे खाणेपिणे, लेणे व नेसणे याविषयी कोणत्याच प्रकारचा विधिनिषेध न करिता त्यांच्याबरोबर शुद्ध अंतःकरणाने आचरण करितात त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावे. सर्व मानव स्त्रीपुरुषांपैकी कोणाची आवडनिवड न करिता त्यांतील महारोग्यांस, पंगूंस व पोरक्या मुलांस आपल्या शक्तीनुसार मदत करितात अथवा त्याला मदत करणाऱ्यांस सन्मान देतात त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावे.'

'भूमंडळावर महासत्पुरुषांनी म्हणून धर्मपुस्तके केली आहेत त्या सर्वांत त्या वेळेस अनुसरून त्यांच्या समजुतीप्रमाणे काहीना काही सत्य आहे. यास्तव कोणत्याही कुटुंबातील एका मानव स्त्रीने बौद्धधर्मी पुस्तक वाचून तिच्या मर्जीप्रमाणे पाहिजे असल्यास तो धर्म स्वीकारावा. तिच्या पतीने बायबल वाचून त्याच्या मर्जीप्रमाणे वाटल्यास ख्रिस्ती व्हावे. व त्याच कुटुंबातील त्यांच्या कन्येने कुराण वाचून तिच्या मर्जीप्रमाणे पाहिजे असल्यास तिने महंमदी धर्मी व्हावे आणि त्याच कुटुंबातील त्यांच्या पुत्राने सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक वाचून त्याच्या मर्जीप्रमाणे पाहिजे असल्यास सार्वजनिक सत्यधर्मी

व्हावे. कोणी कोणाच्या द्वेष न करिता सर्वांना निर्मिकाच्या कुटुंबातील आहोत असे समजून प्रेमाने व गोडीगुलाबीने एकमेकांनी वर्तन करावे म्हणजे ते आपल्या सर्वांच्या निर्माणकर्त्याच्या राज्यात धन्य होईल.'

'आकाशातील ग्रहांशी मानवाचे भवितव्य निगडित नाही. ग्रह मानवव्यक्तींस पीडा देत नाहीत. ही पोटबाबू आर्य जोशांची लबाडी आहे.'

'मनुष्यास कन्या वा पुत्र झाल्याबरोबर आनंद होतो. कन्येच्या नावाचा संस्कार बाराव्या दिवशी, पुत्राच्या नावाचा तेराव्या दिवशी करावा. मातेच्या स्तनात दूध पुरे असल्यास मुलास सहा महिन्याच्या आत कोणत्याही प्रकारचा अन्नसंस्कार करू नये. मुलास अथवा मुलीस बोलता येऊ लागल्याबरोबर आईने त्यास लहान वाक्ये बोलावयास लावून त्याच्याकडून मुळाक्षरे खेळता खेळता पाठ करून घ्यावीत. पाचवे वर्ष लागताच त्याला शाळेत घालावे.'

'कन्यापुत्रांनी आपल्या मातापित्यासह वडील इष्टमित्रांचा सल्ला घेऊन त्यांनी मागेपुढे पाहून सारासार विचार करावा आणि लग्न जुळवावे. लग्नाच्या वेळी सद्‌वर्तनाने वागण्याविषयी प्रतिज्ञा करावी. नंतर गरिबांस, अंधपंगूस जातपातधर्मनिरपेक्ष दानधर्म करावा.'

'जे अनीतीने वागलेले असतात त्यांना मरणकाळी पश्चात्ताप झाल्यामुळे क्लेश होतात. मानव स्त्रीपुरुष आपली लग्ने झाल्यावर ते निर्मळ अंतःकरणाने सत्यास स्मरून एकमेकाशी जेव्हा सर्वकाळ सर्वकामी सत्य आचरणात आपले सर्व आयुष्य घालवितात. यास्तव मरण आले की ते शांतपणे आपले प्राण सोडितात.'

'मनुष्याने मरणापूर्वी शुद्धीवर असता आपल्या कन्यापुत्रांसह कुटुंबातील एकंदर सर्व तरुणांस त्याविषयी बोध करून एकंदर सर्व सोयरेधायरे, इष्टमित्र वगैरेंचा निरोप घ्यावा आणि शांतपणे प्रार्थना करावी : ती अशी :

'मला निर्माण करून मला सदसद्विचार करण्याची बुद्धी दिलीस व तुझ्या आज्ञेप्रमाणे सत्यास स्मरून मी या जगात वर्तन केले, हे तू जाणतोस. यास्तव तू माझा अंगीकार करशील अशी माझी पूर्ण खात्री आहे. आणि त्याचप्रमाणे माझ्या बाकी एकंदर सर्व मानव बहीणभावंडांनी सत्यास स्मरून आचरण केल्याबरोबर, त्यांचाही अंगीकार निःसंशय करशील! तुझी सत्यसत्ता वाढो.'

'प्रेतास स्नान घालून अंगास सुवासिक तेल लावावे. त्यास वस्त्रे नेसवावीत. त्यावर पुष्पांच्या माळा घालाव्यात. प्रेताची गती लावण्यापूर्वी अंगावरची वस्त्रे काढू नयेत. स्मशानातून घरी जाण्यापूर्वी एखाद्या सत्यपालक वृद्धाने प्रार्थना करावी. तेराव्या दिवशी शक्त्यनुसार सखेसोयरे, भाऊबंद, इष्टमित्र यांना भोजन देऊन सर्वांच्या गळ्यांत पुष्पांच्या माळा घालाव्यात. 'शक्त्यनुसार काही द्रव्य देऊन शाळेत जाणाऱ्या त्यांच्या मुलांमुलींना मोठ्या उत्साहाने गाई बक्षीस कराव्यात. वर्षश्राद्धाच्या दिवशी तसेच भोजन द्यावे. निराश्रित मुलांमुलींना त्या दिवशी साहाय्य करावे.'

असा हा जोतीरावप्रणीत धर्म आहे. ज्याच्यायोगे सर्व समाजाचे धारण होते तो धर्म. म्हणूनच त्यांनी आपल्या धर्मास सार्वजनिक सत्यधर्म म्हटले आहे.

# २०

## मृत्युसमयींची भव्यता

जानेवारी १८९० मध्ये जोतीरावांच्या आजारीपणात त्यांना एक मोठा विजय मिळाला. मुंबईतील सर्वोच्च न्यायालयामध्ये ओतूर अभियोगाचा निकाल लागून बाळाजी कुसाजी पाटील यांच्या बाजूने निवाडा झाला. ब्राह्मण पुरोहितांचा पराभव झाला. निवाड्याने जोतीरावांच्या मताला पाठिंबा दिला. ब्राह्मणेतर वर्गांना हीन दर्जाचे समजून तुच्छ मानणाऱ्या आणि मृत्यूनंतरही प्रत्येक बाबतीत दक्षिणेच्या रूपाने कर उपटणाऱ्या ब्राह्मणांच्या शतकानुशतकाच्या स्वार्थी मक्तेदारीला त्याने कायमची मूठमाती दिली.

सर्वोच्च न्यायालयात जेव्हा अभियोग सुरू झाला तेव्हा पुरोहितांचे वकील महादेव चिमणाजी आपटे म्हणाले की, 'वादी हे वंशपरंपरेने जोशी आहेत आणि म्हणून प्रतिवाद्यांच्या घरी लग्नसमारंभाच्यावेळी त्यांना संस्कार करण्याचा हक्क आहे. ज्या मनुष्याने प्रतिवादीच्या घरी पुरोहिताचे काम केले त्याने वादींच्या हक्कांवर गदा आणली आहे. कुणबी पुरोहिताला प्रतिवादीकडून जी दक्षिणा मिळाली त्यावर वादी यांचा हक्क आहे.'

घनःशाम नीळकंठ नाडकर्णी हे प्रतिवाद्यांचे वकील होते. ते म्हणाले, 'पाटलांच्या घरी झालेल्या लग्नात शास्त्रात सांगितलेले कोणतेही संस्कार करण्यात आलेले नव्हते.

तेथे पुरोहित असा कोणी आणलेलाच नव्हता. गणेशपूजन हा लग्नाच्या वेळी प्रारंभीचा विधी असतो तो ह्या लग्नात केलेला नव्हता. वधूवरांनी एकमेकांच्या गळ्यात हार घालण्यापलिकडे येथे कोणताच संस्कार केलेला नव्हता. दक्षिणा कोणालाही वाटलेली नव्हती. यास्तव ग्रामपुरोहित दक्षिणेवर हक्क सांगू शकत नाहीत. प्रतिवाद्यांसारख्या ज्ञातीच्या शूद्राकडे वेगळाच संस्कार करावयाचा असतो. तो संस्कार केलेला नव्हता.'

सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती सर चार्लस सार्जंट यांनी तो अभियोग जिल्हा न्यायालयात एका मुद्दयावर फेरविचारासाठी परत पाठविला. कोणते विधी लग्नाच्या प्रसंगी केले होते आणि ते कोणाकडून करविले गेले होते, याविषयी वरिष्ठ न्यायालयाला माहिती पाहिजे होती. दोन्ही पक्षांकडील साक्षीदारांची पुन्हा साक्ष घेऊन आपला निष्कर्ष वरिष्ठ न्यायालयाकडे निर्णयासाठी पाठवावा, अशी त्यांनी जिल्हा न्यायालयास आज्ञा केली.

जिल्हा न्यायाधिशाने आपला निष्कर्ष सर्वोच्च न्यायालयास सादर केला. जानेवारी १८९० मध्ये बाळाजी कुसाजी पाटील यांच्या बाजूने निवाडा झाला असे म्हणतात.[1] ह्यामुळे सत्यशोधक समाजाने नेमलेल्या संस्काराप्रमाणे जी लग्ने व्हावयाची ती कायदेशीर आहेत असे तत्त्व निर्विवादपणे प्रस्थापित झाले. हा जोतीरावांचा मोठा विजय झाला. ब्राह्मणेतरांकडे ब्राह्मण पुरोहिताला संस्कार करण्याचा अधिकार आहे असा जो त्याचा दावा होता तो अमान्य झाला. आता त्याला दक्षिणासुद्धा मागण्याचा हक्क राहिला नाही. सत्यशोधक समाजाच्या चळवळीवर दूरवर परिणाम करणारा असा हा सूचक विजय मिळाला.

जोतीराव अर्धांगवायूशी झगडत असताना त्यांच्या अनुयायांनी आपल्या हक्कांसाठी आणि सामाजिक प्रगतीसाठी लढा चालू ठेवलाच होता. जोतीरावांच्या युगप्रवर्तक संदेशामुळे कनिष्ठ समाजात आपले हक्क संपादन करण्यासाठी मोठी जागृती झाली होती. मुंबई नगरपालिकेतील भंग्यांनी १८८९ सालच्या जून आणि जुलैमध्ये आपली गाऱ्हाणी दूर करून घेण्यासाठी लागोपाठ दोन वेळा संप केला होता. अलिबाग नगरपालिकेतील झाडूकामगारांना रस्त्यातील गवत कापण्यास सांगितले म्हणून ऑक्टोबर १८८९ मध्ये महारकामगारांनी संप केला. अलिबाग नगरपालिकेतील भंग्यांनी पगारवाढीची मागणी केली होती. त्या नगरपालिकेने ती धुडकावून लावली होती. त्यामुळे तेथील भंगीही महारांबरोबर संपावर गेले होते. अलिबाग नगरपालिकेने त्यांच्या मागण्या मान्य केल्यावर संप मिटला. त्याच वेळी विधवांच्या केशवपनाच्याविरुद्ध जोतीरावांच्या अनुयायांनी मोठी खळबळ उडवून देणारी चळवळ सुरू केली. ब्राह्मण आणि न्हावी यांच्यामध्ये जी तेढ वाढत होती, तिला कलाटणी देण्याचा जोतीराव विचार करीत होते. विधवांचे

---

१. 'धर्म आणि ब्राह्मण' यात अण्णा बाबाजी लठ्ठे म्हणतात, 'ह्या कज्जांचे पुढे काय झाले हे समजण्यास मार्ग नाही.' पृ. ५६.

केशवपन जबरदस्तीने करण्यात येते असे वृत्त वर्तमानपत्रांमध्ये प्रत्येक महिन्यात येऊ लागले. 'ज्ञानप्रकाशा'ने तर ह्या क्रूर चालीचा अनेक वेळा धिक्कार केला होता. 'ज्ञानोदया'मध्ये अनेक वेळा या चालीचा धिक्कार करण्यात आला होता.

सन १८८० च्या ऑक्टोबर महिन्यात मुंबईच्या 'सुबोधपत्रिके'मध्ये विधवांच्या केशवपनासंबंधी एक स्फुट प्रसिद्ध झाले. त्यात अशी सूचना करण्यात आली होती की जर विधवांचे केशवपन करावयाचेच असेल तर ते एकतर कुटुंबातील स्त्रियांनी करावे किंवा न्हाविणीकडून करवून घ्यावे. नाशिक येथे एक न्हावीण केशवपनाचे काम करीत असे. परंतु तिला जातिबहिष्कृत करण्याची दहशत घालण्यात आली. सार्वजनिक कार्यकर्त्यांनी त्या न्हाविणीला संरक्षण द्यावे. तिला पुण्यास नेऊन तिचा धंदा चालविण्यास तिला साहाय्य करावे. म्हणजे तिला आपला चरितार्थ चालविण्याची पंचाईत पडणार नाही आणि तिच्यावरील संकट टळेल. गतकालात जेव्हा जेव्हा न्हाव्यांनी ब्राह्मणांवर बहिष्कार टाकला तेव्हा तेव्हा ब्राह्मणांनी विधवांचे केशवपन स्वतःच केले. जे आपल्या आयांना, बहिणींना आणि मुलींना केशवपनाच्या भयंकर रूढीपासून वाचवू शकत नाहीत, ते सामाजिक प्रगतीला कधीही साहाय्य करू शकणार नाहीत, असे जोतीराव ब्राह्मणांविषयी म्हणत असत.

केशवपनाचे हे प्रकरण आता पेटू लागले होते. पुण्यातील न्हाव्यांनी विधवांचे केशवपन ह्यापुढे करावयाचे नाही अशी घोषणा केली. तेथे तडजोड झाली. तथापि 'दीनबंधू'ने हे प्रकरण धसास लावण्याचे ठरविले म्हणून केशवपनाच्या चालीच्याविरुद्ध 'दीनबंधू' कारांनी एक लेखमालिका लिहिली आणि न्हाव्यांनी या निष्ठुर चालीस हातभार लावू नये अशी त्यांना कळकळीची विनंती केली. या मालिकेतून जोतीरावांची मनीषा आणि निर्धार ही पुन्हा व्यक्त झाली. जर न्हावी लोक शूर असतील तर ही क्रूर चाल त्यांनी बंदच पाडली पाहिजे, अशी 'दीनबंधू'तील लेखमालिकेने हिरीरीने मागणी केली. 'दीनबंधू'तील लेखमालिकेतील विचारामुळे मुंबईतील थोर पुढारी मामा परमानंद ह्यांनी ह्या प्रश्नाला मोठीच चालना द्यावयाचे ठरविले. मामा परमानंदांना राजकीय ऋषी म्हणत. ते विचारवंतांचे मुकुटमणी. त्यांनी त्या प्रश्नासंबंधी आपले विचार प्रसिद्ध करताच सर्व विचारवंतांचे लक्ष त्या प्रश्नाकडे वेधले गेले. विख्यात पारशी कवी, हिंदी समाजसुधारक आणि निस्पृह संपादक मलबारी यांच्या 'इंडियन स्पेक्टेटर' मध्ये मामा परमानंदांनी २४ फेब्रुवारी १८९० रोजी लेख प्रसिद्ध करून मोठीच खळबळ उडवून दिली.

आपल्या लेखात परमानंद म्हणाले : " 'दीनबंधू'च्या कालच्या प्रशंसनीय मराठी लेखात विधवांच्या केशवपनाच्या रानटी चालीसंबंधी एक लेख आला आहे. तो लेख त्यातील न्हावीसमाजाला दिलेल्या आदेशामुळे स्तुतीस पात्र आहे. इतकेच नव्हे तर ती अमोल नि अलौकिक अशी कल्पना असल्यामुळे संपादकमहाशयांना मुळात एक नवीनच कल्पना काढल्याविषयी श्रेय दिले पाहिजे. मुंबई इलाख्यातील न्हाव्यांच्या हलाखीच्या परिस्थितीशी तुलना करून त्यांनी आपले असे मत दिले आहे की, त्यांची वाईट परिस्थिती

यावयाला न्हावी लोकांचा निष्ठुरपणाच कारणीभूत आहे; कारण ते तरुण विधवा स्त्रियांना त्यांचा निसर्गाने दिलेला ठेवा जो केशसंभार त्याला निर्दयपणे आणि भेकडपणे मुकवितात. ऐन तारुण्यातच नव्हे तर तो सुखाचा आणि आनंदाचा तारुण्याचा काळ निघून गेल्यानंतरही त्या स्त्रियांना न्हावी लोक ज्या निष्ठुरतेने मुकवितात त्या निष्ठुरतेला तोड नाही."

परमानंद आपल्या लेखात पुढे म्हणाले : "काही वर्षांपूर्वी न्हावी लोकांनी ब्राह्मणांच्या विरुद्ध आपल्या जातीची जशी सभा बोलावून विधवांच्या केशवपनापासून त्यांनी परावृत्त व्हावे असा 'दीनबंधू' च्या संपादकाने आदेश दिला आहे. ही कल्पना, त्याविषयी थोडक्यात बोलावयाचे तर, चांगली आणि सद्हेतूने प्रेरित अशीच आहे. विधवांच्या केशवपनाच्या त्या निष्ठुर चालीवर निर्णायक तडाखा देण्याचा त्यात हेतू आहे. केशवपनाची क्रूर चाल, ज्याला हिंदू लोक शास्त्र म्हणतात आणि आधारासाठी पुढे करतात त्या बुजगावण्यालासुद्धा–किंवा वाटल्यास त्याला 'बळी' म्हणा–त्यालासुद्धा मान्य नाही. साधे, सरळ व्यक्तिगत विचार आणि साध्या असंस्कृत ब्राह्मणांची मते ह्यांना लोभी ब्राह्मण पुरोहित उत्तेजन देतात, कारण पैसे खिशात टाकण्यासाठी तो कोणती साधने वापरतो याविषयी त्याला खंत नसते. आता जी कल्पना निघाली आहे ती जर योग्य रीतीने कृतीत आली, तर हिंदू सुधारकांच्या प्रयत्नाला तिचे निर्दाळण करण्यास जेवढे यश आले नाही तेवढे यश येईल. हिंदू सुधारक हे आपल्या लेखांविषयी आणि व्याख्यानांविषयी प्रसिद्ध असतात, सुधारणा घडविण्याकरिता जे नीतिधैर्य लागते ते त्यांच्यामध्ये नाही."

परमानंद आपल्या विवेचनात पुढे म्हणाले, "'दीनबंधू'तील लेखकाच्या एक गोष्ट लक्षात आली नाही. ती अशी की, विधवेचे जे नातलग तिच्या मनाच्याविरुद्ध तिचे केशवपन जबरदस्तीने करवितात ते जेवढे कायद्याला जबाबदार आहेत तेवढेच न्हावीसुद्धा आहेत. जर महत्त्वाच्या शहरांमधून हस्तपत्रिका वाटल्या, तर संपादकांच्या उद्दिष्टांची लोकांना अधिक माहिती होईल. नाहीतर संपादकाचा तो लेख त्याच्या साप्ताहिकामध्येच गडप होऊन राहील. पुरोहितवर्गाच्या सत्तेला बंधन घालण्याचे काम आणि ब्राह्मणी अंधश्रद्धेच्या गुलामगिरीतून अज्ञान जनतेला मुक्त करण्याचे काम 'दीनबंधू' एवढे दुसऱ्या कोणत्याही मराठी वृत्तपत्राने केलेले नाही. बरीचशी वृत्तपत्रे ब्राह्मणांच्या हाती असल्यामुळे ते विधवांच्या केशवपनाला जोराचा विरोध करतील हे संभवनीय आहे. यास्तव प्रत्येक प्रामाणिक सुधारक आमच्याशी सहमत होऊन तुमच्या वृत्तपत्रासारखे वजनदार वर्तमानपत्र 'दीनबंधू'च्या या सूचनेला पाठिंबा देईल अशी आशा आहे. अनेकदा मोठ्या सुधारणा लहान गोष्टींतूनच निर्माण होतात."

मामा परमानंद ह्यांच्या वर उल्लेखिलेल्या पत्रापूर्वी एक आठवडा अगोदर 'इंदुप्रकाश'मध्ये एक जाहिरात[२] आली होती. तीत म्हटले होते की, 'तरुण हिंदू विधवांना

२. इंदुप्रकाश, २४ फेब्रुवारी १८९०.

जबरदस्तीने केशवपनास मान तुकवावी लागते. त्यांच्या ह्या दुःखाचा कळवळा वाळगणारा, असे जाहीर करीत आहे की, जो मनुष्य दंडाधिकाऱ्याकडे ह्या प्रकरणात विधवांचा छळ करण्यास कारणीभूत होणाऱ्या माणसांविरुद्ध हिंदी दंडसंहितेच्या ३५२ कलमप्रमाणे अभियोग करील, त्याला जो काही योग्य खर्च येईल तो द्यावयाला तयार आहे. हा अभियोग ब्राह्मणाच्या कोणत्याही जातीतील अज्ञान मुलीसंबंधी असावा. फिर्यादी हा त्या अज्ञान मुलीचा पालक असावा. जेव्हा आरोपी त्या अज्ञान मुलीचा बाप असेल किंवा दुसरा कोणी मनुष्य पालकाचे कर्तव्य करीत असेल तेव्हा तिच्या सासऱ्याने किंवा तिच्या नवऱ्याच्या कुटुंबातील कोणत्याही माणसाने हा अभियोग केला पाहिजे. अंतिम निर्णय मिळेपर्यंत कोणत्याही परिस्थितीत अभियोग चालविला पाहिजे. ही संधी १८९० सालच्या शेवटापर्यंत कोणालाही घेता येईल. तशी परिस्थिती उत्पन्न झाली तर ती सुरू ठेवण्यास परवानगी मिळेल. या बाबतीतील अर्ज 'सुबोधपत्रिका' किंवा 'इंदुप्रकाश' यांच्या हस्ते 'अ'कडे पाठवावेत. दि. १५ फेब्रुवारी १८९०."

'इंदुप्रकाश'मध्ये ही जाहिरात आल्यावर मामा परमानंदांनी 'इंदुप्रकाशा'त ११ मार्च १८९० रोजी पत्र लिहून, ज्या गृहस्थाने ती जाहिरात दिली होती त्याचे अभिनंदन केले. आपल्या अभिनंदनपर पत्रात मामा परमानंद म्हणाले, "विधवेचे जबरदस्तीने केशवपन करणाऱ्या माणसाविरुद्ध जो फिर्याद करील त्याला तो अभियोग चालविण्यासाठी पैसा पुरविण्यास जो गृहस्थ पुढे आला आहे आणि स्थानिक वृत्तपत्रात त्याने तशी जाहिरात दिली आहे, त्याने न्हाव्यांनाही फौजदारी कृत्यात गुंतवावे असे जे म्हटले आहे ते वाचून आम्हांस अत्यंत समाधान होत आहे. ही बदलत्या काळाची चाहूल आहे. ही जाहिरात न्हाव्याला इशारा देण्यास पुरी आहे."

परमानंद पुढे म्हणाले की, "आणखी आनंदाची गोष्ट अशी की, नाशिकसारख्या सनातनी ब्राह्मणांच्या बालेकिल्ल्यातील एक ब्राह्मण, न्हाव्याच्या तिरस्करणीय कृतीपुढे विधवेला मान तुकवावयास न लावता तिला शुद्ध करून घेण्यासाठी निश्चयपूर्वक पुढे आला आहे. तो धन्यवादास पात्र आहे. नाशिकमधील तो ब्राह्मण ह्याविषयी लिहिताना म्हणतो, 'विधवांच्या केशवपनाची चाल ही पेशव्यांच्या वेळेपासून सुरू झाली. पेशव्यांच्या उदयापूर्वी ती महाराष्ट्राला माहीत नव्हती. सर्वाधिकार गाजविणाऱ्या पेशव्याने त्या काळच्या पतित पुरोहितांच्या वर्गांवर आपल्या जातीचे श्रेष्ठत्व स्थापण्यासाठी पुण्यातील नागझरी येथे एका वेळी सुमारे तीनशे विधवांचे केशवपन जबरदस्तीने करून घेतले. तळेगावच्या पुरोहितवर्गामध्ये ही केशवपनाची पद्धत त्या काळी सुरू असावी असे दिसते. तळेगावातील पुरोहितांशी आपली बरोबरी व्हावी म्हणून त्याने हे कृत्य केले असावे. परंतु ह्या तिरस्कृत चालीस शास्त्रात आधार नाही. हे आता चांगलेच सिद्ध झाले आहे. ते काहीही असो. जे ह्या सुधारणेला विरोध करीत आहेत त्यांनी विरोध करण्यापासून परावृत्त होऊन शहाणपणा दाखवावा हे बरे. तसे करण्याची अद्याप वेळ गेलेली नाही.'"

"नाशिककर ब्राह्मणाच्या ह्या वृत्तांतावरून विधवांचा असा छळ करणाऱ्या लोकांवर देवाचा कसा कोप होतो याची खात्री पटते. गरीब, कोमल आणि निराश्रित अशी ती विधवा तिचा पती हयात असताना त्याचा आसरा असते. आणि त्याच्या निधनानंतर तिला अवर्णनीय अशा हालअपेष्टा भोगाव्या लागतात. पेशव्यांच्या साम्राज्याला जर कोणती गोष्ट भोवली असेल तर ती म्हणजे केशवपनाच्या बाबतीत केलेला छळ ही होय." असे मामा परमानंदांनी आपल्या पत्रात शेवटी म्हटले आहे.

## •२•

आपल्या ८ मार्च १८९०च्या संपादकीय स्फुटामध्ये 'बॉम्बे गॅझेट'च्या संपादकाने म्हटले, 'पतिवियोगाच्या दुःखाच्या वेळी विधवांचे केशवपन करण्याचा अत्याचार न्हावी लोकांनी पुढे करू नये, म्हणून विचारवंत सुधारकांनी जी व्यवहारी चळवळ सुरू केली आहे त्यासंबंधी आमच्याकडे अनेक पत्रे आली आहेत. ही रूढी चालू ठेवण्यासाठी न्हाव्यांचा त्यात जो भाग आहे त्याविषयी न्हावी लोकांना आता लाज वाटत आहे हे पाहून संपादकास आनंद होत आहे. उत्तर हिंदुस्थानमध्ये ही रूढी विशेष कठोर रीतीने पाळण्यात येत नाही. फक्त विशिष्ट पवित्र स्थळी गेल्यावर त्यांना केशवपन करावे लागते.' स्फुटाच्या शेवटी संपादकमहाशय म्हणाले, 'जे विधवांच्या दुःखाच्या वेळी किंवा नंतर केशवपन करण्याचे निंद्य कृत्य करतात अशा न्हावी लोकांना युरोपियन आणि देशी सद्‌गृहस्थ ह्यांनी आपल्याकडे कामास बोलाविले नाही तर ते ठीक होईल.' ही चळवळ चालली असताना काही सनातनी वृत्तपत्रांनी रागाने असे म्हटले की, 'जर न्हाव्यांनी विधवांचे केशवपन केले नाही, तर ब्राह्मण स्वतःच विधवांच्या डोक्यांवर वस्तरा चालवितील.'

मुंबई येथील एल्फिन्स्टन माध्यमिक शाळेच्या पाठीमागे १४ एप्रिल १८९० रोजी न्हावी समाजाची विराट सभा भरली.[3] सभेला सुमारे एक हजारावर न्हावी जमले होते. पोलिसांनी बंदोबस्त चांगला ठेवला होता. 'न्हावी लोकांनी विधवांच्या केशवपनाची रानटी चाल बंद करण्याचा निर्धार केला.' अशा जाहिराती ठिकठिकाणी लावण्यात आल्या होत्या. सदोबा कृष्णाजी नावाच्या एका न्हावी गृहस्थाने सभेचे अध्यक्षपद भूषविले. ह्या सभेत भावना हलवून सोडणारी भाषणे करण्यात आली. स्त्रियांचा अत्यंत चांगला दागिना म्हणजे त्यांचे केस; त्यास त्या निरपराधी विधवांना आपण मुकवीत असल्यामुळे आमच्या धंद्याला उर्जितावस्था येत नाही, असेही एका वक्त्याने म्हटले. म्हणून त्यांनी असा ठराव केला की, यापुढे कोणीही नव्या विधवेचे केशवपन करू नये. न्हावी लोकांनी त्या सूचनेप्रमाणे ते घोर कर्म करावयाचे सोडून दिले. न्हावी लोकांच्या सभेमध्ये प्रामुख्याने भाग घेणाऱ्या गद्रे आणि केळकर ह्या गृहस्थांवर सनातनी मराठी

---

३ The Bombay Gazette, 17 April 1890.

वृत्तपत्रांनी शिव्याशापांचा वर्षाव केला.

मामा परमानंद ह्यांनी पुन्हा एकदा 'बॉंबे गॅझेट'ला[४] पत्र लिहिले. त्यात त्यांनी हिंदुसमाजसुधारकांना आणि त्यांच्या मित्रमंडळींना अशी कळकळीची विनंती केली की, 'ज्या न्हाव्यांनी असे धैर्य आणि मनाचा मोठेपणा दाखविला त्यांना प्रत्येक आठवड्याला त्यांच्या कामाबद्दल एक पैसा अधिक द्यावा.' त्यांनी सुधारक आणि त्याचे स्नेही ह्यांना आणखी एक विनंती केली की, 'ज्या न्हाव्याने नवीन विधवेचे केशवपन केले असेल त्याला आपल्या घरीं येण्यास बंदी करावी.'

सामाजिक स्थित्यंतरामुळे स्पंदन पावत असलेल्या इंग्लंडमध्ये हिंदू विधवांचा आक्रोश आणि त्यांच्या कैवाऱ्यांच्या चळवळीचा आवाज यांचा प्रतिध्वनी उठला. लंडनच्या चॅन्सेरी गल्लीमधील एका तळघरात एप्रिल १८९०च्या दरम्यान न्हाविणींनी सुसज्ज असे एक केशकर्तनालय उघडले. ह्या न्हाविणींनी नीटनेटके कपडे पेहरले होते. त्या रूपाने गोंडस नि तारुण्याने मुसमुसलेल्या दिसत होत्या. त्यांची मनगटे लवचिक होती. पुरुषांपेक्षा अधिक हलक्या हातांनी अन अती कुशलतेने त्यांनी केशकर्तनाचे कार्य पार पाडले. केशकर्तनालयाचा धनी सॅनफ्रॅनसिसको नि माल्टा येथे गेला असता त्याने केशकर्तनकुशल न्हाविणी पाहिल्या होत्या. त्याला स्वानुभवाने कळले की, न्हाव्यापेक्षा न्हाविणी केशकर्तनालयाचे काम अधिक सुलभतेने पार पाडतात. त्यांची मनगटे अधिक लवचिक असतात.[५]

मुंबईतील न्हाव्यांच्या चळवळींची वार्ता कानांवर पडताच लंडनमधील महिलांना हिंदू विधवांविषयी सहानुभूती वाटली. न्हाव्यांचे म्हणणे त्यांना पटले. 'विमेन पेनी पेपर'च्या धन्यांनी मुंबईच्या न्हाव्यांना पत्र पाठवून त्यांचे आभार मानले. आपल्या पत्रात ते म्हणाले, "हिंदुस्थानातील महिलांच्या स्वातंत्र्याचा सन्मान ठेवला पाहिजे ह्याविषयी इंग्लंडमधील महिला अत्यंत उत्सुक आहेत असे आम्ही कृतीने दाखवून देऊ. सर्व ठिकाणी त्यांची गुलामगिरीतून मुक्तता होऊन जसजशी प्रगती होईल, तसतशी त्यांची शांतताप्रधान कालामध्ये प्रगती होत जाईल. गतभर्तृकांच्या केशवपनाची रूढी अत्यंत तिरस्करणीय नि किळसवाणी आहे. ज्यांना त्या रूढीला मान तुकवावी लागते त्यांना ती अधोगतीस नेते."[६]

इंग्लंडातील महिलांच्या सहानुभूतीने भरलेले एक निवेदन 'बॉंबे गॅझेट'कडे पाठविण्यात आले. त्यात त्यांनी म्हटले की, "विमेन पेनी पेपर'चे आम्ही वाचक, मुंबईतील न्हाव्यांनी हिंदू विधवांना अधोगतीस नेणाऱ्या रूढीचे पालन न करण्यात जो धैर्यशील पवित्रा घेतला आहे त्याविषयी त्यांचे आभार मानतो. भारतीय महिलांना नि पुरुषांना

४ The Bombay Gazette, 17 April 1890.

५ Ibid, 25 April 1890.

६ Ibid, 25 April 1890.

यापेक्षा अधिक वैयक्तिक स्वाभिमानाचे नि इतर देशात आदर वाढविणारे उदाहरण कोणी घालून देईल असे आम्हांस वाटत नाही."[७]

आपल्या १७ जून १८९० च्या अंकात "बॉंबे गॅझेट"ने इंग्लंडमधल्या महिलांचे ते निवेदन प्रसिद्ध करून त्यांच्या नावांची यादी ज्या न्हाव्यांना पाहावयाची असेल त्यांनी बॉंबे गॅझेटच्या कचेरीत येऊन पहावी अशी सूचना केली. त्यावर मुंबईतील न्हावी मंडळींनी लंडनमधील महिलांचे आभार मानले.

ह्याविषयी लिहिताना 'इंडियन स्पेक्टेटर' या साप्ताहिकाने आपल्या २२ जून १८९०च्या अंकात म्हटले की, "ज्या राष्ट्राचा स्वातंत्र्य व वैयक्तिक हक्क ह्यासाठी चाललेला झगडा म्हणजे मानवजातीला गुलाम करण्याविरुद्ध अखंडपणे निषेध आहे त्या राष्ट्राकडून असा बंधुभाव नि प्रेमळपणा ही अनपेक्षित नव्हती. त्या भावनांचा प्रतिध्वनी सच्च्या भारतीयांच्या हृदयात उठलाच पाहिजे, आणि विशेषतः ह्या देशाच्या महिला जगताने त्यांच्या सदिच्छेविषयी आभार मानणे त्यांचे कर्तव्य आहे. उलटपक्षी, त्या सहृदयी इंग्रजी महिलांनी विधवांच्या हालअपेष्टा निवारण्यासाठी आणि त्यांना जुलमी नियंत्यांनी नाकारलेले त्यांचे जन्मसिद्ध हक्क संपादन करून देण्यासाठी जी संघटना नि चळवळ सतत करावी लागेल ती करून आपल्या उदार हेतूची व्यवहार्यता पटविली तर ठीक."

सुधारलेल्या इंग्रज महिलांनी भारतीय महिलांना अशी सहानुभूती प्रथमच दाखविली होती असे नाही. त्यांनी १८८६ साली रखमाबाईला साहाय्य केले होते. ह्या बावीस वर्षांच्या महिलेचे तिच्या लहानपणी ज्या गृहस्थाशी लग्न झाले त्या दरिद्री, अक्षरशत्रू नि रोगट नवऱ्याशी संसार करण्यास तिने नकार दिला. मुंबईतील वरिष्ठ न्यायालयाने तिच्याविरुद्ध निकाल दिला. स्त्रीसुधारणावाद्यांनी तिच्या नवऱ्याची समजूत पैसे देऊन केली. नंतर रखमाबाई इंग्लंडला गेल्या. तेथे एप्रिल १८८९मध्ये स्त्रीस्वातंत्र्याची कैवारी म्हणून त्यांचा जयजयकार करण्यात आला. तेथे शिक्षण घेऊन रखमाबाईंनी वैद्यकीची एम. डी. पदवी संपादन केली. पुढे त्यांनी १८९५ पासून गुजरातमधील इस्पितळात मुख्य वैद्यकीय अधिकारी म्हणून नोकरी केली आणि १९३०साली त्या सेवानिवृत्त झाल्या. त्यांच्या जीवनातील एका विशिष्ट घटनेमुळे राष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाच्या अशा एका प्रश्नाशी त्यांचा संबंध आला. अशा ह्या विख्यात बाईंचा अंत एक्याण्णवाव्या वर्षी सेवानिवृत्तीच्या काळात २५ सप्टेंबर १९५५ रोजी मुंबईतील फ्रेंच पुलाजवळील त्यांच्या निवासस्थानी झाला.[८]

हिंदुस्त्रिया आपल्या हक्कांसाठी जागृत होत असता अमेरिकेतील महिला यापूर्वीच दंडाधिकारी, बॅरिस्टर, वैद्य आणि प्राध्यापिका झाल्या होत्या. परंतु इंग्लंडमध्ये महिलांना

७ The Bombay Gazette, 25 April 1890.

८ The Social Service Quarterly, October 1955, p. 57.

अद्याप यावे तसे यश आले नव्हते. अमेरिकेमध्ये नि इंग्लंडमध्ये डॉ. मेरी वॉकर आणि तिची भगिनी डॉ. एलिझ वॉकर यांचा सन्मान करण्यात आला होता.

जोतीरावांनी सतत चाळीस वर्षे अबलोन्नतीसाठी व स्त्रियांच्या स्वातंत्र्यासाठी जिवापाड मेहेनत घेतली होती. भारतीय महिलांची ती अवस्था पाहून त्यांना अत्यंत दुःख होई. त्यांच्या आयुष्यात शेवटी महिलांच्या हक्काविषयी झालेला झगडा म्हणजे रखमाबाई प्रकरण. पहिला झगडा १८८४ साली जोतीरावांच्या प्रेरणेने न्हाव्यांनी केला. 'दीनबंधू'तून त्यांनी न्हाव्यांना चेतावणी दिली. त्यांच्या वीर्यशाली झगड्याने नि स्फोटक चळवळीमुळे खालचा वर्ग आपल्या जन्मसिद्ध हक्कप्रस्थापनेसाठी उभा ठाकला.

जोतीरावांचे हे कार्य किती अवघड, दुष्कर, दुरापास्त होते याची कल्पना खाली उद्धृत केलेल्या जाहिरातीवरून येईल आणि त्यांच्या काळी सामाजिक प्रश्न किती अवघड होते हेही कळेल.

"एक कळकळीचा गुजराती भाषा जाणणारा कार्यकर्ता पाहिजे. त्याला गुजरातमध्ये प्रवास करावा लागेल. बालविवाहाची रूढी टाकून देण्याकडे सर्व जातींचे त्याला मन वळवावे लागेल आणि ह्या बाबतीत निर्बंधात नसेल अशी प्रतिज्ञा करण्यास त्यांना उद्युक्त करावे लागेल. गुजरातची हिंदू सोशल रिफॉर्म असोसिएशन त्याचा खर्च करण्याची व त्याला योग्य असे वेतन देण्याची जबाबदारी घेण्यास तयार आहे. गुजरातमधील व्यक्ती अधिक पसंत केली जाईल. महीपतराम रुपाराम सी. आय. ई. अहमदाबाद यांच्याकडे अर्ज करा."[१] खरे सुधारक आणि खरे देशभक्त भाड्याने मिळत नाहीत. खऱ्या देशसुधारणेची प्रेरणा ही जन्मजात असते. ती प्रसंगाने वा परिस्थितीने प्रदीप्त होते, प्रज्वलित होते.

**. २ .**

जोतीरावांच्या आजारीपणात रे. बाबा पदमनजी त्यांची चौकशी करण्यासाठी गेले. त्यांनी जोतीरावांना अनेक वेळा साहाय्य केले होते. 'ब्राह्मणांचें कसब' ह्या जोतीरावकृत ग्रंथास त्यांनी प्रस्तावना लिहिली होती. जोतीरावांना मनःस्वास्थ्य नि शांतता लाभत होती किंवा नाही आणि जीवितयात्रा संपत आली असता त्यांच्या मनास काही त्रास होतो की काय, अशी त्यांनी पृच्छा केली. प्रशांतपणे तो महान कर्मयोगी उत्तरला की, 'मी समाजाला उपयुक्त असे जीवन निष्काम बुद्धीने जगलो. जीवनकार्याची परिपूर्ती झाली. मला कसलेही भय वाटत नाही. माझे मन पूर्णपणे प्रसन्न नि शांत आहे.'

दुखण्याने उग्र स्वरूप धारण करताच, जोतीराव समजून चुकले की आपली आता इहलोकीची यात्रा संपत आली आहे. सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांना त्यांनी बोलावून घेतले. कनिष्ठ वर्गाच्या उद्धाराचे कांम नेटाने चालू ठेवा असा त्यांनी त्यांना

१ The Indian Spectator, 16 March 1890.

कळकळीने नि शांतपणे उपदेश केला. त्यांना हुंदके आल्याचे पाहून तो महापुरुष त्यांना म्हणाला, "अरे, प्रत्येक प्राणिमात्राला अंत अटळ असतो. ज्या मार्गाने प्राणिमात्र गेले त्याच मार्गाने मी जात आहे. दुःख आवरा.' सौ. सावित्रीबाईंना आणि यशवंतास त्यांनी त्यांच्या स्वाधीन केले आणि त्यांचा सांभाळ करण्यास विनविले. आपली पत्नी आपले कार्य चालू ठेवील नि मुलगा त्या कार्यासाठी जीवित व्यतीत करील असा त्यांना विश्वास वाटत होता. त्या साध्वीने सुमारे पन्नास वर्षे पतीसंगे कडूगोड झेलले होते. जिवापाड कष्ट केले होते. त्यांनी अपार अडचणी सोसल्या आणि जगाकडे पाहण्याची शांत नि विरक्त दृष्टीही अंगी बाणवली होती. ती आपल्या पाठीमागे आपले कार्य सोडणार नाही अशी त्यांची खात्री होती.

सहकाऱ्यांमागून सहकारी, अनुयायांपाठून अनुयायी त्या महात्म्याला भेटावयास येऊ लागले. त्या पुण्यपुरुषाच्या दर्शनाचा लाभ घेऊ लागले. लोखंडे शेजारी बसले. भालेकरांनी प्रणाम केले. ससाणे, डॉ. लाड, रामय्या व्यंकय्या आय्यावारू आणि मोरो विठ्ठल वाळवेकर हे भावनोत्कटपणे दर्शन घेऊन गेले. वाळवेकरांची मैत्री आजन्म टिकली. त्यांनी आपला जिवलग स्नेही आपले 'सार्वजनिक सत्य धर्मपुस्तक' कसे छापावे ह्या विवंचनेत आहे असे पाहून ते पुस्तक स्वखर्चाने छापून देण्याचे वचन मृत्युशय्येवर पडलेल्या त्या आपल्या मित्राला दिले. जोतीरावांच्या मनावरचे एक ओझे त्यामुळे कमी झाले. जोतीरावांनी एका अखंडात आपल्या ह्या अमर स्नेहाची जी स्तुती गायली ती उगाच नव्हे.

जोतीरावांचे उर्वरित आयुष्य सुखात जावे, त्यांचे कुटुंब आर्थिक विवंचनेत न राहवे, असे जोतीरावांच्या मित्रांना नि चाहत्यांना वाटे. बडोद्याच्या महाराजांकडून त्यांना काही साहाय्य मिळावे म्हणून मामा परमानंद यांनी आटोकाट प्रयत्न केले. त्यांचा हा प्रयत्न रामचंद्रपंत धामणस्कर यांच्या मध्यस्थीने चालला होता. 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तका'मध्ये जोतीरावांनी कृतज्ञपणे हे ऋण मान्य केले आहे. नागेश्वरबुवा, डॉ. घोले आणि श्री. सयाजीराव महाराज यांचे त्यांनी केलेल्या साहाय्याविषयी आभार मानले आहेत. हे साहाय्य सयाजीराव महाराजांनी कुटुंबाची तात्काळ सोय व्हावी म्हणून दिले असावे. कायम स्वरूपाची पद्धतशीर अशी ह्या बाबतीत तरतूद व्हावी ह्यासाठी मामा परमानंद, महाराजांशी पत्रव्यवहार करीतच होते.

मामा परमानंद हे मुंबईचे 'राजकीय ऋषी.' त्यांची स्वतःची प्रकृती ठीक नसता-नाही त्यांनी ३१ जुलै १८९० रोजी धामणस्करांना लिहिले की, आपण जोतीरावांच्या कुटुंबाच्या साह्यासाठी पाठविलेला अर्ज महाराजापुढे विचारार्ह ठेवावा. आपल्या त्या प्रभावी निवेदनात 'राजकीय ऋषी' पुढे म्हणतात: "जोतीबांनी आपले जीवित ज्या सार्वजनिक उद्दिष्टांसाठी व्यतीत केले त्याविषयी साधेसुधे निवेदन केले, तर त्यामुळे त्यांनी ज्या वादळी काळात कळकळीने कष्ट केले आहेत त्या काळाचे वा त्यांच्या निःस्वार्थी कार्यांचे परिणामकारक चित्र उभे राहाणार नाही. परंतु माझा असा विश्वास

आहे की महाराज त्यांच्या कार्याविषयी गुणग्राहकता दाखवितील; कारण एका मराठ्याने आपल्या पत्नीस शिकवून तिच्याकरवी ब्राह्मणांच्या मुलींना शिकविण्याचा त्यांच्या बालेकिल्ल्यात प्रयत्न करणे हे मोठे धाडसाचे काम होते. परंतु त्यांच्या बालेकिल्ल्यात राहून महारमांगांसाठी शाळा उघडून आणि त्यांना समाजाचे घटक म्हणून वागविणे म्हणजे सिंहाची आयाळ त्याच्या गुहेतच उपटण्यासारखी गोष्ट आहे. ते कार्य त्यांनी दोन ब्राह्मणमित्रांच्या साह्याने केले. त्यांपैकी एकाने तत्त्वभ्रष्ट होऊन त्यांच्याशी द्रोह केला नि नंतर कालवश झाला. दुसरा अद्याप त्यांच्याशी एकनिष्ठ आहे आणि स्वतःची परिस्थिती चांगली नसताही केवळ आपल्या मित्राची शेवटची इच्छा पूर्ण करण्यासाठी त्याचा एक ग्रंथ स्वतःच्या खर्चाने आपल्या मुद्रणालयात छापून घेत आहे. जर जोतीबांनी आपल्या ऐहिक हिताकडे दुर्लक्ष केले नसते तर त्यांनी पैसा मिळवून एव्हाना ते स्वावलंबी बनून सुखासमाधानात राहिले असते. परंतु त्यांनी निराळाच मार्ग चोखाळला. त्यांनी स्वहिताकडे दुर्लक्ष करून लोकहितासाठी झिजण्यात आयुष्य वेचले. त्यांच्या ठायी आणखी एक अलौकिक गुण आढळून आला. तारुण्य, देखणेपणा नि आरोग्य ह्यांनी त्यांचे व्यक्तिमत्त्व विलसत असता काही दुर्वर्तनी स्त्रियांच्या अपवित्र इच्छेचे ते प्रीतिपात्र बनले होते. परंतु त्या मोहजाळ्यात न पडता जातिवंत विभूतीप्रमाणे ते आचरणाने पवित्र राहिले."

"वरिष्ठ जातींतील पतित विधवांचा सांभाळ त्यांनी अनेक वर्षे पितृवात्सल्याने केला. बालहत्येच्या गुन्ह्यापासून त्यांची सुटका केली. ह्या कार्याने त्यांची उदात्त मानवसेवा दिसून येते. जोतीरावांचे अखेरचे नि सर्वश्रेष्ठ सार्वजनिक सेवाकार्य म्हणजे ज्याला मराठ्यांच्या मनाचे बंधविमोचन असे म्हणतात ते होय. त्या विमोचनाप्रीत्यर्थ त्यांनी आपली वाणी आणि लेखणी वाहिली. त्यासाठी उपदेश नि प्रचार केला. आज दख्खनमध्ये नि इतर ठिकाणी मराठासमाजातील लोक अन्यायाच्या विरुद्ध जी काही जाणीव दाखवीत आहेत किंवा वरिष्ठ समाजाला सपशेल लोटांगण न घालता मतस्वातंत्र्य नि सुधारणा ह्यासाठी आकांक्षा प्रदर्शित करीत आहेत, त्याला जोतीबांचे परिश्रम कारणीभूत आहेत. ही गोष्ट यापूर्वी कधीही घडली नव्हती."

आपल्या ऐतिहासिक मूल्यमापनात 'राजकीय ऋषी' पुढे म्हणतात : "पंचवीस वर्षांपूर्वीचा काळ आठवा. त्या काळी जे तुम्ही ऐकले व पाहिले त्याच्याशी तुमच्या आजच्या विचाराची तुलना करून पाहिलीत, तर माझे म्हणणे तुम्हांला पटेल. अशा तऱ्हेचे जे चैतन्य उत्पन्न झाले आहे त्याचे आपण सार्वत्रिक प्रगतीसाठी उत्सुकता निर्माण झालेल्या ह्या काळात स्वागत केले पाहिजे. परंतु जोतीरावांच्या विचार-जागृतीच्या ह्या कार्यामुळे ते उच्च वर्णीयांच्या मनातून उतरले आणि त्याचा परिणाम असा झाला की त्यांची पूर्वीची सत्कृत्ये लोक विसरले. हे अंशतः साहजिक होते. परंतु दुर्दैवाने जोतीरावांनी आपल्या कठोर भाषेमुळे त्यात अधिकच बिघाड केला. त्यांचे वरिष्ठ वर्गातील स्नेही व सुधारणावादी सहकारी ह्यांनी त्यांच्याकडे पाठ फिरवावी ह्याला काही सबब होती

आणि दुसऱ्या एका ठिकाणच्या बदसल्ल्यामुळे हे घडले."

"जोतीरावांच्या काही अनुयायांनी तर तशीच काही कारणे घडली नसता वा नेत्याची कर्तृत्वशक्ती अंगी नसता त्याच्या चुकांचेच तेवढे अनुकरण करून त्यांच्या सत्कार्यास कलंक लाविला आहे. परंतु जेथे पक्षहितसंबंध गुंतले आहेत तेथे अशी गोष्ट घडणे अपरिहार्य आहे. जोतीरावांच्या बहुतेक टीकाकारांना असे वाटते कीं जोतीबांनी ज्या विशिष्ट परिस्थितीत जे काही केले तशाच परिस्थितीत आपणही तेच करीत आहोत. जोतीरावांचा हा दोष काही अगदीच क्षमार्ह आहे असे म्हणता येणार नाही. तसेच त्यामुळे त्यांचे सत्कार्य नाहीसे होत नाही. किंवा ज्यावेळी सर्व जनतेच्या कृतज्ञतेस ते पात्र आहेत त्या वेळी त्यांच्या विपन्नावस्थेत नि वृद्धापकाळी त्यांच्याकडे दुर्लक्ष करावे हे ठीक नाही. त्यांना साहाय्य करील असा त्यांना धनवान मित्र नाही, आणि अर्धांगवायूने विकल झालेल्या स्थितीत ते आपला विसर पडलेल्या लोकांकडे याचना करावयास जाऊ शकत नाहीत. किंवा ज्या श्रीमंतांनी त्यांच्या कार्याविषयी गुणग्राहकता दाखविली नाही त्यांच्याकडे ते साह्यासाठी खरोखरीच हात पसरणारे नाहीत. आणि म्हणून जेथे गुणग्राहकता आढळत आली आहे अशाच ठिकाणी त्यांनी अर्ज केला आहे. ह्यात तोंडपूजेपणाचा भाग नाही. ते युग केव्हाच लयास केले आहे."

"अर्थातच महाराजांनी कुठच्याही एका बाजूचा पक्ष धरावा अशी माझी इच्छा नाही. ते पक्षपाती आहेत असेही दिसू नये. परंतु जातिनिष्ठ किंवा चुकीची मते किंवा त्रासदायक भाषा यांच्याविषयी सहानुभूती न बाळगता जोतीबांच्या निरपेक्ष नि निःस्वार्थी बुद्धीने केलेल्या कार्याप्रीत्यर्थ त्यांना नि त्यांची पत्नी ह्यांना उर्वरित आयुष्यात जीवन-वेतन महाराज देऊ शकतात; ती स्त्री जोतीबांच्यापेक्षाही अशा साहाय्यास अधिक पात्र आहे. कारण तिने ज्या तऱ्हेने आपल्या नवऱ्यास त्याच्या कार्यात सहकार्य दिले नि त्याच्याबरोबर हालअपेष्टा भोगल्या तशा प्रकारचे कार्य नि धैर्य उच्च शिक्षण घेतलेल्या उच्च जातींमध्येसुद्धा आजपर्यंत कोणी दाखविलेले नाही. खरोखरीच त्या उभयतांच्या लोकसेवेबद्दल सरकारनेच त्यांना मदत करणे योग्य होते. परंतु सांप्रतकाळचे ब्रिटिश सरकार परकीय आहे. ते अशा गोष्टीत लक्ष घालील अशी अपेक्षा करणे व्यर्थ आहे." परमानंदांनी बडोदा महाराजांच्या निदर्शनास तसलेच एक उदाहरण आणून दिले. भारतातील त्या काळचे विख्यात धन्वंतरी नि महान इतिहाससंशोधक डॉ. भाऊ दाजी लाड यांच्या विपन्नावस्थेत हैद्राबादचे दिवाण सर सालरजंग ह्यांनी डॉ. भाऊ दाजी ह्यांचे काही लागत नसतानासुद्धा त्यांच्या विद्वत्तेचा नि कार्यांचा मान ठेवून त्यांना मासिक १०० रुपयांचे निवृत्तिवेतन चालू ठेविले होते.

आपल्या निवेदनाच्या शेवटी परमानंद म्हणाले : "जोतीबा आणि त्यांची पत्नी ह्यांना मासिक तीस रुपयांचे वेतन आता सुरू करावे. ते त्यांच्या उभयतांच्या अंतापर्यंत चालू ठेवावे. त्यांपैकी एकाच्या मृत्यूनंतर कमी करावे. मागे राहिलेल्याच्या मृत्यूनंतर आणि मुलाचे शिक्षण संपल्यावर बंद करावे. आता ही गोष्ट दीर्घकालपर्यंत लांबणीवर टाकता

येणार नाही. ह्यासाठी खर्चसुद्धा फार मोठा होणार नाही. किंवा तो दीर्घकाळ करावा लागणार नाही. एवढीच आमची अपेक्षा आहे."

"आणखी दोन शब्द लिहून मी हे पत्र संपविणार आहे. डॉ. विश्राम घोले हे जोतीबांचे स्नेही आहेत. त्यांच्या परिस्थितीची त्यांना कल्पना आहे. ते त्यांना मोफत औषधोपचार करतात. त्यांनी जोतीबांच्या वतीने पतंगे यांच्याकडून महाराजांस एक पत्र पाठविले होते याविषयी मला काहीच कल्पना नाही. त्यांनी काय लिहिले व त्यांच्या मागणीचे स्वरूप काय होते ह्याची मला कल्पना नाही. परंतु त्या पत्राचे उत्तर पुढील-प्रमाणे आले असे समजते. 'मदतीसाठी अशा प्रकारचे अनेक अर्ज येऊन पडले आहेत. इतक्यातच त्या बाबतीत वचन देता येत नाही. असे महाराज म्हणाले.'" परमानंद पुढे म्हणतातः "अर्धांगवायूमुळे जोतीबा अंथरुणास खिळलेले आहेत. त्यांना जर साहाय्याला उशीर झाला तर मनातला दयाभाव विफल ठरेल."[१०]

ऑगस्ट १८९० च्या तिसऱ्या आठवड्यात परमानंदांनी धामणस्करांना पत्र लिहून जोतीरावांच्या अर्जाविषयी आठवण केली. त्यात ते म्हणाले की, "जोतीबांनी अनेक वर्षे निःस्वार्थ बुद्धीने कार्य केले. ह्या एकाच कारणास्तव त्यांची विनंती मान्य करता येणे शक्य आहे. ज्योतीबा मराठा आहेत म्हणून अर्जातील विनंती मान्य केली असता ती एखाद्या वर्गाला सवलत दिली आहे असा अर्थ होणे शक्य नाही." नाही म्हटले तरी शेवटी योगीराज परमानंदांचा ह्या आळवणीत धीर सुटला आणि ते जरा खोचक शब्दांत म्हणाले : "बडोदे संस्थान आजवर सर्व प्रकारच्या ब्राह्मणांसाठी, मग ते बरे असोत, वाईट असोत, उदासीन असोत, रयतेच्या घामाचा पैसा उधळीत आलेच आहे. त्यांनी एका लायक अशा ब्राह्मणेतरासाठी आणि जो शेतकरी वर्गापैकीही आहे त्यासाठी त्या करापैकी थोडा पैसा खर्च केला तर अनाठायी होणार नाही."

.४.

गुरुवार, २७ नोव्हेंबर १८९० या दिवशी जोतीरावांची प्रकृती चिंताजनक होऊन त्यांचा अंत समीप आला आहे असे चिन्ह दिसू लागले. सायंकाळी पाच वाजता त्यांनी आपल्या रुग्णशय्येजवळ आपल्या नातलगांना बोलावून घेतले. ज्यांनी त्यांनी आपली कर्तव्ये नीतीने नि निर्लोभाने करावीत असा त्यांनी सर्वांना उपदेश केला. आपला हात त्यांच्या मुखावरून फिरवून त्यांना आशीर्वाद दिला. आपल्या पत्नीस बोलावून तिला धीरगंभीरपणे उपदेश केला. ती त्यांच्याकडे दुःखी अंतःकरणाने नि निश्चलपणे पाहत राहिली. यशवंतास त्यांनी धूप घालावयास सांगून ईश्वराची प्रार्थना करावयास सांगितले. स्वतः ते मंद स्वरात प्रार्थना म्हणू लागले. आता विलंब न लावता ईश्वराने आपला स्वीकार करावा, असे त्यांनी निर्माणकर्त्यास विनविले. ते पूर्णपणे शुद्धीत होते. त्यांचे

१०. कुळकर्णी, पु. बा., मामा परमानंद आणि त्यांचा काळ, पृ. ४८२-८७.

वदन प्रसन्न नि प्रशांत होते. मन शांत होते. रात्र पडत चालली तसे त्यांनी हळू हळू आपले नयन बंद करून घेतले. पोटातील पेटके थांबले. ओठावर प्रार्थना रेंगाळत होती. असा प्रशांत नि सुखी अंत थोड्याच थोर पुरुषांच्या वाट्याला येतो. थोर पुरुष मृत्यूला कसे तोंड देतात ही त्यांच्या आयुष्यातली एक महत्त्वाची कसोटी मानली जाते. शेवटी रात्री दोन वाजून वीस मिनिटांनी २८ नोव्हेंबर १८९० रोजी भारतातील त्या नरोत्तमाने आपली इहलोकीची यात्रा संपविली. अशा प्रकारे आधुनिक भारतास सुमारे अर्धशतक तेजाळून टाकणारी ती मानव्याची मंगल ज्योत निमाली. हळू हळू मृत्युशय्येसभोवतालचे हुंदके मंद मंद होत गेले. दुःख निःशब्द झाले. जनताजनार्दन अदृश्य झाला. आणि काही काळ सामान्य जनता निर्नायक झाली.

जोतीरावांच्या मृत्यूची वार्ता वाऱ्यासारखी पसरली. पहाटेस गरीब लोक, स्त्रिया, मुले यांची महात्म्याच्या दर्शनासाठी एकच गर्दी लोटली. आपला महात्मा आपणास सोडून गेला याचे त्यांना अपरिमित दुःख झाले. महात्मा जोतीरावांचे बहुतेक सर्व सहकारी नि चाहते आदल्या दिवशी पुण्यास येऊन राहिले होते. पुण्याजवळील खेड्यांतील सत्य-शोधकांचे थवेच्या थवे शहराकडे लोटू लागले. सकाळी जोतीरावांच्या घराजवळ प्रचंड जनसमुदाय जमला. त्यांचा देह घराच्या पुढील भागात खुर्चीत दर्शनासाठी ठेवण्यात आला. शेकडो गरीबांनी त्यांचे अंत्यदर्शन घेतले. त्यांच्या मार्गदात्याने, उद्धारकर्त्याने आपल्या देहाचे विसर्जन केले होते. सामाजिक न्याय, सामाजिक बंधुभाव आणि सामाजिक समता यांनी परिपूर्ण अशी मानवतेची तेजःपुंज मूर्ती दृष्टीसमोरून आता गुप्त होणार होती. जोतीराव त्यांचा पिता, द्रष्टा नि त्राता होता. त्यांचा शोक अमर्याद होता, अनिवार्य होता, अनिर्वाच्य होता.

दिनांक २८ नोव्हेंबरला सकाळी दहा वाजता जोतीरावांच्या पार्थिव देहाला सुगंधी स्नान घालण्यात आले. त्यांचा नेहेमीचा पोशाख देहावर चढविण्यात आला. शेकडो पुष्पहार घालण्यात आले. नातलग आणि सहकारी यांनी खांदा दिला. प्रेतयात्रेबरोबर ग्यानोबा ससाणे, मोरो विठ्ठल वाळवेकर, डॉ. घोले, कृष्णराव भालेकर, नारायणराव लोखंडे, रामय्या आय्यावारू, पंडित धोंडीराम आणि ब्राह्मण, मुसलमान, महार, मांग आदी सर्व जातींचा नि धर्मांचा प्रचंड जनसमुदाय गंभीरपणे चालू लागला. काही स्त्रियाही त्या प्रेतयात्रेत सामील झाल्या होत्या. रस्त्यांच्या दोन्ही बाजू माणसांच्या हुंदक्यांनी नि अश्रूंनी सजीव झाल्या होत्या. प्रेतयात्रेला स्मशानात पोचण्यास दोन तास लागले. आपले प्रेत पुरावे असे जोतीरावांनी आपल्या मृत्युपत्रात म्हटले होते. ते त्यांच्या सहकाऱ्यांस माहीत नसावे.

पुढाऱ्यांनी आपल्या नेत्याचे शव चितेवर ठेवले. जोतीरावांचे पुत्र यशवंत ह्यांनी प्रार्थना केली. नंतर पुढाऱ्यांची भाषणे झाली. जोतीरावांचे निष्ठावंत सहकारी भाऊ कोंडाजी पाटील ह्यांनी भावनोत्कट असे भाषण केले. आपल्या भाषणात ते म्हणाले, 'ज्या महापुरुषाने आपणा शूद्रादी अतिशूद्रांच्या विमोचनाच्या कार्यासाठी आपले

आयुष्य वेचले, ज्याने कायावाचामनेकरून आपल्या शूद्रादी अतिशूद्रांना मानवी हक्क प्राप्त व्हावे म्हणून झगडा केला, त्याचा सृष्टिनियमाप्रमाणे आज अंत झाला खरा. परंतु त्यांची कीर्तिरूप ध्वजा फारच फडकली आहे, अमर आहे. आपणांपैकी काही जणांस त्यांच्या कर्तृत्वाचे माहात्म्य व त्यांचे उपकार, यांची थोरवी जरी अज्ञान-अंधकारामुळे सध्या कळत नसली तरी जेव्हा लोक सत्यशोध करू लागतील तेव्हा खरोखर त्यांना त्यांची थोरवी कळून येईल व त्यांची पक्की खात्री होईल. त्यांच्या डोळ्यांतून अश्रुपात होईल. आपण त्यांचे उपकार नित्य स्मरणात ठेवू या."[११]

आणखी काही भाषणे झाली. दुपारचे बारा वाजले. यशवंताने जोतीरावांच्या देहास अग्नी दिला. चिता पेटली. जोतीरावांच्या पार्थिव देहाची रक्षा झाली. त्यांची काया अनंतात विलीन होत असता लोकांनी ते अविस्मरणीय दृश्य पाहिले. त्या रक्षेतून महात्म्याचे विभूतिमत्त्व उगवले. लोकसमुदाय माघारा फिरला. जाताना लोक गुणगुणत होते 'ज्याचे होते त्याच्याकडे ते परत गेले.' कित्येक ब्राह्मण मित्रांनी 'धन्य जोतीरावांची' असे उद्गार काढले. उभा महाराष्ट्र हळहळला.

नंतर तिसऱ्या दिवशी अनुयायांनी नि चाहत्यांनी जोतीरावांच्या अस्थी मोठ्या समारंभाने वाजत गाजत पालखीतून त्यांच्या घरी आणल्या. आणि जोतीरावांच्या इच्छेप्रमाणे घरात जी समाधी केली होती तीत त्या ठेवल्या. शेवटी सत्यशोधक समाजाचा जयघोष करून मंडळी घरोघर गेली.[१२]

जोतीरावांचे परममित्र मोरो विठ्ठल वाळवेकर ह्यांनी 'सुबोधपत्रिके'त मृत्युलेख लिहून त्यांची थोरवी गायिली. 'दीनबंधू'ने टाहो फोडला. 'इंदुप्रकाश'ने म्हटले, "रा. रा. जोती गोविंदराव फुले हे निवर्तले, हे ऐकून आम्हांला फार वाईट वाटते. ते मोठे उद्योगी होते, आणि बुद्धिवानही होते. पण त्यांच्या बुद्धीत असे वेड शिरले होते की, या देशातल्या ब्राह्मणांनी, आपल्या कल्याणाकरिता, अन्य जातींच्या लोकांस अज्ञानात ठेवून बुडविले आहे, आणि अन्य जातींचे लोक सर्व प्रकारे जे फार मागासलेले आहेत, त्यास कारण ब्राह्मणांचे कपट आहे. पण हा भ्रम होता. ह्या भ्रमाने त्यांचे मन भ्रमिष्ट झाले होते; आणि त्यामुळे ते ब्राह्मणांकडे द्वेषबुद्धीने पाहत असत, आणखी ब्राह्मणांना शिव्याशाप देणे मोठे पुण्य मानीत असत."

"आणखी एका वर्तमानकर्त्याने असे म्हटले आहे की, सध्या ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर ह्यांच्यामध्ये जे काय वैमनस्य दिसत आहे, ते उत्पन्न होण्यास आणि वाढण्यास कारण हे फुले होत. हे सगळे म्हणणे आम्हांला मान्य नाही."

"इतर जरी कोणती गोष्ट ह्या फुल्यांच्या चरित्रापासून दिसली नाही तरी, हाती धरलेल्या कामात दृढनिश्चयाने परिश्रम कसे करावे, ह्याबद्दल त्यांचा कित्ता चांगला आहे.

---

११. ज्ञानोदय, १२ डिसेंबर १८९०.

१२. —कित्ता—

आपल्या जातीच्या हितार्थ हे फुले जसे कायावाचामनेकरून झटत होते, तसे जर इतर जातींचे लोक आपापल्या जातीच्या लोकांच्या हितार्थ झटतील, आणि त्यात दुराग्रहाचे काही चालू देणार नाहीत, तर त्यापासून अनेक लाभ होण्याची आशा आहे." असा अभिप्राय 'इंदुप्रकाशा'ने व्यक्त केला[१३].

'मराठा समाजाचे कैवारी जोतीराव गोविंदराव फुले-माळी ह्यांचे काल प्रातःकाळी वेताळ पेठेतील त्यांच्या घरी निधन झाले हे जाहीर करण्यास आम्हास वाईट वाटते,' असे वृत्त 'डेली टेलीग्राफ ॲण्ड डेक्कन हेराल्ड,'[१४] पुणे या वृत्तपत्राने दिले आहे. जोतीरावांच्या मृत्यूविषयी लिहिताना 'ज्ञानोदया'ने म्हटले की, "आपल्या देशाचे हित कधी होणे असेल तर ते स्त्रियांस व शेतकरी वगैरे खालच्या प्रतीच्या बहुसमाजास शिक्षण मिळाल्यावाचून व्हायचे नाही असा त्यांचा विचार ठरला." "त्यांनी आपले आयुष्य आपल्या समजुतीप्रमाणे स्वदेशसेवेत, सरकारी चाकरीची किंवा लोकांच्या विरोधाची पर्वा न करिता घालविले. असे निश्चयाचे व कळकळीचे पुरुष आपल्यात हल्ली क्वचितच सापडतील."[१५] अशी पुष्पांजली 'ज्ञानोदया'ने वाहिली. खिस्ती मुलींच्या शिक्षणाच्या कामावर असता त्यांनी मिशनरी लोकांच्या सूचनेवरून खिस्तीधर्माकडे विशेष लक्ष पुरविले. ते स्वर्गीय राज्याच्या अगदी जवळ जवळ पोहोचले, पण त्यांनी सत्याचा प्रकाश सर्वस्वी स्वीकारला नाही ही मोठी दुःखाची गोष्ट आहे, असे 'ज्ञानोदया'ने दुःखाश्रू ढाळले आहेत.

"जोती गोविंदराव फुले हे गेल्या नोव्हेंबरात मरण पावले. हे ब्राह्मणेतरांचे मोठे कैवारी होते. हे वाईट ब्राह्मणांस शिव्या देत असत." असे 'बालबोध'चे संपादक ओक ह्यांनी थोडक्यात चरित्र सांगितले.[१६]

---

१३. इंदुप्रकाश, २९ डिसेंबर १८९०.

१४. The Daily Telegraph And Deccan Herald, 29 November 1890.

१५. ज्ञानोदय, १८ डिसेंबर १८९०.

१६. बालबोध, जानेवारी १८९१.

# २१

## युगसमाप्ती

मामा परमानंद हे जोतीरावांचे जिव्हाळ्याचे हितचिंतक व स्नेही असल्यामुळे त्यांनी सयाजीराव महाराजांचे मन वळविण्याचे प्रयत्न सोडून दिले नाहीत. साध्वी सावित्रीबाई आणि त्यांचा दत्तक पुत्र यशवंतराव ह्यांना काही साहाय्य त्यांच्याकडून मिळावे म्हणून त्यांनी आपले प्रयत्न सुरू ठेविले होते. त्यांनी स्वतः जोतीरावांच्या मृत्युसमयी लहानशी रक्कम गोळा करूनही पाठविली होती. जोतीरावांच्या निधनानंतर त्यांनी रामचंद्रपंत धामणस्करांना पुन्हा पत्र लिहून कळविले की, जोतीरावांच्या कुटुंबासाठी निधी गोळा करण्यात येणार आहे. आपली पत्रे सयाजीराव महाराजांना अत्यंत खासगीरीत्या दाखवावीत, अशी त्यांनी त्यांना सूचना केली.

सरतेशेवटी परमानंद आणि धामणस्कर यांच्या प्रयत्नांना यश आले. सयाजीराव महाराजांनी साध्वी सावित्रीबाई नि यशवंत यांना साहाय्य केले. त्यांनी १८९२ च्या फेब्रुवारीत धामणस्करांच्या हस्ते एक हजार रुपयांची हुंडी मामा परमानंदांकडे पाठवून दिली. ती रक्कम तुकाराम तात्यांच्या एस. नारायण आणि कंपनीत ठेव म्हणून ठेवण्यात आली. त्या रकमेतून त्यांना प्रत्येक तिमाहीस ५० रुपये मिळत असत.

ही व्यवस्था केल्यानंतर काही दिवसांनी महाराजांनी जोतीरावांची स्मृती चिरंतन

राहावी म्हणून त्यांचे एक स्मारक उभारण्याची आपली इच्छा आहे, असे विचार धामणस्करांना बोलून दाखविले. त्याप्रमाणे धामणस्करांनी मामा परमानंदांना पत्र लिहून जोतीरावांच्या स्मारकासाठी एक निधी गोळा करता येईल की कसे ह्याविषयी चौकशी केली. मामा परमानंद हे आजारीपणामुळे दहा वर्षे शरपंजरी पडलेले होते. त्यामुळे त्यांना सयाजीराव महाराजांच्या विचारास मूर्तस्वरूप देणे शक्य झाले नाही. परमानंद १३ सप्टेंबर १८९३ रोजी निधन पावले. त्यांच्यासंबंधी नारायणराव लोखंडे ह्यांनी 'दीनबंधू'त जो मृत्युलेख लिहिला, त्यांत जोतीरावांच्या स्मारकासाठी परमानंद कसे प्रयत्न करीत होते ह्याविषयी त्यांनी उल्लेख केला आहे. 'ते जोतीरावांचे काही स्मारक करण्यासंबंधाने आम्हांस आग्रहाने सुचवीत. पण आमच्यामध्ये सर्वच 'जोतीराव' झाल्यामुळे त्याकडे कोणी लक्ष दिले नाही,' असे लोखंड्यांनी त्यात म्हटले आहे.

जोतीरावांचा मुलगा यशवंत १८९३ साली मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाला. पुढे त्याने वैद्यकीची सनद मिळवून सैन्यात डॉक्टर म्हणून नोकरी पतकरली होती. परंतु दुर्दैवाने ती मातापुत्र पुण्यातील प्लेगच्या पहिल्या भयंकर साथीत १८९७ साली मृत्यू पावली.

भुकेकंगाल झालेले, बुद्धीने खुरटलेले नि अनंत हालअपेष्टा भोगणारे कनिष्ठवर्ग ह्यांच्यावरील सामाजिक अन्याय नि त्यांच्या आर्थिक हालअपेष्टा दूर करण्यासाठी चळवळ करणारे जोतीराव हे पहिले भारतीय नेते होत. गरिबांचे ताप नि दुःखे ह्यांना त्यांनी वाचा फोडली. सामान्य जनता सामाजिक गुलामगिरीत खितपत राहिल्यामुळे तिचा भौतिक व आध्यात्मिक अधःपात हजारो वर्षे होत आला होता. म्हणून त्यांनी सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी आणि त्यांना सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी चळवळ सुरू केली. त्या सामाजिक चळवळीतून त्यांनी मानवप्रतिष्ठेच्या रक्षणासाठी व मानवी हक्कांसाठी अविरत झगडा चालविला; मानवी स्वातंत्र्याचा संदेश मन-प्राण एक करून दिला. सर्व भारतीय हे जन्मतः समान दर्जाचे आहेत असे त्यांनी उद्घोषित केले. नव हिंदुस्थानात व्यक्तिस्वातंत्र्य, समता नि समानसंधी ह्यांसाठी जी नव आकांक्षा निर्माण झाली होती, त्याचे प्रतीक म्हणजे जोतीरावांची ही महान प्रखर चळवळ. जुनी समाजरचना ही ईश्वरप्रणीत, स्वयंभू व चिरंतन नाही. तिची न्याय, बुद्धिप्रामाण्य नि समता ह्यांवर उभारणी केली पाहिजे अशी त्यांची धारणा होती. देवाधीनता नि दैवाधीनता ह्यांपासून कनिष्ठ वर्गांना मुक्त करण्यासाठी जातिसंस्था, पुरोहितशाही नि अवतारवाद ह्यांवर त्यांनी कडाडून हल्ला चढविला. त्यासाठीच त्यांनी आपल्या चळवळीस सामान्य जनतेच्या शिक्षणापासून आरंभ केला. कारण त्यांनी आपल्या मनाशी अशी पक्की खूणगाठ बांधली होती की, मनुष्याला बौद्धिक व आर्थिक साधनांशिवाय संपूर्ण जीवन जगता येणे अशक्य आहे आणि ते तसे पूर्ण जीवन जगणे असेल, तर त्याने विद्येचे साधन जोडले पाहिजे. विद्या प्राप्त झाल्यानेच मनुष्याला संपूर्ण नि समाधानकारक जीवन जगता येईल, अशी त्यांची श्रद्धा होती.

आपल्या ह्या ध्येयसिद्धीसाठी जोतीरावांनी समाजातील विशिष्ट अधिकार उपभोगणाऱ्या

वर्गांच्या परंपरावादी, सनातनी नि प्रतिगामी धोरणावर आसूडाचे फटके ओढले. कारण हेच वर्ग कनिष्ठ वर्गात विद्येचा प्रसार करण्यास विरोध करीत होते. त्याबरोबर अनेक युगे निराश नि हताश होऊन पडलेल्या कनिष्ठ वर्गांच्या निष्क्रिय वृत्तीवर अंकुश चालवून त्यांनी त्यांना आपल्या विमोचनासाठी झडझडून उभे राहून झुंज देण्यासाठी उभे केले. जो समाजातील सडके विचार अन् फसवी मूल्ये झिडकारून द्यायला लावून त्याला निरोगी, समदृष्टी, सक्षम, नि प्रगतिशील बनवितो तोच खरा महापुरुष होय. जोतीरावांना कनिष्ठवर्गातील विद्याप्रसाराला आणि त्याच्या सर्वांगीण स्वातंत्र्याला ब्राह्मणांचा जो प्रचंड विरोध होता तो मोडून काढावयाचा होता. ब्राह्मणांकडे श्रुति-स्मृतींनी समाजनियंत्रणाचे खास अधिकार दिलेले असल्यामुळे सत्तामदांध होऊन 'आम्ही म्हणू ती पूर्वदिशा' अशा वृत्तीने वागणाऱ्या लोकांशी त्यांचे पदोपदी खटके उडावे हे साहजिकच होते.

कोणतीही सामाजिक, धार्मिक वा राजकीय चळवळ ही कडवा, तत्त्ववेडा मनुष्यच हिरीरीने सुरू करून चालवू शकतो. समाजपरिवर्तनासाठी चळवळ करणारा नेता हा सदा एकाच एक कल्पनेने झपाटलेला असतो. त्यामुळे तो बऱ्याच वेळा वृत्तीने एककल्ली व असहिष्णू बनलेला आढळतो. जी शस्त्रे तो कठोरतेने वापरतो ती त्या परिस्थितीला नि प्रसंगाला अनुरूप अशीच असतात. आणि त्याच्या मार्गात जे अडथळे आढळून येतात त्यांच्या स्वरूपाप्रमाणे त्या शस्त्रांचा आकार लहानमोठा होत असतो. जोतीराव हे कनिष्ठवर्गांच्या उद्धाराची चळवळ करणारे केवळ आद्यभारतीय नेते नसून, ते बहिष्काराचे शस्त्र वापरणारे, शेतकऱ्यांना आपली गाऱ्हाणी दूर करून घेण्यास उपदेशिणारे नि कामगारांना आपल्या गाऱ्हाण्यांना वाचा फोडावयास शिकविणारे पहिले भारतीय नेते होत. हिंदी कामगार चळवळ ही सत्यशोधक समाजाच्या एका शाखेतून कशी जन्म पावली ह्याची हकीगत ह्यापूर्वी येऊन गेलीच आहे.

जोतीरावांनी आपली लढाऊ वृत्ती आपल्या कार्यासाठी वापरली. त्यांनी आपली जीवनशक्ती सडक्या समाजाची पुनर्रचना करण्यासाठी, आणि आपली बुद्धिमत्ता लोकांच्या स्वभावात नि आदर्शात आमूलाग्र फरक पडावा म्हणून उदात्तपणे वापरली. त्यांच्या चळवळीमुळे महाराष्ट्रातील कोंडलेल्या जीवनास जबरदस्त हादरा बसून ते उफाळले नि प्रवाही बनले. त्यांच्या भावनेची प्रखरता चाळीस वर्षांपेक्षा अधिक काल टिकली. थोर तत्त्वचिंतक नीत्शे म्हणतो की, मनुष्यास मोठेपणा प्राप्त होतो तो त्याच्या शक्तीमुळे नसून त्याच्या भावनेच्या सातत्यामुळेच लाभतो. जोतीरावांच्या बाबतीत असे भावनेचे सातत्य फार काळ टिकले. आणि ती भावना अतिशय अविभाज्य, अव्यभिचारी नि निर्दोष होती.

आपल्या ध्येयपूर्तीसाठी जोतीरावांनी सर्व तऱ्हेचा मानमरातब, सारी सुखे आणि सारी मानाची स्थाने यांचा त्याग केला. जर त्यांनी समाजपुनर्घटनेच्या ध्येयाचा त्याग केला असता, तर त्यांच्या पायाजवळ ही सर्व सुखे येऊन पडली असती. त्या काळी समाजातील कर्त्या पुरुषांना पदव्या देण्याचा ब्रिटिश सरकारचा रिवाज होता. परंतु जोतीरावांच्या

व्यक्तिमत्त्वाला व्यापण्याएवढे मोठे पंख त्या पदव्यांचे नव्हते. त्यांनी ब्रिटिश महाराज्य-पालांच्या स्वागतासाठी नि मानपत्रासाठी खर्च करू नये म्हणून पुणे नगरपालिकेला विरोध केला होता. आणि राज्यपालांचे मंडईच्या इमारतीला नाव दिले, तरी त्यांनी मंडईच्या नवीन इमारतीला विरोध केला होता.

जोतीराव हे मूलग्राही समाजक्रांतिकारक होते. त्यांनी जरी समाजसुधारकांना साहाय्य केले होते, तरी त्यांना त्यांच्या कार्याविषयी विशेष सहानुभूती होती असे नाही. कारण सुधारक हे विचाराने पुरोगामी असले तरी ते कृतीने परंपरावादी होते. जेव्हा योग्य असूनही एखादी गोष्ट करण्याचे मनुष्य टाळतो, तेव्हा तो समेटासाठी ध्येयाचा त्याग करतो असे समजावे. समाजसुधारकांची वागणूक अशीच होती. दुसरे असे की, वरवर पाहता जरी सुधारकांचे आणि जोतीरावांचे ध्येय समाजसुधारणेचे दिसले तरी त्यांच्या विचारांत मूलभूत फरक होता. जोतीरावांना जातिभेदाचा उच्छेद करावयाचा होता. समाजसुधारक ह्या प्रश्नाची जाणूनबुजून उपेक्षाच करीत असत. जोतीरावांच्या ह्या मूलग्राही विचारांमुळेच 'एकोणिसाव्या शतकातील विचारवंतांत आणि द्रष्ट्यांत अग्रपूजेचा मान जोतीरावांनाच द्यावा लागेल'' असे जे गोवर्धन पारिखांसारख्या विचारवंताने उद्‌गार काढले ते यथार्थच होते. म्हणूनच स्वातंत्र्यवीर सावरकरांनी जोतीरावांचा समाजक्रांतिकारक असा जो गौरव केला आहे तो समर्पक आहे.[२]

जगाची नवीन जडणघडण करू पाहणारे वा नवसमाज निर्माण करू इच्छिणारे महापुरुष कधीही समाजाच्या पारंपरिक चाकोरीतून जात नसतात. त्यांचे मनोधैर्य प्रबळ असल्यामुळे ते कालविरोधी जुनाट चालीरीती, परंपरा, रूढी नि निर्बंध तुडवून पुढे जातात. अज्ञानी लोक नेहमी रूढींच्या दास्यात राहतात. सामान्य जनता तिच्या आज्ञेत राहते. परंतु जीवितध्येयाने धुंद झालेला कर्मवीर ती बंधने झुगारून देतो.

जोतीरावांनी हिंदी स्त्रीची बंधने तोडून टाकण्यास आरंभ केला. आणि तिला स्वातंत्र्याचा मार्ग चोखाळायला समर्थ केले. पुरोहितांनी नि शास्त्र्यांनी कनिष्ठ वर्गाच्या मानेभोवती मानसिक गुलामगिरीचे पाश आवळलेले होते, ते त्यांनी तोडून टाकले. शतकानुशतके अस्पृश्य जनतेला बंधनांत ठेवणारे साखळदंड तोडून टाकले. त्यामुळे नव-जीवनाची पहाट उगवत असल्याची त्यांना खात्री वाटू लागली. शूद्र नि अतिशूद्र ह्यांना पिळून काढणाऱ्या विरुद्ध जोतीरावांनी बोभाटा केला. आणि शेतकरी सुखी तर देश सुखी हे तत्त्व त्यांनी देशाच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला. खरोखर जोतीराव हे बंड करणाऱ्या स्वातंत्र्यदेवीचे मुखवटा होत.

सांप्रतकाळचे स्त्रियांचे हितचिंतक आणि त्यांच्या चळवळीचे इतिहासकार ह्या सर्वांनी जोतीरावांच्या कार्यावर व नावावर विस्मृतीचा पडदा टाकलेला असल्यामुळे हिंदी

---

१. मराठा, २८ नोव्हेंबर १९६१.

२. वीर सावरकरांचीं अभिनव भारत सांगता समयींचीं उत्कृष्ट भाषणें, पृ. ५.

स्त्रियांना आपल्या उद्धारकांमध्ये अग्रदूत कोण होता हे कळणे कठीण झाले आहे. हिंदी स्त्रिया सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यस्मृतीलाही जागत नाहीत. ज्या साध्वीने भारतातील तमोयुगात शिक्षिकेचा पेशा पत्करण्याचे अलौकिक धैर्य दाखवून हिंदी स्त्रीवर लादलेली अन्यायी बंधने झुगारून दिली आणि मुलींना शिकवून हिंदी स्त्रियांचा उद्धार साधण्यासाठी पतीबरोबर सासऱ्याचे घर सोडले, पतिसंगे हालअपेष्टा भोगल्या, शिव्याशाप सहन केले, त्या स्त्रीशिक्षणाच्या अग्रदूतीची हिंदी स्त्रियांनी स्मृती बाळगू नये, ही कृतघ्नपणाची परमावधीच नव्हे काय? एकोणिसाव्या शतकात स्त्रियांच्या उद्धारासाठी व्यतीत केलेले सावित्रीबाईसारखे अन्य आदर्श नि उदात्त उदाहरण क्वचितच आढळून येईल. पंडिता रमाबाईंचे पांडित्य नि भरारी त्यांच्याठायी नसेल. परंतु मंगल धडाडी, निर्व्याज मानवता आणि भारतीय धवलता ह्या गुणांत रमाबाई त्यांची बरोबरी करू शकल्या नाहीत.

जोतीरावांच्या अलौकिक जीवनावरील विस्मृतीचा पडदा आचार्य प्रल्हाद केशव अत्रे ह्यांनी दूर केला. एक नामांकित शिक्षणतज्ज्ञ, अग्रेसर नाटककार, निर्भय, प्रभावी नि वेडरवृत्तीचे पत्रपंडित, सुवर्णपदक विजेते व चित्रपटनिर्माते अशा अष्टपैलू बुद्धीच्या अत्र्यांनी त्यांच्या जीवनावर एक बोलपट काढून त्यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. त्या बोलपटाच्या मुहूर्तसमारंभाच्या वेळी भाषण करताना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, "आजकाल जो उठतो तो राजकारण व चित्रपट ह्यांच्यापाठी लागतो. परंतु समाजसेवेलाही अधिक महत्त्व आहे. कारण समाजसेवेने शीलवर्धन होते. अत्रे ह्यांच्या ह्या बोलपटामुळे समाजसुधारक जोतीराव फुले ह्यांच्याविषयी स्मृती पुन्हा जागृत होईल. कारण म. फुले हे आपल्या महान सुधारकांपैकी एक होत." आचार्य अत्रे ह्यांना ह्या सुंदर नि विचारप्रवर्तक निर्मितीबद्दल राष्ट्राध्यक्षांकडून रौप्यपदक मिळून देशात जोतीरावांच्या कार्यावर स्मृतीची सुमने उधळली गेली.

जोतीरावांचे नाव जोती. आणि जोती म्हणजे ज्योत. त्या ज्योतीने सामाजिक समता, मानवता आणि विवेकवाद ह्यांवर प्रकाश टाकून राष्ट्रास खरा मार्ग दाखविला. त्यांचे उपनाव होते फुले. आणि फुले म्हणजे फुलाचा धंदा करणारे फुलमाळी. त्या माळ्याने राष्ट्ररूपी बागेतील सामाजिक एकतेच्या वाढीला विरोध करणारी तणे नि बांडगुळे उपटून फुलझाडांची उत्तम जोपासना केली. त्यांची सुवासिक सुमने मानवांना उपयुक्त ठरावी हाच त्यांचा उद्देश होता. त्या बागेतील फुलझाडे वाढतच आहेत. त्यांना अद्याप फुलांचा बहर आलेला नाही. जी काही फुले फुलली आहेत त्यांच्यापासून मानवतावादाचा सुगंध दरवळत आहे. ज्याप्रमाणे जातिवंत गायनात स्वाभाविक माधुरी संचरत असते, त्याप्रमाणेच त्या बागेतही स्वाभाविकपणे सुगंध दरवळत असतो.

. २ .

कर्तव्यकर्माचरण हाच जीवनधर्म असे मानणाऱ्या पुरुषांपैकी जोतीराव हे एक होते.

त्यांच्या ठायी प्रचंड इच्छाशक्ती वसत होती. इच्छाशक्ती हीच थोर विभूतींची प्राणशक्ती असते. ह्या शक्तीतूनच जोतीरावांचे सारे सामर्थ्य निर्माण झाले. हे सामर्थ्य त्यांच्या जवळ अमाप होते. ते एकेश्वरी मताचे नीतिवादी असून बुद्धिप्रामाण्यवादी होते. हृदयाचे थोर आणि वृत्तीने उदार असलेले जोतीराव हे प्रत्येक युगात समाजाची सदसद्विवेकबुद्धी जागती ठेवण्याविषयी जागरूक राहणाऱ्या मूलाधार महापुरुषांपैकी एक होत.

ज्याचे हृदय गरीबांसाठी द्रवते तो महात्मा होय. तसे ज्याचे द्रवत नाही तो दुरात्मा. जो जो सामान्य माणसांकडून मिळणाऱ्या पैशाच्या आधारावर शिक्षित झाला असता त्यांच्याकडे दुर्लक्ष करतो, तो तो मनुष्य देशद्रोहीच समजला पाहिजे, असे स्वामी विवेकानंदांनी म्हटले आहे. कनिष्ठ वर्गाच्या उद्धारासाठी ज्यांनी हिंदुस्थानात चळवळी सुरू केल्या असतील, त्यांपैकी तत्त्वचिंतक शेतकरी जोतीरावांसारखे महात्मेपदाला पात्र असलेले नेते हाताच्या बोटावर मोजण्याइतकेसुद्धा झाले नसतील. संत तुकाराम महाराजांनी

जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले ॥
तोचि साधु ओळखावा । देव तेथेचि जाणावा ॥

अशी साधुपुरुषाची लक्षणे सांगितली आहेत. त्याप्रमाणे जोतीराव हे हाडाचे साधुपुरुष होते. जोतीरावांना बुद्ध आणि कबीर ह्यांच्या पंक्तीत बसवून ते महात्मा आहेत असे दलितांचे उद्धारक नि भारताच्या राज्यघटनेचे प्रमुख शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे म्हणत असत ते अगदी यथार्थच होते.

जोतीरावांच्या अंगी एवढे कर्तृत्व नि गुणवत्ता असूनही त्यांच्या वागण्यात अहंकार वा दुःसहता कधीही आढळली नाही. कारण त्यांच्या ठायी महापुरुषाचे आणखी दोन गुण विलसत होते. ते म्हणजे कृतज्ञबुद्धी नि धवल चारित्र्य. कृतघ्नपणा आणि भ्रष्ट चारित्र्य ह्यांमुळे काही अलौकिक पुरुषही पुष्कळदा दुःसह वाटतात.

जोतीराव हे मताच्या बाबतीत आग्रही तर होतेच. नव्या चळवळीस आरंभ करणारा कोणताही नेता स्वतः त्यागी असला तरी तो आपल्या तत्त्वासाठी नि ध्येयपूर्तीसाठी असाच असहिष्णू बनलेला असतो. जोतीरावांचे ठायी असलेले धैर्य ही त्यांच्या आत्म्याची अभिव्यक्ती होती. असले नीति धैर्य सत्यावरील नितांत श्रद्धेतूनच उसळी घेत असते. त्यांच्या ठायी निग्रोंची गुलामगिरी नष्ट करण्यासाठी आपले सारे आयुष्य खर्ची घालणाऱ्या विल्यम विल्बरफोर्सप्रमाणे अन्यायाविरुद्ध उसळणारी तळमळ होती; मार्टिन ल्यूथरप्रमाणे समाजसुधारणेची शक्ती होती. ब्रिटिश सत्तेविरुद्ध जोतीराव बंड करून उठले नाहीत हे खरे. त्यांच्या तरुणपणी ब्रिटिश सत्तेविरुद्ध जी बंडे झाली ती सर्व फसली होती. लोकांच्या अंगात स्वातंत्र्ययुद्ध लढण्यास आवश्यक असलेले त्राण राहिलेले नव्हते. अन्यायी सामाजिक परिस्थिती आणि सतत चालणारी युद्धे ह्यांमुळे त्यांची शक्ती पूर्णतया क्षीण होऊन

ते निपचित पडले होते. शिवाय जोतीरावांना एक सतत भीती वाटत असे की, जर हिंदुस्थान ब्राह्मण नेत्यांच्या सत्तेखाली पुन्हा गेला तर परंपरावादी, प्रतिगामी शक्ती पुन्हा उचल खाल्ल्याशिवाय राहणार नाहीत. ब्रिटिश राज्य आज ना उद्या जाणार अशी त्यांची खात्री असल्यामुळे त्यांना त्याच्याविरुद्ध त्यावेळी उठाव करण्याची निकड भासली नाही. कारण त्या सत्तेने विद्यासंपादण्याचा हक्क, रोजगाराची शाश्वती, शांतपणे उद्योग करण्याची संधी, जलद वाहातुकीची साधने, आपल्या मनाप्रमाणे आयुष्यक्रम ठरविण्याचे स्वातंत्र्य ह्या अत्यंत आवश्यक अशा गरजांची सोय जातीनिरपेक्ष दृष्टीने केली होती. ह्या सोयीमुळे कनिष्ठ वर्गांना उन्नतीचा मार्ग मोकळा होईल असे जोतीरावांना वाटे.

जोतीरावकालीन हिंदुस्थानात नाव घेण्यासारखी अशी राजकीय चळवळ नव्हती. त्या पिढीतील नेत्यांना त्याची कल्पनाही नव्हती. त्यामुळे राजकीय क्रांती घडून येणे अशक्यच होते. स्वातंत्र्याचा लढा करण्यास फारच मोठी तयारी करावी लागली असती. त्यामुळे त्या काळी क्वचितच कोणी क्रांतीच्या मार्गाकडे वळे. आपल्या सहकाऱ्यांनी नि अनुयायांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध बोलावे हे जोतीरावांना आवडत नसे. तसे बोलण्यास ते त्यांना मुभा देत नसत. प्रथम त्यांनी आपले सामाजिक, धार्मिक नि आर्थिक अधिकार मिळवावे असे त्यांना वाटे. जे आपणांस राजकीय क्रांतिकारक समजत त्यांच्या कल्पनेला-देखील सामाजिक पुनर्घटना आणि सामाजिक न्याय ह्या गोष्टी शिवल्या नाहीत. ते केवळ पुनरुज्जीवनवादी होते. त्यांचे राज्य त्यांना परत पाहिजे होते एवढेच.

दामोदरपंत चाफेकर यांचेच उदाहरण घ्या ना. ते धैर्यशालीपणे १८९८ रोजी फाशी गेले. ह्या देशभक्ताला त्या काळच्या समाजसुधारकांविषयी ज्वलंत द्वेष वाटे. त्यांना ते 'धेड' म्हणून धिक्कार करीत. दामोदरपंतांचे बंधूही त्याच प्रतिगामी प्रवृत्तीचे होते. आपल्या आत्मचरित्रात देशी सैनिकांच्या समूहाविषयी लिहिताना दामोदरपंत म्हणतात : "त्या गटातील मराठा सैनिकांशी मी बोलण्याचे सोडून दिले. कारण इंग्रज सैनिकांनी 'ब्राह्मण हे तुमच्या नाशास कारणीभूत आहेत' ह्या कल्पनेने त्यांना चांगलेच झपाटून टाकले होते. माझ्या बुद्धिवान वाचकांना निःसंशय माहीत असणारच की जोतीराव नावाच्या कोण्या एका इसमाने स्थापन केलेली ब्राह्मण-विरोधी संस्था पुण्यामुंबईत अस्तित्वात आहे. इतर सर्व जातींत ब्राह्मणांच्या विरुद्ध द्वेष प्रसृत करणे हेच त्या संस्थेचे एकमेव उद्दिष्ट आहे. त्या संस्थेचे सभासद सर्व ठिकाणी व्याख्याने देऊन ब्राह्मणांविरुद्ध द्वेषभावना निर्माण करीत असतात."

"त्यांचे प्रमुख पत्र," चाफेकर पुढे म्हणतात, "'दीनबंधु' नावाचे साप्ताहिक आहे. ते मुंबईत प्रसिद्ध होते. त्यातील सर्व स्तंभ ब्राह्मणांच्या निंदेने भरलेले असतात. जोतीबा फुले ह्यांच्या मृत्यूनंतर कोणी एक लोखंडे नावाच्या गृहस्थाने त्या चळवळीची सूत्रे हाती घेतली आहेत. हा लोखंडे जरी अक्कलशून्य असला, तरी तो स्वतःच्या देशबांधवांमध्ये कलह निर्माण करण्याचे महत्त्वाचे काम करतो ह्याच एका कारणामुळे

इंग्रजांनी त्याला जे. पी. करून त्याचा बहुमान केला आहे."[३]

ह्या काळातील क्रांतिकारक देशभक्तांना ब्रिटिशांचे राज्य उलथून पाडावयाचे होते. तसे केल्याने त्यांना आपल्या जुन्या राज्यपद्धतीला प्रारंभ करावयास अवसर मिळावयाचा होता. राजकीय स्वातंत्र्यासाठी त्यांनी आपले केलेले बलिदान हे त्यांनी राष्ट्राला समर्पिलेले महान दान होते ह्यात मुळीच संशय नाही. परंतु त्यांच्या बुद्धीत कनिष्ठ वर्गांची दुःखे समजून घेण्याची वा बदलत्या युगधर्माची लक्षणे ओळखण्याची कुवत नव्हती. ते आपली प्राचीन संस्कृती नि परंपरा ह्यांस अंधाभिमानाने चिकटून राहत वर्तमानकाळाकडे लक्ष न देता त्यांचे मन भूतकाळात वावरे आणि त्याचे पुनरागमन व्हावे ह्यासाठी धडपडत असे. ह्या देशभक्तांना वर्तमानकालीन समाजव्यवस्थेविषयी काहीच म्हणावयाचे नव्हते. ज्या समाजव्यवस्थेने त्यांना वंशपरंपरेने सर्वांत वरच्या पायरीवर उभे केले होते आणि बहुजनसमाजाला पायाशी कुजत सडत ठेवून त्यांना उत्कर्षाची संधी ठेवली नव्हती, त्या जातिसंस्थेविषयी त्यांनी ब्रसुद्धा काढला नाही. जे स्वातंत्र्यासाठी अतिशय आक्रोश करतात ते दुसऱ्यांना ते नाकारतात ही म्हण अशा देशभक्तांच्या बाबतीत खरी ठरते. ह्या अशा देशभक्तांपैकी बहुतेकांची मते देशभक्तीच्या अस्पष्ट किंबहुना भ्रामक कल्पनांनी भारलेली होती. नाहीपेक्षा त्यांना आचार्य पी. सी. रे, सी. आर. दास, डॉ. पी. वरदराजलु नायडू ह्यांनी ब्राह्मणशाहीविरुद्ध का टाहो फोडला हे उमजले असते व त्याविषयी त्यांनी विचार केला असता. डॉ. नायडू म्हणाले होते की, "ब्रिटिश साम्राज्यवादाने आमची शरीरे गुलाम केली. परंतु ब्राह्मणशाहीने आमच्या आत्म्यालाच गुलाम केले आहे. ब्रिटिश साम्राज्याने हिंदुस्थानची संपत्ती नेली आणि ब्राह्मणशाहीचे अद्याप सामाजिक नि धार्मिक क्षेत्रात वर्चस्व असल्यामुळे तिने ब्राह्मणेतरांच्या मनातील आत्मसन्मानाची नि स्वातंत्र्याची प्रेरणा मारून टाकली आहे."[४]

राष्ट्रीय सभेचे नेते दादाभाई नौरोजी व सुरेंद्रनाथ बानर्जी ह्यांनी आणि प्रारंभी प्रारंभी लो. टिळक आणि म. गांधी ह्यांनी, हिंदुस्थानातील शासकीय विभागाचे भारतीयकरण करावे अशी मागणी केली होती. नोकरशाही ही केवळ हिंदी असली म्हणजे काम झाले, असे जोतीरावांना कधीच वाटले नाही. शासनसंस्था हिंदी लोकांनी चालविली तरी ती भ्रष्टाचार, लाचलुचपत नि वशिलेबाजी ह्यांपासून मुक्त असली पाहिजे अशी त्यांची मागणी होती. जे लोक लाच घेऊन नि लांड्यालबाड्या करून जनतेच्या आर्थिक हिताचे नुकसान करीत होते त्यांच्या विरुद्ध सरकारने कडक उपाय योजावेत अशी त्यांची मागणी होती. शासनसंस्थेवर कडक नियंत्रण ठेवण्यात सरकार अयशस्वी झाले होते याविषयी त्यांनी अनेकदा सरकारची कानउघाडणी केली. त्या काळी नफेबाज

३ Source Material for a History of Freedom Movement in India Vol. II, p. 987.

४ ब्राह्मण-ब्राह्मणेतर, १६ ऑक्टोबर १९२६.

नि साठेबाज यांच्याविरुद्ध सरकार काही उपाय योजीत नव्हते. त्यामुळे जोतीरावांनी त्याविषयी सरकारचा कडकडून निषेध केला होता.

. ३ .

जोतीरावांनी आपले आयुष्य कनिष्ठ वर्गांच्या सेवेसाठी व्यतीत केले. त्यांच्या अनुयायांची त्यांच्यावर अनन्यसाधारण भक्ती होती. परंतु ते त्यांच्या विचारसरणीप्रमाणे नेहमीच वागू शकले नाहीत. महापुरुषांची विटंबना जसे त्यांचे विरोधक त्यांच्या आयुष्यातच करतात, तसे त्यांचे अनुयायीही त्यांच्या मृत्यूनंतर करतात. जोतीरावांच्या मृत्यूनंतर सत्यशोधक समाजाच्या मतप्रणालीचे रूपांतर त्यांनी ब्राह्मणेतरी राजकीय तत्त्वज्ञानात केले. त्यामुळे ब्राह्मणशाहीला विरोध करण्याची त्यांची जी विवेकनिष्ठ भूमिका होती त्यापासून ते च्युत झाले. चळवळीचे नैतिक अधिष्ठान ढळले. त्याचा परिणाम असा झाला की, त्यांचा पक्ष हा ब्राह्मणजातीविरुद्ध एक शस्त्र बनले. असे त्याला स्वरूप आले. त्यामुळे,

**जरी ब्राह्मण झाला भ्रष्ट । तरी तो तिन्ही लोकीं श्रेष्ठ ॥**

ह्या घोषवाक्याच्या विरुद्ध,

**जरी ब्राह्मण असला श्रेष्ठ । तरी तो मनावा अतिभ्रष्ट ॥**

अशी प्रतिक्रिया म्हणून साऱ्या महाराष्ट्रात प्रतिध्वनी उठत राहिले.

हे मात्र खरे की ब्राह्मणेतर चळवळीने कनिष्ठवर्गांच्या शिक्षणाला चालना दिली आणि त्यांच्या ठायी राजकीय हक्काची जाणीव निर्माण केली. तसेच तिने ब्राह्मण नि इतर वरिष्ठवर्ग ह्यांना सामाजिक समतेचे तत्त्व विचारात घेण्यास भाग पाडले. स्वतः जोतीराव उच्चनीचतेच्या भावनेचा नि अस्पृश्यतेस जन्म देणाऱ्या ब्राह्मणशाहीचा तिरस्कार करीत. ते ब्राह्मणजातीचा तिरस्कार करीत नसत. चांगले ब्राह्मण त्यांचे चाहते होते.

ब्राह्मणेतर चळवळीचे नेते केशवराव जेधे आणि दिनकरराव जवळकर ह्यांनी त्या चळवळीला उचलून धरले. परंतु ते ब्राह्मणद्वेषाने इतके बेभान झाले होते की, त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांना त्यांच्या चळवळीत भाग घेणाऱ्या ब्राह्मण कार्यकर्त्यांना दूर करण्याविषयी प्रकटपणे सुचविले होते. डॉ. आंबेडकर हे भावनेपेक्षा तत्त्वाला अधिक महत्त्व देणारे असल्यामुळे असल्या अतिरिक्ततेला त्यांजकडे थारा मिळण्यासारखा नव्हता. त्यांनी त्या सूचनेचा खरमरीत समाचार घेतला.

सामाजिक वा राजकीय चळवळीस आरंभ करताना नेत्यांनी आपल्या अनुयायांच्या मनात आपल्या भवितव्याविषयी आशा व विश्वास निर्माण केला पाहिजे. ब्राह्मणेतर चळवळीत छत्रपती शाहूमहाराजांव्यतिरिक्त कोणीही तसा प्रयत्न केला नाही. उलटपक्षी, त्यांनी आपल्या अनुयायांच्या मनात ब्राह्मणांविषयी द्वेषभावना वाढविली. इतकेच नव्हे तर, जोतीरावांनी सुरू केलेल्या सामाजिक चळवळीचे रूपांतर ब्राह्मणेतर राजकीय चळवळीत

करून तिला राष्ट्राभिमानापासून दूर ठेविले[५] आणि परक्या राजकीय सत्तेविरुद्ध तिला ब्रही काढू दिला नाही. सामाजिक समतेच्या तत्त्वांकडे त्यांनी दुर्लक्ष केले आणि ज्यांना जोतीराव क्षत्रिय समाजाचे मानीत त्या अस्पृश्यांना ते विसरले. आणि सर्वांवर कळस म्हणूनच की काय त्यांनी ज्यासंस्थेच्या विरुद्ध जोतीरावांनी लढा केला होता ती पुरोहितसंस्था 'क्षत्रिय शंकराचार्यां'ची गादी निर्माण करून सुरू केली. पुढे त्यांनी मंदिर-प्रवेश विधेयकाला मुंबई विधिमंडळात विरोध केला नि जोतीरावांच्या तत्त्वाला काळिमा फासला. आणि माधवराव बागलांसारख्या नेत्यालाही अस्पृश्यता निवारण्याच्या कार्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला.[६] ब्राह्मणेतर समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी भास्करराव जाधवांनी बरीच धडपड केली आणि कर्मवीर भाऊराव पाटील ह्यांनी पराकाष्ठा केली हे खरे आहे. सी. के. बोले हे कनिष्ठ वर्गांच्या नि कामगारांच्या हितासाठी झगडले. त्यांनी समाजातील अनिष्ट चालीरीतींचा नायनाट करण्याचा प्रयत्न केला. तसेच त्यांनी अस्पृश्यतेचे निर्मूलन करण्याच्या कार्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना कळकळीने साह्य केले.

शिवाय ब्राह्मणेतर चळवळीच्या नेत्यांनी आणखी एक चूक अशी केली की, ज्यांच्या-वर जोतीरावांनी हल्ला चढविला होता ते सावकार, जमीनदार, मारवाडी हे केवळ जन्माने ब्राह्मण नाहीत म्हणून आपल्याच पंथाचे आहेत असे त्यांनी मानले. त्यामुळे यशवंतराव चव्हाणांसारखे बाणेदार तरुण पुढारी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरां-सारखे महान पुढारी त्यांच्या चळवळीपासून दूर राहिले. यशवंतरावांना त्या चळवळीत राष्ट्राभिमान आढळला नाही. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना तीत सामाजिक समतेचा लढा लढण्याची तळमळ नाही, असे स्पष्ट दिसून आले.

महाराष्ट्रातील ख्यातनाम इतिहासकार आणि ब्राह्मणेतर चळवळीतील एक तुफानी नेते प्रबोधनकार केशवराव ठाकरे ह्यांनी जोतीरावांच्या ध्वजाखाली चालू असलेल्या ब्राह्मणेतर चळवळीच्या नेत्यांच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घातले. ते म्हणाले की, ब्राह्मणेतर नेत्यांनी शंकराचार्यांची गादी स्थापन करून आणि आपल्या चळवळीत सावकार व जमीनदार घेऊन तिची फार मोठी हानी केली. त्यानंतर शंकरराव मोरे यांच्यासारख्या नेत्यांनी अत्यंत निराशेच्या भरात ती चळवळ दुसऱ्याच अतिरेकी टोकाला नेली. त्यांच्या विचारांतील गोंधळामुळे त्यांनी ती चळवळ मार्क्सवादाला बांधून टाकण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे दोन तत्त्वज्ञानांच्या मिश्रणातून निराळीच खिचडी तयार झाली! यास्तव डॉ. आंबेडकरांना ह्या नेत्यांची पुन्हा एकदा कानउघाडणी करावी लागली. सत्यशोधक समाजाच्या सोळाव्या परिषदेला पाठविलेल्या आपल्या संदेशात ते म्हणाले, "ब्राह्मणेतर वर्गाने महात्मा जोतीराव फुले यांची स्मृती सर्वस्वी पुसूनच

५. प्रसाद, दिवाळी विशेषांक, १९५३, यात केशवराव जेधे यांचा लेख.

६. बागल, माधवराव, जीवनप्रकाश (आत्मवृत्त) पृ १०३.

टाकली आहे असे नसून या वर्गाने त्यांच्या तत्त्वज्ञानास निर्लज्जपणे दगा दिला आहे. सत्यशोधक समाजाचे कार्य अखिल भारतात पोहचले पाहिजे."

जोतीरावांनी ज्या ज्या गोष्टींची आपल्या मनात चित्रे रेखाटली होती, त्यांची त्यांची आता प्रत्यक्ष सृष्टी होऊ घातली आहे. शेतीची जुनी अवजारे नि पद्धती ही हळूहळू बदलत आहेत. ग्रामीण विभागातील मुलांसाठी शिक्षणक्रम वेगळा असला पाहिजे असे जे जोतीरावांचे विचार होते त्या विचारांकडे कोणी फारसे लक्ष दिले नसले, तरी सक्तीचे प्राथमिक शिक्षण आणि त्याबरोबर गरीब विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे ह्यांची सोय सर्व राज्यांत होत आहे. मुलींच्या शिक्षणात प्रगती होत आहे; परंतु ती प्रगती मंद आहे. शेळ्यामेंढ्या, गोधन ह्यांची शास्त्रीय पद्धतीने निपज करण्यात येऊ लागली आहे. जोतीरावांनी आपल्या ध्येयदृष्टीने ज्या गोष्टी पाहिल्या त्या आता देशात घडत आहेत. भारतात आता शेतकऱ्यांना नि कामगारांना चांगले दिवस दिसू लागले आहेत. स्त्रियांना अधिकाधिक स्वातंत्र्य लाभू लागले आहे. त्यांना पुरुषांबरोबर हक्क नि दर्जा लाभला आहे.

देशाभिमान नि धर्माभिमान हे खूळ आहे आणि 'धर्म राज्यभेद मानवा नसावे । सत्याने वर्तावे । ईशासाठी ॥' असे उपदेशिणारे जोतीराव हे प्रायः साऱ्या मानवजातीचे देशभक्त होत. ते खऱ्या महापुरुषाप्रमाणे विश्वपुरुष होत. मानवी हक्क, न्याय, शांतता आणि मानवांची उन्नती ह्यांसाठीच ते जगले. त्यांचे जीवित सत्तासंपादनाच्या उद्दिष्टाने स्फुरलेले नव्हते. सामाजिक समता मानणारा धर्म त्यांना हवा होता. सर्व समाजाची धारणा करील असा सार्वजनिक सत्यधर्म त्यांना हवा होता. त्या धर्मात न्याय, सहकार नि बुद्धिप्रामाण्य ही तत्त्वे अभिप्रेत होती. तरीसुद्धा ज्या अर्थाने येशू ख्रिस्त नि गौतमबुद्ध हे धार्मिक होते, त्या अर्थाने जोतीराव धार्मिक नव्हते. ते देववेडेही नव्हते. आत्म्याच्या मुक्तीचा त्यांना ध्यास नव्हता. जोतीरावांच्या ठायी धार्मिकतेपेक्षा सामाजिक, नैतिक आणि बौद्धिक विचारांचे अधिक प्राबल्य होते. त्यांनी अवतारकल्पनेवर शौर्यशाली नि बुद्धिनिष्ठ हल्ला केला, तो त्या वेळी समाजाला जबरदस्त धक्का देणारा होता. ईश्वर संकटाच्या वेळी अवतार घेऊन धावून येतो, सर्व काही प्रारब्धाप्रमाणेच घडते ह्या खोट्या कल्पनांपासून त्यांना कनिष्ठवर्गातील हिंदूंना मुक्त करावयाचे होते. त्यांच्याठायी स्वावलंबनाची वृत्ती निर्माण करून त्यांनी आपल्या आत्मसन्मानासाठी आणि मानवी हक्कांसाठी उभे राहवे असा त्यांनी प्रयत्न केला. एका कुटुंबातील व्यक्तींनी आपापल्या मताप्रमाणे वाटेल तो धर्म स्वीकारावा आणि बंधुभावाने वागावे हे त्यांचे मत त्यांच्या विश्वधर्माचे प्रतीक आहे.

जोतीरावांचा असा अढळ विश्वास होता की, बायबल, कुराण आणि वेद ह्यांच्यासारखे पवित्र ग्रंथ हे ईश्वरनिर्मित नसून मनुष्यनिर्मित होत. 'त्यांपैकी एकाही ग्रंथात आरंभापासून शेवटापर्यंत सारखे सार्वजनिक सत्य नाही,' असे त्यांचे मत होते. त्यांच्या चळवळीमुळे महाराष्ट्रीय कनिष्ठ वर्गातील धर्मांतर मंदावून त्यांचे अराष्ट्रीयकरण

थांबले ही लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे. त्यांच्या काळात पुणे येथे वा महाराष्ट्रातील इतर ठिकाणी मुसलमानांचा जातीय प्रश्न उद्‌भवला नव्हता. ते समदृष्टी होते. त्यांचे विचार जातीयवाद नि राष्ट्रवाद यांच्या पलीकडे गेलेले होते. त्यांना चांगल्या विचाराचा, शिक्षणसंपन्न, समतेच्या नि स्वातंत्र्याच्या विचारांनी भारलेला असा समाज निर्माण करावयाचा होता. राजकीय स्वातंत्र्य हे सामाजिक समतेविना स्थिर समाजरचना निर्माण करू शकत नाही. जर सामाजिक नि आर्थिक बाबतीत दलित नि मागासलेले वर्ग यांना उत्कर्षाची संधी दिली नाही, तर स्वातंत्र्याला नि राजकीय लोकशाहीला धोका निर्माण होतो. आदर्श समाज निर्माण करू पाहणाऱ्यांनी हे दोष टाळले पाहिजेत.

**.४.**

जोतीरावांच्याविषयी त्यांच्या काळच्या ब्राह्मण समाजाच्या मनात जे दूषित पूर्वग्रह होते ते आजही काही सुशिक्षित ब्राह्मणांमध्ये नाहीत असे नाही. ज्यांचा देशाभिमान, विचार नि ज्ञान चिपळूणकर-टिळक यांच्या पलीकडे पाहू शकत नाही, समाज म्हणजे काय नि त्याची व्याप्ती किती आहे ह्याविषयी ज्यांनी कधी विचार केलेला नाही आणि जे पुण्यातील संकुचित सामाजिक विचारप्रणालीने भारलेले आहेत अशा लोकांना वाटते की, ब्राह्मणेतरांना भक्ती करावयाला एक विभूती पाहिजे म्हणून त्यांनी जोतीराव फुले यांची मूर्ती लोकमान्य टिळक यांच्याविरुद्ध उभी केली आहे. अशाच तऱ्हेच्या लोकांनी काही ब्राह्मणेतर पामरांना १९२५ साली हाती धरून जोतीरावांचा पुतळा पुणे नगरपालिकेने उभारू नये म्हणून कडवा विरोध केला. त्या काळी ब्राह्मण नि ब्राह्मणेतर ह्यांच्यामध्ये जी शब्दांची लढाई झाली ती पुतळ्याची लढाई म्हणून प्रसिद्ध आहे. तथापि त्यानंतर जोतीरावांचे पुतळे अनेक ठिकाणी जनतेकडून उत्साहाने उभारले गेले.

जोतीरावांची जन्मशताब्दी सर्व महाराष्ट्रात मोठ्या उत्साहाने नि कृतज्ञतेने साजरी करण्यात आली. त्यानंतर तेहतीस वर्षांनी सध्याचे भारताचे गृहमंत्री यशवंतराव चव्हाण जे भारताचे काही वर्षे संरक्षणमंत्रीही होते, त्यांनी जेव्हा नवमहाराष्ट्रराज्याच्या मुख्यमंत्रीपदाची सूत्रे उचलली, तेव्हा म्हटले की, 'ज्ञानेश्वर, शिवाजी, महात्मा फुले आणि लोकमान्य टिळक ही महाराष्ट्राची प्रतीके[७] होत. ह्यानंतर काही दिवसांनी मुंबईत फुले-तांत्रिक माध्यमिक शाळेचे उद्‌घाटन करतेवेळी भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू म्हणाले की, ज्या काळात महात्मा फुले स्त्रीशिक्षणासाठी आणि अस्पृश्यता निवारण्यासाठी लढले ते दिवस असे होते की त्यांना कोणत्याही तऱ्हेची कुठूनही मदत मिळणे अशक्य होते.[८] भारतीय लोकशाहीत शेतकरी नि कामगार ह्यांचा जसजसा उत्कर्ष होत जाईल तसतसे जोतीरावांचे व्यक्तिमत्त्व इतिहासात उठावदार होत

---

७. चव्हाण, यशवंतराव, सह्याद्रीचे वारे, पृ. ५८.

८. Siddharth College of Law, Magazine, 1963-64.

जाईल हाच वरील भाषणांचा मथितार्थ आहे.

जोतीरावांच्या मृत्यूनंतर रामय्या व्यंकय्या आय्यावारू, भास्करराव जाधव, भाऊराव पाटील, केशवराव जेधे आणि दिनकरराव जवळकर ह्यांनी आपल्या गुरूच्या उपदेशाप्रमाणे यथाशक्ती कार्य केले. परंतु ज्या कार्याने कनिष्ठ वर्गांतील हजारो लोकांचे हित झाले नि महाराष्ट्रात मोठे सामाजिक स्थित्यंतर घडवून आणले ते कार्य शाहू महाराजांच्या परिश्रमामुळे नि पोटतिडकेमुळे झाले हे विसरून चालणार नाही. सांप्रत महाराष्ट्रात जे ब्राह्मणेतर नेते राजकीय, सामाजिक नि शैक्षणिक क्षेत्रांत उदय पावलेले दिसतात, त्यांचा उगम जे अनेक वर्षे सत्यशोधकांचे शक्तिकेंद्र बनले होते, त्या शाहूमहाराजांचे परिश्रम नि त्यांनी केलेले कनिष्ठ वर्गांच्या विमोचनाचे कार्य ह्यांपासून झाला आहे. हे सत्य आहे. तथापि जर ब्राह्मणेतर नेत्यांनी ब्राह्मणेतर समाजाचा स्वाभिमान नि आत्मोन्नती ही जागृत करण्यावर अधिक भर दिला असता, तर त्यांचे कार्य अधिक यशस्वी नि प्रभावी झाले असते.

म. जोतीरावांची स्तुती करणाऱ्या कित्येक पुढाऱ्यांना समता, बंधुता नि स्वातंत्र्य मानणाऱ्या त्यांच्या जातिभेदोच्छेदक विचारप्रणालीविषयी विशेष उत्साह वा खरी तळमळ वाटत नाही. सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रांत ब्राह्मणेतर बरेच मागे पडलेले आहेत. त्यांच्या उद्धारासाठी जोतीरावांनी अनेक वर्षे प्रचंड परिश्रम केले आणि त्यांच्या शिक्षणाला सयाजीरावमहाराज, शाहूमहाराज, माधवराव शिंदे, भास्करराव जाधव आणि भाऊराव पाटील यांनी जोराची चालना दिली, तरी त्यांच्या ठायी उच्च शिक्षण, उच्च दर्जाची विद्वत्ता, स्पर्धा, आत्मोन्नती ह्यांविषयींच्या आस्थेचा अद्याप अभाव आहे. त्याविषयी त्यांना जेवढी तळमळ असावयास हवी तेवढी नाही. तेसुद्धा आत्मसंतुष्ट असून जे काही गाठचे आहे ते जाईल अशी भीती बाळगणारे असल्यामुळे ध्येयसिद्धीसाठी लागणारा त्याग करावयास तयार नाहीत. त्यांच्या प्रतिष्ठेचा उगम त्याग, झगडा नि ज्ञानाची परंपरा ह्यांत होत नसल्यामुळे त्यांच्यापैकी बऱ्याच अव्वल दर्जाच्या कार्यकर्त्यांना वा विद्यार्थ्यांना लवकर बुद्धिमांद्य येते, ते लवकर थकतात अथवा दुसऱ्याच्या प्रभावाखाली निष्प्रभ होऊन राहतात. त्यामुळे अखिल भारतीय क्षेत्रात त्यागसंपन्न नि ज्ञानसंपन्न बंगाली ब्राह्मणेतरांप्रमाणे त्यांचा प्रभाव पडत नाही.

ब्राह्मणेतरांच्या ठायी दुसरी एक उणीव आढळून आली. ती अशी की, शाहूमहाराज व भाऊराव पाटील ह्यांव्यतिरिक्त दुसरा कोणताही ब्राह्मणेतर नेता, ऐंशी वर्षांच्या पूर्वी कनिष्ठ वर्गांच्या ज्या थरापर्यंत जोतीराव पोचले होते त्या थरापर्यंत पोचू शकला नाही. कर्मवीर विठ्ठलराव शिंदे ह्यांनी आपले जीवित अस्पृश्यतानिवारणासाठी वेचले. ते इतर अनेक प्रार्थनासमाजवाद्यांप्रमाणे जोतीरावांचे मोठे भक्त होते. अस्पृश्यतेचे निर्दाळण करण्याच्या कार्यात जोतीरावांच्या नावासंगे नाव घेण्यासारखे ते एकच एक पुरुष ब्राह्मणेतरांत निर्माण झाले.

'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक' यांत जोतीरावांनी एक भविष्य वर्तविले होते की,

' आर्यभटांनी नीच मानलेल्या सर्व शूद्रादी अतिशूद्रांसह भिल्ल कोळी वगैरे मानव बांधवांनी आपआपल्या कन्यापुत्रांस शाळेमध्ये पाठवून त्या सर्वांस सत्यज्ञान शिकविण्यास प्रारंभ करावा म्हणजे काही काळाने आपल्या सर्वांच्या मुलीमुलांस सत्यज्ञान प्राप्त झाल्याबरोबर त्यांतून शूद्र वगैऱ्यांतील एखादा सत्पुरुष आपल्या सर्वांच्या समाधीवर पुष्पवृष्टी करून आपल्या सर्वांच्या नांवाने उल्हास करील, असे मी स्वसंतोषानें भविष्य करितो.'[९] यास्तव जेव्हा महान पंडित डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या अलौकिक धैर्याने दलितांच्या मानवी हक्कासाठी लढा केला आणि जेव्हा भारताच्या घटनेचे प्रमुख शिल्पकार म्हणून, घटनेच्या तिसऱ्या वाचनानंतर, त्यांचा भारतात अपूर्व असा गौरव झाला तेव्हा जोतीरावांनी वर्तविलेले भविष्य खरे ठरल्याचा प्रत्यय आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर केलेला पुष्पवर्षाव ज्यांना ते स्वतः गुरू मानीत त्या जोतीरावांच्या समाधीवर एक प्रकारे झाला हे सांगावयास नकोच. त्यांच्या आत्म्याला अतीव आनंद झाला असेल!

सत्यशोधक समाजाचा शतसांवत्सरिक उत्सव २४ सप्टेंबर १९७३ रोजी होईल. चिमुकला प्रार्थना समाज आपले आयुष्य शांतपणे नि सहनशीलपणे कंठीत आहे. ब्राह्म समाज हे नाव एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी शेवटी निंदाविषय बनले'[१०] होते, असे मोतिलाल घोष ह्यांनी म्हटले आहे. परंतु सत्यशोधक समाजाचे कार्य महाराष्ट्रात इतस्ततः पसरलेल्या असंख्य अनुयायांनी नि भक्तांनी धैर्याने चालू ठेवलेले आहे. भोळ्या समजुती, अज्ञान, पूर्वग्रह आणि कर्मकांडे ह्यांपासून खेडी आज पूर्णतया विमुक्त झाली आहेत असे नाही! ज्या लाचलुचपतीविरुद्ध नि पिळवणुकीविरुद्ध जोतीरावांनी आकाशपाताळ एक केले, ती लाचलुचपत नि पिळवणूक, जरी आता ब्राह्मण कनिष्ठ वर्गांची पिळवणूक करणारे राहिले नसले तरी, चालू आहेच. यास्तव महाराष्ट्र जोतिरावांचे स्मरण आजही आंग्ल कवि वर्डस्वर्थ ह्याच्या शब्दांत करीत आहे, "जर ह्यावेळी तू आमच्यामध्ये असतास!" विश्वातील सर्व महापुरुषांनी आपल्या काळात आपापल्या भाषेत व देशात मानवोत्कर्षाची एकच शिकवण दिली. ज्याप्रमाणे प्रत्येक सूर्योदयाबरोबर नवा दिवस उगवतो त्याप्रमाणे प्रत्येक महापुरुष मानवांपुढे उत्कर्षाची नवी संधी ठेवतो. जोतीरावांनी आपल्या जीवनात तीच गोष्ट केली.

तत्त्वचिंतक जोतीराव हे 'सत्यमेव जयते' ह्या अमर संदेशाचा पुनरुच्चार करणारे आधुनिक भारतातील पहिले महापुरुष होत. आपल्या पत्र लिहिण्याच्या कागदावर ते हे ब्रीदवाक्य लिहीत असत! भारतातील महान संतपुरुषांनी त्या संदेशावर भर दिलेला आहे. त्या संदेशातील तत्त्व हे हिंदु संस्कृतीची नि परंपरेची मुख्य प्रेरणा आहे. सत्याच्या संदेशाने जोतीरावांचे व्यक्तिमत्त्व अगदी भारलेले होते. 'जो सत्याचा निष्ठावंत पुजारी असतो त्याला मोक्षलाभ हा व्हायचाच.' जोतीरावांनी सत्य हीच आपली

९ फुले, जोतीराव गोविंदराव, सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक, पृ. १२३-२४.

१० कुळकर्णी, पु. वा., मामा परमानंद आणि त्यांचा काळ, पृ. ५०३.

पूजनीय देवता मानून तिचीच भक्ती केली, तिच्या नावाची पताका घेऊन तिच्या संदेशाच्या प्रचारार्थ ते आयुष्यभर कायावाचामनेकरून झटले. जेव्हा महात्मा गांधी चार वर्षांचे होते तेव्हा जोतीराव आपल्या प्रभावी व अनुभवयुक्त वाणीने सत्यशोधक समाजसंस्थेतून सत्याच्या संदेशाचा उपदेश करीत राहिलेले होते.

वीर्यशाली, उदात्त नि नैतिक उद्दिष्टांनी भारावलेले जोतीरावांचे व्यक्तिमत्त्व हे उच्च आध्यात्मिक पातळीवर अधिष्ठित झालेले आहे. सत्य, समता आणि मानवतावाद ह्यांच्या शिकवणीवर त्यांचा भर असल्यामुळे भारताच्या इतिहासात त्यांचे स्थान भारतातील महान विचारवंत नि संत ह्यांच्या मालिकेत विलक्षत आहे. ह्या मालिकेत भगवान बुद्ध मध्यभागी विराजत आहे. आजूबाजूला महान सुधारक, विचारवंत नि परंपरागत समाजव्यवस्था मोडून दुसरी उभारू पाहणारे बंडखोर हे प्रकाशत आहेत. जेव्हा भारतीय लोक सामाजिक नि आर्थिक समतेचे ध्येय गाठतील आणि प्रत्येक मनुष्य ‘मी स्वतः जे हक्क उपभोगीत आहे ते दुसऱ्यासही उपभोगिता आलेच पाहिजेत’ असे म्हणेल, तेव्हाच जोतीरावांचे स्वप्न नि ध्येय प्रत्यक्षात अवतरले व पूर्ण झाले असे म्हणण्याचा सुयोग येईल.

८९३.७५
२५७०६८

# सूची


अंडरसन ६४
अतिशूद्रांचे शिक्षण (अस्पृश्यांचे) ६०, ६१, ७८, ८१, ९२, ९३
अत्रे, आचार्य प्र. के. ३११
*अंबालहरी* २७५
*अरुणोदय* २२८-२९
अस्पृश्य (अतिशूद्र, अंत्यज, महारमांग) २८, २९, ३५, ६४, ६५, ७८, ८१, ९१, ९३, १११–१२, १५८, १७२, २२६-२७, २४८, ३१०
अस्पृश्य मुलीचा निबंध ४७, ४८
*अस्पृश्यांची कैफियत* २४७
आकाशवाणी २७३-७४
आगरकर, गोपाळ गणेश २३, ५२, ९०, १९०, १९२-९३
आपटे, महादेव चिमणाजी २६९
आंबेडकर, डॉ. बाबासाहेब १३६, १५०, १६८, २५१, ३१२, ३१५-१६, ३१९
आय्यावारू, रामय्या व्यंकय्या १५४, १६२, २३९, २६६
आर्य समाज १६८-६९
आरनॉल्ड, एडविन ९१
आळतेकर, प्रा. मा. दा. ९०
*इंडियन स्पेक्टेटर* १०७, २१९, २७५, २९३
*इंदुप्रकाश* ११०, २१८-१९ २३२, २९४-९५, ३०५
इमर्सन, १५७
उरवणे, रामशेट बापूशेट १५४, १६०, १९१
एकनाथ, संत ३५, ४२
एल्फिन्स्टन, माऊंट स्टुअर्ट ६, ६१, ६७
एलेन बरो, लॉर्ड (शिक्षणविषयक धोरण) ६२, ६७, ७०
*ओरिएन्टल खिश्चन स्पेक्टेटर* ८३
कनिष्ठ वर्गाचे शिक्षण व त्याला विरोध ५५, ५६, ५८, ६०-६५, ८०
कबीर ३१२
*कम्युनिस्ट जाहीरनामा* २३
कल्पतरू १७६
कल्याणोन्नायक मंडळी १२४
कर्वे, महर्षी धों. वि. २३, ५२
कार्लाईल १२२
कीझ, न्यायाधीश ७५
कुकडे, शाहूराव १४८
कुंटे, म. मो. ६५, ११७, १७२, १९६
कुंभार, पंडित धों. ना. ८५, ८७, १६० ३०४
*कुराण* १४८, १५८, २८७, २८९ ३१७
केशवपनबंदीची चळवळ २९३-९८

केसरी १९०, १९१, २०४
केळकर, साहित्यसम्राट न. चिं. २३, १९०
कॅन्डी, मेजर थॉमस ३४, ४३, ४५, ५०, ५९, ६०, ७२, ७५
खराटे, ग. वा. १५५
खानोलकर, गं. दे. २४
ख्रिस्त, येशू ८५, १४८, ३१७
ख्रिस्तीधर्म १७, ६७, ७०, २१९, ३०६
गजेंद्रगडकर, न्या. प्र. बा. १४७, ४८
गद्रे, अनंत हरी ९८
गांधी, महात्मा मो. क. ३५, ५२, १७२, २२०, २६६, ३१४
गायकवाड, महाराज सयाजीराव २०५–०६, २३६–३७, २४१, २६९, ३००–०३, ३१९
गावडे, डॉ. सदोबा १४५, १५५, २३९
गीता १५०
'समाजसेवक पाहिजे', जाहिरात २९९
गुंजीकर, रा. भि. १३७–३९, २५२
गुढीपाडव्याची मिरवणूक २३८
गुलामगिरी १७, १८, ७९, ८२, ९०, १६०, १६८–६९
गोखले, गोपाळ कृष्ण २३, १४५
गोमांसबंदी २१५
गोवंडे, सदाशिव ब. १५, १६, २८, २९, ३३, ४५, ७७, १२३–२४, १५५, २२१, २६१
गौतम बुद्ध १४२, ३१२, ३१७, ३२१
घोले, डॉ. विश्राम रा. १५४, १६०, १७३, १९२, २७२, २८२, ३००, ३०३–०४
घोष, मोतिलाल ३२०
चंदावरकर, सर नारायण १२३
चव्हाण, भिकोबादादा १४७
चव्हाण, यशवंतराव ३१६, ३१८
चाफेकर, दामोदर ३१३
चिपळूणकर, अण्णासाहेब ३५, ४० ७४, ७९, ९१
चिपळूणकर, कृष्णशास्त्री २३, ३६, ७२, ७९, १००
चिपळूणकर, विष्णुशास्त्री ५२, १६०, १६६–७२, १८२, १९१–९२
चिपळूणकर, हरि रावजी १८८, २०३, २६३–६४
चोखामेळा, संत १४६, १४८
छत्रे, प्रा. केरो लक्ष्मण ७२, ७५, ७९, १९२
जगन्नाथ शंकरशेट (नाना) २३, २५, ४४, ६८
जयकर, राम बाळकृष्ण ६६, ११६
जवळकर, दिनकरराव ३१५, ३१९
जातिभेद विवेकसार १०६–०९, १६९
जाधव, भास्करराव १५०, ३१९
जांभेकर, बाळशास्त्री २३–२५, ६८
जेधे, केशवराव ३१५, ३१९
जोशी, ना. वि. (पुणेंवर्णनकर्ते) ५, ११६
जोशी, सार्वजनिक काका १२३
टागोर, गुरुदेव रवींद्र २२०
टागोर, देवेंद्रनाथ १४७
टिकेकर, श्री. रा. ४, ५, ६, १४, ५६, ११२
टिळक, लोकमान्य बा. गं. २३, १००, १०५, १९०, १९२–९३, २२०, २५१ ३१४, ३१८
टेंपल, सर रिचर्ड १८, ११४
टेलर, कर्नल मेडोज ४३

*टेलिग्राफ ॲण्ड कूरियर* ४३,४५
ठाकरे, प्रबोधनकार के. सी. ३१६
ठोसर, देवराव ३४,१५५
डगलास, जेम्स १९३
डलहौसी, लॉर्ड ५४,८९
डेक्कन असोशिएशन १२४
*डेली टेलीग्राफ ॲन्ड डेक्कन हेराल्ड* ३०६
ढमढेरे, अप्पासाहेब ७२
ढमढेरे, मोरो वामन ७९
तर्खडकर, दादोबा पांडुरंग २४, ३७, ६५
तुकाराम, संत ३२, १४६, २५८
तेलंग, का. त्रिं. २५३
त्रिवेदी, लालशंकर उ. ११०
*तृतीयरत्न नाटक* ८४
थोरात, सरदारबहादूर दर्याजीराव १५५
दयानंद सरस्वती १४७, १४९, १५८–५९, १९२
दारूबंदी १८६–८८
दास, देशबंधू चित्तरंजन ३१४
दीक्षित–फडके, गंगाधर ५७
*दीनबंधु* १६८–६९, १७४–७६, १७८ १८०–८१, २०४, २५२, २५५, २६३, २६६, २९३–९४, ३१३
*दीनमित्र* २२३, २६६, २६८, २७१
दीनबंधु सार्वजनिक सभा २२३–२४
दुर्गाराम मंछाराम ६५
देशमुख, गोपाळ हरि (लोकहितवादी) ४; १४, २३, २५, ४०, ७९, १०९, १११, १४१, १५६–५७, १६०, १६८
धर्मांतर ६७–७१
धर्मांतराविषयी ब्रिटिश मुत्सद्यांचे धोरण ६७, ७०
धामणस्कर, रामचंद्र विठोबा १५४, २३५–३७, ३०३, ३०७
धुलीपसिंग, महाराजा ६९
नवरंगे, वा. बा. १०७, १०९, १५७
नवले, मारुतराव १५४
नाईक, उमाजी १८
नाडकर्णी, घनःश्याम २६९, २९१
नामदेव, संत २, १४६
नारायण शेषाद्री ६७, ६८
नायडू, डॉ. वरदराजलु ३१४
निग्रोंचे स्वातंत्र्य १२९
निजाम नि १८५७ चे स्वातंत्र्ययुद्ध ८९
*निर्भीड* ९८
*निबंधमाला* १६६–६९
नीत्शे ३०९
*नेटिव्ह ओपीनियन* १०१, १५७, २३२
नेहरू, पंडित जवाहरलाल २२०, ३१८
नौरोजी, दादाभाई ५३, ३१४
पडवळ, तुकाराम तात्या १०६–०९, १६२, ३०७
पंडित, विष्णुशास्त्री ३६, ११०, १५७
पंडिता, रमाबाई ५२, २१८–२१, ३११
परमहंस सभा २५, ६५, ६६, ६९, १२३
परमानंद, मामा ना. म. १०९, २०६, २३६, २५२–५३, २९३–९४, ३००, ३०७–०८
परशुराम १३०, १६८
परांजपे, स. य. १७, २९, ४५, ७५, १२३, १५५.
परुळेकर, रा. वि. १०, ४२
पाटील, कर्मवीर भाऊराव ३१९
पाटील, भाऊ कोंडाजी २२४, २५६ ३०४–०५
पाटील, बाळाजी कुसाजी २३१, २७०,

२९१–९२
पारिख, गोवर्धन ३१०
पूना असोशिएशन १२४
पूना ऑब्झरव्हर ४५, ४६, ४९
पेन, थॉमस १६
पेरी, सर थॉमस अर्स्किन ३८, ४३, ७४
पेशवे नानासाहेब ९१
पॉटिंजर, सर हेन्री ६४
प्रतापसिंह १८
*प्रभाकर* २४, २५, ५७, ५९
प्रभू, धाकजी दादाजी १४, ६५
प्रल्हाद, भक्त २१०
प्रार्थना समाज १२२, १४९–५०, १७६
प्रिन्स ऑफ वेल्सचे स्वागत २७५
प्रियोळकर, अ. का. १४
फडके, वासुदेव बळवंत १६, १७७–७८
फाटक, प्रा. न. र. ९५, ९७, १११
फुले, गोविंदराव २, ३, ९, १२, १३
३०, ३१, ९९

फुले, महात्मा जोतीराव—
शिक्षणाची पद्धत ८; शिक्षणाची परिस्थिती ११, १२; शाळेतून काढले १४; विवाह १४; शिक्षणास पुन्हा आरंभ १५; गोवंडे नि वाळवेकर यांची मैत्री १५; थॉमस पेनच्या ग्रंथाचे वाचन १६; धर्मांची मूलतत्त्वे १७; ब्रिटिश सैनिकांना झोडपले १७; ब्रिटिश राजवट उलथून पाडण्याचे विचार १५–१८; वरातीतून हाकलून लाविले १९,२०; सशस्त्रक्रांतीचा मार्ग सोडला २१; जातिभेद संस्थेविरुद्ध बंड २१; जीवनात परिवर्तन २१, २२; महाराष्ट्रातील नेतृत्व बदलते २३–२६; अतिशूद्र मुलींसाठी शाळा २८, २९; वडिलांनी घरातून हाकलून दिले ३२; 'ध्येय सोडणार नाही' ३२; ध्येयाचा साक्षात्कार ३३; शाळा समितीच्या स्वाधीन केल्या ३६; सुधारकांना संरक्षण ४१; कंपनीकडे शाळांचा वृत्तांत गेला ४६; सत्कार ४९, ५०; त्यांचे भूतदयावादी सहकारी ८१; भूतदयावाद नि मानवतावाद यांतील फरक ८१, ८२; विख्यात प्रभावी शिक्षक ८३; सत्यनारायणाच्या पोथीची कथा ८४; रात्रीची शाळा चालविली ८७; शैक्षणिक क्षेत्रातील सेवा ९२; विधवा विवाह घडवून आणला ९८; दुसरी पत्नी केली नाही ९९, १००; बालहत्याप्रतिबंधकगृहाची स्थापना ९९; वडिलांचा मृत्यू १००; ठेकेदारीचा धंदा १०२–०३; *जातिभेद विवेकसाराचे* प्रकाशक १०६–०७; घरचा पाण्याचा हौद खुला केला १११; *पोवाड्याचे पुस्तक* ११२–१३; *शिवाजीचा पवाडा* ११६–१७; *ब्राह्मणांचे कसब* ११७–२१; रानडे आणि जोतीराव यांचे ध्येय १२५–२६; सत्यशोधक समाजाची स्थापना १४४; नगरपालिकेचे सभासद १६३; चिपळूणकरांचा हल्ला १६८–७०; दुष्काळासंबंधी पत्रक १७२; नवीन पद्धतीची शेती १७९; कामगारांची चळवळ १८०, २२२; लिटनसाहेबांच्या मानपत्रास विरोध १८५; दारूचे व्यसन फैलावू नये म्हणून प्रयत्न १८६–८८; टिळक–आगरकर सत्कार १९२–९३; शेतीची नवीन उपकरणे २१५; सैनिक आणि राखीव पोलीस यांनी धरणे बांधावी २१५; धर्मांतराला विरोध २२१; जमिनदार नि सावकार यांच्यावर बहिष्कार २३२–३३; साहित्य संमेलनास

पत्र २३९; *इशारा* २४१–४३; न्हाव्यांचा संप २५७–५८; मृत्युपत्र २५८–५९; ड्यूक ऑफ कॅनॉटच्या सत्काराच्या वेळी भाषण २६४–६५; महात्मा पदवी २६९–७०; अनेक धर्मीय कुटुंबाची कल्पना २८९; परमानंद यांनी केलेले मूल्यमापन ३००–०३; वृत्तपत्रांतील फुल्यांवरील मृत्युलेख ३०५–०६; हिंदू स्त्रियांच्या उद्धाराचा अग्रदूत ३१०–११; इतिहासातील स्थान ३०८–२०

फुले मार्केट २५४
फुले, यशवंत १०९, २७१, २७४, ३००, ३०३, ३०७–०८
फुले, सावित्रीबाई ३२–३४, ३६–३८ ७६, १०१, १०९, १२७, १५० २६२, २७२, ३००, ३०३, ३०७, ३०८, ३१०
फॅरार, मिस २८
फॉकलंड, व्हाइकाऊंट ४६, ८०
फॉसेट, हेन्री २१३
फ्रँकलिन, डॉ. बेंजामिन २१३
फ्रेझर, प्रा. ७२
बळी राजा १२९, १३०
बागल, भाई माधवराव १४५, ३१६
बाजीराव (रावबाजी) ३–६, ३९
बाबा पद्मनजी (मुळे) ६९–७०, ९७ ११३, २६६, २९९
बापट, विष्णुशास्त्री ९६
*बायबल* १४८, १९६, २८७
*बालबोध* ३०६
बिभीषण १३०
बिर्जे, वा. लिंगोजी १५५
बिल्वर जात ६४
बेथून, ड्रिंकवाटर ५४, ५२
बोले, रा. ब. सी. के. ३१६
बौद्ध धर्म १३५, २०८, २८९
*बॉम्बे गॅझेट* २९६–९७
*बॉम्बे गार्डियन* २९, ३३–३४, ४४, ५०, ६६, ६९, ७५
*बॉम्बे टाईम्स* ९१
ब्राऊन, न्यायाधीश ३८
ब्राह्म समाज १४६, १४९–५०
'ब्राह्मण न्हावी' २५८
ब्राह्मणेतर ५६, १७६, १९०, २२९, २३२, २४५, २५३, २५७, ३०६, ३१५, ३१९
ब्रिटिशांचे शिक्षणविषयक धोरण ११, ६१, ६२
ब्रूटस २१०
भवाळकर, केशवराव १४, १५, २५ ३४, ३६, ४०, ४१, ६६
भंगी आणि महार कामगारांचा संप २९२
भागवत, दुर्गाबाई २६३
भागवतधर्म १४८
भागवत, राजारामशास्त्री २२१, २६३
भांडारकर, डॉ. रा. गो. १११, १४९, २३६, २४१
भांडारकर, विनायकराव १०९, ११३, १६२, १८४
भालेकर, कृष्णराव १६०, १६८, १८०, २३९, २६२, २६६, २७५, ३०४
भृगु १३१
मंडलिक, रावसाहेब वि. ना. ८५, २१४
मदन श्रीकृष्ण १०९
*मनुस्मृति* ३०, १३०, १३५
मऱ्हाठा १९०–९१
मराठी साम्राज्य ७

—पाडाव ७
—शेतकऱ्यांची स्थिती, ४–६
मराठी विरुद्ध संस्कृत ३९–४२
मलबारी २१९–२०
महंमद पैगंबर २४८
महाजन, भाऊ २३–२५
महाभारत १३९, ३११
महार इंग्रजाकडे का जातो ११२
मार्क्स, कार्ल २३
मांडे, बापू रावजी ३६, ३८, ४०, ५०, ७२, ९१
मानवतावाद ८२, ३११
मानवधर्मसभा ६५
माळी, संत सावता २, १४६
मिचेल, रे. मरे ६२–६३, ७५, ९१
मिडकिंग २२२
मिल्टन आंग्लकवी ३८
मुकुंदराज, कवी १३५
मुनशी, गफ्फार वेग १५
मुसलमान २१०, २१३, २२६, २४५, २४८, २७९
मुसल्मान धर्म १६, २१०, २४६, २४८, २८६, २८९
मेकॉले, थॉमस बॅबींग्टन ११, १३९
मेथा, फेरोजशहा २५१
म्हस्के, गंगाराम भाऊ १५१, १६२
*यमुनापर्यटन* ९७
यंदे, दामोदरपंत सावळाराम १८०, १९२
रखमाबाई २९८
*राईट्स ऑफ मॅन* १६
राजवाडे, कृष्णशास्त्री ५९, २३९
राजवाडे, वि. का. ९१
रानडे, न्यायमूर्ती म. गो. ५२, १०९, १२५–२६, १४०, १४९, १५५–५६, १५८–५९, १६८, २३०, २३९, २४१, २५१
राम, २८७
रामभाऊ मन्साराम १५१, १७२
रामदास, संत १३५, २५३
राष्ट्रीय गाड्याची कल्पना २७६
राष्ट्रीय सभा २४९–५२, २७६–७७
रिपन, लॉर्ड १६३, २०४
रीव्हज, एच. व्ही. ४३, ७९, ८८
रे, आचार्य प्रफुल्लचंद्र ३१४
रे मार्केट २५४
रे, लॉर्ड २५४
रोपर, सर हेन्री ६७
रोमा रोलाँ १५७
रॉबर्टसन् ६
रॉय, राममोहन २३, ५२, १३९, १४७–४९
लंडनमधील महिलांची सहानुभूती २९८
लजपतराय, लाला २२०
लठ्ठे, आण्णा बाबाजी २३१
लहुजीबुवा मांग १६, ७६, १७८
लाड, डॉ. भाऊ दाजी ४५, ३०२
लाड, डॉ. संतूजी रामजी १५४, २४९, ३००
लिंकन, अब्राहम १२९
लिटन, लॉर्ड १२३, १८५
लुम्सडेन ३८, ७४
लोखंडे, नारायणराव मेघाजी १५४, १८०–८३, २२२, २२५, २५६, २६२, ३००, ३१३
लोपामुद्रा ५४
ल्यूथर ३१२
वर्डस्वर्थ ३१९
वलंगकर, गो. बा. २४८

वामन १३०
*वार्ताहर* २६३
वाळवेकर, मोरो विठ्ठल १५, ३४, ७५, ८०, १२३, ३००, ३०४–०५
वाळिंबे, डॉ. रा. शं. ६
विधवेचा पुनर्विवाह ९८, ११०, १३४
विधवेची करुण कहाणी ९३–९६
*विमेन पेनी पेपर* २९७
विल्बरफोर्स, विल्यम ३१२
विल्सन, डॉ. जॉन ७०
*विविधज्ञानविस्तार* ११५, १५६, १६४–६५
विवेकानंद २२०, ३१२
विष्णु १३०–३१
वुडचा खलिता ६२, ८०
वेडरबर्न, विल्यम २७७
वेद १३५, १४८, २८७, ३१७
वेदसमाचार संस्था १२४
*वेदाचार* ८७
वेलिंग्टन, ड्यूक ऑफ ६७
वेस्ट्राप, सर एम. आर. २३०
वैद्य, लक्ष्मण ग. (दिवाण, बडोदा) २५२
वॉर्डन, जॉन ३५, ३७, ७६
वॉशिंग्टन, जॉर्ज १६, २०
वॉशिंग्टन, बुकर टी २६९
व्हिक्टोरिया राणी ११४, २४७–४८
शंकराचार्यांना दंड २१७
शार्प, हेन्री ४२
शाहू महाराज, छत्रपती ३१९
शिवाजी ७, १६, २०, ३८, १७५, १९३–९४, २२८, २४१, २५३, २७९, ३१८
शिंदे, कर्मवीर विठ्ठल रामजी २३, ३१९
शिंदे, माधवराव ३१९
*शुभवर्तमान* १२८
*शेतकऱ्याचा असूड*, २०३–०६, २१०–१६
शेतकऱ्याचा पुतळा, २७६
श्रीकृष्ण २७८, २८६
श्रीपत शेषाद्री ६७, ६८
सकपाळ, रामजी १५९
सती ९५
'सत्यमेव जयते' २६६, २७२, ३२०
*सत्यदीपिका* १६१
*सत्सार* भाग १ ला २४४–४५
सत्सार भाग २ रा २४६–४७
समाजवाद, २३५
*सरस्वतीमंडल* १३९, २५२
ससाणे, ग्यानोबा १७७, २७१, ३००, ३०४
साठे, मोरशास्त्री १२४
सार्वजनिक सभा १२३, २३५
सालरजंग, सर ८९
सावरकर, वीर वि. दा. २३, १६०, २२०
सीझर, ज्युलिअस, याचा वध २१०
'सुधारला' याचा अर्थ ८५
*सुबोधपत्रिका* ११०, १५१, १६१, २१५
सेन, केशवचंद्र १४८
स्टूडंटस लिटररी ॲन्ड सायंटिफिक सोसायटी ५३, ५४, ६६
स्त्रीविचारवती सभा १२६
स्त्रीशिक्षण १७, २९, ३६, ३८, ४९, ५४, ७३, ७५, २४५, २४७
हंटर शिक्षणसमिती १९५
हनीबॉल २१०
हार्ट–डेव्हिस २३४
हिंदुधर्म १६, १७, ५८, ६६, ६८, ६९

८५, १०८, १५८, १६४–६६, २०९, २१८, २२०, २४६, २५१ २६५, २७४
हिंदू स्त्रीची परिस्थिती ७४, ७५
हिंदूंच्या निष्ठुर रूढी ९४
*हिस्टॉरिकल स्केच ऑफ साऊथ इंडिया* १३९
हेंडरसन ७०
हॅरिसन, सी. एम्. ९१, ९२
हॅम्टन, एच. व्ही. ११, ३९
हॅरे, डेव्हिड ५२
क्षत्रिय १३०, १३५–३६
*ज्ञानप्रकाश* १३, ४६, ४९, ५१, ५८, ७७, ७८, ९८, १०९, १६१, १८६ १९१, २४१, २९३
ज्ञानेश्वर ४२, १३५, २६१, ३१८
*ज्ञानेश्वरी* २८६
*ज्ञानोदय* ४६–४८, ५४, ५६–५८, ७७, ७८, १११, १५३, १८८, २२१, २२५, २२८, २३९, ३०६.

## चुकांची दुरुस्ती

काना, मात्रा, अनुस्वार, वेलांटी व रफार गळण्याच्या चुका दुरुस्त केल्या नाहीत. ज्या चुका विशेष अनर्थकारक वाटल्या त्यांची दुरुस्ती खाली दिली आहे.

| पृष्ठ | ओळ | चूक | दुरुस्ती |
|---|---|---|---|
| १५ | ९ | दाविणारे | दाखविणारे |
| ३८ | २६ | मारास | सुमारास |
| ४६ | १ | व्हिसकाऊंट | व्हाइकाऊंट |
| ५८ | १३ | र्व | सर्व |
| ६२ | ४ | वुडस्कृत | वुडकृत |
| ७९ | ८ | श्रमंत | श्रीमंत |
| ८० | ९ | व्हिसकाऊंट | व्हाइकाऊंट फॉकलंड |
| १४७ | २२ | उख–न | उखडून |
| २२१ | ५ | जगन्नाथ सदाशिव | सदाशिवराव |
| २३१ | १ | विनश्वाथ | विश्वनाथ |
| २४१ | ३१ | डाल | डौल |
| २६३ | १० | फवडपणे | फडवटपणे |



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अ. क्र. ९६०४८

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## लेखक : धनंजय कीर

...अशा वादळी व्यक्तीचे चरित्र लिहिणे हे सोपे काम नव्हे. पण श्री. कीर यांना झंझावाती व्यक्तींची चरित्रे लिहिण्याचा एव्हाना सराव झालेला दिसतो. किंबहुना अशा व्यक्तींच्याकडेच ते सहजपणे आकृष्ट होत असावेत. आतापर्यंत वीर सावरकर, लोकमान्य टिळक, महात्मा फुले यांची चरित्रे त्यांनी लिहिली. त्यावरून माझ्या विधानाला पुष्टी मिळाली नाही का ? श्री. कीर यांची भाषा, निवेदनशैली, विषयाची मांडणी व बांधणी ही सर्व कशी ठाकठीक आहेत. डॉ. आंबेडकरांचा अमर्याद महत्त्वाकांक्षी स्वभाव, त्यांची कष्ट सोसण्याची तयारी, त्यांची प्रगाढ बुद्धी, त्यांचे नेतृत्वगुण, त्यांची निर्भयता, त्यांच्या पर्वतप्राय व्यक्तिमत्वाचे पैलू, चरित्रलेखकाने यथार्थपणे उभे केलेले आहेत. आणि त्या त्या प्रसंगाला साजेशी भाषा त्यांच्या लेखणीमधून अनायासे प्रकटलेली आहे. स्वतःची भूमिका मांडताना चरित्रनायकाचे दैवतीकरण करू नये, दानवीकरणही करू नये. त्याचे करावे मानवीकरण, हे जे सूत्र श्री. कीर यांनी प्रस्तावनेमध्ये सांगितलेले आहे त्याचे पूर्ण पालन आपल्या ग्रंथात त्यांनी केले असल्याकारणाने त्यांचे विशेष अभिनंदन करावेसे वाटते.

—**ना. ग. गोरे,** आकाशवाणी, पुणे

...अशा सराईत चरित्रकाराचे हे मराठीतले पहिले पदार्पण आहे आणि ते मोठे आकर्षक ठरले आहे. कीर यांनी हा वृत्तांत परिणामकारकपणे चित्रित केलेला आहे. कालानुक्रमपद्धती अनुसरली आहे. सत्याची कास सोडलेली नाही. व्यक्तीला काळात बुडवून टाकले नाही. व्यक्ती आणि परिस्थिती यांच्या बारीकसारीक प्रतिक्रिया देत देत त्यांनी डॉ. आंबेडकरांची वाङ्मयमूर्ती साकार केलेली आहे. प्रस्तावनेत भूमिका निवेदन करताना कीरांनी प्रतिज्ञा केली आहे. चरित्रनायकाचे दैवतीकरण किंवा दानवीकरण न करता मानवीकरण केले पाहिजे. हे एकार्थी बरे झाले. कारण चरित्रविषयाला यथायोग्य तो न्याय केला आहे.'

—**डॉ. स. गं. मालशे,** आकाशवाणी, मुंबई

...ह्या चरित्राची सोपी पण प्रौढ भाषेची जडणघडण पाहिली की श्री. धनंजय कीर यांना "सव्यसाची धनंजय" ही रास्त पदवी देण्याचा मोह आम्हांस टाळता येतच नाही...कोटी गणती बहिष्कृतांना सर्वांगीण अधःपाताच्या अंधारातून, याच देही याच डोळा, उज्ज्वल भविष्याच्या लख्ख प्रकाशात आणून उभे करण्यात डॉ. आंबेडकरांनी गाजविलेला विचार-उच्चार-आचाराचा पराक्रम अक्षरशः न भूतो न भविष्यति असाच झाला. त्या पराक्रमाचे शब्दचित्रण सव्यसाची धनंजयांनीही कौतुकास्पद केले आहे.

—**मार्मिक**

ह्या सुमारे साडेपाचशे पृष्ठांच्या ग्रंथात डॉ. आंबेडकर यांच्या जीवनाची व कार्याची सविस्तर व सटीक माहिती दिली आहे. श्री. कीर यांनी अनेक थोर पुरुषांची चरित्रे इंग्रजीत लिहिली आहेत. चांगले इंग्रजी लिहिण्याचे आपले सामर्थ्य त्यांनी सिद्ध केले आहे. या मराठीत लिहिलेल्या चरित्राने असे दाखवून दिले आहे की, त्यांना इंग्रजी-प्रमाणे, किंबहुना अधिक प्रभावाने मराठी हाताळता येते. त्यांची भाषाशैली प्रसंगी किती सुटसुटीत, अल्प शब्दात बव्हर्थ व्यक्त करणारी, वाचकाच्या मनाची पकड घेणारी होते. ते दाखविण्यासाठी पुढील उतारा पहा...

...नियतकालिकांची मते देऊन आपला निःपक्षपातीपणा व सत्यप्रियता दाखवून दिली आहे.

—नवनीत

'...मराठी वाचकांसाठी पुन्हा नव्याने आंबेडकर चरित्र लिहून मराठी वाङ्मयात एक अमोलिक भर घातली आहे खास...आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रमुख वैशिष्ट्यांचे झळाळते दर्शन श्री. कीर ह्यांनी आपल्या आंबेडकर चरित्रातून तर घडविलेच आहे; परंतु एक धर्मसुधारक ह्या नात्याने भारताच्या इतिहासातले आंबेडकरांचे योग्य ते स्थान आणि श्रेयही त्यांना देऊन केवळ वाङ्मयीनच नव्हे तर ऐतिहासिक कामगिरी बजावली आहे असे योग्य आदराने म्हटले पाहिजे.

—मराठा

...डॉ. आंबेडकरांची विविध दर्शने या चरित्रग्रंथात दिसून येतात. प्रत्येक दर्शन हिऱ्याच्या पैलूप्रमाणे तेजस्वी आहे. हुषार, विद्वान, विधिज्ञ, अस्पृश्यवर्णाचा उद्धारकर्ता, धर्माचा तौलनिक अभ्यास करणारा धर्मशास्त्रज्ञ, प्रेमळ पती, गरीबांचा कनवाळू, पुस्तकांच्या ढिगाऱ्यात लपलेला चिकित्सक विचारवंत, दारिद्र्यात जन्म घेऊन राजैश्वर्य लाभलेला आणि शेवटी सर्वसंगपरित्याग करून "बुद्धं सरणं गच्छामि" म्हणणारा सर्वश्रेष्ठ भिक्षू या आंबेडकरांच्या जीवनातील एकाहून एक चढत्या मनोऱ्यांचे दर्शन या ग्रंथात घडते. संबंध चरित्र वाचून पुरे झाल्यावर वाचक आजचा भारत घडविणाऱ्या शिल्पकारांपैकी एकाचे विश्वरूपदर्शन जणू घडले अशा विचाराने भारावून जातो व ते दर्शन घडविणाऱ्या चरित्रलेखकास मनोमन धन्यवाद देतो.

—धनुर्धारी

५७० पृष्ठे छायाचित्रे २० पृष्ठे

किंमत चोवीस रुपये

# वीर सावरकर

## लेखक : धनंजय कीर

## अनुवादक : द. पां. खांबेटे

इंग्रजी दुसऱ्या आवृत्तीवरील अभिप्राय

..A very vivid canvas of political events in India before the commencement of World War II leading right upto the partition and thereafter is painted in this informative work which is a must for any student of Indian politics......

—THE TIMES OF INDIA

..Savarkar had a scathing contempt for hypocrisy, whether in society, religion or politics. His life and services have been truly historic and it is as well that Dhananjay Keer has done justice to it by his very stimulating study. This book deserves to be read by all and it should find an honoured place in every library..

—THE MAIL

...As perhaps the only misunderstood and misinterpreted national hero, Savarkar was certainly in need of a discerning biographer, and the present book gives proof that the author possesses that quality in good measure.

. the very fact that he is aware of biography being both history and art has raised the level of his work far above Biographical writing generally done in this country. For a student of India's nationhood—and for those colouring under fashionable misconceptions about India's recent history—this book is certainly a must...

—THE ORGANISER

वीर सावरकर म्हणजे राज्यक्रांतीच्या ज्वालामुखीला नितांत अभयाने छातीठोक तोंड देणारा महाराष्ट्राचा पुरुषोत्तम वीर. त्या वीरोत्तमाचे चरित्र सव्यसाची धनंजय कीरांनीही —लेखनापुरतेच का होईना—तितक्याच सहृदयतेने नि निस्पृहतेने शब्दांकित केले आहे.

**—मार्मिक**

.New information and new facts prese nted in a simple style enlivens its passages. The author Shri Dhananjay Keer has tried to make the biography as complete as possible and to bring out Savarkar's personality and achievements... "

—THE BHART JYOTI

जिज्ञासू नि अभ्यासू वाचकांनी हे पुस्तक मुळात वाचले तर पाहिजेच, परंतु एखाद्या पवित्र ज्ञानग्रंथाप्रमाणे संग्रही बाळगले पाहिजे नि त्याचे पुन्हा पुन्हा पारायण केले पाहिजे. सावरकरांसारख्या खऱ्याखुऱ्या राष्ट्रपुरुषाचे, भारतरत्नाचे चरित्र लिहिण्यास त्याच्या सारखा समर्थ लेखक लाभला हे आमचे परम भाग्य. नाहीतर सावरकरांच्या संबंधीच्या अनेक गैरसमजांच्या भुतावळीतच आम्ही अखेर गोंधळून गेलो असतो नि खरे सावरकर आम्हाला कधी समजलेच नसते.

—धनुर्धारी

In trying to capture those dramatic movements of success and frustrations, the writer, who is also a well-known biographer, had to give his best in his monumental work '*Veer Savarkar*' The style is good and the work is an authentic biography which can be quoted for reference.

—THE AMRITA BAZAR PATRIKA

त्यात चरित्र लिहिणारे श्री. धनंजय कीर यांच्यासारखे वाक्बगार आणि विचारवंत लेखणीबहाद्दर जिवाशिवाची भेट व्हावी तसेच 'वीरांना कीर' भेटले असे हर्षाने म्हणावे लागते. असे हे माहिती आणि विवेचन या दृष्टीने साधार अन् परिपूर्ण असलेले, विषय आणि शैली यांच्या अजोड मिलाफाने आकर्षक बनलेले अवीट चरित्र प्रत्येक व्यक्तीने अवश्य वाचावे अशी आम्ही आग्रहपूर्वक शिफारस करतो. इंग्रजी भाषेत या पुस्तकाने एका आकर्षक नि आदर्श चरित्रग्रंथाची मौलिक भर टाकली आहे याविषयी दुमत होणार नाही.

—मराठा

The definitive biography by Sri Dhananjay Keer is indeed an eye-opener —Keer's great love and devotion to his hero makes him wield a powerful pen. His writing is uniformly clear, always cogent and occasionally inspired. The best course would be to translate Keer's biography into our language.

—THE ANDHRA JYOTI

सुमारे ६०० पृष्ठे, अनेक छायाचित्रे

किंमत तीस रुपये

९८०८६

REFBK-0016040